म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. २९३७

मराठी साहित्याचे आदिबंध

REFBK-0023583

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, त्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा द्यावी लागेल.

12 DEC 1990

UG 1989

6 OCT

92153

11 JAN 1984

1 FEB 1984

22 FEB 1984

27/3/85

4/9/85

10 JAN 1985

24 SEP 1990

12 JAN 1986

27 APR 1986

18 MAY 19

8 OCT 1986

25 JAN 1987

16 OCT 1991

27 APR 1987

27 APR 1988

(K. M. H.)

4000-8-70

संदर्भ ग्रंथ (वाङ्मय समीक्षा
2345C3
2936 अ.क्र.
पा.टा.C2

मराठी साहित्याचे आदिबंध

मराठी साहित्याचे आदिबंध

डॉ. अुषा माधव देशमुख

उषा

REFBK-0023583

लोकवाङ्मय गृह प्रा. लि., मुंबई ४०० ००४.

म/३०७

© डॉ. विजय माधव देशमुख

प्रथमावृत्ती : २४ जून १९८२

मुखपृष्ठ : भ. मा. परसवाळे

मूल्य : चाळीस रुपये

प्रकाशक :
आर. जी. देसाई,
लोकवाङ्मय गृह प्रा. लि.,
१९०-बी, खेतवाडी मेन रोड,
गिरगाव, मुंबई ४०० ००४.

मुद्रक :
आर. जी. देसाई,
न्यू एज प्रिंटिंग प्रेस,
८५ सयानी रोड, प्रभादेवी,
मुंबई ४०० ०२५.

दादा, भाऊ, अरविंद
आक्का आणि सौ. मालती
— या भावंडांना

तेराव्या शतकाचा सरता काळ आणि मराठी साहित्याची निर्मिती यांचा अन्योन्यसंबंध आहे. गीतेचा अनुबंध आणि भारतीय संस्कृतीचो परंपरा व त्या परंपरेचा डोळसपणे व पुरोगामीपद्धतीने ज्ञानदेवांनी लावलेला अन्वयार्थ या साऱ्याच गोष्टी मराठी माणसाच्या संचिताप्रमाणे वडिलोपार्जित वारसाहक्काने त्याला मिळाल्या आहेत. वेदांची परंपरा, हिंदुधर्माची सर्वसमावेशकता व विचारांची आधुनिकता या तिन्ही गोष्टींचा संगम ज्ञानेश्वरीत झाला आहे. संपूर्ण मानवी जीवन त्याकाळात धर्माने अनुबंधित झाले असल्यामुळे धर्मभावना हीच जीवन जगण्यातील मूल प्रेरणा म्हणून निश्चित झालेली होती व सर्व समाजाने ती स्वीकारलीही होती. आचार नियंत्रण, विचार नियंत्रण आणि व्यक्ती, कुटुंब आणि समाज यांचे परस्परांचे नियंत्रण धर्म करीत असे. भारतीय जीवनाला धर्माचे अधिष्ठान परंपरेने प्राचीन काळापासून मिळाले आहे. ही परंपरा वेदांपासून ज्ञात आहे. धर्मविचारांची सातत्याने प्रत्येक शतकात अनेक अंगांनी घुसळण होत जाऊन त्यातून विविध विचारप्रणाली एकीकडे निर्माण होत गेल्या तर दुसरीकडे त्या विचार-प्रणालींना सामावणारी ग्रंथसंपदा तयार होत गेली. टीका, टिप्पणी, चर्चा, प्रबंधलेखन या मार्गाने तात्त्विक विचारांची छाननी होऊ लागली. काव्यनिर्मिती आणि गद्यनिर्मितीही याच काळात सातत्याने होऊ लागली. धर्म हेच अधिष्ठान समाजमनाने स्वीकारलेले असल्यामुळे ईश्वरविषयक चिंतनाला आणि भक्तियुक्त अशा परमार्थ मार्गाला एक सर्वंकष अशी गती मिळून बहुजन समाजातून आत्मोद्गाराचे तरंग उमटू लागले. परमार्थाकडून मोक्षाकडे जाण्याची वाटचाल आपल्या आपल्या पद्धतीने आणि प्रवृत्तीसह मराठी लेखक करू लागले व मराठी साहित्याच्या एका महान युगाचा प्रारंभ झाला. ईश्वरविषयक चिंतनामधून उपासना निर्माण झाली आणि जीव व परब्रह्म यांचा जगाशी जो संबंध त्याच्या चिंतनातून तत्त्वविचारांचाही सुसंगत पाठपुरावा होऊ लागला. महानुभाव पंथीयांत पंडितांचा विशेष समावेश होता. चक्रधरांची विचारप्रणाली व तत्त्वज्ञान त्यांनी स्वीकारून तो दृष्टिकोण समाजासमोर मांडला. ईश्वरविषयक चिंतन करीत असतानाच ब्रह्म आणि मानवी जीव यांचा परस्पर संदर्भ शोधण्याचाही प्रयत्न साहित्यातून होत गेला. अनेकरंगी साहित्य या काळात निर्माण होत असतानाच ते साहित्य प्रामुख्याने भक्तिविचाराशी आणि मूलतः कृष्णभक्तीशी एकनिष्ठ राहिले. त्यामुळे मराठी वाङ्मयाची सुरुवात विषयाच्या दृष्टीने एकदेशीच झाली असली तरी मनामनांच्या रंगाने रंगलेली भक्ती त्यातून व्यक्त झाल्यामुळे तीत आत्माविष्कारासह विविधता आली. या विविधतेतच मराठी साहित्याचे विविध आकृतिबंध निर्माण करण्याचे सामर्थ्यही आले. महानुभाव शास्त्री पंडितांना आणि मुकुंदराज ज्ञानेश्वरांना स्वनिर्मितीविषयी निश्चितच सूक्ष्म जाण होती; परंतु ज्ञानेश्वरांपाठोपाठ निर्माण झालेली संतांची जी मांदियाळी होती ती उत्कटपणे आपल्या मनोभावांसह ईश्वराच्या सगुणरूपाला आळविता आळविता ऐहिकातून पारलौकिकापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न

करीत राहिली. भौतिकवादाचा किंवा विज्ञानाचा परिचय नसतानाही केवळ प्रखर आत्मज्ञानिवेच्या बळावर संतकवींनी ईश्वरी चैतन्याला सगुणरूपात न्याहाळले. विलक्षण स्नेहाने आणि आदराने चिंब भिजलेल्या भक्तीची थरथर त्यांच्या मुखावाटे अव्याहत झरू लागली. लौकिक जीवनव्यवहारातील प्रतिमा व प्रतीके आपोआपच कवितेतून प्रतिबिंबित होऊ लागली. माणसाची नैतिकता, विचारांची सूक्ष्मता तीत आली आणि ईश्वरावरील भक्तीच्या आणि अध्यात्माच्या साह्याने आत्मानुभवी व आत्मसाक्षात्कारी संत म्हणून बहुजनसमाजातील अनेक जातीजमातीतील माणसांना मान्यता मिळाली. स्त्रियांना उद्‌गार स्वातंत्र्य मिळाले. सगुणभक्तीसाठी नामसंकीर्तनाचे सुलभ माध्यम संतांनीच निर्माण केले.

वसंतऋतू येताच कोकिळा गाऊ लागाव्या व पंचक्रोशी त्या गायनाने धुंद व्हाव्या तसे तेराव्या शतकात घडले. नामसंकीर्तनाच्या सुलभ भक्तिमार्गाची मुहूर्तमेढ ज्ञानेश्वर, नामदेवांनी घालून देताच सगळा महाराष्ट्र पंढरीच्या मेहुणाच्या नामसंकीर्तनात दंग झाला. भक्तीची उत्कटता आणि सगुणोपासनेतील आर्तता यामधून पहिली ओवी आणि पहिला अभंग तेराव्या शतकात निर्माण झाला. भागवत संप्रदायातील कवींनी भाष्यकाव्य आणि तत्त्वचिंतनपर काव्याबरोबरच उत्कट आत्मनिष्ठ सौंदर्यलयी अशा भावकाव्याची गंगा निरंतर वाहाती ठेवली. तर महानुभाव लेखकांनी संस्कृतपरंपरेला अनुसरून व चक्रधर स्वामींच्या विचारसरणीला स्वीकारून दीर्घकथाकाव्य व आख्यानकाव्याची निर्मिती करून त्यातून चक्रधरप्रणित द्वैततत्त्वज्ञानाचा पुरस्कार आणि प्रचार सातत्याने सुरू ठेवला. केवळ कवितेची साक्ष काढली तरी मुकुंदराज, ज्ञानेश्वर, दामोदर, नरेंद्र, भास्करभट्ट, रवळोबास, विश्वनाथ यांची तत्त्वचिंतनात्मक आणि द्वैती-अद्वैती तत्त्वविचारसरणीचा पुरस्कार करणारी व त्यातून प्रपंच, जीव, जगत परमेश्वर यांमधील अन्तःसूत्र शोधू बघणारी कविता निर्माण झाली. या कवितेने रचनासंस्कार स्वीकारले ते प्रामुख्याने संस्कृतातील महाकाव्य रचनेचे व पुराणरचनेचे. 'विवेकसिंधू', 'ज्ञानेश्वरी' व 'अमृतानुभव' यामध्ये आलेली संवादपरंपरा प्राचीन पुराण परंपरेशी अनुभवदृष्ट्या अनुबंधित आहे; तर नरेंद्र, भास्कर, विश्वनाथ यांची निर्मिती संस्कृत महाकाव्याचा आदर्श स्वीकारू बघणारी आहे. पांडित्यप्रदर्शन, विदग्धता, नवरसांचा आविष्कार, ऋतुवर्णने, व्यक्तिवर्णने, नायक-नायिका वर्णनातील पारंपारिकता या दृष्टीने संस्कृत पंचमहाकाव्यांचा फार मोठा प्रभाव महानुभाव दीर्घ कवितेवर व स्फुट कथा कवितेवर पडला तर मुकुंदराज ज्ञानेश्वर यांनी उपनिषदांतील संवादरचना अधिकच संस्कारित करून तत्त्वांचे निरूपण केले. भागवत सांप्रदायिकांनी काव्यविषयक स्वीकारलेला दृष्टिकोण आणि महानुभाव कवींनी स्वीकारलेला काव्यविषयक दृष्टिकोण यांच्या मीलनाने तेराव्या शतकातील मराठी कवितेला वैविध्य प्राप्त झाले. तत्त्वचिंतनातून आलेले विचारगांभीर्य आणि महाकाव्य पुराणपरंपरांच्या स्वीकारामुळे आलेले वैदग्ध्य या दोन किनाऱ्यांनी ही कविता बांधली गेली. नाथसंप्रदायाच्या प्रभावातून गुरुनिष्ठेचा विशेष प्रभाव या

काळातील कवींवर झाल्यामुळे गुरुवंदन, गुरुवर्णन आणि गुरुचिंतन करण्यातही कवी एकरूप झालेले दिसतात व त्याचा परिणाम म्हणजे चरित्रकाव्याची निर्मिती होत गेली. महानुभावांची गद्यचरित्रे जशी बोलीभाषेतून तत्कालिन महाराष्ट्राचे ऐतिहासिक, भौगोलिक, सामाजिक, धार्मिक, आध्यात्मिक आणि वाङ्मयीन दर्शन घडविण्यास समर्थ ठरली; त्याचप्रमाणे चरित्रकवितेने गुरुनिष्ठेतून स्फुरण घेऊन आज उपलब्ध नसलेल्या चरित्रांना कवितेतून जन्म दिला. नामदेवाने ज्ञानेश्वरांचे उभे केलेले चरित्र, जनाबाईने नामदेवाचे गोचर केलेले चाळीस माणसांचे संसारचित्र, सोयराबाईने साक्षात केलेले गोरोबाचे चरित्र, सह्याद्रिवर्णनात आलेले दत्तात्रेयप्रभूंचे चरित्र, 'ऋधिपूरवर्णना'तील 'ऋधिपूर' महात्म्य आणि गोविंदप्रभू चरित्र, 'मूर्तिप्रकाशा'तील चक्रधरचरित्र, गद्यचरित्राबरोबरच काव्य-चरित्रेही निर्माण झालीत व त्यातून ईश्वररूप असलेल्या पंचकृष्णाचे महानुभाव कवींनी आणि श्रेष्ठ भक्त असलेल्या ज्ञानेश्वरांचे व त्यांच्या भक्तमंडळाचे चरित्र गुरुनिष्ठेतून निर्माण होत जाऊन 'चरित्रकाव्य' हा एक लक्षणीय असा वाङ्मयाचा आकृतिबंध निर्माण झाला व पुढे महीपतीने व मोरोपंतांनी या कवितेचा विशेष विस्तार केला. आजही यशवंतांच्या 'शिवायन' सारखी कविता शिवचरित्राचीच प्रतीती देते.

ज्ञानेश्वर, नामदेव, मुक्ताबाई, चोखामेळा, जनाबाई, गोराकुंभार, सावतामाळी, कान्होपात्रा या सर्व कवींनी अभंगांतून सगुणभक्तीचा आणि आत्मसाक्षात्काराचा उत्कट आविष्कार केला व मराठी भावकवितेचा जन्म झाला. तत्त्वचिंतनपर कवितेतून निर्गुण-निराकार ईश्वराचे अविकारी स्वरूप शोधले गेले तर अभंगातून मानसपातळीवर व भाव पातळीवर जाणवलेले अविकारी व सगुण सावळे ईश्वरी रूप व्यक्त झाले. सगुणोपासना व निर्गुणोपासना नामसंकीर्तनातून व भक्तिसंकीर्तनातून अभिव्यक्त झाली. भावनांची व्यामिश्रवलये, प्रतिमांचे साधर्म्य आणि वैधर्म्य आणि कविमनांचा मंचकावर अधिष्ठिलेल्या सावळ्या सगुण मूर्तीचे चित्रमयी दर्शन अभंगा अभंगांतून घडले. एका सौंदर्यलक्षी गेय भावकाव्याचा (Romantic lyric) जन्म झाला. आणि हरिहरैक्याच्या पुरस्काराचीही मेढ रोवली गेली. परमार्थमार्गावरील भक्ती व आध्यात्मिक मार्गाने आत्मसाक्षात्कार, या कवितेतून गोचर होत गेला व त्यातून सर्जनशील काव्याची निर्मिती झाली. सर्व ऐहिक बंधने स्वीकारलेली असूनही व आश्रमव्यवस्था व जातिव्यवस्था मान्य करूनही ही कवि-मंडळे मनाने मुक्त आणि ईश्वरमय झालेली होती त्याचा परिणाम असा झाला की बहुजन समाजाला ईश्वरचिंतनाचा एक डोळस मार्ग मिळाला. एक आध्यात्मिक नेतृत्व मिळाले. बहुजनसमाजाच्या मनाचा आतला आवाज कुठेतरी स्पष्ट होत गेला व त्यातून लौकिक राजकीयदृष्ट्या महाराष्ट्राची पडझड होत असतानाही समाजमन मात्र अभंग राहिले. दणकट राहिले. ईश्वरी नामसंकीर्तनाने घराघरांना, वस्त्या-वस्त्यांना, कुटुंबा कुटुंबांना, खेड्यापाड्यांना आणि संपूर्ण महाराष्ट्राला जातीचे बंधन स्वीकारूनही जागृत केले. त्यांना अध्यात्माची आणि ईश्वरसंकीर्तनाची द्वारे खुली झाली. अभिजात काव्यपरंपरा आणि सौंदर्यलक्षी भावकाव्य परंपरा या दोन्ही परंपरा निर्माण करण्याचे श्रेय भागवत व महानुभाव कवींकडे जाते व

करीत राहिली. भौतिकवादाचा किंवा विज्ञानाचा परिचय नसतानाही केवळ प्रखर आत्मज्ञाणिवेच्या बळावर संतकवींनी ईश्वरी चैतन्याला सगुणरूपात न्याहाळले. विलक्षण स्नेहाने आणि आदराने चिंब भिजलेल्या भक्तीची थरथर त्यांच्या मुखावाटे अव्याहत झरू लागली. लौकिक जीवनव्यवहारातील प्रतिमा व प्रतीके आपोआपच कवितेतून प्रतिबिंबित होऊ लागली. माणसाची नैतिकता, विचारांची सूक्ष्मता तीत आली आणि ईश्वरावरील भक्तीच्या आणि अध्यात्माच्या साह्याने आत्मानुभवी व आत्मसाक्षात्कारी संत म्हणून बहुजनसमाजातील अनेक जातीजमातीतील माणसांना मान्यता मिळाली. स्त्रियांना उद्‌गार स्वातंत्र्य मिळाले. सगुणभक्तीसाठी नामसंकीर्तनाचे सुलभ माध्यम संतांनीच निर्माण केले.

वसंतऋतू येताच कोकिळा गाऊ लागाव्या व पंचक्रोशी त्या गायनाने धुंद व्हाव्या तसे तेराव्या शतकात घडले. नामसंकीर्तनाच्या सुलभ भक्तिमार्गाची मुहूर्तमेढ ज्ञानेश्वर, नामदेवांनी घालून देताच सगळा महाराष्ट्र पंढरीच्या मेहुणाच्या नामसंकीर्तनात दंग झाला. भक्तीची उत्कटता आणि सगुणोपासनेतील आर्तता यामधून पहिली ओवी आणि पहिला अभंग तेराव्या शतकात निर्माण झाला. भागवत संप्रदायातील कवींनी भाष्यकाव्य आणि तत्त्वचिंतनपर काव्याबरोबरच उत्कट आत्मनिष्ठ सौंदर्यलयी अशा भावकाव्याची गंगा निरंतर वाहाती ठेवली. तर महानुभाव लेखकांनी संस्कृतपरंपरेला अनुसरून व चक्रधर स्वामींच्या विचारसरणीला स्वीकारून दीर्घकथाकाव्य व आख्यानकाव्याची निर्मिती करून त्यातून चक्रधरप्रणित द्वैततत्त्वज्ञानाचा पुरस्कार आणि प्रचार सातत्याने सुरू ठेवला. केवळ कवितेची साक्ष काढली तरी मुकुंदराज, ज्ञानेश्वर, दामोदर, नरेंद्र, भास्करभट्ट, रवळोबास, विश्वनाथ यांची तत्त्वचिंतनात्मक आणि द्वैती-अद्वैती तत्त्वविचारसरणीचा पुरस्कार करणारी व त्यातून प्रपंच, जीव, जगत परमेश्वर यांमधील अन्तःसूत्र शोधू बघणारी कविता निर्माण झाली. या कवितेने रचनासंस्कार स्वीकारले ते प्रामुख्याने संस्कृतातील महाकाव्य रचनेचे व पुराणरचनेचे. 'विवेकसिंधू', 'ज्ञानेश्वरी' व 'अमृतानुभव' यामध्ये आलेली संवादपरंपरा प्राचीन पुराण परंपरेशी अनुभवदृष्ट्या अनुबंधित आहे; तर नरेंद्र, भास्कर, विश्वनाथ यांची निर्मिती संस्कृत महाकाव्याचा आदर्श स्वीकारू बघणारी आहे. पांडित्यप्रदर्शन, विदग्धता, नवरसांचा आविष्कार, ऋतुवर्णने, व्यक्तिवर्णने, नायक-नायिका वर्णनातील पारंपारिकता या दृष्टीने संस्कृत पंचमहाकाव्यांचा फार मोठा प्रभाव महानुभाव दीर्घ कवितेवर व स्फुट कथा कवितेवर पडला तर मुकुंदराज ज्ञानेश्वर यांनी उपनिषदांतील संवादरचना अधिकच संस्कारित करून तत्त्वांचे निरूपण केले. भागवत सांप्रदायिकांनी काव्यविषयक स्वीकारलेला दृष्टिकोण आणि महानुभाव कवींनी स्वीकारलेला काव्यविषयक दृष्टिकोण यांच्या मीलनाने तेराव्या शतकातील मराठी कवितेला वैविध्य प्राप्त झाले. तत्त्वचिंतनातून आलेले विचारगांभीर्य आणि महाकाव्य पुराणपरंपरांच्या स्वीकारामुळे आलेले वैदग्ध्य या दोन किनाऱ्यांनी ही कविता बांधली गेली. नाथसंप्रदायाच्या प्रभावातून गुरुनिष्ठेचा विशेष प्रभाव या

काळातील कवींवर झाल्यामुळे गुरुवंदन, गुरुवर्णन आणि गुरुचिंतन करण्यातही कवी एकरूप झालेले दिसतात व त्याचा परिणाम म्हणजे चरित्रकाव्याची निर्मिती होत गेली. महानुभावांची गद्यचरित्रे जशी बोलीभाषेतून तत्कालिन महाराष्ट्राचे ऐतिहासिक, भौगोलिक, सामाजिक, धार्मिक, आध्यात्मिक आणि वाङ्मयीन दर्शन घडविण्यास समर्थ ठरली; त्याचप्रमाणे चरित्रकवितेने गुरुनिष्ठेतून स्फुरण घेऊन आज उपलब्ध नसलेल्या चरित्रांना कवितेतून जन्म दिला. नामदेवाने ज्ञानेश्वरांचे उभे केलेले चरित्र, जनाबाईने नामदेवाचे गोचर केलेले चाळीस माणसांचे संसारचित्र, सोयराबाईने साक्षात केलेले गोरोबाचे चरित्र, सह्याद्रिवर्णनात आलेले दत्तात्रेयप्रभूंचे चरित्र, 'ऋधिपूरवर्णना'तील 'ऋधिपूर' महात्म्य आणि गोविंदप्रभू चरित्र, 'मूर्तिप्रकाशा'तील चक्रधरचरित्र, गद्यचरित्राबरोबरच काव्य-चरित्रेही निर्माण झालीत व त्यातून ईश्वररूप असलेल्या पंचकृष्णाचे महानुभाव कवींनी आणि श्रेष्ठ भक्त असलेल्या ज्ञानेश्वरांचे व त्यांच्या भक्तमंडळाचे चरित्र गुरुनिष्ठेतून निर्माण होत जाऊन 'चरित्रकाव्य' हा एक लक्षणीय असा वाङ्मयाचा आकृतिबंध निर्माण झाला व पुढे महीपतीने व मोरोपंतांनी या कवितेचा विशेष विस्तार केला. आजही यशवंतांच्या 'शिवायन' सारखी कविता शिवचरित्राचीच प्रतीती देते.

ज्ञानेश्वर, नामदेव, मुक्ताबाई, चोखामेळा, जनाबाई, गोराकुंभार, सावतामाळी, कान्होपात्रा या सर्व कवींनी अभंगांतून सगुणभक्तीचा आणि आत्मसाक्षात्काराचा उत्कट आविष्कार केला व मराठी भावकवितेचा जन्म झाला. तत्त्वचिंतनपर कवितेतून निर्गुण-निराकार ईश्वराचे अविकारी स्वरूप शोधले गेले तर अभंगातून मानसपातळीवर व भाव पातळीवर जाणवलेले अविकारी व सगुण सावळे ईश्वरी रूप व्यक्त झाले. सगुणोपासना व निर्गुणोपासना नामसंकीर्तनातून व भक्तिसंकीर्तनातून अभिव्यक्त झाली. भावनांची व्यामिश्रवलये, प्रतिमांचे साधर्म्य आणि वैधर्म्य आणि कविमनांचा मंचकावर अधिष्ठिलेल्या सावळ्या सगुण मूर्तीचे चित्रमयी दर्शन अभंगा अभंगांतून घडले. एका सौंदर्यलक्षी गेय भावकाव्याचा (Romantic lyric) जन्म झाला. आणि हरिहरैक्याच्या पुरस्काराचीही मेढ रोवली गेली. परमार्थमार्गावरील भक्ती व आध्यात्मिक मार्गाने आत्मसाक्षात्कार, या कवितेतून गोचर होत गेला व त्यातून सर्जनशील काव्याची निर्मिती झाली. सर्व ऐहिक बंधने स्वीकारलेली असूनही व आश्रमव्यवस्था व जातिव्यवस्था मान्य करूनही ही कवि-मंडळे मनाने मुक्त आणि ईश्वरमय झालेली होती त्याचा परिणाम असा झाला की बहुजन समाजाला ईश्वरचिंतनाचा एक डोळस मार्ग मिळाला. एक आध्यात्मिक नेतृत्व मिळाले. बहुजनसमाजाच्या मनाचा आतला आवाज कुठेतरी स्पष्ट होत गेला व त्यातून लौकिक राजकीयदृष्ट्या महाराष्ट्राची पडझड होत असतानाही समाजमन मात्र अभंग राहिले. दणकट राहिले. ईश्वरी नामसंकीर्तनाने घराघरांना, वस्त्या-वस्त्यांना, कुटुंबा कुटुंबांना, खेड्यापाड्यांना आणि संपूर्ण महाराष्ट्राला जातीचे बंधन स्वीकारूनही जागृत केले. त्यांना अध्यात्माची आणि ईश्वरसंकीर्तनाची द्वारे खुली झाली. अभिजात काव्यपरंपरा आणि सौंदर्यलक्षी भावकाव्य परंपरा या दोन्ही परंपरा निर्माण करण्याचे श्रेय भागवत व महानुभाव कवींकडे जाते व

त्या परंपरा केवळ त्या काळाशी बांधल्या गेल्या नाहीत, तर निरंतर त्या गतिमानपणाने प्रवाही झाल्या. प्रत्येक शतकात त्यांनी वेगळी वेगळी वळणे घेतली. परंतु त्यातील एकसंधता, जिवंतपणा आणि अनुभूतींची उत्कटता कोळपली नाही तर अनेक कवी त्यांच्यात सामील होत गेले व एका काव्यदिंडीचा उदय झाला.

तत्त्वचिंतनपर विमर्शात्मक भाष्यकाव्य आणि सर्जनशील उत्कट भावानुभूती व्यक्त करणारे सौंदर्यलक्षी भावकाव्याबरोबरच या काळात विमर्शात्मक गद्य आणि सर्जनशील गद्याचीही निर्मिती झालेली होती. भाष्ये, महाभाष्ये, वार्तिके, शब्दकोश, न्यायशास्त्र, संगीतशास्त्र, अलंकारशास्त्र, साहित्यशास्त्र, महाकाव्यमीमांसा टीकाग्रंथ, मल्लिनाथी, प्रमाणे, टीकग्रंथ, वैद्यकग्रंथ, विधिग्रंथांची निर्मिती तेराव्या शतकात झाली व ती प्रामुख्याने महानुभाव पंडित लेखकांनी केली. 'लीळाचरित्र' संपूर्ण महानुभाव वाङ्मयनिर्मितीचा मूलाधार ठरला. विशेषतः शास्त्रीय ग्रंथनिर्मिती जी झाली ती चक्रधरविचारांची सुसूत्रता राखण्यासाठी प्रामुख्याने झाली. 'सूत्रपाठ' 'दृष्टान्तपाठ' या दोन प्रमुख गद्यग्रंथावर पुढील जवळजवळ तीन-चारशे वर्षांच्या कालखंडात अनेक महानुभाव पंडितांनी टीकाटिप्पणी केली. याच लेखकांनी मूळ लोकभाषेतील रसरशीत गद्यग्रंथांना पुनः एका संस्कृत भाषेमध्येही नेण्याचा प्रयत्न केला. विचारांची सूक्ष्मता व विषयाची वस्तुनिष्ठा महानुभाव लेखकांनी एखाद्या व्रतस्थासारखी जोपासली.

मराठी भाषेच्या संदर्भातील अभिमान, या भाषेतील नवनवोन्मेषशाली वाङ्मयनिर्मिती, सर्जनशील कलाकृती आणि सर्जनशील वाङ्मयसमीक्षा, वाङ्मयाची चिकित्सा आणि त्याची जपणूक या दृष्टीने तेराव्या शतकातील वाङ्मयनिर्मितीचे अनन्यत्व लक्षणीय ठरले. वाङ्मयनिर्मिती व वाङ्मयविमर्श यांचा दृढ ठसा तेराव्या शतकातील मराठी वाङ्मयनिर्मितीतील सर्जनशीलतेतून अभिव्यक्त होतो. तेराव्या शतकाच्या पूर्वार्धातील वाङ्मयाची आणि तेराव्या शतकाच्या उत्तरार्ध आणि चौदाव्याच्या पूर्वार्धामधील वाङ्मयनिर्मितीची साक्ष काढली तर स्पष्ट दिसू लागते की एका नव्या विचारांचे वारे जुन्या पारंपारिक प्रस्तरप्राय धर्मविचारांवर आदळून फुटून पुनः आपले रूप जपू बघत आहे. सायंकालीन बुडत्या सूर्याला समुद्राने साक्षी असावे तसे पारंपारिक संस्कृत वाङ्मयाला साक्षी ठेवून मराठी लेखक जीवनाच्या नव्या दिशा आपल्या कांतिमान अनुभवातून गोचर करू लागले. एकीकडे मराठी वाङ्मयनिर्मितीच्या दृष्टीने हा काळ पृथगात्म म्हणून ओळखला जातो; तर दुसरीकडे संप्रदाय आणि संप्रदायांनी बांधले गेलेले लेखकाचे मन यांच्या उत्कट आत्माविष्कारातून वाङ्मयनिर्मिती होत गेलेली दिसते. एखाद्या शतकाला किंवा एखाद्या राज्यकर्त्यांच्या काळाला वाङ्मयामुळे गुणरूप मिळाले, हा योगही अपूर्व आहे. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात आणि त्या शतकानंतर उदयाला आलेल्या विसाव्या शतकाच्या पूर्वार्धाचे जे नाते एकोणिसाव्या शतकाशी होते आणि आहे तसेच आणि त्याच पद्धतीचे नाते तेराव्या शतकाचा उत्तरार्ध आणि त्याच्या आगेमागे असलेला जो काळ आहे त्याच्याशी आहे. सामाजिक जीवनजाणिवांचा दर्पण म्हणून वाङ्मयाकडे बघता येते.

व्यक्तिस्वातंत्र्य व आविष्कारस्वातंत्र्याचे माध्यम म्हणूनही सृजनशील वाङ्मयाची डोळस चिकित्सा एकोणिसाव्या शतकात होत राहिली. तिचा जीवनहेतू आणि तिने घेतलेले आत्मबळ हेही तिच्या निर्मितीला एकविशिष्ट रूप देण्यास साह्यभूत ठरले गेले. अशीच घटना तेराव्या शतकाच्या पूर्वार्धात घडलेली दिसते. धर्माधिष्ठित अशा संप्रदायांची निर्मिती, त्यांची सांस्कृतिक, धार्मिक आणि सामाजिक संदर्भातील कार्यनिष्ठा आणि त्यातून आचार व विचारांना आलेली विशिष्टता लक्षात घेता एका टीकात्म शिस्तीने बांधली गेलेली साहित्यिक-मंडळेच संप्रदाय आणि त्यांचे अनुयायी यांचे भरणपोषण करीत होती. वारकरी पंथातील धर्म विचार आणि आचारसंहिता आणि महानुभाव पंथातील धर्मविचार आणि आचार-संहिता ही त्या संप्रदायाला येऊन मिळालेला जी लेखकमंडळे होती त्यांनीच एकीकडे संप्रदायाची वाढ आणि आचारसंहितेची शिस्त आपल्या रचनेतून सिद्ध करीत नेली. म्हणजे ईश्वरसान्निध्यासाठी आणि त्यासाठी मोक्षप्राप्तीसाठी सिद्ध झालेली लेखक-मडळांनीच त्या त्या धर्मसंप्रदायाला प्रभावी केले, गतिमान केले, जिवंत ठेवले आणि एक विशिष्ट जीवनविषयक तत्त्वविचारही पुरस्कृत केला. महानुभाव पंथाच्या संदर्भात विचार करता गोविंद प्रभू, चक्रधर या पंचकृष्णावतारातील अंतिम अवतारांनी आणि नागदेव या प्रथम आचार्याने कोणत्याही स्वरूपाची 'रचना' केलेली नाही. परंतु असे असूनही पंथाची निर्मिती, संघटनेतील आचारसंहिता आणि अनुयायांची शिस्त ही आपल्या कृति-उक्तीतून व्यक्त करीत अनेक लेखकांना त्यांनी लेखनप्रवृत्त केले. म्हणजे वाङ्मयातून धार्मिक संप्रदायांची व्यवस्था लावण्यात आणि मूलगामी दृष्टिकोण त्या संप्रदायांना देण्यात तत्कालीन साहित्यिक कारणीभूत ठरले होते असे दिसते. अनेक माणसे एकत्र येऊन त्यातून एक जीवनविषयक मूलगामी विचार आणि जीवनासंबंधीची अचूक जाण ते आपल्या अनुभवा-तून मांडू लागले. वैदिक धर्मातील काही तत्त्वे स्वीकारून आणि त्यांचे सुलभिकरण करून संप्रदायांनी आपली आचारसंहिता आणि विचारसंहिता बनविली. जैन, बुद्ध, लिंगायत आणि महानुभाव यांनी ईश्वरवादीत्व स्वीकारले नसले आणि 'ईश्वर' आणि 'जीव' यात द्वैत कल्पिले असले तरी 'जीव', 'जगत' आणि 'ईश्वर' या संकल्पनांच्याच साह्याने जाणीवपूर्वक तत्त्वचिंतन केले आहे. म्हणजे भारतीय संस्कृतीची एक स्पष्ट बाजू वरील द्वैती संप्रदायांच्या विचारसरणीत प्रतिबिंबित झाली तर 'नाथ संप्रदाय' 'वारकरी संप्रदाय', 'वैष्णव संप्रदाय', 'शैव संप्रदाय', 'दत्त संप्रदाय' यांनी 'जीव', 'जगत' आणि 'ईश्वर' याच संकल्पना स्वीकारून तत्त्वचिंतन केले. संस्कृतीलाच धर्माचे पाठबळ मिळाले. त्यातून भारतीयत्व जोपासणारे पण भिन्न भिन्न पद्धतींनी 'जीव', 'जगत्', 'ईश्वरा'चा अन्वयार्थ लावणारे धर्मसंप्रदाय प्राचीन काळापासून भारतात निर्माण होत गेले. मूळ वैदिक परंपराच अतिप्राचीन असूनही तीत अनेक मूलभूत बदल घडवीत द्वैत संप्रदाय आपला धर्मविचार समर्थनीय करू पाहत होते, तर अद्वैती संप्रदाय मूळ वैदिक परंपरेलाच सुलभरीत्या स्वीकारण्याचा प्रयत्न करीत होते.ज्याप्रमाणे मूळ इस्लाम धर्म व त्याच्या इतर अनेक संघटना किंवा मूळ ख्रिश्चन धर्म व त्याच्या इतर शाखोपशाखा त्याप्रमाणे महाराष्ट्रात

तेराव्या शतकात मूळ वैदिक परंपरेतील तत्त्वविचारांना स्वीकारून अनेक शाखोपशाखा निर्माण झाल्या. व त्यातून धर्मसंप्रदाय Religious schools निर्माण होत गेलीत. आणि त्यांचे माध्यम वाङ्मय बनले व इतर ललित कला बनल्या. एकीकडे या सर्व कला उदा. नृत्य, शिल्प, संगीत आणि साहित्य या सांप्रदायिकांच्या होत्या व सांप्रदायिकांसाठी तर होत्याच तर दुसरीकडे त्यांची धर्मनिष्ठा हीही अनन्य होती. म्हणूनच १३ व्या शतकात अनेक संप्रदायांची गर्दी महाराष्ट्रात व भारतात असूनही ते परस्पर-छेदक ठरले नाहीत तर परस्पर-पूरकच ठरलेत. त्यांचे अंतिम साध्य मात्र एकच राहिले आणि ते म्हणजे भक्ति-मूलक मोक्षसुख आणि ईश्वरसान्निध्य. सर्व ललितकलांचा आविष्कार धर्ममूलक असूनही त्यातून कलेचे अनन्यरूप आणि आत्माविष्काराची ऊर्मी अस्पष्ट झाली नाही. इतर कलांत जसे हे घडले तसेच वाङ्मयात तर विशेषत्वाने घडून आले.

वाङ्मयाचे मूलधर्म

अंतिम जीवनसत्याचा शोध म्हणजे ईश्वरी शोध. या जाणिवेचा स्पर्श ज्ञानदेव, नामदेव आणि चक्रधरांना झालेला आहे. या सत्याच्या चिंतनातील आणि शोधनातील निर्द्वंद्व अवस्था अनुभवण्याचा आणि त्याच्या साक्षात्काराचा गूढात्म आशय ज्ञानदेव-नामदेवाच्या कवितेतून उत्स्फूर्तपणे व्यक्त झाला. त्यांच्या वृत्ती 'स्व'शी निगडित न राहता पूर्ण विश्वातच त्यांनी ईश्वर बघितला व त्यातून प्रेरणाही घेतली. एका विश्वात्मक पातळी-वरून आणि सर्वभूतात्मक अवस्थेतून अनुभूती स्वीकारून जनजागृती आणि आत्मजागृती लेखकमंडळे करीत गेलीत. त्यातही पूर्वपरंपरा एकदम तोडून त्यांना पुढे जाता आलेले नाही आणि ते शक्यही नव्हते; कारण महानुभाव संप्रदायाने भागवतातील एकादशस्कंध आणि द्वादशस्कंध व भगवद्गीता स्वीकारली; तर वारकरी संप्रदायातील साहित्यिकांनीही अभंग-वाङ्मयातून भागवताला स्वीकारले आणि भाष्य-काव्यातून भगवद्गीतेला स्वीकारले. किंबहुना पुराणपरंपरेने कीर्तनाश्रयातून वाटचाल करणारे हे वाङ्मय एकीकडे परंपरेला स्वीकारत होते तर दुसरीकडे पृथगात्मपणे आपली वाट शोधत होते. म्हणून या काळात केवळ पुनरुज्जीवन किंवा परिवर्तन घडले नसून अतिशय विचक्षण पद्धतीने महानुभाव आणि वारकरी साहित्यिकांनी मराठी वाङ्मयविश्वात अजाणता मूलगामी बदल घडवून आणला. एकीकडे संस्कृत परंपरेला स्वीकारत जाणे तर दुसरीकडे पृथगात्म रूपाविष्कार 'रुक्मिणी-'स्वयंवरा'ने आणि 'ज्ञानेश्वरी'ने घडवून आणला तर दुसरीकडे दोन्ही पंथीय साहित्यिकांनी मराठी भाषा, मराठी संस्कृती आणि महाराष्ट्र देश यांच्या संदर्भातील अस्मिता नुसती डोळसपणे न्याहाळली असे नाही, तर ती टिकवून आणि तिच्यातील साचलेपणा नाहीसा करून तिला प्रवाही, गतिमान आणि चैतन्यरूप दिले तेही वाङ्मयाच्या माध्यमातून! प्रत्येक लेखकाने बोलीभाषेचा अभिमान आणि सामर्थ्याचे जे वर्णन केले आहे त्यातूनही अरूपाला रूप देण्याचे सामर्थ्य आणि त्या संदर्भातील अनन्य श्रद्धाच व्यक्त केली होती. एका अर्थी शतकाचे हे आव्हान सर्व मराठी साहित्यिकांनी स्वीकारले व आपली रचना

निखळ बोलीभाषेतून केली आणि तत्त्वविचारही अतिशय सुलभपद्धतीने आविष्कृत केला. जातिधर्मातील प्रखरता, कर्मकांडाचे काठिण्य आणि आचारधर्माची तांत्रिकता यांना आवर घालण्यात आणि ईश्वराविषयी भीती वाटण्याऐवजी प्रेमभाव जागृत करण्यात व जनसामान्यांचे प्रतिनिधित्व स्वीकारण्यात तेराव्या शतकातील साहित्यिकांची 'रचना' कारणीभूत ठरली आणि ती यशस्वीही झाली. भौतिक आणि पारलौकिक अशा दोन पातळ्यांवर दुभंगलेला समाज सांधण्यासाठी आणि कर्मकाण्डाचा अतिरेक कमी करून ईश्वरप्राप्तीमधील साधनामार्ग सुकर करण्यासाठी वाङ्मयाच्या निर्मितीतून ही लेखक मंडळी समाजाला सामोरी गेली. 'चतुर्वर्ग चिंतामणी' मधील दोन हजार व्रतवैकल्ये कशी व कोणत्या कोणत्या पद्धतींनी करावयाची यापेक्षा 'देव भावाचा भुकेला' यामधील उत्कटता समाजमनाने स्वीकारली आणि त्यातून एक प्रचंड खळबळ वैचारिकदृष्ट्या आणि आध्यात्मिकदृष्ट्या घडून आली. महानुभाव लेखकांनी गद्यनिर्मितीतून आणि वारकरी लेखकांनी काव्यनिर्मितीतून ही मराठी अस्मितेची ज्ञानज्योत पेटविली व तिचे पारदर्शक रूप आपल्या निर्मितीतून जोपासले. म्हणूनच या वैचारिक खळबळीचे स्वरूप तीनपदरी ठरले. एकीकडे पारंपारिक धर्मविचार अधिक डोळसपणे स्वीकारून त्याचे सुलभीकरण ज्ञानेश्वरांनी केले तर चक्रधरांनी एका पुरोगामी दृष्टीने धर्मविचारातील अद्वैताचा अव्हेर करून पण सगुणोपासना स्वीकारून 'मीच ईश्वर' असे सगुण ईश्वरीरूप आपल्या ठिकाणी शोधण्यास भक्तजनांना आज्ञा दिली. जीव, ईश्वर आणि विश्व यांतील परस्परसंबंधाची पुर्नरचना ज्ञानेश्वर आणि चक्रधरांनी आपल्या विशिष्ट विचारसरणीतून केली व अध्यात्मविचार आणि ज्ञानविचार एका विशिष्ट समाजामध्ये केंद्रित झाला होता, तो फोडून काढून त्याचे पाट वाहाते केले. शेतातील पाटाचे आडवलेले पाणी सोडताच ते अनंतधारांनी जमिनीत झिरपत जावे आणि पेरलेल्या बीजांकुरांना आत्मबळ मिळावे त्याप्रमाणे चक्रधर आणि विशेषतः ज्ञानेश्वरांनी धार्मिकदृष्ट्या आणि तात्त्विक संदर्भात आजपर्यंत परंपरेने जोपासलेला जो आध्यात्मविचार होता त्यातील बंधने निखळून टाकून तो अनंतधारांनी वाहता केला व त्यांच्या समकालीन संतमंडळांनी तो आत्मसात केला. 'ज्ञानविचार', 'नामविचार', 'कर्म', 'अकर्म' आणि 'विकर्म विचार' याचेतील मिथ्यत्व आणि चिद्विलासातील सातत्य, कर्माकडून ज्ञानाकडे व ज्ञानाकडून भक्तीकडे जाण्याचा सुलभ मार्ग ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी' व 'अमृतानुभवा'तून मांडला व त्याचा प्रसार आणि प्रचार आपल्या अभंगातून घडविला व नामदेवासारख्या सहप्रवाश्याने तो घरा-घरांतून समजविता उमजविता केला. 'ज्ञानदीप' किंवा चक्रधरांनी म्हटल्याप्रमाणे 'ज्ञानापसि प्रेम उत्तम' या सर्व संकल्पनांचा अर्थ अंतिम मानव कल्याण भूमिकेप्रत पोहचविणारा ठरला आणि निर्नायक असलेल्या समाजाला आणि पंथांना 'वाङ्मया'चा नायक तर मिळालाच पण गतीही मिळाली. धार्मिक दृष्ट्या एक प्रचंड खळबळच तत्कालीन समाजधुरिणांच्या समोर निर्माण झाली. कारण ज्ञानेश्वरांचा झालेला छळ आणि चक्रधरांना जीवे मारण्याचा दोन वेळा झालेला प्रयत्न यामधून ही गोष्ट स्पष्ट होते की, मानसिकदृष्ट्या दुभंगलेली मने

भक्तिद्वारा सांधण्याचा मूलगामी प्रयत्न ज्ञानदेव आणि चक्रधरांनी केला. तत्कालीन दोन पातळ्यांवर विभागला गेलेला समाजही चाणाक्ष आहे, सुजाण आहे. अन्यथा अनुभवाला पटल्याशिवाय व पंडितमान्य विद्वान असूनही शेकडो विद्वान महानुभाव पंथात एकरूप झालेत, तर भोळीभाबडी जनता वारकरी पंथाच्या झेंड्याखाली नांदू लागली.

चक्रधर-ज्ञानेश्वरांपूर्वी आणि चक्रधर-ज्ञानेश्वरांनंतर महानुभाव पंथ आणि वारकरी पंथ यांची वाङ्मयनिर्मिती लक्षात घेता कोणता निष्कर्ष निघतो ? इस्लामचे आक्रमण आणि त्यामुळे उध्वस्त झालेले समाजजीवन यामुळे चक्रधर-ज्ञानदेवानंतर मराठी वाङ्मयविश्वात एक प्रकारचे अंधारयुग जाणवू लागले, तर चक्रधर ज्ञानदेवांपूर्वी नाथपंथातील तंत्रप्राधान्य आणि जारणमारण विद्यांचा प्रसार यामुळे व शंकराचार्यांच्या संन्यासप्राधान्य मिळालेल्या वैदिकतेला हताशपणे सामोरी गेलेली प्रजा व सुशिक्षितांनी कर्मकाण्डाला दिलेले महत्त्व यामुळे स्थितिशील रूप सांस्कृतिकदृष्ट्या, धार्मिकदृष्ट्या आणि सामाजिकदृष्ट्या त्या काळाला आणि वाङ्मयालाही आलेले दिसते. संस्कृत वाङ्मयाची साक्ष घेतली तरी वरील विधानातील अन्वयार्थ लक्षात येईल. संस्कृत विदग्ध महाकाव्यातील राजाश्रयी रचना, शृंगाराची रेलचेल आणि अद्भुताचा वापर यामुळे ही कविता जीवनदूर झाली, तशी ती बनणे अपरिहार्यच ठरले. कारण भारतीय संस्कृतीने उभा केलेला आदर्शवाद पायाभूत मानून ही निर्मिती होत राहिली आणि लौकिकदृष्ट्या ज्या राजांच्या दरबारी हे लेखक आश्रित होते त्यांचे ऋण काव्यमाध्यमातून अभावितपणे का होईना त्यांना मान्य करणे भाग होते. मराठी बोलीभाषेच्या संदर्भात विचार करता तिचे सामर्थ्य जाणवलेला मुकुंदराज लेखन करीत असला तरी वाङ्मयापेक्षा त्याला रस होता तो तत्त्वचिंतनात आणि तोही 'शांकरोक्तिवरी ही मऱ्हाटी वैखरी' अशा अभिनिवेशाने शंकराचार्यांचा विवर्तवाद आणि अद्वैत सिद्धान्त हिरीरीने तो मांडू बघतो, याही दृष्टीने मुकुंदराजापूर्वीचा काळ हा वाङ्मयाच्या संदर्भात अंधारयुगाचा ठरला. अशा या दोन काळांच्यामध्ये वाङ्मयदृष्ट्या उजळून गेलेला नागदेवाचार्य मार्गदर्शी महानुभावांचे वाङ्मय आणि ज्ञानेश्वर निर्मित आणि पुरस्कृत भागवतसंप्रदायचे वाङ्मय यांनी पृथगात्म युगाचा दैदिप्यमान प्रारंभही केला आणि त्याला पूर्णताही आणली. अनेक नव्या परंपरा आणि नवे दृष्टिकोण आणि नव्या जाणिवा जन्माला आल्या, वाढू लागल्या आणि त्यांनी संपूर्ण वाङ्मयाचे आकाश व्यापून टाकले. महानुभाव गद्य म्हणजे यादवकालीन समाजाचा चालताबोलता इतिहास आणि भूगोल आहे असे जे म्हटले जाते त्याचाही अर्थ हाच आहे. एकीकडे जीवनसन्मुखता तर दुसरीकडे ईश्वरसन्मुखतेतून पुनः जीवनजाणिवांचा शोध असा सर्वांगीण आणि सर्वदूर प्रयत्न लेखननिर्मितीत घडलेला दिसतो. एकीकडे सामाजिक जिवंतपणा वाङ्मयनिर्मितीतून जाणवते तर दुसरीकडे वाङ्मय म्हणून निर्मितीभूमिका नसताही पण तसा सार्थ अभिमान बाळगताही अनेक परंपरा निर्माण झाल्या. अनेक वाङ्मयीन वाद खेळले गेले, अनेक वाङ्मयप्रकार निर्माण झाले आणि अनेक शास्त्रीय स्वरूपाची रचनाही सिद्ध झाली. वाङ्मयाची समृद्ध निर्मिती आणि विकास नागदेवाचार्यांच्या आचार्यपदीच्या कालखंडात महानुभाव लेखकांनी आणि

ज्ञानेश्वरांनी संजीवन समाधी स्वीकारल्यानंतरच्या कालखंडात नामदेव आणि ज्ञानेश्वर प्रभावळीतील लेखकांनी केलेला आहे.

विवेकसिंधू ते अभंगगाथा

मराठी भाषेला इ. स. १०५० ते १३५० या काळात म्हणजे विवेकसिंधूपासून नामदेवाच्या अभंगरचने अखेरपर्यंतचा काळ किंवा चक्रधर महानिर्वाणापासून बाइदेवबास आणि नागदेवाचार्य यांच्या निर्वाणापर्यंतच्या काळात एक रसरशीत आणि जिवंत अशी वाङ्माला अभिव्यक्ती मिळाली. मराठी भाषेचो जडणघडण तिचे अभिव्यक्तीसामर्थ्य तिची सर्वात्मकता आणि अतींद्रिय अनुभवांनाही इंद्रियगोचर करण्याचे तिचे कसब याद्दष्टीने हा काळ फार उपकारक ठरला. वास्तविक सर्वच भारतीय बोलीभाषांतील अभिव्यक्तीच्या धुमसलेपणाचा बंडखोरीचा हा काळ आहे. मुस्लीम आक्रमणापूर्वी आणि स्वराज्याची वाताहत होत असताना मात्र मराठी वाङ्मयाने आपल्या निर्मितीने वैभवाचे शिखर गाठले. मराठी साहित्यातील श्रेष्ठ अक्षरवाङ्मय आणि कविकुलगुरु याच काळात निर्माण झाला. वास्तविक समृद्ध काळात समृद्ध साहित्यनिर्मिती होते असे म्हटले जाते. परंतु मराठी वाङ्मयाचा स्फुल्लिंग पेटला तोच मुळी एका अपर अशा वेगळ्या पातळीवरून ! यादव राजांची वाताहात, राजकीय बंडाळी, सामाजिक दुभंगलेपण आणि धार्मिक जीवनाचा अधःपात याच काळात किती प्रकारांनी आणि कसकसा होत होता याची साक्ष 'लीळाचरित्र' देते तरी मराठी लेखकांची मने दुभंगलेली नव्हती. इतकेच काय पण नरेंद्रासारख्या बाणेदार कवीने रामदेवराव राजाने रुक्मिणीस्वयंवराचे कर्तृत्व मागू लागताच 'कविकुळा बोलू लागैल' असे उद्गार काढून त्याचे सभाकविपण झुगारून तो महानुभावपंथाकडे वळलेला आहे असे 'स्मृतिस्थळां'तील आख्यायिका सांगून जाते. तर या उलट ज्ञानेश्वर मात्र ज्ञानेश्वरीचा शेवट करताना यादवराजाची प्रशस्ती करतात. या लेखकांच्या मनोभूमिका जाणून घेतल्या तर लक्षात येते की त्यांना स्वकर्तृत्वाची अचूक जाण आहे, स्वनिर्मितीविषयी कमालीचा आत्मविश्वास आहे आणि मानवासंबंधीच्या परमकर्तव्याने ती बांधली गेली आहेत. म्हणूनच जीवनभर अनन्वित छळ होऊनही ज्ञानेश्वर कडवट बनलेले नाहीत, तर एका उदात्त भूमिकेवरून आणि आदर्श समाज-निर्मितीच्या अपेक्षेने एखाद्या प्रेषिताप्रमाणे ज्ञानेश्वर गीतेचा स्वविचारानुकूल असा अन्वयार्थ लावतात. उपनिषदांतून व्यक्त झालेला अध्यात्मविचार, सांख्यानी स्वीकारलेला सृष्ट्युत्पत्तीचा प्रकृतिपुरुष विचार, निर्गुण, निरवयव, निराकार अशा ईश्वरी स्वरूपाचा मायावाद सांगणारा वेदांत, सगुण निर्गुणोपासनेचा भक्तियोग आणि आत्मोद्धाराची खडतर तपस्या स्वीकारणारा हटयोग आणि या सर्व विचारांना माखून आलेला मानव कल्याणकारी नीति विचार ! या सर्व भारतीय पारंपारिक विविध विचारधारांना ज्ञानेश्वरीत स्थान मिळून सर्व भारतीय विचारांचे सम्यकदर्शन ज्ञानेश्वरीतून घडविण्यात आणि ह्या विविध तत्त्वचिंतनाचे सार मराठीसारख्या लोकभाषेतून आणि बोलीभाषेतून अभिव्यक्त

करण्यातील धीटपणा ज्ञानेश्वरांनी दाखविला. महानुभाव लेखकही या संदर्भात ज्ञानेश्वरांचेच सहप्रवासी ठरले. त्यांनी पंथनिष्ठा प्रमाण मानून त्या अनुषंगाने वाङ्मयनिर्मिती केली असली तरी शास्त्रीय वाङ्मयाची निर्मिती आणि व्यवस्था अनन्यसाधारण म्हणावी लागेल. 'लीळाचरित्र' या ग्रंथातूनच महानुभाव शास्त्रीय आणि ललित वाङ्मयाची परंपरा निर्माण झाली. पंथप्रचार आणि पंथनिष्ठेतून चक्रधरांविषयीचा अनन्यभाव हीच महानुभाव वाङ्मयनिर्मितीमागील मूलभूत प्रबळ प्रेरणा आहे. तेराव्या शतकातील वारकरी आणि महानुभाव लेखकांची दुधारी व्यक्तिमत्त्वे होती. एकीकडे ते कर्ते सुधारक आहेत तर दुसरीकडे साहित्यिक आहेत. 'झरा आहे मुळचाचि खरा' अशी त्यांची अवस्था आहे.

विविध वाङ्मयनिर्मितीतील समानता

चक्रधरांनी पुरस्कारिलेला आणि आचरणात आणलेला लोककल्याणकारी मार्ग आणि ज्ञानेश्वरांनी आपल्या वाङ्मयनिर्मितीतून अभिव्यक्त केलेला समानतेचा मार्ग हे दोन्ही मार्ग समकालीन समाजाने आपलेसे केले व त्या त्या पंथाच्या अधिपत्याखाली जमलेल्या लेखकांनी ईश्वरी साक्षात्काराच्या संदर्भातील आणि पंचकृष्णांच्या संदर्भातील आपल्या जाणिवा काव्यमाध्यमातून आणि गद्यमाध्यमातून अभिव्यक्त केल्या. चरित्रनिर्मिती, भाष्यनिर्मिती, आख्यानकाव्यनिर्मिती, चिंतनपरकाव्य निर्मिती, भावकाव्यनिर्मिती, लोकगीतात्मकनिर्मिती, व्याकरणशास्त्रनिर्मिती, भाषाशास्त्र निर्मिती, साहित्यशास्त्रनिर्मिती, छंदशास्त्रनिर्मिती, कथानिर्मिती, उपदेशपर निर्मिती, अलंकारशास्त्रनिर्मिती, लोककथात्मक, जातककथात्मकनिर्मिती, स्थलवर्णनपर निर्मिती, मूर्तिवर्णनपर निर्मिती, विविध वाङ्मयीन-प्रवाहांचे संकलन, संपादन, व्यवस्थापन, विश्लेषण याच काळात अतिशय समर्थपणे झाले. महानुभावांचे वैभवशाली गद्य आणि वारकरी संप्रदायाची वैभवशाली कविता या दोन जबरदस्त आधारावर संपूर्ण नववाङ्मय अंग धरू लागले, वाढू लागले, मोठे होऊ लागले. 'लीळाचरित्र' हा महानुभाव संप्रदायाचा आणि तत्त्वज्ञानाचा पहिला ग्रंथ! त्याच्या निर्मितीतही सहस्त्रांचे हातभार लागले. अनेकांच्या अनेक आठवणी नागदेवासमोर पारखून घेत म्हाइंभट्टाने त्यांचा अनुक्रम लावला, त्यांना एकत्र गुंफले व त्यातून लीळाचरित्राची निर्मिती झाली. चौकस आणि जिज्ञासू भक्तांच्या प्रश्नांमुळे चक्रधरांनी आपले आत्मवृत्तही सांगितले आणि लीळाचरित्राचा 'एकांक' निर्माण झाला. चरित्र, आत्मचरित्र-निर्मितीची प्रेरणा नसूनही ईश्वरी अवतारांचे मानवी जीवन असे आहे याचे स्मरण चिंतन, मनन पंथीय करू लागले व चक्रधरांच्या महानिर्वाणामुळे निर्माण झालेली व्याकुलता त्यांच्या आठवणींच्या साहाय्याने कमी करण्याचा प्रयत्न त्यांच्या भक्तांनी केला. ज्ञानेश्वराच्या संजीवन समाधीने पोळलेले नामदेवाचे मन ज्ञानेश्वरांची समाधिकविता गाऊ लागले. मुक्ताबाई, निवृत्तिनाथ, सोपानदेव, चांगदेव, यांची समाधिकविता ही नामदेवाला त्या व्यक्तीच्या विरहामुळे आलेला जो एकाकीपणा होता त्यातूनच निर्माण झाली. नामदेव, जनाबाई, सेना न्हावी, चोखामेळा, गोरा कुंभार हे सारेच कवी

एकमेकांविषयीचा आणि ज्ञानेश्वरांविषयीचा आपला आदर अभंग कवितेतून व्यक्त करतात. 'लीळाचरित्र', 'गोविंदप्रभुचरित्र', 'चक्रपाणिचरित्र' ही तिन्ही लीलारूप चरित्रे म्हाइभट्टानेच संकलित केली आहेत ती प्रामुख्याने ईश्वरी अवतारांचे भक्तांना झालेले जे दूरान्तर होते ते भरून काढण्यासाठी, त्यांचे दुःख कमी करण्यासाठी त्याचे सैरभैर मन शांत करण्यासाठी चरित्रनिर्मिती महानुभावांनी विशेषतः म्हाइभट्टाने केली. वारकरीपंथीय कवींनीही काही चरित्रे गायिली पण ती ईश्वरी अवतारांची नसून श्रेष्ठज्ञानीभक्तांची चरित्रे होती. तपशीलवार चरित्रचित्रण हाही त्यांचा उद्देश नव्हता, तर चरित्रनायकाने लोकजीवनावर घडविलेला जो संस्कार होता त्याने प्रभावित होऊन, वारकरी कवितेत चरित्रविषय झाले. उदा. जनाबाईच्या अभंगात ज्ञानेश्वर, नामदेव यांचे येणारे चरित्र, नामदेवाच्या अभंगात जनाबाई, विसोबा, ज्ञानेश्वरादि भावंडे यांचे येणारे चरित्र, चोखा मेळा आणि गोरा कुंभार यांच्या कवितेत नामदेवाचे, जनाबाईचे आलेले चरित्र म्हणजे संतश्रेष्ठांच्या जीवनतपशीलाचा एक ठसा जो कविमनांवर उमटला असेल त्याचे ते प्रगटीकरण ठरले. उलटपक्षी, महानुभाव चरित्रात मात्र ईश्वरी अवतारांची विभूतिमत्वे सांभाळून ते मानवीरूपात कसे वावरले हेच शोधविषय झाले, त्यामुळे ही चरित्रे पंथीय स्वरूपाची एकसाची झालीत. कारण सर्व भक्तांचा गुंडम राऊळ, चक्रधर यांच्या संदर्भातील अनुभव ईश्वरीस्वरूप म्हणूनच अभिव्यक्त झाला. समूहमनांची नवनिर्मिती असूनही तिला पंथनिष्ठा व पंथप्रामाण्याच्या कक्षेतच वावरावे लागलेले होते. महानुभाव कवींनी चक्रधर आणि गुंडम राऊळ, चांगदेव राऊळ या तीन ईश्वरी अवतारांचे जेथे जेथे विहरण झाले तेथील स्थानमाहात्म्य आणि मूर्तिवर्णने आपल्या निर्मितीतून केली आहेत. उदा० ऋद्धिपूरवर्णन, सह्याद्रिवर्णन, मूर्तिप्रकाश पूजावसर आणि स्थानपोथी या महानुभाव गद्यपद्य ग्रंथांवरून त्यांची पंथीय दृष्टी लक्षात येते पण याच पद्धतीने वारकरी संप्रदायाच्या कवींनीही रचना केलेली आढळते. जवळजवळ प्रत्येक संतकवीच्या अभंगात विठ्ठलमाहात्म्य आणि पंढरपूरमाहात्म्य, त्र्यंबकेश्वरमाहात्म्य, पैठणमाहात्म्य, आळंदीमाहात्म्य येते यावरून महानुभाव कवींपेक्षा वारकरी पंथाच्या कवींची मनोभूमिका फार वेगळी होती असे दिसत नाही. सेना न्हावीचे अतिशय अल्प अभंग उपलब्ध असूनही त्यात तुळजापूरच्या देवीचे व त्र्यंबकेश्वराचे माहात्म्य त्याने गायिलेले आहे.

महानुभाव कवींनी भाष्यपर आणि गीतेला अनुसरून रचना केली तशी वारकरी कवींनीही केलेली आहे. उदा० उद्धवगीता, ज्ञानप्रबोध, ज्ञानेश्वरी, तत्त्वसार ही होय. महानुभाव कवींनी आख्यानपर काव्यनिर्मिती केली. उदा. धवळे, रुक्मिणीस्वयंवर, शिशुपालवध, वच्छाहरण नरेंद्राचे रुक्मिणीस्वयंवर आणि भास्कराचे 'शिशुपालवध' ही महाकाव्याच्या बरोबरीची काव्ये निर्माण झाली. वारकरी पंथाच्या कवितेत पृथकपणे आख्यानकाव्य किंवा महाकाव्यसदृश रचना झालेली नसली तरी नामदेवाची आख्याने आणि जनाबाईचे आख्यानपर अभंग, ज्ञानेश्वरांचे मदालसाप्रकरण या अभंगकवितेची जात आख्यानात्मक कथनपर अशीच आहे.

वाङ्मयाची परस्परपूरकता

महानुभाव पंथियांची वाङ्मयनिर्मिती आणि वारकरी पंथियांची वाङ्मयनिर्मिती द्वैताद्वैती तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करणारी असली तरी ज्या देशात ती जन्माला आली तेथील सर्व गुणरूपे तिने आत्मसात केलेली दिसून येतात. धर्ममूलक अशी ही निर्मिती आहे. तरीही वाङ्मयाचे सर्व रूपप्रकार निर्मात्यांना फारशी जाणीव नसतानाही साक्षात् झाले. 'लीळाचरित्रा'च्या निर्मितीबरोबर म्हाइंभट्टानेच चक्रपाणी, गुंडम राऊळ आणि चक्रधरांनी निरोपिलेले 'कृष्णचरित्र' संगृहित करून चरित्रवाङ्मयाचे दालन समृद्ध केले व त्याला वारकरी पंथातील नामदेव आणि जनाबाई यांनी जणू हातभार लावला. लीळाचरित्रातूनच केसोबासांनी 'सिद्धान्तसूत्रपाठ' तयार केला. लीळाचरित्रात आलेली चक्रधरांची सर्व सूत्रमय वचने वेगळी काढून सूत्रपाठाची निर्मिती झाली. लीळाचरित्राच्या निर्मितीनंतर लगेच महानुभाव संशोधनाला, विवरणाला, स्पष्टीकरणाला सुरुवात झालेली होती. विचारांचा कसदारपणा आणि भाषेची समृद्ध अवस्था असल्याशिवाय शास्त्रीय निर्मिती दुरापास्त ठरते, परंतु तेराव्या शतकाच्या पूर्वार्धातच लीळाचरित्राच्या पाठोपाठ चरित्र-आत्मचरित्रांची निर्मिती झाली व महानुभाव पंथाचे आणि एकूण मराठी वाङ्मयाचेच सिद्धान्तन करणारा 'सूत्रपाठ' हा ग्रंथ निर्माण झाला. चक्रधरांनी सूत्रांसाठी योजिलेले दृष्टान्त आणि मूळ सूत्रे एकत्र करून दृष्टान्तपाठाची निर्मिती झाली. सूत्रपाठातील सूत्रांच्या अर्थनिर्णयासाठी लक्षणरत्नाकराची रचना झाली. त्यावर बत्तीस लक्षणी टीपग्रंथ निर्माण झाला. 'सूत्रपाठा'ची भूमिका विशद करणारे प्रकरणवस, निरुक्तशेष हे ग्रंथ निर्माण झाले. सूत्रपाठातील सूत्रांचे सूत्रमय व्याकरण, व भाषाशास्त्र पंचवार्तिकात आणि नामविभक्तीत मांडले गेले. साती ग्रंथांचे तीन टीपग्रंथ पंधराव्या शतकात तयार झाले. इतक्या सूक्ष्मरीतीने चक्रधरांच्या सूत्रवचनांचा अभ्यास तेराव्या शतकात आणि पुढे सतत होत राहिला. सूत्रग्रंथ, भाष्यग्रंथ, साधनग्रंथ, तात्त्विक ग्रंथ, गीताटीका, आख्यानकाव्य, भौगोलिक स्थलवर्णनपर ग्रंथ, मूर्तिवर्णनपर ग्रंथ, इतिहास ग्रंथ, चरित्रग्रंथ, भावकाव्य इतक्या विविध वाङ्मयीन रूपांचा आविष्कार महानुभाव वाङ्मयातून झाला तर भावकाव्य (अभंग), चिंतनपर भावकाव्य, (ज्ञानेश्वरी, अमृतानुभव) निरुपणपर भाष्य (विवेकसिंधू तत्त्वसार) चिंतनपर पत्रकाव्य (चांगदेव पासष्टी), रूपक काव्य (भारुडे, गौळणी, विराण्या) प्रतीक काव्य (कूटे), नामसंकीर्तनपर काव्य (नामदेव अभंग), समाधिकाव्य अर्थात विरहगीत (नामदेवाची समाधी कविता), स्त्री गीते (जाते, पाळणा इ.) वर विषय गीत - मंगलाष्टके (धवळे) लोक संस्कृतीशी निगडित खेळ, व्यवसाय, मनोरंजन संस्था, (कुस्ती, हमामा, कापडी, भुते, वासुदेव) कीर्तने, पुराणे, प्रवचने अशा अनंतरूपांनी तेराव्या शतकातील वाङ्मयनिर्मिती रूपवान आणि साजिवंत झाली होती.

नवनवोन्मेषशाली-निर्मिती

परंपरेतून आलेली अभिजातता आणि मनःप्रवृत्तीतून आलेली स्वच्छंदता यांचे मनोहर मिश्रण तेराव्या शतकातील वाङ्मयनिर्मितीतून साक्षात झाले. महानुभाव वाङ्मयातून जीवनाचा संदर्भ, वास्तवाचे भान आणि तत्त्वज्ञानाचा प्रखर अट्टाहास साक्षात होत गेला तर वारकरी वाङ्मयातून उत्कट आत्माविष्कार आत्मानुभूतींच्या नैसर्गिक अभिव्यक्तीतून मनमुक्तपणे साक्षात झाला. ओवी आणि अभंगाचा केलेला वापरही एका अर्थी मुक्त-पद्धतीने स्वीकारलेल्या अनुभवाचाच एक अविभाज्य घटक होता. आणि गद्यलेखनात आलेली संभाषणात्मकता, स्वाभाविकता, सुलभता, सहजता यात ग्रामजीवनातील बोलीभाषेचे ताजे रसरशीत जिवंत अमृतकोंभ मराठी मातीतून डोकावू लागले होते. त्यांची अस्सलता, समृद्धता आणि मराठी भाषेचे आशयगर्भ वैभव यामुळेच केवळ एका शतकात इतकी प्रचंड आणि अनेक पद्धतींची अनेकपदरी वाङ्मयनिर्मिती होऊ शकली. भक्तिभावनेशी आणि मोक्षकल्पनेशी बांधली गेलेली कविमने असूनही त्यांची निर्मिती मात्र एका एका वाङ्मयप्रकाराला जन्म देत गेली. दृष्टान्तपाठातील दृष्टान्त म्हणजे मराठी वाङ्मयातील पहिली प्रसंगनिष्ठ आणि व्यक्तिनिष्ठ भावकथा आहे. 'मल्हार महुडे,' 'मोगरा फुलला' ही पहिली भावकविता आहे. 'रात्र काळी घागर काळी' किंवा 'निळिये रजनी' ही मराठीतील पहिली प्रेमकविता आहे. 'कुत्ना थमाल ले थमाल अपुल्या गाई' हे नामदेवाचे पहिले 'बालगीत' होते. 'सनाधिकविता' म्हणजे मराठीतील पहिली विलापिका आहे. चरित्र, आत्मचरित्र, आख्यायिका, कथा, रोजनिशी, भाष्य, महाभाष्य, व्याकरण, न्यायशास्त्र, अलंकारशास्त्र आणि साहित्यशास्त्राची पहिली निखळ मराठी बोली-भाषेतील सुरुवात याच काळात झाली. संगीत, नृत्य, स्थापत्य, वास्तुकला इत्यादि कलांचा दृढ परिचयही वाङ्मयातून याच काळात अभिव्यक्त झाला. सत्यनिष्ठा, अर्थप्रामाण्य आणि मानवकल्याणाची विजिगीषा याच काळातील वाङ्मयातून जोपासली गेली आणि पुढे समृद्ध परंपरा तेराव्या शतकानंतर मराठी वाङ्मयाला मिळाली. गुरुपरंपरा, तत्त्वज्ञान परंपरा आणि संप्रदाय परंपरा सांभाळूनही एका मुक्तीच्या मार्गाकडे जाणारे साहित्यिक मुक्त वाङ्मयनिर्मिती करून गेले आणि त्यांनी दिलेल्या प्रेरणा आणि परंपरा, आशय आणि अभिव्यक्ती, रूपसिद्धी आणि अनुभवांचा आत्माविष्कार पुढील वाङ्मयाने सातत्याने जोपासला. अनंत हेतुप्रवाहांमुळे तेराव्या शतकातील वाङ्मय गढूळ न बनता अनंत उन्मेष आणि नव्यानव्या जाणिवा वाङ्मयात निर्माण झाल्या व ईश्वरविषयक अनुभूती सारख्याच असूनही त्यांना आशयाची आणि अभिव्यक्तीचीही विविधता आली. एका अर्थाने तेराव्या शतकातील वाङ्मयाच्या आशयाचे विषय एकरंगी, एकमुखी, एक-पद्धतीचे होते, परंतु असे असूनही त्यातून साधलेली किंवा अभिव्यक्त झालेली वाङ्मय-सृष्टी मात्र अलौकिक, अपर, केवलस्वरूपी, अशी निर्माण झाली. एका प्रचंड भक्तीच्या आणि श्रद्धेच्या पायावर तोलून उभी असलेली मराठी वाङ्मयाची 'कृष्णद्वारका' ठरली.

अनेक रूपांतून वाङ्मयाने कृष्णाला न्याहाळले! पूर्णपुरुष कृष्ण, गोपींबरोबर क्रीडा करणारा कृष्ण, तत्त्वचिंतक कृष्ण, खोडकर कृष्ण, यशोदा-देवकीचा कृष्ण, निर्व्याज बाल्य आणि शैशव जपणारा कृष्ण अशा अनेक रूपांतील कृष्णदर्शन तेराव्या शतकातील वाङ्मय-सृष्टीतून घडले. इतकेच नव्हे, तर महानुभावांच्या पंचकृष्णांनेही दत्तात्रय अवतार वगळल्यास सर्वांनी स्वतःला कृष्णावतार म्हणवून घेतले. कृष्णभक्ती व कृष्णभक्तीतून मुक्ती या प्रयोजनाने सिद्ध झालेली वाङ्मयसृष्टी आत्माविष्काराने आणि सांकेतिक वर्णन-परतेनेही गजबजलेली आहे.

नरेंद्र, भास्कर, ज्ञानेश्वर यांची स्वतःची अशी साहित्यशास्त्रीय भूमिका आहे. विशिष्ट काव्यसंकल्पना आहेत व रसचर्चेची निश्चित दिशा आहे. अशी समृद्ध अवस्था मराठी वाङ्मयविश्वात अजून तरी पुनः निर्माण झालेली नाही. कविता आणि गद्य या वाङ्मयाच्या मूलबंधांचा विकास, विस्तार आणि प्रचार, प्रसार तेराव्या शतकातील वाङ्मयनिर्मितीतून झाला. आपण विशिष्ट वाङ्मयप्रकाराच्या विशिष्ट वाङ्मयाच्या आकृति-बंधाचा पुरस्कार आणि निर्मिती करीत आहोत याविषयी कवींच्या मनात पृथक जाणीव नसली तरी आपल्या सामर्थ्याची काव्यकर्तृत्वाची त्यांना अचूक ओळख आहे. एकच उदाहरण देता येईल महानुभावांनी निर्माण केल्याचा अनेक लिप्या उदा. सकळा, सुंदरी, पारमांडिल्य त्यात आपले संपूर्ण ईश्वरविषयक वाङ्मय गुप्त रीतीने त्यानी सांभाळले. ही गुप्तता सांप्रदायिक असली तरी लिपी-निर्मात्यांची विचक्षणा लक्षवेधीच ठरते. लौकिक जीवन जगण्यापलीकडील एक वेगळेच 'पूर्णविश्व' वाङ्मय निर्मात्यांनी साक्षात केले व त्यात वाङ्मयाचे सर्व रूपप्रकार घडविले गेले.

मराठी कवींची पृथगात्मता

संस्कृत वाङ्मयाची परंपरा तेराव्या शतकात नाही म्हटले तरी खंडित झालेली होती. मम्मटाच्या काव्यप्रकाशात अलंकारांची उदाहरणे किती सामान्य कवितेतून निवडली गेली हीच त्याची साक्ष आहे. चित्रकाव्य, श्लोकरचना, महाकाव्य, चंपूकाव्य, दीर्घकाव्य चूर्णिका, पद्यबंधकाव्य अशा विविध आकृतिबंधांतून संस्कृत कविता अवतरत होती. तीतून योग्य असे काही स्वीकारण्यापेक्षा महानुभाव कवींनी आणि वारकरी संतकवींनी अभंग, ओवीचा स्वतंत्र मार्ग चोखाळला. भाषेचे सुलभीकरण तंत्रबंधनाच्या पलीकडून अनुभवाला साक्षात करणे या मूलभूत प्रवृत्तिबदलातूनच तेराव्या शतकातील कवींची स्वतंत्र भूमिका कळू शकते. भाष्य, महाभाष्य, बंधप्रकरणे यांमध्ये त्यांनी संस्कृत वैय्याकरणांचा आदर्श स्वीकारला असे म्हटले जाते. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, तेराव्या शतकातील महानुभाव लेखक आणि ज्ञानेश्वर हे जाणकार विचक्षण आहेत. संस्कृत भाषा आणि वाङ्मयाची परंपरा त्यांनी अवलोकिली आहे, आत्मसात केलेली आहे व तिच्या साह्याने त्यांना मराठी बोलीभाषेत वाङ्मयाचे व शास्त्रनिर्मितीचे बीजारोपण करावयाचे होते व त्यासाठी त्यांनी उपनिषदांची सूत्रमयता स्वीकारली आणि त्यांचा आदर्श गिरविला.

वस्तुतः मम्मट हा संस्कृत साहित्यशास्त्रज्ञ महानुभाव लेखकांच्या नजिकच्या काळातील लेखक होता. त्याच्या काव्यप्रकाशाचा आदर्श न स्वीकारता उपनिषदांची सूत्रमयता आणि अचूकता विचक्षण संस्कृततज्ज्ञ महानुभावांनी स्वीकारली. चक्रधर स्वतः संस्कृतपंडित आहेत आणि चक्रधर परिवारातील केसोबास, अनेराजबास, म्हाइंभट्ट, दामोदरपंडित, लक्ष्मेंद्र, भीष्माचार्य, भाष्यकार भीष्माचार्य, विश्वनाथबास ही सर्व चक्रधर परिवारातील महानुभाव संस्कृत भाषा आणि वाङ्मयाचे जाणकार पंडितमान्य विद्वान मंडळी. धर्मभाषा म्हणून मराठी बोलीचा अंगीकार आणि विद्वत्सभेला जिंकण्यासाठी संस्कृतमधून पांडित्य-प्रदर्शन करून बोलीभाषेचे आशयसामर्थ्य वृद्धिंगत करण्याचाच हा प्रकार आहे. चक्रधरांचे मूळसूत्र त्यावरील लापिका, प्रकरणबस, आचार, वचनसंबंध, भाष्य, महाभाष्य, पूर्वसंबंध, ही पूर्वमीमांसा आणि उत्तरमीमांसेच्या तोडीची निर्मिती महानुभाव पंडितांनी केली. मूळसूत्र मराठी त्यावर लक्षणरत्नाकरासारखा ग्रंथ संस्कृतात आणि त्यावरील टीकाभाष्य पुनः मराठीत अशी ही रचना होत गेली व मराठीमधून शास्त्रीय सूक्ष्म पद्धतीचे अध्ययन पंथीयाकडून होऊ लागले. टीपग्रंथ आणि शब्दकोश व पुनः त्यासाठी निर्माण झालेले व्युत्पत्तिकोश हे सारे हेतुतः मराठी बोलीचे आविष्कार-सामर्थ्य दर्शविणारे ठरले आहेत. निर्मितिभूमिका चक्रधर वचनांचे पावित्र्य टिकविण्यासाठी झाली असली तरी तीमधून मराठी शास्त्रीय व्याकरण, भाष्य, महाभाष्य-निर्मिती झाली. शब्दकोश रचले गेले. मल्लिनाथाच्या टीपांसारखी सातीग्रंथावर टीपग्रंथ प्रथम द्वितीय आणि तृतीय शोधणीचे निर्माण झाले.

पंडित भीष्माचार्यांचे वार्तिक म्हणजे चक्रधर सूत्रांचे लक्षण, प्रकृती, कारक, व्याख्यान व स्वरूप सांगणारे असे पंचवार्तिक श्रीमुखीचे बोल भक्तांना समजून देण्यासाठी त्यांची रचना झाली. 'हे शास्त्र वचनरूप परमेश्वर' हीच भावना या निर्मितीमागे प्रबळ होती.

बोलीभाषेतील शास्त्रनिर्मिती आणि साहित्यनिर्मिती

संस्कृतभाषेच्या परिणामातून महानुभाव लेखकांनी शास्त्रनिर्मिती केली असे घडले नसून सर्वच लेखक पंडित, संस्कृत विद्यावंत, असल्यामुळे जे जे ज्ञानप्रकार आणि शास्त्रप्रकार, आणि वाङ्मय प्रकार व सिद्धांतप्रकार, संस्कृत भाषा आणि साहित्यातून त्यांनी मिळविले त्यांच्या आदर्शातून निखळ मराठी धर्मभाषेतून एक नवीन शास्त्रनिर्मिती आणि साहित्यनिर्मिती महानुभाव पंडितांनी केली. मराठी भाषेचा अभिमान धर्मभाषेच्या अभिमानातून फुलत गेला. शास्त्रनिर्मिती आणि साहित्य-निर्मिती विविध रूपप्रकारान्वित अशी निखळ मराठी बोलीभाषेतून निर्माण होत गेली. अतिशय आशयसंपन्न अशी सूत्रमय आणि व्यंजनागर्भ अशी चक्रधरवाणीरूप परमेश्वराचे पावित्र्य स्वीकारण्याच्या भूमिकेतून वाङ्मयनिर्मिती साधनरूप घेऊन अवतरली असली तरी तिची अंगकांती आणि वाङ्मय प्रकारांतील विविध आकृतिबंधांची विलक्षण कमनीयता लक्षात घेतली तर समजते की हे सारे वाङ्मयाचे आदिबंध तेराव्या-चौदाव्या शतकात निर्माण झालेल्या

मराठी वाङ्मयाने प्रस्थापित केले. एका तालबद्ध गद्याचा संस्कार चक्रधरांनी मराठी बोलीभाषेला दिला आणि तीतून आंदोलनात्मक, गेयसदृश्य शैलीचा प्रवाह मंत्राक्षरी पद्धतीने चक्रधरवाणीतून पाझरला आणि त्या शैलीनेच महानुभावांचे ललित आणि शास्त्रीय गद्य माखून निघाले. आणि हा पहिला ग्रांथिक आविष्कार 'लीळा चरित्रा'तून बघावयास मिळतो. 'सत्यं वद! धर्मं चर' ह्या तैतरीय उपनिषदातील प्रभावी आणि तालबद्ध वाणीप्रमाणे चक्रधरांची सूत्रवाणी मराठी मनांनी वरचेवर झेलली आणि त्यातून मराठी गद्याचे पाझर जिवंतपणे वाहू लागले. संपूर्ण आसमंत त्याने सृजनशील बनविला. गद्याची उत्स्फूर्त घडण आणि नादमय तालान्वित स्वरमंडळे चक्रधरवाणीतून अविर्भूत झालीत आणि मराठी गद्यवाणीला एक झळाळ आला. अत्यंत सरलार्थी आणि कमालीच्या भावघन अनुभूतीतून विश्वात्मक आशय चक्रधरवाणीतून साक्षात झाला व म्हाईभट्टाने त्याला संकलन, व्यवस्थापन, अनुक्रम देऊन गद्यातील लालित्य आणि शास्त्रीयता समजाऊन दिली. लीळाकथनातून वैयक्तिक अनुभूती आणि सर्वगामी, सार्वत्रिक अनुभवांची जाणीव यातील दूरान्तर कमी होत गेल्यामुळे आणि 'श्रीप्रभूचे बोल असतीं– श्रीप्रभूचे बोल नसती– एकीवासना, दुजीवासना' त्यात पावित्र्य आले. त्यामुळे 'लीळाबोल' एवढे साधे, सरळ, सोपे असूनही सर्वस्पर्शी, स्थलकालातीत आणि विश्वव्यापी सत्याच्या झळाळीने चमकदार आणि उठावदार झालेले दिसतात.

आदि पदबंधनागर

'लीळा'मधील विचारांच्या आणि भावनांच्या गतिशीलत्वाचे सामर्थ्य प्रभावीपणे गद्यात अभिव्यक्त झाले. निखळ आद्य स्वरूपी गद्याचा (Archtypal prose) उदय चक्रधरवाणीतून आणि मराठी धर्मबोलीभाषेतून झाला व तो लीळचरित्राची निर्मिती करून नागदेवाचार्य आणि म्हाइंभट्ट यांनी जोपासला. लीळाचरित्रात लोकजीवनाशी चक्रधर या व्यक्तित्वाची असलेली जवळिक आणि लोकजीवनाशी त्या व्यक्तित्वाची झालेली एकरूपता यामधून एक संवादात्म कथात्मकता लीळाचरित्राला आली आहे.

कथा, कविता, शास्त्रीयनिर्मिती, कथेचे विविध रूपप्रकार, कवितेचे विविध रूपप्रकार, शास्त्रीय वाङ्मयाचे विविध रूपप्रकार तेराव्या शतकात निर्माण झाले; म्हणून तेराव्या-चौदाव्या शतकातील मराठी वाङ्मय म्हणजे 'आद्य स्वरूपी वाङ्मय' ज्याला इंग्रजीत Archtypal literature म्हणतात तसे त्याचे स्वरूप आहे. गद्यनिर्मिती व गद्याची अनेकविध रूपे, काव्यनिर्मिती व काव्याची अनेक पदरी वीण, शास्त्रनिर्मिती व शास्त्राची अनेकविध उपांगे यांचे सातत्याने आणि सर्जनशील प्रतिभावंतांनी आपल्या निर्मितिक्षम प्रतिभेने एक अपर विश्व निर्माण केले. एक अलौकिक वाङ्मयीन सृष्टी निर्माण झाली की जिचा लौकिक जीवनापेक्षा पारलौकिक आणि आध्यात्मिक जीवनाशीच अतूट संबंध जुळला गेला होता. त्याच विश्वात सारे साहित्यिक मनाने एकरूप झाले होते व वाङ्मयनिर्मितीची जाणीव नसूनही त्यांच्या हातून केवळ वाङ्मय निर्मितीच झाली असे नाही तर वाङ्मयाचे सर्व रूपप्रकार (Forms and Patterns) आणि आकृतिबंध

अजाणता निर्माण झाले आणि म्हणून त्यात सहजता आणि लालित्य आले. विचार भावना आणि कल्पनांचे एक गतिशील सामर्थ्य (Dynamic force) आले. ईश्वर गुणसंकीर्तन आणि नामस्मरण तसेच वचनरूप परमेश्वराचे मनन आणि चिंतन नवविधाभक्तीच्या साहाय्याने तेराव्या शतकातील कवी करीत असता मात्र त्यातून 'रंगाथिले साहित्य अंबर' करून सोडणारे ' पदबंधनागर ' निर्माण झाले. कवित्व, रसिकत्व आणि परतत्त्वस्पर्श हीच वाङ्मयाची परिसीमा होती. ज्ञानभक्ती आणि कर्मभक्ती मधून मोक्षसुखाची वाट सर्वच पंथीयांनी स्वीकारली. पण या वाटेने जाताना मात्र साहित्याचे मानदंड प्रस्थापित करीत ते मोक्षमार्गाला सन्मुख झाले. समाजाचे नेतृत्वच वाङ्मयाने केलेले इतिहासात फार अल्प उदाहरण म्हणून दाखविता येतील परंतु महाराष्ट्रात मात्र दोन भिन्न विचारसरणीच्या पण अंतिम मुक्काम एकाच दिशेने स्वीकारणाऱ्या सांप्रदायिक कवींनी वाङ्मयात इतिहास घडविला. संपन्न, समृद्ध आणि सर्वांगीण अशी वाङ्मयाच्या आशयाची अभिव्यक्तीची आणि आकृतिबंधाची लक्षणीय आणि कलात्मक वाढ याकाळातील वाङ्मयाने केली आणि समाजाचे नेतृत्वच वाङ्मयाने स्वीकारले. आज तेराव्या-चौदाव्या शतकातील राजकीय, सांस्कृतिक, भौतिक जीवनमान, समजाऊन घेण्यासाठी वाङ्मयाशिवाय दुसरा कोणताच उपोद्बलक पुरावा उपलब्ध नाही याही दृष्टीने काळाचे आव्हान आणि परिस्थितीचे आव्हान तेराव्या-चौदाव्या शतकातील लेखकांनी स्वीकारले आणि कळिकाळाच्या माथा पाय ठेवून अत्यंत दैदीप्यमान अशी परंपरा मराठी संस्कृतीला आणि वाङ्मयाला या काळातील वाङ्मयनिर्मात्यांनी घालून दिली. परंपरा आणि पृथगात्मता, भावपरता आणि तत्त्वचिंतनात्मकता, प्रासंगिकता आणि केवलता, शृंगारबहुलता आणि निःसंगता अशा अनेक व्यूहांतून वाङ्मय प्रवाही झाले. पण त्याचा अस्सल कस आणि गुणात्मक सौंदर्य कुठेही उणावले नाही तर पुढे पाचशे वर्षे आणि आजही त्याच वाङ्मयाच्या खांद्यावर बसून पुढे जाण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत. वाङ्मयाने जे अनेकपदरी रूप तेराव्या-चौदाव्या शतकात घेतले त्याचा प्रस्तुत ग्रंथ म्हणजे इतिहास नव्हे. तर वाङ्मयीन दृष्टिकोणातून आणि आदिस्वरूप संशोधनाच्या दृष्टीने वाङ्मयाच्या आदिबंधांचा संदर्भशोध येथे घेतलेला आहे. या काळातील वाङ्मयातून व्यक्त झालेली तत्त्वचर्चा, पंथप्रतिष्ठा परंपरेचे स्वीकारलेले ऋण, आचारसंहिता, सांस्कृतिक सामाजिक, धार्मिक आणि राजकीय परिस्थितीचा विचार न करता निखळ वाङ्मयीन भूमिकेतून आदिस्वरूपाचा संदर्भशोध प्रस्तुत घेतला आहे. चक्रधर आणि चक्रधरांची प्रभावळ तसेच ज्ञानेश्वर आणि ज्ञानेश्वरांची प्रभावळ यांची वाङ्मयनिर्मिती म्हणजे संपूर्ण तेराव्या शतकातील आणि चौदाव्या शतकातील वाङ्मयनिर्मिती होय. चक्रधर आणि ज्ञानेश्वर या दोन महाबाहुंच्या आधारावर मराठी वाङ्मयाची इमारत उभी राहिली व तीतून विविध आकृतिबंध निर्माण झाले ते परस्परपूरक आणि परस्परान्वयी पद्धतीचे. दिव्याने दिवा उजळावा तसे अभंगवाङ्मय निर्माण झाले तर श्रीप्रभूच्या वचनरूपी परमेश्वराच्या दर्शनसुखार्थ भव्य मंदिराचे गाभारे महानुभावांनी निर्माण केले. त्याचेच आदिरूप न्याहाळण्याचा हा प्रयत्न आहे.


'विवेकसिंधू' ज्ञानेश्वरीनंतर आणि मुकुंदराज ज्ञानेश्वरांनंतर निर्माण झालें असा अतिशय वादग्रस्त कवी व काव्य म्हणून मुकुंदराजाकडे बघावे लागते परंतु आंतर्गत पुराव्यानुसार मराठी बोलीभाषेचा मुकुंदराज हाच पहिला तत्त्वचिंतक कवी ही भूमिका स्वीकारून त्यापद्धतीने विवेकसिंधूतील विवेकवादाचा ज्ञानेश्वरीवर झालेला परिणाम शोधून, पहिले तत्त्वचिंतन म्हणून विवेकसिंधूचे आदित्व शोधिले आहे. तिसऱ्या प्रकरणात महानुभाव तत्त्वज्ञानाच्या अलौकिक स्वरूपामुळे वाङ्मयावर झालेला परिणाम व त्यामुळे त्या वाङ्मयाला आलेल्या स्वरूपाची चिकित्सा केली आहे. तसेच आदि ललित गद्याच्या कक्षा निश्चित करून त्यांच्या आदित्वाची मीमांसा वाङ्मयीन पद्धतीने केली आहे. 'महानुभाव चरित्रग्रंथ', 'लीळाचरित्र' आणि 'दृष्टान्तपाठ' हे महानुभावांचे आदि ललित गद्यग्रंथ होत. त्यांचा ऊहापोह प्रस्तुत केला आहे. शास्त्रीय गद्याची चिकित्सा याच प्रकरणात अन्यत्र केली गेली आहे. 'मराठी गद्याचे अहेव लेणे' असलेले आणि 'चक्रधरांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व' म्हणजेच लीळाचरित्र हे लक्षात घेतल्यावर चक्रधरांचे ईश्वरीपण जोपासण्याचा भक्तांचा चाललेला प्रयत्न व त्यामुळे या आदिगद्याने घेतलेला अनेकबंधी रूपाविष्कार लक्षात घेतला व त्यातून चक्रधरांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्व उलगडून दाखविले. विवेकसिंधूपासून सुरू झालेली मराठी कवितेची वाटचाल कथाकाव्याच्या वळणाने कशी प्रवाही झाली त्याचा शोध घेतला व त्यातून एका स्त्रीने आख्यानात्मक कथाकाव्याची रोवलेली मुहूर्तमेढ व पश्चातकालीन वाङ्मयनिर्मितीत तिला आलेली अमृतफळे यांचा संदर्भ शोधला, तर नरेंद्राच्या रुक्मिणीस्वयंवरात पारंपारिक महाकाव्य आणि मराठी मनाची पृथगात्मता यांचा अपूर्व संकर कसा दिसतो व त्यातून एका लहानसर विषयातून प्रचंड महाकाव्यसदृश्य रचना करण्याची व त्यातून Co-related designs of Literature कसे जाणवते हे बघितले. व एकाच विवाहकथेला दोन कवींनी स्वीकारले असता त्यात आदितत्त्वांचा कोणता मूळबंध साकारतो ते शोधून काढले. 'साती ग्रंथ' आणि ज्ञानेश्वर यांचाही संदर्भशोध घेण्याचा प्रयत्न केला.

चौथ्या प्रकरणात ज्ञानेश्वर या कविकुलगुरुची अमृतकविता न्याहाळली. महाकवित्व, तेराव्या शतकातील आदिम स्वरूप, महानुभावपंथाशी असलेले काळनाते, अध्याय प्रस्तावना, भक्तिरहस्य, ज्ञानेश्वरी, अमृतानुभव आणि चांगदेव पासष्टीमधील तत्त्व चिंतनात्म काव्यात्मकता व अभंगवाणीतील नामस्मरण व भावपरता लक्षात घेतली. पाचव्या आणि सहाव्या प्रकरणात नामदेवाच्या कवितेतून उमललेल्या अंकुराचे प्रचंड वृक्षातझालेले जे रूपांतर होते त्याचा शोध संतवाणीच्या साह्याने घेतला व संपूर्ण लेखनाचा निष्कर्ष काढून लेखनप्रपंचाची वाचकांसमोर रुजवात केलेली आहे; मराठी वाङ्मयाचे आदिबंधात्मक स्वरूप आणि आशयातील भक्तिपरता यामधून मोक्षमार्गावरील कविमने कोणत्या पद्धतीने वाटचाल करून गेले त्याचेच हे थोडक्यात दिग्दर्शन!

परिशिष्टात संदर्भसूची, व्यक्तिनामसूची आणि संपूर्ण वाङ्मयाच्या विविधतेचा पट उलगडून दाखविला आहे.

□ □ □

॥ आदिकाव्य ॥



मराठी साहित्याचे पहिले ग्रांथिक काव्यस्वरूप मुकुंदराजाच्या 'विवेकसिंधू' या निर्मितीपासून जाणवू लागते. 'विवेकसिंधू' आणि 'ज्ञानेश्वरी' या दोन काव्यसरितांच्या मधला कालप्रवाह महानुभाव गद्यनिर्मितीने व्यापलेला आहे. काव्यनिर्मिती व लगेच पाठोपाठ गद्यनिर्मिती व तीतून परंपरानिर्मिती असे स्वरूप तेराव्या शतकातील मराठी वाङ्मयाच्या पहाटेस स्पष्ट दिसते. मराठी वाङ्मयाची सुरुवात कवितेपासून झाली आणि तीही भारदस्त, विचारप्रवर्तक आणि तत्त्वचिंतनात्मक गंभीर विचारदर्शनातून सुरू झाली ही गोष्टही स्वाभाविकच घडली असावी; कारण महाराष्ट्रीय माणसाचा स्वभाव धीरगंभीर प्रौढ, विचारपरिप्लुत अशा चिंतनशीलतेलाच प्राधान्य देणारा असावा आणि तेराव्या शतकात तर ही गोष्ट वाङ्मयनिर्मितीच्या संदर्भात विशेषत्वानेच जाणवते. विवेकसिंधूमधील तत्त्वचिंतन, महानुभाव वाङ्मयातील वैचारिकता, 'ज्ञानेश्वरी', 'अमृतानुभव' आणि संपूर्ण अभंग वाङ्मयातील सखोलता आणि अनुभवाच्या अभिव्यक्तीतील गांभीर्य लक्षात घेतल्यास कविता आणि गद्यवाङ्मयही अतिशय प्रौढपणे जीवनानुभवातील भक्ति प्रामाण्याला सामोरे जात असलेले दिसते. परंपरेने दिलेले तत्त्वज्ञान आणि आचार धर्मातील पृथगात्मता यांच्या आधाराने भक्तिप्रवण मनामनांनी ईश्वरी सान्निध्याची आणि त्यातून निर्माण होणाऱ्या मोक्षमार्गाची अपेक्षा मनोमन जोपासली आणि त्यातून एका ध्येयात्मक भावावस्थेतून वाङ्मयनिर्मिती होऊ लागली. लौकिक वास्तव जीवनजाणिवांपेक्षा पारमार्थिक, पारलौकिक आणि आध्यात्मिक पातळीवरून ईश्वरीसान्निध्याची आकांक्षा किती अंगानी या काळातील वाङ्मयातून रूपवान झाली याची साक्ष देण्यास आज आपल्या हाती फक्त ते वाङ्मयच उपलब्ध आहे.'ताम्रपट' आणि 'शिलालेख' म्हणजे दानपत्र, बक्षिसपत्रे आणि धर्मपत्रे म्हणून प्रशस्तीपट असतात असे सर्व 'ताम्रपट', 'शिलालेखां'वरून दिसते. वाङ्मय हा एकमेव पुरावा म्हणावा लागतो की जो लेखकाचे वाङ्मयीन व्यक्तिमत्व, वास्तव जीवनातील तपशील आणि भौतिक व लौकिक जीवनातील परिवर्तने स्पष्टपणे आणि प्रामाणिकपणे देऊ शकेल! परंतु तेराव्या शतकातील गद्यवाङ्मय वगळता कवितेने जीवनसन्मुखता नाकारली आणि भक्तिरंगानेच संपूर्ण काव्यसृष्टी न्हाऊन निघाली. समकालीन स्थितिगतीची स्पंदने आणि जीवन जगण्यातील वर्तमानाची चाहूल वास्तव आणि यथातथ्य दिग्दर्शनातून विशेषत्वाने महानुभाव गद्याने जोपासली. 'लीळा चरित्र' 'दृष्टान्तपाठ' या पहिल्यावहिल्या गद्यनिर्मितीतून समकालीन जीवनाची स्पंदने ऐकू येतात. तत्कालीन चालीरीती, व्यवहार, व्यापार, रूढ समजुती यांचे स्पष्ट चित्रण 'लीळाचरित्र', 'दृष्टान्तपाठ' घडविते. उलटपक्षी कवितेतून विशेषतः साती ग्रंथांतील कवितेतून कवींनी जीवनदूरत्व स्वीकारले. महानुभाव पंथप्रेरणेतून आणि कृष्णगुणवर्णनातून काव्यनिर्मिती झाल्यामुळे वास्तवापासून दूर आणि लौकिक जीवनदर्शनापासून परावृत्त असे कवितेचे स्वरूप दिसू लागले. ज्ञानेश्वरांच्या 'ज्ञानेश्वरी' आणि 'अमृतानुभवा'ची

साक्षही वेगळी नाही. नामदेव मात्र समकालीन कवितेत वेगळ्या पद्धतीने अभिव्यक्ती साधणारा कवी ठरला. प्रत्यक्षानुभूतीचे जे परिमाण लीळाचरित्राला आहे तेच नामदेवाच्या अभंगगाथेतून अभिव्यक्त होते. संतचरित्रे, समाधीवर्णने, पंढरीमाहात्म्य, विठ्ठल माहात्म्य, भीवरातीराचे वर्णन, तीर्थाटनाचे वर्णन या विविध अभंगांतून नामदेवाने साधुसंतांची जीवनचित्रणे अतिशय मार्मिकपणे आणि ऐतिहासिक दृष्टिकोणातून सत्यापलाप होऊ न देता घडविली. विविध शास्त्रपरिमाणांची त्या काळात निर्मिती झालेली नसूनही मराठी साहित्यिकांनी मात्र अनेक आदर्श निर्माण केले. अनेक परंपरा स्पष्ट पृथगात्म केल्या आणि जिवंतपणाने त्या परंपरा मार्गाधारे झाल्या. अनेक भौतिक आणि राजकीय संकटे समाजावर आलीत पण भक्तिमयतेची पाखर आणि ममतेचे पांघरूण जे तेराव्या शतकात साहित्यिकांनी समाजावर घातले; त्यामुळे समाजमन दुभंगले गेले असे झाले नाही. ताठ मानेने आणि भक्तिप्रवण मनाने प्रत्येक शतकात महाराष्ट्रीय नेतृत्व साहित्यातून निर्माण झाले आणि आपल्या विचारदर्शनातून समाजाला त्याने प्रभावित केले. वाङ्मयनिर्मितीचा सूर्योदयच तेराव्या शतकाच्या सुरुवातीला झाला आणि विविध वाङ्मयप्रकारांच्या निर्मितीने दशदिशा भरून गेल्या. अशा निर्मिती-सूर्योदयापूर्वी मुकुंदराज या कवीच्या 'विवेकसिंधू', 'पवनविजय' आणि 'परमामृत' अशा काव्यपर निर्मितीमुळे मराठी वाङ्मयाचा पंचपंच उषःकाल झाला. मुकुंदराजाचे या दृष्टीने मराठी वाङ्मयविश्वात अनन्य असे महत्त्व आहे. त्याच्या निर्मितीच्या संदर्भात आणि जन्म, काळ आणि स्थळाच्या संदर्भात अजूनही एकवाक्यता होऊ शकलेली नाही. किंबहुना ज्ञानेश्वर, नामदेव या वारकरी संप्रदायाच्या कविवर्यांच्याही बाबतीत मुकुंदराजप्रमाणेच अनंत पुराव्याच्या अडचणींचे दऱ्याडोंगर पसरलेले आहेत. त्यांना पार करून सत्यदर्शनाची आच संशोधक मनी बाळगून आहेत, परंतु त्यातूनच अनेकत्वाचा, निर्मितिप्रक्रियेचा आणि स्थळकाळाचा वाद निर्माण होतो. महानुभाव वाङ्मय म्हणूनच सुदैवी की सांकेतिक लिपीत गेल्यामुळे त्यावर जनसागराच्या धडका बसू शकल्या नाहीत व ते अभेद्य राहिले. वाङ्मय जितके आणि जसे जनसामान्यांच्या मनःकोषात झिरपत जाईल तितके आणि तसे त्यात अनेक रंग मिसळण्याची शक्यता अधिकाधिक वाढेल! वारकरी साहित्याचे नेमके असेच झाले. किंबहुना मुकुंदराजाच्या विवेकसिंधूचेही आधुनिकीकरण झाल्यामुळे तो ज्ञानेश्वरांच्या नंतर झालेल्या अनेक मुकुंदांपैकी एक असावा असा संशोधकांचा कयास आहे, पण वस्तुस्थिती तशी नाही. केवळ भाषिक वळण आधुनिक आहे, हा अनेक पुराव्यांपैकी एक पुरावा ठरतो व अनेक इतर पुरावे जर मुकुंदराजाचे प्राचीनत्व देत असतील, तर भाषेचे आधुनिक स्वरूप प्रत्येक काळात विवेकसिंधूवर जे संस्कार होत गेले त्याचेच एक निदर्शक स्वरूप म्हणून लक्षात घ्यावे लागेल!

'शके अकरा दाहोत्तरु। साधारण संवत्सरु
राजा सारंगधरु। राज्य करी
नृसिंहाचा बल्लाळ। तेयाचा कुमरु जयंतपाळ

तेणे करविला गदारोळ। ग्रंथरचनेचा
बाणगंगेच्या तीरी। मनोहर अंबानगरी
तेथे प्रगटले श्रीहरी। जगदीश्वर
ऐसा समर्थो सर्वोत्तमु। तेथ मुकुंद द्विजोत्तमु
विवेकसिंधू मनोरमु। निर्मिता जाला॥

मुकुंदराजाची कालनिश्चिती, स्थळनिश्चितीसाठी विवेकसिंधूमधील वरील ओव्या उपोद्बलक पुरावा म्हणून स्वीकारल्या जातात. परंतु त्या ओव्यांतही शकसंवत्सराचा मेळ बसत नाही व विवेकसिंधूच्या इतर पोथ्यांमधून वरील ओव्या गाळल्या गेलेल्या आहेत. कालनिश्चिती-प्रमाणेच स्थळनिश्चितीच्या बाबतीतही अनेक अडचणी येतात. बाणगंगा किंवा वैनगंगा नदी, तिच्या तीरावरील मनोहर आणि प्रसिद्ध अंबानगरी, नृसिंहाचा बल्लाळ आणि त्याचा कुमर जैतपाळ असे उल्लेख विवेकसिंधूतील ओव्यांतून आलेले असले तरी ते संदिग्ध असल्यामुळे संशोधकांत मुकुंदराजाच्या स्थलकालनिश्चितीसाठी दोन पक्ष निर्माण झाले. वऱ्हाडमधील वैनगंगेच्या तीरावरील अंभोरे म्हणजे अंबानगरी असे एक मत पुढे आले व मराठवाड्यातील परभणी जिल्ह्यातील आंबेजोगाई ही अंबानगरी असावी व मुकुंदराजाने येथेच काव्यनिर्मिती केली असे दुसरे एक मत पुढे आलेले आहे. अजूनही विद्वानात या संदर्भात एकवाक्यता होऊ शकलेली नाही. सर्वश्री य. खु. देशपांडे, डोळके, मा. श्री. अणे, वि. का. राजवाडे, कृ. पां. कुळकर्णी या संशोधकांनी मुकुंदराज वऱ्हाडचा म्हणून कौल दिला, तर सर्वश्री न. र. फाटक, शं. गो. तुळपुळे आणि वि. भं. कानोले यांनी मुकुंदराज मराठवाड्याचा म्हणून आपला आग्रह कायम ठेवलेला आहे. वऱ्हाड आणि मराठवाडा ही प्राचीन मराठी संतकवींची निर्मितिक्षमतेची कर्मभूमीच ठरली. चक्रधर, म्हाइंभट्ट, ज्ञानेश्वर, नामदेव, नागदेवाचार्य केसोबास ही सर्व साहित्यिक मंडळी वऱ्हाड-मराठवाड्यातीलच आहेत. विवेकसिंधूत जो जैत्रपाळाचा उल्लेख आहे तो कलचुरी घराण्याचा मांडलिक राजा राज्य करीत होता. मुसलमानांच्या दक्षिणेतील आक्रमणापूर्वीचा आणि मुकुंदराजानंतरचा असा एक संस्कृत ग्रंथ 'योगेश्वरीमाहात्म्य' (तीस अध्याय व सत्ताविसशे श्लोक) उपलब्ध झाला आहे. या काव्याचा आशय म्हणजे अंबेजोगाईचे स्थळमहात्म्य वर्णन करणे असा आहे त्यावरूनही स्थळनिश्चितीच्या संदर्भात उपयुक्त संदर्भशोध लागू शकतो. मुकुंदराज हा ज्ञानेश्वरांनंतरच्या अनेक मुकुंद कवींपैकी एक आहे या विधानात मात्र काहीही अर्थ नाही. एक तर जयंती नदी अंबेजोगाईतून वाहत जाऊन बाणगंगेला जाऊन मिळते त्या वाटेवर आजही मुकुंदराजाचे समाधीस्थान उभे आहे व त्याच्या थोडे पुढे ज्ञानेश्वर-पादुकांचे स्थान आहे व अजूनही भक्तगण या रम्य स्थळाला भेट देत असतात परंतु यापेक्षाही एक महत्त्वपूर्ण पुरावा म्हणजे ज्ञानेश्वरीतच 'विवेक सिंधू' आणि 'परमामृता'चे आलेले उल्लेख होय![1]

१. ज्ञानेश्वरी ६ : ११–विवेकसिंधु, २ : ३७३–विवेकामृतसागरू. ज्ञा. २–६७ परमामृत.

विवेकसिंधूबरोबरच 'पंचीकरण', 'मूलस्तंभ', 'पवनविजय' आणि 'परमामृत' या तत्त्वचिंतनपर रचना मुकुन्दराजाच्या नावावर आहेत. विवेकसिंधूचा अन्वयसारांश परमामृतात आला, असे मुकुन्दराजानेच स्पष्ट केले आहे. ज्ञानेश्वरीतील तत्त्वसार जसे अमृतानुभवात उतरले आहे तसेच विवेकसिंधूचे तत्त्वचिंतन परमामृतात एकवटले आहे. ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास या मुकुंदराजानंतरच्या कवींवर भाषिकदृष्ट्या, विचारदृष्ट्या भूमिकेच्या संदर्भात मुकुंदराजाचा दाट परिणाम स्पष्ट जाणवतो. यावरून मुकुंदराज हा मराठी भाषेतील 'आद्यकवी' आणि त्याची निर्मिती ही 'आद्यनिर्मिती' म्हणूनच स्वीकारणे आवश्यक आहे. ज्ञानेश्वरीचे भाषिक वळण आणि विवेकसिंधूचे भाषिक वळण जुळत नसले तरी केवळ या एका कारणाने त्याचे आद्यत्व संपुष्टात आणण्याची गरज नाही. ज्या पद्धतीने विवेकसिंधूत तत्त्वचिंतन झालेले आहे त्याचा ठसाही ज्ञानेश्वरीत स्पष्ट उमटलेला आहे. 'शांकरोक्तिवरी मी बोले मराठी वैखरी' ही मुकुंदराजाची निर्मितीची प्रेरणा आहे. भक्तिमार्गाचा आणि अद्वैत तत्त्वज्ञानाचा जो 'सुकाळ' ज्ञानेश्वरांनी ब्रह्मविद्येतून केला तिचे बीज 'विवेकसिंधू'त रुजले गेले व ज्ञानेश्वर-नामदेवांनी त्याचे प्रचंड वृक्षात रुपांतर केले. मुकुंदराजांच्या ओवीची रचना साडेतीन चरणी असून चार चरणी ओवीचा वापर त्यांनी केलेला नाही हीही एक प्राचीनतेची साक्ष लक्षात घ्यावी लागते. पहिले तीन चरण सयमक समाक्षरी किंवा विषमाक्षरी असे आहेत. आणि दुसरा पुरावा म्हणजे मुकुंदराजाची शिवोपासना यावरूनही त्यांचे आद्यत्व निर्विवाद म्हणून स्वीकारावे लागेल यात शंका नाही.

'विवेकसिंधू' मराठी भाषेतील पहिला ग्रंथ! भाष्यपर निरुपण करून मुकुंदराजाने पारंपारिक तत्त्वचिंतन मराठी या बोलीभाषेतून अभिव्यक्त केले. या दृष्टीने महानुभाव पंथीयांची धर्मभाषा मराठी आणि ज्ञानेश्वर-नामदेवांची लोकभाषा मराठी जी कौतुकाचा विषय ठरली अशा भाषेची पाठराखण करण्यास पहिल्यांदा मुकुंदराज पुढे आलेला आहे. उपनिषदाला जे परंपरेत स्थान आहे तसे विवेकसिंधूला मराठी वाङ्मय परंपरेत आहे. या काळात संस्कृत भाषेचा दरारा आणि बोलीभाषेचे केवळ मानवी भावसंयोजन आणि भावप्रगटिकरण करणे इतक्यापुरतेच स्थान मर्यादित होते. किंबहुना सर्वच बोलीभाषांची संस्कृत भाषेच्या संदर्भात केवळ आदानप्रदानात्मक अशीच अवस्था होती. पहिल्यांदा गौतम बुद्धाने आणि महावीराने अनुक्रमे पाली आणि अर्धमागधींचा पुरस्कार करून संस्कृत भाषेपेक्षा वेगळ्या वाटा स्वीकारल्या. परंतु त्यांनाही शेवटी संस्कृत भाषेकडे कालांतराने वळावेच लागले! मुकुन्दराज आणि महानुभाव लेखकांनी एकीकडे मराठी भाषेचा आग्रह धरला व दुसरीकडे संस्कृतमधूनही रचना केली. उदा. मुकुन्दराजने 'विवेकसिंधू' मराठी बोलीभाषेतून रचला असला तरी तेवढ्याने त्याचे समाधान न झाल्याने 'ब्रह्मावबोध', 'परमार्थबोध', 'तत्त्वबोध' इत्यादी संस्कृत रचनेतून विवेकसिंधूतील अध्यात्मशास्त्राचे निरूपण केलेले आहे. महानुभाव लेखक केसोबासाने लीळा चरित्राचे भाषांतर 'रत्नमालास्तोत्रात केलेले आहे. अध्यात्म-

विचारांचे आणि भाषेचे व संस्कारांचे पारंपारिक दडपण मराठी लेखकांना नाकारता आलेले नाही तर एकीकडे परंपरा स्वीकारावयाची व दुसरीकडे तिच्यापासून थोडेफार पृथगात्म होत जावयाचे अशा पद्धतीनेच ज्ञानेश्वरही गेलेले दिसतात. महानुभाव लेखकांची सूत्रभाष्ये, महाभाष्ये, भाष्ये, वार्तिके इतकेच नव्हे, तर सर्व टीपग्रंथही संस्कृत साहित्य-परंपरेतून आणि आदर्शातून निर्माण झाले. महानुभाव कवींवरही संस्कृत महाकाव्यांचा जो पगडा आहे, त्याची दिशा 'रुक्मिणीस्वयंवर', 'शिशुपाळवध' इत्यादि निर्मितीतून लक्षात येते. या काळातील लेखकांची द्विधानिष्ठाच त्यामधून डोकावित्ते. एकीकडे बोलिभाषेच्या ऐश्वर्याचे, ताकदीचे आणि सौंदर्याचे योग्य भान मराठी लेखकांना आहे, तर दुसरीकडे पंडितशरणता आहे. एका विशिष्ट वर्गापुढे मान्यताप्राप्त होण्यासाठी पुनः संस्कृत भाषेतून रचना करण्याकडे लेखकांना वळावे लागलेले आहे. आज ज्याप्रमाणे ग्रांथिक भाषा ही प्रादेशिक भाषेपेक्षा नाही म्हटले तरी थोडीफार वेगळी आहे; तशीच अवस्था बोलीभाषा आणि संस्कृत भाषा यांच्या संदर्भात लेखकांना जाणवत असावी म्हणूनच मराठी भाषेतून पृथगात्मपणे केलेला तत्त्वविचार पुनः संस्कृतमधून सांगितला जातो. चक्रधरांचा 'सूत्रपाठ' तर संस्कृत सूत्रवाङ्मयाचाच वस्तुपाठ आहे. या काळात असे घडले; कारण केवळ भाषिक अभिमानापोटी मराठीमधून वाङ्मयनिर्मिती झालेली नसून बहुजन समाजापर्यंत अध्यात्मशास्त्र, ब्रह्मविद्या आणि भक्तिमार्गातील उपासना लेखकांना पोहोचविणे आवश्यक वाटले व त्यासाठी मराठीमधून रचना करीत असतानाच संस्कृत भाषेलाही दूर लोटून भागले नसते याची जाणीव प्रखर बनली होती. या काळात म्हणजे शंकराचार्यांच्या शांकरभाष्यनिर्मितीनंतर संपूर्ण भारत देशात एक अध्यात्मशास्त्राच्या पुनर्भ्यासाचा प्रयत्न होऊन वेदान्त, तत्त्वज्ञान, उपासना, पंथपरंपरा, आचारसंहिता या संदर्भात नवे वारे निर्माण होऊन संस्कृतातील प्रस्थान त्रयींवर विद्वानांचे लक्ष केंद्रित झाले आणि कर्मकाण्डाच्या अतिरेकावस्थेतून आणि हिंसेच्या आचारधर्मापासून ईश्वरी चिंतनाला आणि तत्त्वस्वरूपाला ज्यात विशेषत्व मिळालेले होते आणि ज्यात मानवी जीवनाला एक आदर्शवाद दिला गेला होता अशा प्रस्थानत्रयींकडे म्हणजे 'ब्रह्मसूत्रे', 'उपनिषदे' आणि 'भगवद्गीता' याकडे दहाव्या शतकापासूनच विद्वानांचे लक्ष्य केंद्रिभूत झाले. एका अर्थाने हा काळ म्हणजे प्रस्थानत्रयीतील अध्यात्मशास्त्राचा पुनरुज्जीवनाचा काळ ठरला. शंकराचार्य आणि रामानुजाचार्य यांनी लिहिलेली भाष्ये आणि टीका विद्वानांच्या कुतूहलाचा विषय बनल्या. मुकुंदराजांची रचना ही या कुतूहलातून आणि जनसामान्यांच्या ज्ञानात्मक भरणपोषणासाठी झालेली दिसते. विवेकसिंधू संस्कृत आणि मराठी या दोन्ही भाषांमधून रचला गेला.

विवेकसिंधूचे स्वरूप

भारतीय परंपरेने स्वीकारलेले अध्यात्मशास्त्र आणि वेदांत 'मऱ्हाठी' वैखरीत आणून प्राकृत लोकांना प्राकृत भाषेत वेदांत समजाऊन सांगावा या भूमिकेमधून विवेक-

सिंधूची निर्मिती झाली. विवेकसिंधूचे स्वरूप गुरुशिष्यसंवादात्मक असून त्याच्या या अभिव्यक्तीचा पुढील अनेक शतकांतील मराठी कवींवर परिणाम झालेला आहे. किंबहुना तेराव्या शतकातील जवळजवळ संपूर्ण वाङ्मय हे संवादात्मक आविष्कारातून सिद्ध झाले आहे. वक्तृत्व आणि प्रवचननिरूपण शैलीचा अवलंबच सर्व साहित्यिकांनी केला; कारण समूहमनांना तत्त्वचिंतन पटवून देत असता ते अभ्यासजड होऊन चालणार नसून दैनंदिन जीवनातील विविध प्रतीके, उपमा, दृष्टान्त आणि प्रतिमा योजून समजाऊन देण्याची भूमिका संवादात्मक आविष्कार पद्धतीमागे प्रबळ ठरली. विवेकसिंधूचे पूर्वार्ध आणि उत्तरार्ध असे दोन पृथक विभाग असून पूर्वार्धात सातशे सत्त्याहत्तर आणि उत्तरार्धात आठशे चौऱ्याण्णव ओव्या आल्या आहेत व एकूण अठरा प्रकरणांत विभागल्या गेल्या आहेत. प्रकरणशः अशी विवेकसिंधूची निर्मिती झाली असली तरी त्याचा अंतिम परिणाम 'ज्ञानेश्वरी' किंवा 'अमृतानुभवा'प्रमाणे एकसंध व एकात्म असाच होतो. विवेकसिंधूच्या पूर्वार्धात आलेले विषय व तत्त्वचिंतन आणि उत्तरार्धात आलेले तत्त्वचिंतन व विषय यांमध्ये एक अन्तःसंगती निर्माण झालेली आहे. प्राचीन संस्कृत भाष्य निरुपणाची जी शैली आहे तीच मुकुंदराजाने स्वीकारली इतकेच नव्हे, तर अमृतानुभवातही तिचा स्पष्ट ठसा जाणवतो. एका चढत्या क्रमाने आणि लौकिकाकडून अलौकिकाकडे, द्वैताकडून अद्वैताकडे आणि अंतिमतः सत् चित् आनंद स्वरूपात विलीन होणाऱ्या जीवाशिवाच्या अद्वयानुभूतीमध्ये निर्माण होणाऱ्या केवल अवस्थेची प्रतीती मुकुंदराज व्यक्त करतात व शेवटच्या प्रकरणात गुरुगौरव करून ईश्वर हाच गुरू या जाणीवेपर्यंत पोहोचतात. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव आणि विवेकसिंधू या तिन्ही भाष्यपर आणि तत्त्वचिंतनपर ग्रंथात एकीकडे पारंपारिक तत्त्वविचार आणि अध्यात्मचिंतन पृथगात्म पद्धतीने व्यक्त होत जाते तर दुसरीकडे मराठी भाषेचे अभिव्यक्ती सामर्थ्य आणि समृद्धता आणि ती व्यक्त करण्यातील जिव्हाळा साक्षात होत जातो. म्हणूनच या निर्मितीला केवळ भाष्यपर तत्त्वचिंतन म्हणता येत नाही तर भाष्याला, तत्त्वचिंतनाला आणि अध्यात्मशास्त्राला आलेले काव्यरूप लक्षणीय ठरते.

विश्वाची निर्मिती, उभारणी हा पूर्वार्धाचा, चिंतनाचा विषय आहे; तर विश्वाची 'संहारणी' हा उत्तरार्धाचा विषय आहे. उत्पत्ती, स्थिती आणि लय (विलय) या संदर्भात सर्वच प्राचीन भारतीय तत्त्वचिंतकांनी मूलगामी विचार केलेला आहे. मानवाचा आणि सृष्टीचा दृढ संबंध आणि त्यात ईश्वरी चैतन्याला असलेले स्थान आणि ईश्वराचाच अंश सृष्टीत आणि जिवात दाटलेला आहे याची येणारी प्रतीती यामधून भारतीय तत्त्वविचार बदलत्या काळात बदलती वळणे घेत पण सातत्याने होत राहिला. ईश्वर, जग आणि जीव यांचा परस्पर निर्मितीसंबंध शोधत जाणे व त्यातून मानवी अस्तित्वाचा आणि कर्तव्याचा शोध घेणे या भूमिकेतून एका आदर्शवादी पद्धतीने तत्त्वविचार साकार होत गेला तो अनुभवाचाच विषय ठरल्यामुळे स्वानुभवाच्या अद्वैती प्रतीतीला, ईश्वरी साक्षात्कारी अवस्थेला आणि त्यातून येणाऱ्या निरामय अवस्थेला प्राधान्य मिळून विचार-

वंतांनी एक विशिष्ट पद्धती आणि आत्मानुभवाचे पाठबळ तत्त्वविचाराला मिळवून दिले. वेदकाळापासून मुकुंदराजापर्यंत पूर्वेतिहास लक्षात घेतला तर वरील विधानांतील सत्यता समजू शकेल. आध्यात्मिक जीवनातील विविध प्रश्न आणि समस्या यांचा ऊहापोह तत्त्वचिंतकांनी केला व त्यातून भारतीय अध्यात्मशास्त्र एकीकडे प्रगत आणि दुसरीकडे जीवनसंदर्भी होऊ शकले. आत्मज्ञानाची अभिव्यक्ती आत्मानुभवातून स्वीकारल्यामुळे साक्षात्काराची प्रतीती आणि तत्त्वचिंतनाचे वस्तुनिष्ठ रूप जे कवितेत उतरले त्याचा मराठी भाषेतील पहिला उन्मेष विवेकसिंधूत अभिव्यक्त झाला.

विवेकसिंधूतील तत्त्वचिंतन

पूर्वार्धात पहिल्या सात प्रकरणांत सृष्टीची उभारणी कशी झाली याचे विवेचन आले असून त्यात स्वरूपसमावेशन, स्वानुभवयुक्त सृष्टिक्रम, ईश्वरतनुत्रय, लिंगदेहस्वरूप, प्रणवार्थात्मक सर्वब्रह्म या विषयावर भर दिला आहे. उत्तरार्धात विश्वाची संहारणी, जीव आणि ईश्वर यांची एकरूपता, स्थूलदेह, लिंगदेह, कारणदेह, महाकारणदेह, गुरुमाहात्म्य आणि सत् चित आनंद विवरण अशी विवेकसिंधूतील तत्त्वज्ञानाची मांडणी आहे विवेकसिंधूच्या प्रास्ताविकात ग्रंथनिर्मितीचा मूळ उद्देश, नमन, मराठी भाषाभिमान ग्रंथाची फलश्रुती, गुरुशिष्य लक्षणे, त्यांची इष्टानिष्टता शिष्य-गुरुच्या प्रश्नोत्तरातून उलगडत जाते. पूर्वार्धात पंचिकरणाची प्रक्रिया समजाऊन सांगितली आहे तर उत्तरार्धात प्रपंचकारणांचा निरास करणाऱ्या महावाक्याचे स्पष्टीकरण आलेले आहे. शिष्याला तुर्यावस्था प्राप्त होताच ब्रह्मसुख मिळते व ते तसेच कायम असावे म्हणून जागृती, सुषुप्ती, स्वप्न, तुर्या, आणि उन्मनी यांचे स्पष्ट रूप व्यक्त केले आहे.

परब्रह्म स्वरूप

परब्रह्म हे ज्ञानमात्र, केवल, निजानंदघन, निर्मळ, त्रिपुटीविरहित, परिपूर्ण, अव्यक्त, सहज, सदोदित नित्यनूतन आहे, असे मुकुंदराजाने मानले आहे. विवेकसिंधूचा परिणाम ज्ञानेश्वरांच्या अमृतानुभवावरही झाला आहे. अमृतानुभवात परब्रह्माचे स्वरूप पहिल्याच अध्यायाच्या पहिल्या पाच श्लोकांत ज्ञानेश्वरांना जे जाणवले आहे ते मुकुंदराजाला जसे जाणवले तसेच आहे. माया व अविद्या या दोन उपाधी आहेत. परमात्मा हा परब्रह्माचे विवर्त रूप आहे. मायेमुळे परब्रह्माला सृष्टीची उत्पत्ती करावी असे वाटते. त्यातून महतत्त्व म्हणजे गुणक्षोभिणी मायाच पुनः जन्माला येते व सात्त्विक, राजस आणि तामस अहंकाराची निर्मिती होते. सात्त्विकातून ज्ञानशक्ती, राजसातून क्रियाशक्ती, तामसाची द्रव्यशक्ती निर्माण होते. त्यातून पंचमहाभूते निर्माण होतात. प्राणपंचक, ज्ञानेंद्रिय पंचक, कर्मेंद्रिय पंचक अशी तत्त्वे निर्माण होतात.

अविद्येच्या अज्ञान, विक्षेप आणि आवरण अशा तीन शक्ती असून जीव अविद्यामय असतो. प्रकृतिपुरुषांची युग्मे अनादिसिद्ध आहेत. पिंडीचे व ब्रम्हाण्डीचे स्थूल,

लिंग, कारण आणि महाकारण असे चार देह असून त्याच्या प्रत्येकी चार अवस्था, स्थाने, भोग, गुण, मात्रा, प्रणवप्रकार आणि देवता असतात.

पंचीकरणाचा सिद्धांत

देह पिंडब्रह्मांडात्मक असला तरी त्याच्या निर्मितीच्या मुळाशी पंचीकरणाचा सिद्धांत आहे. विश्वाच्या संहारणीचा आणि उभारणीचा तो गाभा आहे. स्वानुभवाच्या चार अवस्थांनी मोक्ष प्राप्ती होते. अंतिम ज्ञानप्राप्तीही स्वानुभवातूनच होते. ज्ञानेश्वरांनी अमृतानुभवात स्वात्मानुभवाच्या अद्वयानंदाची मीमांसा केलेली आहे. पंचीकरण म्हणजे पंचमहाभूतांचे एका मर्यादेत आणि विशिष्ट प्रमाणात परस्परांचे संमिश्रण आणि दूरान्तर होय. स्वात्मानुभवातून मोक्षप्राप्ती होत असल्यामुळे म्हणजे परतत्त्वज्ञान होत असल्यामुळे त्यातून भक्तितत्त्वाचा उगम भारतीय परंपरेने जो शोधला तसाच मुकुन्दराजानेही स्वीकारला आहे. आत्मज्ञान आणि सगुणभक्ती यांचे परस्पर महत्त्व सर्व संतांनी मान्य केले, त्यात मुकुन्दराज हा पहिला मराठी कवी ठरला. जीवन्मुक्ताची सगुणोपासना विवरण करून सांगत असता हरि आणि हर यांचे ऐक्य मुकुन्दराजाने मांडले आहे. ज्ञानेश्वरी आणि अमृतानुभवात 'विष्णु कृष्ण गोविंदुः एकु अंगु' असेच मतप्रदर्शन ज्ञानेश्वरांनी केले. वेदान्ताला अनुसरणारा ज्ञानयोग आणि आत्मसाक्षात्कारातून प्रगट होणारा भक्तियोग मुकुन्दराजाने ज्ञानेश्वरांइतका पृथकपणे सांगितला नसला तरी त्यांची भूमिका कैवल्यसाधकाचीच आहे. आत्मज्ञानातून स्फुरणाऱ्या केवळ भक्तीचा पुरस्कार नंतरच्या काळात ज्ञानेश्वरांनी केला व संपूर्ण महाराष्ट्र या विचाराने निनादून गेला. ज्ञानभक्तीला भावभक्तीची जोड नामदेवाने दिली व नवविधा भक्तीने ईश्वराचे नामसंकीर्तन आणि नामस्मरणात विविध भौतिक आणि राजकीय व्याधिउपाधींनी ग्रस्त झालेला समाज एकरूप झाला, तल्लीन झाला. वर्णधर्मांची आणि जातिसंस्थांची चौकट स्वीकारूनही ईश्वरी सान्निध्यात मात्र बहुजन समाजाला अभिव्यक्तीचे एक निखळ भावमय असे साधन मिळाले व नकळताच उत्कटतेने जाणवलेला वेदांत आणि अद्वैताचे अध्यात्म उत्स्फूर्तपणे आपल्या भाववाणीतून ते अभिव्यत करू लागले. सगुणाकडून निर्गुणाकडे किंवा निर्गुणाकडून सगुणाकडे जाण्याचा भक्तिमार्ग ज्ञानेश्वरांनी झळाळून सोडला असला तरी त्याची प्रामाणिक सुरुवात मुकुंदराजाने केली आहे.

होआवी विषयी विरक्ती । आणि चित्तासी प्रत्येक्षावृत्ती
करावी ईश्वरी भक्ती । आनन्येभावे
म्हणौनि जगदीश्वराचे भजन । ते कहीचि नोहे अप्रमाण
जे भक्तासि कैवल्येसाधन । होये ज्ञानद्वारा ॥
म्हणौनि भक्तिज्ञान विरक्ती । जीये शास्त्रे उपपादिती
तीये बोलावी महंती । येथार्थवादे ॥

असा निर्देश मुकुंदराजाने केला आहे. 'शांकरोक्तिवरी मी बोले वैखरी' असे

मुकुंदराजाने म्हटले आहे आणि वृद्धापकाळी या ग्रंथाची निर्मिती झालेली आहे असा स्पष्ट उल्लेखही विवेकसिंधूत आलेला आहे.[१] 'मज स्वासोन्मेषाचाही श्रमु' होत आहे असे मुकुंदराज म्हणतो. शांकरभाष्य मुकुंदराजासमोर आदर्श म्हणून निश्चितच होते; कारण शांकरभाष्यातील ब्रह्मसूत्रभाष्याचे आणि उपनिषदभाष्याचे मथित सार म्हणजे विवेकसिंधू होय. शंकराचार्यांचा विवर्तवाद मुकुंदराजाने स्वीकारला आहे व त्या अनुसंधानाने 'माया' व 'अविद्या' यांचा अन्वयार्थ लावला आहे. मुकुंदराजावर शांकरमताचा पगडा आहे तर परंपरेने ते नाथपंथाशी जोडले गेले आहेत. मुकुंदराजांनी जी गुरुपरंपरा दिली आहे त्यात

आदि गुरू श्री आदि नाथु । तेथौनि श्री हरिनाथु
तेयाचा शिष्य रघुनाथ । जो गुणसिंधु ।। विवेकसिंधू १८ : ३४

अशी आहे व हरिनाथ म्हणजे दुसरातिसरा कुणी नसून महानुभावपंथाचा संस्थापक चक्रधरस्वामी होय अशी नवीन माहिती डॉ. रा. चिं. ढेरे (चक्रपाणी) यांनी उजेडात आणली आहे व त्यासाठी उपोद्बलक पुरावेही दिलेले आहेत. अजून संपूर्ण व निश्चित पुरावे हाती आल्याशिवाय हरिनाथ म्हणजे चक्रधर आणि रघुनाथ म्हणजे रामदेवदादोस यांच्याविषयी निर्णय होऊ शकत नाही; हे निश्चित. मुकुंदराजाला ईश्वरीस्वरूपात निर्गुण, निराकारता जाणवली आहे.

तू निर्गुण निराकारु । निःसंगु निर्विकारू
तुझे या स्वरूपाचा पारु । नेणती ब्रह्मादिक
तू सच्चिदानंद घनु । षड्विचारविहीनु
स्वयंप्रकाशे प्रकाशमानु । तू स्वसंवेद्य ।। विवेकसिंधू १ : ३, ४

ईश्वर निर्गुण, निराकार आणि निःसंग निर्विकार असून त्याच्या स्वरूपाचा ठाव ब्रह्मादिकांनाही लागत नाही. तो सत्‌चित आणि आनंदमय असून षट्‌विकारविरहित आहे. स्वयंप्रकाशी आणि स्वसंवेद्य असे त्याचे स्वरूप आहे. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत आणि अमृतानुभवात ईश्वरी अस्तित्वाविषयी नेमकी अशीच भूमिका वेतलेली आहे. ईश्वराची स्वयंप्रकाशितता आणि स्वसंवेद्यता ज्ञानेश्वरांनीही सर्वश्रेष्ठ मानली आहे. मुकुन्दराजाचाही दृष्टिकोण तोच आहे.

ज्ञानेश्वरांप्रमाणे मुकुन्दराजाची काव्यनिर्मितीची भूमिका नाही. विवेकसिंधूच्या सुरुवातीलाच तसे स्पष्ट होते.

नवरसाचे उपलवणे । ते उघड वाचेसि नागवणे
म्हणौनि न प्रवर्तति स्याहाणे । तेथ विषयी
होका वक्ता नवरसांचा । जन्हि चतुर अपाडाचा
तथापि लाभु परमार्थाचा । तया दुर्लभुच की ।। विवेकसिंधूः १:१७, १८.

---

१. विवेकसिंधू पूर्वार्ध ७ : १५४.

तत्त्वनिरूपणात नवरसांचा स्वादिष्टपणा आणणे म्हणजे भाषेची सरळ फसवणूक आहे. वक्ता नवरसनिर्मिती करण्यात कुशल असला तरी त्याच्या त्या कृतीचे परमार्थ लाभ होणे अतिशय कठीण आहे असे मुकुंदराजाचे मत आहे. यावरून मुकुंदराजाची भूमिका समजू शकते. शांकरभाष्यात आलेल्या वेदांताला लक्षात घेऊन त्याला मराठी वेष चढविणे ही एक प्रबळ प्रेरणा विवेकसिंधूच्या पाठीमागे दिसते आणि दुसरी म्हणजे चतुर अपाडाचा नवरस निर्मिती करणारा वक्ता असला तरी त्याने काव्यनिर्मिती करण्यापेक्षा परमार्थ निरुपण करावे अशी मुकुंदराजाची भूमिका दिसते. केवळ काव्यपर रचना करणे हीच विवेकसिंधूच्या निर्मितीमागील भूमिका आहे. परंतु असे असूनही मतप्रतिपादनात मुकुंदराजाने बहारीचे दृष्टान्त योजिले आहेत.

ऊस किरू दिसे काळा । परि घेपे रसाचा गळाळा
तैसे आरुष बोलपरि झळाळा । दिसे विवेकाचा

लौकिक जीवनव्यवहारातील प्रतीके घेऊनच मुकुंदराज अध्यात्मनिरुपण करतात. चोखामेळानेही 'ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा' असेच म्हटले आहे. 'जैसे भागले ढोर पावे सुखादिक बिढार', 'प्रपंचाची विणावणी', 'गगनी नाचिले आभाळ' 'मौक्तिकी-रंध्रशलाका' अशा नित्यवास्तवातील दृष्टांतातून मुकुंदराज अध्यात्मनिरुपण करतात. ज्ञानेश्वर हे मूलतःच कवी होते. त्यांनी भगवद्गीतेतील अध्यात्मशास्त्राला स्वीकारून त्यालाच काव्यात्मरूप दिले. मुकुंदराजाने शांकरभाष्य स्वीकारले, पण ते जसेच्या तसे मांडले. काव्याची ढब त्याला तितकीशी मिळाली नाही. पण तरीही काही ठिकाणी कल्पनेचा शिरवा घेऊन आपला अध्यात्मविचार मुकुंदराजाने अधिक स्पष्ट केला.

वेदशास्त्रांचा मतितार्थु । मन्हाटया जोडे फलितार्थु ।।
हा शिवशक्तीचा समयोगी । हाचि बोलिजे राजयोगु ।।
वेदशास्त्राचा मथितार्थु । तियां बोलिला हा परमार्थु ।।

वरीलप्रमाणे जवळजवळ प्रत्येक अध्यायात 'वेदान्ताचा व उपनिषदाचा मतितार्थ मी मांडतो आहे, सांगतो आहे,' याच भूमिकेने अध्यात्मशास्त्राचा ऊहापोह मुकुन्दराजाने केला आहे

विवेकसिंधू आणि ज्ञानेश्वरी-अमृतानुभव

मुकुंदराजाने पहिली मराठी रचना केली ती भाष्यपर! ज्ञानेश्वरांसारखे कविगुण त्याच्या ठिकाणी अभावानेच आढळतात. त्याच्या निर्मितिहेतूचा आणि अभिव्यक्तिपद्धतीच विचार केला तर ज्या आन्तरिक प्रेरणेने ज्ञानेश्वर आणि महानुभाव गद्य लेखक मराठी भाषेच्या अभिमानाने आणि महाराष्ट्रीय संस्कृतीच्या अस्मितेने भारावले आहेत, तसेही मुकुंदराजाच्या कवितेत दिसत नाही. ही गोष्ट खरी असली तरी पहिला मराठी भाषेतील तत्त्वचिंतनपर वाङ्मयनिर्मितीचा प्रयत्न या दृष्टीने मुकुंदराजाचे संपूर्ण लक्ष केंद्रित झाले ते अध्यात्मशास्त्र निरुपणावर! त्याचा मराठी भाषेविषयीचा अभिमान दुबळा नसून,

त्याची भूमिका प्रखर नाही इतकेच ! 'तुमचा अस्मात् कस्मात् मी नेणे गा' किंवा 'माझा मराठाची बोलु कौतुके अमृतातेही पैजा जिंके' अशी बोलीभाषा म्हणून मराठीची सर्वमान्य अवस्था नव्हती असेही अनुमान काढणे योग्य नाही, तर मुकुन्दराजाची भूमिका केवळ अध्यात्मशास्त्र निरूपण करणाऱ्याची आहे. ज्ञानेश्वरी ज्या पद्धतीने आणि संदर्भाने लिहिली गेली तशी समाजसन्मुख लेखनपद्धती मुकुन्दराजाने अनुसरलेली नाही, तर संस्कृतमध्ये निर्मिती करून पुनः मराठीमध्ये विवेकसिंधूची निर्मिती साधली गेली हाही पुरावा लक्षणीय ठरतो. बहुजन समाजाची गरज म्हणून विवेकसिंधूची रचना झाली असेही स्पष्ट दिसत नाही कारण पंचीकरणाचा सिद्धान्त, अविद्येचा निरास, विश्वाची उभारणी आणि संहारणी, लिंगदेहाच्या विविध अवस्था या तात्त्विक चिंतनातील दुर्बोधता मुकुन्दराजाला कमी करता आलेली नाही किंवा तसा प्रयत्न नाही. ज्ञानेश्वरीत किंवा अमृतानुभवात अध्यात्मशास्त्र हा केवळ चिंतनाचा विषय न राहता अनुभवाचा विषय बनतो व स्वाभाविकपणे तो अभिव्यक्त होतो म्हणून त्यातील काठिण्य नाहीसे होते मराठी भाषेचा कणखर अभिमान, लोकानुवर्ती भूमिका आणि प्रबोधनाची तळमळ या दृष्टीने महानुभावगद्याचे आणि ज्ञानेश्वरीचे मराठी भाषेवरील ऋण अधिक आहे.) उलटपक्षी

जेया नाही शास्त्री प्रतीती । नेणति तर्कमुद्रेचि स्थिति
तेया लागी मऱ्हाटीया युक्ति । केली ग्रंथ रचना ॥

मराठी बोलीभाषेविषयी मुकुंदराजाची वरीलप्रमाणे धारणा आहे. ज्ञानेश्वरीने मराठी भाषेचे आविष्कारसौंदर्य वाढविले आणि अभंगकवितेने आशयाची गर्भश्रीमंती व्यक्त केली तसा प्रयत्न मुकुंदराजाने केलेला नाही. ज्ञानेश्वरांवर मात्र विवेकसिंधूचा बराचसा संस्कारपरिणाम जाणवतो तो कोणता ते बघुया. ज्ञानेश्वरीपेक्षा अमृतानुभवावर विवेकसिंधूचा बराच परिणाम झाला आहे. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत विवेकवादाचा केलेला पुरस्कार आणि विवेकसिंधूत विवेकाधिष्ठित ब्रह्म निरूपण यातही साम्य आहे इतकेच नव्हे तर ज्ञानेश्वरीत 'परमामृत' आणि 'विवेकसिंधू'चा स्पष्ट उल्लेखही आलेला मागे निर्दिष्ट केला आहे.

रचनासाम्य

विवेकसिंधूत पूर्वार्ध, उत्तरार्ध अशी रचना मुकुंदराजाने केली आहे. अमृतानुभव व चांगदेवपासष्टी यांच्याप्रमाणे ज्ञानेश्वरीच्या दहाव्या अध्यायात 'पूर्वकाण्ड विनोदे। वाखाणिले' आणि 'आता उत्तरखंड आदरिले। ग्रंथिचे आईका॥ (२२–३९) असा पूर्वार्ध-उत्तरार्ध ज्ञानेश्वरांनी अध्यात्मनिरुपणाचा केलेला आहे. मूळ भगवद्गीतेत पूर्वार्ध-उत्तरार्धातून अध्यात्मचिंतन झालेले नाही ही वस्तुस्थिती आहे. विवेकसिंधूचे अठरा अध्याय ज्ञानेश्वरीचेही अठरा अध्याय आहेत. शांकरभाष्य स्वीकारताना मुकुंदराजाने उपनिषद आणि ब्रह्मसूत्रे यावरील भाष्यालाच अंगिकारले आहे. शंकराचार्यांच्या गीताभाष्याला मुकुंदराजाने स्पर्श केलेला नाही. फक्त गीतेचा निर्देश केला आहे. (५ : ६१) यामुळे मुकुंदराजांच्या अध्यात्मनिरु-

पणात विवर्तवादाला आणि पंचीकरणाला प्राधान्य मिळाले. रामानुजाचार्य आणि शंकराचार्य यांच्या वेदांतविचाराचा फार मोठा परिणाम विवेकसिंधूवर होतो तो मूलतः ज्ञानात्मक पातळीवरचा आहे. अमृतानुभवासारखा तो सिद्धानुवाद नाही किंवा ज्ञानानुभवच प्रतीतीचा विषय बनलेला नाही. 'अमृतानुभव' जसे मराठीतील पहिले स्वतंत्र 'ज्ञानोपनिषद' ठरले तसा 'विवेकसिंधू' ठरू शकला नाही. कारण तर्काधिष्ठित पातळीवरून निरूपण केल्यामुळे स्वानुभवाची केवलता त्याला येऊ शकलेली नाही याचा परिणाम त्याच्या अभिव्यक्तीवर झाला आणि आशयावरही झाला. अमृतानुभवात स्थितप्रज्ञाची परतत्त्वाची ओढ आणि साक्षात्कारोन्मुख पद्धतीने अन्तर्मनाशी चाललेला हृदयसंवाद साधला जातो व त्यातून ज्ञानेश्वरांच्या आत्मानुभूतीचे दर्शन घडते. ज्ञानेश्वरांचे साक्षात्कारप्रवण आणि सौंदर्यासक्त अन्तर्मुखवृत्तीचा गाभा 'अमृतानुभवा'तून गोचर होतो. त्याच्या आशयाचा मूलकंद मुळी द्वंद्वातीत आत्मतत्त्वाच्या स्वरूपावर प्रकाश टाकीत असतो.[१] मुकुंदराज आणि ज्ञानेश्वरांची साहित्यनिर्मिती यात वरवर साम्य दिसत असूनही मूळ भूमिकाच भिन्न असल्यामुळे अभिव्यक्तीही भिन्नस्वरुपी ठरली. तरीही विवेकसिंधूचे जे संस्कार ज्ञानेश्वर स्वीकारतात ते कुतूहलजनक ठरतात.

विवेकसिंधूची सुरवात संस्कृत श्लोकाने झाली आहे तर 'अमृतानुभवा'त पहिल्या पाच संस्कृत श्लोकांत संपूर्ण अमृतानुभवाची बीजभूमिका आलेली आहे.

यदक्षरमनाख्येयमानंदमज केवलम् ।। श्रीमन्निवृत्तिनाथे तिख्यातं दैवतमाश्रये ।।१।।
गुरुरित्याख्य या लोके साक्षाद्विद्याही शांकरी।। जयत्यज्ञा नमस्तस्यै दयार्द्रायै निरंतरम् ।।२।।
सार्धकेन च कस्मार्ध शिवयो समरुपिणोः ।। ज्ञातुं न शक्यते लग्नमिति द्वैतच्छलान्मुहुः ।।३।।
अद्वैतमात्मस्तत्त्वं दर्शयन्तौ मिथस्तराम् ।। तौ वन्दे जगतामाद्यौ तयो स्वस्त्वा भिपत्तये ।।४।।
मुलाग्राय मध्याय मूलमध्याग्रमूर्तये ।। क्षीणाग्रमूलमध्याय नमः पूर्णाय शंभवे ।। ५ ।।

अमृतानुभवाच्या वरील सुरुवातीच्या श्लोकात परमात्मा, शिव, शक्ती आणि जीव या सर्वांचे ऐक्य ज्ञानेश्वरांनी मानले असून हीच शांकरी विद्या होय. जगाचे कारण असलेली शक्ती परमात्म्याचाच विलास असून परमात्मा अज, केवळ, अक्षर अनाख्येय आनंदमय आहे. मुकुंदराजाने विवेकसिंधूची सुरवातही संस्कृत श्लोकाने केली असून 'श्रीहरंजगदाधारमरविंदाक्षमक्षरम्' अभि वंद्यात्मविज्ञानोपदेशविधिरुच्यते ॥ हा तो श्लोक होय. परमात्म अक्षर असून अशा त्या शंकराला अभिवंदन करून आत्मज्ञानाचा उपदेश मी येथे करतो असे मुकुंदराजाने म्हटले आहे.

तूं निर्गुणु निराकरू । निःसंगु निर्विकारू
तुझेया स्वरूपाचा पारू । नेणती ब्रह्मादिक ।।

---

१. याचे विवरण अन्यत्र 'अमृतानुभव एक रसास्वाद' या ठिकाणी जिज्ञासूंनी बघावे.

वेदान्तनिष्ठ अद्वैतसिद्धान्त मुकुंदराजाने व ज्ञानेश्वरांनीही मांडला, परंतु मुकुंदराज शंकराचार्यप्रणित विवर्तवादाच्या दिशेने गेले तर ज्ञानेश्वरांनी चिद्विलासी स्फूर्तिवाद मांडला. मूळ बैठक दोन्ही भाष्यकारांची अद्वैती अध्यात्मशास्त्र निरुपणकाराचीच ठरली. विवेकसिंधूत पहिल्या अध्यायाच्या सदतीसाव्या ओवीपासून गुरुगौरव मुकुंदराजाने केलेला आहे. सद्गुरुची लक्षणे त्यांनी सांगितली आहेत. 'जे संसारापासून निराळे ज्ञानाने आणि वैराग्याने अधिक जे परब्रह्माच्या आनंदात रमतात,' तेच सद्गुरु समजावे.

येही लक्षणी अलंकृत । जे देखिजेती महंत
ते सद्गुरुचि निश्चित । ईश्वरावतार ।। विवेकसिंधू–१ : ५१

ज्ञानेश्वरीत गुरुगौरव अनेक पातळ्यांवरून ज्ञानेश्वर साधतात. कृष्ण-अर्जुन, वक्ता-श्रोता, गुरु-शिष्य, ईश्वर-भक्त यांच्या संवादातून ज्ञानेश्वरीत तेराव्या अध्यायापासून सोळाव्या अध्यायापर्यंत सलग व इतर सर्व अध्यायांत फुटकळपणे गुरु-गौरव ज्ञानेश्वरांनी केला आहे. किंबहुना गुरुशिवाय मुक्ती नाही व अध्यात्मशास्त्र जाणून घेण्यास गुरुसारखा दुसरा कोणी वंदनीय नाही अशीच धारणा नाथपंथीय साहित्यिकांची होती. नाथपंथात गुरूचे स्थान अनन्य ठरते. त्याही दृष्टीने मुकुंदराजांनी केलेला गुरुगौरव व ज्ञानेश्वरांनी केलेला गुरुगौरव पंथीय संस्कारातील समानशीलत्व दाखवितो. 'अमृतानुभव' यात दुसरे प्रकरण गुरुस्तवनपर झाले आहे. नामरुपात्मक जग आणि सृष्टीतील रूपे आणि आकार मानवी ज्ञानापलीकडची आहेत ती समजाऊन घ्यावयाची असल्यास गुरुचरणांचा आश्रय घ्यावा लागतो व तसा लाभ आम्हाला झाला आहे असे ज्ञानेश्वर म्हणतात. संपूर्ण जग गुरुमध्ये सामावले आहे. परमात्मस्वरूप गुरु जोपर्यंत भेटत नाही, तोपर्यंत द्रष्ट्याला दृश्य भेटत असते पंण त्याची भेट होताच हे बहुरूप नष्ट होऊन वंदकत्व आणि वंदनीय नष्ट होतात. संपूर्ण जग गुरुमध्ये सामावले जाते. अशा निवृत्तिनाथ या स्वयंसिद्ध आणि अकृत्रिम चक्रवर्ती रत्नराजाला मी वंदन करतो. असा अमृतानुभवाच्या दुसऱ्या अध्यायाचा शेवट ज्ञानेश्वरांनी केला आहे. ज्ञाता, ज्ञान आणि ज्ञेय यांबरोबरच द्रष्टा, दृश्य आणि दर्शन यांचा निरास होऊन त्याही पलीकडे असलेले आत्मज्ञान म्हणावे तर जाणीव नाही आणि अज्ञान म्हणावे तर नेणीव नाही असे मुकुंदराजाने वर्णन केले आहे. ज्ञानेश्वरी व अमृतानुभवात हाच विचार आलेला आहे. ज्ञानेश्वर 'निकराचा आत्मभाव' म्हणतात तर मुकुंदराज 'चैतन्य परब्रह्म स्फटिकभाव' म्हणतात.

सदासिद्ध अशा परमात्म वस्तूचा ज्ञानी मुक्ताला आलेला अद्वैतानुभव आणि आत्मानुभव विवेकसिंधूत मांडला गेला. एक अखंड व शांकरभाष्याचे संस्कार स्वीकारूनही पृथगात्मपणे अभिव्यक्ती साधणारा पहिला भाष्यपर काव्यग्रंथ. मुकुंदराजांचे विवरणात एक सैद्धान्तिकता आहे. एका सिद्धान्तशास्त्राची निर्मिती विवेकसिंधू मधून साधली गेली. तात्त्विक संकल्पनाची संगती अनुभवाच्या पातळीवरून जाणवून घेत असता लौकिक जीवन व्यवहारातील प्रतिके योजून तत्त्वज्ञानालाच अनुभवाचा विषय त्यांनी बनविले. संविद्रहस्याचा शोध मुकुंदराज घेतो. ज्ञानेश्वरांनीही हाच मार्ग स्वीकारला. फरक

इतकाच की मुकुंदराज तर्कमार्गाने गेले तर ज्ञानेश्वर स्वानुभवाच्या मार्गाने गेले म्हणूनच विवेकसिंधूपेक्षा आमृतानुभवात काव्यात्मकता अधिक प्रमाणात उतरली. विवेकसिंधूचे सातवे प्रकरण व अमृतानुभवाचे 'अज्ञानखंडन' प्रकरण अतिशय साम्य-स्थळांनी भरलेले आहे. विवेकसिंधूतील पुरुषप्रकृती आणि अमृतानुभवातील शिवशक्ती यांच्या अद्वैतातही सारखेपणा आला आहे. आणि अमृतानुभवातील 'पदत्रयविवरण' आणि विवेकसिंधूतील 'सच्चिदानंदव्याख्या' ही दोन्ही प्रकरणे एकमेकाशी फारच जुळणारी अशी उतरली आहेत. 'अमृतानुभव' आणि 'ज्ञानेश्वरी,' यामध्ये उतरलेली काव्यात्मकता आणि तरल भावसंपृक्त संवेदनक्षमता विवेकसिंधूत नसेल परंतु विवेक-सिंधूची रचना, निरुपण पद्धती, विषयप्रतिपादन आणि तत्त्वसिद्धान्तविचार यांचा फार मोठा प्रभाव ज्ञानेश्वरी आणि अमृतानुभवावर पडला आहे. हे या तिन्ही ग्रंथांच्या परस्पर-तुलनेतून सिद्ध होते. तत्त्वज्ञानाच्या संदर्भात दोन्ही लेखक भारतीय परंपराच स्वीकारतात. त्यातही मुकुंदराज शांकरभाष्याच्या मार्गाने गेले तर ज्ञानेश्वरांनी 'भाष्यकाराने वाट पुसतु' असे संदिग्ध विधान करून ठेवले पण विवेकसिंधूचा आशय आणि अभिव्यक्ती, विषय आणि आविष्कार या संदर्भात लक्षात घेतल्यास मुकुंदराज हाही एक वाट पुसतु मधील भाष्यकार ठरण्यास हरकत नसावी इतका गडद संस्कार 'ज्ञानेश्वरी' आणि 'अमृतानुभवा' वर झालेला आहे आणि नंतरच्या काळातील मराठी कवितेवरही झाला. पाहा.

१.	अमृतानुभव २ : २४, २५	विवेकसिंधू ७: ४७, ५० तरंग आणि पाणी (१)	
२.	,, २ : ६३, ६४	७ : १०७, १०८ चंद्र आणि चंद्रकांत (२)	
३.	,, ३ : ३३, ३४	१७ : १७ अरण्यात झोपलेला माणूस (३)	
४.	,, १ : ६३	७ : ७१ लवण आणि पाणी (४)	
५.	,, ३ : २८	९ : ५१ कापूर आणि सुवास (५)	

पिनाकपाणी शंकर हाच उपासनाविषय विवेकसिंधूत झाला आहे. मी शूलपाणीच्या संप्रदायाचा आहे असेही वारंवार मुकुंदराज सांगतात. शंकराच्या अनुग्रहामुळे मला स्वरूपप्रतीती आणि आत्मज्ञान झाले. अर्थात अशा वेळी मी स्वस्थ असावे असेही त्यांना वाटते परंतु आपल्याला जाणवलेले संविद्रहस्य परोपकारार्थ विषद करावे म्हणून मी सांगतो अशी आपली निर्मिती प्रेरणा व भूमिका मुकुंदराजाने सांगितली आहे. 'अमृतानुभवा' च्या शेवटच्या प्रकरणात ज्ञानेश्वर म्हणतात

> 'आम्ही बोलिलो जे काही । ते प्रगटचि असे ठायी,
> मा स्वयंप्रकाशा असे काई । प्रकाशाने बोले ।।
> पढियंते सदा तेचि । परी भोगी नवी नवी रुची ।
> म्हणौनि हा उचीतचि । अनुवाद सिद्ध ।। १३ ।।

दोघांचेही विचार कसे समांतर आहेत हे वरील ओव्यांवरून दिसून येते.

ज्ञानयोग आणि राजयोग

हा शिवशक्तीचा समयोगु । हाचि बोलिजे राजयोगु
जेणे फिटे भवरोगु । हेळामात्रे ।।

आत्मज्ञानाला प्रमाण मानणाऱ्या अद्वैत सिद्धान्तालाच मुकुंदराजांनी राजयोग ही उपाधी दिली आहे. ज्ञानेश्वरांनी ज्ञानोत्तर भक्तीचा पुरस्कार केला व ज्ञान म्हणजे आत्मज्ञान हे स्पष्ट केले. मुकुंदराजाने विवेकजळाच्या साह्याने देहासह प्रपंचाची धूळ झटकून टाकावी व स्वयंप्रकाशाची दिप्ती असलेल्या आत्ममुखाची प्राप्ती करून घ्यावी, असे म्हटले.

इयाचिपरी विवेकजळीं । धुनि देहादि प्रपंचधुळी
स्वयंप्रकाश झळाळी । भेटे आत्महेम ।।
सांडौनि केळाचीं सालडी । भोगीजे रसरूपगोडी
तैसे माइक कंचुक सांडी । निवडी स्वस्वरूप ते ।।
हा संग त्यागु कराया । संन्यासु उपदेशावा
बंधमोक्षु करावा । जोवासी जो ।। विवेकसिंधू ११ : ६१-६३.

मुकुंदराजांचा भक्तियोग वरीलप्रमाणे संन्यासधर्माची ओळख पटविणारा राजयोग आहे. नवविधा भक्तीच्या साह्याने ईश्वरी चिंतन करून आत्मरूपाचे ज्ञान प्राप्त करून घ्यावे व असे ज्ञान प्राप्त होताच विरक्तपणे संन्यास स्वीकारावा तरच मुक्ती मिळेल अशी मुकुंदराजाची शंकराचार्य पुरस्कृत संन्यासमार्गाधिष्ठित राजयोगाची संकल्पना आहे. 'म्हणौनि भक्ति ज्ञान विरक्ती। जीये शास्त्रे उपपादिती। तीये बोलावी महंती। येथार्थ वादे ।। मुकुंदराजाचा यथार्थवाद म्हणजे भक्तीकडून विरक्तीकडे नेणारा संन्यासमार्ग आहे. मुकुंदराजावरील शांकरभाष्याचा हा परिणाम असावा किंवा भगवद्गीतेला न स्वीकारल्याचाही हा प्रभाव असावा परंतु पहिल्याच मराठी कवीने संन्यासाचा पुरस्कार करून भक्तीपेक्षा विरक्ती श्रेष्ठ आणि विरक्ती मिळवावयाची असेल तर सगुण भक्तीकडून निर्गुण भक्तीकडे वळावे असे सांगितले. ज्ञानेश्वर प्रस्तुत फार वेगळे ठरले ते या ठिकाणी. ज्ञानेश्वरांनी संन्यासमार्गाला विरोध दर्शविला. उलटपक्षी 'जे जे भेटे भूत ते ते मानी भगवंत' अशी बहुजन समाजाशी मिसळून जाणारी ज्ञानोत्तर भक्तीची शिकवण प्रभावीपणे ज्ञानेश्वरीतून दिली. कर्मकाण्डातील काठिण्य कमी केले. ईश्वरी साधनेतील अवडंबराला फाटा दिला व केवळ मनाच्या देव्हाऱ्यातही ईश्वराची पूजा बांधता येते असा संदेश समाजाला दिला. प्रपंचात राहूनही मोक्षप्राप्ती करता येते हा तो संदेश होता. मुकुंदराजांनी संन्यासाला आणि सर्वसंगपरित्यागाला दिलेले महत्त्व आणि ज्ञानेश्वरांनी वर्णाश्रम धर्म सांभाळीत ईश्वरी भावभक्तीला दिलेले महत्त्व येथूनच पुढे भक्तिविचारांच्या वेगळ्या वाटा निर्माण झाल्या. सगुण भक्ती, निर्गुणोपासना, आत्मज्ञान आणि संन्यास ही जी चतुष्टयी आहे तिचा पुरस्कार महानुभाव पंथप्रवर्तकांनी केला होता या दृष्टीने महानुभाव विचारसरणीशी मनाने मुकुंदराज फार जवळचा होता. आणि जर

मुकुंदराजाचे गुरु हरिनाथ म्हणजे चक्रधर आणि रघुनाथ म्हणजे रामदेव दादोस हे सिद्ध झाले तर संन्यासप्रधान भक्तिमार्गाचा जो पुरस्कार महानुभावपंथाने केला त्याच्या पहिल्या खुणा मुकुंदराजात दिसतील पण ही जरतरची अवस्था आहे.

विवेकसिंधूतील आत्मोल्लेख

विवेकसिंधूच्या प्रस्ताविकात मुकुंदराज म्हणतात, 'तुझ्या कृपाप्रसादानेच तुझे स्पष्ट ज्ञान होणार असल्यामुळे तू माझ्या अंतःकरणात वास्तव्य करून माझ्या पांगुळलेल्या वाणीला (प्रसृत वाचेते चेववावे) जागे करून माझ्याकडून आत्मस्वरूपाचे वर्णन करून घ्यावे कारण तुझे स्वरूप 'स्वस्वरुप अनुभविजे फुडे। स्वानुभवे जे' असे आहे. पूर्वार्धाच्या उपसंहारात मुकुंदराज म्हणतात–

शंकरोक्तीवरी। मिया बोलिली हे वैखरी
म्हणौनि धरावी चतुरी। शास्त्रबुद्धि
आहो युक्तिचियेनि प्रसंगे। शास्त्राते म्हणती उगे
तरि माझिये बोलु वाउगे। काये होयील पां।।
मज स्वासोन्मेषाचाहि श्रमु। तेथ कायसा ग्रंथाचा उदेयु
परि फळला मनोधर्मु। सदैवाचा।।
नृसिंहाचा बल्लाळु। तेयाचा कुमरु जैतपाळु
तेणे करविला हा रोळु। ग्रंथरचनेचा।।
मिया आपुली वाणी। पवित्र केली येही वचनी
प्रीति पावो पीनाकपाणी। म्हणे मुकुंदराजु।। विवेकसिंधू ७: १४६ ते १५७

पीनाकपाणीच्या प्रीतिसाफल्यासाठी स्वासोन्मेषाचा श्रमू होत असताही नृसिंहाचा बल्लाळ, त्याचा मुलगा जैतपाळ याने माझ्याकडून ग्रंथरचनेचा खटाटोप करवून घेतला. भगीरथाच्या प्रयत्नांनी सर्व विश्व गंगेत मुस्नात झाले. त्याप्रमाणे जैतपालाच्या निमित्ताने माझ्याकडून रचना होऊन सर्व जग सुखी झाले; यावरून जैतपालाचा कालनिर्णय निश्चित झाल्यास त्याच्या आग्रहाने विवेकसिंधू सिद्ध करणाऱ्या मुकुंदराजाचा कालनिर्णय व त्याबरोबरच स्थलनिर्णय होऊ शकेल.

विवेकसिंधूचे काव्यस्वरूप

मुकुंदराज हा खऱ्या अर्थाने भाष्यकार आहे. त्याला ब्रह्मनिरुपण करून आत्मतत्त्वाचे स्वरूप शांकरभाष्याच्या आधारे प्रगट करावयाचे आहे. त्यामुळे मूळ भूमिकाच निश्चित असल्यावर आणि निर्मितिप्रक्रियेचे स्वरूपही पक्के झाल्यावर आपोआपच काव्यनिर्मितीची अपेक्षा विवेकसिंधूकडून करता येत नाही. ('ज्ञानेश्वरी' ही मूलतः भाष्यनिरुपण पद्धतीने निर्माण झाली असूनही तिच्या आविष्कारात मात्र ज्ञानेश्वरांची सौंदर्यदृष्टी प्रतीत झाली. ज्ञानेश्वरांनी भाष्यनिरुपणाबरोबरच अभिव्यक्तीचे व विषयांतराचे स्वातंत्र्य घेतले व भाष्याला

काव्याची प्रत आपोआप येऊन गेली ती कलावंताच्या अनुभूतीचाच तो विषय झाला म्हणून. विवेकसिंधूच्या बाबतीत तसे घडत नाही. मुकुंदराजाची भूमिका विशदिकरणाची. निरुपणकाराची आहे. कलासक्त, भावतरल आणि संवेदनाक्षम अशा कवीची नाही, ज्ञानेश्वर किंवा नरेंद्र या तेराव्या शतकातील महाकवींनी मराठी कवितेला जी काव्यात्म आणि कल्पनेची श्रीमंती मिळवून दिली त्यामुळे मराठी भाषेचे आविष्कार सामर्थ्य आणि आशयघनता यांची उंची वाढून तिच्यातील वैचारिकता अधिकच झळाळून निघाली. परंतु मुकुंदराज काव्य-निर्मितीच्या अंगाने पुढे गेलेला नाही त्याची भूमिकाही मर्यादित होती आणि काव्याविषयी त्याची मनोभूमिकाही आत्मविष्काराला अनुकूल नव्हती. उदा.

नवरसांचे उपलवणे। ते उघड वाचेसि नागवणे
म्हणौनि न प्रवर्त्तती स्याहाणे। तेथ विषयी
हो का वक्ता नवरसांचा। जन्हा चतुर अपाडाचा
तथापि लाभु परमार्थाचा। तया दुर्लभुची की

वक्ता जरी नवरसनिर्मितीत अत्यंत कुशल असला तरी त्याच्या त्या कृतीने परमार्थाचा लाभ होणे कठीणच अशी मुकुंदराजाची धारणा आहे. श्रोता आणि वक्ता यांच्या विषयीही मुकुंदराजाचे मत विशेष चांगले नाही.

जेया रसाची आवडी। श्रोतेयांचा चित्तो फुडी
वक्ता तैसेचि बडबडी। अभिळाषे॥
रसरंगी बोलते। अभिलाषी जे वक्ते
महा रसाळ तैसे ते। बहिर्मुख की
श्रोतेयांचे चित्त बावरे। तेऊतेचि तयाचे तोंड वावरे
यैसे याचे बोलणे बारे। काये करावे॥
वैषिक बोलते। घरोघरी आसती वक्ते॥
भाट नागरि तैसे ते। वोळखावे गा॥ विवेकसिंधू ७ : ८४ ते ८७.

ज्ञानेश्वरांनी वक्ता आणि श्रोता यांचे जपलेले भावसंबंध लक्षात घेता मुकुंदराज अगदीच श्रोत्यांकडे दुर्लक्ष करतो असेच वरील ओव्यांवरून निदर्शनास येते. नवरसांचा स्वादिष्टपणा प्रस्तुत ग्रंथात आणणे म्हणजे भाषेची उघड फसवणूक आहे. म्हणून सूज्ञ त्या भानगडीत पडत नाहीत. वक्ता जरी नवरसनिर्मितीत अत्यंत कुशल असला तरी त्याच्या त्या कृतीने परमार्थाचा लाभ होणे फार कठीण ठरते (१ : १७, १८) असे स्पष्टपणे मुकुंदराज म्हणतात.


वेदशास्त्र पुराण। साधु मुखे निरुपण
ते करावे श्रवण। विवेकार्थ॥
विवेक उत्पत्तीसी साधन। आणीक नाही प्रधान
येक वेदान्त श्रवण। वांचोनिया॥

विवेकसिंधु भीतरी। जो मुमुक्षु अवगाहन करी
तेयासि सेखी श्रीहरी। भेटे साक्षात्कारे
आहो विवेकसिंधूचे पूर्वार्ध। क्षीरसिंधुपासाव आगाध
जेथ निर्गुण निजबोधु। भेटे विष्णुस्वरूप

वरील ओव्यांवरून विवेकसिंधूच्या निर्मितीमागील भूमिका स्पष्ट होते व त्यामुळे मूळ भूमिकाच काव्यनिर्मितीपेक्षा चिंतनाची असल्यामुळे एका वैचारिक तत्त्वचिंतनाची ढब विवेकसिंधूला मिळाली आहे.

महानुभाव वाङ्मय निर्मितीपूर्वी आणि ज्ञानेश्वरीच्या पूर्वी भाष्यपर मराठी रचना समृद्धपणे निर्माण झालेली विवेकसिंधूच्या रूपाने आज उपलब्ध आहे. तत्त्वज्ञानाची सूक्ष्मता आणि विवरणाची मार्मिकता यांचाही आढळ पहिल्याच तात्त्विक भाष्यपर ग्रंथातून झाला आणि महानुभाव लेखकांनी त्यात विविधता आणली व पुढे तेराव्या शतकापासून चिंतनशीलतेचा वारसा मराठी वाङ्मयाने स्वीकारला तो आजपर्यंत! कवितेप्रमाणे गद्याचीही सुरुवात कशी झाली ते आता बघितले पाहिजे.

□ □ □



॥ महानुभाव साहित्य ॥

मराठी पहिले गद्य

प्राचीन मराठी वाङ्मयसमीक्षेत कवितेला जसे प्राधान्य दिले गेले तसे गद्य-वाङ्मयाला फारसे दिले गेलेले दिसत नाही. याला प्रमुख कारण म्हणजे यादवकालीन गद्य हे पूर्णतः महानुभाव पंथीयांचे गद्य आहे. त्याचे स्वरूप Collection of teachings and sayings of चक्रधर असे होते. त्यामुळे ते पूर्णतः सांकेतिक लिपीमध्ये बंदिस्त राहिलेले होते. उलटपक्षी भागवतसंप्रदायाच्या कवितेची अवस्था तशी नव्हती. ही कविता सर्वसामान्य माणसाचा जिव्हाळ्याचा आणि आदराचा विषय झालेली होती. यादवकाळापासून पेशवेकाळापर्यंतच्या मराठी गद्याची परंपरा शोधू गेल्यास त्याची हिरवळ फार अल्प असली तरी त्या गद्याने विस्तार आणि विकास करण्याचा प्रयत्न सातत्याने केलेला स्पष्ट होतो. ज्ञानेश्वर, नामदेव, मुक्ताबाई आणि ज्ञानदेवांचा समस्त संतपरिवार यांनी जी उत्कट भक्तिभावपूर्ण अशी काव्यरचना केली ती काही एकदम निर्माण झाली असे नाही. कारण यादवकालीन सर्वच कवी एकीकडे परंपरावादी आहेत तर दुसरीकडे त्या परंपरांचा छेद करून पुढे जाण्याचा प्रयत्न करणारेही आहेत. यादव-काळात प्रौढ प्रतिभेची झेप आणि जीवनजाणिवांच्या तळापर्यंत जाण्याचा प्रयत्न कविता करीत आहे. एक समृद्ध जीवनाशय आणि कल्पकतेने निर्माण झालेली प्रतिमासृष्टी यांचाही आढळ यादवकालीन वाङ्मयनिर्मितीत झालेला स्पष्ट होतो. अशी समृद्ध निर्मिती एकदम होणे शक्य नसते आणि तिच्या पाठीशी महानुभाव गद्य निर्मितीचे पाठबळ आहे. मुकुंदराजाचा 'विवेकसिंधू' आणि 'परमामृत' आणि ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी, नामदेवांची अभंगगाथा आणि ज्ञानेश्वर प्रभावळीतील सकळ संतांची अभंगगाथा यांच्या जोड-दुव्याचे काम महानुभाव गद्याने आणि महदंबेच्या धवळ्यांनी केलेले आहे ही गोष्ट वाङ्मयाच्या इतिहासावरून दिसून येते आणि 'सातीग्रंथा'ची रचना ही ज्ञानेश्वरोत्तर आहे याही घटनेला अनन्यसाधारण महत्त्व द्यावे लागते. मुकुंदराजाने शके १११० मध्ये 'विवेकसिंधू'ची रचना केली आणि ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीचे लेखन शके १२१२ मध्ये झालेले आहेत. या दोन समृद्ध आणि आशयपूर्ण निर्मितीतील एका शतकाचे अंतर महानुभाव वाङ्मयाने भरून काढले आहे. त्याही पूर्वी जाण्याचा प्रयत्न केला तर श्रीपति-भट्टाची 'ज्योतिषरत्नमाला' आणि 'ताम्रपट', 'शिलालेखांचा' उल्लेख करावा लागेल, परंतु हे पुरावे एकतर त्रोटक स्वरूपाचे आहेत आणि ज्योतिषरत्नमालेत गद्यवाङ्मयाच्या घडणीचा आणि जिवंतपणाचा आढळ सर्वथैव दुरापास्त आहे. कारण तो एक मुहूर्तग्रंथ किंवा ज्याला 'शकुनग्रंथ' असेही म्हणता येईल असा तो ग्रंथ आहे. आणि 'ताम्रपट', 'शिलालेख' हे बोलूनचालून राजाज्ञेने आणि धर्मदानासाठीच बोलके झालेले दिसतात. मराठी भाषेचा काळ ठरविण्यासाठी आणि मराठी भाषेचे स्वरूप जाणून घेण्यासाठी ताम्र-पटांचा आणि शिलालेखांचा उपयोग होऊ शकतो. परंतु मराठी भाषेचे वळण, मराठी

भाषेची घडण आणि सामाजिक जीवनमानाचा एक छेद या दानपत्रांकडून काही अपेक्षिता येत नाही. त्यावेळी महानुभाव वाङ्मयाचा आणि पंथीयांचा अक्षरग्रंथ जो 'लीळाचरित्र' त्याकडे आपल्याला वळावे लागते. यादवकालीन समाजमन समजावून घेण्यासाठी 'लीळाचरित्र' आदर्शभूत ठरले आहे. माणूस हा नेहमीच आपल्या भाव-भावना, विचार, विकार, सुखदुःख सर्वप्रथम आपल्या बोली भाषेतून अभिव्यक्त करतो. प्रथमतः तो नेहमीच गद्यात बोलतो. कारण त्याची बोलीभाषा ही केवळ संकेत पुरवीत नसून संकेत माध्यमातून जन्माला आलेल्या भाषेची घडण आणि विकासही गद्यातून करीत असते. यादवकालीन गद्याचे स्वरूप लक्षात घेता एकीकडे बोलीभाषेला समृद्ध करण्याचे आणि तिचे भरणपोषण करण्याचे काम गद्याद्वारे पुरे केले जात होते तर दुसरी-कडे वाङ्मयाचे विविध प्रकार निर्माण करून वाङ्मयाची विविधता साक्षात करीत होते. ललित आणि शास्त्रीय अशा दोन्ही पद्धतींनी वाङ्मयनिर्मिती होत होती.

यादवकालीन कवितेमागील आणि गद्यनिर्मितीमागील प्रेरणा आणि प्रवृत्ती वरवर भिन्न स्वरूपाची जाणवत असली तरी ती अंतिमतः धर्ममूलकच होती. अध्यात्मविचार, ईश्वरसंकीर्तन आणि समाजप्रबोधन यांनी गद्यपद्य वाङ्मय माखून निघालेले दिसते. आणि हिंदुधर्मान्तर्गत अनेक संप्रदायांचा आणि विशेषतः भक्तिसंप्रदायांचा उदय आणि ऱ्हास सतत होत राहिलेला दिसतो याचेही कारण धर्मबंधन हेच होय. तत्त्वज्ञानाचा पुरस्कार, प्रचार आणि प्रसार करणे व त्याच्या साह्याने समाजाला सुधारण्याचा प्रयत्न करीत ईश्वर-निरूपण भक्तिमार्गाने करीत जाणे व त्यातून 'ज्ञान' धारणा मिळविणे या पद्धतीने यादवकालीन वाङ्मयनिर्मिती होत होती. प्रत्येक कलावंत या दिशेने जात असता आत्माविष्कार करून 'धर्म', 'कर्म' आणि 'ज्ञान' या संकल्पनांचा अर्थ आपल्या पद्धतीने आणि कुवतीप्रमाणे लावीत होता. ज्ञानेश्वरांनी 'विश्व स्वधर्म' असे म्हटले तर नामदेवांनी आणि इतर कवींनी 'धर्म' आपल्या प्रकृतीप्रमाणे शोधला. महानुभाव कवी आणि गद्यलेखकांनी मात्र 'धर्म' ही संकल्पना चक्रधरांच्या लीळा शोधनात आणि चक्रधर गुणसंकीर्तनात शोधलेली होती. वस्तुतः महानुभाव संप्रदाय हा हिंदुधर्मान्तर्गत एक संप्रदाय होता आणि आहे. परंतु हिंदू धर्मातील ईश्वर तत्त्वातील संकल्पना महानुभावांनी न स्वीकारता पंचकृष्णांपैकी शेवटचा अवतार जो चक्रधर त्यालाच ईश्वर मानले व द्वैतभाव-निर्मिती केली. आणि चक्रधरांनी मी म्हणजेच ईश्वर असेही वारंवार सांगितल्यामुळे चक्रधर या ईश्वराचे ठिकाणीच पंथीयांनी धर्मशोधन केले. भागवत संप्रदाय आणि महानुभाव संप्रदाय समकालीन असूनही आणि त्यांच्या निर्मितीत अनेक साम्ये असूनही ईश्वर-विषयक मूलभूत अधिष्ठानात भेद निर्माण झाला व दोन्ही संप्रदाय केवळ समांतर राहिले.

'लीळाचरित्र' एक प्रखर निष्ठा

'लीळाचरित्र' हा महानुभाव संप्रदायाचा जसा पहिला ग्रंथ आहे तसाच मराठी वाङ्मयातही पहिला गद्यग्रंथ आहे. पंथीय दृष्टिकोणातून त्याचे महत्त्व अनन्य स्वरूपाचे तर आहेच परंतु वाङ्मयाच्या संदर्भात आणि राजकीय, धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक

आणि ऐतिहासिक दृष्टीने देखील 'लीळाचरित्रा'चे महत्त्व अनन्य ठरते. एक तर यादव-काळाला आज जे आपण संपूर्णपणे जिवंतपणाने अनुभवू शकतो ते लीळाचरित्रामुळेच! लीळाचरित्रात चक्रधर या ईश्वरी अवताराच्या लीळांचे कथन असल्यामुळे त्या जशाच्या तशा स्वीकारण्यातील वस्तुनिष्ठा फार महत्त्वाची ठरली आहे. त्यातून एका शब्दाचाही फरक किंवा कानामात्रा इकडची तिकडे करणे म्हणजे धर्मबाह्य वर्तन करण्यासारखे ठरते. अशी महानुभाव पंथियांची प्रखर निष्ठा होती आणि दुसरी गोष्ट म्हणजे 'लीळाचरित्र' सांकेतिक लिप्यांमध्ये बंदिस्त झाल्यामुळेही त्याचे यथातथ्य रूप नाहीसे झालेले नाही. एका प्रखर व्यक्तिनिष्ठेने भारावलेल्या पंथीयांनी जोपासलेले हे वाङ्मयधन भाषाशास्त्रीय दृष्ट्याही अत्यंत महत्त्वाचा पुरावा म्हणून उपयुक्त ठरले. म्हणून लीळाचरित्राचे मोठेपण केवळ महानुभाव पंथीयांनाच वाटते असे नाही, तर वाङ्मयाचे अभ्यासक, भाषाशास्त्रज्ज्ञ, इतिहासतज्ज्ञ, राज्यशास्त्रतज्ज्ञ, धर्मविचारवंत, समाजशास्त्रज्ज्ञ या सर्वांना वाटत आलेले आहे आणि दिवसेंदिवस अनेक अंगांनी त्याचा अभ्यास संपूर्ण जगभर होत आला आहे ही घटनाही मराठी वाङ्मयात अपूर्व आहे. यादवकालीन जीवनाचा ठाव घेणारे वास्तवदर्शन लीळाचरित्र घडविते. यादवकालीन समाजजीवनाचे विविध स्तर, सामाजिक मनांची कुजबूज आणि मनामनांचे हुंकार लीळाचरित्रातून ऐकू येतात. म्हणून ते फक्त चक्रधरांचे आत्मवृत्त किंवा चरित्र आहे असे नाही, तर यादवकालाचेच एक बिंबप्रतिबिंब त्यातून गोचर झालेले आहे. विद्याप्रसार, धर्मप्रसार, लोकशिक्षण, तत्त्वप्रचार या सर्व अंगांसह लीळाचरित्र आपल्याला चक्रधरांकडे नेत असते. त्या दृष्टीने त्याचे महत्त्व अनन्यसाधारण ठरते. सामाजिक स्थितिगतीची स्पंदने आणि यादवकालीन परिस्थितीचा मूळाबरहुकूम चलच्चित्रपट लीळाचरित्र घडवीत असते आणि गंमत अशी की, अशा प्रकारची कोणतीही प्रेरणा किंवा प्रवृत्ती अभिप्रेत नसतानाही किंवा तशी भूमिका नसतानाही आपोआप तसे ते घडून आलेले आहे.

लीळाचरित्राचे आणखी एक गुणरूप म्हणजे या ग्रंथातूनच महानुभाव पंथीयांना लेखनप्रेरणा मिळालेली आहे. चक्रधरांच्या हयातीत पंथीत वाङ्मय निर्मिती झालेली नव्हती. ती निर्मिती होण्यासाठी चक्रधरांच्या महानिर्वाणामुळे पंथीयांच्या भावजीवनात निर्माण झालेली जी विरहव्यथा होती, जी एक भावमय दरी निर्माण झाली होती, जी एक भावनिक कोंडी निर्माण झाली होती त्यातून लीळाचरित्र निर्मिती झालेली आहे. या लेखनात ओतप्रोत भरलेली मनाची तळमळ आणि उत्कटता जाणवते याचे कारण आजपर्यंत जे दैवत उरीपोटी अत्यंत श्रद्धेने बाळगले तेच गुणस्वरूप नाहीसे होताच मनामनांचा कल्लोळ आणि दुःखावेग असह्य झाला व अविरतपणे सर्व भक्तमंडळी चक्रधरांच्या स्मृती आणि लीळारूप आठवू लागले व आपला विरह कमी करण्याचा आणि दुःख हलके करण्याचा प्रयत्न करू लागले. या दुःखकल्लोळाला एक सुंदर रूप म्हाइंभट्टांनी नागदेवाचार्यांच्या उपस्थितीत दिले आणि दुःखभार हलका करण्याचा प्रयत्न केला.

लीळाचरित्राची केंद्रीभूत व्यक्ती म्हणजे चक्रधर! त्यांच्या संदर्भातील विविध आठवणी, आख्यायिका, आत्मकथन, वृत्तकथन, चरित्रचित्रण, प्रसंगचित्रण, दैनंदिन जीवनातील व्यवहार, चक्रधरांचे विविध ठिकाणीचे विहरण, विहरणात भेटलेली माणसे, घडलेले प्रसंग यांचे सर्वांगीण जिवंत चित्रण 'लीळाचरित्रा'त ग्रथित केले गेले. आणि लीळाचरित्रातून प्रेरणा घेऊन 'सूत्रपाठ', 'दृष्टांतपाठ' आणि 'स्थानपोथी' यांचीही निर्मिती झाली. याचाच अर्थ असा की लीळाचरित्राची निर्मिती ही नैमित्तिक दुःख-कल्लोळ शमविण्यासाठी झाली असली तरी पुढील वाङ्मयनिर्मात्यांना ती उपजीव्य ठरली ती कायमचीच.

गद्य परंपरेची बहुविधता

महानुभावांची गद्यपरंपरा ही बहुमुखी आणि वैविध्याने नटलेली आहे. एकिकडे तिचे स्वरूप हे संस्कृतनिष्ठ आणि शास्त्रीय आहे तर दुसरीकडे ती कहाणी वाङ्मयाशी, लोककथांशी आणि जातककथा वाङ्मयाशी आपले नाते जोडते आहे. लीळाचरित्र आणि दृष्टान्तपाठ यांतील रचनासौंदर्य, संपादन कौशल्य आणि मार्मिक मूलगामी विवेचने लक्षात घेतल्यास संशोधन संपादनाचा पाया मराठीच्या बाळपणीच अत्यंत समृद्धपणे महानुभाव गद्याने घातलेला दिसतो. आणि शास्त्रीय पद्धतीच्या गद्य लेखनातील वस्तु-निष्ठा सांभाळण्यातही परंपरेला स्वीकारीत आणि तीत नाविन्याने बदल घडवीत निर्मितीप्रक्रिया चालू असलेली दृष्टीस पडते. एकीकडे लीळाचरित्राचेच पुनः रूपांतर संस्कृतात रत्नमालास्तोत्रात करण्याचा प्रयत्न होत असतो तर दुसरीकडे वैदिक परंपरेप्रमाणे श्रुती, स्मृती यांना महत्त्व दिलेले असते. आणि सर्वच महानुभाव लेखक हे विद्वान पंडित आहेत. त्यांनी एकीकडे मराठी या आपल्या धर्मभाषेतून वाङ्मयनिर्मिती केली तर दुसरीकडे मूळ मराठी ग्रंथनिर्मितीचेच संस्कृतकरण केले. यावरून काळाचा प्रभाव आणि धर्माची बंधने यांनी बंदिस्त असलेली विद्वानांची मने कोणत्या दिशेने विचार करीत होती यावर प्रकाश पडतो. तेराव्या शतकात कविताच केवळ समृद्धपणे निर्माण झाली असे दिसत नाही तर कवितेच्या तोडीस तोड असे गद्य वाङ्मयही निर्माण झालेले आहे व त्यातून त्यांची संशोधन दृष्टी आणि सत्य-शोधनाचा चाललेला प्रयत्न प्रत्ययाला येतो. भाष्य, महाभाष्य, लापणिका, व्याकरण, न्यायशास्त्र, टीपग्रंथ, प्रमेय ग्रंथ, लक्षण ग्रंथ, मीमांसा, तर्क, वैय्याकरण, साहित्यशास्त्र आणि अलंकार-शास्त्र ही जी शास्त्रीय वाङ्मयनिर्मिती आहे ती पूर्णतः महानुभाव लेखकांनी संस्कृत भाषेच्या तोडीस उतरेल, अशा पद्धतीने केलेली आहे. यादवकालीन गद्य वाङ्मयात एकीकडे ललित गद्याची निपज होत होती, तर दुसरीकडे शास्त्रीय स्वरूपाचे व विविध ज्ञानशाखांतील वैशिष्ट्ये साक्षात करणारे असे गद्यलेखन चालू होते. 'स्मृतिस्थळ', 'गोविंदप्रभुचरित्र', 'स्थानपोथी', 'लक्षणबंद', 'आचार स्थळ', 'सूत्रमाला', 'सूत्रपाठ' या ग्रंथांच्या साह्याने वरील विधान पडताळून बघता येईल. कोणत्याही काळात वस्तुनिष्ठ दृष्टिकोणातून शास्त्रीय स्वरूपाची वाङ्मयनिर्मिती ही त्या काळातील वैचारिक

आंदोलन कोणत्या स्वरूपात आहे आणि कोणत्या दिशेने जात आहे यावर प्रकाश टाकण्यास समर्थ ठरणारी असते. एक नवीन वाङ्मयीन परिभाषा निर्माण झाली आणि संशोधन संपादनाचा ओनामा महानुभाव गद्यवाङ्मयाने पुढील मराठी वाङ्मयाला दिला. लीळाचरित्रा 'मधून जसे चक्रधरांचे आत्मवृत्त आणि चरित्रचित्रण मिळत असते त्याच-प्रमाणे मराठी ललित वाङ्मयाचा आकृतिबंध कसा होता, कोणत्या स्वरूपात या लीळा अभिव्यक्त झाल्या आहेत आणि लीळांच्या पाठीशी असलेले जे प्रचंड व्यक्तिमत्त्व आहे त्या व्यक्तिमत्त्वाची व्यामिश्रता कोणत्या स्वरूपाची आहे; गावकुसात आणि गावकुसाबाहेर या व्यक्तित्वाने केलेले जे परिभ्रमण होते त्या परिभ्रमणातील सुखदुःखाचे क्षण, उलाघालीचे क्षण आणि आनंदाचे क्षण त्या व्यक्तिमत्त्वावर कोणता परिणाम घडवून गेले; या व्यक्तिमत्वाभोवती जमलेली जी माणसे होती त्यांचे स्वभाव, त्यांचे दैनंदिन जीवन आणि त्यांचा चक्रधर या प्रचंड व्यक्तिमत्वाशी आलेला संबंध यांचे मोठे विलोभनीय दर्शन लीळाचरित्रातून घडले आहे. आणि हे सर्व मराठी या खळखळत्या मायबोलीतून !

संवादिनी गद्य

मराठी बोलीभाषेचा जिवंत आणि उमलता फुलोरा विशेषतः यादवकालीन गद्यवाङ्मयातून अभिव्यक्त झाला ही गोष्ट स्वतःसिद्ध आहे. माणूस बोलतो ते जिव्हाळ्याच्या, प्रेमाच्या भावना व्यक्त करण्यासाठी. या भावनांपाठीमागे असते ती माणसांनी माणसांना ओळखण्याची जिज्ञासा. आपले विचार, आपल्या भावना, आपल्या मनोकामना ज्यावेळी माणूस व्यक्त करतो त्यावेळी त्यातील उत्कटता ही सरळ अभिव्यक्त होते, ती संवादात्मक संभाषणातून ! कवितेला असलेली बंधने गद्यात बंधनकारक ठरत नसतात आणि एका वऱ्हाडी मोकळेपणाचे आणि मनाचे प्रतिबिंबिब ज्यात प्रतिबिंबित झाले आहे अशा मनामनांचे हुंकार यादवकालीन गद्यातून आणि विशेषतः लीळाचरित्रातून जाणवत असतात. लीळाचरित्राची रचना, लेखननिविष्टतेमागील भूमिका आणि वृत्ति-प्रवृत्तिनिदर्शकता लक्षात घेतल्यास त्यातील संवादी सूर बोलीमागच्या आंदोलनातून झिरपत असतात आणि अशा अनेक तऱ्हेच्या, अनेक प्रकारच्या आणि अनेक भावानुभूती अभिव्यक्त करणाऱ्या 'संवादिनी' लीळाचरित्रातून गोचर होत असतात. एका अर्थाने 'लीळाचरित्र' ही 'एकोक्ती' आहे तर दुसऱ्या अर्थाने समूहभावनांची 'संवादिनी' आहे. लीळाचरित्रात गद्याची कर्कशता किंवा काठिण्य का निर्माण झाले नाही ? गद्यामध्ये असलेली तार्किक मांडणी का येऊ शकली नाही ? आणि भाषेची क्लिष्टता का निर्माण झाली नसावी ? या साऱ्या प्रश्नांची उत्तरे 'लीळाचरित्रा'ला आलेल्या स्वरूपात आणि त्याने स्वीकारलेल्या आकृतिबंधात स्पष्ट होतात. तसेच त्यात लगलेले जे जीवन जाणिवांचे नाट्य आहे त्यात स्पष्ट होतात. लीळाचरित्राने स्वीकारलेला जो 'रूपबंध' आहे तोही कसा अनघड, नैसर्गिक आणि तालेवार असा, त्यातच त्याचे आकृति-सौंदर्य सामावलेले आहे. रंगभूमीचा पडदा वर जावा आणि नाटकाच्या पहिल्या

अंकाला सुरुवात होऊन वाचक आणि प्रेक्षक त्याकडे खेचला जावा तसे लीळाचरित्राच्या 'लीळा' वाचनाचा अनुभव आहे. आपल्या सर्व रूपगोचर अंगप्रत्यंगांसह एक निखळ संवादलेणे अनेक माणसांच्या भावभावनांना, विचारांना, विकारांना आणि कल्पनांना साक्षात करीत असते व त्यासह ती माणसेही जिवंत, जागती आणि स्वतःच्या पायावर उभी असलेली अशी साक्षात होत असतात. म्हणजे लीळाचरित्र हे एकीकडे 'चरित्र' आहे, 'आत्मचरित्र' आहे, 'संवादिनी' आहे, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाचे एक 'सुवर्णपान' आहे पण त्याहीपेक्षा ते अनेक गावकुसांबाहेरील आणि गावकुसाआतील माणसामाणसांचे 'हुंकार' आहेत, 'सहजोद्‌गार' आहेत आणि 'मनोदर्पण' आहे. असे म्हणण्याचे कारण म्हणजे ज्या काळात मराठी हा शब्द आणि मराठी ही संस्कृतीही आपला रूपभेद स्पष्ट करू शकत नव्हती अशा एका अंधारकाळी संस्कृत पंडितांनी आणि जाणकार विद्वानांनी मराठी भाषेची गंगा 'लीळाचरित्रा'तून धारावाही बनविली.

साहित्य-समाज-संस्कृती यांचा आदर्शपाठ

सर्वच महानुभाव हे संस्कृत विद्येचे उपासक, जाणकार आणि पंडित होते. संस्कृत भाषेची योग्य ती श्रेष्ठता त्यांनी मान्य केलेली होती. संपूर्ण देशातील व्यवहार विद्वान्मान्य अशा देववाणीतून होत होता. अशा वेळी शके १२०५ मध्ये मात्र गद्यातून मराठी बोली भाषेचे 'खळाळ' विद्वान अशा महानुभावांनीच जिवंत ठेवले व केवळ काव्यातूनच बोलीभाषेचा स्वीकार झाला; असे होऊ न देता गद्यातूनही मराठी भाषेचे पाझर पाझरू लागले हे 'लीळाचरित्र' या ग्रंथांचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. आपले भाषिक पारतंत्र्य झुगारून देण्याचा प्रयत्न फक्त केवळ महानुभावांनीच केला होता असे नाही तर जैन, लिंगायत या पंथियांनीही लोकभाषेचा आणि आपल्या मातृभाषेचा आग्रह आपल्या वाङ्मयनिर्मितीतून मांडला होता. येथे केवळ भाषिक विरोधामुळे किंवा केवळ भौगोलिक संकुचितपणामुळे भाषिक वादळे निर्माण झाली असेही नव्हते तर एकच आणि एकमेव प्रमुख कारण म्हणजे बहुजनसुखाय आणि बहुजनहिताय अशी निर्माण झालेली आणि लोकशिक्षक असलेली माणसे आपले विचार आणि आपला दृष्टिकोण आपल्या बोली-भाषेतून अभिव्यक्त करण्याचा आग्रह धरून होती व एक प्रचंड वादळ त्यामुळे निर्माण होत होते. अनपढ, अशिक्षित आणि अज्ञानी समाजाला जर काही भौतिक आणि आधिदैविक शिकवण द्यायची असेल, तर त्याच्याशी त्याच्या मायबोलीतून, मायभाषेतून बोलले पाहिजे, त्याच्याशी संवाद साधला पाहिजे, याची प्रखर जाणीव जशी चक्रधरांना झाली तशीच चक्रधरांपाठोपाठ येणाऱ्या ज्ञानेश्वर नामदेवांना झाली. केवळ 'संस्कृताची गहन तीरे' तोडण्याचा हा प्रयत्न नव्हता, त्याबरोबरच एका 'आध्यात्मिक लोकशाही'ची मुहूर्तमेढ पक्की करून ईश्वर संकीर्तन चक्रधर आणि ज्ञानेश्वर या लोकपालांना करणे आवश्यक वाटले होते. म्हणूनच लीळाचरित्रात 'संवाद' येतात आणि ज्ञानेश्वरीतही 'संवाद' असतात. त्यातून हजारो-लाखोंच्या मनामनांच्या संवादांमधून समाजाची दुःखे,

अन्याय, दारिद्र्य, व्यथा अभिव्यक्त होत गेल्या होत्या. समाजाशी संवाद साधीत, समाजाला जवळून न्याहाळीत आणि समाजामध्ये डोकावीत जात जात आपल्या धर्माचे, पंथाचे प्रयोजन चक्रधर ज्ञानदेव यांनी निश्चित केले होते. एका अर्थाने त्यांचे 'जगणे' हे त्यांचे स्वतःचे 'जगणे' नव्हतेच तर 'स्व' मध्येच संपूर्ण मानवसमाजाची जगण्याची खंत लक्षात घेत व त्यातून मार्ग काढीत पुढे जाण्याचा तो प्रयत्न होता. तत्कालीन समाजाचे लौकिक भावजीवनाचे स्वरूप आपल्याला जसे लीळाचरित्रातून जाणवत असते तसेच ते थोड्या प्रमाणात ज्ञानेश्वरीतूनही जाणवत असते. वस्तुतः चक्रधर हे विचारवंत होते. ते काही ज्ञानेश्वरांसारखे कलावंत नव्हते. परंतु चक्रधरांनी लावलेला जीवनाचा अर्थ आणि त्यासाठी एकातांतून लोकांतात येण्याची दर्शविलेली तयारी त्यांच्या लोकाभिमुखतेची साक्ष देते. समाजजीवन लोकाभिमुख आणि लोकसत्ताक करण्याचा असा हा प्रयत्न होता. म्हणून एकांक–पूर्वार्ध–उत्तरार्ध या संपूर्ण लीळाचरित्रातील संवादात शब्दाशब्दांत जिव्हाळा ओतप्रोत भरला आहे. इतकेच नव्हे तर 'लीळाचरित्र' हे महानुभाव संप्रदायाचे आणि वाङ्मयाचे स्फूर्तिकेंद्र बनले. एकीकडे चक्रधरांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व लीळाचरित्रातून गोचर होते तर दुसरीकडे सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि सांस्कृतिक अशी महाराष्ट्राची घडण कशी होती याचा अतिशय महत्त्वपूर्ण पुरावा म्हणून वैशिष्ट्यपूर्ण ठरते. 'लीळाचरित्रा' मधून राजकीय परिवर्तनाची दिशाही स्पष्ट झाली आहे. म्हणून हा ग्रंथ केवळ महानुभावांना किंवा केवळ वाङ्मयाच्या अभ्यासकांनाच महत्त्वपूर्ण वाटतो असे नव्हे तर साहित्य, समाज आणि संस्कृती यांचा यादवकालीन 'आदर्शपाठ' लीळाचरित्रातून साक्षात होतो.

म्हणी आणि वाक्प्रचार

एखादी 'म्हण' किंवा एखादा 'वाक्प्रचार' केव्हा निर्माण होतो ? भाषाशास्त्रीयदृष्ट्या बघू लागलो तर निरंतर उपयोगात आणून जो शब्दसमूह एका विशिष्ट अर्थानेच सिद्ध होतो त्याला आपण 'म्हणी' असे म्हणतो. म्हटली जाते ती 'म्हण' अशी जर म्हणींची फोड केली तरी देखील तीतून शब्दांचा सामाजिक असा जो अन्वय आहे तो लक्षात येईल. पिढ्यानुपिढ्या वापरून या शब्दसमूहाला एक विशिष्ट अर्थाचे बलय निर्माण होते व त्याचा वाक्प्रचार तयार होतो. वाक्प्रचारात किंवा म्हणींमध्येही लोकांनी दैनंदिन जीवनात जो भाषेचा व्यवहार केलेला असतो; त्यातूनच एक विशिष्ट संकेत कालांतराने निर्माण होत जातो. यादवकालीन मराठी भाषेत आणि विशेषतः लीळाचरित्रात असंख्य म्हणी आणि वाक्प्रचार मिळतात याचाच अर्थ असा की, भाषेची शब्दसंपत्ती समृद्ध असते त्याशिवाय वाक्प्रचार आणि म्हणी भाषेत निर्माण होणे शक्य नसते. तसेच आणखी असे स्पष्ट होईल की जर भाषा सर्वार्थाने समृद्ध आणि प्रौढ असेल तरच तिच्यात 'म्हणी' आणि 'वाक्प्रचार' निर्माण होतील. त्याही दृष्टीने लीळाचरित्रातील 'म्हणी' आणि 'वाक्प्रचार' लक्षात घेतले तर यादवकालीन मराठी भाषेची प्रौढता, विदग्धता आणि गर्भश्रीमंती दिसू लागेल. लीळाचरित्रातील शब्दसंपत्तीच्या साह्याने त्याच्यातील म्हणींचा व वाक्प्रचारांचा अन्वयार्थ लक्षात घेतला तर समकालीन महाराष्ट्रीय

अंकाला सुरुवात होऊन वाचक आणि प्रेक्षक त्याकडे खेचला जावा तसे लीळाचरित्राच्या 'लीळा' वाचनाचा अनुभव आहे. आपल्या सर्व रूपगोचर अंगप्रत्यंगांसह एक निखळ संवादलेणे अनेक माणसांच्या भावभावनांना, विचारांना, विकारांना आणि कल्पनांना साक्षात करीत असते व त्यासह ती माणसेही जिवंत, जागती आणि स्वतःच्या पायावर उभी असलेली अशी साक्षात होत असतात. म्हणजे लीळाचरित्र हे एकीकडे 'चरित्र' आहे, 'आत्मचरित्र' आहे, 'संवादिनी' आहे, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाचे एक 'सुवर्णपान' आहे पण त्याहीपेक्षा ते अनेक गावकुसांबाहेरील आणि गावकुसाआतील माणसामाणसांचे 'हुंकार' आहेत, 'सहजोद्‌गार' आहेत आणि 'मनोदर्पण' आहे. असे म्हणण्याचे कारण म्हणजे ज्या काळात मराठी हा शब्द आणि मराठी ही संस्कृतीही आपला रूपभेद स्पष्ट करू शकत नव्हती अशा एका अंधारकाळी संस्कृत पंडितांनी आणि जाणकार विद्वानांनी मराठी भाषेची गंगा 'लीळाचरित्रा'तून धारावाही बनविली.

साहित्य-समाज-संस्कृती यांचा आदर्शपाठ

सर्वच महानुभाव हे संस्कृत विद्येचे उपासक, जाणकार आणि पंडित होते. संस्कृत भाषेची योग्य ती श्रेष्ठता त्यांनी मान्य केलेली होती. संपूर्ण देशातील व्यवहार विद्वान्मान्य अशा देववाणीतून होत होता. अशा वेळी शके १२०५ मध्ये मात्र गद्यातून मराठी बोली भाषेचे 'खळाळ' विद्वान अशा महानुभावांनीच जिवंत ठेवले व केवळ काव्यातूनच बोलीभाषेचा स्वीकार झाला; असे होऊ न देता गद्यातूनही मराठी भाषेचे पाझर पाझरू लागले हे 'लीळाचरित्र' या ग्रंथांचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. आपले भाषिक पारतंत्र्य झुगारून देण्याचा प्रयत्न फक्त केवळ महानुभावांनीच केला होता असे नाही तर जैन, लिंगायत या पंथियांनीही लोकभाषेचा आणि आपल्या मातृभाषेचा आग्रह आपल्या वाङ्मयनिर्मितीतून मांडला होता. येथे केवळ भाषिक विरोधामुळे किंवा केवळ भौगोलिक संकुचितपणामुळे भाषिक वादळे निर्माण झाली असेही नव्हते तर एकच आणि एकमेव प्रमुख कारण म्हणजे बहुजनसुखाय आणि बहुजनहिताय अशी निर्माण झालेली आणि लोकशिक्षक असलेली माणसे आपले विचार आणि आपला दृष्टिकोण आपल्या बोली-भाषेतून अभिव्यक्त करण्याचा आग्रह धरून होती व एक प्रचंड वादळ त्यामुळे निर्माण होत होते. अनपढ, अशिक्षित आणि अज्ञानी समाजाला जर काही भौतिक आणि आधिदैविक शिकवण द्यायची असेल, तर त्याच्याशी त्याच्या मायबोलीतून, मायभाषेतून बोलले पाहिजे, त्याच्याशी संवाद साधला पाहिजे, याची प्रखर जाणीव जशी चक्रधरांना झाली तशीच चक्रधरांपाठोपाठ येणाऱ्या ज्ञानेश्वर नामदेवांना झाली. केवळ 'संस्कृताची गहन तीरे' तोडण्याचा हा प्रयत्न नव्हता, त्याबरोबरच एका 'आध्यात्मिक लोकशाही'ची मुहूर्तमेढ पक्की करून ईश्वर संकीर्तन चक्रधर आणि ज्ञानेश्वर या लोकपालांना करणे आवश्यक वाटले होते. म्हणूनच लीळाचरित्रात 'संवाद' येतात आणि ज्ञानेश्वरीतही 'संवाद' असतात. त्यातून हजारो-लाखोंच्या मनामनांच्या संवादांमधून समाजाची दुःखे,

अन्याय, दारिद्र्य, व्यथा अभिव्यक्त होत गेल्या होत्या. समाजाशी संवाद साधीत, समाजाला जवळून न्याहाळीत आणि समाजामध्ये डोकावीत जात जात आपल्या धर्माचे, पंथाचे प्रयोजन चक्रधर ज्ञानदेव यांनी निश्चित केले होते. एका अर्थाने त्यांचे 'जगणे' हे त्यांचे स्वतःचे 'जगणे' नव्हतेच तर 'स्व' मध्येच संपूर्ण मानवसमाजाची जगण्याची खंत लक्षात घेत व त्यातून मार्ग काढीत पुढे जाण्याचा तो प्रयत्न होता. तत्कालीन समाजाचे लौकिक भावजीवनाचे स्वरूप आपल्याला जसे लीळाचरित्रातून जाणवत असते तसेच ते थोड्या प्रमाणात ज्ञानेश्वरीतूनही जाणवत असते. वस्तुतः चक्रधर हे विचारवंत होते. ते काही ज्ञानेश्वरांसारखे कलावंत नव्हते. परंतु चक्रधरांनी लावलेला जीवनाचा अर्थ आणि त्यासाठी एकातांतून लोकांतात येण्याची दर्शविलेली तयारी त्यांच्या लोकाभिमुखतेची साक्ष देते. समाजजीवन लोकाभिमुख आणि लोकसत्ताक करण्याचा असा हा प्रयत्न होता. म्हणून एकांक–पूर्वार्ध–उत्तरार्ध या संपूर्ण लीळाचरित्रातील संवादात शब्दाशब्दांत जिव्हाळा ओतप्रोत भरला आहे. इतकेच नव्हे तर 'लीळाचरित्र' हे महानुभाव संप्रदायाचे आणि वाङ्मयाचे स्फूर्तिकेंद्र बनले. एकीकडे चक्रधरांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व लीळाचरित्रातून गोचर होते तर दुसरीकडे सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि सांस्कृतिक अशी महाराष्ट्राची घडण कशी होती याचा अतिशय महत्त्वपूर्ण पुरावा म्हणून वैशिष्ट्यपूर्ण ठरते. 'लीळाचरित्रा' मधून राजकीय परिवर्तनाची दिशाही स्पष्ट झाली आहे. म्हणून हा ग्रंथ केवळ महानुभावांना किंवा केवळ वाङ्मयाच्या अभ्यासकांनाच महत्त्वपूर्ण वाटतो असे नव्हे तर साहित्य, समाज आणि संस्कृती यांचा यादवकालीन 'आदर्शपाठ' लीळाचरित्रातून साक्षात होतो.

म्हणी आणि वाक्प्रचार

एखादी 'म्हण' किंवा एखादा 'वाक्प्रचार' केव्हा निर्माण होतो ? भाषाशास्त्रीयदृष्ट्या बघू लागलो तर निरंतर उपयोगात आणून जो शब्दसमूह एका विशिष्ट अर्थानेच सिद्ध होतो त्याला आपण 'म्हणी' असे म्हणतो. म्हटली जाते ती 'म्हण' अशी जर म्हणींची फोड केली तरी देखील तीतून शब्दांचा सामाजिक असा जो अन्वय आहे तो लक्षात येईल. पिढ्यानुपिढ्या वापरून या शब्दसमूहाला एक विशिष्ट अर्थाचे बलय निर्माण होते व त्याचा वाक्प्रचार तयार होतो. वाक्प्रचारात किंवा म्हणींमध्येही लोकांनी दैनंदिन जीवनात जो भाषेचा व्यवहार केलेला असतो; त्यातूनच एक विशिष्ट संकेत कालांतराने निर्माण होत जातो. यादवकालीन मराठी भाषेत आणि विशेषतः लीळाचरित्रात असंख्य म्हणी आणि वाक्प्रचार मिळतात याचाच अर्थ असा की, भाषेची शब्दसंपत्ती समृद्ध असते त्याशिवाय वाक्प्रचार आणि म्हणी भाषेत निर्माण होणे शक्य नसते. तसेच आणखी असे स्पष्ट होईल की जर भाषा सर्वार्थाने समृद्ध आणि प्रौढ असेल तरच तिच्यात 'म्हणी' आणि 'वाक्प्रचार' निर्माण होतील. त्याही दृष्टीने लीळाचरित्रातील 'म्हणी' आणि 'वाक्प्रचार' लक्षात घेतले तर यादवकालीन मराठी भाषेची प्रौढता, विदग्धता आणि गर्भश्रीमंती दिसू लागेल. लीळाचरित्रातील शब्दसंपत्तीच्या साह्याने त्याच्यातील म्हणींचा व वाक्प्रचारांचा अन्वयार्थ लक्षात घेतला तर समकालीन महाराष्ट्रीय

सांस्कृतिक, भौतिक, धार्मिक, सामाजिक आणि राजकीय जीवनावर एक वेगळाच प्रकाश पडेल! मराठी भाषेची समृद्ध आणि परिपक्व अवस्था लीळाचरित्रातील अनंत वाक्प्रचार आणि म्हणीमधून लक्षवेधी ठरते आणि हे वाक्प्रचार लोकजीवनाशी आणि विशेषतः नागर जीवनापेक्षाही ग्रामजीवनाशी संबंद्ध असे आहेत. त्यातून चालीरीती आणि जीवन व्यवहार दृक्गोचर होतोच पण एका समृद्ध आणि सुसंस्कृत जीवनातील भावविश्व गोचर होत जाते.

लीळाचरित्राचे स्वरूप

उत्तरार्धातील लीळा ४८८ आहेत, पूर्वार्धातील लीळा ३५८ आहेत आणि एकांकातील लीळा केवळ ७५ आहेत. यावरूनही चक्रधर-शिष्यांनी आपल्या परमदैवताला सतत आळविण्याचा मनःपूर्वक केलेला जो प्रयत्न होता त्याचा निर्देश करता येईल. सर्व स्मृती आठवताना अर्थातच काही वेळा द्विरुक्ती, काही वेळा पुनरुक्ती तर काही वेळा एकी वासना, दुजी वासना असे लीळाचरित्रात घडले आहे आणि त्यामुळे त्याच्या स्वाभाविक सौंदर्यात आणखीनच भर पडलेली आहे. नागदेवाचार्यांच्या अनुसरणापासून महाप्रयाणापर्यंतचा उत्तरार्ध त्या दृष्टीने भक्तांच्या अधिक निकटचा होता. हा काळ अर्थातच शके ११९० ते ११९४ असा केवळ चार वर्षांचा कालखंड आहे. त्यात शेकडो भक्तमंडळी चक्रधरांच्या अवती-भोवती होती त्यांची ती 'पाळिली' 'पोषिली' अशी होती. एकांतातून केवळ लोकांतात चक्रधर आले असे नाही तर अतिशय झपाटलेपणाने त्यांचे परिभ्रमण चालू होते. या भ्रमणालाही विलक्षण गती होती, विलक्षण संगती होती. एकांक पूर्वार्धापेक्षाही उत्तरार्धात अनेक सूत्रे आणि दृष्टान्त येतात आणि एक विलक्षण चमकदारपणा त्यांच्या भाषेला येतो. तिच्यातील वक्तृत्व, स्वभावोक्ती आणि अलंकरण यामुळे एक प्रगल्भ प्रौढत्व या भाषासरणीला झळाळ देऊन जाते. पूर्वार्धातील काळ म्हणजे चक्रधरांच्या पतितावतारापासून पैठणला येऊन नागांबिकेला प्रेमदान आणि स्वतः चक्रधरांनी संन्यासदीक्षाग्रहण हा कालखंड आहे. उत्तरार्धापेक्षा हा काळ खूपच विस्तृत आहे व त्यातच चक्रधरांचे आत्मचरित्रही बोलके झालेले आहे. मूळ लीळाचरित्राचे 'उत्तरार्ध' आणि 'पूर्वार्ध' असे दोनच विभाग स्मृतिस्थळकारांनी मानलेले असले तरी त्यात अनस्यूत असलेले आत्मवृत्त 'एकांक' मध्ये आलेले आहे आणि अशा पद्धतीने उत्तरार्ध शके ११९० ते ११९४, पूर्वार्ध शके ११८६ ते ११९० आणि आणि एकांक शके १०७५ ते ११८५ अशी चक्रधर-चरित्राची विभागणी झालेली आहे. त्यातही चक्रधरांच्या जीवनाचे पंचखंड डॉ. कोलते यांनी मानले तर डॉ. य. खु. देशपांडे यांनी चार खंड मानले; अर्थात त्यामुळे मूळ आकलनाला मदत होते! एकांक म्हणजे चक्रधरांच्या पंथनिर्मितिपूर्व आयुष्यक्रमाची आत्मकहाणी आहे. जणू चक्रधरांचे स्वतःच्या गतार्थ आयुष्याचे केलेले ते सिंहावलोकन आहे. अलौकिक जन्म, राजधर्मानुसार घेतलेले अनंत सुखोपभोग आणि त्यातून अंतिमतः आलेली निवृत्ती अशा चढत्या क्रमाने चक्रधरांच्या आयुष्याने घेतलेले वळण आहे. त्यात संन्यासदीक्षा आणि नागांबिकेला प्रेमदान या घटना संपूर्ण चक्रधर

जीवनातच विलक्षण खळबळ करणाऱ्या अशा ठरल्या आणि पुढील आठ वर्षे म्हणजे आपल्या आयुष्याच्या सायंकाळी चक्रधरांनी समाजोद्धाराचे कार्य संघटना स्थापनेतून आणि तत्त्वज्ञाननिरुपणातून केले व पुढे नागदेवाचार्यांसारखा निस्सिम भक्त मिळाल्यामुळे वाङ्मयनिर्मितीचे अधिष्ठान महानुभाव संप्रदायाला आणि आचारविचारधर्माला मिळू शकले.

चक्रधरांचे नवे विचार

चक्रधरांची अलौकिक जीवनगाथा आणि ज्ञानेश्वरांची अलौकिक जीवनगाथा यात परस्परविरुद्धत्व असूनही एकामागे एक अवतीर्ण होऊन दिव्याने दिवा उजळावा तसे समाज उद्‌बोधनाचे कार्य चक्रधर आणि ज्ञानदेवांनी आरंभिले आणि पूर्णतेस नेले. ज्ञानेश्वर creative poet होते तर चक्रधर thinker होते, विचारवंत होते. यादवकालीन लोकजीवनाला आणि मराठी संस्कृतीला चक्रधरांनी आपल्या पद्धतीने एक विशिष्ट आकार देण्याचा प्रयत्न केला. त्यांचे विचार अतिशय नाविन्याने भरलेले होते. स्त्रियांना संन्यास दीक्षा देणे, विटाळ चांडाळ न मानणे, मातंगाच्या हातचा प्रसाद स्वीकारणे आणि खेडोगाडी अटन विजन करून एक धार्मिक सामंजस्याचा प्रयत्न करणे या दृष्टीने चक्रधर सतत विहरण करीत राहिले. डोळ्यांनी बघितलेल्या समाजाचे दुःख आणि हाल थोडेफार आचारधर्माने कमी कमी करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्यांची दृष्टी ही पुरोगामी आणि विचार आधुनिक होते. हे सर्व विचारधन लीळा चरित्रातून जपले गेले आहेत. अल्पाक्षरत्व आणि अर्थभारित्व हे काव्याचे गुण असले तरी चक्रधर-वाणीला ते अनुरूप ठरले आहेत. हजारो, लाखोंच्या जीवांना चटका लावून गेलेले हे व्यक्तित्व पुनः स्मरणातून आविष्कृत करण्याचा हा एक अनोखा असा प्रयत्न मराठी वाङ्मयाच्या बाळपणी आणि गद्याच्याही बाळपणी घडला हाही एक अलौकिक चमत्कारच म्हणावा लागेल! भाषेचे वैभव, गद्यातील यथातथ्य वास्तव आणि बोलीभाषेतील माणसांच्या उक्तीतील सळसळता जिवंतपणा यांमुळे मराठी भाषेचे आणि वाङ्मयाचेही एक अहेवलेणे म्हणून 'लीळाचरित्रा'चे स्थान अनन्यसाधारण ठरते! आणि लीळाचरित्रातील चक्रधरांचे व्यक्तिमत्त्व संपूर्ण तेराव्या शतकातील गद्याचे व महानुभाव कवितेचे आधारदेठ ठरते. आणि लीळाचरित्रातील त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा पडताळाच वाङ्मयातून येतो.

महानुभावपंथ संस्थापक चक्रधर

महानुभाव पंथाचे संस्थापक आणि महानुभाव पंथीय लेखकांचे प्रेरणास्थान म्हणून चक्रधरस्वामींना लक्षात घ्यावे लागते. चक्रधरस्वामींनी कोणतेही वाङ्मयीन स्वरूपाचे लेखन केलेले नसले तरी त्यांच्या वैचारिक दृष्टिकोणामुळे व प्रभावी व्यक्तिमत्त्वामुळे अनेक अनुयायांना लेखनप्रवृत्त केलेले होते ही गोष्ट उघडच आहे. 'लीळाचरित्र' हा एकमेव गद्यग्रंथ होय की ज्यातून चक्रधरांच्या जीवनाचे व तत्त्वज्ञानाचे संचित जपले गेले आहे. ज्ञानेश्वर आणि चक्रधर यांच्या भूमिकांमध्ये वास्तविक साम्य अनेक ठिकाणी दिसून येते.

किंबहुना लोकशिक्षणाच्या बाबतीत ज्ञानेश्वरपूर्वकाळात चक्रधरांनी जे सतत परिभ्रमण केले त्यातून तत्कालीन महाराष्ट्राची स्थितिगती बरीच मूळपदावर आणण्याचे काम त्यांनी केलेले होते ही गोष्ट नाकारून चालणार नाही. कर्मकाण्डाचा अतिरेक, जातिसंस्थांचा बडेजाव आणि धार्मिक बाबींतले अज्ञान न्याहाळून चक्रधरांनी शहरे, गावे, खेडी आणि वस्त्या या सर्व स्तरांतून खानदेश, वऱ्हाड, तेलंगण आणि गुजराथचा काही भाग यात सतत भ्रमंती करून सामान्य जनसमुदायांना अहिंसामार्गाचा आणि स्त्रीपुरुष समानतेचा संदेश दिला; याही दृष्टीने ज्ञानेश्वरांपूर्वी समाजाच्या नैतिक आणि धार्मिक ऱ्हासाचे डोळसपणे आकलन करून चक्रधरांनी त्यावर आपली पंथनिर्मिती करून एक उपाय शोधण्याचा प्रयत्न केला. महानुभावपंथाला पंधराव्या, सोळाव्या शतकांत आणि नंतरही हळूहळू लोकापवादाची झळ पोहोचली. पण ज्या हेतूने आणि ज्या दिशेने चक्रधरांनी समाजविचार केला होता तो अतिशय नाविन्यपूर्ण आणि अभिनवस्वरूपाचा होता. चक्रधरांच्या पश्चात आणि विशेषतः नागदेवाचार्यानंतर हा पंथ लोकांच्या विशेष अनादरास पात्र झाला. त्याला विविध नैमित्तिक आणि धार्मिक आचारपद्धतीच्या संदर्भातील कारणे होती. पण मूळ चक्रधरांचा दृष्टिकोण आणि पुढील पंथीयांनी त्याचे केलेले अनुसरण यांत मूलभूत स्वरूपाचीच तफावत निर्माण झाली व चक्रधरांची वैचारिकदृष्टी पुढीलांना डोळसपणे न्याहाळता आली नाही. चक्रधरांच्या तत्त्वज्ञानाचे उदाहरण घेतले तरी स्पष्टपणे दिसून येईल. ज्या पद्धतीने आणि ज्या समाजसापेक्ष रीतीने चक्रधरांनी जीवनाचा तात्त्विक विचार केला तो पूर्णपणे लीळाचरित्रातून ज्ञात झाला आहे. चक्रधरांच्या कृत्युक्तीतून गोचर झालेला त्यांचा वैचारिक दृष्टिकोण हा अतिशय अभिनव असूनही त्यांच्या शिष्यप्रशिष्यांनी मात्र त्यांच्या भूमिकेला स्वीकारताना अधिक क्लिष्ट, अधिक सांकेतिक आणि अधिक जीवनदूर बनविले.

विचारवंत चक्रधर

चक्रधर हे एक विचारवंत होते. त्यांचे मन हे एका विचारवंत पण सहृदयी माणसाचे होते. भोवतालचा संपूर्ण जीवनव्यवहार न्याहाळत असता होणारे दुःख आणि मानसिक वेदना त्यांच्या करुणामय अंतःकरणाला यातना देणाऱ्या ठरल्या व त्यातून त्यांनी काही निमित्ताने काही प्रवृत्ती झाली असता जे जीवनचिंतन केले ते उत्स्फूर्त, सहजसंवादी आणि मानव्याच्या अपार करुणेतून निर्माण झाले. जीवनाची खोलवर जाणीव व दृष्टीची विश्वात्मकता या दोहोंचा संकर चक्रधरवचनांमधून व्यक्त झाला आहे. म्हणून त्यांचे विचार केवळ नैमित्तिक किंवा केवळ देशकाळस्थितीशी संबद्ध न राहाता मानवाच्या संदर्भात कल्याणकारी भूमिकेतून चिरंतन स्वरूपाचे राहिलेले दिसतात. ज्ञानेश्वरांच्या बाबतीत आपल्याला असे म्हणता येईल की, ज्ञानेश्वरांची प्रतिभा ही केवळ लोकशिक्षकाची किंवा केवळ मानवतावादी संताची किंवा केवळ तत्त्वज्ञानी विचारवंतांची होती असे नाही; तर एका कलावंताची होती. त्यामुळे त्यांचे अनुभवविश्व हे विविधतापूर्ण असूनही पुनः काव्यात्म झालेले दिसते. लोकोद्धार हा सामाजिक आणि आध्यात्मिक क्षेत्रात करणे हे तर यादव-

कालीन सर्वच लेखकांचे किंवा समाजधुरीण समजल्या गेलेल्या पुढाऱ्यांचे ब्रीद होते. त्याला चक्रधर जसे अपवाद नाहीत, तसे ज्ञानेश्वरही नाहीत. पण ज्ञानेश्वर हे कविमनाचे होते. त्यांची प्रतिभा ही चिंतनशील आणि सर्जनशील असल्यामुळे एकीकडे जीवनजाणिवांचे पदर उलगडत असतानाच त्या जाणिवांना कलात्मकता आपोआप अंगभूतपणे आलेली ज्ञानेश्वरीतील प्रत्येक ओळीओळीतून दृग्गोचर होते. ज्ञानेश्वरांनी वारकरीपंथाची संघटना बळकट करून तिला भरीव रूप देण्याचा प्रयत्न केला, पण ज्ञानेश्वरांच्या मागे येणारे सर्व अनुयायी पंथाच्या अस्मितेने बांधले गेलेले असूनही, पुनः स्वतः स्वतंत्र विचार करणारे व आत्माविष्काराचे स्वातंत्र्य उपभोगणारे साधक होते. चक्रधरांनी प्रस्थापित केलेल्या महानुभाव पंथाच्या अनुयायांच्या संदर्भात असे दृष्टीस पडत नाही. पंथीय दृष्टिकोणाने सर्व कवी-लेखक बांधले गेलेले आहेत व ईश्वराचे स्वरूपही निश्चित झाल्यामुळे जणू स्वत्व हरवलेले (पण त्याच्या शोधापेक्षा) चक्रधरलीनता स्वीकारण्यात धन्यता मानणारे आणि व्यक्तित्व हरवलेले पण निष्ठावान असलेले कवी दिसू लागतात. चक्रधरोक्तींना जो जिवंतपणा आला तसा पुढीलांच्या उक्तीला एकतर आला नाही आणि चक्रधरांच्या विचारांचे प्रतिबिंबही त्यांना स्पष्टपणे निर्माण करता आले नाही. भागवत संप्रदायात 'ज्ञानाचा एका' आणि 'नामाचा तुका' ही परंपरा कायम राहून एक जिवंत, चैतन्यदायी आणि सळसळते भावनोत्कट जीवनचिंतन प्रगट होत असताना जसे दिसते व त्याला पुढे रामदासांनी तत्त्वचिंतनाला प्रवृत्तिवादाची आणि प्रपंचपरमार्थाची जी जोड दिली, त्यामुळे ज्ञानेश्वरांनी पुरस्कारिलेले तत्त्वज्ञान आणि जीवनचिंतन हे प्रत्येक शतकात अधिकाधिक समृद्ध होत गेलेले दिसते. याउलट परिस्थिती महानुभाव तत्त्वज्ञानाची आणि जीवनचिंतनाची झाली. 'लीळाचरित्रा'ला वाङ्मयीन गुणरूप येऊ शकले किंवा 'दृष्टान्तपाठा'ला वाङ्मयीन कथात्मक रूप येऊ शकले, कारण त्यात स्वतः चक्रधर तुमच्या आमच्यासारख्या सामान्य माणसाला विश्वासात घेऊन हृदयसंवाद साधीत असतात. म्हणूनच 'लीळाचरित्र' ही एकीकडे महानुभावपंथीय तत्त्वज्ञानाची बीजभूमी असली, तरी वाङ्मयाचे विविध प्रकार, उपप्रकार निर्माण करणारी अस्सल अशी निर्मितिभूमी आहे. लीळाचरित्रातून 'सूत्रपाठ' व 'दृष्टान्तपाठ' हे वाङ्मयीन स्वरूपाचे ग्रंथ निर्माण झाले. कारण मूळ लीळाचरित्रात असलेले व्यक्तिमत्त्वच अत्यंत समृद्ध, दीर्घायुष्य मिळालेले व जीवनाचा चवीने आस्वाद घेतलेले असे चक्रधराचे व्यक्तिमत्व आहे. चक्रधराचे जीवनदेखील एका सरळ रेषेत जाणारे असे नाही; तर विविध नाट्यपूर्ण आणि माणसाला अन्तर्मुख करावयास लावतील असे विविध समरप्रसंग चक्रधर या व्यक्तीच्या जीवनात घडलेले आहेत. हे सारे 'लीळाचरित्रा'तून म्हाइंभट्टाने गोळा केलेल्या विविध आठवणींमधून आपल्याला मिळत असते. यावरून चक्रधरांनी कुठेही स्वतःचे चरित्र, आत्मचरित्र किंवा सूत्रभाष्य, दृष्टान्त कथा लिहिण्याचा प्रयत्न केला नसूनही चक्रधर ही व्यक्ती कशी होती, व्यावहारिक जीवनातील तिचे विविध स्वभावविशेष कोणते, तिचे रूप, स्नेहसंबंध, खाणेपिणे, जाणेयेणे या सर्वांचा आढळ लीळाचरित्रातून घडू लागतो व 'चर्चक' आणि 'जिज्ञासक' अशा

शिष्यांनी पृच्छा केल्यामुळे स्वतःचे आत्मचरित्रही चक्रधर सांगू लागतात. त्यामधून त्यांच्या जीवनाच्या अज्ञात आणि नाट्यपूर्ण अशा गृहस्थाश्रमी जीवनावर प्रकाश पडतो व एक एक जीवनाची पाकळी चक्रधर उलगडत जातात. ज्या संदर्भात जी जी आठवण आली ती सांगून टाकतात व पूर्वचरित्र आठवू लागतात. त्यामुळे एक प्रकारचा जिवंतपणा या आठवणीत येऊन जातो.

पूर्वार्ध उत्तरार्ध दोनि विभाग

'एकांक-पूर्वार्ध-उत्तरार्ध' यांमधून दिसणारे चक्रधर हे वास्तविक त्यांच्या भक्तांना जसे दिसले तसे चितारण्याचा प्रयत्न झाला आहे. त्यात वास्तविक विविध रंगच्छटा सहज मिसळून देता येणे शक्य होते; पण आपल्या सुदैवामुळे ईश्वराच्या अवतारी क्रीडा आठवताना कोणत्याही भक्ताच्या मनाचे रंग त्यात मिसळता उपयोगी नाही याची पंथीय भूमिकेतून खबरदारी घेतली गेली व त्यामुळे आपोआपच अपेक्षा नसताही चक्रधरांचे व्यक्तिमत्व गोचर होऊ शकले. समुद्राच्या किनाऱ्यावरून समुद्राला न्याहाळावे तसे या ठिकाणी आठवणींच्या साह्याने पण सत्याच्या साक्षीने भक्तगणांनी चक्रधरांना न्याहाळले आहे. लिटनस्ट्रॅचीने म्हटल्याप्रमाणे 'Paint me as I am' हे विधान जणू एका अर्थाने खरे करण्याचा प्रयत्न सर्व भक्तमंडळींनी केला. स्वतःच्या पदरचे काहीही न घालता जो प्रसंग, जी घटना ज्या संदर्भात चक्रधरांच्या जीवनात घडली, ती जशीच्या तशी सांगण्याचा प्रयत्न झाल्यामुळे चरित्र वाङ्मयप्रकारातील अपेक्षित असलेली अस्सलता आपोआप त्यात निर्माण झाली.

महानुभाव वाङ्मयाच्या संदर्भात नेहमीच एक गमतीची गोष्ट दिसते ती म्हणजे वाङ्मयनिर्मितीच्या भूमिकेतून लेखनप्रेरणा झाली नसूनही विविध वाङ्मयप्रकारांचे Norms महानुभाव वाङ्मयाने निश्चित केले. वाङ्मयप्रकारांची विविधताही मराठी भाषेच्या बालपणीच निर्माण झाली व या निर्मितीमागे प्रेरणा होती ती चक्रधरांविषयीच्या भक्तीची ! तसेच महानुभाव वाङ्मयाचे स्वरूपही वास्तविक धार्मिक आणि पंथीय दृष्टीने निश्चित झालेले आहे. त्याची संहिता आणि विचारसंहिताही पक्की झाली असूनही बोलीभाषेचे वैभव आणि अस्मिता जागवण्याचे व समाजाभिमुखतेचे लेणे वाङ्मयाला मिळाले. आणि या सर्व वाङ्मय व्यवहारामागे एखाद्या पहाडासारखे उभे राहिले ते चक्रधरांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व ! विविध लेखननिर्मितीला प्रेरणा देण्याचे बळ चक्रधरांच्या शिकवणुकीत असलेले दिसते. म्हणून चक्रधर स्वतः लेखक जरी नसले तरी अनेकांच्या लेखनाचा विषय ते झाले आणि त्यामुळे विविध वाङ्मयीन परंपरा त्यांनी निर्माण केल्या. ज्यांना आपण दार्शनिक किंवा तत्त्वज्ञ म्हणतो त्या संदर्भात चक्रधर दर्शनकार किंवा तत्त्वज्ञाची होते की नव्हते हा वादविषय होईल, पण लीळाचरित्रातून दिसणारे चक्रधर हे एक चिंतनशील असे मन असणारे व्यक्तित्त्व आहे. अनेक लेखकांना त्यांनी जणू लेखनासाठी प्रवृत्त केलेले दिसते. समृद्ध जीवनाचा समृद्धपणे अनुभव घेतलेले पण वितरागी

असलेले असे त्यांचे व्यामिश्र व्यक्तिमत्त्व लीळाचरित्रातून प्रकट होते. हे व्यक्तिमत्त्व एका सरळ रेषेत जीवन जगलेले नाही तर विविध पद्धतीचे चढउतार आणि व्यक्तिमत्त्वालाच डंख करणारे प्रसंग या माणसाच्या जीवनात आलेले लीळाचरित्रातून दिसू लागतात व त्यातून चक्रधरांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व जाणवू लागते.

लीळा संकलन

वस्तुतः कोणत्याही वाङ्मयीन स्वरूपाच्या लेखनातून त्या लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाची अपेक्षा आपण ठेऊन असतो, पण लीळाचरित्राच्या बाबतीत तीही अपेक्षा फलदायी होत नाही. याचे कारण म्हणजे ज्या म्हाइंभट्टाने नागदेवाचार्याच्या सहाय्याने लीळाचरित्राची बांधणी केली, त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे विविधरंगी धागे लीळाचरित्रातून गोचर होणे शक्य होते, पण तसे होत नाही याचे कारण चक्रधरांना त्यांच्या जीवोद्धारणाच्या कार्यात म्हाइंभट्ट हे फार उशिरा येऊन मिळाले हे नाही; तर अतिशय वस्तुनिष्ठ राहून स्वतःची छाया कुठेही पडणार नाही ही खबरदारी घेत या ठिकाणी लीळा संकलन झालेले आहे. त्यामुळे चक्रधरांच्या सान्निध्यात ज्यावेळी म्हाइंभट्ट येतो, त्यावेळी त्याची थोडीफार ओळख पटते. पण एरव्ही एखाद्या अनामपणे पण निःस्वार्थी बुद्धीने काम करणाऱ्या कार्यकर्त्याची भूमिका आणि कष्ट म्हाइंभट्टाने घेतलेले दिसतात. म्हणूनच चरित्रविषय झालेले चक्रधर जसे सर्वांगीण आणि परिपूर्ण रीतीने दृष्टीस पडतात तसे त्यांची आठवण देणारे किंवा सांगणारे पडत नाहीत. अर्थात जो मंडळी चक्रधरांच्या सहवासात विशेषत्वाने आलीत त्यांच्या संदर्भात वाचकाला माहिती मिळते व त्यांच्या स्वभावाचे दर्शनही घडते, नाही असे नाही; पण त्या त्या व्यक्तीचाही प्रयत्न चालू असतो तो चक्रधर रूप आठवण्याचा ! प्रखर प्रकाशझोतामुळे वस्तुमात्रा दिसू लागतात त्याप्रमाणे विविध प्रकारच्या आणि पद्धतींच्या आठवणींमुळे चक्रधरांचे व्यक्तिमत्त्व उजळून निघते.

चक्रधरांचे व्यक्तिमत्त्व

चक्रधरांच्या व्यक्तिमत्त्वाचे सरळ दोन भाग आपल्याला जाणवतात ते म्हणजे, एकांकात भेटणारे चक्रधर हे एक राजकुमार, समृद्ध जीवन जगणारे, दीर्घ आयुष्य मिळालेले व विविध प्रकारचे सांसारिक सुख उपभोगलेले, कधी तृप्त तर कधी अतृप्त असे चक्रधर दिसत असतात. पत्नीवर उत्कट प्रेम करणारे पण प्रेमालाही व्यवहाराचे रूप येताच भणंगपणे तिला सोडून देणारे असे तारुण्यसुलभ भावभावना जपणारे चक्रधर एकांकात दिसत असतात. महानुभावपंथीयांनी चक्रधरांच्या जीवनाचे (स्मृतिस्थळात १४१) दोनच भाग कल्पिले आहेत. त्यात 'उत्तरार्ध पूर्वार्ध : दोनि विभाग केले' असे म्हटले आहे. पंथीय दृष्टीने चक्रधर जीवनाच्या या दोन भागांनाच विशेष महत्त्व असणे स्वाभाविकच होते; पण या दोन्ही भागात लपलेले चक्रधरांचे आत्मचरित्र एकांकात येऊन जणू त्यांच्या आत्मपर विचारांची परिपूर्ती झाली. संख्येने अतिशय अल्प लीळा असूनही एकांक हा आस्वाद्य ठरला आहे. कारण त्याठिकाणी स्वतः चक्रधरच आपल्या

आयुष्यातील प्रभावी घटना आणि प्रसंग सांगत आहेत. चक्रधरांच्या आयुष्यातील एकाकीपणाचा हा कालखंड आहे तोही सरळ एका चाकोरीतून जाणारा नाही, तर चक्रधरांचा जन्म जसा अलौकिक ! तसाच त्यांच्या दैनंदिन जीवनाचा क्रमही अलौकिक. कमळाइसेने रागावणे, चक्रधरांनी तिची समजूत घालणे, त्यातून निर्माण होणारे गृहस्थाश्रमी जीवनाचे चित्र चक्रधरांच्या व्यक्तिमत्त्वाच्या घडणीची दिशा दाखवते. प्रपंचत्याग, रानभेरीचा मुलांमध्ये मूल होऊन खेळलेला खेळ, हंसाबाशी केलेला विवाह, चोर म्हणून स्वतःला कैद करवून घेणे लग्नघरी उभयपक्षाचे वऱ्हाडी होणे, गोपाळासमवेत दहीभात खाणे हे चक्रधर जीवनात आलेले विविध तपशील चक्रधरांचे मानवीरूप, व्यवहारातील त्यांचे वागणे आणि त्यातून व्यक्त होणारे ऋजू मनाचे चक्रधर भावनाशील असूनही सामान्यात सामान्य होणारे दिसतात. तर याच त्यांच्या व्यक्तित्वातील दुसरा विशेष म्हणजे दैवीशक्तीचा ! काळवंचना करणारे, सर्पझुंज संपविणारे, मृत माणसाला जिवंत करणारे, उन्मत्त रानमहिषाला शांत करणारे असेही चक्रधर जाणवतात ! यावरून हे व्यक्तिमन सामान्य असामान्य या सीमारेषांपलीकडे असणारे असे व्यक्तिमन आहे. चक्रधरांच्या जीवनातील विविध घटना आणि प्रसंगात भरलेली जी चमत्कृती आणि नाट्य आहे त्यामुळे तर ही व्यक्तिरेखा अधिकच समृद्धपणे जाणवू लागते. निर्भर स्थितीमुळे येणारा स्थित्यानंद व त्यामुळे येणारी आनंदाची अवस्थिती यांचे मिश्रण जसे चक्रधरांच्या कृत्युक्तीतून दिसते, तसेच ते जेथे जेथे जात तेथे तेथे लोकांचे चित्त त्यांच्या मूर्तीकडे लागे. यातून चक्रधरांच्या ठिकाणी असलेली वेधशक्ती व बोधशक्ती तर दिसतेच, पण एक प्रसन्न आनंदमय वातावरण निर्माण करण्याचे चक्रधरांचे कौशल्यही स्पष्ट होते. चक्रधरांची भूतदया आणि मानवतेतील करुणा या गुणविशेषांची ओळख पटते. स्त्रीविषयक लोकविलक्षण वर्तनही एकांकात आढळते. त्याची संगती कशी लावणार ! वास्तविक स्त्रीधर्माविषयी त्यांची स्पष्ट अशी दृष्टी होती. आउसा, साधे यांना संध्याकाळी मठात येण्यास उशीर झाला तर चक्रधर कासावीस होताना दिसतात. अशावेळी त्यांच्या शय्यापाळणप्रसंगाचा उलगडा कसा लावणार ?

स्त्रीदाक्षिण्य, ब्रह्मचर्यवृत्ती दर्शविणाऱ्या लीळा पूर्वार्ध उत्तरार्धात अनेक सापडतात. एकाचवेळी ते कुणाचे तरी शिष्य आहेत आणि अनेकांचे गुरू आहेत. त्यामुळे गुरूविषयीचा आदर आणि शिष्याविषयीचे वात्सल्य, ममत्व हे अनेक लीळांतून उफाळून आलेले आहे. अशावेळी त्यांच्या लोकविलक्षण वर्तनाच्या सत्यतेविषयी संभ्रम निर्माण होतो. तर दुसरीकडे वाटू लागते की हेच माणसाचे माणूसपण की जे मोहाला अनेकवेळा टाळते पण एखादाच क्षण असा येतो की, त्यामुळे संपूर्ण जीवनावरच त्याची घनछाया उमटून जाते. तसे चक्रधर जीवनात घडले असावे का ?

'लीळाचरित्र' एकांकातून प्रतीत होणारे चक्रधरांचे व्यक्तिमत्त्व नाट्यपूर्ण आणि मानवी स्वरूपाचे विशेषत्वाने असलेले दिसते. कौटुंबिक जिव्हाळ्याची नातीगोती तोडून टाकलेली, योग्याची अवस्था ह्या व्यक्तिमत्त्वाला आलेली दिसत नाही. तर संसाराचा समृद्धपणे आस्वाद घेतलेले; पण त्यातही अस्वस्थ असणारे चक्रधर एकांकातून दिसतात.

मुलांबरोबर खेळणारे तर कधी यात्रेला निघून जाणारे, द्युताचा छंद असणारे व त्यापायी घडलेल्या घटनांनी अन्तर्मुख होणारे चक्रधरांचे व्यक्तिमत्त्व समृद्ध होत जात असताना दिसत असते. म्हणून ते विशेषत्त्वाने मानवी वाटत असते. कारण या एकांकातील चक्रधरांची अवस्था ही साधकाची असते. पूर्णावताराची पातळी त्यातून व्यक्त होत नसते. तरीही तिची चुणूक विविध चमत्कारांतून दिसून येत असतेच.]

पूर्वार्ध–उत्तरार्धातील चक्रधर

पूर्वार्धात आलेले चक्रधरांचे जीवन हे केवळ तीन साडेतीन वर्षाचे आहे. त्यात नागांबिकेला दिलेले प्रेमदान ही महत्त्वाची घटना घडलेली असली तरी चक्रधर जे जाणवतात ते एक सिद्धावस्थेप्रत पोचलेले पूर्णपुरुष म्हणून! उत्तरार्ध पूर्वार्धातून तयार झालेला लीळाचरित्राचा एकांक असल्यामुळे अर्थातच एकांकातील लीळा एका अर्थाने सुसंगत नाहीत. कारण विविध स्वविषयक विचारलेल्या उत्सुकतापूर्ण प्रश्नांना उत्तर देण्याच्या संदर्भात चक्रधर एकांकात बोलके झालेले आहेत. उलटपक्षी पूर्वार्धात पंथप्रचाराला विशेष महत्त्व देऊन चक्रधरांनी परिभ्रमणाचा वेग वाढविलेला दिसतो. एकांकातील चक्रधर स्वतःचे जीवन स्वत साठी जगणारे असे दिसतात. पूर्वार्धात व उत्तरार्धात परिस्थिती बदललेली आहे. चक्रधरांचे आयुष्य स्वतःपुरते मर्यादित राहिलेले नाही तर त्यावर शिष्यांचाही अधिकार निर्माण झालेला दिसतो. एकतर चक्रधरांनी विधिपूर्वक घेतलेला संन्यास आणि पंथप्रचार व पंथप्रसार यांचा सुरू केलेला उपक्रम व त्यासंदर्भातील पहिली सुरुवात म्हणजे नागांबिकेला दिलेले प्रेमदान. या सर्व चक्रधर जीवनात निर्माण झालेल्या घटना फार बोलक्या आहेत. पूर्वार्ध ते उत्तरार्ध या पूर्ण आठ वर्षाच्या काळात चक्रधरांनी जे ध्येय म्हणून काम स्वीकारले त्याची परिपूर्ती चढत्या क्रमाने निर्माण करून हजारो लोक आपल्या पंथात समाविष्ट करून घेतले. अत्यंत गतिशील जीवनाचा आणि परिभ्रमणाचा आलेख पूर्वार्धउत्तरार्धातून मिळत असला तरी एका विशिष्ट दिशेने जाण्याचा मार्ग निश्चित झाल्यामुळे आपोआपच एकांकातून जाणवणारे चक्रधरांचे जिवंत, अभिनव, नाट्यपूर्ण आणि विविध अनुभवग्रहण करणारे संवेदनशीलत्व असलेले व्यक्तिमत्त्व नाही म्हटले तरी एका पंथसंस्थापकाच्या जाणिवेने रंगले गेले. एखाद्या पंथप्रचारकाची भूमिका स्वीकारताच ज्या ज्या मर्यादा व्यक्तित्वाला पडणे सहज शक्य आहेत त्या त्या सर्व मर्यादा चक्रधरांच्या व्यक्तिमत्त्वाला पडलेल्या दिसू लागतात व हे व्यक्तिमत्त्व एकांतिक, एकसूरी व प्रचारकी दृष्टिकोण स्वीकारलेले व्यक्तिमन जाणवू लागते आणि त्यातही मी म्हणजेच ईश्वर ही तत्त्वज्ञानाची भूमिका प्रस्तुत केल्यामुळे आपोआपच ईश्वर आणि भक्त यांचें नाते जाणवू लागले. एकप्रकारचे एकांकातील चक्रधर आणि पूर्वार्ध–उत्तरार्धातील चक्रधर यांमध्येच दूरान्वय निर्माण झाला. चक्रधरांची विनोदवृत्ती, शिष्यप्रेम, गुरुभक्ती, शिस्तप्रियता, करुणामय अंतःकरण, स्त्रीदाक्षिण्य, ह्या विविध व्यक्तिविशेष गुणांचा आढळ जरी चक्रधरांच्या व्यक्तिरेखेतून दिसून येत असला तरी त्यांच्या व्यक्तिरेखेवर पडलेली ईश्वरीपणाची बेडी

त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वावर आघात करणारी ठरली. म्हणूनच एकांकातून चक्रधरांच्या जीवनाचे विलक्षण नाट्यपूर्ण चढउतार, त्यांच्या जीवनात निर्माण झालेल्या विविध समस्या, संपूर्ण आयुष्यच उस्कटून टाकणाऱ्या आणि श्रद्धांना तिलांजली देणाऱ्या घटनांचा चक्रधर या व्यक्तिमनावर झालेला संस्कार व त्यातून जणू लकाकून निघणारे चक्रधरांचे व्यक्तिमत्त्व पूर्वार्ध-उत्तरार्धामध्ये एका विशिष्ट पद्धतीने बंदिस्त झालेले आहे. लहान मुलांमध्ये मूल होणारे चक्रधर किंवा रानभेरीचा खेळ खेळणारे, दहीकाला खाणारे चक्रधरांचे व्यक्तिमत्त्व पूर्वार्ध उत्तरार्धात दिसत नाही. एक विलक्षण गती त्यांच्या प्रचाराला आणि भ्रमणाला आलेली दिसते व महानुभावपंथ विचाराने व मीच ईश्वर या कल्पनेने झपाटलेले चक्रधर पूर्वार्धउत्तरार्धात दिसू लागतात. त्यातूनच त्यांच्या प्रत्येक कृति-उक्तीला एक विशिष्ट संकेत मिळू लागतो. विशिष्ट अन्वयार्थ लावला जातो. चक्रधरांच्या सौंदर्यमूर्तीला एक वेगळे परिमाण दिले जाते. वस्तुतः चक्रधरांच्या ठिकाणचा गौरवर्ण सुदृढ देहयष्टी या एखाद्या राजकुमाराला शोभाऱ्या तशाच होत्या. पण पूर्वार्ध-उत्तरार्धामध्ये चक्रधरांनीच आपण ईश्वर आहोत असे जणू जाहीर केल्यामुळे त्यांच्या सौंदर्याचा उगम ईश्वरी अवतारात शोधण्याचा प्रयत्न भक्तजन करू लागले. पूर्वार्धात आणि उत्तरार्धात चक्रधर स्वतःविषयी फार कमी बोलताना दिसतात. याही वस्तुस्थितीला काही अर्थ आहे. वेधशक्ती आणि बोधशक्तीची किमया पूर्वार्ध उत्तरार्धात विशेष प्रभावी ठरली गेली, यावरून चक्रधरांनी संन्यास स्वीकारल्यानंतर त्यांच्या व्यक्तिमत्त्वात घडलेले जे बदल आहेत ते उत्स्फूर्त आणि अंगभूत बदल आहेत असे जाणवते का? हा एक प्रश्न पडतो आणि दुसरा प्रश्न पडतो, ज्या एकांकातून चक्रधर हे अतिशय मानवीय वाटत असतात, भावनाशील वाटत असतात, कोमल अंतःकरणाचे दिसत असतात तेच चक्रधर एका विशिष्ट संप्रदायाच्या निर्मितीसाठी अहोरात्र मेहनत घेत असता आपल्या भावभावना दडपून टाकीत असतात का? हाही विचार करावा लागतो. उत्तरार्ध-पूर्वार्धात चक्रधरांच्या स्वभावात आलेला कठोरपणा, करडेपणा, शिस्तीचा अतिरेक हाही त्यांच्या पूर्वायुष्याशी विसंगतच वाटत नाही काय? असे विविध प्रश्न चक्रधरांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा शोध घेताना जाणवू लागतात व एका मर्यादित अवस्थेत स्वतःचा जीवनक्रम निश्चित केल्यामुळे निर्झरासारखे खळखळणारे चक्रधरांचे एकांकातील व्यक्तिमत्त्व पूर्वार्ध-उत्तरार्धात जडशीळ झालेले दिसते. अर्थात एकांक–पूर्वार्ध–उत्तरार्ध यांतील चक्रधरांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व म्हणजे एका सरळ रेषेत जीवन जगणाऱ्या माणसाचे विकसनशील व्यक्तिमत्त्व नव्हे, तर एकांकात एका जीवनधारेची प्रवाही, गतिशील, तारुण्यसुलभ अशी व्यक्तिरूप अवस्था चक्रधरांच्या रूपाने जाणवत असते; तर पूर्वार्ध-उत्तरार्धामध्ये त्याच जीवनधारणेला आचारांचे आणि विचारांचे घाट बांधल्यामुळे संथ, एकसुरी, गंभीर अशी अवस्था चक्रधरांच्या व्यक्तिमत्त्वात जाणवत असते. एक सत्पुरुष, एक सिद्धयोगी, एक जीवोद्धारण हेच ध्येय स्वीकारणारा विचारवंत ही पूर्वार्ध-उत्तरार्धातील चक्रधरांची उपस्थिती आहे

तर एकांकात माणसातील माणूसपण जागवणारा आणि जतन करणारा माणूस ही एकांकातील चक्रधरांची उपस्थिती आहे.

'लीळाचरित्र' म्हणजे महानुभाव पंथीयांचे 'गुरूचरित्र' असले तरी त्यामधून महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय आणि धार्मिक परिस्थितीचा पडताळा वाचकाला येत असतो. वास्तविक चक्रधरांच्या आठवणी या 'डोळ्यांनी बघितलेल्या,' 'कानांनी ऐकलेल्या' आणि 'स्मृतींनी जपलेल्या' अशा आहेत, एक प्रकारचे ते आठवणीचे संकलन म्हणून जरी लीळाचरित्राला आपण लक्षात घेत असलो तरी त्यातून व्यक्त होणारी चक्रधरांची जीवनोत्सुकता व लौकिक अलौकिकाच्या सीमारेषांवरील आयुष्यक्रम त्यांच्या देहसौंदर्यासह लीळाचरित्रातून व्यक्त झाला आहे. ज्ञानेश्वरांचे चरित्र लिहिण्याचा प्रयत्न झाला; पण त्यामधून ज्ञानेश्वर ही व्यक्ती कशी होती याविषयी आजही आपल्याला निश्चित विधाने करता येत नाहीत. चक्रधरांविषयी जे अनेक जण आठवणी देतात, त्यातून एक सुसंगत पारदर्शक आणि पूर्ण चरित्र, आत्मचरित्र, दैनंदिनी आणि वृत्तकथा म्हाइंभट्टाने नागदेवांच्या समोर मांडून लीळाचरित्राची बांधणी केली. त्यामुळे या ग्रंथाला बोलीभाषेचे सौंदर्य तर प्राप्त झालेच; पण चक्रधर या एकाच सूत्राने संपूर्ण आशयबंध बांधला गेला असल्यामुळे त्यात नैमित्तिकता न येता एक सुसंघटित रूप लीळाचरित्राला येऊन गेले.

'लीळाचरित्र' म्हणजे एका स्वतंत्रवृत्तीच्या आणि स्वतंत्र विचारवाणा असलेल्या माणसाचे चरित्रचित्रण होय. परंपरेला न स्वीकारता एक स्वतंत्र जीवनधारेचा मार्ग चक्रधरांनी अनुसरला व आपल्याबरोबर हजारोंना ते घेऊन गेले. विचारांचा नवेपणा आणि आचारांचा नवेपणा त्यांच्या पुरोगामी दृष्टिकोणातून वाचकांच्या प्रत्ययाला येतो. म्हणूनच 'लीळाचरित्र' म्हणजे चक्रधरांची 'वाङ्मयमूर्ती' होय. चक्रधरांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध परिवर्तने 'लीळाचरित्रा'तील 'लीळां'मधून दिसतात.

चक्रधर परिवारातील स्त्री-सृष्टी

महानुभाव तत्त्वज्ञानाने कृष्णावतारांची पाच ही संख्या निश्चित केली असली तरी त्यात सर्वाधिक महत्त्व मिळाले ते चक्रधर स्वामींना. कृष्णावतार, दत्तावतार, चांगदेवावतार, गुंडमराऊळावतार आणि चक्रधरावतार अशी पंचकृष्णांची संकल्पना सिद्ध झाली. पैकी कृष्णावतार आणि दत्तावतार द्वापर त्रेतायुगातील असून चांगदेव, गुंडमराऊळ आणि चक्रधर हे अवतार पहिल्या दोन अवतारांनंतरचे आहेत. त्यातही चांगदेवांचा आत्मा हरिपाळाच्या शरीरात वास करीत असल्यामुळे शरीर हरिपाळदेवाचे व आत्मा चांगदेव राऊळांचा अशी किमया चक्रधर अवतारात घडून आली आणि गुंडमराऊळ हे चक्रधरांचे गुरू व चांगदेवराऊळ गुंडमराऊळांचे गुरू यावरून चक्रधर व गुंडमराऊळ यांचे लोकविलक्षण नातेसंबंध लक्षात येतो. कलियुगात उभय दृश्यावतारी व जीवोद्धरणाचे व्यसन

स्वीकारलेले सर्वश्रेष्ठ ईश्वरी अवतार आपणच आहोत याची सार्थ जाणीव चक्रधरांनी नेहमीच प्रकर्षाने स्वीकारली. त्यामुळे चक्रधरांनी जीव आणि ईश्वर यांचे परस्पर नातेसंबंध आणि सृष्टिव्यापारात जीवाचे स्थान व त्याचा परस्पर संबंध या संदर्भातील तत्त्वविचार महानुभाव पंथाच्या विचारावर आणि आचारावर फार खोलवर पडला होता.

चक्रधरांनी निरूपित केलेल्या तत्त्वज्ञानाचे प्रतिबिंब महानुभावांच्या कवितेतून, गद्यातून, भाष्यग्रंथातून, व्याकरणग्रंथातून व्यक्त झाले. अनेक भक्त त्यांना येऊन मिळाले. त्यात पढिक पंडितांचा फार मोठा वर्ग होता आणि त्यांच्याबरोबर स्त्रियाही होत्या. ज्या काळात स्त्री-शूद्रांना सर्वच हक्क नाकारले गेले होते, त्या काळात म्हणजे जवळ जवळ १२ शतकाच्या उत्तरार्धात ही घटना घडते. चक्रधरांचे विचार हे त्यांच्या डोळस जाणिवेतून स्फुरलेले विचार होते. त्यांना जाणवलेले जीवनसत्य आणि जीवनाची अनुभूती यांचे लख्ख प्रतिबिंब लीळाचरित्राचा एकांक, पूर्वार्ध-उत्तरार्ध यात पडलेले आहे. तो ग्रंथ म्हणजे चक्रधरांच्या जीवनदृष्टीचे वाङ्मयात पडलेले जणू प्रतिबिंब ठरते. चक्रधरांचा अवतार म्हणजे सगुण ईश्वराचा अवतार! मी म्हणजेच परमेश्वर ही त्यांची धारणा! आणि चक्रधरांचे व्यक्तिमत्त्वही अतिशय आकर्षित करणारे, त्यामुळे विद्वानांचा वर्ग, स्त्रियांचा वर्ग, सामान्याचा वर्ग त्यांचेकडे ओढला गेला आणि त्यांचे विचार व आचार आपल्या कृति-उक्तीतून मिरविण्यात भक्तगणांना धन्यता वाटू लागली. वास्तविक महानुभावांचा आचारधर्म लोकरीतीपेक्षा अतिशय भिन्न आणि जगराहाटीपेक्षा अतिशय विलक्षण असूनही बहुजन समाज, पंडितांचा समुदाय आणि विशेषतः स्त्रियांचा वर्ग त्यांचेकडे ओढला गेला. अर्थात ही घटना ज्ञानेश्वर उदयापूर्वीची आहे. ज्ञानेश्वरांनी केलेला तत्त्वविचार परंपरेला अनुसरून पृथगात्म होणारा ठरला तर चक्रधरांनी बहुजन समाजाला समजाऊन घेण्यासाठी, त्यांची नैतिक आणि बौद्धिक पातळी समजावून घेण्यासाठी गावोगाव, खेडोपाडी परिभ्रमण केले. त्यातून त्यांना जाणवलेले जे जीवन सत्य होते ते कधी भाव पातळीवरून तर कधी विचार पातळीवरून अभिव्यक्त झाले, म्हणून चक्रधरोक्तीला उस्फूर्तता आली. समाजाशी आणि विशेषतः ग्रामीण जीवनाशी संवाद साधण्याचा तो प्रयत्न होता. म्हणूनच चक्रधरांचे विचार आधुनिक पुरोगामी स्वरूपाचे ठरले.

अहिंसा, स्त्री–पुरुष समानता आणि सामंजस्य आसक्तिविरहित जीवन जगण्यातील उदारता, 'आहे ते विसरा' मधून भूतकाळापेक्षा वर्तमानावर आणि भविष्यावर रोखलेली त्यांची नजर आणि 'ज्ञानापसि प्रेम उत्तम' असे म्हणत असता मानवतावादाचा आणि बंधुभावाचा त्यांनी केलेला पुरस्कार हा विचार तर त्या पढिक काळाला नवा होताच, परंतु समाजजीवनाला उभारी आणणारा ठरला. जीवोद्धारणातून समाजोद्धारणाचा अभिनव प्रयोग चक्रधरांनी आपल्या परिभ्रमणातून पुरस्कारिला. चक्रधर विचारांतील नवीनता, द्रष्टेपणा आणि दीर्घानुभवांची त्यांच्या विचारांना मिळालेली अंगकांती यामुळे समाजातील अनेक घटक त्यांचे अनुयायी बनले. इतकेच नव्हे, महानुभवांच्या आख्यान कवितेतील कृष्णमूर्ति-वर्णन आणि चक्रधरमूर्तिवर्णन यात एकरूपता येत गेली. चक्रधर निर्वाणानंतर त्यांचे

विचार आणि आचार यांचा प्रचार आणि प्रसार करणे हेच जीवनध्येय स्वीकारून पुढे अनेक शतके महानुभावांनी वाङ्मयनिर्मिती केली. चक्रधरनिष्ठा हीच पुढच्या काळातील महानुभाव भक्तांची जीवननिष्ठा बनली.

चक्रधरांची जीवनदृष्टी सर्व समावेशक होती. चक्रधरांनी गुजरातेतून येऊन महाराष्ट्राला आपली कर्मभूमी मानली आणि मराठी भाषेला धर्मभाषा बनविली. बहुजन समाज आदराने आणि कौतुकाने त्यांचेकडे आकर्षिला गेला. आपलीच भाषा बोलणारा लोकोत्तर महापुरुष म्हणून जनता चक्रधरांकडे बघू लागली. मराठी भाषेचे पावित्र्य सांभाळले पाहिजे याची शिकवण त्यांनी भक्तांना दिली आणि जातिभेदांची आणि वर्णधर्माची चौकट मोडण्याचा प्रयत्नही आपल्या कृतिउक्तीतून चक्रधरांनी केला. या साऱ्या घटितांचा परिणाम समाजाच्या खालच्या तळापर्यंत पोहचला. नव्या जीवनाची, नव्या भविष्याची आशावादी उभारी सर्वसामान्याला झाली. स्त्री-शुद्रांना तर मायमाऊलीच मिळाली.

अलीकडेच डॉ. कोलते यांनी समग्र लीळाचरित्राची मूलगामी अशी बांधणी केली आहे. त्यातून चक्रधर ही व्यक्ती, तिचा आचारधर्म, विचारधर्म, भ्रमणगाथा, भक्तगण, समकालीन सांस्कृतिक जीवन, भौगोलिक, राजकीय, सामाजिक परिस्थिती, भाषाव्यवहार, म्हणी, वाक्प्रचार, अलंकार, व्यापार उदिम, राज्यकर्ते, सार्वत्रिक जीवनमान, उद्योगधंदे, धार्मिक आचारविचार, रुढीबंधने इत्यादींचा एक समग्र महाकाय असा 'महापट' उलगडत जातो. एका अर्थाने लीळाचरित्र म्हणजे महाराष्ट्रीय सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय आणि सामाजिक जीवनाचा 'दर्पणग्रंथ' आहे. प्रस्तुत चक्रधर स्वामींचा स्त्रीविषयक दृष्टीकोण 'लीळाचरित्रा'च्या आधारे तपासून घ्यावयाचा आहे. चक्रधरांची भूतमात्रांवर निर्विशेष प्रेम करण्याकडे प्रवृत्ती होतीच, पण त्यातही स्त्रियांना त्यांनी विशेष सन्मानपूर्वक मानले का? तिच्या आशाआकांक्षा न्याहाळल्या का? चक्रधरांना दिसलेली स्त्री कशी होती? व स्त्रियांचे चक्रधरांविषयीचे मत काय होते? इत्यादि प्रश्नांच्या साह्याने उलगडा करून घ्यावयाचा आहे.

चक्रधर विवाह

चक्रधरांनी अवतार स्वीकार केला त्यावेळेपासून पुढे आठ वर्षे महानुभाव पंथाला आणि विचारवर्धनाला बळकटी आणण्यासाठी त्यांनी जे प्रयत्न केले एथपर्यंत आणि पुढे महानिर्वाणापर्यंतचा काळ अलौकिक महत्त्वाचा तो काळ आहे. हा काळ पूर्वार्ध व उत्तरार्धातून गोचर होतो, तर एकांकात मात्र अवतार स्वीकारापूर्वीची समग्र पार्श्वभूमी व चक्रधरांच्या लौकिक जीवनाचा कालपट उलगडत जातो. माल्हाइसा ही हरिपाळदेवाची आई आणि कमळाईसा ही त्यांची पत्नी, या दोन स्त्रिया राजस्त्रिया होत्या आणि हरिपाळदेव हा राजपुत्र होता. त्याला द्यूताचे व्यसन होते. एकदा द्युतात फार मोठी हार खावी लागली असता गोपाळकृष्णाची शपथ घेऊनही प्रियपत्नी कमलाइसेने आपले दागिने दिले नाहीत. इतकेच नव्हे, तर या दागिन्यांवर तुमचा हक्क नाही; कारण ते माझे वडिलाकडून विवाहप्रसंगी

मिळालेले स्त्रीधन आहे व मी ते दागिने दिले तर मलाही गोपाळकृष्णाची शपथ आहे असे म्हटले. चक्रधर जीवनातल्या विलक्षण नाट्यपूर्ण प्रसंगात कमलाईसेचा व्यावहारिक दृष्टिकोण स्पष्ट होतोच पण चक्रधरांची ऐहिकावरील उदासीनवृत्ती निर्माण होण्यास हाच मतभेदाचा प्रसंग कारणीभूत ठरतो. आपल्या प्रेमापेक्षा आपल्या प्रियपत्नीला आपले दागिने महत्त्वाचे वाटावे या वृत्तीचा, अहंकाराचा, अभिमानाचा तिटकारा निर्माण होऊन, रामटेक येथे रामयात्रेला चक्रधर गेले ते पुनः परत आलेच नाहीत आणि त्यांचे मन प्रवृत्तीकडून निवृत्तीकडे वळले ते महाप्रयाणापर्यंत. ऐहिकातून आलेल्या अनुभवातून चक्रधर पारमार्थिक अनुभवाकडे वळले. त्यासाठी वरील प्रसंग कारण ठरला. रामयात्रेसाठी निघालेल्या चक्रधरांना गोविंदप्रभूंनी प्रसाद देऊन ज्ञानशक्ती स्वीकारण्यास दिली. हरिपाळदेवाचे चक्रधर झाले. शक्तिस्वीकारानंतर एक तप सालबर्डीच्या डोंगरात तपाचरण करीत असता मुक्ताबाईने त्यांची मनोभावे सेवा केली. एका स्त्रीच्या हट्टामुळे घराबाहेर पडलेल्या चक्रधरांना दुसऱ्या स्त्रीनेच आधार दिला होता आणि तो म्हणजे मुक्ताबाईनी. एकाकी भ्रमणात हेडाऊची कन्या हिचेबरोबर चक्रधरांनी लग्न केले. पण त्यातूनही निवृत्तीने त्यांना झपाटून पुनः ते निघून गेले. हा चक्रधरांचा दुसरा विवाह अल्पकालीन ठरला. पुढे अळजापूरच्या राजघराण्यातल्या कन्येचा विवाह चक्रधरांशी झाला. पैठण येथे नागांबिका ऊर्फ बाईसा चक्रधरांना अनुसरली आणि चक्रधर यांची एकाकी अवस्था संपली. चक्रधरांनी संन्यास घेतला. पैठणात बाइसाने चक्रधरांचा सांभाळ केला. सेवाभावाने आणि श्रद्धेने. संन्यासदीक्षा स्वीकारल्यावर परमार्थाकडे चक्रधर वळले. चक्रधर जीवनात कमळाइसा आणि नागांबा या दोन स्त्रियांचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण ठरते. कमळाईसेच्या सान्निध्यातच प्रपंचातून परमार्थाकडे चक्रधार वळले आणि नागांबिकेच्या साक्षीने परमार्थाचा शेवट संन्यास ग्रहणात झाला. चक्रधरांच्या व्यक्तिमत्व परिवर्तनात या दोन्ही स्त्रियांचा फार मोठा वाटा आहे.

चक्रधर शिष्या

बोणेबाईच्या आग्रहावरून चक्रधर मेहकरला अनेक दिवस थांबले आणि सिंहस्थ पर्वणीसाठी बोणेबाईला त्र्यंबकेश्वरीच्या वाटेला लाऊन पैठणला गेले. व बाईसा त्यांची अनन्यभावे सेवा करू लागली. चक्रधरांचा शिष्यपरिवार वाढीस लागला. पैठणला दीक्षा स्वीकारल्यानंतर जीवोद्धरणासाठी महाराष्ट्रात अखंड परिभ्रमण करण्यासाठी चक्रधरस्वामी निघाले, अधिकारी व्यक्तींना ज्ञानदान आणि प्रेमदान त्यांनी दिले त्यात महदंबा आणि नागाइसासारख्या स्त्रिया होत्या. चक्रधरांना गुरू म्हणून त्यांनी मानले होते. विलक्षण भक्ती आणि श्रद्धा त्यांच्याजवळ होती. चक्रधरांच्या खोट्या मृत्यूची वार्ता ऐकून बाइसेने आत्महत्या केली इतक्या त्या संवेदनशील व सश्रद्ध होत्या. नागदेवाचार्यांची आई आबाइसा आणि चुलत बहीण महदाइसा यांनी स्वामीची दीक्षा घेतली. चक्रधरांचे व त्यांचे संबंध अतिशय जिव्हाळ्याचे होते. आबाइसा रंगमालिका काढीत असे व चौपद्या गात असे.

चक्रधरांनी उमाइसेला ' निरयनिरूपण ' आणि आबाइसाला ' अनंत निरूपण ' केले होते त्यांचा अधिकार व बौद्धिकता चक्रधरांना निश्चितच जाणवली होती.

महदाइसेवर चक्रधरांची विशेष कृपा होती. महदाइसाही प्रेमदृष्टीने चक्रधरांकडे आकर्षित झाली होती. दादोसाच्या सांगण्यावरून तिने काशीला जाऊ नये असे चक्रधरांना वाटत होते; पण तसे त्यांनी बोलून दाखविले नाही. नंतर महदंबेलाच पश्चाताप झाला. तिची विरक्ती आणि जिज्ञासूपणा यांचा गाढ प्रभाव चक्रधरांवर पडला होता. ब्रह्मानुभूती कलिधर्म, संन्यास इत्यादि संकल्पनांची चर्चा चक्रधर महदाइसेबरोबर करीत असत. बौद्धिक परिमाणात स्त्री-पुरुष भेद चक्रधरांनी पाळला नाही हाच त्याचा अर्थ. अतिशय विश्वासाने त्यांनी महदाइसेला निरूपण केलेले आहे. महदाइसेच्या जिज्ञासेनेच चक्रधरांचे पूर्वायुष्य आज उपलब्ध झाले आहे. इतकी परस्परांची जवळिक निर्माण झाल्याचे यावरून स्पष्ट होते. चक्रधरांबरोबर धर्मचर्चा करणारी म्हातारी " जिज्ञासकःचर्चकः एथ काही पुसतच असे, " असे उद्‌गार चक्रधर काढतात. चक्रधर निर्वाणाचे दुःख पचवून महदाइसेनेच नागदेवाचार्याला सांभाळले होते.

इल्हाइसा ऊर्फ साधे ही भोळीभाबडी स्त्री चक्रधरांच्या सानिध्यात येताच तिचे हर-प्रकारे त्यांनी सांत्वन केले. आईच्या ममतेने तिचा सांभाळ केला. तिने एकदा सामान्य फुलांच्या साह्याने चक्रधरांची पूजा करताच स्वामींनी "साधेहो देवो सुवर्णफुलो पूजिजताए?" असे उद्‌गार काढून 'भाव अपूर्व की' असा तिच्या श्रद्धेचा गौरव केला. गोसावी इश्वरू, श्रीप्रभु आत्मप्रकाशः राम तो आमचा सोयरा, असे तिचे उद्‌गार ऐकून चक्रधर चकित होत असत. एकदा तिला काही माग म्हणताच तिने पुनःसंबंध मागून स्वतःची आध्यात्मिक पातळी दाखवून दिली.

चांभाराच्या जोडप्याला दर्शनस्थिती, तेल्याच्या जोडप्याला दर्शनस्थिती, मासोपवासिनीला विडाप्रसादामुळे आलेली स्थिती, काऊळगावच्या माळिणीचा जिभेचा रोग चक्रधरांच्या सान्निधाने निवळला. उमाइसेचा पोटशूळ चक्रधरांनी केवळ कृपाप्रसादाने कमी केला, रात्रीचे वेळी स्त्रियांनी एकटे फिरू नये म्हणून चक्रधरांनी रामदेवाला दिलेली समज या विविध घटनांवरून चक्रधरांचा स्त्रीविषयक दृष्टिकोण स्पष्ट होतो. एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे, महदाइसा आणि नागाइसा या दोन स्त्रिया चक्रधर जीवनात अखेरपर्यंत सोबत करीत होत्या. त्यांना नित्यानंद मिळून त्या समाधानी झाल्या होत्या. स्त्री-पुरुष भेद असा चक्रधरांनी कधी मानला नव्हता. अतिशय जिव्हाळ्याने व आपलेपणाने व बरोबरीच्या नात्याने सर्व भक्तांना ते वागवीत असत. इतकेच नव्हे तर नागाइसा आणि महदाइसा यांचेबरोबर ते धर्मचर्चाही करीत असत. एका स्त्रीच्या व्यावहारिक बुद्धीमुळे संसार ऊस कटून घर सोडणारे चक्रधर स्त्रीद्वेष्टे कधीच नव्हते. किंबहुना लोकोत्तर व्यक्ती स्त्री-पुरूष असा भेद करून शिकवण देत नसतात. त्यांच्यासमोर असतो तो केवळ त्यांचा कृपा-प्रसाद मिळविणारा भक्त! एकांकाच्या काळात विवाहबंधनात रमलेले चक्रधर विमुक्त होतात व बहुजन समाजाशी आपले नाते जोडून टाकतात. यातच त्यांच्या उदार दृष्टीचा

आढळ होतो. महदाइसेशी चक्रधरांनी केलेली धर्मचर्चा, नागांबिकेची मठातील शिस्त, साधेची श्रद्धा, बोगेबाईचा आग्रहीपणा, चक्रधर स्वामी अतिशय ममत्वाने स्वीकारतात आणि त्यांच्या शंकांचे निरसनही करतात. एका आत्मप्रतिष्ठेच्या तेजाने तत्कालीन स्त्रीवर्ग उजळून निघाला असेल! आज व्यक्तिस्वातंत्र्याच्या आणि समानतेच्या युगातही जे स्थान स्त्रीला सुशिक्षित असूनही मिळू शकत नाही किंवा तिला महान् प्रयासाने ते मिळवावे लागते. ह्या संदर्भात १२ व्या शतकात मात्र एका धर्मपुरुषाने आणि द्रष्ट्याने स्त्रीची योग्यता अचून हेरली होती. तिची मनोभूमिका समजावून घेतली होती. तिच्या सामर्थ्याची, प्रचीतीची जाणीव त्यांना झालेली होती. स्त्रीची अवहेलना, त्यांच्यासारख्या मातेचे अंतःकरण असलेल्या माहात्म्यांकडून होणेच शक्य नव्हते. एका आत्मसन्मानाने आणि आत्मविकासाच्या बळावर स्त्री जगू शकते व तीही तर्कवादात किंवा धर्म चर्चेत कमी पडत नाही हे विविध उदाहरणांनी सिद्ध करता येईल. असे चक्रधर परिवारातील स्त्रियांच्या उद्‌गारातून दिसून येते.

वास्तविक तत्कालीन वातावरण धर्मबंधनांनी बांधलेले व चातुर्वर्ण्याचा पुरस्कार करणारे आणि कडवट निष्ठांना स्वीकारणारे होते. संस्कृत परंपरेचा व वेद परंपरेचा पगडा विलक्षण होता. अशा वातावरणात स्त्रीला धर्मचर्चा, ज्ञानचर्चा, तत्त्वचर्चा करण्यास संधी देणे हीच गोष्ट अतिशय नवी होती. स्त्रीच्या ठिकाणच्या सुप्तगुणांना चक्रधर सान्निध्यात अधिक अवसर मिळाला, ती अधिक मोकळेपणाने जगू शकली. दामोदर पत्नीने पंडितांना सडेतोडपणाने केलेला 'जिये चुलीची खिर खादली' हा सवाल तिच्या ठिकाणचे आत्मबल वृद्धिंगत झाल्याचाच पुरावा ठरतो. स्त्रीविषयी सामंजस्याची भूमिका चक्रधर या धर्मगुरूनेच स्वीकारल्यामुळे आपोआपच भक्तगणांच्या मनामध्येही योग्य ते परिवर्तन घडून येणे स्वाभाविक ठरले. स्त्रीला संरक्षण देणे, तिच्या वात्सल्याचा आदर करणे आणि तिची आकलन शक्ती समजाऊन घेणे या दृष्टीने त्या काळात चक्रधरांनी फार मोठा उदार दृष्टिकोणाचा आदर्श साक्षात केला. तिच्या गुणांची कदर केली आणि कौतुकमिश्रित भावनेने तिला सतत प्रोत्साहनच दिले. यावरून चक्रधरस्वामींचा स्त्रीविषयक दृष्टिकोण स्पष्ट होतो. लीळाचरित्रातील व्यक्तिदर्शनातून आणि विचारसूत्रांतून चक्रधरांचा स्त्रीविषयक दृष्टिकोण समजाऊन घेतला आता दृष्टान्तपाठाचे स्वरूप बघूया.

ललित आणि ललितेवर गद्यग्रंथ

मराठी गद्यवाङ्मयाच्या आद्य निर्मितिग्रंथांपैकी 'दृष्टान्तपाठ' हा एक ललित आणि ललितेवर असा गद्यग्रंथ. वस्तुतः या गद्यग्रंथाची मूळ निर्मिती ही लीळाचरित्रांतून झाली. तीही मौखिक पद्धतीने! खालसेयाच्या धाडीपूर्वी जी लीळाचरित्राची प्रत मराठी भाषेत होती, तिच्यावरून आज उपलब्ध असलेल्या संपादित प्रती तयार झालेल्या नाहीत, तर विविध पिढीपाठांकडून तयार झालेल्या ज्या लीळाचरित्राच्या प्रती आहेत, त्यावरून तयार झालेल्या आहेत. म्हणूनच त्या प्रतीत मूळ दृष्टान्त न देता, 'माळेकराचा दृष्टान्त कथियेला,'

'हस्तीचा दृष्टान्त कथियेला,' असे म्हटलेले असते, असे आज संपादित असलेल्या प्रतींवरून दिसते. चक्रधरांनी योजिलेले एखादे सूत्र व त्या सूत्राच्या संदर्भात आलेला दृष्टान्त वास्तविक लीळाचरित्रात येणे आवश्यक होते. पण तसे झाले नाही. कारण मधल्या काळातच केसोबासांनी दृष्टान्तपाठाची संकलित अशी अभ्यासपूर्ण निर्मिती केली. वास्तविक प्रत्येक सूत्र व त्यावरील लौकिक दृष्टान्त संपूर्ण लीळाचरित्रात एकएकदाच आला आहे, असेही नाही. विविध सूत्रे आणि एखादा दृष्टांत किंवा एखादे सूत्र आणि अनेक दृष्टांत, असेही झालेले आपल्याला दिसून येते. परंतु केसोबासांनी जो 'दृष्टांतपाठ' तयार केला त्याची मूळ सूत्र, त्यावरील दृष्टांत आणि त्यासाठी त्यांनी तयार केलेले दार्ष्टान्तिक, या पद्धतीची तीन पदरी घडण झालेली आहे. कारण चक्रधरांच्या सूत्राचे स्वरूप हे तात्त्विक आणि शास्त्रीय स्वरूपाचे आहे, तर त्या सूत्राच्या विशदीकरणासाठी आलेला जो दृष्टांत असतो त्याचे स्वरूप हे लौकिक, व्यावहारिक, भौतिक जीवनदर्शनार्थक बनलेले असते आणि केसोबासांनी सूत्र आणि दृष्टांत या दोघांचेही स्पष्टीकरण करता येणे शक्य होईल अशापद्धतीने तात्त्विक आणि अर्थमूलक अशा दोन्ही पद्धतींनी संदर्भपूर्ण स्पष्टीकरण केलेले दिसते. म्हणून मला असे वाटते की, दृष्टांतपाठाला न्याहाळताना जितकी चक्रधर ही व्यक्ती आणि त्यांचे तात्त्विक विचार आपल्याला जाणवत असतात, तितकेच केसोबास ही व्यक्ती आणि त्यांनी चक्रधरोक्त उक्तीचा लावलेला अन्वयार्थ, यांचाही संदर्भ जाणवत असतो.

लीळाचरित्रासारखेच दृष्टान्तपाठाचे महत्त्व दोन कारणांनी विशेष आहे. एक म्हणजे रसरशित प्रभावी गद्यशैलीचा सूत्ररूप आविष्कार दृष्टान्तपाठात झाला आहे; आणि दुसरे म्हणजे जीवोद्धारणाचे तत्त्वनिरूपण ज्या कथात्म पद्धतीने आणि विपुल वास्तव चित्रणातून चक्रधरांनी केले आहे, त्यातून एक कथाकार म्हणून गोचर होत असलेले चक्रधर आपल्याला न्याहाळता येतात. सर्वच महानुभाव गद्यातून सामाजिक संदर्भाचा तपशील मिळत असतोच ! तसाच तो दृष्टान्तपाठातूनही मिळतो. पण तेच केवळ त्याचे सारसर्वस्व नव्हे, तर त्यामागे असलेला वैचारिक व्यावहारिक असा चक्रधरांचा दृष्टिकोण आणि तो अधिक स्पष्ट करण्यासाठी केसोबासांनी मांडलेला स्वतःचा तर्कशुद्ध असा शास्त्रीय दृष्टिकोण व्यक्त झालेला दिसतो. त्याच्या साहाय्याने दृष्टान्तपाठाचे सौंदर्य न्याहाळता येईल.

दृष्टान्तपाठाची रचना

दृष्टान्तपाठात विचार प्रगटीकरणाची किमया तीन पातळीवरून झाली आहे. एक म्हणजे चक्रधर अतिशय सघन, अर्थपूर्ण आणि अल्पाक्षरी सूत्रातून आपला तात्त्विक आशय प्रगट करीत असतात. ही एका पातळीवरून चक्रधर या व्यक्तिमनाने केलेली जीवन-चिंतनाची तात्त्विक बाजू झाली. दुसरी पातळी म्हणजे चक्रधर याच मनाने लोकजीवनाचा आपल्या वैचारिक दृष्टिकोणाच्या पुष्ट्यर्थ लावलेला ससंदर्भ अन्वयार्थ. यामधून लौकिकाचे, ऐहिकाचे भान फार अपूर्वाईने जपलेले आढळते व त्यात समाजमनाशी चक्रधरांचा

साधलेला सुसंवादही प्रत्ययाला येतो. तिसरी पातळी म्हणजे मूळ चक्रधरोक्त सूत्र, त्या सूत्राच्या पुष्ट्यर्थ आलेला दृष्टान्त आणि या दोहोचे स्पष्टीकरण आणि भावलेपन दाखविणारा केसोबासांचा दृष्टिकोण ही होय. यांत एकाच वेळीं चक्रधर आणि केसोबास या भिन्न व्यक्तिमनांनी केलेला जीवनविषयक विचार समजू लागतो.

दृष्टान्तपाठाची रचना लक्षात घेतल्यास आणखी एक गोष्ट जाणवते, ती म्हणजे मूळ सूत्र हे उपमेयात्मक असते. त्यासाठी दृष्टान्तातून उपमान पुरविलेले असते व त्याचे दार्ष्टान्तिक केसोबास पूर्ण करतात. वास्तविक सूत्रपाठाच्या उद्धरण-प्रकरणात आलेल्या सहासष्ट सूत्रांपैकी आलेली पंचेचाळीस सूत्रे म्हणजे दृष्टान्तपाठात जीवोद्धारणाचे जे कार्य चक्रधरांनी आरंभिले त्याचा मूर्त शब्दरूप आविष्कार होय. वैचारिकता आणि विशदीकरण यांच्या समन्वयातून जन्माला आलेला एक विचारानुभव साक्षात होतो तो भटोबास, महदाइसा, रामदेव, दादोस, बाईसा, या विलक्षण श्रोत्यांसमोर! तसेच, चक्रधरांची सूत्र स्पष्टीकरण करण्याचीही एक विशिष्ट धाटणी आहे, एक विशिष्ट पद्धती आहे. ते सरळ वस्तुरूप दृष्टांत देतात, त्यावेळी ते दृष्टान्त पृथक, स्पष्ट आणि वेगळे, पण परिपूर्ण असतात. उदा. कुकडीयेचा, मासळीयेचा, कासवीयेचा, समुद्राचा, सोमकांताचा, वेंवाचा, राहाटघडीएचा, डोळेयाचा, लाडाचीये बासीचा, खाजेयाचा, अन्नाचा, अमृताचा, वटबीजाचा, सेवाळलिया खडकाचा, वावराचा, कानवाथराचा, वेळुवाचा, विषयाचा, मोदळेयाचा, माकोडेयाचा, अग्नियेचा, वृक्षत्वचेचा, अग्निसंबंधाचा, पोळलेया सुनेयाचा, वर्तेचा, राज्याभिषेकाचा, साखरेचा, या सर्व चौथ्या दृष्टान्तापासून एकशेचौदाव्या दृष्टान्तापर्यंत वरील सर्व दृष्टान्तात प्रामुख्याने चक्रधरांनी उपमेयोक्त अशा आपल्या सूत्राला मासळी, कोंबडी, कुत्रे, वटबीज, रहाटघडी, अशी विविध उपमाने योजून आपली वैचारिक भूमिका अतिशय समृद्धपणे व समर्पक पद्धतीने व्यक्त केली आहे. सूत्राचा आशय अधिक शोधात्मक पद्धतीने सांगून, चक्रधरांनी दोन पद्धतींनी विचार केलेला दिसतो. एक म्हणजे दैनंदिन जीवनातील अनुभवजन्य उपमाने स्वीकारून मूळ जे उपमेय आहे त्यावर प्रकाशझोत टाकला आणि दुसरी गोष्ट म्हणजे समाजमनावर आपल्या सूत्राचा ठसा उमटविण्यासाठी अपेक्षित असलेली जवळिक निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्यात सूत्रांतील शास्त्रीयता आणि दुर्बोधता येत नाही, तर समाजमनाचा हुंकार त्या दृष्टांतामधून ऐकू येत असतो. 'येन दृष्टः प्रमेयन्तस्तं प्रचक्षते' ही व्याख्या लक्षात घेतली, तर प्रमेयरूप अशा दृष्टात्मक स्वरूपाच्या परिसीमेला दृष्टान्त म्हणावे लागेल. वरील सर्व दृष्टान्तात आणि सूत्रात जी एक परस्परपूरक आणि परस्परान्वयी अशी अवस्था आहे, तीतून अल्पाक्षरी सूत्रे आणि अंगासरसा दृष्टान्त यांची अपरिहार्य मांडणी स्पष्ट होते. अशा वेळी त्या दृष्टांतात कोणतेही कथाबीज नसते, कोणतीही वर्णनात्मकता येत नाही किंवा कोणत्याही घटितांचे ताणेबाणे बांधल्याची जाणीव होत नाही, तर एक पृथक स्पष्ट चित्र डोळ्यांसमोर येते आणि त्याची परिणामकारकता पूर्ण होताच आणि सूत्राचा अर्थ उलगडला जाताच दृष्टान्ताचे काम पूर्ण होते. अशावेळी या ग्रंथाचा संपादक असलेला जो केसोबास तो प्रभावी ठरतो. वरील सर्व सूत्रांची आणि दृष्टान्ताची दार्ष्टान्तिके मूलतः बघण्यासारखी आहेत.

चक्रधरोक्ती विशेष पद्धतीने आणि मुळावरहुकूम स्वीकारित केसोबास अधिक तपशील पुरवितात. हा तपशील याठिकाणी महत्त्वाचा ठरतो. उदा कुकडीयेचा दृष्टान्त :

कुकडीयेचा दृष्टान्त :

सूत्र : जोवासि वेध आणि वेधशक्ति ते ऐथौनीचि कीं गा ॥ १ ॥

दृष्टान्त :–कुकडी असे : ते अंडी घाली : पोली होती तेयांसि पाखवा दे : अमृतकळा असे ते संचरे : तथा तवं तीये वाढती ॥

दार्ष्टान्तिक :–तैसे परमेश्वराचे या स्पर्शास्तव एकां–वेधु संचरति : जैसे गोपाळासिः गरुडा घोडेयासिः कांकोसासिः विष्णुभटांसि ॥

या ठिकाणी जीवांना वेध आणि वेधशक्ती परमेश्वरापासून म्हणजे चक्रधरांपासूनच प्राप्त होते, हे मूळ सूत्र आहे. त्यासाठी चक्रधरांनी दृष्टान्त दिला तो असा की, एका कोंबडीने अंडी घातल्यावर पुढे पिले झालीत. त्यांना ती आपल्या पंखाखाली घेऊन जीवन देत असे व त्यामुळे ती पिले वाढत असत. केसोबासांनी यासाठी दिलेले जे स्पष्टीकरण आहे ते महत्त्वाचे होय. ते म्हणतात, त्याप्रमाणे परमेश्वराच्या स्पर्शामुळे जीवास वेधसंचार होतो. जसा गोपाळास, गरुड घोड्यास, काकोसाला व विष्णुभटास वेधसंचार झाला. या दार्ष्टान्तिकाच्या साह्याने केसोबासांनी चक्रधरोक्तीचे नुसते स्पष्टीकरण केले असे नाही, तर चक्रधरांच्या वास्तव जीवनातील महत्त्वपूर्ण तपशील पुरवून त्यांच्या विधानाला अधिक बळकटी आणली. अशी किती तरी उदाहरणे दाखविता येतील की, त्यातून चक्रधराच्या जीवनात आलेल्या व्यक्ती आणि वस्तू यांच्या साह्याने विचारांच्या कक्षा अधिक विस्तृत करीत केसोबास चक्रधरोक्तीच्या थोड्याफार अपूर्णतेस जी पूर्णता आणीत असतात, ती आपल्या पांडित्यपूर्ण भाषासरणीतून ! म्हणूनच असे म्हणावेसे वाटते की, सूत्रातून आणि दृष्टांतातून चक्रधरांच्या अनुभवातील जी आशयघनता व्यक्त होत असते, तिला एक नवे परिमाण केसोबासाची उक्ती देत असते आणि म्हणूनच तीतून उपमेय–उपमानातील परस्पर संबंध स्पष्ट केलेला आढळतो. चक्रधरांच्या दीर्घ चिंतनातून परिस्फुट झालेली सहृदयता आणि प्राणीमात्रावरील वात्सल्य, ममत्वभावना नेमकी लक्षात घेऊन केसोबास तपशील पुरवितात.

मनाची स्पंदने

पंथीय दृष्टिकोणातून 'दृष्टान्तपाठा'ला फार महत्त्व मिळाले आहे. म्हणूनच महानुभाव शास्त्रकारांनी बत्तीस लक्षणी टीपग्रंथ तयार करून दृष्टान्ताचे सूक्ष्म, सखोल आणि शास्त्रीय पद्धतीने विवेचन केले. 'दृष्टाचा अंती अदृष्ट बुझविले म्हणौनि दृष्टान्त बोलिजे' या विश्वनाथ बासाने केलेल्या व्याख्येत 'दृष्ट वस्तूच्या साह्याने अदृष्ट ज्यात समजावून दिले आहे त्यास दृष्टान्त म्हणावे' अशी व्याख्या केली आहे. त्याबरोबरच दार्ष्टान्तिकाचीही व्याख्या तयार केली गेली ती अशी : 'दृष्टान्ताचेनि व्यवहारे जो अर्थु निर्धारिजे त्ये दार्ष्टान्तिक.' याहिपुढे जाऊन अंशग्राह्य, समग्रांशग्राह्य, अन्वयग्राह्य, अप्रत्यन्वय, योगज

आणि वास्तव असे सप्त पोटभेदही मानले गेले. यावरून पंथीय दृष्टीने दृष्टान्तपाठाला चक्रधरोक्तीचा आकारग्रंथ म्हणून स्थान मिळाले. पण त्याहीपेक्षा बाराव्या-तेराव्या शतकातील शास्त्रशुद्ध पद्धतीने केलेल्या संकलन-संपादनाचा आदर्श केसोबासांनी निर्माण केला. 'लीळाचरित्रां 'तून इतस्ततः विखुरलेले चक्रधराचे तात्त्विक विचारकण एकत्र करून त्यावर आपली टीका-टिप्पणी देऊन सर्वांगीण पद्धतीने त्यांना शास्त्ररूप देण्याचा प्रयत्न केसोबासांनी केला, तर दृष्टान्तामधून कथाकार चक्रधरांनी आपल्या तात्त्विक विचारांना एक जिवंत कथारूप दिले. अशा प्रकारे भिन्न दृष्टिकोणाच्या, पण एकाच तत्त्वविचाराने भारावलेल्या मनांची स्पंदने 'दृष्टान्तपाठां 'तून ऐकू येतात व म्हणून तो निर्जीव होत नाही, सजीव होतो व त्याला वाङ्मयीन मूल्य येते. 'दृष्टांत पाठां 'तील इतर उरलेले जे दृष्टांत आहेत, त्यांचे स्वरूप प्रामुख्याने सलग आणि पूर्णरूप अशा कथांचे आहे. या कथाही केवळ राजाराणीच्या किंवा शहरी संस्कृतीच्या नाहीत, तर ग्रामीण लोकजीवनाला न्याहाळत आणि साक्षात करीत चक्रधर ही दृष्टान्त-कथा बांधतात. या कथाही पूर्णकथा आहेत. उदा. समुद्राचा, माळेकराचा, बांधकरीयाचा, सुरीयेचा, रुंभणेयाचा, हत्तीचा, आधारीयेचा, सींदेराणेयाचा, अहीरदेशीचीए म्हातारीचा, कठियाचा, लेंकुरवाळीए मातेचा, कुष्टीयाचा हे दृष्टान्त होत.

संपूर्ण व स्वयंपूर्ण आदिकथा

वरील सर्वच पूर्णरूप दृष्टांत कथांतून यादवकालीन मराठी कथेचे स्वतंत्र स्वयंपूर्ण रूप सिद्ध झालेले दिसते. व्यक्तिदर्शन, कथाप्रसंगवर्णन, घटनानिर्मिती, व्यक्तिमनोभावदर्शन ग्रामीण जीवनदर्शन आणि या सर्वांना गोचर करणारी भाषापद्धती असे अविस्मरणीय पद्धतीने केलेले विवेचन 'दृष्टांतपाठा 'त दिसते. मराठी वाङ्मयाच्या बाळपणीच कथारूप किती व कोणत्या प्रकारे विकसित आणि समृद्ध होते, याची साक्ष या कथा देतात. आणि या दृष्टान्तकथांच्या दार्ष्टांतिकात केसोबासही अल्पाक्षरी स्पष्टीकरण देताना दिसतात. त्यांनाही अधिक काही स्पष्टीकरण देण्यास वावच नाही, इतक्या दृष्टांतकथा बोलक्या आणि जिवंत झाल्या आहेत. कथाबीजांतून निर्माण होणारी कथा आपसुक वाढत जाते आणि बघता बघता उमललेल्या कथांचे पूर्णरूप दिसू लागते. एका समृद्ध मनाने घेतलेला जीवनानुभव अर्थपूर्ण रीतीने कथारूप घेतो. अशावेळी ज्या सूत्रासाठी दृष्टान्तात जे उपमेय येणार असते, त्या सूत्राचाही काही काळ विसर पडावा, अशी अवस्था पूर्णरूप दृष्टान्तकथांची झाली आहे. कथांमधून घडणारे नाट्यमय प्रसंग, त्यातून उमलणारी व्यक्तिदर्शने व त्यांच्या मानसिक-शारीरिक क्रिया-प्रतिक्रिया ह्या जाग्या करून संवादाच्या समर्थ निर्मितीतून ही कथा साकारलेली असते. या सर्वच कथांना वास्तवाचे भान आणि तपशिलांची अचूकता मिळाली आहे. म्हणून या कथा एका कलात्मक पातळीवर पोहोचतात. परिसाचा दृष्टान्त किंवा माळेकराचा दृष्टांत, कठियाचा दृष्टांत, हे दृष्टांत म्हणजे पूर्णरूप कथाच होत. किंबहुना कथा बीजांचा होणारा विकास आणि त्याला येत

जाणारे एक पूर्णरूप या दृष्टान्तकथातून जाणवते. या कथा जशा भोवतालच्या समाज-विश्वातून आलेल्या आहेत, तशाच त्यातून एक त्रिकालीन तात्पर्यबोधही घडविण्याचा प्रयत्न होत असतो. म्हणजे केवळ मनोरंजन करणे, ही या कथानिर्मितीमागील मूलभूत प्रेरणा नव्हे, तर या कथा कोणते तरी जीवन सत्य गोचर करण्याच्या संदर्भात रूप घेतात व त्यातून ईश्वरी चैतन्याचे स्वरूप दिग्दर्शित करतात. चक्रधरांनी ईश्वरी कर्तृत्वाच्या संदर्भात दिलेले विचारसूत्र, त्या विचारसूत्राच्या स्पष्टीकरणक्रियेसाठी आलेली दृष्टान्तपूर्ण-रूपी कथा आणि तीतून आलेले जीवनचिंतन, जीवनभाष्य, या सर्व घटितांचे एक अपरिहार्य मिश्रण सूत्रांतून आणि दृष्टान्तकथातून झाले आहे. म्हणून या कथा म्हणजे बोधकथा असतात–उपदेशकथा असतात. किंबहुना चक्रधरांच्या वाणीचा तो धर्मच आहे. त्यांनी ज्या ज्या स्थळी विहरण केले तेथे तेथे त्यांनी सहप्रवासी भक्तांना वेधशक्ती आणि बोधशक्ती दिली. दृक् स्पर्श, आलाप आणि अंतःकरण अशा चार मार्गांनी वेधशक्ती आणि बोधशक्ती होते, हे त्यांनी स्पष्ट केले. भक्त आणि ईश्वर यांचे परस्पर नाते; भावसंबंध आणि त्या सर्वांहून ईश्वराचे असलेले वेगळे रूप विविध सूत्रांतून स्पष्ट करीत त्यासाठी दृष्टांतकथा चक्रधर निर्माण करतात. सर्व सूत्रांचा, दृष्टांताचा आणि दार्ष्टान्तिकांचा घाट हा वक्तृत्वशैलीने अन्वित झालेला दिसतो. कारण त्यामागे कोणतीही लेखनाची प्रेरणा नाही, तर उत्स्फूर्तपणे दैनंदिन जीवन जगत असता आलेली जीवनाची अनुभूती गोचर करण्याचा प्रयत्न चक्रधर हे व्यक्तिमन करू लागते व ते समजावून घेऊन त्या अनुभवांना अधिक वास्तवाची आणि विविध तपशिलांची पुरवणी जोडीत कसोबासांचे दार्ष्टान्तिक मूळ विचारात मिसळून जाते व दोन भिन्न विचारधारा एकरूप होतात, एकात्म होतात. त्यातून विविध दृष्टांतसमूह निर्माण झालेले दिसतात.

दृष्टान्तांची विविधता

ईश्वराचे त्रिविधावतारित्व दाखविताना, ईश्वराचे स्वरूप परा, अपरा आणि उभय दृश्यावतारी आहे हा चक्रधरांच्या विचारांचा मूलकंद. या मूलकंदावर दृष्टांत प्रकाश टाकतात व त्यामुळे मूळ सूत्र आणि दृष्टांत यांची एक वैचारिक बाजू उजेडात येते. ईश्वरी रूप न्याहाळल्यावर त्याचे सर्वगामी अधिकार कोणते, याचाही विचार एका दृष्टांतसाखळीत मिळतो(–कुकडीयेचा, मासळीयेचा, कासवीचा, शब्दवेदीचा, रसाचा). सबंध दृष्टान्तपाठात जी एक वैचारिक सुसंगती साधली गेली आहे, त्याचे श्रेय केसोबासाचे होय. कारण दृष्टान्ताची आणि सूत्रांची निवड करणे, हे दिसते इतके सोपे काम नव्हे. त्यातून चक्रधरांचे तत्त्वज्ञान व विचारधन शास्त्रीयदृष्ट्या संकलन करण्याची भूमिका या लेखनामागे प्रभावी ठरल्यामुळे तिला तात्त्विक रूप आले असूनही क्लिष्टतेचा आणि विस्कळितपणाचा स्पर्शही नाही.

विरहिणीचे उपमान योजिलेले तीन दृष्टान्त; मातेचे उपमान योजिलेले सात दृष्टान्त; सामान्य स्त्री, दासी, पतिव्रता ही उपमाने योजिलेले तीन दृष्टान्त; यामधून निर्माण झालेली

उपमेय–उपमाने घेऊन त्यांचा विविध स्तरांवरून घेतलेला वेध वाचकाला दिसू लागतो आणि त्यातून ईश्वर आणि भक्त यांचे नाते आई आणि मुलासारखे कसे सौहार्दाच्या धाग्यांनी जोडले गेलेले असते, गुंफले गेलेले असते; हा तात्पर्यबोध चक्रधर वाणी आपणास करीत असते. दृष्ट वस्तूच्या साह्याने अदृष्टाचा शोध घेतला जात असतो आणि केसोबास त्यात जी भर घालतात ती 'व्यवहारे जो अर्थु निर्धारिजे' याची. 'दृष्टांतपाठा'ला आणखी एका पद्धतीने जाणून घेता येईल. ती म्हणजे त्यात आलेली प्रमेये व दृष्टांत यांची परस्पर संगती, याच्या साह्याने! म्हणजे विशिष्ट सूत्रप्रमेयासाठी आलेला विशिष्ट लोकव्यवहारातील दृष्टान्त अपरिहार्य कसा झाला आहे, ही निर्मितिप्रक्रिया समजून घेऊ.

परमेश्वरापासौनि चतुर्विध दान अति, ईश्वरी जीव नीलळ होती ।। जीव स्वार्थपर ।। जीव जीवा साजात्यः हे सकळाही वैजात्य ।। चैतन्यापार परमेश्वर-पद पावीजेः ते अच्युतपर बोलिजे ।। राजसा तापसा धर्मी अधिकार नाही ।। हृदयशून्या धर्मी अधिकार नाही ।। जरठा, भक्तिजडा, कर्मजडा धर्मी अधिकारु नाही ।। जीव सर्वाधिकार्या ।। परमेश्वर आर्तदानी परमेश्वरू अनिमित्य बंधू ।। अनाथनाथ ।। कृपाळू ।। परमेश्वर पुरुषार्थ ।। लाभापासुनि लाभ ।। अयोग्यासि योग्य करीतिः योग्यासि परमेश्वरू ज्ञान देति ।। बाई जाणतेयापासि वर नेणता चांग ।। कर्मचांडाळा पसि जात चांडाळ चांग ।। पुरुष सवे तव जाए ।। सवे ते काइसेयाचीही न होवावी ।। देव माझा मी देवाचा ऐसियापरी असीजो ।। धड तुटलेयाही जीवे परमेश्वराते न सोडावे वासना न संडावी ।। सुखसाधने देव न पवीजे की नाएका ।। बाइ येथ हासतांही लटके न बोलिजे जे की ।। गेलेती ते नव्हेः आलेती ते होए ।। आपण कव्हणा आधीन व्हावे नाहीः आपणां आधीन कव्हणा करावे नाहीः जीवे परमेश्वरा आधीन होवावे ।। जन्म जीवित परमेश्वरासि देयावे ।। उपाए न पवीजे ऐसे कांही असे ।। साधनापसी साध्य उत्तम ।। विषयांचा संग न धरावा ।। कोमळ ज्ञानी विखो विघ्न ।। कंटकटीयेमान होऔनि असावे ।। सुख साधने देव न पवोजे ।। आचारे योग्यता विचारे दृढता ।। आत्म ज्ञाने मोक्ष ।। चेइलेया स्वप्न लटिकाः तैसा प्रपंचू मिथ्या ।। साध्याचिया प्राप्ति साधन निवते ।। परमेश्वर ज्ञानियासी अतिष्ट निवृत्ति करीती ।। साधनापसी साध्य उत्तम ।।

सूत्रप्रमेये

वरील सर्व सूत्रप्रमेयांतून काय जाणवते? एकतर ईश्वर आणि भक्त यांच्या भक्ति-संबंधाचे दर्शन घडलेले असते आणि दुसरी गोष्ट म्हणजे जर जिवांना मोक्ष मिळवावयाचा असेल, आपला उद्धार करून घेणे असेल, तर त्या जीवांनी ईश्वराचे अनुसरण कोण-कोणत्या पद्धतींनी करणे आवश्यक आहे, हेही वरील सूत्रप्रमेयातून लक्षात येते. अनधि-

कारी जीव आणि सर्वाधिकारी जीव यामधील त्रुटी कमी करावयाची असेल, तर त्यासाठी त्याने स्वीकारावयाचा आचारधर्म हाही चक्रधर सांगत असतात. परमेश्वर हे जे एक अंतिम साध्य, त्या साध्याप्रत भक्ताची जाण्याची धडपड आणि त्यातून येणारी साधकावस्था चक्रधर स्पष्ट करतात व काय करावे आणि काय करू नये या संदर्भातील आचारधर्मही सांगून जातात. एका निःस्वार्थ बुद्धीने आणि भक्तिपूर्ण अंतःकरणाने ईश्वरप्राप्ती होऊ शकते. ही वैचारिक भूमिका एका विशिष्ट पद्धतीनुगामी रीतीने आणि सुसंगतपणे प्रमेयसूत्र सिद्धान्तातून व्यक्त होत असते, त्याही दृष्टीने दृष्टान्तपाठातील सर्वच सूत्रे महत्त्वपूर्ण आहेत. इतकेच नव्हे, तर जीवनजाणिवांचे क्षितिज अधिक विस्तारित करण्याचे सामर्थ्य या सूत्रवाङ्मयात आहे. आणि सारे उत्स्फूर्त, सहज, जिवंतपणे मानवी कल्याणकारी पद्धतीने 'अवतरते.' लेखकाची भूमिका नसतानाही चक्रधरांच्या उक्तींनी वाङ्मयीन परिमाण मिळविले, कथाकार म्हणून भूमिका नसताही आद्यकथाकार म्हणून लौकिक मिळविला व मराठी गद्याला, लालित्याचे एक विकसित रूप आपल्या प्रगाढ अनुभवान्वित वाणीने मिळवून दिले. 'दृष्टान्तपाठ' म्हणजे फक्त चक्रधरांच्या शिकवणुकीचे किंवा वक्तव्याचे संकलन नव्हे, तर एक तत्त्वज्ञ आणि विचारवंत कथाकार अशा चक्रधराचे दर्शन स्वतंत्ररीत्या घडते व ते घडवीत असता केसोबासांनी त्याला दिलेले नेटके, अनोखे रूप प्रसन्न करते.

दृष्टान्तपाठाची निर्मिती

केसोबासांनीच संकलित केलेल्या 'सूत्रपाठ' या चक्रधरवचनांच्या महाग्रंथातील उद्धरण प्रकरणातील सदुसष्ट सूत्रांपैकी पंचेचाळीस सूत्रे दृष्टांतपाठात आली असली तरी सूत्रपाठापेक्षा त्यांचे स्वरूप अतिशय वेगळे आहे व वाङ्मयीन दृष्ट्या अधिक महत्त्वाचे आहे. केसोबास हे गोविंदप्रभूंच्या मृत्यूनंतर महानुभाव पंथात प्रविष्ट झालेले होते यावरून 'सूत्रपाठ' आणि 'दृष्टांतपाठ' यांची निर्मिती शके १२०९ नंतर झालेली आहे व याच सुमारास केसोबासांनी 'रत्नमालास्तोत्र' हा लीळाचरित्राचा संस्कृत अनुवाद केला व नागदेवाचार्यांची शाबासकी मिळविलेली होती. लीळाचरित्राच्या आज उपलब्ध असलेल्या प्रती म्हणजे परशुरामबासांनी हिरगाईसेच्या साह्याने तयार केलेले पिढीपाठ, (शके १२३५ सुमाराचा) तळेगावकर आणि वाइदेशकर यांचे पाठ (शके १३५०–१४०० सुमाराचा) यावरून तयार केल्या गेल्या आहेत; कारण खालसैयाच्या धाडीत महानुभाव सांप्रदायिकांनी आपले वाङ्मयधन जीवाच्या आकांताने सांभाळण्याचा प्रयत्न केला, परंतु त्या गडबडीत मूळ मराठीमध्ये असलेली 'लीळाचरित्रा'ची प्रत नाहीशी झाली. त्यावेळी पंथीयांमध्ये हिरांबेला संपूर्ण 'लीळाचरित्र' मुखपाठ होते तिच्या मदतीने परशुरामबासांनी हा ग्रंथ पुनः लिहून काढला त्यावेळी तो 'शुद्ध' करण्यासाठी नागदेवाचार्य हयात होते. कारण त्यांचा निधनकाल शके १२३४ असून त्यांच्या मृत्यूनंतर 'स्मृतिस्थळाची निर्मिती झाली व संपूर्ण महानुभाव वाङ्मय सांकेतिक लिप्यांमध्ये बंदिस्त झाले. यावरून ज्या अर्थी लीळा-

चरित्राच्या आज उपलब्ध असलेल्या प्रतीतून 'अमुक दृष्टांत कथियेला' अशी विधाने आलेली आहेत त्या अर्थी या 'लीळाचरित्र' निर्मितीपूर्वीच 'सूत्रपाठ' व 'दृष्टांतपाठा'ची रचना पूर्णतः झालेली होती म्हणून त्या त्या दृष्टांताचा उल्लेख आजच्या लीळाचरित्रात आलेला नाही. हे आपण बघितले आहेच.

सूत्रपाठ आणि दृष्टान्तपाठ

'महानुभाव पंथ आणि त्याचे वाङ्मय' या डॉ. शं. गो. तुळपुळे यांच्या ग्रंथाच्या विस्तृत प्रस्तावनेत डॉ. वि. भि. कोलते यांनी दृष्टान्तपाठाच्या निर्मितीच्या आदित्वाचा साकल्याने परामर्ष घेतलेला आहे म्हणून तो वाद विषय टाळून आणखी एका महत्त्वाच्या गोष्टीकडे संशोधकांचे लक्ष वेधू इच्छिते. ती म्हणजे अजूनही मराठी वाङ्मयाच्या चिकित्सक अभ्यासकात केसोबासाने 'सूत्रपाठ' तयार केला व त्यावरून 'दृष्टांतपाठ' निर्माण केला असा एक गैरसमज पसरलेला आहे. वास्तविक 'सूत्रपाठ' हा मूलतः वस्तुनिष्ठ पद्धतीने आकारास आलेला आहे व त्यात एकूण बाराशेपंचावन्न सूत्रे लीळाचरित्रातून घेतलेली एकत्रित केलेली आहेत. 'दृष्टान्तपाठा'चे स्वरूप सूत्रपाठापेक्षा सर्वस्वी भिन्न आहे. एकतर चक्रधरोक्त सूत्र, त्या सूत्रासाठी चक्रधरांनी दिलेला दृष्टान्त व सूत्रदृष्टान्ताचा अन्वयार्थ लावण्याचा केसोबासाने केलेला प्रयत्न असे चक्रधर स्वामी व केसोबास या दोघांचे वैचारिक आदानप्रदान दृष्टान्तपाठातून गोचर होत आहे. म्हणून जर 'सूत्रपाठा'वरून दृष्टान्तपाठ तयार झाला असता तर सूत्रपाठातील सर्व सूत्रे त्यासाठी (डॉ. तुळपुळे यांच्या म्हणण्याप्रमाणे) केसोबासांनी तयार केलेले दृष्टान्त व दार्ष्टान्तिक असा एक वेगळाच बृहद 'दृष्टान्तपाठ' सिद्ध झाला असता परंतु वस्तुस्थिती तशी नाही तर मूळ मराठी लीळाचरित्रात चक्रधरांनी ज्या ज्या सूत्र निरुपणासाठी 'दृष्टान्त' उपयोजिले होते असे 'सूत्र दृष्टान्त' वेगळे काढून त्यावर केसोबासाने स्पष्टीकरणात्मक दार्ष्टान्तिकांची स्वतंत्र निर्मिती केली आहे. डॉ. य. खु. देशपांडे यांनीही आपला याच समजावर आधारलेला विचार 'महानुभावीय मराठी वाङ्मय' या पुस्तकात मांडला आहे. ते म्हणतात "केशवव्यास उर्फ केशवराज सूरी यांचाही 'सिद्धान्त सूत्रपाठ' विशेष प्रसिद्ध आहे. यांनी प्रथम सूत्रे लिहून त्यानंतर त्यावर ११४ दृष्टान्त सांगितले आहेत. त्यास दार्ष्टान्तिक म्हणतात त्यावर त्यांनी सिद्धान्त काढलेला आहे" (पाहा म. म. वा. पृष्ठ २६/१९२५) या ठिकाणी सूत्रपाठावरून 'दृष्टान्तपाठ' निर्माण झाल्याचे भासविले आहे पण ते वस्तुस्थितीला धरून नाही. तसेच जर केसोबास गोविंद-प्रभूंच्या मृत्यूनंतर महानुभावपंथात प्रविष्ट झालेले आहेत तर 'रत्नमालास्तोत्र' या त्यांच्या पहिल्याच ग्रंथाचा लेखनकाळ शके १२०६ असणे शक्य नाही तर तोही महानुभावपंथाची दीक्षा घेतल्यानंतर पण 'सूत्रपाठ' रचण्यापूर्वी तयार झालेला आहे व 'रत्नमालास्तोत्र' रचताना मूळ मराठी लीळाचरित्राचा 'अभ्यास' केसोबासाकडून घडला व त्यातून रत्नमालास्तोत्राच्या पाठोपाठ दोन भिन्न दृष्टिकोणाचे पण एकाच ईश्वरी अवताराचे विचारधन केसोबासांनी मराठीमध्ये आणले व त्याला नामदेवाचार्यांनी नुसती मान्यताच

दिली असे नाही तर केसोबासांच्या या विचारशास्त्राला व्यवस्था लावण्याच्या प्रयत्नामुळे नागदेवाचार्य अतिशय प्रसन्न झालेले होते. यावरुन 'सूत्रपाठ' व 'दृष्टांतपाठ' यांचा जन्यजनक संबंध नसून दोन्ही 'स्वतंत्र' पण भिन्न भूमिकेचे व भिन्न पातळीवरील ग्रंथ आहेत. 'सूत्रपाठ' हा विचार प्रधान धर्मग्रंथ आहे तर 'दृष्टांतपाठ' हा वाङ्मयीन सौंदर्य प्रगट करणारा व समाजजाणिवांची प्रतीती देणारा आणि दोन व्यक्तिमनांची स्पंदने साक्षात करणारा अनन्य ग्रंथ आहे. त्याच्यासारखा तोच असे त्याचे स्वरूप आहे.

केसोबासाने 'सूत्रपाठ' आणि 'दृष्टान्तपाठ' अशी नावे चक्रधरांच्या संकलित विचारांना का दिली असावी ? याचाही विचार केला पाहिजे. 'पिढीपाठ' यामधील 'पाठ' या शब्दाचा अर्थ आणि 'सूत्रपाठ' आणि 'दृष्टान्तपाठ' या शब्दाचा अर्थ वेगळा आहे. पिढीपाठातील पाठ = Lesson या अर्थाने योजिला गेलेला आहे तर सूत्रपाठ आणि दृष्टान्तपाठमधील 'पाठ' Learnt by heart असा आहे. यावरून चक्रधरवचनांची शास्त्रपूत व्यवस्था लावून पुढे ती पंथीयांच्या नित्यनैमित्तिकाचा एक अविभाज्य घटकच बनली; ही गोष्ट स्पष्टच आहे. 'सूत्रपाठ' आणि दृष्टांतपाठ' या दोन्ही ग्रंथांवर नंतरच्या काळात अनेक टीका निर्माण झाल्या यावरूनही केसोबाच्वा या दोन्ही ग्रंथाना फार मोठी मान्यता पुढील महानुभाव परंपरेत मिळावी. ज्ञानदेवांचे 'हरिपाठाचे अभंग' यामधील पाठ हाही वारकरी भक्तांचा अविभाज्य कर्मघटकच होता. तोच अर्थ पठण ग्रंथ म्हणून 'सूत्रपाठ' आणि 'दृष्टांतपाठ' यांना मिळाला. म्हणून 'सूत्रकाव्य' किंवा 'दृष्टांतसूत्र' 'सूत्रदृष्टांत' असे नामकरण न होता पठणाचे महत्त्व या ग्रंथांना मिळाले होते ही गोष्ट स्पष्ट होते.

केसोबासांची विचक्षणता

केसोबास हे विचक्षण पंडित आहेत. पंथ प्रतिष्ठेविषयी ते जागरूक आहेत. पंथीयांमधील स्नेहसंबंध व मठातील वातावरण विशुद्ध ठेवण्याविषयी ते फार सावध आहेत. 'तुम्ही माझे डोळे की गा' असे आणि 'माझे शास्त्र पंडित केसोदेयासी चर्चा करिता उजळले' असे नागदेवाचार्य केसोबासाविषयीउद्‌गार काढतात. ते वितरागी असून त्यांचे मित्रप्रेम प्रसिद्ध आहे. महानुभावीय पंथीयांत केसोबासाइतकी ग्रंथरचना व संस्कृत पांडित्य म्हाइंभट वगळता कुणाजवळ नाही. आणि भास्करभट्टासारखेच तेही दिसण्यासही सुंदर होते. केसोबासांच्या नावावर 'सूत्रपाठ', 'दृष्टान्त पाठ', 'रत्नमाळास्तोत्र', 'मूर्ति प्रकाश', 'दृष्टान्तस्तोत्र' आणि 'ज्ञानकला निधिस्तोत्र' इत्यादी ग्रंथरचना आहे यावरून केसोबास संस्कृत पंडित, विद्‌वान, शास्त्रकार, संशोधक आणि एक आत्यंतिक प्रामाणिक महानुभाव होते. नागदेवाचार्यांच्या अनुग्रहास पात्र आणि राघवभट व दामोदर पंडित यांचे जिवलग मित्र या नात्याने त्यांच्या प्रौढ प्रतिमेची व विदग्धतेची कल्पना येईल. चक्रधर स्वामींविषयी विलक्षण भक्ती आणि पंथीय नेमस्तपणाची निष्ठा आणि चक्रधर सूत्र दृष्टान्ताच्या साह्याने श्रीचक्रधरांच्या जीवोद्धारणाचा प्रचार आणि प्रसार

करीत जाणे व त्यातून पंथाला शास्त्रीय विचारव्यवस्था आणि टीकात्मक शिस्त (Critical discipline) देण्याचा प्रयत्न केसोबासांनी केला. 'शास्त्रवचनरूप परमेश्वरा'ची अनन्यभक्ती हा या निर्मितीमागील हेतू असला तरी आकलनाची तितकी ताकदही त्यांची होती. सूत्रपाठात वर्गवारी लावण्यात आणि दृष्टान्तपाठात योग्य असे दार्ष्टान्तिक देण्यात केसोबासांची परीक्षा होती व ती त्यांनी पूर्ण केलेली होती. कारण पुढच्या काळात या दोन्ही ग्रंथांवर पूर्णतः सर्व महानुभाव विद्वानांचे लक्ष केंद्रित झालेले होते व या दोन्ही ग्रंथांचा फार बारकाईने अभ्यास झालेला दिसतो. यावरून पंथीय दृष्टिकोणातून 'पठण ग्रंथ' म्हणून आणि विदग्धांसाठी चिकित्सक अभ्यासपद्धती म्हणून 'सूत्रपाठा'बरोबर 'दृष्टान्तपाठा'ला विशेष महत्त्व द्यावे लागते.

दृष्टान्तपाठावर केसोबासानेच एक 'लापणिक' तयार केले आहे. विश्वनाथबासाने 'दृष्टान्तस्थळ' हा टीपग्रंथ तयार केला 'दृष्टान्तस्तोत्र' हा केसोबासाचा संस्कृत अनुवादही उपलब्ध आहे. 'दृष्टान्तलक्षण' आणि 'दृष्टान्त व्याख्या' अशी अनेक भाष्ये आणि साधनग्रंथ 'दृष्टान्तपाठा'वर निर्माण झाली आहेत. त्यात 'दृष्टान्त सरवळे' 'दुर्भागाप्रमेय' 'शय्यापालनाप्रमेय' 'दृष्टान्त विधेयक' 'दृष्टान्त बोध' 'दृष्टन्तमालिका भाष्य' 'दृष्टान्त लक्षण' 'दृष्टान्त व्याख्या' 'दृष्टान्तअन्वयव्याख्यान' अशी महत्त्वाची ग्रंथनिर्मिती 'दृष्टान्त पाठ'चा सूक्ष्म अभ्यास किती विविध अंगांनी झाला हे स्पष्ट करते. महानुभाव लेखकांनी परमेश्वररूपी चक्रधरांच्या विचारसरणीचा प्रसार आणि तत्त्वज्ञानाची चिकित्सा मनःपूत केलेली आहे व त्या ग्रंथ निर्मितीमागे श्रीचक्रधर या पंचकृष्णाच्या विभूतिवादाची दाट छाया आहे. केसोबासाने 'सूत्रपाठ' शके १२१२ ते १३ च्या दरम्यान रचला असावा असा अंदाज डॉ. तुळपुळे यांनी वर्तविलेला आहे तो गृहीत धरल्यास 'दृष्टान्त पाठा'ची निर्मिती नजिकच्या काळात म्हणजे शके १२१५–१६ च्या सुमारास झालेली असावी, कारण परशरामबासाचे 'दुर्भागा–प्रमेय' आणि विश्वनाथबासाचे 'दृष्टान्तस्थळ' यांची निर्मितीही त्याच काळातील जवळची अशीच आहे. आणि 'ज्ञानप्रबोधा'पूर्वीची आहे. चक्रधरांची सूत्रे ही सुबोध आणि अल्पाक्षरयुक्त व रमणीय अशी आहेत. सूत्रांची व्याख्या पंचवार्तिकात भीष्माचार्याने दिली आहे. ती अशी 'अल्पाक्षरे असंदिग्धे, सारवन्ते, विश्वतोमुखे, सार्थके, निर्दोषे, जेही प्रयोगे अर्थज्ञानु सूत्रिजे तेया, प्रयोगाते सूत्र ऐसे म्हणिजे ॥'

दृष्टान्ताचे स्वरूप

चक्रधर सूत्रवचनावली, त्यासाठी आलेल्या कथामाला व त्यांचा लावलेला अन्वयार्थ असा त्रिविधस्वरूपी 'दृष्टान्त पाठ' झाला आहे. महानुभाव तत्त्वज्ञान या तत्त्वज्ञानाच्या सुलभीकरणासाठी उपयोजिलेला लोकजीवनातील दृष्टान्त आणि त्याचे अन्वयात्मकरीतीने केलेले स्पष्टीकरण यातून चक्रधरांचे अनुभव आणि त्याचा केसोबासाने लावलेला अन्वयार्थ याचा प्रतीती वाचकाला येत असते व त्यातून चक्रधर या व्यक्तिमनाने आपल्या भोवतालच्या सृष्टीशी जोडलेले नाते स्पष्ट होत जाते व एका अत्यन्त करूणायम अन्तः

करणाने जीवोद्धारणासाठी चालवलेला प्रयत्न याचेही दर्शन घडते. सूत्र व दृष्टान्त यांच्या परस्पर संबंधदर्शनातून केसोबास चक्रधरजीवनातील तत्त्वशीलही पुरवीत असतो व त्यातून गुरूनिष्ठा व गुरू गौरव व्यक्त करीत जात असतो. मानवी अवतार स्वीकरून उभय-दृश्यावतारी परमेश्वर असलेल्या चक्रधरानी मानवतेविषयीच्या अपार करूणेतून जीवोद्धारण करण्यासाठी आपल्या भ्रमणात वेळोवेळी जे वक्तव्य केले ते इतके जीवनजाणिवांनी लखलखून निघालेले होते की, त्यांना 'सूत्रा'चे व 'मंत्रां'चे स्थान मिळाले व अशी उत्स्फूर्त सूत्रे चक्रधरांनीच भक्तांना दृष्टान्ताच्या साह्याने अधिक समजाऊन दिली त्यावेळी लोकजीवनाचा गंध आणि मराठी-मातीचा स्पर्श त्या कथांमधून व्यक्त होत गेला. जीवोद्धारणासाठी ईश्वर परदर्शी अवरदर्शी आणि परावरदर्शी असा अवतार घेतो व त्यावेळी आत्मस्वरूपप्राप्ती, अन्यविद्याप्राप्ती आणि उभयविश्वज्ञानप्राप्ती या अवतारांकडून जीवांना होत असते व असे अधिकारी जीवच बोध आणि बोधशक्तीला व वेध आणि वेधशक्तीला अनुकूल ठरतात. नाहीतर अनधिकारी जीव परमेश्वराशी सन्मुख होण्याऐवजी विषयसन्मुख होतात. त्यांच्या ठिकाणी 'आर्ति' कमी होत जाते. त्यापासून ईश्वर त्यांना सोडवितो, त्यासाठी जीवांना सर्वाधिकारांची साधना करावी लागते व किटकीची भिंगुरटी व्हावी त्याप्रमाणे जीवही परमेश्वरस्वरूप पावतो. म्हणजे परमेश्वर आपल्या व्यापकतेची ज्ञानजाणीव भक्ताला म्हणजे जीवाला देतो.

केसोबासाने 'दृष्टान्तपाठा'त घेतलेली सूत्रे ही लीळाचरित्राच्या अनुक्रमानेच घेतली आहेत असे नाही तरीही सर्व सूत्रांमधून एक प्रकारची अन्तःसंगती निर्माण झाली असून सुसूत्रता आणि विचारांचा चढताक्रम कर्मनिष्ठा, ज्ञाननिष्ठा आणि प्रेमनिष्ठा या निष्ठांमधून गोचर झाला आहे. अनधिकारी जीव हे अविद्येने व्यावृत्त असतात जर त्यांना आधिकारी बनविणे असेल तर त्यासाठी ईश्वरीसत्तेची जाणीव अपेक्षित आहे अनधिकारी जीव अधिकारी होताच त्यांना ईश्वराचे श्रेष्ठत्व, त्याचा कनवाळूपणा जाणवू लागतो व 'साधनापसि साध्य उत्तम' अशी जीवाची अवस्था होते. अविद्या, चैतन्यविद्या आणि ब्रह्मविद्या असाही एक उत्कर्ष क्रम असून तो 'कोमळज्ञानी' असतानाच मिळविला पाहिजे हाही विचार सूत्रांतून बांधला गेला आहे. जीवाच्या विविध अवस्था असून त्यातून तो पार होताच त्याला परमेश्वर प्राप्तीची ओढ लागते त्यावेळी कर्मचाण्डाळापेक्षा ज्ञातिचांडाळ अधिक चांगला असे चक्रधर म्हणतात. ईश्वराचा आणि जीवाचा संबंध स्वामिसेवक असा असतो व असे ज्यावेळी जीवाला जाणवेल त्यावेळी 'आर्तज्ञानि' 'अभय नाथ' 'अनंतशक्ती' 'कृपाळू' अशा परमेश्वराच्या स्वरूपाची प्रतीती येऊन जीवाचा उद्धार होईल. 'जीव' बद्धमुक्त असल्यामुळे ईश्वराच्या दानांनी आणि वेधशक्तींनी तो मुक्त होतो व चैतन्यमायेच्या साह्याने त्याला ईश्वराचे श्रेष्ठपण लक्षात येते व चैतन्याच्या पलीकडे असलेला परमेश्वर सकळ जीवांचा रक्षणकर्ता आणि उद्धारकर्ता असून तो जीवाकडून 'आचारे योग्यता विचारे दृढता' अपेक्षितो अपरोक्षज्ञानी प्रपंच मिथ्या असून तो 'चेइलेया स्वप्न लटिका' असा असतो. अशा प्रपंचात रमणाऱ्या जीवाला 'स्वभाव प्रगटे

तै जीव मुचे' असे व्हावे लागते. साधनापेक्षा साध्य उत्तम असून साखर होण्यापेक्षा साखरेचा अनुभव घेता येणे महत्त्वाचे आहे. त्याप्रमाणे जीव स्वतः ब्रह्म होऊ शकत नसून त्याने ब्रह्माचे म्हणजे ईश्वराचे सान्निध्य मिळविले पाहिजे असा विचार शेवटच्या सूत्रातून चक्रधरांनी मांडला आहे. अनधिकारी जीव, विषयासक्त जीव आणि वार्धक्यमय जीव अशा जीवाच्या तीन अवस्था अविद्यामय चैतन्यविद्यामय आणि ब्रह्मविद्यामय अशा चढत्या क्रमाने बदलतात व अन्तिमतः त्यांना ईश्वरी सत्तेची जाणीव होते. अशी तत्त्वविचारांची चढती श्रेणी 'दृष्टांतपाठा'त आपोआप साधली गेली आहे व त्यामुळे चक्रधर विचारांना अधिकच रेखीवता येऊन गेली आहे. अविद्याखण्डणापासून ईश्वरीसान्निध्यापर्यंतचा जीवाचा प्रवास एकीकडे सर्व सूत्रामधून क्रमशः गुंफला गेलेला आहे तर त्या सूत्रांच्या स्पष्टीकरणासाठी उत्स्फूर्तपणे चक्रधरांनी दिलेली जी उपमानदृष्टांते आहेत त्यातून संपूर्ण स्थिरचर सृष्टीचा पट उलगडला गेला आहे, लोकजीवनाचा सामाजिक संदर्भ दृष्टांतातून अभिव्यक्त झाल्यामुळे यादवकालीन लोकजीवनाचा भौतिक स्तर, त्यांच्या चालीरीती, रीतीरिवाज आणि एकूण कौटुंबिक आणि सामाजिक जीवनाची प्रत विविध प्रतिमांमधून, रूपकान्वीत दृष्टान्तामधून झळाळून व्यक्त झाली आहे. आणि या प्रतिमा आकृतिबंध स्वीकारतात त्या एखाद्या ग्रामीण कथेचा किंवा लोककथेचा किंवा प्राणीकथेचा! मराठी वाङ्मयाच्या दृष्टीने एक आश्चर्यकारक अशी ही घटना आहे.

कथासृष्टीतील विविधता

वस्तुतः जीवोद्धारणाचे कार्य आरंभिलेल्या चक्रधरांनी गावोगावी आणि वस्तीवस्तीतून भ्रमण करून जो लोककल्याणकारी उपदेश केला तोच आपल्या भोवतालच्या जीवनातून उपमाने घेत सुलभ सोपा करून सांगितला. आपले विचार समुदाय मनाला समजले की दृष्टान्ताचे काम वास्तविक संपणारे होते. परंतु तसे न घडता सूत्रांबरोबर जणू एकरूप होऊन आलेले दृष्टांतच मराठी भाषेतील पहिली 'मराठी कथा' पाल्हाळ येऊ न देता जणू सांगू लागतात महानुभाव संप्रदायाच्या दृष्टीने सूत्र माहात्म्या इतके दृष्टान्त माहात्म्य असण्याचे कारण नाही तरीही या दृष्टान्तांनी मराठी भाषेला आणि वाङ्मयाला आपले जागी खिळवून टाकले ते कायमचे!

चक्रधरांची ही कथा सृष्टी (दृष्टान्त सृष्टी) विविध मनोभावांनी, मनोविकारांनी आणि जीवनजाणिवांनी गजबजलेली आहे कृमीकीटक सृष्टी, जलचर, भूचर, आकाशचर प्राणीसृष्टी, कल्पवृक्षांपासून पाणवेली पर्यंतची वृक्षसृष्टी, चंद्रतारका समुद्रादी पंचमहाभूतांची सृष्टी, शेती, खडक, गोटे याची स्थावर सृष्टी विविध जनावरांची सृष्टी, त्यातही पाळीव जनावरे गाय, बैल, घोडा, कुत्रे अशी तर जंगली जनावरे म्हणजे वानरे, हत्ती अशीही प्राणीसृष्टी आपापल्या रूप वैशिष्ट्यांसह व स्वभावधर्मासह साक्षात झाली आहे. कथेतील वैविध्य आणि जीवनांगाच्या सर्व कक्षांना भिडण्याचे जे सामर्थ्य आहे ते अलौकिक म्हणावे लागले! कुकडी, मासळी, कासवीपासून भिंगुरडी वज्रकीटकीपर्यंत सूक्ष्मातिसूक्ष्म जीवजन्तू आणि

किटाणूपर्यंत ही प्राणीसृष्टी मुंगळ्यापर्यंत आणि राजहंसापासून चातकापर्यंत प्रत्येक प्राण्याचा जो स्वभावधर्म आहे तो रूपवान होत एक अपरिहार्य अशी उपस्थिती त्यातून निर्माण होत असते. दृष्टान्तकथेत प्राणीसृष्टीबरोबर फलसृष्टीलाही महत्त्व मिळाले आहे. वाळुकाचा दृष्टांत देऊन अर्धकच्चे वाळुक, पिकलेले वाळुक, कच्चे वाळुक आणि कोवळे वाळुक इतका मार्मिक भेद करीत जीवाची अवस्था चक्रधरांनी विशद केली आहे. इंद्रवणाचे फळ, हिरडेबेहडे ही औषधी फळेही या फलसृष्टीत आलेली आहेत. प्राणिसृष्टी आणि फलसृष्टीबरोबर विविध अन्न प्रकार आणि मिठाई प्रकारही या कथांमधून मूळ सूत्ररूप समजावून देण्यासाठी उपयोजिलेले आहेत. ज्या माणसांच्या संदर्भात सारी उपमाने योजिलेली आहेत ती माणसांची सृष्टी हा तर दृष्टांतकथांचा गाभा आहे.

ग्रामीण जीवन जगणारी, बादशाही जीवन जगणारी अशी भिन्न वृत्तिप्रवृत्तीची आणि भिन्न मनोधर्माची माणसे आपल्या कृतिउक्तीतून आणि संवादातून रूपवान झालेली आहेत. चक्रधरांच्या या मानवी विश्वात अनेक कुटुंबे आहेत, अनेक व्यक्ती आहेत, स्त्रिया आहेत लहान मुले आहेत, चोर आहेत, संन्याशी आहेत, राजा आहे, रंक आहे. किती प्रकारची माणसे आणि त्यांचे जीवन जगणे अतिशय कमी कमी शब्दात आणि पाल्हाळ विरहित पद्धतीने जिवन्त, जागते आणि चमत्कृतिपूर्ण मनोभावांनी उमललेले असे अभिव्यक्त झाले आहे. स्त्रीची विविध रूपे या कथांमधून गोचर होतात. ती आदर्श माता आहे, आदर्श पत्नी आहे, दासी आहे. बालविधवा आहे तर सामान्य स्त्रीही आहे. पुरूषांच्या संदर्भात बघू लागलो तर विषयासक्त पुरुषापासून सिंदेराण्यापर्यंत सर्व मनोवृत्तीची व विविध स्तरांतून जीवन जगणारी अशी ही मंडळी आहेत. त्यांचे विविध व्यवसाय आहेत. कवट्या गोळत करणारे किमयागार, दांड पट्टा खेळणारे आणि तलवार बहादूर असे काही आहेत, गुरव आहेत, कोल्हाटी आहेत, लोहार आहेत, गुलाब विकणारे आहेत, काही विरोधक आहेत, भडभुंजे आहेत, तर काही कर्जबाजारी आहेत, काही सिंदेराणे आहेत तर काही महारोगी आहेत, काहीतील एखाद्याला वज्रकीटकीचा रोग (कॅन्सर) झालेला आहे त्यावर उपाय सुचविलेला आहे, औषधी योजना केलेल्या आहेत असे हे माणसाचे विश्व गजबजलेले आणि आपल्या स्वतःच्या स्वभाववैशिष्ट्यांनी आणि गुणधर्मांनी अन्वित झालेले दृष्टान्त कथातून सजग झाले आहे. स्त्रीचा सुगरणपणा आणि विरहिणीची अवस्थाही या कथातून अचूक टिपली जाते. तप्ततांबे, रहाट गाडगे, घटिकापात्र, पाणी यंत्र याही सार्वजनिक यंत्रसामुग्रीचा वास्तव तपशील दृष्टांत कथातून मिळत असतो. ज्या जगाशी चक्रधर हे व्यक्तिमन एकरूप झाले होते तीच सामान्य माणसांची लौकिक सृष्टी आपल्या अनुभवातून गोचर करून तिला अलौकिकतेप्रत त्यांनी नेले आणि हे सर्व अनुभवाचे बोल असल्यामुळे त्यामागील तळमळ, उत्कटता, स्नेहशीलता, कारूण्य आणि माणसाविषयीचा कळवळा या सर्वच मनोभावातून ही सृष्टी जन्म घेते आणि मूळ अनुभव आणि त्या अनुभवाची अभिव्यक्ती त्यातून एकात्मक होऊन रूपमान होत जाते. ही कथा म्हणून खळखळत्या निर्झरासारखी काठावरील वृक्ष वेलींना

जीवदान देत जाणारी असते; ते तिचे प्रयोजन असते; परन्तु त्याही पाठीमागे समाज-जीवनाचे नितळ दर्शन जे तिच्यातून घडते ते अलौकिक स्वरूपाचे ठरते.

केसोबासांनी मूळ सूत्रांचा अन्वयार्थ लावला; परन्तु सूत्र आणि दार्ष्टान्तिक यामध्ये कौस्तुभासारखी असलेली जी पूर्णरूपी आणि कांतिमान कथा आहे तिच्याविषयी केसोबास बोलत नाहीत कारण अरूपाला रूप देण्याचे जे सामर्थ्य तिच्या ठिकाणी आहे, त्यामुळे तिची भावप्रतीती हृदयाला जाऊन भिडते. त्यासाठी केसोबांसाची उपस्थिती आवश्यक नसते. दृष्टांत कथांचे वाङ्मयीन श्रेष्ठत्व असे आहे. दृष्टांतकथातून बळ घेऊन पुढील मराठी कथा साजिवन्त झाली, रूपवंत झाली, देखणी बनली. पण तिचे जिवन्तपण आणि टवटवीत रूप ज्या लोकजीवनातून अंकुरले ते लोकजीवन साक्षात करण्यासाठी मराठी कथा प्रयत्नशील झाली. ती दृष्टान्तपाठातील दृष्टान्त कथातून! वर्णनात्मकता, संवाद कौशल्य, भाषेचा प्रवाहीपणा आणि सहजता, भावनाचे कल्लोळी रूपसामर्थ्य, कथानकाची एकात्मप्रतीती आणि प्रसंग, घटना आणि व्यक्तिरेखा यांची एकसंध निर्मिती जी आपण आधुनिक मराठी कथेकडून अपेक्षितो ती अपेक्षा दृष्टान्तकथा सर्वार्थाने पूर्ण करते. उदा. 'समुद्राचा' 'बेंवाचा' 'माळेकराचा' 'बांदकरीयाचा' 'सुरीएचा' 'रूमणेयाचा' 'हस्तीचा' आणि 'कठियाचा' या सर्व कथा वाचल्यावर काय जाणवते? या दृष्टान्तकथा जर एकत्र संग्रहित केल्या तर एका लघुकथासंग्रहाचे रूपसौंदर्य त्यांना मिळते. जीवनाचा एक छेद काढूनच जणू संपूर्ण ही चराचर सृष्टी चक्रधरानी सजविली आहे. जिज्ञासाजागृती आणि जिज्ञासातृप्ती जी कथाकाराला करावी लागते, तीही विविध घटना प्रसंगाच्या निर्मितीतून साधली गेलेली असते आणि अंतिमतः स्त्री आणि तिची विविध रूपे व पुरुष आणि त्याची विविध रूपे यांच्या संबंधातून जन्माला आलेले विश्वाचे गोचररूप याची भावप्रतीती या कथा वाचनातून घडत जाते. माणसाचे दैनंदिन जीवन, त्यांची सुखाची कल्पना कुटुंबांविषयीची आस्था आणि शेवटी माणूस म्हणून त्याचे असलेले लौकिक अस्तित्व अतिशय अचूक उपमानातून आणि बोलक्या प्रतिमामधून आकारास येत जाते. चक्रधरांची वैयक्तिक अनुभूती आणि सामाजिक अनुभूती यांच्या अलौकिक मिश्रणातून दृष्टान्तकथांचा आशय स्वाभाविकपणे फुललेला आहे. एखाद्या कळीचे बघता बघता फूल व्हावे तसे या दृष्टान्त-कथातून, आशयातून बघता बघता एक पूर्णरूप कथा आकारास येत जाते. शब्द या साधनाच्या साह्याने घनतेने भरलेला आशय समूर्त करण्यात संवेदना संपृक्त प्रतिमा अपसूकपणे निर्माण होतात. सूत्रांमध्ये आणि दृष्टांतामध्येही चक्रधरांचा शब्दांचा मितव्यय आणि हिशोबीपणा जाणवत असतोच; पण तेच त्यांच्या कथासृष्टीला भूषणभूत होऊन जाते. उत्कटता आणि उत्स्फूर्तता ही चक्रधर विचारांची वैशिष्ट्ये आहेत त्यांचे प्रतिबिंब सूत्रांमधून जाणवतेच; पण सूत्रापेक्षाही दृष्टान्तकथामधून अधिक जाणवते कारण सूत्रांमध्ये पारमार्थिक मंत्र सहजतेने चक्रधर सांगतात पण दृष्टान्तकथेत मात्र एक अनुभव कथेचे रूप घेऊन आविर्भूत होतो व कथानकाची अपरिहार्य पण अर्थपूर्ण वाढ होते व चटकन ती कथा पूर्ण रूपात संपतेही उदा. हस्तीच्या दृष्टान्तात, हत्ती असा नाही तसा नाही,

असे म्हणत कथा आकारू लागते व या नकारात्मक विधानांत एकच होकारात्मक विधान करून कथा संपते. वास्तविक ही परंपरेने चालत आलेली लोककथा असते.

दृष्टान्तकथांचा आणखी एक विशेष म्हणजे व्यक्तिविकास आणि कथानकाचा विकासही विशिष्टपद्धतीने जाणवत असतो. सर्व तपशीलासह व्यक्तिदर्शन आणि सर्व तपशीलासह कथानकदर्शन व त्यांची परस्परानुगामी गुंफण मोठ्या दिमाखाने साक्षात झालेली असते. अशा कथांचे संवाद हे मूलकेंद्र ठरते आणि या सर्वांसह एक जिव्हाळापूर्ण भावठसा वाचकाच्या मनावर प्रतिबिंबित होतो. समाजजीवनातील विविध पातळीवरील व्यक्तिसमूह जीवन आणि त्यांच्या भावभावनातून गोचर होणारे मानवीरूप दृष्टान्तकथातून डोकावीत असते. सुखदुःखांच्या ताणांनी ही जीवनगाथा बांधली गेली आहे. माणसा-माणसातील हेव्यादाव्यांनी ती रंगलेली आहे. आनंदाने कधी ती मोहरून आलेली आहे, तर दुःखाने विदीर्ण झाली आहे. समाजाच्या सर्व स्तरातील ही माणसे आहेत कुशल कारागिरी करणाऱ्यापासून औषधी योजना करणाऱ्यांपर्यंत सर्व थरांतील व सर्व जाती-जमातीतील श्रेष्ठ आणि बहुतांशी सामान्य माणसाची ती जीवनगाथा ठरते.

महानुभाव सांप्रदायिकात 'सूत्रपाठ' आणि 'दृष्टान्तपाठ' यांना चक्रधर वचनोक्तीचे 'श्रुतिग्रंथ' म्हणून मान्यता मिळालेली आहे व या दोन्ही ग्रंथांचे स्वरूप 'लीळाचरित्रा'पेक्षा भिन्न असूनही त्यांची निर्मिती मात्र मूळ मराठीमध्ये शके १२०५ च्या प्रतीवरून झालेली आहे. 'सूत्रपाठ' हा केसोबासाचाच संकलित ग्रंथ असूनही त्यामागील दृष्टी व 'दृष्टान्तपाठ' निर्मितीच्या मागची दृष्टी भिन्न आहे हे त्या ग्रंथाच्या स्वरूपावरून स्पष्ट झालेले आहेच. 'सूत्रपाठा'चे स्वरूप केवळ संकलनाचे व व्यवस्थापनाचे आहे त्यात शास्त्रीयता अधिक अचूकपणे स्वीकारली गेली आहे तर दृष्टान्तपाठात मात्र सूत्र आणि दार्ष्टान्तिकांपेक्षा दृष्टान्तकथांना विशेष महत्त्व आहे. या कथांविषयी विशेष अगत्य ठेऊन त्यांना दार्ष्टान्तिक दिले गेले आहे हे त्याच्या नावावरूनही दिसून येते व या कथांमुळेच दृष्टान्तपाठाला वाङ्मयीन महत्ता प्राप्त झाली आहे. सूत्रपाठासारखा तो तात्त्विक विचारदर्शन फक्त घडवीत नाही तर त्याबरोबरच त्या विचारांच्या पुष्ट्यर्थ आलेली कथा अधिक लक्षणीय पद्धतीने साक्षात करतो. म्हणून दृष्टान्तपाठाला वस्तुनिष्ठ, विचार परिप्लुत गद्याचे आणि आत्मनिष्ठ भावगर्भ ललित गद्याचे स्वरूप येऊन चक्रधर आणि केसोबास यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाची ओळख पटते व हे सर्व मराठी भाषेच्या बाळपणी घडते व आधुनिक लघुकथेच्या इतिहासाला दृष्टान्तपाठातील कथेशिवाय पुढे जाता येत नाही हे त्याचे अलौकिक रूप मराठी भाषेत अनन्यसाधारण ठरते. या रूपाप्रमाणेच चरित्रग्रंथाचे स्वरूपही समृद्धपणे जाणवल्या शिवाय राहात नाही.

चरित्रपर गद्य

तेराव्या शतकात मराठी वाङ्मयाची जी अनेकपदरी वाढ आणि विकास झाला त्यातच चरित्र आणि आत्मचरित्र निर्मितीही घडून आली. म्हाइंभट्ट हा मराठी वाङ्मयाचा

पहिला चरित्रकार, तर नामदेव हा पहिला आत्मचरित्रकार आणि चरित्रकार ठरला. सेनान्हावी यानेही काही चरित्रे लिहिली आहेत परंतु म्हाइंभट्ट आणि नामदेव यांची निर्मिती विपुल, दृष्टिकोण निश्चित, आणि भूमिका ठाम असल्यामुळे तेराव्या शतकातील चरित्र निर्मितीचा संदर्भशोध घेणे आवश्यक आहे.

पहिले चरित्रकार

म्हाइंभट्ट हा महानुभाव संप्रदायाच्या वाङ्मयीन कामगिरीचा मूळ आधारस्तंभ ठरला. तर नामदेवाने विठ्ठलभक्तीची धुरा समर्थपणे वाहून बहुजनसमाजापर्यंत विठ्ठल-भक्तीचा प्रचार आणि प्रसार केला. दोन्ही साहित्यिक एकाच काळातील असून वेगळ्या वेगळ्या संप्रदायाचे अनुयायित्व त्यांनी स्वीकारले होते. नामदेवाचे चरित्र जनाबाईही सांगते. ज्ञानेश्वरांच्या संदर्भातील चरित्रपर कथा समकालीन कवींच्या काव्याचा विषय झाल्या आहेत. नामदेवाने गुरुचरित्रावरोबर शिष्यचरित्रेही रेखाटली आहेत. उलट महानुभाव संप्रदायाच्या वाङ्मय निर्मितीत व्यक्तिनिष्ठा आणि संप्रदायनिष्ठा सांभाळली गेली. श्रीकृष्ण, दत्तात्रेय, चक्रपाणी उर्फ चांगदेव राऊळ, गुंडम राऊळ उर्फ गोविंद प्रभू आणि चक्रधर या पाच अवतारांनी महानुभाव संप्रदाय, हा व्यक्तिनिष्ठ संप्रदाय झाला आणि संप्रदायनिष्ठ अनुयायांकडून संप्रदायातील व्यक्तिनिष्ठा जोपासली गेली व वाङ्मयही संप्रदायनिष्ठ झाले. संप्रदायातील व्यक्तिनिष्ठा व संप्रदायनिष्ठ वाङ्मय असे वाङ्मयनिर्मितीला स्वरूप आले. दत्तात्रयाचे अनुगृहीत चांगदेव राऊळ, चांगदेव राऊळाने गुंडम राऊळांना दीक्षा दिली व चांगदेवाचाच आत्मा हरपाळदेव उर्फ चक्रधरात निवास करून आहे व चक्रधर गुंडम राऊळांना गुरू मानतात. आणि चक्रधरांनी महानुभाव संप्रदायाची स्थापना केली. संघटन व्यवस्थापन करण्यात नागदेवाचार्यांचे साह्य मिळून आपला उत्तराधिकारी नागदेवामध्ये बघून चक्रधर उत्तरापंथे निघून गेले. ज्ञानेश्वरांना जसा प्रचारप्रसारासाठी नामदेव मिळाला तसा चक्रधरांच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार वाङ्मय निविष्ट करण्यात नागदेवाचार्यांचा फार मोठा वाटा निर्माण झाला. पंचकृष्णांविषयीचा निरंतर श्रद्धाभाव व पंथ संघटने-विषयीची प्रामाणिकता यामधून महानुभाव चरित्रनिर्मिती झाली आहे.

पंचकृष्णावतार

महानुभाव वाङ्मय मुळी पंचकृष्णावतारावर अधिष्ठित आहे. श्रीकृष्ण हा महानु-भावांच्या दृष्टीने पंचकृष्णावतारातील एक ईश्वरी अवतार! महानुभाव वाङ्मय निर्मितीत अर्ध्याहून अधिक वाङ्मय कृष्णभक्तिपर असे निर्माण झाले आहे. उदाहरणार्थ 'धवळे'-नरेंद्राचे 'रुक्मिणीस्वयंवर', 'मातृकिरुक्मिणी सैंवर', 'गर्भकाण्ड ओव्या', भास्कराचे 'शिशुपालवध', 'उद्धवगीता', दामोदराचे 'वछाहरण' 'ज्ञानप्रबोध' तसेच पंच-कृष्णापैकी एक अवतार जो चक्रधर त्यानीच 'श्रीकृष्णचरित्र' निरुपिले आहे. पंचकृष्णा-पैकी एक अवतार म्हणजे दत्तात्रयाचा अवतार त्याचेही 'दत्तात्रेय चरित्र' आणि सह्याद्री वर्णन हे साती ग्रंथांपैकी एक असलेले काव्य उपलब्ध आहे. चांगदेव राऊळ हा पंच-

कृष्णापैकी तिसरा अवतार त्यांचे 'चक्रपाणी चरित्र' उपलब्ध आहे. पंचकृष्णापैकी चवथा अवतार गुंडम राऊळ उर्फ गोविंद प्रभू यांचे 'रुद्धिपूरलीला' किंवा 'गोविंद प्रभू चरित्र' उपलब्ध आहे. तसेच 'रुद्धिपूर वर्णन' आणि नागदेवाचार्यांचे पुत्र महेश्वर पंडित यांचे 'रुद्धिपूर माहात्म्य' उपलब्ध झाले आहे. पंचकृष्णापैकी शेवटचा पण महत्त्वाचा अवतार म्हणजे चक्रधरस्वामींचा अवतार! चांगदेव राऊळांचा आत्मा चक्रधराचे शरीरात वस्ती करुन आहे व गोविंद प्रभूंचे चक्रधर अनुग्रहित आहेत, यावरून चांगदेवराऊळ गोविंदप्रभू चक्रधर यांचे परस्पर नाते परस्परावलंबी असून ते सर्व साधारणपणे एकाच काळातील ईश्वरी अवतार महानुभाव पंथ मानतो. चक्रधर हा महानुभाव पंथातील अंतिम अवतार. 'लीळाचरित्र', 'सूत्रपाठ' 'दृष्टान्तपाठ' 'रत्नमाळास्तोत्र' 'दृष्टान्तस्तोत्र', 'पूजावसर' 'स्थानपोथी' 'तीर्थमालिका', 'गद्यराज' 'लक्षणबंद महावाक्य' 'आचारमालिका', 'विचारमालिका', 'लक्षणस्थळ' 'उधरणप्रकरण', बत्तीसलक्षणी टीका', 'पंचवार्तिक', 'मार्गप्रभाकर' इत्यादी महत्त्वपूर्ण वाङ्मयनिर्मिती चक्रधर या कृष्णावताराच्या संदर्भात निर्माण झाली. यावरून महानुभाव हे ईश्वरी अवतार जे महानुभाव संप्रदायाने मान्य केले आहेत त्यावर आधारलेले आहे व पंचकृष्णनिष्ठ महानुभावपंथ व महानुभाव पंथनिष्ठ महानुभाव सांप्रदायिकांचे वाङ्मय असे त्याचे स्वरूप झाले व एकीकडे हीच त्याची मर्यादा ठरली व हेच त्याचे सामर्थ्यही ठरले. वारकरी पंथाचे लेखकही कृष्णभक्तीने रंगलेले होते; परंतु त्या कृष्णभक्तीत आत्माविष्काराचा रंग मिसळल्यामुळे आपोआपच त्या कवितेचे स्वरूप स्थिरशील झाले नाही, होऊ शकले नाही. म्हणून अभंग कवितेत महानुभाव पंथीयांप्रमाणे देवतेची एकात्मता असूनही कविता मात्र बहुरूपी बहुगुणी झाली. भावकाव्याच्या पातळीवर जाऊन पोहोचली.

चरित्र वाङ्मयाची निर्मिती

दत्तात्रय, चांगदेव राऊळ आणि गोविंद प्रभू या पंचकृष्णांपेक्षाही कृष्णपर आणि विशेषतः चक्रधरपर आणि चक्रधरविचारपर महानुभाव वाङ्मय निर्माण झाले. चक्रधरांच्या पश्चात नागदेवाचार्य हे प्रथम आचार्य झाले, नंतर बाईदेववास, भास्करभट्ट आणि परशराम हे महानुभाव पंथाचे आचार्यपदी आले. चक्रधरांनीच नागदेवाची निष्ठा आणि बुद्धिमत्ता बघून त्यांना आपल्या पश्चात महानुभाव पंथाला सांभाळण्याची आज्ञा दिली व ती नागदेवांनी स्वीकारली. त्यावेळी पंचकृष्णापैकी गोविंदप्रभू हे हायात होते व चक्रधरही हायात होतेच. म्हणून पंथीयात नागदेवाचार्यांना विशेष महत्त्व मिळाले. एक कारण म्हणजे साक्षात ईश्वरी अवतार चक्रधरांनीच त्यांना प्रथमाचार्य केले हे होते आणि दुसरे कारण म्हणजे नागदेवाचार्यांच्या मार्गदर्शनाखालीच महानुभाव लेखक मंडळी एकत्र आली व त्यांचेकडून लेखन नागदेवाचार्यांनी अधिकारवाणीने करवून घेतले. नागदेवाचार्य लेखक जरी नव्हते तरी मार्गदर्शक होते, अनुभविक होते व तळमळीचे कार्यकर्ते होते. त्यांचेही चरित्र 'स्मृतिस्थळा'त आलेले आहे ते शके १२३० ते ३४ मध्ये

'नवरसांचिचे गाभारा । झळके प्रबोधवसंतीचा वारा । तरि तया सुखाचिया सावरा । कवणु न दिखे ॥ अशी एक दैदिप्यमान परंपरा नागदेवाचार्यांनी निर्माण केली व त्याचे पहिले फलित म्हणजे महानुभाव पंचकृष्णांच्या चरित्राची निर्मिती हे होय.

चक्रधर निरुपित 'कृष्णचरित्र' म्हाइंभट्टाने तयार केले. 'दत्तात्रय चरित्र' लीळा चक्रधरांनी सांगितल्या. म्हाइंभटाने जमवून ठेवल्या. तिसरा अवतार द्वारावतीचे चांगदेव राऊळ यांच्याही चरित्रविषय लीळा म्हाइंभट्टाने गोळा केल्या. गोविंदप्रभूंचे चरित्रही म्हाइंभट्टाने संकलित केले. महानुभाव संप्रदायात येण्याची प्रेरणा म्हाइंभट्टाला चक्रधरांमुळे मिळाली असली तरी त्याने दीक्षा मात्र गोविंदप्रभूंकडून घेतलेली आहे. 'म्हाइंभटाने श्रीप्रभूदास्या वेगळे जो दाखवी तयासी मी 'महावाक्य' वाखाणिन, अशी पैज नागदेवाचार्यांनी लावलेली सुप्रसिद्ध आहे. (स्मृतिस्थळः २४७) गोविंदप्रभूंच्या मृत्यूपर्यंत अखेरीस म्हाइंभट्टच त्यांच्या जवळ सेवा करण्यास उपस्थित होता. यावरून महानुभावांचे जेवढे म्हणून श्रुतिवाङ्मय आहे. (म्हणजे पंचकृष्णांच्या संदर्भातील) ते सर्व म्हाइंभट्टाने संकलित केलेले आहे. पैकी लीळाचरित्र शके १२०५, चक्रपाणी चरित्र शके १२०३-४, गोविंदप्रभू चरित्र शके १२१०, दत्तात्रय चरित्र (सह्याद्रि वर्णन) आणि स्मृतिस्थळ शके १२३० ते ३४ च्या दरम्यान नागदेवाचार्यांच्या मृत्यूनंतर रचले गेले. लीळाचरित्र ते गोविंदप्रभू चरित्र अशी जवळजवळ पाच ते दहा वर्षांतील म्हाइंभट्टाची बहुमोल कामगिरी आहे. महदंबेच्या धवळ्याच्या उत्तरार्धातही म्हाइंभट्टाची जागरूक उपस्थिती संशोधकांना जाणवली आहे. यावरून म्हाइंभटानी केवळ पंथदृष्ट्याच नव्हे तर मराठी वाङ्मयाच्या संदर्भात एक बहुमोल कामगिरी केली; कारण लीळाचरित्रातून पुढे संपूर्ण महानुभाव पंथीयवाङ्मयाने विविध रूपे घेतली या दृष्टीने महानुभाव तत्त्वज्ञानाचा आणि संप्रदायाचा पायाभूत बीजकेंद्री ग्रंथ म्हणजे 'लीळाचरित्र' होच व लीळाचरित्रातून पुढे अनेकपदरी वाङ्मयनिर्मिती झाली की ज्यात शास्त्रीय आणि ललितगद्य निर्मितीला प्राधान्य होते. या दृष्टीने मराठी वाङ्मयाची सुरुवात समृद्ध गद्यातून झाली इतकेच नव्हे, तर पंचकृष्णांपैकी नजिकचा असा अंतिम अवतार जो चक्रधरस्वामी त्यांच्या संपूर्ण चरित्राचे चित्रण अत्यंत सुसंगत पद्धतीने साधले.

पंचकृष्ण चरित्रलेखनाची किंवा संकलनाची प्रेरणा म्हाइंभट्टाला का झाली असावी? हा एक प्रश्न आहे आणि दुसरा प्रश्न म्हणजे म्हाइंभट्टानेच लीळाचरित्राची निर्मिती करताच त्याच्या आगेमागे दत्तात्रय, चांगदेव राऊळ, गोविंद प्रभू यांची चरित्रेही संकलित केलेली आहेत त्याहीमागील प्रमुख प्रेरणा कोणती असावी? म्हाइंभट्टाचे सहकारी संश्लेषण विश्लेषणात मग्न असता म्हाइंभट्टाने मात्र चरित्रनिर्मिती का केली असावी हे बघणे कुतूहलजन्य ठरणार आहे.

पंथीय दृष्टिकोणातून असे दिसते की 'मार्गासी उपयोगा जाईल,' या दृष्टीने पंचकृष्णांचे भूलोकावरील वास्तव्य आणि त्यांचे जीवनदर्शन 'काळाक्षरी प्रतिपन्न' करण्याचा प्रयत्न म्हाइंभट्टाने केला. म्हाइंभट्टाने चरित्रांची जुळवणी केली. त्याच्या नावावर काही

आरत्या आहेत. धवळ्यांचा उत्तरार्धही संशोधक त्याच्या नावावर रूजू करीत आहेत यावरून तो चतुरस्र पंडित आणि विद्वान टीकाकार लेखक होता ही गोष्ट उघडच आहे. 'स्मृतिस्थळा'त म्हाइंभट्टाने सर्व चरित्रग्रंथातील लीळा गोळा करण्यासाठी किती आणि कसकशी मेहनत घेतली. याचे वर्णन आले आहे. आठवणी गोळा करताना त्यांची निवड, पारख आणि यथाक्रम लावण्यात म्हाइंभट्टाने लीळांवर केलेल्या संस्कारांचा फार मोठा ठसा उमटला आहे. वस्तुतः लीळाक्रम हा काळानुक्रमाने पंथीयांकडून म्हाइंभटाला समजत गेला असे नाही परंतु म्हाइंभटांनी नागदेवाचार्यांच्या मार्गदर्शनाखाली लीळांची जुळवणी अशी केली, की त्यातून चक्रधरस्वामींचे चरित्रचित्रण साक्षात झाले. म्हणून म्हाइंभट्ट केवळ संकलनकार आणि संपादन करणारा नसून एका विचक्षण दृष्टीने लीळांची बांधणी त्याने केली व त्याच्या लीळाचरित्राच्या एकखांबी तंबूवर सारी साहित्यसृष्टी महानुभावांची उभ-लेली आहे. 'लीळाचरित्रा'ची निर्मिती होताच एकीकडे त्याचे संस्कृतात रूपांतर करण्याची प्रक्रिया केसोबासाने 'रत्नमाळा स्तोत्रा'त केली तर दुसरीकडे लीळाचरित्रातूनच अनेक शास्त्रीय आणि ललित टीकाटिप्पणींची आणि सूत्रकाव्यग्रंथांची निर्मिती झाली. म्हाइंभट्टाने लीळाचरित्र निर्मितीने महानुभाव वाङ्मयाचा पाया घातला व त्यावर संपूर्ण महानुभाव वाङ्मयाची इमारत उभी राहिली. प्रचंड श्रद्धा, उत्कट आदरभावना आणि पंथीयांचे ईश्वरीकरणाचा लौकिक आदर्श निर्माण करण्याची प्रेरणाच म्हाइंभट्टाच्या पंचकृष्ण चरित्र चित्रणामागे प्रबळ ठरली. आणि अशा प्रेरणेतून चक्रधरांचे 'कृष्णचरित्र' 'दत्तात्रेयचरित्र', 'गोविंदप्रभूचरित्र' आणि 'लीळाचरित्र' यांची निर्मिती झाली. गोविंदप्रभूंची अनुग्रहित, पण चक्रधर विचारांनी प्रभावीत झालेल्या म्हाइंभट्टाने चार-पाच वर्षांच्या कालावधीत सर्व चरित्रे निर्माण केलीत असे दिसून येते व तसे करीत असता वाङ्मयाचा एक प्रकार आपण हाताळीत आहोत याची कुठेही जाणीव नसतानाही चरित्र वाङ्मयाची निर्मिती, निकष आणि वैशिष्ट्ये म्हाइंभट्टाच्या चरित्रनिर्मितीने साक्षात केली व वाङ्मयनिर्मितीच्या ललितसाहित्य निर्मितीला तेराव्या शतकाच्या पूर्वार्धात सुरवात झाली. पैकी 'लीळाचरित्रा'*चा विचार अन्यत्र पूर्वीच केला असल्यामुळे तो वगळता, इतर चरित्रांची वाङ्मयीन स्वरूपकक्षा शोधली पाहिजे.

गोविंदप्रभुचरित्र

'ऋद्धिपूरलीळा' किंवा 'ऋद्धिपूरचरित्र' हे म्हाइंभटाचे दीक्षा गुरू गोविंदप्रभू यांचे जीवनचरित्र ठरते. शके १२०८ ते ९ हा गोविंदप्रभूच्या निधनाचा काळ आहे. त्यावरून ऋद्धिपूरलीळांची म्हणजेच गोविंदप्रभूच्या चरित्राची निर्मिती शके १२१० मध्ये झाली आहे. असे थोर संशोधक डॉ. वि. भि. कोलते मानतात. एक गोष्ट येथे स्पष्ट होते की म्हाइंभटाने रचण्यास घेतलेली चरित्रे ही त्या अवतारांच्या मृत्यूनंतर होणाऱ्या प्रचंड

---

* पहिले मराठी गद्य. चक्रधरांचे व्यक्तिमत्त्व.

विरहातून निर्माण झालेली आहेत. लीळाचरित्र, गोविंदप्रभुचरित्र, चक्रपाणिचरित्र या निर्मितीवरून स्पष्ट होते आणि 'स्मृतिस्थळ' ही नागदेवाचार्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या विषयीच्या आठवणी नरेंद्र आणि परसराम यांनी गोळा केल्या व त्यावर संस्कार केले व त्यांची पुर्नमांडणी मालोबास व गुर्जर शिवबास यांनी केली.

पंचकृष्णातही दत्तात्रय हे आदिकारण चक्रधरांनी मानले आहे. 'या मार्गासि श्रीदत्तात्रेयप्रभू आदिकारण' 'जैसे द्वापारी श्रीकृष्ण चक्रवर्ती। जैसे सह्याद्री श्रीदत्तात्रेय प्रभू। जैसे द्वारावतीचे श्रीचांगदेवो राउळ। जैसे ऋद्धिपुरी श्री गुंडाराऊळ। जैसे प्रतिष्ठानी श्री चांगदेवो राउळ॥'[१] वरील सूत्रात कृष्णावताराचे नाव आधी आलेले असले तरी दत्तात्रयप्रभूचे आदिकारण चक्रधरांनी सांगितले आहे कृष्णावतार द्वापारयुगातील आहे आणि दत्तात्रयप्रभूचा अवतार त्रेतायुगातला असला तरी तो 'चतुर्युगी अवतारू' असा एका विशिष्ट युगकल्पनेशी बांधलेला अवतार नाही. याच दत्तात्रयप्रभूनी व्याघ्रवेषात चांगदेवाला दर्शन देऊन शक्तिस्वीकार करवून घेतला. चांगदेव राऊळांचा गर्भावतार असून तो आच्छादनीच अवरदृश्यावतार आहे. चांगदेव राऊळानी गुंडम राऊळाला संन्यासदीक्षा देऊन शक्तिस्वीकार दिला. गुंडमराऊळाचा हा अवतार 'आच्छादनीचा परदृश्यावतार' होता. पर आणि अवर विद्या जाणणारा असा हा अवतार पण त्यांनी अवर विद्या आच्छादून टाकली म्हणून त्यांना 'आच्छादनीचा परदृश्यावतार' म्हटले गेले.

चक्रधर हा पंचकृष्णापैकी अखेरचा अवतार. हरपाळ देवाच्या मृत शरीरात चांगदेव राऊळांचा आत्मा येऊन तो देह सजीव झाला. म्हणून चक्रधरांना पतितावतार असे संबोधिले जाते. रिद्धीपूर येथे विरक्त होऊन भटकत असता गुंडमराऊळांनी प्रसाददान देऊन शक्तिस्वीकार घडविला. व 'चक्रधर' हे नावही गोविंदप्रभूनी हरपाळदेवाला दिले. चक्रधरांनी उधळीनाथाकडून वयस्तंभिनी विद्याही स्वीकारली होती. चांगदेव राऊळाचा आत्मा आणि हरपाळचा देह असे त्यांचे व्यक्तित्व होते परंतु सूत्रपाठात चक्रधरांविषयी 'प्रतिष्ठानीचे चांगदेव राऊळ' असे म्हटले आहे यावरून द्वारावतीचे चांगदेव राऊळ म्हणजे महानुभाव पंथाचे तिसरे ईश्वरी अवतार व प्रतिष्ठानचे चांगदेव राऊळ म्हणजे चक्रधर पंचकृष्णांपैकी पाचवे अवतार. चक्रधरांचे ठिकाणी चांगदेव राऊळांना दत्तात्रयाने दिलेली अवरशक्ती व गोविंदप्रभूची परशक्ती या दोहोंचा मिलाफ झाला यावरून आदिकारण दत्तात्रेय चांगदेव गोविंदप्रभू चक्रधर अशी पंचकृष्णांपैकी चार ईश्वरी अवतारांची परंपरा आहे व कृष्णावतार हा स्वतंत्र अवतार असून त्याचाच प्रभाव मात्र महानुभाव वाङ्मयसृष्टीत अतिशय खोलवर रुजलेला आहे.

आद्य मराठी दत्तसंप्रदाय

डॉ. तुळपुळे यांनी 'महानुभावपंथ आणि त्याचे वाङ्मय' याग्रंथात महानुभावपंथ म्हणजे दत्तसंप्रदाय असून या संप्रदायाची महाराष्ट्रात प्रतिष्ठापना करण्याचे श्रेय महानुभाव

---

१. सूत्रपाठ : पंचकृष्णविवरण.

पंथाला द्यावे लागते'[१] असे विधान केले आहे व त्यासाठी डॉ. कोलते यांच्या सह्याद्रि-वर्णनाच्या प्रस्तावनेचा दाखला दिलेला आहे. पंचकृष्णापैकी कृष्णावताराला दत्तसंप्रदायाचे मानणे अशक्य आहे हेही डॉ. तुळपुळे यांनी मान्य केले आहे. आज अधिमान्य असलेल्या दत्तसंप्रदायापेक्षा दत्तात्रयप्रभू पुरस्कृत दत्तसंप्रदाय भिन्न होय असेही डॉ. तुळपुळे सांगतात. आणि दत्तात्रेय, चक्रपाणी, गोविंदप्रभू आणि चक्रधर हे चार अवतार दत्तपरंपरेतील आहेत असेही त्यांचे विधान आहे. श्रीपाद श्रीवल्लभ नृसिंह सरस्वतींचा दत्तसंप्रदाय हा आजही टिकून आहे व त्याची आचारसंहिता आणि विचारसंहिता स्वीकारणारा समाज स्वतःला दत्त सांप्रदायिक म्हणवून घेत असतो. या अर्थाने महानुभाव दत्तसांप्रदायिक नाहीत. 'दत्तात्रेय हे त्याचे आदिकारण' असे सूत्रवचन असले तरी चक्रधरांनीच पंच-कृष्णांची जी व्यवस्था सुचविली आहे तीत श्रीकृष्ण चक्रवर्तीचा उल्लेख प्रथम आहे. सर्व देशभर आजही जयकृष्णीपंथ म्हणून महानुभावपंथाला ओळखले जाते. चक्रधरस्वामी स्वतःलाच कृष्णावतार म्हणवून घेतात आणि संपूर्ण महानुभाव वाङ्मयाची साक्ष घेतली तर चक्रधर आणि श्रीकृष्ण या दोन विषयांवरच महानुभाव वाङ्मयाची इमारत उभी आहे. 'दत्तात्रय चरित्र' आणि 'सह्याद्रिवर्णन' हे दोनच उपलब्ध दत्तात्रेय चरित्र-चित्रणाचे पुरावे आहेत. महानुभावपंथ हा विशुद्ध दत्तसंप्रदायी नाही किंवा दत्तकृष्णैक्यही त्यात नाही. कारण पंथाची वैचारिक घडण आणि आचारधर्म सर्वार्थाने चक्रधरांनी घडविलेला आहे व चक्रधर स्वतःला कृष्णावतार म्हणवून घेतात. यावरून 'आदिकारण' या संकेताचा अर्थ परंपरासूचकच ठरतो. अन्यथा दत्तपंथाप्रमाणे, चक्रपाणिपंथ आणि गुंडमपंथ असे प्रत्येक ईश्वरी अवतारांचे नावे पंथसंप्रदाय निर्माण झाले असते. चक्र-धरांच्या संपूर्ण विचारविश्वावर आणि लौकिक जीवनव्यवहारावर कृष्णजीवनाची छाप आहे. चक्रधरांच्या विचारांची तात्त्विकता आणि लौकिक जीवनातील क्रीडावृत्ती कृष्ण-जीवनाशी समांतर ठरते. इतकेच नव्हे, तर गोविंदप्रभूनीही 'वीव्हावो स्वीकारू' या लीळेत द्वापारयुगात आपण कृष्णचक्रवर्ती होतो असे म्हटले आहे. यावरूनही 'आदिकारण' म्हणजे परंपरेत दत्तात्रयाला स्थान असले तरी महानुभावपंथ, कृष्णपंथ किंवा कृष्ण-भक्तिपंथच प्रामुख्याने ठरतो. मान्यताग्रंथ असे साती ग्रंथांतही कृष्णमाहात्म्यच प्रदर्शित झाले आहे. घवळ्यांमध्ये कृष्णभक्तीच साक्षात झाली. याच काळातील दुसरे उदाहरण म्हणजे कृष्ण विष्णू शिव यांना एकात्मदृष्टीने बघणारा वारकरी संप्रदाय हा केवळ कृष्ण-संप्रदाय किंवा विष्णुसंप्रदाय किंवा शिवसंप्रदाय म्हणून नावाजला गेलेला नाही, तर तो मूलतः विठ्ठलसंप्रदायच आहे. त्याचप्रमाणे मूळ आदिपुरुष दत्तात्रयप्रभू असले तरी चक्रधरांनी प्रवर्तित केलेला व कृष्णभक्तीचा प्रचार आणि प्रसार करणारा महानुभाव संप्रदाय कृष्णभक्तिसंप्रदायच ठरतो. 'कदाचित मार्गास अदिकारण श्री दत्तात्रेयप्रभू झाले असले तरी पुढे श्रीकृष्णावतार अधिक प्रभावी ठरल्याने त्या आदिकरणाची पंथियांच्या

---

१. महानुभाव पंथ आणि त्याचे वाङ्मय : पृष्ठ ५, ओळ आठवी.

मनातील आठवण किंचित पुसट झाली असणे शक्य आहे. किंवा एकंदरीतच तेराव्या शतकातील मराठी वाङ्मयावर जो कृष्णभक्तीचा प्रभाव आहे त्याचे हे द्योतक असावे. महानुभावीय वाङ्मय प्राधान्याने दत्तभक्तीने नव्हे, तर कृष्णभक्तीने उजळलेले दिसते इतके मात्र खरे.' [१] असे डॉ. तुळपुळे यांना कबूल करावे लागले आहे. वास्तविक मूळ वस्तुस्थिती अशी की, महानुभाव पंथाचे सर्जक आणि व्यवस्थापक चक्रधर आहेत आणि दत्तात्रयाविषयीची 'संबंधी मते' चक्रधरांची आहेत यावरून तेराव्या शतकातच नव्हे, तर आजही भारतीय जीवनावर कृष्णभक्तीचा फार मोठा पगडा आहे. तसा दत्तसंप्रदायाचा आणि विशेषतः महानुभावपंथाने स्वीकारलेल्या दत्तात्रयाचा कुठेही नाही तर पंचकृष्णांपैकी एक असे महानुभाव दत्तात्रयाचे स्वरूप आहे अन्यथा पंचदत्तात्रय असेही सर्व पंचकृष्णांच्या संदर्भात चक्रधरांनी म्हणवून घेतले असते. वस्तुस्थिती तशी नाही तर पूर्वपरंपरेत दत्तात्रयाला चक्रधरांनी स्थान दिले व तोही वैशिष्ट्यपूर्ण असा मानला इतकेच !

चक्रपाणी, गोविंदप्रभू आणि चक्रधर हे तिन्ही ईश्वरी अवतार आपला पूर्वावतार कृष्णावतार होता असे स्पष्टपणे सांगत असता किंबहुना इतकेच नव्हे, तर सर्व पंथीय भक्तमंडळही चक्रधरस्वामींना 'आमचे गोसावी साक्षात श्रीकृष्णचक्रवर्ती' अशा आत्यंतिक श्रद्धाशील भूमिकेतूनच न्याहाळतात याचाच अर्थ असा की कृष्णावताराशी मनाने चक्रधरांचे जे सामंजस्य होते त्याचाच प्रभाव भक्तमंडळावरही पडलेला आहे. व आजही सर्वत्र महानुभावांची कृष्णमंदिरे पसरलेली आहेत. म्हणून आद्य दत्तसंप्रदाय किंवा दत्तकृष्णैक्य पंथ असेही देशभर महानुभाव संप्रदायाला न म्हणता तो निखळ कृष्णभक्तिपंथ ठरतो व पंथीय लोकही तसेच मानतात. पत्राचा श्रीकारही 'वन्दे जयकृष्ण' असाच महानुभावपंथीय मंडळी करतात. 'पंचकृष्ण' या संकल्पनेतही दत्तात्रय अवताराला कृष्णावतारच मानले गेले हा तपशीलही अतिशय बोलकाच आहे.

महानुभाव वाङ्मयाचे वर्गीकरण

महानुभाव वाङ्मयाचे वर्गीकरणात चरित्रग्रंथ, भाष्यग्रंथ (तत्त्वचिंतनपर), साधनग्रंथ, काव्यग्रंथ, स्थलवर्णनपर ग्रंथ, इतिहास ग्रंथ, तात्त्विक ग्रंथ (भाष्यपर) असे विभाग करता येतात. पैकी चरित्रग्रंथ म्हणजे पंचकृष्णचरित्र व नागदेवचरित्र अशी एकूण सहा चरित्रे उपलब्ध आहेत. महानुभाव संप्रदाय या चरित्रग्रंथांना स्मृतिरूप मानतो; कारण साक्षात चक्रधरांची वचने म्हणजे श्रुती होत. पंथसंस्थापक चक्रधर वचनांना महानुभावपंथात अनन्य स्थान आहे. लक्षणरत्नाकरात 'तत् त्रिविधम्। श्रुतिस्मृतिवृद्धाचारनिर्णयाख्यम्' असे म्हटले आहे, तर बत्तीसलक्षण टीपग्रंथात 'भणौनि परमेश्वरोक्त सूत्रमात्र श्रुति शब्दे बोलिजेः परमेश्वराचे विहरण वर्तन दाविले तैसे स्मरौनि अधिकरणे साधिकरणाप्रति निरूपिले जे लीळाचरित्र ते स्मृति बोलिजेः परमेश्वराचा आणि अधिकरणाचा वृत्तानु

---

१. महानुभाव पंथ आणि त्याचे वाङ्मय : डॉ. शं. गो. तुळपुळे, (पृ. ११, ओळ एक.)

विचारू व्यवहारू तो साधिकरणी केशवादी महानुभावी बंधी लिहिला तो वृद्धाचारू ऐसे श्रुतिस्मृतिवृद्धाचारे त्रिविधप्रमाणः जाणावेः ॥[१] ' मार्गारूढी आणि वर्तमानाचा उल्लेख यात नाही; कारण पुढच्या काळात ' प्रमाणबांधणी ' झाली. स्मृतिरूप लीळाचरित्र, नागदेवाचार्यांची अखेर ' स्मृतिस्थळा 'त तर नागदेवाचार्यांच्या मृत्यूनंतर नागाइसेच्या अंतापर्यंतचा वृत्तकथनपर ' वृद्धाचारा 'त येतो. पुढच्या गुर्जरशिवव्रासापर्यंतचा ' मार्गारूढ 'मध्ये व पुढील सर्व भाग ' वर्तमान ' मध्ये एकत्रित केला गेला.

चरित्रग्रंथ निर्मितीची प्रेरणा

म्हाइंभट्टाने लीळाचरित्र, गोविंदप्रभूचरित्र, चक्रपाणीचरित्रपर लीळा संकलीत केल्या तर नागदेवाचार्यांच्या सान्निध्यात; पंथाच्या आचार्यांच्या मार्गदर्शनाखाली चक्रधर लीळा गोळा केल्या गेल्या व तेव्हापासूनच ३/४ वर्षांत म्हणजे शके १२०५ पासून शके १२१० पर्यंत चक्रधर निरूपित ' श्रीकृष्णचरित्रलीळा ', ' चांगदेवचरित्रलीळा ', ' गुंडम राऊळ चरित्रलीळा,' ' दत्तात्रयचरित्रलीळांचे ' संग्रह म्हाइंभट्टाने तयार केले. नंतरच्या काळात म्हणजे गुंडम राऊळांच्या मृत्यूनंतर तयार झालेल्या गोविंदप्रभू चरित्रानंतर जवळजवळ वीस वर्षांनी ' स्मृतिस्थळ ' म्हणजे नागदेव या पहिल्या आचार्यांची ' चरित्रलीळा ' नरेंद्र आणि परशराम यांनी संगृहित केली. अर्थात स्वतंत्र चरित्रलीळानिर्मिती झालेली असूनही मूळ लीळाचरित्रात वरील पंचकृष्णांचे आणि नागदेवाचे जीवनसंदर्भ मिसळून गेलेले आहेतच. याचे एकच उदाहरण म्हणजे नागदेव आचार्यपदी आल्यापासूनचे चरित्रचित्रण ' स्मृतिस्थळ ' सांगते त्यांचे पूर्वचरित्र लीळाचरित्रातूनच व्यक्त झाले आहे.

सर्व चरित्रग्रंथांची लेखनप्रेरणा ही ईश्वरभक्ती आणि पंथप्रचार व प्रसारातून आदर्श गिरविण्याचा होती. नागदेव आचार्यपदी येताच त्यांची भूमिकाही एकीकडे पंथप्रचार व दुसरीकडे विचारव्यवस्थापन हीच होती. म्हणून चक्रधरांच्या निर्वाणानंतर सर्व भक्तमंडळी एकत्रित जमली असता विद्वान अशा म्हाइंभट्टाकडून आपल्या मार्गदर्शनाखाली चक्रधरचरित्र चित्रणाचा आणि जीवनसिद्धांतनाचा आदर्श नागदेवाचार्यांनी निर्माण केला. ही सर्व चरित्रचित्रणे म्हणजे त्या त्या व्यक्तिमत्वांची संपूर्ण जीवनचित्रणे नाहीत तर स्मृतिरूप आणि लीळारूप अशी आठवणींचा संग्रहरूप चरित्रे आहेत. नामदेवाने गाइलेल्या चरित्रांत जशी जन्ममृत्यूची संगती साधली गेली तोही प्रकार महानुभाव चरित्रात नाही; कारण त्यामागील भूमिकाच ईश्वरी अवतारांचे गुणसंकीर्तन करण्याची आहे. ईश्वरी अवतार मानवी देहरूपात कसा राहिला हेच शोधण्याचा प्रयत्न लीळाकथनातून झाला. द्वापारीच्या लीळा म्हणजे कृष्णचरित्र, सैह्याद्रीच्या लीळा म्हणजे दत्तात्रय चरित्र, द्वारावतीच्या लीळा म्हणजे चांगदेव चरित्र, रुद्धिपूरच्या म्हणजे गोविंदप्रभूचरित्र, सर्वज्ञराज्य लीळा म्हणजे चक्रधरचरित्र अशी नावे महानुभावात रूढ झाली आहेत. त्यावरून ईश्वरी अवतार आणि त्याचे स्थानमाहात्म्य व जीवनाची संपूर्ण आकलनकक्षा

---

१. लक्षण रत्नाकर : ह. ना. नेने (बत्तीस लक्षणी टीप, पृ. ७)

मांडण्याचा प्रयत्न म्हाइंभट्टाने केलेला आहे. लीळाकथनात सूक्ष्मता आणि मार्मिकता आलेली असली तरी ती ईश्वरी अवताराच्या गुणवर्णनात काही चूक होऊ नये या दृष्टिकोणातून आलेली आहे. आज ज्या निकषांच्या साह्याने चरित्र हा वाङ्मयप्रकाराचा विचार आपण करतो त्या सर्व मूल्यांसह तेराव्या शतकातील चरित्रवाङ्मयाकडे जाता येत नसले तरी चरित्रनिर्मितीचा पहिला ओनामा तेराव्या शतकातील चरित्रकारांनी घालून दिला. विभूतिमत्त्वाने दिपून गेलेले भक्तगण आपल्या ईश्वराचे जीवन सलग, एकसंध पद्धतीने मांडण्याचा पहिला प्रयत्न करतात त्यावेळी बोलीभाषेचा गंध, भक्तमनांची तळमळ आणि चरित्रनायकाविषयीचा कमालीचा आदरभाव यांचे मोठे विलोभनीय संमिश्रण पहिल्या चरित्रनिर्मितीतून व्यक्त झाले. आठवणीरूप ईश्वरी अवताराचे यथातथ्य चित्र रेखाटून परस्परांनी परस्परांना सांगणे व त्याचे गुणरूप मनःकोषात जतन करून ठेवण्यासाठी पुनःपुनः आळविणे अशी सर्व चरित्रनिर्मितीमागील मूलगामी भूमिका आहे आणि प्रेरणाही आहे. सूत्रमयता, यथातथ्यता, उत्कटता, भावपरता, सलगता आणि अल्पाक्षररमणीयता अशी गुणरूपे चरित्रनिर्मितीला आली व विरहशमनाची किंवा गुणसंकीर्तनाची भूमिका असूनही चरित्राची सलग घडण म्हाइंभट्टाच्या संपादन संकलन कौशल्याने पहिल्याच समृद्ध चरित्रनिर्मितीत साक्षात झाली. वर्णनपरता, अनुभवजन्यता आणि शब्दचित्रात्मकता ही चरित्रनिर्मितीची गुणरूप वैशिष्ट्ये ठरली. चक्रधरनिरूपित श्रीकृष्णचरित्राचे, दत्तात्रय चरित्राचे, चांगदेव राऊळ चरित्राचे संकलन, संपादन आणि एकसूत्रीकरण म्हाइंभट्टानेच केलेले असले तरी गोविंदप्रभूचरित्र आणि विशेषतः 'लीळाचरित्र' या दोन चरित्रग्रंथांनी म्हाइंभट्टाचे कर्तृत्व उजळून निघाले.

महानुभाव चरित्रनिर्मितीच्या संदर्भात लीळाचरित्र म्हणजे महानुभाव सांप्रदायिकांचे महाभारतच आहे; कारण त्यात चक्रधर संप्रदाय आणि भक्तगण यांचा जवळजवळ संपूर्ण तपशील येऊन गेलेला आहे. म्हणजे एका अर्थी 'लीळाचरित्र' म्हणजे केवळ चक्रधरचरित्राचे चित्रण नसून सूर्योदय होताच संपूर्ण आसमंत प्रकाशमान व्हावा त्याप्रमाणे चक्रधरचरित्र चित्रणात संपूर्ण महानुभाव संप्रदायाचा चालतावोलता तत्त्वग्रंथ, भक्तग्रंथ, आचारग्रंथाचे स्वरूप त्यास आलेले आहे. परिसस्पर्शाने लोखंडाचे सोने व्हावे तसे चक्रधरजीवनात आलेली सर्व भक्तमंडळी एकीकडे चक्रधरांच्या प्रचंड व्यक्तिमत्त्वाने भारावून गेलीत आणि त्यांनाही जीवनमार्ग मिळाला. अशा आठवणी ते चक्रधर प्रयाणानंतर आठवू लागले व त्याची सुगंधित लीळारूप पुष्पांची माला म्हाइंभट्टाने गुंफली. लीळाचरित्रात अविषय जसा पंथ संदर्भात राहिला नाही, त्याचप्रमाणे चक्रधरांचा ज्या ज्या व्यक्तींशी घनिष्ट संबंध आला होता त्यांचेही लीळाउल्लेख लीळाचरित्रात येऊन गेले आहेत. अशा वेळी 'गोविंदप्रभूचरित्र' निर्मितीस म्हाइंभट्टाने सुरुवात करताच मूळ लीळाचरित्रात येऊन गेलेल्या तपशीलाची पुनरुक्ती होऊ दिलेली नाही यातच चरित्रकाराची मार्मिकता, अचूकता, सूक्ष्मता स्पष्ट होते.

गोविंदप्रभुचरित्रात हरपाल व गोविंदप्रभू यांच्या प्रथम भेटीचा वृत्तान्त नाही तसेच

नागदेवाला ऋद्धिपूरला पाठविले असता त्याच्याही हकिकती गोविंदप्रभुचरित्रात आलेल्या नाहीत. कारण त्यापूर्वीच म्हाइंभट्टाने लीळाचरित्रातून गुंफलेल्या आहेत. डॉ. कोलते यांनी गोविंदप्रभुचरित्राचा नवेपणा कोणकोणत्या बाबतीत आहे ते स्पष्ट केलेले आहे. वऱ्हाडी बोलीचा अस्सल तेराव्या शतकातील जिवंत नमुना म्हणून गोविंदप्रभुचरित्राचे महत्त्व आहे. कारण गोविंदप्रभूचे भक्तगणही वऱ्हाडी, लेखनस्थळही रुद्धिपूर आणि चरित्रनायकही खास वऱ्हाडी आहे. लीळाचरित्रात 'स्वामी अविरत मऱ्हाटी बोलीत असे' असे म्हटले असले, तरी नाही म्हटले तरी चक्रधरस्वामी हे मूळ गुजराथी असल्यामुळे त्यांच्या मराठीवर गुजराथीचा परिणाम असणे अशक्य नाही या दृष्टीने वऱ्हाडचे गोविंदप्रभू वऱ्हाडी बोलीतूनच भक्तगणांशी संवाद साधीत असतील व भक्तांनी आठवलेल्या लीळाही खास बोलीभाषेचे रूप घेऊनच अवतीर्ण झाल्या आहेत. तसेच विदर्भाची भौगोलिक परिसीमाही गोविंदप्रभू-चरित्रातून समजते व तत्कालीन विदर्भाच्या स्थळमर्यादेचा निर्देश मिळू शकतो याही दृष्टिकोणातून डॉ. कोलते यांनी गोविंदप्रभूंच्या चरित्रचित्रणाचे महत्त्व लक्षात घेतले आहे.

पंथीय आचारधर्माचा एक भाग म्हणजे 'एथीची' चक्रधरांचे चरित्र आठवणे, ऐकणे, सांगणे आणि मनन करणे. स्मरणपूर्वक चिंतन करणे ही महानुभावांची आचार-पद्धती आहे, त्याप्रमाणे चक्रधरांच्या प्रयाणानंतर नागदेवाचार्य सतत चक्रधरांच्या संबंधी-लीळांचे स्मरण करीत असत. चक्रधरावरोबरच, गोविंदप्रभू, चांगदेवराऊळ यांच्या आख्यायिकाही स्मरणात असत. आख्यायिकांतून व्यक्त होणारे ईश्वरी अवतारांचे जीवन-चित्रण संस्कारपूर्ण पद्धतीने लिहून ठेवण्याची आवश्यकता म्हाइंभट्टाच्या लक्षात आली व नागदेवाचार्यांच्या मार्गदर्शनाखाली लीळासंकलन झाले. गोविंदप्रभूंच्या चरित्राची निर्मितीही याच पद्धतीने झाली. नागदेवांना विचारून आणि भक्तजनांकडून आठवणी गोळा करून त्यांना आदि पुरवून नीटनेटकी संदर्भासह मांडणी करून गोविंदप्रभूचरित्राला नीटस रूप दिले गेले. मराठीतील पहिले चरित्र वाङ्मय असे कथारूप घेऊन अवतरले.

गोविंदप्रभू म्हणजे महानुभाव संप्रदायाचे चौथे ईश्वरी अवतार. त्यामुळे त्यांच्या-संबंधीच्या आख्यायिका गोळा करताना त्यांच्या संबंधीचा आदर आणि ईश्वरीपण लक्षात घेऊनच त्यांच्या आयुष्यातील विविध प्रसंग आणि काही चरित्रप्रसंग यांच्या साह्याने चरित्रवर्णन येते. 'नेणीजे हा गुंडे कोणु : हा इस्वर अवतारू होये' इस्वर एकू असे : भटी म्हणीतले : हो असे : तव तेही म्हणीतले 'कवणे ठाई असे' : तव भटी म्हणीतले : 'हा नव्हे देवो, : रीधपुरी राज्य करित असेति' यावरून चरित्रनायकाचा ईश्वरी अवतार आणि भक्तांची त्याच्यासंबंधीची नितांत आदरभावना यांमधून प्राचीन मराठी गद्य वाङ्मयाची घडण घडत गेली.

महानुभावांनी ईश्वरी अवताराचे पाच प्रकार मानले आहेत. त्यांपैकी गोविंदप्रभूचा अवतार अच्छादनीचा परहस्यावतार होय. परमेश्वर तीन प्रकारांनी अवतार घेतो. गर्भ, पतित आणि दवडणे. त्यात गोविंदप्रभूचा अवतार 'दवडणे' या प्रक्रियेतून झाला. या प्रकारात ईश्वर मातेच्या गर्भातून जीवाला दवडतो आणि तेथे आपण अवतार घेतो.

अशा वेळी दवडलेल्या जीवाचे देहधर्म व स्वभावविशेष तो स्वीकारतो. गोविंदप्रभूचा दवडलेला जीव वेडापिसा होता म्हणून गोविंदप्रभूही वेडेपिसे झाले. गोविंदप्रभूची बुद्धिमत्ता प्रखर होती. वेदांचे अध्ययन, भूतभविष्याचे ज्ञान, मृत जिवंत करणे, पर्जन्य बोलावणे, सूर्याला बोलावणे असे चमत्कारही ते करीत. पांगळ्याला पाय देणे, मुक्याला वाचा देणे अशी भूतदयावादी दृष्टी त्यांची होती. त्यांच्या डोक्यातून व शरीरातून प्रकाश बाहेर पडत असे (३, १५, ३१, ३२) त्यांनी केलेल्या अनेक चमत्कारकथा गोविंदप्रभूंच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाची साक्ष देतात.

विचारबंदकाराने गोविंदप्रभूचे बाह्य व्यक्तित्व चांगले स्पष्ट केले आहे. 'श्री प्रभु आर्य : हे आर्य नागर : श्रीकृष्ण चक्रवर्ती हे नागर : (विचारसूत्र : ८०) यावर टीका करताना बंदकार म्हणतो, 'आर्य म्हणजे आरिखपण : म्हणजे मनुष्यव्यवस्थेसी असारखेपण : मा ते आरिखपण कैसे : उठणे ना म्हणजे शीघ्रता : बैसणे म्हणजे उकडे : तथा श्रीचरणावर श्रीचरण घालौनी : चालणे म्हणजे गगनाची वास पाहत : तथा दुडुदुडु धावणे : बोलणे म्हणजे वेंमळ : तेचि कैसे : ना : मेली आली : तथा : मेली गेली : तथा तोचि शब्द पुनः पुनः बोलणे : घेणे म्हणजे असुडती : तथा लाख भाकर : आमलक : तथा बदरीफळे बलात्कारे घेणे : देणे म्हणजे टाकुन घालणे : यथा सेंगुळ बुडडे : नेसणे म्हणजे सोळा हात वस्त्र मीरीया घालौनि सीर पालव घेणे : पांगुरणे म्हणजे सव्य भाग टाकौनि वामांगी पदर घेणे : जेचि वेढणे : तेचि पांगुरणे : ऐसा वेष आरिख म्हणजे मळवट : कुंकुम भरणे : माथा भांग खोजा जवादि भरणे : कर्णी सुखडी: पायी बाकी : गळा साखळ : मुकुटी तेल : वेणी : नाभिचुंबित खाड (दाढी) तथा स्मश्रु : श्रीकर भवंडणे : टाका भवरी देणे : विहरण वर्तन आवघे आरिख हे वेषाचे अंगीकृत : तरि मूर्ती आरिख ते कसी : नापुराचे सौंदर्य ते नाही : आन मूर्ती शामगौर : आणि वामनेत्र लावणे : वाम कनिष्ठिका वक्र करणे : हे मूर्तीचे आरिखत्व : गोविंदप्रभूंच्या व्यक्तिमत्त्वाचे अतिशय सूक्ष्म वर्णन बंदकाराने म्हाइंभट्टाइतक्याच सश्रद्ध अन्तःकरणाने केले आहे.

इतरांना वेडावणे, हातशरे फिरविणे आणि भरमसाठ खात राहणे याही त्यांच्या काही सवयी लीळांमधून येतात. किंबहुना वृद्धापकाळी अती खादाडपणातच त्यांचा अंत झाला होता. गुंडम राउळांच्या लोकविलक्षण वागणुकीमुळे लोकही त्यांना राउळ वेडे : राउळ पिसे : वेडे : पिसे : असे म्हणत असत. बाहेर वेष बावळा असला तरी गोविंद प्रभूच्या ठिकाणी अन्तरी नाना कळा होत्याच. कडकडीत वैराग्याने लखलखून निघालेले ब्रह्मचर्य, विद्वत्ता, करुणा, मानवता आणि सहृदयता हे गुण या ईश्वरी अवतारात वस्ती करून होते.

चीचोरा खेळु, केसवनाएकाचीए पव्हेचे उदकपान, मातांगग्रही खेळु, मातांग वीनवणी स्वीकारू, खाटिकासी खेळु, सींपेग्रही पहुडु, कांसारवाडे या बीजे करणे, बंदेश्वरी पहुडु, पोळाचे बैल बुजवणे, वीव्हावो स्वीकारू, आळकवसा मागणे, कोथळा नाम करणे, कोथळोवा भेटी, साधां सीक्षापणे, दारवठा नीबंध, नरसीदासी खेळू, नगरस्त्रीचा वोवाळणी,

महदाइसी रंगमाळीका भरणे या आणि अशा कितीतरी लीळा गोविंदप्रभूंच्या लौकिक आणि अलौकिक जीवन जगण्यातील क्षण उजळून टाकणाऱ्या झाल्या आहेत.

शिष्यवर्गाचे ईश्वरी अवतारांविषयीची उत्कट श्रद्धा, नितांत आदर, प्रगाढ आपलेपणा यामधून ईश्वरी अवतारांचे लौकिक अनेकपदरी व अलौकिक एकपदरी व्यक्तिमत्त्व साक्षात होत जातेच पण त्याबरोबरच सभोवतालचा परिसर आणि माणसेही स्वभावधर्मासह अतिशय अचूकपणे टिपली गेली आहेत. सर्वच चरित्रग्रंथांतून असे घडते. एका नैसर्गिक जिव्हाळ्याने आणि आपुलकीच्या मधाळ धाग्याने परस्परांशी जुळत गेलेली नातीगोती आणि त्यांचा गोतावळा रूपवान होत जातो. गोविंदप्रभूचरित्रातही असेच घडते. महदंबेने आपल्या ईश्वरी अवताराचे स्वास्थ जोपासणे स्वाभाविकच ठरले आहे. 'जया वाटा गोसावी खेळावया बीजे करीती म्हणौनि माहदाइसे बीदी गोदरीचा झाडे ती : सडा घाले ती : उतरी लीए दारवठे या आंतुः चौक रंगमळिका भरीती : पुढे दाटा भरीती : दाटे पद्मे रेखीति : तव गोसावी बीजे केले : खेळौनि बीजे करीति : रंगमाळिका चुकौनि श्री चरणु ठेवीति : तवं पुढे दाटा रंगमालिका असे ति : मग माहदाइसे म्हणितले 'जी जी ! आता जाइ ओ : आपुलेनि ऐश्वर्ये : ' कदाचित भट म्हणति : आणि गोसावी हास्य स्वीकारीति : मग श्रीचरण देतिः बीजे करीती : ऐसे जब माहादाइसे होती तवं प्रतीदीनी करीति : ॥ ९० ॥ या लीळेवरूनच एक प्रसंगनाट्य, भावनाट्य किती कंगोरेदार पद्धतीने व्यक्त होते याची साक्ष पटते. यथातथ्य प्रसंगनिर्मिती आणि व्यक्तिजीवनाचे अनंत बारकाव्यांसह साक्षात झालेली भक्तमंडळी, त्याचे परस्परांचे भावजीवन, जपलेले अपूर्व क्षण आणि प्रसंगातील नाटयमयता हे गोविंदप्रभूच्या चरित्रलीळांचे गुणरूप होय. लीळाचरित्राची जी संवाद शैली आहे तीच गोविंदप्रभूचरित्रातही आहे; कारण म्हाइंभट्टांनीच त्यांचे संकलन, संपादन केलेले आहे. भूमीतून नैसर्गिकपणेच रोपाची वाढ व्हावी आणि त्याच्या कोवळेपणामुळे, नाजुकपणामुळे, टवटवीतपणामुळे मन हरखून जावे तसे छोट्या छोट्या लीळांमधून एकीकडे चरित्रनायकांचे ईश्वरीपण अभिव्यक्त होत असते तर दुसरीकडे संपूर्ण प्रसंगच परिपूर्ण होऊन अवतरत असतो. गोविंदप्रभूंच्या मृत्यूचा प्रसंगही असाच चटका लावणारा आणि मनात कुठेतरी खोलवर परिणाम घडविणारा ठरला आहे. 'मग गोसावी सावीयासि वृद्धत्व स्वीकरीले : श्रीकंठु : श्रीमुगुटु : श्रीकर : सावीयासि थरथरा कांपति : मग आरोगणा करीति : ते अण्ण पचेना : मग बाहीरितीचा उपद्रो स्वीकारीला : 'आणि तैसेचि वय संवत्सरी भाद्रपदवदि चौथीचा दीसी गोसावी बीजे केले ' ॥ ३२२ ॥ सावळापुरी गोसावी याची लेकी होती : तिचा घरी आइकीले : जे गोसावी नीजधामा बीजे केले : एकी वासना : ते पाणिया गेली होती : तेथ पाणिवठा आइकीले : आणि पाणीवठा घागरी ठेविली आघवी वाट बापा कारणे रडिजे : तव पैलीकडुनी गोसावियाची लेकी आली : कीडडीः देखीली : आणि धडकरी आंग टाकले : ते मूर्च्छना आली तव भट म्हाइंभट धावत आले : मग हालळ वील्हली रडो लागली : श्रीमुर्तिवरी पडे : 'माझे माहेर गेले : ' म्हणौनि आलाप आलापी रडो लागली : ऐसे

तिचे दुख देखौनि : भट म्हाइंभट हृहयस्पूट झाले : अवघेया भक्ताथोर दुख जाले : भटी म्हाइंभटी म्हणितले : हे साचोकारी गोसावियाची लेकी होए : मग भटी म्हणितले 'आमते लाळिते : ताळिते : इस्वरू ऐसी प्रतीति :' ॥ ३२५॥ ' 'गोविंप्रभुचरित्रां 'तील या शेवटच्या लीळेतील प्रसंग, व्यक्ती वातावरण यांमधील उठावदारपणा अंगभूत गद्य शैलीतून साकार झाला आहे.

स्मृतिस्थळ

'स्मृतिस्थळ' म्हणजे साहित्यिकांचा संदर्भग्रंथ आणि व्यक्तिनामसंदर्भग्रंथ म्हणून लक्षात घ्यावा लागतो. महानुभाव गद्यातील चरित्रात्मक गद्य असे हे शेवटचे गद्यलेखन तेराव्या शतकात झाले व तेही ईश्वरी अवतारांच्या संदर्भातील नसून पंथाचे पहिले आचार्य नागदेव यांच्याविषयीचे आहे. आणि स्मृतिस्थळाचे कर्तृत्वही म्हाइंभटाचे नाही. स्मृतिस्थळाचा काळ शके १२३० ते ३४ असा मानला गेला त्यावरूनही पहिली चरित्रनिर्मिती व स्मृतिस्थळ यात जवळजवळ वीस वर्षांचे अंतर पडलेले आहे. ईश्वरी अवतार वर्णनातील गौरवाची भाषा स्मृतिस्थळात अपेक्षित असण्याचे कारण नाही; कारण नागदेव दैवी ईश्वरी अवतार म्हणून वावरत नसून एका पंथाचे पहिले आचार्य म्हणूनच त्यांचे व्यक्तिमत्व स्मृतिस्थळात डोळ्यांत भरते. म्हाइंभट्टाने संकलित केलेली ईश्वरी अवतारांची चरित्रे आणि स्मृतिस्थळ यात मूलभूत फरक निर्माण झाला; कारण ईश्वरी अवतारांचे संकलन संपादन एकटाकी म्हाइंभट्टाच्या हातून झालेले आहे. स्मृतिस्थळाची अवस्था तशी नाही तरीपण लीळाचरित्रादि चरित्रांचा डौल स्मृतिस्थळाने सांभाळलेला आहे.

'स्मृतिस्थळ' म्हणजे नागदेवांचे चरित्र की स्मृतिस्थळ म्हणजे महानुभावीय स्मृतिवाङ्मय असाही संभ्रम काही आधुनिक अभ्यासकांना पडलेला आहे. त्यात मूळ स्मृतिचरित्राला समजाऊन घेण्यातील घोटाळाच प्रबळ ठरला आहे. 'सारांश स्मृतिस्थळाची जडणघडण ते नागदेवाचार्याचे चरित्र या दृष्टिकोणातून झालेली नाही हे स्पष्ट व्हावे, स्मृतिस्थळ नागदेवाचार्याचे चरित्र नव्हेच!'[1] वरील विधानावरून महानुभाव चरित्रांची निर्मितीची प्रक्रिया नीट जाणून घेतलेली दिसत नाही. एकतर सर्वच महानुभाव चरित्रे हे एका ईश्वरी अवताराच्या प्रयाणामुळे निर्माण झालेल्या विरह भावनेतून निर्माण झाले आहे आणि ते नवविधाभक्तीपैकी भजन, चिंतन, स्मरणाने कमी करण्यासाठी भक्तगण आख्यायिका परस्परांना सांगत आहेत. त्यातून ईश्वरी अवताराविषयीची आपली उत्कट भक्ती आस्था, प्रेम आणि आदर व्यक्त करीत आहेत. म्हाइंभट्टाने या सर्व आख्यायिका सुसंगत लावल्या आणि नागदेवाचार्यांकडून पारखून घेतल्या. त्यातून 'लीळाचरित्र' 'ऋधिपूरचरित्र' 'सह्याद्रीलीळा' आणि 'चक्रधर निरुपित श्रीकृष्ण चरित्रा 'ची मांडणी झाली व त्यातून नैसर्गिकपणेच त्याला ईश्वरी अवतारांचे जीवनरेखाटण चित्रिले गेले. 'स्मृतिस्थळ' नागदेवाचार्यांच्या मृत्यूनंतर निर्माण झालेला चरित्रग्रंथ आहे. नाग-

१ स्मृतिस्थळ : संपादक डॉ. व. वि. पारखे : पृष्ठ सहा.

देवाचार्याच्या पूर्वायुष्यातील विविध घटना आणि आयुष्यक्रम लीळाचरित्रात पूर्वीच म्हाइंभट्टाने लीळारूपाने अनस्यूत करून घेतलेला होता अशावेळी आचार्यपदी आल्यानंतर आणि चक्रधरांच्या पश्चात महानुभाव पंथाला व्यवस्था आणि संघटना नागदेवांनी मिळवून दिली. साहित्यिकांना लेखनप्रवृत्त केले. मठादि व्यवस्था लावली. त्यांचा विरह भक्त-मंडळींना होणे स्वाभाविक होते. त्यातून त्यांच्या संदर्भातल्या इतरेजनांच्या अनुभूतिलीळा परस्परांनी परस्परांना निवेदिल्या व त्यातून नरेंद्राने व परसरामाने त्यांची बांधणी केली हा स्मृतिस्थळाचा इतिहास आहे हे यावरून लक्षात येईल. महानुभाव चरित्रे आणि आत्मचरित्रे निर्माण झालीत पण नामदेवाने जसे निश्चित विशिष्ट दृष्टिकोण स्वीकारून आपले चरित्र आणि आत्मचरित्र रेखाटले तसे चरित्रलेखन करण्याची भूमिकाच जेथे नव्हती अशा लेखनाकडून ती अपेक्षा का करावी ? उलटपक्षी चरित्र आणि आत्मचरित्र निर्मितीची प्रेरणा नसूनही महानुभावांचा पहिलाच गद्यावतार चरित्रपर आद्यस्वरूपी ठरला.

महानुभाव वाङ्मयनिर्मितीचे आदिबीजच धर्मचर्चेत आणि ईश्वरी अवतार स्मरण-चिंतनपरतेत आहे. 'लीळाचरित्र', 'सूत्रपाठ' आणि 'सातीग्रंथ' ही महानुभाव साहित्याची एका अर्थाने प्रस्थानत्रयीच आहेत. व तिचेच अनुकरण आणि तिचेच लेखकही इतर वाङ्मयनिर्मिती करताना आढळतात. 'सूत्रपाठ' हा श्रुतिग्रंथ आहे तर 'लीळाचरित्र' हा स्मृतिग्रंथ ठरला. प्राचीन भारतीय परंपरेप्रमाणे श्रुतिस्मृतिपुराणोक्त पद्धतीने महानुभावांनीही श्रुती, स्मृती, वृद्धाचार, मार्गारूढी आणि वर्तमान अशी प्रमाणे अधिमान्य केलेली होती त्यातीलच 'स्मृतिस्थळ' हे एक चरित्र होय.

'स्मृतिस्थळा'चे वैशिष्ट्य म्हणजे अनेक राजकीय घडामोडींचा उल्लेख स्मृतिस्थळात आलेले आहेत. यादवराजा रामदेव याला पकडून घडलेले सत्तान्तर त्यातच रामदेवाच झालेला मृत्यू व झालेले राज्यांतर या ऐतिहासिक आणि राजकीय दृष्टीने अतिशय महत्त्वाच्य घडामोडी स्मृतिस्थळाने टिपलेल्या आहेत. रामदेवराव राजाने साधुसंतांचा केलेला छळ, रामदेवपत्नी कामाइसेने नागदेवाचार्याचे स्वीकारलेले शिष्यत्व या सर्व महत्त्वपूर्ण घटना स्मृतिस्थळात आलेल्या आहेत. महाराष्ट्रात पडलेल्या तीन दुष्काळांचे करुण चित्रण 'स्मृतिस्थळा'त आले आहे. (स्मृ. २७, १०७)

समाजातील विद्वान लोक परस्पर वादविवाद करीत व स्त्रियांच्या ठिकाणी काव्य करण्याइतपत चातुर्य होते (मृ. ३३, १२३, १६५). यावरून महदंबा, मुक्ताई, जनाबाई यांची निर्मिती स्मृतिस्थळकारांसमोर असली पाहिजे. रामदेवराव राजाने नरेंद्राला रुक्मिणीस्वयंवराचे काव्यकर्तृत्व मागितले असता नरेंद्राने दाखविलेला बाणेदारपणा स्मृति-स्थळावरूनच समजू शकतो. म्हाइभट्टाचा झालेला भीषण हृदयद्रावक मृत्यू (स्मृ. १९८) हृदय पिळवटून टाकणारे प्रसंगचित्रण त्या प्रसंगातून जाणवते.

नागदेव हे पहिले आचार्य या नात्याने चक्रधरवाणीचा प्रचार आणि पुरस्कार करून पंथसंघटनेचे कार्य त्यांनी केले. कुशल संघटक आणि लोकसंग्राहक या नात्याने नागदेवांनी नवनिर्मिती, शास्त्रव्यवस्थापन, धर्मजागृती लेखकांकडून करून घेऊन संप्रदायाचे

संघटन आणि प्रवर्तन केले व चक्रधरनिष्ठा शेवटपर्यंत टिकवून अनुयायांतही ती दृढ केली. 'हा मी चक्रधरस्वामीचाच वानरा' असे नागदेव स्वतःविषयी म्हणवून घेतात. आपण आचार्य होऊनही महानुभाव पंथाचे स्वतःला अनुयायीच म्हणवून घेतात. चांगला शिक्षक जसा अनंतकाळपर्यंत विद्यार्थीच असतो तसे आचार्य होऊनही नागदेवाचार्य शेवटपर्यंत पायिकच राहिले.

ग्रंथनिर्मितीस प्रेरणा देण्यात नागदेव सतत आघाडीवर होते. किंबहुना त्यांच्याच कारकिर्दीत महानुभाव वाङ्मयाची निर्मिती झाली. नागदेवांच्या अलौकिक व्यक्तिमत्वामुळे त्यांना 'वेधवंती' अशी उपाधी मिळाली होती (स्मृ. २१९). महदाइसा, बाइदेववास, म्हाइंभट्ट, केसोबास, हिराइसा, दामोदर पंडित, भास्करभट्ट इ. लेखकांना नागदेवाचार्यांनी प्रोत्साहन दिले व त्यांच्याकडून ग्रंथरचना करवून घेतली.

नागदेवाचार्यांचा चक्रधरसूत्राचा अभ्यास अपूर्व असल्यामुळे त्या सूत्रांच्या साह्याने 'भटोबासाचे बोलणे ईश्वरवाणी की' असा तत्त्वविचार भटमार्गाला मिळवून दिला. चक्रधरांचे 'शास्त्र' व त्यांचे 'चरित्र' स्मरणातून पुढीलांना मार्गदर्शन व्हावे या नात्याने तेराव्या शतकातील चरित्रनिर्मिती झाली. 'एथिचि चरित्रे आठविजेति : आइकीजेति : उच्चारिजेती : तेही एक स्मरणचि की गा : ' या भूमिकेतून पंचकृष्णचरित्रे अवतरली व स्मृतिस्थळातून आचार्यांच्या मुखातून ईश्वरवाणी ऐकली असल्यामुळे पाहिल्या आचार्यांचेही ईश्वरलीळारूप चरित्र बांधले गेले.

चरित्रनिर्मितीच्या हेतूने बांधली गेलेली चरित्रे असे पंचकृष्णलीळावर्णन आणि स्मृतिस्थळाविषयी म्हणता येईल. निकटवर्तीयांनी, समकालीनांनी, चरित्रनायकांच्या सन्निधानी असताना कथन केलेल्या आख्यायिका, कहाण्या, प्रसंग, गोष्टी, दैनंदिनी म्हणजे तेराव्या शतकातील आदिचरित्रवाङ्मय होय. त्यात सुसंगत जीवनचित्रणाची अपेक्षा नसताही सुसंगत जीवनचित्रण प्रगट झाले. चरित्रग्रंथ रचण्यात भक्तसमूहांचा हातभार आहे. आपल्याला जाणवलेले आणि भावलेले चरित्रनायकाचे लोकोत्तर जीवन कथन करून सांगत गेल्यामुळे त्या लीळांना संवादात्मकता, कथनात्मकता, प्रसंगचित्रणातील नाट्यात्मकता आपोआप आली व त्यांचे एकत्रीकरण करून त्यांचा अनुबंध म्हाइंभट्टाने व नरेंद्राने साधला. आज चरित्रलेखकाकडून समग्र आणि संपूर्ण जीवनचित्रणांची आणि सत्यदर्शनाची जी अपेक्षा करतो तशा दृष्टीने प्राचीन चरित्रनिर्मितीकडे बघून भागणार नाही. ईश्वरी अवतारांचे गुणवर्णन आणि विभूतिमत्व जोपासण्याचा तो एक भक्तिमार्गपर आचार ठरतो.

चरित्रनिर्मितीच्या मर्यादा

महानुभाव चरित्रे म्हणजे व्यक्तीचे संपूर्ण चरित्रे नव्हेत ही गोष्ट स्पष्ट जाणून घेतली पाहिजे. संपूर्ण आख्यायिका किंवा आठवणी ऋद्धिपूरलीळात किंवा स्मृतिस्थळात येत नाही याचे कारण पूर्ववृत्तांत लीळाचरित्रात येऊन गेलेला असतो. चरित्रात्मक गद्यनिर्मितीची प्रेरणा भक्तमूलक अंतःकरणाच्या विरहवेदना कमी करण्याच्या भावनेतून झाली.

'चक्रधर', 'गोविंदप्रभू' आणि 'नागदेव' हे परस्पर अनुबंधित असे होते. व वरील-पैकी चक्रधर आणि गोविंदप्रभू हे ईश्वरी अवतार होते तर नागदेव चक्रधरांचा अनुगृहित आणि पंथाचे पहिले आचार्य होते. चरित्रनायकांचे आत्मचरित्रही चरित्रचित्रणात व्यक्त झाले आहे. लीळाचरित्र म्हणजे चक्रधरांचे चरित्रचित्रण असले तरी महदाइसेने पूर्ववृत्त विचारल्यावरून चक्रधर आपले आत्मवृत्तही कथन करीत असतात. चरित्र-नायकाचे चरित्रचित्रण आणि त्या चित्रणातही त्याची उपस्थिती यामुळेच जाणवत असते. स्मृती सांगणे आणि आख्यायिका गोळा करणे हे महानुभाव चरित्रग्रंथांचे पूर्वरूप आहे. त्यांचे व्यवस्थापन आणि अनुक्रम लावणे हे चरित्रग्रंथांचे पूर्णरूप ठरले. विविध आम्नायात स्मृतिस्थळातील स्मृतींची संख्या वाढविली. चरित्रग्रंथातून चरित्रनायकांचे जे भ्रमण घडले व ज्या व्यक्तिसमूहांचा सहवास घडला त्याचाही वृत्तान्त चरित्रग्रंथातील स्मृति-आख्यायिकातून जोपासला गेला. ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि धार्मिक जीवनाचा काळपट चरित्रगद्यातून आविर्भूत झाला. महानुभाव चरित्रगद्य म्हणजे पंथी-यांनी पूज्य व्यक्तीला वाहिलेली गौरवांजलीच ठरली. ईश्वरी अवताराच्या लौकिक लीळा आणि लौकिक लीळेतील विभूतिमत्व अशा दुहेरी ताणांनी चरित्रगद्य सजले गेले. चमत्कार, दंतकथा, अलौकिकता, दैवतकथा म्हणूनच चरित्रनायकांच्या गौरवासाठी चरित्रलेखकांनी आणि लीळाकथनकारांनी भक्तिभावाने सांगितल्या व त्यातून पहिली आद्यचरित्रे आणि पहिले आद्यगद्य रूपवंत झाले. साजिवंत झाले. नामदेवाची चरित्रेही त्याला अपवाद नाहीत हेही तितकेच खरे आहे. ही चरित्रे निर्माण होण्यामागील भूमिका वाङ्मयनिर्मितीची नसून त्यातून पंचकृष्णांविषयीचा आदर आणि भक्ती करण्याचाच प्रयत्न प्रभावी ठरवा. त्यामुळे व्यक्तिमाहात्म्याचा व विभूतिपूजेचा प्रभाव वाङ्मयनिर्मितीतून स्पष्ट झाला.

तत्त्वविचार

महानुभाव तत्त्वज्ञानात, पंचकृष्णांच्या अवतारवादाला महत्त्व दिल्यामुळे स्वयंप्रकाशी ईश्वर जीवोद्धारण करण्यासाठी सृष्टीच्या आरंभापासून अवतार घेत आला ही कल्पना महानुभावांनी निश्चित केली. पैकी कृष्ण, दत्तात्रय हे अवतार त्रेतायुगात आणि द्वापार-युगात होऊन गेले. त्यांच्यानंतर चांगदेव राऊळ, गुंडमराऊळ आणि चक्रधर या तीन अवतारांनी सृष्टीवर पदार्पण केले. चक्रधर यांनी आपण कृष्णावतार आहोत असे आपल्या विवेचनातून मांडले. किंबहुना चक्रधरांनीच पंथाची स्थापना व प्रवर्तन केले असून कलियुगात उभयदृश्यावतारी व जीवोद्धरणाचे व्यसन स्वीकारलेला सर्वश्रेष्ठ ईश्वरी अवतार आपणच आहोत ही भूमिका चक्रधरांनी निश्चित केली. चक्रधरांच्या या भूमिकेचा परिणाम महानुभाव पंथीय वाङ्मयाच्या स्वरूपावर व निर्मितीवर निश्चितच झालेला आढळतो.

या परिणामाचे स्वरूप दोन पातळ्यांवरून न्याहाळता येते. एक म्हणजे केवळ चक्रधरांच्या विचारांनी पंथीय वाङ्मयनिर्मिती झाली. चक्रधरांना जाणवलेले जीवनसत्य आणि जीवनाची अनुभूती स्वीकारीत असता केवळ चक्रधरांचे विचार आपण स्वीकारा-

वयाचे अशी भूमिका पंथीयांची झालेली होती व ती तशी होण्यास चक्रधरांची शिकवणही कारणीभूत ठरली कारण चक्रधरांचा शब्द हा अंतिम शब्द व चक्रधरांची शिकवण हीच अंतिम शिकवण अशी आग्रही भूमिका चक्रधरांची होती व त्यांच्या भक्तांनी तशी ती स्वीकारली होती. कुणीही विरोध करू शकेल असा एकही भक्त नव्हता. त्यामुळे महानुभावांचे तत्त्वज्ञान म्हणजेच चक्रधरांचे तत्त्वज्ञान होते आणि त्याचे वाङ्मयात पडलेले प्रतिबिंब म्हणजेच चक्रधरांनी केलेला तत्त्वविचार ! यामुळे हा तत्त्वविचार ज्या परिघात सामावला जातो त्यापलीकडे काही असू शकते या संदर्भात महानुभाव वाङ्मय विचार करीत नाही. म्हणून चक्रधरांनीच आपल्या आग्रही भूमिकेमुळे तत्त्वज्ञानाचा ओघ जीव, देवता, प्रपंच, ईश्वर यांच्या चौकटीत मर्यादित केला ! चक्रधरांनी निरुपित केलेल्या तत्त्वज्ञानाचे प्रतिबिंब महानुभावांच्या कवितेतून, ललितगद्यातून आणि शास्त्रीय भाष्य-रूपातून व्यक्त झालेले आहे व अशारीतीने विचारविनिमय व शास्त्रमंथन तेराव्या शतका-पासून सोळाव्या सतराव्या शतकांपर्यंत सर्व महानुभाव भक्त जमेल तसे करीत होते.

मी म्हणजेच ईश्वर या चक्रधरांच्या भूमिकेचा वाङ्मयाच्या स्वरूपावर व निर्मितीवर झालेला दुसरा परिणाम म्हणजे सगुण परमेश्वरावताराच्या उपासनेला मिळालेले श्रेष्ठत्व ! त्यामुळे झाले काय की ईश्वरी अवताराशी संबद्ध अशा चराचर वस्तू पवित्र करून त्या पूजनीय मानल्या गेल्या. 'येथिचेया संबंधा गेले तेतुले ओटे गोटे आदिकरौनि तुम्हा नमस्कारणीये की गा' अशी आज्ञा चक्रधरांनी शिष्यवर्गाला दिली. स्थावरजंगम वस्तूंचा प्रसाद, मूर्तिज्ञान, ध्यानधारणा आणि नामस्मरण हे ईश्वराचेच रूप असलेल्या चक्रधरां-च्याच संदर्भात होत राहिले. तसेच चक्रधरोक्ती म्हणजे धर्म निरूपण अशी जवळजवळ अवस्था झाल्यामुळे भक्तांचे व्यक्तिस्वातंत्र्य नाही म्हटले तरी कोंडले गेले व एखाद्या प्रवाहपतितासारखे भक्तगण लीळाचरित्रातून जन्माला आलेले चक्रधरांचे चरित्र, तत्त्वज्ञान, सूत्रभाष्य, दृष्टांतकथा यांचे वर्गीकरण, विवरण आणि स्पष्टीकरण करण्यात धन्यता मानू लागले. मूर्तिप्रकाश, स्थानपोथी, रत्नमालास्तोत्र, अन्वयस्थळ, विचारस्थळ या आणि इतर ग्रंथांतून किंबहुना सर्वच महानुभाव वाङ्मयातून चक्रधरनिष्ठा प्रगट झाली. त्यामुळे एक विवक्षित रूप या वाङ्मय व्यवहाराला येणे अपरीहार्य ठरेल.

प्रस्तुत चक्रधरस्वामीचे तत्त्वज्ञान आणि जीवनभाष्य कोणत्या स्वरूपाचे होते हे बघावयाचे नसून (कारण आजपर्यंत डॉ कोलते, नेने आणि य. खु. देशपांडे यांनी तसा सर्वांगीण प्रयत्न केलेला, निश्चित झालेला आहे.) चक्रधरांनी आपल्या विचारातून आणि आचारप्रणालीतून आपल्या दृष्टिकोणाला जे रूप दिले होते, ज्या विचारधारेचा पुरस्कार केला होता तो दृष्टिकोण आणि ती विचारधारा पुढील सांप्रदायिकांना स्वीकारता आली का ? हा एक प्रश्न उभा राहतो. दुसरा याच संदर्भात निर्माण होणारा प्रश्न म्हणजे चक्र-धरांच्या निर्वाणापूर्वी महानुभावांची वाङ्मयीन परंपरा निर्माण झाली नसल्यामुळे किंवा पंथाची संघटना तयार झाली नसल्यामुळे चक्रधरांची विचारसूत्रे आणि आचारसूत्रे

स्वीकारण्यामागील सांप्रदायिकांची भूमिका डोळस असलेली दिसते का? आणि या प्रश्नांच्या संदर्भात विचार केल्यावर आपोआपच आपल्याला चक्रधरांनी पुरस्कृत केलेली तत्त्वप्रणाली आणि तिचा चक्रधरांच्या पश्चात महानुभाव वाङ्मयाच्या स्वरूपावर आणि निर्मितीवर झालेला परिणाम न्याहाळता येणे सहजशक्य होणार आहे.

विविध पंथ आणि तत्त्वज्ञान

वास्तविक अंतिम सत्याचे (Absolute Truth) आकलन आणि दर्शन माणसाला त्याच्या बुद्धीच्या शक्तीप्रमाणे होत असते त्यातून तो काही निष्कर्ष काढतो, काही सिद्धान्त बांधतो आणि अशा निष्कर्षाला किंवा सिद्धान्ताला आपण तत्त्वज्ञान म्हणतो. मग चार्वाकांचे तत्त्वज्ञान, महानुभावांचे तत्त्वज्ञान, ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान, जैनांचे तत्त्वज्ञान असे शब्दप्रयोग आपण करू लागतो. तत्त्वज्ञाने अनेक असू शकतात पण अंतिम सत्य अनेक असू शकत नाही. एक तत्त्वज्ञान दुसऱ्या तत्त्वज्ञानाच्या विरुद्ध उभे राहाते आणि तत्त्वज्ञानामध्ये संघर्ष निर्माण होतो. यादवकाळात नेमके असेच झाले. वास्तविक विविध तत्त्वज्ञाने संघटित होऊन संप्रदाय बांधले गेले व त्यांतून संप्रदायप्रमुखाचा वैचारिक दृष्टिकोण पुढीलांनी स्वीकारून, आपल्या संप्रदायांना बळकटी आणली. संप्रदायाचे तत्त्वज्ञान जिवंत आणि लोकाभिमुख असल्याशिवाय कोणताही संप्रदाय जिवंत राहू शकणार नाही. सांप्रदायिकांची पृच्छावृत्ती किंवा अन्वेषणवृत्ती (Spirit of enquiry) यांचे खतपाणी मिळाल्याशिवाय संप्रदायाचे तत्त्वज्ञान आणि संप्रदाय अंग धरू शकणार नाहीत तसेच पंथाची तात्त्विक आणि संघटनात्मक अशी दोन अंगे जोपर्यंत परस्परपूरक आणि परस्परसापेक्ष राहणार नाहीत तोपर्यंत पंथ आणि तत्त्वज्ञान टिकू शकणार नाही. पैकी पंथाची तात्त्विक भूमिका ही संस्थापकाच्या जीवनविषयक दृष्टिकोणातून आणि अनुशासनातून निश्चित होईल! तर संघटनात्मक भूमिका ही सांप्रदायिकांच्या अनुसरणातून पंथसंस्थापकाचा दृष्टिकोण नीट समजावून घेऊन निश्चित होईल.

सुरवातीला बघितल्याप्रमाणे यादवकाळात व्यक्ती, कुटुंब आणि समाज यांचे परस्पर नाते हे प्रामुख्याने धर्माने बांधले गेले होते. त्यामुळे समाजव्यवहारही धर्माने निश्चित झाले होते. म्हणूनच महाराष्ट्रात राजकीय किंवा आर्थिक परिवर्तन घडून आले तरी धर्माने निश्चित केलेली जीवनमूल्ये कायम राहिली. समाजाचे अनुशासन करणाराही धर्मच आणि व्यक्तिकर्तव्याला वळण लावणाराही धर्मच. या धर्माधिष्ठित समाजरचनेत पंथसंप्रदायांना महत्त्व आले. यादवकालीन समाज आपल्या आध्यात्मिक उन्नतीसाठी पंथांच्या, संप्रदायांच्या पंखाखाली आश्रयार्थ आला. समाजाच्या विविध स्तरांतील लोक आध्यात्मिकदृष्ट्या जागरुक होऊ लागून, त्यांच्या कृतीत आणि वाणीत बदल घडून येऊ लागला. हा बदल वाङ्मयाच्या आश्रयाने आणि माध्यमातून प्रकट झाला. कारण त्यांचे वाङ्मयीन कार्य म्हणजे पंथीय कार्याचे एक प्रचार अंग होते. समाजाला स्वार्थनिरपेक्ष बुद्धीने एकत्र आणणे आणि भावनादृष्ट्या ईश्वरचरणी नम्र करणे या पद्धतीने वाङ्मयनिर्मिती

झाल्यामुळे ती समाजाभिमुख होऊ शकली. धर्मविचारात वास्तवाची आणि औदार्याची दृष्टी ठेवून पुर्नजन्म, जातिसंस्था, कर्मसिद्धांत, वर्णाश्रमधर्माची उपयुक्तता यांचा विचार पंथप्रमुखांनी केला त्या विचारांची तात्त्विक बाजू न्याहाळली आणि व्यक्त केली व समाजाने ती शिकवण स्वीकारून पंथसंघटनेला अधिक बळकटी आणली. समाजाच्या मूलभूत तत्त्वांना नवा आदर्श आणि नवा अन्वयार्थ देण्याचा प्रयत्न लोकशिक्षक असलेल्या चक्रधरांनी आणि ज्ञानेश्वरांनी यादवकाळात केला.

स्वतंत्र दृष्टिकोण

ज्ञानेश्वरांनी अद्वैत तत्त्वज्ञानाचा आणि चिद्विलासाचा केलेला पुरस्कार ज्ञानेश्वरी आणि अमृतानुभवामधून मांडून एक स्वच्छ आणि पारदर्शक दृष्टिकोण स्वतः सिद्ध केला. चक्रधरांच्या महानुभाव तत्त्वज्ञानाची अवस्था थोडी वेगळी आहे. ज्ञानेश्वरांनी केलेले अंतिम सत्याचे उद्घाटन त्यांच्या तात्त्विक भूमिकेला आणि संप्रदायाच्या घडणीला उपकारक ठरले. म्हणजे वारकरीपंथाची तात्त्विक घडण ज्ञानेश्वरांनी पुरस्कारिलेल्या तत्त्वविचाराच्या साह्याने निश्चित झाली तशी ती ज्ञानेश्वरांनी स्वतः निरुपित करून पक्की केली होती. चक्रधरांचे तत्त्वविचार हे प्रामुख्याने त्यांनी जे विहरण केले त्या विहरणात कधी प्रवृत्ती झाली असता किंवा अन्यवेळी वार्तालापांच्या संदर्भात व्यक्त केलेले आहेत. त्यांचे विचार अतिशय आधुनिक स्वरूपाचे होते, अहिंसेचा चक्रधरांनी केलेला पुरस्कार किंवा स्त्रीपुरुष समानतेच्या बाबतीत स्वीकारलेला उदार दृष्टिकोण किंवा आसक्तीविरहित जीवन जगण्याची आणि 'ज्ञानापसि प्रेम उत्तम' किंवा 'आहे ते विसरा' यांमधून प्रतीत होणारी उदारता यांतून 'जीवा'चे अस्तित्व आणि परमेश्वराचे सान्निध्य यासंदर्भात चक्रधरांनी केलेला विचार हा अतिशय नवमतवादी स्वरूपाचा होता. वस्तुतः त्या काळात 'जीवा'च्या अस्तित्वाच्या संदर्भात इतक्या मूलगामी पद्धतीने विचार कुणीही केलेला आढळत नाही. चक्रधरांनी मानवी जीवनाच्या सर्व कक्षांचा विचार गंभीरपणे करून ईश्वर आणि माणूस यांतील 'द्वैत' लक्षात घेत एक स्वतंत्र दृष्टिकोण एकाकीपणे समाजासमोर ठेवला. चक्रधरांचे निरूपण हे एका अभिजात विचारवंताचे तत्त्वनिरूपण होते. त्यामुळे विचारांना पुढे नेण्याचे सामर्थ्यही त्यात होते; पण पुढील पंथीय आचार्यांनी यादृष्टीने चक्रधरांना स्वीकारलेच नाही.

महानुभाव संप्रदायाची संघटना अजूनही आहे. पण वाङ्मय जे यादवकाळात झाले तेच फक्त कलात्मकतेच्या संदर्भात लक्षणीय झाले. अन्यथा सोळाव्या सतराव्या शतकांतील केशवमुनी विराटदेशेसारखे महानुभाव कवी पुनः एकदा संस्कृत परंपरेला स्वीकारीत एक सामान्य प्रकारची वाङ्मयनिर्मिती करीत राहिले. त्यांनी 'दमयंती स्वयंवरात' योजिलेली चित्रबंधात्मक रचना त्यांच्या दृष्टिकोणावर प्रकाश टाकते. उलटपक्षी महानुभाव लेखकांनी चक्रधरांच्या प्रयाणानंतर एकांतिक आणि व्यक्तिवादी विचारसरणी स्वीकारून आत्यंतिक पंथनिष्ठा निर्माण केली आणि पंथसंस्थापकाच्या चरित्राची आचारविचारांची आणि दैवीशक्तीची जपणूक करणे आणि त्याचे दर्शन घडविणे या मर्यादित भूमिकेमुळे

पुढील महानुभावीय पंथप्रचारक आणि प्रसारक चक्रधरांच्या विचारांना अधिकच बंदिस्त करून ठेवू लागले. आणि दुसरी गोष्ट अशी घडलेली दिसते की, चक्रधरांनी जो जीवोद्धारणाचा आणि दलितोद्धारणाचा एक सर्वंकष दृष्टिकोण तात्त्विक पद्धतीने व लौकिक मानवी जीवनाचा संदर्भ शोधीत आपल्या भ्रमणातून आणि व्याख्यानातून मांडला होता तो नाही म्हटले तरी पुढीलांनी अनुकरणात आणला नाही. त्यामुळे जोपर्यंत चक्रधरोक्ती पंथीय वाङ्मयातून पाझरत होती तोपर्यंत त्या वाङ्मयाला जिवंतपणा, सहजसौंदर्य आणि प्रत्यक्षगोचरत्व प्राप्त झाले. कारण 'लीळाचरित्र', 'दृष्टांतपाठ' थोड्याफार प्रमाणात 'स्मृतिस्थळ' आणि 'गोविंदप्रभुचरित्र' या गद्यलेखनापैकी विशेषतः 'लीळाचरित्र' आणि 'दृष्टांतपाठा'त असलेली चक्रधरांची उपस्थिती त्यांच्या तत्त्वविचारांना जखडून टाकणारी (static) झाली नाही. एखादा निर्मळ झरा वाहता असावा आणि बघता बघता त्याचे रूप शांतगंभीर सघन व्हावे असे त्यांच्या तत्त्वनिरूपणाचे स्वरूप होते.

महानुभाव कवी आणि वारकरी कवी

म्हाइंभट्ट, नागदेवाचार्य, भास्करभट्ट बोरीकर, रवळोबास, विश्वनाथबास, महदंबा ही चक्रधरांची प्रमुख शिष्यमंडळी बुद्धिगम्य पद्धतीने विचार करणारी व विद्वानांच्या आणि पंडितांच्या सभांमधून मान्यता पावलेली साहित्यिक मंडळी होती. यावरून चक्रधरांचा दृष्टिकोण स्वीकारताना आणि पंथप्रवेश करताना केवळ भक्तिमूलक दृष्टी त्यांनी ठेवली होती असे नाही की जी वारकरीपंथाच्या कवींची असलेली दिसते. कारण साधकतेतून आत्मशुद्धीचा प्रयत्न वारकऱ्यांनी केला. चक्रधरांच्या तात्त्विक भूमिकेतील नावीन्य, द्रष्टेपणा आणि दीर्घानुभवांची त्यांच्या विचारांना मिळालेली अंगकांती लक्षात घेऊन तत्कालीन पंडितवर्ग चक्रधरांचा अनुयायी बनला. ज्ञानेश्वरांचे पुढारीपण स्वीकारून त्यांच्या मागे जाणारे नामदेव, गोरोबा, चोखामेळा, जनाबाई, सावतामाळी, कान्होपात्रा, मुक्ताबाई, नामदेवाचे सारे कुटुंब ही मंडळी भक्तिमार्गाच्या वाटेने ईश्वरापर्यंत पोहचण्यासाठी ज्ञानेश्वरांच्या मागोमाग वाटचाल करू लागली, पण त्यासाठी त्यांनी आत्मनिवेदन, आत्माविष्कार करून स्वतःचे अस्तित्व ज्ञानेश्वरात एकरूप होऊ दिलेले नाहा. कारण भागवतसंप्रदायाच्या पंखाखाली वावरत असूनही संतकवींचे काव्य त्यांचे स्वतःचे अनुभव प्रकट करणारे ठरले म्हणजे महानुभाव पंथीयांची पंथनिष्ठा जशी त्यांच्या काव्यनिर्मितीत बाधा आणू लागली तशी परिस्थिती वारकरीपंथाच्या कवींची नव्हती. ज्ञानेश्वरांनी स्वतःला कुठेही प्रतिपरमेश्वर मानले नाही व दुसरे म्हणजे आपणही ईश्वराचे एक भक्त आहोत अशा दृष्टीने ज्ञानेश्वर आणि इतर भक्त यांचे नाते होते. महानुभाव संप्रदायात चक्रधर हा ईश्वरी अवतार व इतर लोक म्हणजे त्या ईश्वराचे भक्त अशा भूमिकेतून त्यांचे भावसंबंध निर्माण झाल्यामुळे त्यांनी केलेल्या कवितेवर त्याचा परिणाम व्यक्तिवादी स्वरूपाचा झाल्याशिवाय कसा राहील? या उलट, वारकरी संप्रदायाच्या कवींची कविता ही नुसती आत्माविष्कारी झाली एवढेच नव्हे, तर ती स्वतंत्र आणि स्वाभाविक, उत्कट आणि भावपूर्ण अशी झाली. प्रत्येक कवीची अनुभव घेण्याची आणि

तो अभिव्यक्त करण्याची स्वतंत्र अशी शैली आहे. त्यातून त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाची ओळख आपल्याला पटते. आणि हे सर्व कवी महानुभाव कवींसारखे संन्यासमार्गी नसून, विशेषतः गृहजीवनात आणि ग्रामीण जीवनात राहून आपल्या भावभावनांचा मुक्तपणे आणि उत्कटपणे आविष्कार करीत राहाणारे गृहस्थाश्रमी कवी होते. म्हणूनच वारकरी पंथाच्या वाङ्मयाचे स्वरूप हे आत्मोद्गारी, स्फुट स्वरुपाचे उत्स्फूर्तपणे अनुभूतींना अभिव्यक्त करणारे झाले म्हणजे काव्यनिर्मितीची प्रेरणा नसूनही त्यांनी उत्कट भावकाव्याची निर्मिती केली.

चक्रधर हाच ईश्वर! ही भूमिका

जोपर्यंत महानुभाव गद्यवाङ्मयातून चक्रधरांचे विचार प्रगट होत होते, तोपर्यंत त्या वाङ्मयाला आलेला तेजस्वीपणा, ठसठशीतपणा कमी झाला नाही. लीळाचरित्रातून प्रतित होणारे चक्रधरांचे चरित्र आणि आत्मचरित्र मराठीवाङ्मयाच्या पायाभरणीला केवळ कारणीभूत झाले असे नाही; तर वाङ्मयप्रकारांची विविधता त्यातून निर्माण झाली. दृष्टान्तपाठातून निर्माण झालेल्या सूत्रबोधकथा म्हणजे मराठीतील पहिल्या लघुकथा असून, कथाकार चक्रधर त्यामधून आपल्याला जाणवतात, एकट्या लीळाचरित्रातून, सूत्रपाठ, दृष्टान्तपाठ, स्थानपोथी इ. ग्रंथांची निर्मिती झालेली आहे याही घटनेचा अन्वयार्थ लावला तर एक गोष्ट स्पष्ट होते; ती म्हणजे चक्रधर या व्यक्तिमत्त्वाला दैवीशक्तीने अन्वित आणि आचारविचारप्रामाण्यात अखेरचा शब्द या भूमिकेतून स्वीकारले गेल्यामुळे जर ईश्वराकडे भक्तिमार्गाने जावयाचे असेल तर त्यासाठी चक्रधर या ईश्वराचीच भक्ती करणे, हाच वैचारिक पगडा नागदेव, म्हाइंभट्टापासून भास्करभट्ट रवळोबासापर्यंतच्या सर्व साहित्यिकांच्या मनावर असल्यामुळे विषयाची एकदेशीयता आणि व्यक्तिस्वातंत्र्याचा अभाव या दोन बाबींमुळे महानुभाव वाङ्मयाला एक सांकेतिक वळण मिळाले. विषयाची एकदेशीयता येण्याचे कारण म्हणजे महानुभाव तत्त्वज्ञानाने पंचकृष्णांची संकल्पना स्वीकारली आहे.

चक्रधर निर्वाणानंतर चक्रधरवचनांचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी महानुभाव कवींनी गीतेतील अहिंसावाद आणि भागवत पुराणाच्या दहाव्या व अकराव्या स्कंधात आलेल्या श्रीकृष्णकथा यांमधून विशेषतः चक्रधरोक्त वचनांच्या सिद्धयर्थ चरित्रपर, स्थळवर्णनपर, टीकाभाष्यरूप, व्याकरणविषयक आणि शब्दकोशादी वाङ्मयाची निर्मिती केली. चक्रधरांच्या उक्तींच्या अनेक शोधनी होऊन सूत्र कल्पनेचा विकास आणि विस्तार करण्यात आला त्यामुळे आत्माविष्कार आणि आत्मचिंतनाला स्थान न मिळता सूत्र, लापिका, आचार, प्रकरणवश वचनसंबंध यापद्धतींने चक्रधरांच्या वचनांचे मंडन शास्त्रीय स्वरूपाच्या वाङ्मयनिर्मितीतून झाले आणि त्यातही ही वर्गीकरणाची प्रक्रिया प्रामुख्याने गुरुकुलाशी एकनिष्ठ राहण्याच्या भावनेतून झाली. त्यात लोकांच्या विद्वत्तेचा गंभीरपणा, शास्त्रविषयक सूक्ष्मदृष्टी, खंडनापेक्षा मंडनाची अपूर्व तार्किकता यांचा आढळ होतो. पण या लेखननिर्मितीमागील प्रेरणा ही शास्त्र बांधण्याची नाही. शास्त्र-

निर्मितीत अपेक्षित असलेले विचारस्वातंत्र्यच नष्ट झाल्यामुळे तत्त्वविचार हा चक्रधर विचारापुढे जाऊ शकला नाही. कारण कोणताही तत्त्वविचार म्हणजे एक जिवंत वाढ असते. नदीच्या प्रवाहाला जमिनीतून मिळणाऱ्या जिवंत झऱ्यामुळे प्रवाहीपणा येतो, केवळ पावसाच्या पाण्यामुळे नव्हे! जमिनीतील झरेच जर नदीला येऊन मिळाले नाहीत तर नदीप्रवाह खुटित होईल. चक्रधरांचे तत्त्वज्ञान अधिक समृद्ध करण्यासाठी त्याची जिवंत वाढ होणे अपेक्षित होते; पण तसे न घडता स्थानपोथी, आचारस्थळ, विचारस्थळ अन्वयस्थळ अशी तांत्रिक स्वरूपाची निर्मिती होत गेली. त्यामुळे पुष्कळ आरशात एकच प्रतिबिंब दिसावे तसे स्वरूप, महानुभावांच्या वाङ्मयातील तत्त्वज्ञानाला आले. एकतर त्याला कालिक संदर्भ मिळाला नाही व जीवनव्यवहारातील सुलभीकरणापासून तत्त्वविचार दूर गेला. त्यामुळे त्या तत्त्वविचाराचे वाङ्मयातील रूप (stagnant) निष्क्रिय झाले. चक्रधरासंबंधी ग्रंथाच्या आकलनासाठी शब्दकोशांची आणि अनेक शोधनीच्या टीपग्रंथांची निर्मिती नंतरच्या काळात झाली. मराठी वाङ्मयाच्या संदर्भात हा प्रयत्न अभिनव होता आणि विधायकही ठरला. पण महानुभावांनी मात्र श्रीस्वामींचे विचारसत्य अधिक स्पष्टपणे जाणता यावे व ते अतिशुद्ध राहावे याच पंथीय भूमिकेतून शास्त्रीयवाङ्मयाची निर्मिती केली. ऋद्धिपूरवर्णन, ऋद्धिपूरचरित्र यांना महत्त्व येते ते वरील विचारसरणीच्या संदर्भात! शास्त्रीय स्वरूपाच्या वाङ्मयाचा विचार करता महानुभाव तत्त्वज्ञानाचा आणि आचारधर्माचा अतिशय सूक्ष्मपद्धतीने अभ्यास करून संशोधनाचा आदर्श तेराव्या शतकातील महानुभाव लेखकांनी तयार केला. संपादन, संकलनाचा आदर्श दृष्टांतपाठ व लीळाचरित्रातून केसोबास आणि म्हाइंभट्ट यांनी निर्माण केला. पंचवार्तिक व्याकरण, न्याय, मार्गप्रभाकरासारखा छंदशास्त्रपर ग्रंथ आणि शब्दकोशांच्या संदर्भातही असे आदर्श निर्माण झाले. सिद्धान्तसूत्रपाठ, गद्यराज, भक्तिप्रबोध, आचारस्थळ, विचारस्थळ, लक्षणस्थळ, स्थानपोथी, मूर्तिप्रकाश, स्मृतिस्थळ, महाभाष्य, दर्शनप्रकाश, पुसदेकरांची कैवल्यदीपिका या महानुभाव वाङ्मयनिर्मितीचे स्वरूप प्रामुख्याने शास्त्रीयस्वरूपाचे आहे. चक्रधर हा त्या लेखनाचा विषय आहे व भूमिका ही सत्यान्वेषणाची आहे त्यामुळे पंथीय तत्त्वज्ञानाची मीमांसा आणि चक्रधरोक्तीचे स्मरण याच पद्धतीने ही वाङ्मयनिर्मिती झाली असूनही एक शास्त्रीय पद्धतीचे परिमाण तिला मिळाले आहे. विविध लोकांच्या आठवणीत असलेल्या चक्रधर जीवनकथा एकत्र येऊन लीळाचरित्र निर्माण झाले व त्यातून चक्रधरांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व वाङ्मयाच्या अभ्यासकाला जाणवू लागले. म्हणजे दृष्टिकोण पंथीय, प्रेरणा चक्रधरोक्ती निरूपण, पण परिणाम मात्र वाङ्मयीन स्वरूपात मिळाला. दृष्टान्तपाठातही. चक्रधरांनी अवलंबिलेला जीवोद्धारणाचा मार्ग व त्यानुसार आलेले तात्त्विक निरूपण, विविध दृष्टान्तांतून जे चक्रधरांनी सांगितले त्याचे अधिक स्पष्टीकरण केसोबासाने केले. त्यामुळे या लोककथात्मक आणि व्यूहात्मक कथादृष्टान्तांना एक नवे परिमाण मिळाले. तत्त्वज्ञानामुळे चक्रधरांच्या जीवनानुभूतीला बाधा आणलेली येथे दिसत नाही. तर हे तत्त्वज्ञान मूळ आशयाला अधिकच समृद्ध बनविते असे लक्षात येईल. महानुभाव कवितेच्या

संदर्भात मात्र असे दिसत नाही. एकतर भास्कर, दामोदर, नरेंद्र यांची अभिरुची संस्कृत कवितेवर पोसली गेली होती तर दुसरीकडे श्रीकृष्ण ही देवता महानुभाव तत्त्वज्ञानातील पंचकृष्णदेवतांपैकी एक असल्यामुळे सर्वच महानुभाव कवींनी त्या देवतेचा संदर्भ, महानुभाव तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोणातून लावला. आद्य मराठी कवयित्री आणि दीर्घकाव्य निर्मितीच्या काळात स्फुट, उत्कट, उत्स्फूर्त रचना करणारी महदंबा आपल्या धवळ्यांमधून कृष्णरुक्मिणी स्वयंवराची कथा गोविंदप्रभूच्या विनंतीवरून उत्स्फूर्तपणे गात असताही तिच्या मनावरील पंथीय तत्त्वज्ञान ढळू शकलेले नाही. वास्तविक तिची कविता ही मराठी मधील उत्स्फूर्त भावकवितेचा पहिला पृथगात्म अविष्कार होती. केवळ स्वयंवर कथा स्वीकारून आणि कथावस्तूच्या केंद्रस्थानी लक्ष ठेऊन तिने आपली कविता गतिमान प्रभावीपणे बांधली की जीमुळे मराठी आख्यानकाव्याचे आदर्श धवळ्यांच्या साह्याने आपण लक्षात घेऊ लागलो. तरीही पंथीयदृष्टीमुळे कवितेत होणारा रसभंग आणि तत्त्वज्ञानाच्या आणि चक्रपाणीच्या संदर्भातील महदंबेचा आग्रही दृष्टिकोण विरस करतो.... 'जगाचे जन्मस्थान बरवेयाचा रावो मुरारीभक्ता उद्धरण हेतु मायालेखे अवतरला संसारी ॥ ६६ ॥ पूर्वार्ध ॥ किंवा मातृकीरुक्मिणीस्वयंवरात 'गावो द्वारावती गोदरीचे क्रीडती चक्रपाणी धावो देऊनि अवीचे घाली पदी : खेळे कृपानिधी : कधपुरी ॥ धवळ्यांची सुरुवातही पंथीय दृष्टीने होते, मग धवळी गाइन गोविंददुराणा....जयजय श्री प्रभु गोविंदा....

वाङ्मयातील कथात्मकता आणि आध्यात्मिकता

वास्तविक सर्वच मराठी कवितेत जाणवणारी कथात्मकता आणि आध्यात्मिकता तर महानुभाव कवितेत असतेच पण त्याबरोबरच पंथीय तत्त्वज्ञानाचा पुरस्कारही विशेषत्वाने केलेला आढळतो. या दृष्टीने भागवतसंप्रदायाचे कवी वेगळे उमटून दिसतात. लेखकाला चिंतनाचे आणि आविष्काराचे स्वातंत्र्य अपरिहार्यपणे मिळाले पाहिजे तसे ते भागवत सांप्रदायिकांना मिळू शकले. ज्ञानेश्वरांच्या व्यक्तिमत्वात चिंतनशीलतेचे आणि आविष्काराचे स्वातंत्र्य निश्चितच होते. नाथपंथ, ग्रंथपरंपरा, गुरुपदेश या विविध घटितांमुळे त्यांचे अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य मर्यादित होऊ शकलेले नाही. किंबहुना नामदेवादी सर्वच संतकवींचे अभिव्यक्तिस्वातंत्र्य उपजतपणे अबाधित राहिले. महानुभाव कवितेसंबंधी काय दिसते ? एकतर कवींची अनुभव घेण्याची पद्धती चक्रधराभिमुख होती. बुद्धिमत्ता पांडित्यशरण झालेली होती. पंथनिष्ठेवर नको तितक्या प्रमाणात ठामपणे स्थिर झाल्यामुळे वाङ्मयाचे आविष्कारित रूप हे तटस्थ भूमिकेचे आणि द्वैततत्त्वज्ञानाच्या पुरस्कारासाठी विवेचनप्रधान बनलेले दिसते. चक्रधरनिष्ठा, पंथनिष्ठा आणि संस्कृतचे अनुकरण यांमुळे महानुभाव लेखकांचे चिंतनस्वातंत्र्य आणि आविष्कारस्वातंत्र्यच संपुष्टात आले. विचारांच्या संदर्भात पूर्णतः चक्रधरविषयक आत्यंतिक श्रद्धेतून आणि आविष्काराच्या संदर्भात पूर्णतः संस्कृत महाकाव्यांना अनुसरून वाङ्मयनिर्मिती झाल्यामुळे त्याहीपलीकडे असलेले त्यांचे व्यक्तिमत्व एका अर्थाने अनामिक राहिले. वाङ्मयव्यवहाराच्या संदर्भात

या कविमनांचा हा मोठा पराभव म्हणावा लागेल. वस्तुतः सर्व वाङ्मयीन परंपरा सुरू करण्याचे श्रेय महानुभाव लेखकांचे असूनही अभिजात प्रज्ञावंतांचे तत्त्वचिंतन जे विचारांना पुढे नेत असते किंवा भावनांचे प्रचंड प्रवाह शब्दांचे तट फोडून बाहेर पडतात याही स्वरूपात या वाङ्मयाकडून अपेक्षा करता येत नाही. कारण चक्रधरांनी घालून दिलेल्या तात्त्विक मार्गाने आपण जात राहणे हीच त्यांची एकमेव अपेक्षा असते व ती वाङ्मयनिर्मितीच्या साहाय्याने ते पुरी करीत असतात. अर्थात याला काही प्रमाणात सन्माननीय अपवाद म्हणजे 'महदंबेचे धवळे' आणि नरेंद्राचे 'रुक्मिणीस्वयंवर' होय.

स्थळवर्णनपर पहिले काव्य

ऋद्धिपूरवर्णन हे काव्य म्हणजे वास्तविक मराठीतील स्थळवर्णनपर काव्यातील पहिले वर्णनात्मक काव्य आहे परंतु ऋद्धिपुराकडे स्वतंत्र दृष्टीने कवी बघू शकत नाही. एकतर ऋद्धिपूर म्हणजे आयोध्या, मथुरा इत्यादी नगरीप्रमाणे पंचकृष्णांपैकी एक ईश्वर असलेल्या महानुभाव आचार्य गोविंदप्रभू यांचे वसतिस्थान असल्यामुळे त्याचे माहात्म्य वेगळे असणारच! आणि विविध तपशिलांनी ऋद्धिपुरातील गोविंदप्रभूंचे स्थानसामिप्य वर्णन केल्यावर अर्थातच आज गोविंदप्रभू तेथे नाहीत यामुळे होणाऱ्या असह्य विरहामुळे कवीला जगणेही अशक्य होते. परंतु संस्कृतपरंपरेनुसार काव्याचा दुःखान्त तर करता येत नाही या अडचणीतून कवीने आपल्या दुःखाला विवेकाचा बांध घालून काव्य पूर्ण केले. अर्थात स्थलवर्णनपर काव्य असल्यामुळे वस्तुतः चक्रधरांच्या तत्त्वज्ञानाला तसा अवसर कमीच; परंतु तरीही कर्मयोग प्रवृत्तिमार्ग, निवृत्तिमार्ग, देवतांची अनेकता, विविध विद्या आणि अविद्या, चैतन्यमाया आणि कर्मभूमीच्या देवता यांचा नको इतका पाल्हाळ वर्णून मूळ स्थलवर्णनपरतेला कवी बाधा निर्माण करतो आणि मूळ चरित्रविषय जो गोविंदप्रभू त्याहीकडे नाही तरी दुर्लक्ष होते व 'कैवल्यबीजाचे क्षेत्र,' 'धर्माची उतारपेठ,' 'ब्रह्मदेवाची ब्रह्मपुरी' अशी ऋद्धिपूरनगरी कवीला दिसू लागते. तत्त्वचिंतन नेहमीच अनुभवातून स्फुरलेले असले तर ते आपोआपच ज्ञानेश्वरांच्या तत्त्वचिंतनाप्रमाणे अनुभवाशी एकरूप होऊन गोचर होईल. महानुभावांच्या वाङ्मयनिर्मितीत ज्या पद्धतीने चक्रधरांनी तत्त्वनिरुपण केले ती समाजसापेक्ष निर्मितीप्रक्रिया कुणालाच न साधल्यामुळे तत्त्वज्ञानाचा बोजडपणा, क्लिष्टता तर वाढलीच पण त्याहीपेक्षा वाङ्मयाच्या आस्वादात बाधा निर्माण झाली. जीव-प्रपंचविवाद, जीवईश्वर यांचा संबंध परमपुरुषाचा वसैठा आणि कैवल्यनायकाचे क्रीडास्थान यांचे नको इतके वर्णन ऋद्धिपूरवर्णनात येते वास्तविक ज्ञानेश्वरांनीही शिव आणि शक्ती किंवा एकनाथानीही प्रकृती आणि पुरुष यांचे अद्वैतस्वरूपी वर्णन आपल्या कवितांतून घडविले आहे पण तो विषय मूळ काव्याच्या आशयाशी एकरूप होऊन अवतरतो. ऋद्धि-पूरवर्णनात जीव देवता प्रपंचाची पृथक् जाणीव सतत होत राहिल्यामुळे कवितेच्या संदर्भात ती बाधा निर्माण करते व त्यामुळे काव्याचे स्वरूप अकारण गढूळ होऊन जाते.

संदर्भात मात्र असे दिसत नाही. एकतर भास्कर, दामोदर, नरेंद्र यांची अभिरुची संस्कृत कवितेवर पोसली गेली होती तर दुसरीकडे श्रीकृष्ण ही देवता महानुभाव तत्त्वज्ञानातील पंचकृष्णदेवतांपैकी एक असल्यामुळे सर्वच महानुभाव कवींनी त्या देवतेचा संदर्भ, महानुभाव तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोणातून लावला. आद्य मराठी कवयित्री आणि दीर्घकाव्य निर्मितीच्या काळात स्फुट, उत्कट, उत्स्फूर्त रचना करणारी महदंबा आपल्या धवळ्यांमधून कृष्णरुक्मिणी स्वयंवराची कथा गोविंदप्रभूच्या विनंतीवरून उत्स्फूर्तपणे गात असताही तिच्या मनावरील पंथीय तत्त्वज्ञान ढळू शकलेले नाही. वास्तविक तिची कविता ही मराठी मधील उत्स्फूर्त भावकवितेचा पहिला पृथगात्म अविष्कार होती. केवळ स्वयंवर कथा स्वीकारून आणि कथावस्तूच्या केंद्रस्थानी लक्ष ठेऊन तिने आपली कविता गतिमान प्रभावीपणे बांधली की जीमुळे मराठी आख्यानकाव्याचे आदर्श धवळ्यांच्या साह्याने आपण लक्षात घेऊ लागलो. तरीही पंथीयदृष्टीमुळे कवितेत होणारा रसभंग आणि तत्त्वज्ञानाच्या आणि चक्रपाणीच्या संदर्भातील महदंबेचा आग्रही दृष्टिकोण विरस करतो.... 'जगाचे जन्मस्थान बरवेयाचा रावो मुरारीभक्ता उद्धरण हेतु मायालेखे अवतरला संसारी ॥ ६६ ॥ पूर्वार्ध ॥ किंवा मातृकीरुक्मिणीस्वयंवरात 'गावो द्वारावती गोदरीचे क्रीडती चक्रपाणी धावो देऊनि अवीचे घाली पदी : खेळे कृपानिधी : कधपुरी ॥ धवळ्यांची सुरुवातही पंथीय दृष्टीने होते, मग धवळी गाइन गोविंददुराणा....जयजय श्री प्रभु गोविंदा....

वाङ्मयातील कथात्मकता आणि आध्यात्मिकता

वास्तविक सर्वच मराठी कवितेत जाणवणारी कथात्मकता आणि आध्यात्मिकता तर महानुभाव कवितेत असतेच पण त्याबरोबरच पंथीय तत्त्वज्ञानाचा पुरस्कारही विशेषत्वाने केलेला आढळतो. या दृष्टीने भागवतसंप्रदायाचे कवी वेगळे उमटून दिसतात. लेखकाला चिंतनाचे आणि आविष्काराचे स्वातंत्र्य अपरिहार्यपणे मिळाले पाहिजे तसे ते भागवत सांप्रदायिकांना मिळू शकले. ज्ञानेश्वरांच्या व्यक्तिमत्वात चिंतनशीलतेचे आणि आविष्काराचे स्वातंत्र्य निश्चितच होते. नाथपंथ, ग्रंथपरंपरा, गुरुपदेश या विविध घटितांमुळे त्यांचे अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य मर्यादित होऊ शकलेले नाही. किंबहुना नामदेवादी सर्वच संतकवींचे अभिव्यक्तिस्वातंत्र्य उपजतपणे अबाधित राहिले. महानुभाव कवितेसंबंधी काय दिसते ? एकतर कवींची अनुभव घेण्याची पद्धती चक्रधराभिमुख होती. बुद्धिमत्ता पांडित्यशरण झालेली होती. पंथनिष्ठेवर नको तितक्या प्रमाणात ठामपणे स्थिर झाल्यामुळे वाङ्मयाचे आविष्कारित रूप हे तटस्थ भूमिकेचे आणि द्वैततत्त्वज्ञानाच्या पुरस्कारासाठी विवेचनप्रधान बनलेले दिसते. चक्रधरनिष्ठा, पंथनिष्ठा आणि संस्कृतचे अनुकरण यांमुळे महानुभाव लेखकांचे चिंतनस्वातंत्र्य आणि आविष्कारस्वातंत्र्यच संपुष्टात आले. विचारांच्या संदर्भात पूर्णतः चक्रधरविषयक आत्यंतिक श्रद्धेतून आणि आविष्काराच्या संदर्भात पूर्णतः संस्कृत महाकाव्यांना अनुसरून वाङ्मयनिर्मिती झाल्यामुळे त्याहीपलीकडे असलेले त्यांचे व्यक्तिमत्व एका अर्थाने अनामिक राहिले. वाङ्मयव्यवहाराच्या संदर्भात

या कविमनांचा हा मोठा पराभव म्हणावा लागेल. वस्तुतः सर्व वाङ्मयीन परंपरा सुरू करण्याचे श्रेय महानुभाव लेखकांचे असूनही अभिजात प्रज्ञावंतांचे तत्त्वचिंतन जे विचारांना पुढे नेत असते किंवा भावनांचे प्रचंड प्रवाह शब्दांचे तट फोडून बाहेर पडतात याही स्वरूपात या वाङ्मयाकडून अपेक्षा करता येत नाही. कारण चक्रधरांनी घालून दिलेल्या तात्त्विक मार्गाने आपण जात राहणे हीच त्यांची एकमेव अपेक्षा असते व ती वाङ्मयनिर्मितीच्या साहाय्याने ते पुरी करीत असतात. अर्थात याला काही प्रमाणात सन्माननीय अपवाद म्हणजे 'महदंबेचे धवळे' आणि नरेंद्राचे 'रुक्मिणीस्वयंवर' होय.

स्थळवर्णनपर पहिले काव्य

ऋद्धिपूरवर्णन हे काव्य म्हणजे वास्तविक मराठीतील स्थळवर्णनपर काव्यातील पहिले वर्णनात्मक काव्य आहे परंतु ऋद्धिपुराकडे स्वतंत्र दृष्टीने कवी बघू शकत नाही. एकतर ऋद्धिपूर म्हणजे आयोध्या, मथुरा इत्यादी नगरीप्रमाणे पंचकृष्णांपैकी एक ईश्वर असलेल्या महानुभाव आचार्य गोविंदप्रभू यांचे वसतिस्थान असल्यामुळे त्याचे माहात्म्य वेगळे असणारच ! आणि विविध तपशिलांनी ऋद्धिपुरातील गोविंदप्रभूंचे स्थानसामिप्य वर्णन केल्यावर अर्थातच आज गोविंदप्रभू तेथे नाहीत यामुळे होणाऱ्या असह्य विरहामुळे कवीला जगणेही अशक्य होते. परंतु संस्कृतपरंपरेनुसार काव्याचा दुःखान्त तर करता येत नाही या अडचणीतून कवीने आपल्या दुःखाला विवेकाचा बांध घालून काव्य पूर्ण केले. अर्थात स्थलवर्णनपर काव्य असल्यामुळे वस्तुतः चक्रधरांच्या तत्त्वज्ञानाला तसा अवसर कमीच; परंतु तरीही कर्मयोग प्रवृत्तिमार्ग, निवृत्तिमार्ग, देवतांची अनेकता, विविध विद्या आणि अविद्या, चैतन्यमाया आणि कर्मभूमीच्या देवता यांचा नको इतका पाल्हाळ वर्णून मूळ स्थलवर्णनपरतेला कवी बाधा निर्माण करतो आणि मूळ चरित्रविषय जो गोविंदप्रभू त्याहीकडे नाही तरी दुर्लक्ष होते व 'कैवल्यबीजाचे क्षेत्र,' 'धर्माची उतारपेठ,' 'ब्रह्मदेवाची ब्रह्मपुरी' अशी ऋद्धिपूरनगरी कवीला दिसू लागते. तत्त्वचिंतन नेहमीच अनुभवातून स्फुरलेले असले तर ते आपोआपच ज्ञानेश्वरांच्या तत्त्वचिंतनाप्रमाणे अनुभवाशी एकरूप होऊन गोचर होईल. महानुभावांच्या वाङ्मयनिर्मितीत ज्या पद्धतीने चक्रधरांनी तत्त्वनिरुपण केले ती समाजसापेक्ष निर्मितीप्रक्रिया कुणालाच न साधल्यामुळे तत्त्वज्ञानाचा बोजडपणा, क्लिष्टता तर वाढलीच पण त्याहीपेक्षा वाङ्मयाच्या आस्वादात बाधा निर्माण झाली. जीव-प्रपंचविवाद, जीवईश्वर यांचा संबंध परमपुरुषाचा वसैटा आणि कैवल्यनायकाचे क्रीडास्थान यांचे नको इतके वर्णन ऋद्धिपूरवर्णनात येते वास्तविक ज्ञानेश्वरांनीही शिव आणि शक्ती किंवा एकनाथानीही प्रकृती आणि पुरुष यांचे अद्वैतस्वरूपी वर्णन आपल्या कवितांतून घडविले आहे पण तो विषय मूळ काव्याच्या आशयाशी एकरूप होऊन अवतरतो. ऋद्धि-पूरवर्णनात जीव देवता प्रपंचाची पृथक् जाणीव सतत होत राहिल्यामुळे कवितेच्या संदर्भात ती बाधा निर्माण करते व त्यामुळे काव्याचे स्वरूप अकारण गढूळ होऊन जाते.

महानुभाव कविता

'वछाहरणा'तही वास्तविक एक कलात्मक कथाकाव्य आकाराला येत असते. कृष्णाने अघासुराच्या केलेल्या वधाचे नाट्यपूर्ण चित्रण विविध पातळ्यांवरून न्याहाळण्याचा फार चांगला प्रयत्न दामोदराने केलेला दिसतो. कृष्ण आणि ब्रह्मदेव यांमधील कृतकनाटक कथानकाला ग हरेपणा आणण्यात हातभार लावीत असते. अशावेळी नारद आणि ब्रह्मदेवाने केलेली कृष्णस्तुती कवीच्या भक्तिभावपूर्ण अंतःकरणाची साक्ष देण्यास एकवेळ पुरेशी वाटत असेल, पण अघासुर हा असुर असूनही कृष्णाच्या हातून आपणास मृत्यू येत आहे याविषयी स्वतःला धन्य समजतो. या ठिकाणी तत्त्वज्ञानामुळे पूर्व कथाबीजातून उमलत गेलेला कथाशय हा थांबतो व द्वैतरूप असलेल्या तत्त्वज्ञानावर भाष्य करण्याची संधी दामोदर दवडू देत नाही. तत्त्वज्ञानही नुसते येत नाही तर उपमेय उपमान संबंधदर्शनातून कृष्णमाहात्म्य वर्णिल्यामुळे कथेच्या वेगवान गतीला विरोध तर निर्माण होतोच पण कथानकातील नाट्यगुणही वितळून जातो. त्यामुळे काव्यात्मकतेच्या स्पर्शाप्रत जाणारी ही नाट्यपूर्ण कथा एका क्लिष्टतेच्या, सांकेतिकतेच्या भोवऱ्यात फिरू लागते व तिला एक पसरट रूप येऊन जाते. 'सांडा सांडा अहंकारा : अनुसरा श्री चक्रधरा' यातून येणारी प्रचारकी घाटणी दृष्टिआड करता येत नाही. त्यामुळे या काव्याचे स्वरूप तत्त्वज्ञान टाळून आपण आख्यानकाव्य म्हणून स्वीकारतो. इतके या तत्त्वज्ञानामुळे दुर्लक्ष का होते ? या तत्त्वज्ञानाची अपरिहार्यता का जाणवत नाही ? यातच त्याच्या मर्यादेची बीजे आहेत. जी गोष्ट वछाहरणाची तीच सह्याद्रीवर्णनाचीही झाली आहे. किंबहुना सर्वच महानुभावीय मूर्तिवर्णने जरी पडताळून बघितली तरीही त्यातील सांकेतिकता नजरेआड करता येणार नाही. महानुभावपंथनिष्ठा आणि चक्रधरव्यक्तिनिष्ठा प्रगट करण्याच्या संदर्भात जणू एक स्पर्धात्मक भूमिका सर्व साती-ग्रंथांच्या कवींनी स्वीकारलेली दिसते. चक्रधरांच्या अवतारकार्याचे संपूर्ण वर्णन करणे आणि श्री दत्तात्रयप्रभूचे मातापूरदर्शन घडविणे यांना सह्याद्रिवर्णनात महत्त्व मिळते व कवितेतील आशयघनता एखाद्या धुक्यासारखी वितळून जाते.

वास्तविक रुक्मिणीस्वयंवर, शिशुपालवध, उद्धवगीता, वछाहरण या काव्यांतील कथाच मुळी भारतीय माणसाला जिव्हाळा वाटावा अशा आहेत, त्यामुळे महानुभाव कवींनी त्या कथांकडे चक्रधरांचे दर्शन या भूमिकेतून बघण्याचा प्रयत्न केला असला तरी विचक्षण वाचक वरील काव्यांचा आस्वाद हा पंथीयदृष्टीने घेत नसतो. त्यातून त्याला मिळत असते ती एक विदग्धकथा, महाकाव्यसदृशकाव्य आणि भक्तिरसाची उठावणी. असे होण्याचे कारण हे लेखक मूळ कविवृत्तीचे होते. उलटपक्षी पंधराव्या सोळाव्या शतकांतील महानुभाव लेखक हे केवळ पंथप्रचारक होते. त्यामुळे वाङ्मयातही तफावत निर्माण झाली. 'उद्धवगीता,' 'ज्ञानप्रबोध' हे ग्रंथ प्रामुख्याने तात्त्विक स्वरूपाचे आहेत. उद्धवगीतेत मूळ भागवताला अनुसरताना भास्कराने घेतलेले जे स्वातंत्र्य

आहे त्यात महानुभावांच्या द्वैतवादाला अनुसरून जीवदेवता व्यावृत्ती, जीवब्रह्माच्या अभेदाचे खंडन व भेदाचे समर्थन, जीवाकडून होणारी प्रपंचरचना आणि जीवाच्या चतुर्विध कर्मफळाचे निरूपण यांचे जे विवेचन केले ते मूळ कथावस्तूला मारकच ठरत नाही काय ? कारण एकीकडे भागवताला अनुसरून रचना करावयाची व भागवताला अपेक्षित नसलेला द्वैतवादाचा पुरस्कार करावयाचा. यामुळे आपोआपच सर्व महानुभाव कवींची द्विधानिष्ठा आपल्याला जाणवते. एकीकडे संस्कृत विदग्धमहाकाव्यांचा आदर्श डोळ्यांपुढे ठेवून काव्यरचना करण्याचा प्रयत्न करावयाचा तर दुसरीकडे भागवत पुराणातील कथांच्या आश्रयाला जावयाचे. त्यातही दत्त, कृष्ण, चक्रपाणी, चक्रधर या देवता पंचकृष्णांपैकी मानून निरूपणाला सुरुवात करावयाची व मूळ भागवत पुराणांचा अन्वयार्थ द्वैततत्त्वज्ञानाच्या साह्याने लावून दाखविण्याचा प्रयत्न करावयाचा. अशा द्विधा मनःस्थितीमुळे मात्र कवितेच्या आस्वादात तत्त्वज्ञानाची उपस्थिती रसभंगकारक ठरते यात शंका नाही. चक्रधरांची भक्तिविषयक असलेली विशिष्ट भूमिका त्यांच्या अनुयायांना स्वीकारता आलेली नाही. चक्रधरांनी अंतिम जे सत्य त्याची उपासना स्वीकारली पण भक्तांना मात्र मीच ईश्वर अशी शिकवण दिल्यामुळे ईश्वरी भक्तीचे स्वरूप व्यक्तिवादी झाले. उदा. मुखाने ईश्वरी लीळा उच्चारणे, कानांनी चक्रधरोक्ती ऐकणे, नाकाने चरणकमळांचा वास घेणे, त्वचेने श्रीमूर्तीचे क्षेमालिंगन घेणे, दृष्टीने तीर्थस्थाने व प्रसादवस्तू पाहणे असे अखंड आचरण केले तरच भक्तीची चढती पायरी प्राप्त होईल असा आदेश चक्रधरांनी पंथीयांना दिला आहे. या संदर्भात वारकरी पंथाच्या कवींचा भक्तिमार्ग वेगळा असलेला दिसतो. चक्रधराच्या तात्त्विक विचारप्रणालीचा आपल्याला जणू प्रचार आणि प्रसार करावयाचा आहे या भूमिकेने सर्व महानुभाव लेखक लेखननिर्मिती करतात. परंतु तत्त्वज्ञानात प्रमुख असलेली आचारसंहितेची स्पष्टता त्यांना दाखविता येऊ शकत नाही. कारण त्यांची ती स्वतंत्र नवनिर्मिती नसते. एकीकडे पौराणिक कथाभाग निवडून संस्कृत काव्यपरंपरेचे आदर्श स्वीकारीत आणि तत्त्वज्ञान निरूपणाचे स्वातंत्र्य घेत रचना करीत असल्यामुळे सर्वच महानुभाव वाङ्मयाला तत्त्वज्ञानदृष्ट्या आणि काव्यदृष्ट्या एक मर्यादा पडली आहे.

वास्तविक सर्वच प्राचीन वाङ्मय हे विशेषतः धर्ममूलक असूनही त्यातून आत्माविष्कार करण्याचा प्रयत्न काही संप्रदायांच्या कवींनी केला. अशावेळी त्यांच्या संप्रदायाचे तत्त्वज्ञान आणि आचारधर्म हा वाङ्मयातून अशा काही एकात्म पद्धतीने अवतरला की त्यामुळे वाङ्मयाच्या स्वरूपावर आणि निर्मितीवर त्याचा परिणाम इष्टस्वरूपी ठरला. मुख्य म्हणजे चक्रधरांनी जी तात्त्विक भूमिका आणि आचारसंहिता आपल्या शिष्यांना दिली तीही सहजतेने विविध शहरांतून, गावांतून, खेड्यांतून आणि वस्त्यांतून त्यांचे जे विहरण चालू होते त्यातून शिकवण दिली असल्यामुळे ती बोजड, क्लिष्ट, संदर्भहीन आणि जीवनदूर अशा स्वरूपाची झाली नाही. उलटपक्षी ज्यावेळी चक्रधरांच्या उत्तरापंथे गमनानंतर प्रत्येक महानुभाव लेखकाला जणू हे तत्त्वज्ञान आपण प्रचारात आणले पाहिजे अशी जाणीव

होऊन त्यासाठी विविध पुराणकथांच्या चौकटी निर्माण करण्याचा ते प्रयत्न करतात. त्यातून त्यांची साहित्यशास्त्रविषयक जाण दिसते. पण आत्माविष्कार व्यक्त न होता एक तटस्थ आणि वस्तुनिष्ठ भूमिका स्पष्ट होते. त्यातल्या त्यात धवळे, रुक्मिणीस्वयंवर, चौपद्या यांचा अपवाद करावा लागतो.

संतकवितेच्या अभंगवाणीला आलेली स्फुटता, उत्स्फूर्तता आणि आत्माविष्काराची उत्कटता महानुभाव लेखनातून उतरू शकली नाही. कारण चक्रधरनिष्ठा हीच त्यांची जीवननिष्ठा होती. तिचा कलात्मक आविष्कार होणे अगत्याचे होते, तसे झाले नाही. त्यामुळे मूळ संस्कृतपरंपरेचेही अनुकरण नाही, केवळ चक्रधर अनुसरणही नाही किंवा केवळ आत्माविष्कारही नाही असे त्या वाङ्मयाला रूप आले व एका विशिष्ट काळात ज्यांच्या निर्मितीमुळे मराठी वाङ्मयाचे विविध रूपप्रकार निर्माण झाले अशी महानुभावांची परंपरा मात्र काळाबरोबर विरळ होत गेली. अर्थात नव्या निष्ठा आणि नव्या प्रेरणा ह्या नव्या जाणिवांच्या मौलिक बहरातून जन्माला येण्याचा तेरावे शतक हा कालखंड होता. चक्रधरांचे महाप्रयाण आणि ज्ञानेश्वरांचे आगमन यांतील विधिसंकेत मराठी वाङ्मयाला उपकारच ठरला होता. समृद्ध वाङ्मयनिर्मितीच्या आकृतीबंधांतील लक्षणीय वैचित्र्य, व्यापकता आणि सरसता यामुळे यादवकालीन वाङ्मय व्यवहाराला आणि त्यांच्या निर्मात्यांच्या प्रज्ञेला आणि प्रतिभेला बहर आला होता.

मराठी धर्मभाषा

चक्रधरांनी महाराष्ट्रालाच आपली कर्मभूमी मानली तर मराठी भाषेला धर्मभाषेची प्रतिष्ठा दिली. चक्रधरांच्या वक्तव्यातून पाझरलेले बोलीभाषेतील ताजे, टवटवीत उत्फुल्ल शब्दभांडार, मराठी भाषेला, चक्रधरांनी मिळवून दिले. प्राचीन मराठी गद्य वाङ्मयाला परंपरा नाही ती चक्रधरांनी मिळवून दिली. तर शास्त्रीय वाङ्मय आणि काव्यवाङ्मय मात्र संस्कृतधार्जिणे बनले. महाराष्ट्र आणि मराठी भाषा यांना विशेष आत्मीयतेने चक्रधरांनी बघितले. चक्रधरांपाठोपाठ ज्ञानेश्वरांनीही हीच भूमिका स्वीकारली. मराठी भाषेच्या भवतव्याच्या दृष्टीने ही लाखमोलाची गोष्ट घडली. मराठी भाषेचा श्रद्धापूर्वक कैवार आणि नितांत आदर, जिव्हाळा आणि पोटतिडीक आणि धर्मभाषेचे 'पावित्र्य' मराठी भाषेला चक्रधरांनी मिळवून दिले. महानुभाव पंथाबरोबर मराठी भाषा ही सावली-सारखी सोबत करीत राहिली. त्यामुळे तिचा प्रचार आणि प्रसार हा सिंधूनदीच्या तीरा-पर्यंत पोहोचला. लाहोर, अमृतसर, पेशावर, सारंगकोट, काबूल, कंदाहारमध्ये आजही कृष्णमंदिरांतून मराठी ग्रंथांचे पठन, मनन होत असता मराठी भाषेची राघोभरारी महानु-भाव सांप्रदायिकांनी उत्तरेत अनेक शतकांपूर्वी नेली या गोष्टीचे मात्र विस्मरण होऊन चालणार नाही, मराठी धर्मभाषा म्हणून मान्यता पावली ती चक्रधर वाणीमुळेच! महानुभाव गद्यातून मराठी साहित्याचे आदिबंध कसे स्फुरण पावले ते गद्याच्या व तत्त्व-ज्ञानाच्या स्वरूपावरून शोधले आता महानुभाव कवितेचा विचार केला पाहिजे.

पहिली भाव कविता

मराठी भाषेतील पहिली भावकविता आणि पहिले गद्य महानुभाव लेखकांनी निर्माण केले व तेथूनच मराठी वाङ्मयाची भागिरथी प्रवाही झाली आणि अनेक प्रवाह तिला येऊन मिळत गेले. हे आतापर्यंत बघितले आहेच. गद्याचे शास्त्रीय पद्धतीने संशोधन, चिकित्सा, समीक्षा आणि विवरण होत गेले तर त्यांचे लालित्यहा 'लोळाचरित्र' व 'दृष्टांतपाठ' यांनी जोपासले तर कवितेच्या संदर्भात मराठी कवितेचा पंचपंच उषःकाल एका स्त्रीच्या उत्कट भावगर्भ आणि उत्स्फूर्त अशा पारंपारिक प्रेमकथेने झाला व तोही आपला आशय आणि घाट स्वतंत्रपणे मिरवीत आला ही गोष्ट आता सिद्ध झाली आहे. चक्रधर तत्त्वविचारांचा पगडा असूनही मराठीतील पहिले गद्य आणि पहिली कविता कथात्मक पद्धतीने निर्माण झाली असून पांडित्यप्रदर्शनाचा आणि बोजडतेचा लवलेशही या पहिल्याप्रतीच्या आद्य वाङ्मयनिर्मितीला शिवलेला नाही. उत्कट भक्तिभावातून आणि 'ईश्वरी' विरहातून अनुक्रमे 'धवळे' व 'लीळाचरित्र' यांची निर्मिती झाली. 'ज्ञानेश्वरी'चे वळण आणि नामदेवाच्या अभंगांचे वळण घाटदृष्ट्या लक्षात घेतले तर त्यातही असलेली कथात्मकता लक्षणीय पद्धतीने जाणवते. गद्य आणि काव्य हे दोन्ही वाङ्मयीन प्रवाह कथेच्या घाटातून साक्षात झाले. कारण अशिक्षित समाज व शिक्षणाचा अभाव यातून बहुजन समाजाच्या जागृतीसाठी साहित्यिकांनी कथेचे साह्य घेतले व त्यातून आपला सामाजिक आणि ईश्वरविषयक विचार आणि भावना अभिव्यक्त केल्या. आपल्या उत्कट अनुभूतींना साक्षात करण्यासाठी कथेशिवाय दुसरे माध्यम शक्य नव्हते कारण प्रवचन कीर्तनाच्या आश्रयातून आणि माध्यमातून महाराष्ट्रातील मंदिरामंदिरांतून कविता आपले रूप घेत होती. डोमेग्राम आणि ऋद्धिपूर ही महानुभावांची काशी आणि पंढरी होती तर पंढरपूर आणि आळंदी–नेवासे ही भागवत सांप्रदायिकांची काशी आणि प्रतिष्ठान होते. एक वक्ता व हजारो श्रोते असे या वाङ्मयनिर्मितीचे क्षेत्र होते. वक्त्या-समोरचा श्रोताही विविध स्तरांतला आणि बौद्धिकदृष्ट्या विविध पातळीवरचा असा होता! अशा श्रोत्यांचे अवधान आणि लेखकाचा आत्माविष्कार प्रामुख्याने कवितेतून झाला तर गद्यातून मात्र चक्रधरांचा विचार आणि आचारांचा प्रसार आणि प्रचार झाला. भागवत सांप्रदायाच्या लेखकांनी गद्य-निर्मिती केलेली नसली तरी अभंगाचे व ओवीचे स्वरूप हे गद्यात्मक होते. कारण गद्यात्मक बोलीभाषेतूनच मनोमनांचा संवाद लेखकांना साधावयाचा होता व एकीकडे आत्माविष्कार करून पण संवादात्मकता सांभाळून कवितेचा जन्म झाला. अशावेळी या कवितेला पुराणकथांचा आधार घ्यावा लागला. मध्ययुगीन काव्यनिर्मितीचे स्वरूप दुहेरी झाले; कारण एकीकडे कवितेतून आत्माविष्कार कवींनी साधला तर दुसरीकडे पुराणकथांचा आधार घेतला. अभंगवाङ्मयातूनही भागवतातील दशमस्कंधातील कृष्ण-लीला आळविल्या गेल्या तर श्रीकृष्ण अवतार हा पंचमकृष्णांपैकी एक असल्यामुळे महानुभाव गद्य आणि कविताही भागवतातील कृष्णकथेवर आधारित अशी निर्माण झाली.

आद्य कविता आणि आद्य कवयित्री

आद्य कविता आणि आद्य कवयित्री याद्दष्टीने महदाइसा या स्त्रीला पहिलेपणाचा मान मिळाला व तिने पहिली कृष्णरूक्मिणी विवाहकथा निर्माण करून एक प्रेमकथा कवितेतून बांधली. धवळे-पूर्वार्ध व धवळे-उत्तरार्ध यावरोबरच मातृकीरूक्मिणीसैंवर आणि गर्भकांडाच्या ओव्या इतकी तिची कविता उपलब्ध आहे. आशयाचा नवेपणा आणि अभिव्यक्तीचा नवेपणा समकालीन कवितेच्या संदर्भात लक्षणीय ठरला; कारण संस्कृत कविता ही विशेषतः वैदग्धपूर्ण आणि दीर्घ महाकाव्यसदृश अशी निर्माण होत राहिली. त्याद्दष्टीने 'धवळे' यांनी केवळ मराठी वाङ्मयापुरतेच नव्हे तर आख्यान काव्याच्या संदर्भात नव्या नव्या अपेक्षा निर्माण केल्या. नवी मूल्ये निर्माण केली आणि नवे आदर्श साक्षात केले या दृष्टीने धवळ्यांचे वेगळेपण लक्षात घ्यावे लागेल!

धवळ्यांमधील कल्पनासाम्य आणि प्रतिभासाम्य केवळ नरेंद्राच्या रूक्मिणीस्वयंवरात दिसते असे नाही तर सामराज विठ्ठल यानंतरच्या अगदी अलीकडच्या कवींच्या 'रूक्मिणीस्वयंवर' आणि 'रूक्मिणीहरण' यातही दिसते. या दृष्टीने महदंबेने उत्स्फूर्तपणे गायिलेली कृष्ण रूक्मिणीविवाहकथा नंतरच्या मराठी कवींना उपजीव्य ठरली इतकेच नव्हे तर धवळ्यांप्रमाणे कृष्णकथा भावसंक्रमित आणि प्रवाही गतिमान करण्याचा प्रयत्न झाला पण धवळ्याइतकी व्यक्तिरेखाटन आणि प्रसंगरेखाटनातील एकसंधता आणि एकरूपता नंतरच्या रुक्मिणीस्वयंवरकथेत उतरलेली नाही. वस्तुतः 'धवळे' हे एक प्रासंगिक कथाकाव्य आहे. आणि त्या प्रसंगातही कमालीचे नाट्य भरलेले आहे. 'एकु दी भक्तिजने भीक्षेसि गेली होती : तव तेलीण वोइरासि बासींगे नेत होती : तीते माहादाइसी म्हणीतले : आवो तेलीणी : मेहरी एक बासींग आमचेया गोसावियासि दे : आणुनि गोसावियाचिये श्रीमुगुटी बांधले : मग गोसावी श्रीमुकुट हालविती : कांकण बांध म्हणे : हळदी उटावे म्हणे : तुरे वाजो लागली : वडे मांडे केले : वळिवट वेळिले : मग ईश्वरनायके म्हणीतले : गोसावियासि वीव्हायाची प्रवृत्ती जरी होईल तरि मी आपुली कन्या देत असे : आणि गोसावी कोपु नटले : आववेया लोका जेवणावळी केली : मग महदाइसा धवळे गाइले : गोसावी गाए गाए म्हणे : आवो कृष्ण रूख्मिणी गाए म्हणे : आणि महादाइसासि स्फूर्ती जाली : मग चाऱ्ही दीस गोसावी रूक्मिणीसैंवर आइकीले: चौथा दीसी साडे झाले.'[१]

धळजे : पूर्वार्ध : उत्तरार्ध

धवळ्यांच्या पूर्वार्धाची माळ वरील नाट्यपूर्ण आणि कृतककोपनाट्यातून जन्माला आली. एक सहजता, मोकळेपणा आणि निःसंकोच भावाविष्कारामागील उत्स्फूर्तता या लेखना पाठीमागे होती. गोविंदप्रभूंच्या लुटूपुटीच्या विवाहानिमित्ताने धवळ्यांचा पूर्वार्ध

---

१. गोविंद प्रभूचरित्र २२४.

निर्माण झाला व तो इतका लोकप्रिय झाला की त्याचा उत्तरार्ध म्हाइंभट्ट आणि लक्ष्मीधरभट्ट यांच्या आग्रहाखातर महदंबेने गायिला. स्मृतिस्थळात या प्रसंगाचा उल्लेख असा येतो 'एकु दीसु म्हाइंभटी लक्ष्मीधरभटो महदाइसाते म्हणितले : समोरे रूक्मिणीसैंवर कां न करा : महदाइसी म्हणितले : तै गोसावी वरू दिधला म्हणौनि स्फुरले : लक्ष्मीधरभटी : म्हणितले : तरी आम्ही शब्द घडवुनी : तुम्ही गा : महदाइसी मानिले : तेही शब्द घडवू घडवू पदे बांधिली : आणि महदाइसी गाइली : यापरी दुसरी माळ केली : '[१] या आख्यायिकेवरून पूर्वार्ध व उत्तरार्ध निर्मितीत अंतर निर्माण झाले आहे ही गोष्ट स्पष्टच आहे; कारण गोविंदप्रभूंच्या प्रेरणेने धवळ्यांच्या पूर्वार्ध रचिला गेला व गोविंदप्रभूंचे निर्वाण शके १२०९ मधील आहे. त्याअर्थी त्यापूर्वी म्हणजे शके १२०८ च्या आसपास धवळ्यांचा पूर्वार्ध रचला गेला व नागदेवाचार्यांच्या मृत्यूपूर्वी म्हणजे शके १२३४ पूर्वी उत्तरार्ध रचला गेला असावा. दुसरी गोष्ट सिद्ध होते ती म्हणजे पूर्वार्ध आणि उत्तरार्ध यांच्या निर्मातीमागे एकच व्यक्तिमत्व आहे आणि ते म्हणजे महदंबेचे ! पूर्वार्ध रचनेत गोविंदप्रभूंच्या नैमित्तिक प्रेरणेतून निर्मिती साधली गेली तर उत्तरार्धात म्हाइंभट्ट व लक्ष्मीधरभट यांचा आग्रह कारणीभूत ठरला म्हणून त्याचे उत्तरदायित्व महदंबेचे ठरते आणि पूर्वार्ध व उत्तरार्ध यांतील भाषेच्या, प्रतिमांच्या, अलंकाराच्या साम्याचे अन्तर्गत आणि बाह्य पुरावे लक्षात घेतल्यास ही एकाच कविमनाची निर्मिती असून तीच उत्कटता आणि उत्स्फूर्तता आशयातून अभिव्यक्त होत गेली आहे. भाषेचा साधेपणा आणि प्रवाही गतिमानपणा पूर्वार्ध उत्तरार्धात सारखाच असून प्रसंगचित्रण आणि व्यक्तिमनोभाव दर्शन दोन्ही भागांत समान्तर पद्धतीनेच व्यक्त झाले आहे यावरून म्हाइंभट्ट व लक्ष्मीधरभट्ट यांची प्रेरणा उत्तरार्ध निर्मितीला प्रेरक ठरली पण अस्सल निर्मिती महदंबेचीच ठरते. मूळ कथेची उकल आणि परिणामकारक शेवट याही दृष्टीने पूर्वार्ध उत्तरार्धाचे आन्तरिक साम्य व एकसूत्रीपणा लक्षात घेता येतो. मातृकीरुक्मिणीसैंवराच्या बाबतीत मात्र कर्तृत्वाच्या संदर्भात म्हाइंभट्ट आणि लक्ष्मीधरभट्ट यांची मदत महदंबेने घेतली असावी किंवा तिचे अपूर्ण कार्य पंडितद्वयांनी पूर्णतेस नेले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. श्री वा. ना. देशपांडे यांनी म्हटल्याप्रमाणे धवळ्यांचा हा प्रतिध्वनी महदंबेचा नसून तो म्हाइंभट्ट व लक्ष्मीधरभट्ट यांनीच काढला असावा अशी खात्री वाटू लागते; कारण धवळ्यांमधील अंतर्गत सुलभता, वातावरणाची परिणामकारकता आणि व्यक्तिमनोभावदर्शनातील अचूकता मातृकीरुक्मिणीसैंवरात नाही, एकसंध भावप्रतीती जशी धवळ्यांमधून येते तशी ती 'मातृकी रुक्मिणी सैवरा'च्या वाचनातून येत नाही व स्त्रीसुलभ भाषेचा जो गोडवा धवळ्यांमधून व्यक्त होतो तोही 'मातृकी रुक्मिणी सैवरा' मधून होत नाही यावरून 'शब्द घडवू घडवू' ही रचना धवळ्यांच्या आधाराने म्हाइंभट्टाने व लक्ष्मीधरभट्टाने पूर्ण केली असावी, असे खात्रीपूर्वक आणि निश्चयाने वाटू लागले.

---

१. स्मृतिस्थळ : १७४

महदंबेचे व्यक्तिमत्त्व

धवळे निर्मितीत स्त्रीमनाचे प्रतिबिंब पडलेले आहे. आणि महादंबेचे व्यक्तिमत्त्वही सामान्य स्त्रीचे नव्हते. नागदेवाचार्यांची चुलत बहीण याद्दष्टीने घराण्यातूनच तिला परंपरेने विचक्षणता आणि बहुश्रुतता मिळालेली होती. गोविंदप्रभू व चक्रधर यांचा सर्वांत जास्त सहवास तिलाच मिळालेला होता याही दृष्टीने 'म्हातारी चर्चक' 'जिज्ञासक' अशी समृद्ध जीवन जगलेली व तीर्थाटने करून अनुभवसंपन्न झालेली वयस्क महदंबा अधिकारवाणीने नागदेव आणि अनुयायी यांच्याशी वार्तालाप करू शकत होती. ती प्रखर पंथाभिमानी होती. आपल्या भावाच्या भेटीस गेली असता तो देवता पूजनात मग्न आहे असे बघून ती माघारी वळली होती. दादोस आणि चक्रधर यांच्यात महदंबेवरून किंचित दुरावाही निर्माण झाला होता यावरून तिच्या व्यक्तित्वाचे वेगळेपण लक्षात येईल चक्रधरांच्या आत्मचरित्राचा 'बोलविता धनी' महदंबाच होती इतकेच नव्हे, तर ब्रह्मज्ञान, आत्मानुभव, कर्मवंचना या संदर्भात प्रश्न विचारून चक्रधरांचे तत्त्वविचार व आचारधर्म तिने समजाऊन घेतला व चक्रधरांना बोलते केले. गोविंदप्रभू व चक्रधर यांना महदाइसेविषयी विलक्षण आदर आणि स्निग्धभाव होता. त्यांचे परस्पर प्रेम हे गुरु शिष्याच्या आदर्श प्रेमाचे निदर्शक होते. चक्रधरनिर्वाणानंतर ऋद्धिपूरला राहून खंबीरपणे तिने मठव्यवस्था केली व सर्व भक्त मंडळींना लीळाकथन करून त्यांचे दुःख कमी करण्याचा प्रयत्न केला. भानखेड्याच्या डोंगरावर नागदेव मूर्च्छा येऊन पडले तर महदंबेने त्यांना पाठीवर उचलून परत आणून आचार्यपदाचा आब राखण्याचे अवधान दिले. नागदेव आणि महदंबा या बहीण भावाचे प्रेमही कमालीचे होते. महदंबेचे उपकार नागदेवांनी आयुष्यभर मानले व तिच्या अंतकाळी नागदेवाचार्य तिच्या भेटीसाठी खास करून गेले होते. यावरून पंथीयामधील परस्पर जिव्हाळा आणि प्रेमभावातील ममत्व महदाइसेच्या धवळ्यात व्यक्त झाले आहे. महदंबा जितकी जिज्ञासू आणि मार्मिक, चौकस आहे तितकीच फटकळ आणि तापटही आहे. म्हाइंभटाच्या देमतीचा वाम-व्यवहार महदंबेनेच उघडकीस आणला. दादोसला उलट उत्तर देण्यात आणि चक्रधरांशी वाद घालणारी ती एकमेव शिष्या आहे. वैराग्यशील असे वार्धक्यात संपृक्त झालेले आणि अनेक उन्हाळे पावसाळे सोसलेले असे महादंबेचे आयुष्य आहे. ती अतिशय सुगरण असून मनकवडी होती. गोविंदप्रभूंची खाण्यावरील वासना आणि चक्रधरांच्या आवडीनिवडी ती अचूक सांभाळीत असे. मठातील वातावरण प्रसन्न ठेवण्यात रंगमालिका काढून ती आपले कौशल्य दाखवीत असे. एकीकडे ती अतिशय करारी, फटकळ, शिस्तशीर आहे तर दुसरीकडे अतिशय संवेदनशील आणि कविमनाची आहे. उत्स्फूर्तता हे तिचे वैशिष्ट्य. दळता कांडतांना ती उत्कटपणे ओव्या म्हणत असे. 'गोमतीचे तीरी : नीळेया गुढरा : राजेया गुजरा : कृष्णराया' तसेच 'नागदेवाचेया खांदावरी करू : राजा चक्रधरू : बीजे करी :' अशा उत्स्फूर्तपणे ती ओव्या गात असे. ही उत्स्फूर्तता धवळ्यांच्या आकृतिबंधात आणि आशयातही उतरली आहे.

एक अस्सल प्रेमकथा

पुराणातील एक प्रेमकथा निवडण्यातही महदंबेनें मार्मिकता दाखविली आहे. कृष्ण रुक्मिणी यांच्या विवाहकथेत अतिशय नाट्य भरलेले आहे. कृष्णकथा ही अतिशय व्यामिश्र आहे आणि महानुभावीय अनुयायांची ती पंचकृष्णांपैकी एक ईश्वरी अवतारी रूपच आहे. महदंबेने भक्तिमय अंतःकरणाने कृष्णकथा आळविली असून 'गोविंद-राजा', 'चक्रधरू' आणि 'सर्वेश्वरू', 'नागदेवाचा स्वामी' यांच्या उल्लेखातून पंथ-निष्ठाही स्पष्ट केली आहे. रुक्मिणीचे तारुण्यात पदार्पण होणे भीमकाच्या दरबारी भाटांनी कृष्णकौतुक करणे त्यामुळे रुक्मिणीने विरह व्याकुळ होणे, वसुदेवाबरोबर निरोप धाडणे त्याप्रमाणे कृष्णाने कौण्डीण्यपूर येथे येणे, रुक्मा, जरासंध आणि शिशुपाळ यांनी युद्धास तयार होणे, कृष्णाने गावाबाहेर जानोसा घेणे व रुक्मिणी सख्यांसह अम्बेच्या देवळात पूजाअर्चा करण्यासाठी येणे व कृष्णरुक्मिणीचे मनोमीलन होऊन विवाह होणे अशी ही मूळ पुराणातील कथा सर्वच मराठी कवींच्या चिंतनाचा विषय झाली व त्यात अनेक हेतुप्रवाह मिसळून देत व आपापल्या कुवतीप्रमाणे व दृष्टिकोणाप्रमाणे मूळ कथेतील नाट्य आविष्कृत करीत जाणे या पद्धतीने गेली पाचशे वर्षे मराठीमध्ये वेगवेगळ्या काळांत आणि वेगवेगळ्या कवींनी कृष्णरुक्मिणी विवाहकथा गायिली व तीतून आपले भक्ति-प्रवण मन व्यक्त केले.

धवळे म्हणजे काय?

महदंबेचे वैशिष्ट्य असे की या आख्यानाला ती स्वयंवरकाव्य म्हणत नाही तर 'धवळे' असे नामाभिधान देते यावरून धव+ल मधील वरविषयक प्रसंशात्मक उत्स्फूर्त गाणे असा त्याचा अर्थ होतो. एका मांगल्यपूर्ण वातावरणाची व तारुण्यातील उत्साहाची अपेक्षा अशा गीताकडून केल्यास महदंबेच्या धवळ्यांनी ती पूर्ण केली आहे, अभिलषितचिंतामणीकार सोमेश्वराने 'विवाहे धवलम्' असा गीतप्रकार सांगितला तर हेमचंद्राने 'धवलगीत' अष्टचरणी किंवा षट्चरणी असते असे म्हटले. श्री. वा. ना. देशपांडे 'धवळे'ची व्युत्पत्ती धवलगीत म्हणजे वरविषयक गीत अशीच सांगतात व ती एकूण धवळ्यांचे स्वरूप लक्षात घेता अनुकूलच आहे. भारतीय विवाहपद्धतीत वधूवर गीतांना विशेष महत्त्व आहे आणि प्राधान्याने ती आटोपशीर व अचूक वर्णने देणारी असतात. चार चरणांचे एक कडवे व त्यासाठी ध्रुवपद अशी त्यांची रचना असते. त्यांनाच आपण मंगलाष्टके असे म्हणतो. स्त्रियांनी गावयाचे वरविषयक विवाहगीत असे धवळ्यांचे स्वरूप आहे. प्रा. द. रा. बेन्द्रे यांनी धवळ्यांचे मूळ द्राविड 'अक्कर' या गीतप्रकारात शोधले. वास्तविक अपभ्रंशकाळापासून किंवा त्याही पूर्वीपासून 'धवळ' हा वृत्तप्रकार मानला गेला व तो मौखिकपद्धतीने परंपरेने भक्त मंडळींनी जिवंत ठेवला म्हणूनच एकीकडे धवळ्यांमध्ये अनंत अपपाठ आणि पाठभेद निर्माण झाले, तर दुसरीकडे महानु-भावांची आजपर्यंतची वस्तुनिष्ठ निर्मितीची पद्धतीही धवळ्यांनी बाजूला सारली. बहुजन

समाजाच्या वाणीत एकरूप झालेले स्वरूप धवळ्यांना आल्यामुळे त्यांची गेयता आणि भक्तिप्रवणता ही जिव्हाळ्याचा विषय बनली. एकनाथांचे समकालीन दासोपंत यांनी 'धवलमंगल गाणे' असे म्हटले तर एकनाथांनी 'धवळामाजी गाणी गाइले रामनाथ' असे म्हटले यावरून विवाहप्रसंगी गावयाचे वरस्तुतीपर गीत या दृष्टीने महदंबेचे धवळे हे पहिले कृष्णरुक्मिणी विवाहकथा काव्य ठरले आहे. धवळे पूर्वार्धात त्यांशी मुक्त ओव्या आहेत तर उत्तरार्धात फक्त पासष्ट ओव्या आल्या आहेत. यावरून महाकाव्यनिर्मितीसाठी अनुकूल कथा असूनही महदंबेने अत्यंत आटोपशीरपणे हा कथाभाग कवितेतून गुंफला व यातच तिचे कौशल्य दिसते.

भक्तिकथा

श्रीकृष्णरुक्मिणी विवाह कथेकडे कवयित्री एका शृंगारकथेच्या भूमिकेतून बघत नसून तिचे भक्तिमूल अंतःकरणच धवळ्यांमधून अभिव्यक्त होते. प्रेमकथेच्या गुंफणीतून एक अस्सल भक्तिकथाच साक्षात होते. 'पाविजे परमागती भक्ती आइकता कृष्णचरित्र... मग धवळी गाइन गोविंदुराणा' हीच महदंबेच्या लेखननिर्मितीमागील प्रबळ प्रेरणा ठरली. तरुण रुक्मिणीची आपल्या विवाहासंदर्भातील स्त्रीसुलभ उत्सुकता आणि 'शिशुपाळ वरू' ऐसे बाळेने ऐकताच 'श्रम पातली नीव्हा जाली व्याकुळ' अशी रुक्मिणीची अवस्था झाली. एका अकृत्रिम साधेपणाने भावभावनांचे चढउतार आणि कथाविस्तारापेक्षा व्यक्ति-मनोभावांवर महदंबेने नकळत दिलेला भर त्यातून धावत्या प्रसंगचित्रणातील गतिमानता आणि उत्स्फूर्तपणे व्यक्त झालेली शब्दरूपे कवितेला एक धारदारपणा देतात. 'स्मरीले कृष्णरावो देवा संकष्टी पडलीच थोरी, शीशूपाळ बंदीशाळा चुकवा दाखवा आपुले श्रीचरणः'[1] अशी उत्कट हाक घालून ती हृदयाची आर्तता स्पष्ट करते आणि लगेच कृतिशीलही बनते. रुक्मिणी आणि तिच्या सख्यांचा परिवार, रुक्मिणी आणि शिशुपाळ जरासंध यांचा परिवार सुदेव आणि भीमक हे रुक्मिणीचे पाठीराखे तर बलराम, उद्धव हे कृष्णाचे पाठीराखे रुक्मिणीपरिवार आणि कृष्णपरिवार यांची जिवंत चित्रणे कौंडिण्यपूर आणि द्वारकानगरी येथील राजवैभव, ऋषिमुनींची गजबज, स्वर्ग पाताळातील देवतांची घाईगर्दी व मूळ धाडण्यापासून तो विवाह होईपर्यंतचा संपूर्ण तपशील यामधून एक संपूर्ण आणि स्वतंत्र अपरविश्व निर्माण झाले. सुदेव, भीमक, रूक्मी, जरासंध यांचा स्वतःचा जीवन-विषयक स्वतंत्र असा दृष्टिकोण आहे. श्रीकृष्णावर अपरंपार प्रेम करणारा बलरामही लगबगीने सैन्य घेऊन कृष्णाची पाठराखण करीत आहे. रूक्मीने 'गौळिया' म्हणून कृष्णाचा अधिक्षेप केलेला आहे. मुलगी वयात आल्यामुळे सचिंत होणारा आणि बंदीजनांनी कृष्णस्तुती गाताच मनोमन निश्चिंत होणारा, आणि साक्षात विवाहासाठी द्वारकेहून कौंडिण्य-पुरी कृष्ण येताच भोळेपणाने गडबडून जाणारा भीमक शब्दांच्या मितव्ययातून फार

---

१. धवळे पूर्वार्ध : ९

सुंदर उभा केला आहे. त्याची मानसिक आंदोलने आणि राजा या नात्याने असलेली कर्तव्ये यांचा फार सूक्ष्म तपशील कवयित्री देते. भीमकाचा दरबार, अंबेचे देऊळ आणि श्रीकृष्णाचा द्वारकेतील राजदरबार आणि त्या अंगभूत वेगळेपणाने सर्व तपशीलासह येतो. रुक्मिणीच्या सख्या जशा अतिशय चतुर आहेत, तसाच सुदेव ब्राह्मणही फार मार्मिक आहे. रुक्मिणीच्या कृष्णासाठी असलेल्या निरोपाची पोहचवणी तो अचूकपणे करतो. 'पंचरात्रे देवी आणीन गोविंदुराणा' असे रुक्मिणीला आश्वासन देतो आणि 'अहोरात्री विप्रु पातला द्वारावती' असा 'मनावेगा' गतीने द्वारकेला येऊन पोहोचतो. तेथील कृष्णाचे वैभव बघून तो चकित होतो व रुक्मिणीचा निरोप पोहोचवून तडक परत फिरतो. इकडे रुक्मिणी त्याची गच्चीवर उभी राहून वाटच बघत असते. कृष्ण आपल्या दळभारासह येत आहे असे कळताच रुक्मिणी गच्चीवरून उडी घेते त्यावेळी सुदेव तिला सावरतो. नंतर चाणाक्षपणे रुक्मिणीहरण कसे व कोठून करावयाचे याचाही सल्ला तो कृष्णाला देतो. हरखून जाणारा भीमक आणि चाणाक्ष सुदेव यांच्या प्रयत्नांनी रुक्मिणीला सर्व अनुकूलता मिळाली म्हणून 'आइकौनि शीशुपाळु रूकुमिया जरासधु दचकले मनी' अशी शिशुपाळादिकांची अवस्था झाली. व्यक्तिरेखांची, त्यांच्या मनोभावांची आणि कृति-उक्तींची मनोज्ञ चित्रणे महदंबेने केली आहेत. कथानकावरील पकड कुठेही ढिली होऊ न देता व गतिमान धावत्या प्रसंगचित्रणातील व्यक्तिरेखाटनातील सुस्पष्टता आणि भिन्न स्वभावधर्म यामुळे व्यक्तिचित्रणाला गुणरूप आले आहे. घटना आणि प्रसंग विलक्षण जिवंत झाल्यामुळे त्यांची एकात्मता ही एकसारखी व्यक्तींच्या संदर्भातच जाणवते. विविध प्रसंग खुलविणे आणि त्यातून व्यक्तिरेखा जिवंतपणे साक्षात करणे हे महदंबेचे कर्तृत्व आहे. प्रसंगचित्रणातील अपरिहार्य तपशील, अचूक निवेदन आणि वृत्तीचा विलक्षण गोडवा महदंबेच्या अभिव्यक्तीची कोवळिक जाणवून देतात, कौंडिण्यपुरातून द्वारकेत व द्वारकेतून कौंडिण्यपुरी केव्हा येऊन पोहचतो व सर्व परिवारासह स्थिरचरासह यावद्दल वाचक विस्मयचकित होऊन जातो. पूर्वार्धात एक सुखद स्वप्नवत् मोहमय वातावरण उत्कटतेने शिगोशीग भरलेले असे जाणवत असते, तर उत्तरार्धात बळभद्राचा कोप आणि त्यांच्या सैन्याने शिशुपाळाशी प्रळयाच्या कालाप्रमाणे दिलेली झुंज, रूक्मीची झालेली फजिती, रूक्मीचे 'सालेपण' आणि विवाहाची सांगता अशी घटनांची आणि प्रसंगाची चढती श्रेणी निर्माण झाली आहे. वीररसाचा प्रादुर्भाव उत्तरार्धात होतो, तर भक्तिरस संपूर्ण धवळ्याचा प्राणहेतूच असतो. श्रीकृष्ण हा तर ईश्वरीरूपात महदंबेला दिसतो आहे. तो 'भक्तवछळ' आहे. 'शरणागत स्वामी,' 'जगनाथ,' 'लावण्यसागरू,' 'कृपासिंधू,' 'कैवल्याचा पुतळा,' 'मूर्त झलेले अमूर्त ब्रह्म,' 'परब्रह्म' असे कृष्णरूप आहे. कृष्णकथा आळविताना कृष्णाचे श्रेष्ठत्व आणि ईश्वरत्व या प्रेम विवाह कथेत बाधा आणीत नसते तर त्यामुळे एक भक्तिरसाची वाढती श्रेणी निर्माण होत जाते व त्यातून या विवाहोत्सवाची आणि आनंदोत्सवाची आकर्षकता अधिकच वाढीस लागते. अध्यात्मापेक्षा भक्तिमय अन्तःकरणाने उत्स्फूर्तपणे कृष्णरुक्मिणी विवाह कथा धवळ्यांमध्ये केंद्रिभूत झाली व

संगीतसुभग असे रूप या कवितेला येऊन गेले. विवाहप्रसंगातील अपरिहार्य असे लहान-सहान प्रसंगही तितक्याच तादात्म्याने आणि स्त्री सुलभ जिव्हाळ्याने आणि उत्कटतापूर्ण सहजतेने महदंबेने रेखाटले आहेत. म्हणूनच एक मर्यादित अनुभवविश्व घवळ्यातून गोचर होत असूनही समूह लोकवृत्तीशी एकरूप होण्याचे बळ त्याच्याशी आहे.

आशयसौंदर्य

रुक्मिणीची व्यक्तिरेखाही अशीच विलोभनीय झाली आहे. स्त्रीत्वाचे सारे गुणधर्म घेऊन रुक्मिणी साकार होते ती केवळ प्रेयसी नाही तर मिलनोत्सुक आणि समर्पित जीवनासाठी आसुसलेली अशी स्त्री आहे. तिचे स्त्रीत्वाचे सर्व विशेष कांतिमान होऊन व्यक्त झाले आहेत. कृष्णरूप वर्णन करताना येणाऱ्या विशाल प्रतिमा आणि रुक्मिणीरूप साक्षात करणाऱ्या नाजूक प्रतिमा यातूनही कवयित्रीची स्त्रीदृष्टी लक्षवेधी ठरते. 'लावण्य-रासी', 'त्रैलोक्य-मोहिनी', प्रियकर भेटीसाठी आतुर झालेली, 'लावण्यवेली', 'मृग-लोचना', 'प्रेमपिसे लागलेली रुक्मिणी', 'हंसगती,' अशी रुक्मिणी अंबेच्या देवळात कृष्णाला बघताच संभ्रमित झाली त्याचे वर्णन मुळातून बघण्यासारखे आहे.

> हंसगती चाले बाळा
> आनंदे आसुवे काही नेदखोचि डोळा :
> कंपित सासंकित अंगी रोमस्वेद लल्लाटी
> तव तिया रुक्मिणी यादवरावो श्रीकृष्णु देखिला भारी ॥[1]

प्रसंगचित्रण, व्यक्तिचित्रण आणि व्यक्तिमनोभाव दर्शन यांतील भावनांची गति मान आणि प्रभावी निर्मिती हे घवळ्यांचे महत्त्वाचे गुणरूप असल्यामुळे कुठेही सांके-तिकता आणि पुनरावृत्तीचा दोष निर्माण होऊ शकलेला नाही. एक लोकगीतात्मक घाट या कवितेला मिळाल्यामुळे त्यातूनही तालबद्ध आणि संगीतात्मक चरणांची बंदिशी अपूर्व साधली गेली. मिस्कील अशा दासी, विनोदी नारद, भोळा भीमक, सर्वेश्वरू श्रीकृष्ण आणि लावण्यवेली रुक्मिणी आपापल्या कृति उक्तीतून आणि गुणरूपांतून पृथकपणे साकार होत जातात व व्यक्तित्वविशेष निखळपणे सांभाळीत जातात. वास्तविक महाकाव्याचा साज रुक्मिणी स्वयंवरावर कवींनी चढविलेला आहे, पण महदंबेने मात्र कमीत कमी शब्दांत जास्तीत जास्त आशयसंपन्न अनुभव गोचर करून मराठी काव्यविश्वात एक चमत्कार घडवून आणला.

घवळ्यातील संपूर्ण वातावरण हे एका आनंदोत्सवाचे उत्स्फूर्ततेने भारलेले असे आहे. त्यात सगळीच लगीनघाई आहे. पण अशी गतिमानता असूनही तपशीलाची अचूकता व शब्दांची मार्मिक गुंफण यांमधून एक निखळ मराठी वाणाचे कथागीत

---

१. घवळे पूर्वार्ध ७९

भावसंक्रमित होऊन जन्माला आले आहे. कथेतील नाट्यात्मकता प्रसंगांनी आणि संवादांनी सांभाळली तर कथात्मकता व्यक्तिरेखांनी उजळून निघाली. वाचकाला एकाच वेळी कौडिण्यपूर आणि द्वारका यांचे दर्शन घडवून पुनः विवाह सोहोळ्यात सामील करून घेण्याचे महदंबेचे कसब खरोखर अपूर्व आहे. नरेंद्राने रुक्मिणीस्वयंवर रचले पण पांडित्य प्रदर्शनाचा हव्यास आणि सभाकवित्वाची बंधने त्याच्या कवितेला पडली. पुढच्या काळात एकनाथांनी 'रुक्मिणीस्वयंवरा' मध्ये जीवाशीवाचे ऐक्य शोधण्याचा प्रयत्न केला आणि कवीच्या दृष्टिकोणामुळे कथा कोमेजून गेली. विठ्ठलाने 'रुक्मिणीहरण' कथा चित्राकृतिबंधात पकडली. त्यामुळे तीही सांकेतिक झाली तर सामराज भक्तिमुक्तीच्या साह्याने 'अगत्य आहे जनरंजनाचे' या भूमिकेतून सर्गरचना करीत कवितेच्या घाटावरच स्थिरावला त्या कथेतील आशयावर त्यामुळे मर्यादा पडल्या. पेशवेकालापर्यंत 'कृष्णरूक्मिणी विवाहकथे' वर जवळजवळ तीस ते चाळीस मराठी रचना झाल्या पण महदंबेने आशय आणि अभिव्यक्ती यांमधील दाखविलेली एकरूपता आणि एक सोलीव, भक्तिमूळ अंतःकरणाने गायिलेली, उत्स्फूर्त विवाहकथा या दृष्टीने महदंबेचे धवळे एकमेवाद्वितीय ठरले. वा. ना. देशपांडे यांनी म्हटल्याप्रमाणे धवळ्यांच्या एक खांबी तंबूवरच महदंबेच्या भावविश्वातून गोचर झालेले काव्य तोलून उभे आहे. अशी कविता पुनः मराठीत अजूनपर्यंत तरी निर्माण झालेली नाही.

पहिले आख्यानकाव्य

धवळे पूर्वार्ध आणि धवळे उत्तरार्ध यांतील एक रसात्मकता, एक कथात्मकता आणि व्यक्तिदर्शनातील एकात्मता यामुळे मराठीतील पहिले आख्यानकाव्य हे असे उत्स्फूर्त आणि भक्तिभावाच्या सूत्रात गुंफलेले असे निर्माण झाले. आधात्मदर्शनापेक्षा कृष्णभक्ती आणि पांडित्य प्रदर्शनापेक्षा उत्स्फूर्त गतिमान काव्यनिर्मिती या दोन्ही दृष्टींनी आख्यानकवितेची सुरुवात धवळ्यांनी केली असली तरी पुढील आख्यानकवितेला मात्र तसे स्वरूप पुनः येऊ शकले नाही. अनेक कलाबाह्य दृष्टिकोण आणि हेतुप्रवाह तीत मिसळत जाऊन तिचे रूप अधिकच संमिश्र झाले. आख्यानात्मकतेची जी निखळ जाणीव धवळ्यांमधून झाली तशी पुढील आख्यानकवितेतून होऊ शकली नाही. आख्यानकाव्याचे सर्व विशेष धवळ्यांमधून अभिव्यक्त झाले. मनःपूर्वकता आणि उत्स्फूर्तता ही सर्जनशील आणि संवेदनाक्षम कविमनाची अभिव्यक्ती व कोवळिक धवळ्यांमधून प्रतीत झाली तशी पुनः पुढच्या काळात शक्यच झाली नाही; कारण अनेक कारणांसाठी कृष्णकथा रावविली गेली. कृष्णभक्ती आणि उत्कट भावनांचा जिव्हाळ्याने घेतलेला आशयसंपन्न अनुभव यामुळे यादवकालीन कवितेत धवळ्यांना अनन्यत्व आले ते कायमचेच अशी ही महदंबेची पहिली कविता आणि मराठी कवितेची 'सुललित रचनेची' लावण्यवेल! ज्ञानेश्वरांनी म्हटल्याप्रमाणे 'जैसा पंचमालापु सुगंधु की परिमळु सुस्वादु, भला झाला विनोदु कथेचा इये॥ धवळ्यांविषयीही असेच म्हणता येते.

विदग्ध कथाकाव्य

महदाइसेच्या धवळ्यांची निर्मिती ही मराठी कवितेची सुरुवात होती तर त्याच विषयावर आणि महानुभाव पंथातच असलेल्या नरेंद्राने विदग्ध रचना करून एक वैचित्र्यपूर्ण सुरुवात कवितेच्या प्रांतात केली. 'रुक्मिणीस्वयंवर', भास्कराचा 'शिशुपालवध' आणि दामोदर पंडिताचे 'बछाहरण' ही तीन विदग्ध दीर्घ कथाकाव्ये यादवकाळात निर्माण झालीत. त्यांचा विषय जरी कृष्णभक्तीचा असला तरी कविपरत्वे त्यांच्य निर्मितीचे स्वरूप भिन्न झालेले आहे. संस्कृत 'विदग्ध' महाकाव्यांचे काही आदर्श स्वीकारीत व काही स्वतःचे आदर्श निश्चित करीत या रचना तयार झाल्या. धवळ्यांमध्ये गुंफलेली कृष्णकथा आणि रुक्मिणीस्वयंवरात उलगडत गेलेली कृष्णकथा यांमध्ये मूलतः फरक आहे. सांप्रदायिक कवी असूनही आणि विषयसाम्य असूनही कविप्रवृत्ती भिन्न असल्यामुळे निर्मितीही भिन्न स्वरूपाची झाली आणि आख्यान कवितेचा दुसरा आदर्श नरेंद्राने निर्माण केला. आख्यान कवितेची सुरुवात धवळ्यांपासून झाली, त्या कवितेला पृथक असे स्वरूपही आले आणि एकसंध अशी आशय आणि अभिव्यक्तीची जाणही धवळ्यांमधून प्रगट झाली. अध्यात्मापेक्षा भक्तिभाव वरचढ ठरला आणि कृष्णभक्तीसाठी कृष्णकथेतील नाट्यदर्शनातून कवितेने रूप घेतले. स्त्रीमुलभ जिव्हाळा आणि विवाहप्रसंगांचे अगत्य धवळ्यांनी जोपासले व एक उत्स्फूर्त आणि मोकळी मनःस्थिती त्यातून अभिव्यक्त झाली. म्हणून कृष्ण रुक्मिणी विवाहापूर्वीच महदंबेने कृष्णाला 'रुक्मिणी कांत' असे तर रुक्मिणीसाठी 'कृष्णाराणी' असे विशेषण योजिलेले आहे. (पाहा–धवळे पूर्वार्ध ४८) 'तेथ उपलाणे केले यादवराये श्रीकृष्ण रुक्मिणीकांतेः' यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, महदाइसा कृष्णकथेच्या माध्यमातून कृष्णभक्तीचा आविष्कार आणि कृष्णमहात्म्याची नवलाई अनुभवण्याच्या भूमिकेतून धवळे गात आहे. उत्कटतेतील अपूर्वता आणि भक्तीमधील आर्तता यांच्या संयोगातून धवळ्यांना आत्यंतिक गतिमानता आली. पूर्वार्धामध्ये अनेक नाट्यपूर्ण प्रसंग कृष्ण रुक्मिणींच्या मनोमीलनापूर्वी घडून जातात आणि उत्तरार्धात मात्र संपूर्ण विवाहविधी यथासांग सांगितला जातो यातच महदाइसेची भूमिका स्पष्ट होत जाते. मूळ धाडण्या पासून तो साडे झाल होईपर्यन्तचा संपूर्ण लग्नविधी महदाइसाने गायिलेला आहे. म्हणजे धवळे या उत्स्फूर्त आख्यान कवितेत स्त्रीसुलभ सृष्टीची निर्मिती भक्तिभावाच्या माध्यमातून नाट्यपूर्ण पद्धतीने व एकरसात्मकतेने सिद्धीला गेली. नरेंद्राच्या रुक्मिणीस्वयंवराची अवस्था वेगळी असली तरी महदंबेप्रमाणेच रुक्मिणीचे कृष्णावरील भक्तियुक्त प्रीतीचे दर्शन घडविण्याच्या भूमिकेतून काव्यनिर्मिती त्याने केली आहे. अर्थात महदंबेच्या लेखनात सहजता असते तर नरेंद्र विदग्धतापूर्ण पद्धतीने या कथेला न्याहाळतो.

स्मृतिस्थळ ११३ व टीपग्रंथ आणि अन्वयस्थळ यावरून नरेंद्राच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकणार एक प्रसंग कळतो. नरेंद्र रामदेवराव यादवाचा सभाकवी आहे. त्याचे भाऊही त्याच राजाच्या दरबारात 'नलोपाख्यान' आणि 'रामायण' गाऊन गेले

त्यावेळी नळकथा किंवा रामकथेपेक्षा कृष्णकथा गायिली असती तर 'तुमचे या पापा पुरश्चरण होते' असे नरेंद्राने खडसावले. अशावेळी बंधू दुखावले आणि नरेंद्राशी त्यांनी पैज लावली व रुक्मिणीस्वयंवराच्या निर्मितीला सुरुवात झाली. अठराशे ओव्यांचे संपूर्ण काव्य तयार झाले. रामदेवराजाने ते काव्य माझ्या नावावर दे म्हणून नरेंद्राला सुचविले असता त्याने बाणेदारपणे कविकुलाला दोष निर्माण होईल म्हणून नकार दिला (आमचे या कविकुळा बोलु लागैल) आणि पुढे रातोरात प्रत्येक भावाने तिनशे ओव्या लिहिल्या व सकाळी राजदूत येऊन त्यांनी जबरीने काव्य नेले. यावरून दोन गोष्टी स्पष्ट झाल्या आहेत. स्मृतिस्थळातील हा पुरावा असल्यामुळे त्यातील सत्यता निखळ आहे व नरेंद्राची स्वकाव्य-कर्तृत्वाविषयीची जाण आणि अभिजात निर्मितीसंदर्भातील आग्रह यावरून स्वकाव्याविषयी अचूक समज आणि तिच्या कलात्मकतेविषयीची धारणाच वरील आख्यायिकेमधून व्यक्त झाली आहे. तसेच डॉ. डोळके आणि डॉ. कोलते यांना उपलब्ध झालेल्या संपूर्ण रुक्मिणीस्वयंवराच्या प्रतींविषयी विचार करावा लागतो. कारण स्मृतिस्थळातील उल्लेखात रुक्मिणीस्वयंवराची ओवीसंख्या अठराशे दिली आहे, तर डोळके प्रतीत दोन हजार नऊशे छत्तीस ओवीसंख्या, तर नव्या कोलतेप्रतीत दोन हजार नऊशे एकोणचाळीस ओवीसंख्या आहे. याशिवाय आणखी दोन संपूर्ण प्रती अठराशे पंचाऐंशी आणि एकोणिसशे बारा अशा उपलब्ध झाल्या. यावरून रुक्मिणीस्वयंवराचा टीपग्रंथ आणि स्मृतिस्थळ यांतील संख्येच्या संदर्भातील एकवाक्यता आणि सुदेवाचे द्वारकेत आगमन इथपर्यंतच्या रुक्मिणी स्वयंवरावरील उपलब्ध असलेले टीपग्रंथ यात मूळ ग्रंथ अठराशे ओव्यांचा असून[1] पुढील ओव्या वाढीव स्वरूपाच्या समजाव्या लागतील. डोळके प्रतीत आणि कोलते प्रतीतही (नव्या उपलब्ध झालेल्या संपूर्ण रुक्मिणीस्वयंवराचा) टीपग्रंथ पुढील ओव्यांचा उपलब्ध नाही यावरून ही निर्मिती नंतरच्या काळातील असून जो ग्रंथ घेऊन नरेंद्र नागदेवाचार्याकडे आला तोच ग्रंथ टीपग्रंथासाठी पंथीयांनी स्वीकारला. नंतरच्या काळात म्हणजे चौदाव्या पंधराव्या सोळाव्या शतकातील उपलब्ध महानुभाव वाङ्मयातही मिळत नाही. पुढच्या रुक्मिणीस्वयंवरावरील टीपग्रंथ मिळत नाहीत. आणि स्मृतिस्थळ, वृद्धाचार, अन्वयस्थळातही मिळत नाही याही गोष्टीचा विचार केला पाहिजे. म्हणजे तेराव्या शतकात नरेंद्राने ज्या ओव्या घेऊन पंथात प्रवेश केला तेच रुक्मिणीस्वयंवर पंथीयांच्या दृष्टीने प्रमाण मानले गेले व त्यावरील टीपग्रंथ निर्माण होऊन मान्यताप्राप्ती त्यांनाही मिळाली. द्वितीय आणि तृतीय शोधगीचे टीपग्रंथ रुक्मिणी स्वयंवराच्या ८७९ ओव्यांचाच विचार करतात. डोळके प्रतीतून उपलब्ध झालेले संपूर्ण रुक्मिणीस्वयंवर नंतरच्या कवींनी वाढविलेली अशी निर्मिती असावी असे अन्तर्गत पुराव्याच्याच साह्याने स्थूलपणे म्हणता

---

१. पाहा : राजधर प्रतीचा समाप्तिलेख डॉ. कोलते उध्दृत, युगवाणी, जाने. १९७४, पृष्ठ ७७४. वछाहरण, एकादशस्कंध इ. ओवी संख्या देऊन समाप्ति लेखक म्हणतो 'ओविया' : नरेंद्र : १८८५ ओविया ॥०॥

येते. नरेंद्राचा कल्पनाविलास सौंदर्यदृष्टी आणि कथानक धावते ठेवण्यामागील संथपणा या संदर्भात वाढीव रुक्मिणीस्वयंवर विशेष आशादायक नाही व कविवृत्तीत फरक पडत गेलेलाही निदर्शनास येतो. महानुभाव टीकग्रंथ हे वाङ्मयाचे अस्सल पुरावे मानले व ज्या अर्थी रुक्मिणीस्वयंवरावरील संपूर्ण टीकग्रंथ मिळत नाही त्या अर्थी ती पूर्णतः निर्मिती नरेंद्राची नसून त्या काव्याला 'सातीग्रंथां'त जे महत्त्व, वैशिष्ट्य आणि पंथप्रतिष्ठा मिळाली, त्यातून ही वाढ झाली असावी. या संदर्भात नामदेव तुकारामाची अभंगसंख्येतील वाढ तुलनेसाठी बघता येईल.

नरेंद्राच्या रुक्मिणीस्वयंवराचा घाट लक्षात घेता केवळ भक्तिमुक्तीसाठी ही निर्मिती झालेली नाही किंवा पंचकृष्णांपैकी एक ईश्वरी अवतार म्हणूनही केवळ कृष्ण-रुक्मिणी विवाहकथा, निवडलेली नाही तर पारंपारिक कथाभाग घेऊन त्यावर त्याने स्वतंत्र निर्मिती केली आहे. कथाविस्तार आणि कल्पनाविस्तारातील सौंदर्यदृष्टी यामधून काव्यबंध निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे. अर्थात नरेंद्राचे हे विदग्ध दीर्घ कथाकाव्य केवळ काव्यनिर्मिती म्हणून निर्माण झाले नसले तरी तशी त्याची धारणा आहे. आणि यादवकाळात तर ही घटना अभिनवच म्हणावी लागेल. पंथप्रवेशापूर्वीची ही निर्मिती असली तरी तिच्यापूर्वी नागदेवाचार्यांचे 'श्रवण' नरेंद्राला घडले असून एकूण त्याचा कल महानुभाव पंथाकडे झुकलेला होता. तसेच रामदेवराव यादवाकडून तडक तो पंथाला येऊन मिळाला, यावरूनही त्याच्या काव्यनिर्मितीपूर्वीच त्याचा कल मानसिकदृष्ट्या महानुभाव पंथाकडे झुकलेला होता व समकालीन महाराष्ट्रीय विद्वान, महानुभाव पंथाला जाऊन मिळाले होते. यावरूनही रुक्मिणीस्वयंवरातील महानुभाव संकल्पना आणि परिभाषा चिंतनीय ठरते. रुक्मिणीस्वयंवरातही ही पंथनिष्ठा अभिव्यक्त झालेली आहे व तिचे निखळ रूप जाणवत असते.

आदिकवींनी वेदांवर रचलेली स्मृतिपुराणे ही श्रीकृष्णकथेपुढे बरोबरी करू शकत नाहीत आणि काव्य, नाटक, कथा, आख्याने, प्रबंध आणि चित्रगाथा हेही वाङ्मयातील काव्यप्रकार 'परि सरि न पवेति सर्वथा : देवाचेया पवाडेयासी' (रु. स्वः १७) असे नरेंद्र म्हणतो यावरून संस्कृत विदग्ध वाङ्मयातील विविध प्रकार व त्यातील सूक्ष्मातिसूक्ष्म भेद प्रभेद यांची नरेंद्राला ओळख आहे व कृष्णकथेपुढे अशी निर्मिती फिकी पडते हेही तो दाखवून देतो. शुकाने चौदाविद्यांचा रसपरिपाक आणि सर्व धर्मांचा सारभूत अंश काढून भागवतरूपी ब्रह्मसुखाचे बोने म्हणजे मिष्टान्न तयार केले अशा भागवतातील दशमस्कंध हा जणू चंद्र असून त्यातील रुक्मिणीस्वयंवर कथा म्हणजे चंद्राचे चांदणे होय. नरेंद्र म्हणतो—

तो पुराणातुल आनंदसमुद्रः तेथ दशमस्कंध तोचि चंद्र
ते चांदिणे सांधेन म्हणे नरिंद्रः रुक्मिणि सैंवर
जे कथा साहित्याचे खिरारः नवां रसांचे कन्हेर
अन्नेगा भावांचे भांडार : कीर्ति उदार कैवल्याची

जे सकळ कलांची निधी : नानाविधा कळांची सिधी
सोपान वल्ली प्रसिद्धी: सुख-स्वर्गीची ॥ १

उद्धवगीतेत भास्करभट्टानेही 'पुराणगगनिचा कुमोदबंधुः जो आइकिजे एकादस स्कंधुः तेथ कीजैल प्रबंधुः मुनिजना लागि' असेच भागवत पुराणातील एकादश स्कंधाचे वर्णन केले आहे. नरेंद्राने जी रुक्मिणीस्वयंवराची कथा स्वीकारली त्यामागे त्याच्या विदग्ध आणि प्रौढ प्रतिभेचे दर्शन घडते आणि कलानिर्मितीच्या भूमिकेतून तो कृष्ण रुक्मिणी-कथेकडे बघतो. आनंदसमुद्र आणि चंद्राचे चांदणे यांतील भावाशय लक्षात घेतल्यास चंद्र आणि समुद्र यांचे परस्पर नाते व त्यातून शिंपले जाणारे चांदणे या कल्पनेचे मर्म लक्षात येते. ही कथा म्हणजे सुखस्वर्गीला पोहोचविणारी सोपानवल्ली असून सर्व कलांचा संचय आणि फलप्राप्ती देणारी अलौकिक सिद्धी आहे. भागवत पुराणाची ओळख त्यातील स्वयंवरकथेचे मार्मिक ज्ञान आणि कृष्णकथेची विविध वैशिष्ट्ये यांचे सूक्ष्म मार्मिक ज्ञान नरेंद्राचे ठिकाणी असून काव्यनंदाची ही कथा म्हणजे सोपानमार्ग होय असेही तो म्हणतो यावरून वाङ्मयाची समज आणि कलेच्या संदर्भातील जाण नरेंद्राने रुक्मिणीस्वयंवराच्या प्रास्ताविक ओव्यांमधूनच व्यक्त केली आहे.

ज्ञानेश्वरीची निर्मिती रुक्मिणीस्वयंवरापूर्वी केवळ दोनच वर्षे आधी झालेली होती व पैठण परिसर महानुभावांचा ईश्वरी निवासाचा परिसर होता. त्याही दृष्टीने ज्ञानेश्वरीची ओळख नरेंद्राला असली पाहिजे व ज्ञानेश्वर आणि नरेंद्र दोघेही महाराष्ट्रातील कवी असल्यामुळे ज्ञानेश्वरीची रचनापद्धती नरेंद्राने अवलोकिली असावी. महाभारतगौरव, स्वभाषाभिमान आणि ईश्वरभक्ती या संदर्भात ज्ञानेश्वरीच्या आध्यायप्रस्तावना लक्षात घेतल्यास नरेंद्राने घेतलेले निर्मितीस्वातंत्र्य आणि गणेशवंदन आणि शारदावंदना नंतर भागवतविशेष, कथामाहात्म्य, स्वतःच्या ठिकाणची विनम्रता आणि जाणत्या श्रोत्यांचा गौरव, मराठी भाषेविषयीची आत्मप्रौढी यातील समान्तरत्व विलक्षण साम्याचे वाटू लागते. संस्कृत वाङ्मयाचे अध्ययन, समकालीन मराठीतील प्रयत्नांचे अवलोकन आणि स्वतः कलापूरक दृष्टीने घेतलेल्या अनुभवाची अभिव्यक्ती डौलदार भारदस्त आणि रेखीवपणे शब्द घडवु घडवु करण्याचा हा अलौकिक प्रयत्न ठरला. ज्ञानेश्वरीचा प्रभाव या कविमनावर आहेच. तो संस्कृतापासून दूर होण्याच्या प्रक्रियेत विशेषत्वाचे दृक्गोचर होतो व दुसरीकडे अभिजात पद्धतीने महाकाव्याचे आदर्श स्वीकारीत नरेंद्र रुक्मिणीस्वयंवराची वीण पुरी करतो. महाकाव्याचे आदर्श स्वीकारीत असता ते मूळ कथानकाला अधिक रंगत आणतील या दृष्टीने केवळ तो निर्माण करीत नसून मुक्त कल्पनाविलास आणि अत्युक्ती-मधून संथपणाने जाणाऱ्या कथानकाला साजिवंत करीत जाणे याच एका प्रबळ ऊर्मीने अनेक लहान लहान उपकथानके मूळ कथाभागाला जोडीत असतो. वर्णनात्मकता आणि

---

१. रुक्मिणीस्वयंवर : ४९ ते ५१ डॉ. कोलते प्रत.

भावाशयाची संपन्नता व त्यातील अत्युक्ती ही महाकाव्याच्या जातीची ठरते तर भक्ति-मुक्तीच्या दिशेने कथेची होणारी उकल आणि कवितेचा घाट एकीकडे पृथगात्म पद्धतीने अवतरत असतो. पारंपारिकता आणि पृथगात्मता अशा दोन्ही प्रवृत्तींचे संस्कार कविमनावर असलेले दिसतात. वाहते पाणी जसे जमिनीचे खाचखळगे भरून पुनः वाहू लागते तशी नरेंद्राची रुक्मिणीस्वयंवराची कथा मूलतः पुराणकथेत असलेली अपूर्णता भरून काढीत संथपणे पुढे सरकत असते. तिला अनेक उपकथानके येऊन मिळत असतात. अनेक नव्या व्यक्तिरेखा निर्माण झालेल्या असतात आणि अनेक पद्धतींनी निसर्गावलोकन झालेले असते. निसर्ग आणि मानवी मन यांची उत्कट जाणीव नरेंद्रासारख्या पहिल्या मराठी दीर्घ कथाकवीने अचूक लक्षात घेतलेली आहे. कृष्ण रुक्मिणी विवाहकथेतून नरेंद्राने स्वप्रतिभामूल अशी एक नवनिर्मिती साधली व ती नंतरच्या कथाकाव्याला बरीच आदर्शभूत ठरली. एकनाथ, सामराज, विठ्ठल, नागेश यांची कथा-कविता आणि मुक्तेश्वराची कलात्मक दृष्टी यांची पूर्वपरंपरा नरेंद्रांपासून सुरू होते. उखाहरण, दमयंती स्वयंवर, द्रौपदी स्वयंवर, सीतास्वयंवर, इत्यादी स्वयंवर-कथांनी नरेंद्राने ज्या दृष्टिकोणातून कृष्ण-रुक्मिणी स्वयंवराची कथा स्वीकारली तिचा बाह्यांगदृष्ट्या किंवा अंतरंगदृष्ट्या थोडा बहुत स्वीकार करीत निर्माण झाल्या. या दृष्टीने विदग्ध आणि सुदीर्घ कथाकाव्याची पहिली निर्मिती आणि महानुभाव पंथीयांच्या साती ग्रंथांतील पहिलेपण रुक्मिणीस्वयंवराला मिळाले. एक विमुक्त काव्यक्रीडा आणि सर्जनशील प्रतिभेची अत्युक्तपूर्ण निर्मिती या दृष्टीने रुक्मिणी-स्वयंवराला लक्षात घेतले पाहिजे. 'रुक्मिणीस्वयंवर' म्हणजे नरेंद्राची काव्यक्रीडा आहे. रसालंकार वर्णनांचा साज, भक्तिभरता आणि रचनालाघव यातून एक स्वतंत्र नवनिर्मिती एका सर्जनशील मनाने येथे साधलेली दिसते. आपल्या आत्मबळाची सार्थ जाणीव आणि व्यापक व उत्कट चिंतनशीलता यातून कृष्ण-रुक्मिणी प्रेमकथा नैसर्गिकपणे उलगडत जाते. म्हणून ती निखळ महाकाव्याचे रूप घेत नाही तर महाकाव्यातील रचनाबद्धती आणि वर्णनात्मकता स्वीकारते तर ओवी छंदातून एक अखंड सर्गबद्ध निर्मिती होते. हे 'देशभाषा घडिले लेणे। साहित्यरत्नी सुजडित' असे नवनिर्मितीने साक्षात झालेले रुक्मिणीस्वयंवर आहे. मूळ पौराणिक कथा भागवतातून आणि पद्मपुराणातून घेऊनही तिची 'सुललित रचना' नरेंद्र घडवितो.

भागवतासोनि पद्मपुराणें : जैं सैवर बोलिजे रुक्मिणी
तेथ देवाते कौंनरू बाखाणी : ते सांघैल नरींद्र ॥ [१]

वरील उल्लेखातून भागवत आणि पद्मपुराण या दोन संस्कृत कथात्मक इतिहास ग्रंथांचे सूक्ष्म अवलोकन आणि आधार नरेंद्राने स्वीकारला आहे. किंबहुना भागवत आणि पद्मपुराण या दोन्ही कामधेनू दोहून रुक्मिणीस्वयंवर रचले आणि श्रीभागवतीकथा पद्मपुराणापर्यंत जे ऐकतील त्यांना परमगती प्राप्त होईल असेही समातिलेखात नरेंद्र

---

१. रुक्मिणीस्वयंवर : ७६

म्हणतो.[१] भागवत आणि पद्मपुराणांच्या रचना डौलाने, संथ कथानकाने, गतिशील निसर्ग चित्रणाने आणि प्रवाही मनोभाव दर्शनाने नरेंद्र आकर्षित झाला असून त्या पद्धतीची रचना त्याने केली म्हणून नरेंद्राच्या रुक्मिणीस्वयंवराचा रूपबंध महाकाव्यसदृश झाला. अन्यथा धवळ्यातील प्रसंगचित्रणात आणि कल्पनानिर्मितीत आणि नरेंद्राच्या रुक्मिणीस्वयंवरात अनेक ठिकाणी साम्य आढळून येते ते 'आद्य मराठी कवयित्री' श्री. वा. ना. देशपांडे यांनी प्रस्तावनेत दाखवून दिले आहे. त्यावरून धवळ्यांचा संस्कार मन:पूतपणे स्वीकारून आणि भागवत पद्मपुराणकथांना नवे परिमाण नव्या कथानक-निर्मितीतून देऊन एक नवा पायंडा नरेन्द्राने कथाकाव्यात निर्माण केला. पुराणभावांकित मूळ आख्यान सुसंस्कारित करीत असता महाकाव्याच्या वर्णनातील डौल आणि बोली मराठी भाषेतील भाव यांच्य. अपूर्व संमीलनातून निर्मिती घडत जाते.

भणौनि शब्दरत्न सोहज्वळा : जाऊनि साहित्याचिया बेला उळा
भरूनि आण खोळा : उन्मेखाचिया
ग्रंथसुवर्णमुद्रिके : खेवणू भावमाणिके
सग दर्शना देओ कवतिके : श्री प्रभुराया ॥ २

अशी ही रुक्मिणीस्वयंवर कथारूपी सुवर्णमुद्रा भावमाणिकांच्या कोंदणात बसविलेली आहे म्हणून तिचे आकलन आणि स्वरूप दोन पातळींवरून न्याहाळता येते. महाकाव्याची वैशिष्ट्येही ती काही प्रमाणात स्वीकारताना दिसते आणि निखळ मराठमोळेपणही तो सिद्ध करीत जाते. अभिजात कल्पनावैभव आणि पराकाष्ठेचा वर्ण्य विषयाचा जिव्हाळा म्हणून निर्माण होतो व काव्याची कलात्मक आणि स्वयंपूर्ण व संपूर्ण विशद जाण रूपवान होत जाते.

किन्नराचे स्वतंत्र कथानक मूळ प्रेमकहाणीच्या मुख्य कथानकाशी एकजीव तर झालेले आहेच पण या नवनिर्मितीपुढे अनेक वाङ्मयीन स्वरूपाच्या गोष्टी नरेंद्राने साधलेल्या आहेत. मुख्य कथानक त्यातील उपकथानक आणि उपकथानकातील पुनः कथानक अशी कंदर्पन्यायावस्था कथानक निर्मितीला आली. किन्नर कल्याणकीर्ती ही जोडी भागवत हरिवंश आणि पद्मपुराणातही नाही. एकनाथ, सामराज, विठ्ठल, श्रीधर आणि मोरोपंत यांनी रुक्मिणीस्वयंवर गायिले त्यातही ही जोडी नाही. महदंबेने धवळ्यात 'नागारी' आणला. एकनाथांनी कीर्तिध्वज, विठ्ठलाने कीर्तिनामा नटश्रेष्ठ, मोरोपंतांनी ब्राह्मण, सामराजाने बंदिजन, श्रीधराचा कीर्तिमुख ब्राह्मण भीमकाच्या सभेत आला व त्याने श्रीकृष्णाचे रूपगुण वर्णन केले आणि रुक्मिणीला कृष्णवेध लागले. कृष्ण-रुक्मिणी प्रेमकहाणीचा हा मूळ पाया आहे. नरेंद्र वगळता इतर मराठी कवींनी केवळ एक बंदिजन

---

१. रुक्मिणीस्वयंवर : २८२', २८३१ (डोळके प्रत)
२. रुक्मिणीस्वयंवर : ३८३. [कोलते प्रत]

ब्राह्मण सभेत आला व त्याने कृष्णकौतुक करताच भीमकाची चिंता कमी झाली आणि रुक्मिणी कृष्णाकडे आकर्षित झाली, अशा या भावमय प्रसंगासाठी भाट निर्माण केला. नरेंद्र हा विचक्षण आणि रसिक आहे. पुनः तो स्वतः सभाकवित्वाचा अनुभव घेतलेला कलावंत आहे. त्यामुळे त्याने कल्याणकीर्ती, किन्नर म्हणजे शापभ्रष्ट वेदघोष याची स्वतंत्र निर्मिती करून मूळ भावाशय अधिकच देखणा केला. डॉ. वि. भि. कोलते यांनी 'रुक्मिणीस्वयंवर' प्रस्तावनेत या संदर्भात सूक्ष्म विवेचन केलेले आहे (पृष्ठ २२–२३). त्यावरून महानुभाव कवींनी त्यात महदंबा, संतोषमुनीकृष्णदास, गोपाळदास, कृष्णमुनि विराटदेशे, नृसिंह यांनी किन्नर कल्याणकीर्ती आख्यानाचा उपयोग करून घेतलेला आहे. किन्नर व कल्याणकीर्ती ही नावे पद्मपुराणातून घेतल्याचा नरेंद्राप्रमाणे इतर महानुभाव कवीही उल्लेख करतात. आणि नरेंद्र समकालीन कोणत्याच महानुभाव कवीने पद्मपुराण रचल्याचा उल्लेख स्मृतिस्थळ, वृद्धाचारात येत नाही. हा तपशील निश्चित झाला आहे. नरेंद्र हा पंडित, सकलकलानिधी असा आहे. त्यामुळे त्याच्या चिंतनात संस्कृत महाकाव्ये आलेली आहेत व त्यांच्या संस्कारातून किन्नराख्यान रचले गेले का ? याही विषयी विद्वानांत चर्चा झाली. डॉ. वाटवे यांना बाणाच्या कादंबरीतील वैशंपायन पोपट आणि श्रीहर्षाच्या नैषधीय चरित्रातील राजहंस यांच्यात किन्नराचे साम्य आढळले. श्री. ना. ब. जोशी यांना 'श्रीकृष्णचरित्र' या चक्रधर निरूपित पण वाइंदेशकर पाठात आलेल्या चरित्रातून किन्नराचे आख्यान नरेंद्राला स्वीकरणीय वाटले असावे व किन्नराचे पूर्वचरित्र, विड्यातून जाळ निघून त्याने कृष्णाला ओवाळणे आणि रुक्मिणीची विरहावस्था या संदर्भात रुक्मिणी-स्वयंवर व श्रीकृष्णचरित्रात खूप साम्य जाणवले. वस्तुस्थिती तशी नाही. नरेंद्र रामदेवराव यादवाचे दरबारी सभाकवी होता आणि तिन्ही बंधू कवी होते. आपल्या 'कविकुळाला बोलू लागैल' असे त्याचे ऐतिहासिक उद्गार सुप्रसिद्ध आहेत. त्यावरून नरेंद्राने वरील आख्यान स्वतंत्रपणे निर्माण केलेले असावे. आणि स्थूलमानाने असे म्हणावे लागते की महानुभाव सांप्रदायिक पिढीपाठच विशेष स्वीकार्य मानतात त्यामुळे वाइंदेशकरपाठातील आख्यायिका कितपत लक्षणीय समजावी याविषयीही शंका आहे आणि डॉ. कोलते यांनी उधृत केलेले 'श्रीकृष्णचरित्रा'तील उतारेही उपोद्बलक पुरावा म्हणून सिद्ध होत नाहीत[१] कारण रुक्मिणीचे पाच भाऊ त्यांची नावे आणि रुक्मिणीदेवीने मदनमुद्रेला द्वारकेला जाऊन श्रीकृष्णचक्रवर्तीचे चातुर्य लावण्य सौंदर्य पाहावे म्हणून वस्त्रालंकार देऊन पाठविले आहे. तिच्यापूर्वीच नारद मदनमुद्रेला पाठवून कृष्णरूपवर्णन व नारदमुखे रुक्मिणीवर्णन यामधून रुक्मिणी आणि कृष्ण यांना परस्पर प्रणयवेध लागले असे 'श्रीकृष्णचरित्र' सुचविते. आणि अशा वेळी कल्याणकीर्ती बंदिजन द्वारकेला येऊन पोचला. नरेंद्राने या प्रसंगातील भावरम्य क्षण लक्षात घेऊन त्याला वेगळाच डौल दिला आहे व स्वतंत्रपणे तो प्रसंग उभा केला आहे. द्वारकेला जाऊन पोचले व त्यांनी रुक्मिणीसौंदर्य वर्णन केले व चक्रवर्ती तोखले.

---

१. रुक्मिणीस्वयंवर : डॉ. वि. वि. कोलते पृष्ठ ५५–५६.

"ऐसा समयी किन्नरा वेदघोषासाहितु कल्याणकीर्ती बंदिजन द्वारकेसि आला." नरेंद्राने निर्माण केलेले कथानक सर्वस्वी वेगळे, कलापूर्ण आणि काव्यात्म पद्धतीने साक्षात केले आहे. त्याने किन्नर कल्याण कीर्ती ही नावे घेतली पण कथाभाग सर्वस्वी नवीन घडविला आहे. श्रीकृष्णचरित्र व रुक्मिणीस्वयंवरातील किन्नराख्यान तंतोतत जुळते ह्या श्री. ना. ब. जोशी यांच्या विधानाचा नामसादृश्य वगळता निरास होतो व या उपकथानकाची सर्वस्वी एक अभूतपूर्व निर्मिती नरेंद्राने करून विदग्ध कथाकाव्याला एक नवे वैशिष्ट्य दिले आणि अभिनव वळण लावले. यात नरेंद्राची कलादृष्टी स्पष्ट होते.

विदर्भराजा भीमकाचे वैभव, परिवाराची ओळख करून दिल्यावर, रुक्मिणीचे सौंदर्य-वर्णन तिच्या सख्यांचे सौंदर्यवर्णन, रुक्मिणीचा राजसभेत झालेला प्रवेश व तिला बघताच भीमकराजाला तिच्या विवाहाच्या वाटत असलेल्या चिंतेचे प्रगटीकरण व त्याच वेळी कल्याण-कीर्ती भाटाचे राजसभेत आगमन झाल्याचे दाखवून नरेंद्राने फार औचित्य साधले आहे. "हा काशीश्वराचा भाटु भेटों येतायेः कल्याण कीर्ति" १२९. रुक्मिणीचे रूपसौंदर्य बघून भाटही आश्चर्यचकित होतो आणि किन्नरवर्णन करून रुक्मिणीसाठी योग्य वर कोणता या संदर्भात पूर्व, पश्चिम, दक्षिण आणि उत्तर अशा चारही दिशाचे राजे कसे अयोग्य आहेत याचे रसभरित विवेचन करतो. किन्नर म्हणजे शापभ्रष्ट वेदघोष ऋषी आहे असे मूळ उपकथानकात आणखी एक उपकथानक मिळून जाते. गंगा नदीला जसे अनंत पाझर येऊन मिळावेत व त्यामुळे तिची मूळ अंगकांती कणभरही कमी न होता वाढती व्हावी तसे नरेंद्राच्या रुक्मिणी कृष्ण विवाह कथेत अनेक उपकथानके येऊन मिळतात. त्यामुळे अनौचित्य न घडता ती कथा अधिकच संथपणाने आणि अनेक वळसे वळणांनी प्रवाही होते. या वर्णनांत आणि उपकथानकाच्या स्वतंत्र निर्मितीत नरेंद्राचे कलागुणच दिसतात. त्याची प्रतिभा प्रौढ विचक्षण आहे. आणि तपशीलाच्या अचूक निर्मितीतून वास्तवाभास जाणि दृक्गोचरता निर्माण करण्यात तो यशस्वी ठरला आहे. जणू सारा प्रसंग आपल्या डोळ्यांसमोर घडतो आहे हे शब्दांचे माध्यमातून साधताना नरेंद्राच्या रसिक कलादृष्टीचा आणि संवेदनाक्षम तरल भावमय कविमनाचा पडताळा वाचकांना येईल. स्थिरचरांना सजग करून त्यांच्या कृति उक्तींतून संपूर्ण अनुभव पेलला जाईल अशी शब्दकळा दृष्टिगोचर आणि श्रवणगोचर होऊन अवतरते. प्रतिमांच्या व्यापकतेतही असलेला मुलायम नादमय आणि लयबद्ध कोवळेपणा अपूर्व आहे. कल्पनेची उत्युक्तिपूर्ण भरारी आणि तपशीलाची सूक्ष्मातिसूक्ष्म निर्मिती यांच्या योगे प्रत्येक प्रसंग बोलका, तेजोमय आणि नाट्यपूर्ण होऊ शकला. उदा. भाटाने किन्नराचे केलेले वर्णन, किन्नराविषयी राजसभेतील लोकांचे तर्कवितर्क, किन्नराचे स्वरूप आणि संगीताच्या उपक्रमातून त्रैलोक्यातील विविध रागदाऱ्यांची आणि बंदिशीची त्याला असलेली माहिती व गायनप्रकारातील विविधता यांच्या साह्याने नरेंद्र हा प्रसंग अधिकच खुलवितो. राजसभेचे वैभव, रुक्मिणीच्या सभाप्रवेशामुळे राजसभेला आलेली विलोभनीय शोभा आणि अशा या उत्साहवर्धक वातावरणात किन्नर आणि त्याचे साह्यकारी श्रुतिधर यांनी संमिश्रपणे गायिलेली रागदारी यामुळे केवळ राजसभा आंदोलित झाली असे

नव्हे, तर तरुण रुक्मिणीच्या मनःकोषात अनेक भावतरंग निर्माण होऊन ती भावान्दोलित झाली आणि अशा अचूक क्षणी विविध वरांची योग्यता पारखण्यास किन्नराने सुरुवात केली. देवांची अपात्रता, पाताळातील वरांची अपात्रता, सप्तद्वीपातील वरांची अपात्रता, जंबुद्वीप, पूर्व आणि ईशान्य दिशांचे राजे, दक्षिणेकडील राजे, पश्चिमेकडील राजे हे सर्व कसे अपात्र आहेत याचे विस्तृत वर्णन करून बलराम आणि कृष्णरूप वर्णनाकडे किन्नर वळला आहे. मूळ कथागाभ्याची परिणामकारकता आणि एकसंघता टिकवून धरण्यात या ठिकाणी नरेंद्र यशस्वी ठरला. रुक्मिणीच्या तरुण मनावर अपेक्षित असा परिणाम घडून आला व ती विरहव्याकुळ झाली हा कथानकातील कार्यभाग पूर्ण होताच किन्नराला आणि कल्याणकीर्तीला निरोप दिला गेला यातील औचित्य अपूर्व आहे.

रुक्मिणीचे राजसभेत येणे व किन्नराकडून सर्व दिशांच्या राज्यांची वर्णने करून घेणे या प्रसंगावर अर्थातच संस्कृत महाकाव्यातील प्रसंगवर्णनाची छाप पडलेली स्पष्ट दिसतेच आणि तिचे मूलभूत स्वरूप कसे आहे याचेही विस्तृत परीक्षण डॉ. कोलते यांनी रुक्मिणीस्वयंवराच्या प्रस्तावनेत केले आहे. (पृष्ठ २८–२९) परंतु मूळ मुद्दा असा की राजांची आणि देशांची नावे जरी नरेन्द्राने महाभारत भागवतावरून घेतली असली तरी त्यामुळे त्याला कोणताही उणेपणा येत नाही; कारण त्याने निरूपणासाठी घेतलेली कथाच मूळ महाकाव्यातून स्वीकारली आहे. आणि नरेन्द्र हा भारतीय संस्कृतीत वाढलेला कवी असल्यामुळे त्याचे आदर्श आणि काव्यदृष्टी ही परंपरेचे भान राखणारी ठरणारच! त्यामुळे आर्षकाव्यातून आख्यान स्वीकारूनही तो अधिक जवळचा वाटतो, तो संस्कृत विदग्ध महाकाव्याशी! रघुवंश, किरातार्जुनीय, नैषधीय चरित, शिशुपालवध या महाकाव्यात ज्या राजसभा आणि विवाहप्रसंग त्या त्या महाकवींनी उभे केले त्यांच्या परिशीलातून कळत न कळत त्यांचे संस्कार नरेन्द्रावर होणे अपरिहार्य होते. इतकेच नव्हे तर त्याच्या बंधूंनीच या प्रकारची निर्मितीही केलेली होती. तिचा प्रभाव आणि संस्कार या राजवर्णनात आणि सभावर्णनात प्रतिबिंबित झाला आहे म्हणून ते अनुकरण नाही तर मनःपूत स्वतंत्र पद्धतीने परिणाम साधण्यासाठी योजिलेला तपशील ठरतो. नरेंद्र या वर्णनावरच स्थिरावलेल नाही तर केवळ एक साधन म्हणून या प्रसंगाचा उपर्युक्त भावसंक्रमणासाठी उपयोग करून घेतो इतकेच.

कल्याणकीर्तीचे राजसभेत आगमन व त्या आगमनावरोबरच भीमक राजपरिवार, भीमक राजसभा आणि राजसभेत सख्यांसह बसलेली रुक्मिणी यांचे सूक्ष्म वर्णन करून ते प्रसंग नरेंद्राने दृष्टिगोचर पद्धतीने उभे केले आहेत. यावरून केवळ कल्याणकीर्ती आख्यानाची नवी योजनाच नरेंद्राने केलेली नाही, तर त्या आख्यातून भीमक दरबाराचे आणि रुक्मिणीच्या सौंदर्याचे रसिकतेने वर्णन केले. वातावरणनिर्मितीतील अपूर्व कलाकुसर प्रस्तुत प्रसंग चित्रणातून आणि व्यक्ति मनोभाव चित्रणातून स्पष्ट होत जाते व त्यातील प्रत्येक प्रसंगाला आणि प्रसंगावरोबर व्यक्तिचालाही एक अस्तित्व येत जाते. एक नाट्य जणू रंगभूमीवर घडत असते अशी संवादात्मक निर्मिती नरेंद्राच्या प्रतिभाशक्तीची

ओळख वाचकाला पटवीत असते. कृष्णाचा वेध लागल्यामुळे निर्माण झालेला अलौकिक विरह आणि त्या विरहात तडफडणारी रुक्मिणी हाही प्रसंग अतिशय वेगळ्या पद्धतीने नरेंद्राने उभा केला आहे. या प्रसंगातील विरहाची चढती श्रेणी आणि धारादामोधराची सख्यांनी केलेली निवड यात एक कलात्मक अपरिहार्यता नरेंद्राने निर्माण केली आहे. वास्तवाची निर्मिती अनंत तपशीलांच्या साह्याने करीत असता त्या वास्तवाभासाची अचूकता कुठेही ढिली होऊ न देता संपूर्ण प्रसंगाचा गोफ विणला जातो. 'संगीतकला, आणि 'वास्तुकला' यांतील केवळ परिभाषायोजनेमुळे मूळ प्रसंगनिर्मितीत प्राण फुंकला जात नसतो. त्यावरून फार तर कवीच्या इतर ललित कलांच्या परिचयाची जाणीव होईल परंतु धारादामोधराच्या वर्णनातून एक विरोधाभासात्मक भावनांचा न्यास नरेंद्राने साधला! रुक्मिणीच्या ठिकाणची कमालीची विरहार्तता व धारादामोधराचे कमालीचे सौंदर्य यामुळे तिच्या विरहाला आणखीनच एक वेगळा अर्थ मिळतो. एक नवा अन्वय मिळतो. राजसभेची श्रीमंती जशी जाणवत असते तशीच धारादामोधराची भव्यता, प्रचंडपणा आणि सौंदर्य वाचकाला जाणवत असते.

या संपूर्ण काव्यात रुक्मिणीच्या व्यक्तिमत्वाला विशेष प्राधान्य मिळणे स्वाभाविकच आहे. विविध राजेलोकांसाठी रुक्मिणीचे किन्नराने केलेले रूपवर्णन आणि देहवर्णना रुक्मिणीच्या सख्या आणि दासी यांचे येणारे वर्णन, रुक्मिणीला झालेला शीण, विरहावस्थेची मुर्च्छेपर्यंत चढत गेलेली श्रेणी आणि त्यात मधुमालती आणि भावकळणा यांनी सुचविलेला 'पत्रिके'चा उपचार व सुदेवाची केलेली रवानगी या सर्व प्रसंगांतून एकीकडे कृष्णभक्तीमुळे वेडावलेली रुक्मिणी आणि प्रियकर भेटीसाठी आसुसलेली तरुण रुक्मिणी अशा दोन्ही अवस्था फार विस्ताराने नरेंद्राने अभिव्यक्त केल्या व मनाने तो रुक्मिणीशी तदात्म झाला. विविध प्रसंग उभे करून त्यांच्या साह्याने मूळ कृष्ण रुक्मिणी यांच्या सायुज्य भक्तीची अवस्था नरेंद्र वर्णन करतो व त्यात अस्ताचलावरील सूर्य, सायंकालीन कार्ये, दिव्यांची वर्णने, नक्षत्रशोभा, चंद्रोदय, द्राक्षमंडपातील चंद्रशोभा, या सृष्टीमधील आल्हादायक बदलातील कातर विरहवेडी अवस्था व रुक्मिणीच्या विरहव्यथेला त्यामुळे आलेला चढावा यांचे फार मार्मिक आणि यथातथ्य चित्रण नरेंद्राने भावनांतून संवेदनात्मक प्रतिमांमधून उभे केले.

सर्व ऋतूंसह उभी केलेली सृष्टी आणि सर्व परिवारांसह साक्षात होणारी कृष्ण-रुक्मिणी विवाहकथा आपल्या अंगी महाकाव्याचे कांतिमान रूप घेऊन अवतरते. अतिशयोक्त कल्पनाविलास आणि अत्युक्तिपूर्ण प्रतिमासृष्टी निर्माण करूनही मूळ कथेवरील केंद्रीभूत झालेले लक्ष क्षणभरही दुसरीकडे जाऊ न देता नरेंद्राने एक कथात्मक अशी सुघडित रचनापद्धती या कवितेत स्वीकारली व तिचा आदर्श नंतरच्या सर्व मराठी स्वयंवरकथेने स्वीकारला; म्हणून, पहिला कलाकवी म्हणून नरेंद्राची रुक्मिणीस्वयंवर कथा रसिकांचे लक्ष वेधून घेते.

रुक्मिणीस्वयंवर : महदंबा-नरेंद्र

यादवकालीन मराठी कवितेमागील प्रवृत्ती आणि प्रेरणा लक्षात घेताना श्रीकृष्ण या देवतेविषयी सर्वच मराठी कवींना वाटत असलेले ममत्व कुतूहल निर्माण करणारे ठरते. भागवतसंप्रदाय आणि महानुभाव संप्रदाय या दोन्ही संप्रदायांनी मराठी वाङ्मयाचे जे दालन यादवकाळात पृथगात्मपणे सजविले त्यात कृष्णभक्तीच्या साह्याने धर्मनिरूपण, पंथनिश्चिती व अध्यात्माची दिशा न्याहाळण्याचा प्रयत्न केला. यादवकालीन सर्वच मराठी कवींच्या अनुभवविश्वावर अधिराज्य गाजविणारी एकमेव देवस्वरूपी कृष्णलीला हीच होती. श्रीकृष्णाच्या जीवनातील विविध नाट्यात्म प्रसंग आणि त्यातून उतरलेले त्याचे भावजीवन यामुळे सर्वच मराठी कवींना रामायणातील रामचंद्रापेक्षा व महाभारतातील भगवद्गीतेतील श्रीकृष्णापेक्षाही भागवतपुराणातील श्रीकृष्ण अधिक जिव्हाळ्याचा वाटत असावा. ज्ञानेश्वरांनी केवळ भगवद्गीतेतील कृष्णार्जुन संवादातून एक प्रगल्भ आणि परिपक्व वैचारिक भूमिका असलेला श्रीकृष्ण साकार केला. ज्ञानेश्वर समकालीन असलेल्या नामदेव, गोराकुंभार, सावता, चोखा इत्यादी कवींनीही कृष्णकथा गाईली पण प्रौढ कृष्णापेक्षा त्यांना महत्त्व वाटत आले ते त्याच्या शैशवाचे, निर्व्याज बाल्याचे ज्ञानेश्वरीतून गोचर होणाऱ्या कृष्णरूपापेक्षा नामदेवादी कवींच्या अभंगातून आणि ज्ञानेश्वरांच्या अभंगातून गोचर होणारे कृष्णरूप अगदी भिन्न स्वरूपी ठरले.

प्राचीन स्वयंवरकथा किंवा विवाहकथा बघितल्या तर कृष्णरुक्मिणीस्वयंवरकथेचे फार मोठे आकर्षण यादवकालीन कवींना होते व त्यांच्याच परंपरेचा आधार घेऊन जन्माला आलेल्या पुढच्या कवितेतही होते. कृष्णाने रुक्मिणीशी केलेला विवाह हा राक्षसविवाहपद्धतीतून आलेला आहे. त्यातील नाट्य व त्या नाट्याची अभिव्यक्ती कृष्णभक्तीच्या साह्याने विशद करणे या दृष्टीने आख्यान कवितेची निर्मिती यादवकाळात झाली. यादवपूर्वकालीन संस्कृतकवितेत डोकावले तर विषयांची विविधता व महाकाव्याचा बंध (Pattern) संस्कृत कवितेने स्वीकारलेला दिसतो. यादवकाळातील मराठी कवित संस्कृत कवितेच्या वळणापासून दूर जाण्याचा प्रयत्न जन्मापासूनच पृथकपणे करीत आलेली दिसते. मराठी या देशी भाषेतील नवप्रवृत्ती व तिचा आविष्कार हा शृंगाररसरूप घेऊन न येता भक्तिरसरूप घेऊन अवतरला, त्यामुळे अभिजात महाकाव्यांमधून मांडलेला आदर्शवाद आणि ध्येयवाद यांचे स्वरूप मराठी कवितेने न न्याहाळता स्वतःचा स्वतंत्र मार्ग अनुसरला; अर्थात असे होत असताही यादवकालीन कविता एकदम काही फार परंपरेपेक्षा वेगळी झाली नाही. विदग्ध महाकाव्यांची संस्कृत परंपरा व काव्यविषयक दृष्टिकोण नरेंद्राने आपल्या कवितेत सांभाळला व महाकाव्य पद्धतीची आपली अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न केला.

कृष्णकथेची पंथीयता

मराठी भाषेतील पहिली कृष्णरुक्मिणी स्वयंवर कथा महदंबेने गायली व तिच्या-

नंतरचा महानुभाव कवी जो नरेंद्र यानेही कृष्णरुक्मिणीविवाहकथा हाच आपल्या कवितेसाठी विषय निवडला. महानुभाव पंथातील 'कृष्णमाहात्म्य' या ठिकाणी प्रभावी झाले असले तरी त्याहीपेक्षा भक्तिमुक्तीचे साधन म्हणून कृष्णकथा ही धर्माच्या अपेक्षेने स्वीकारली गेली आहे. यादवकाळात माणसाची लौकिक उन्नती आणि आध्यात्मिक उन्नती ही धर्माधिष्ठितच असलेली स्पष्ट दिसते. वास्तविक सर्व जीवनव्यवहारालाच धर्मभावनेचे अधिष्ठान आहे. यादवकालीन कवींनी जी वाङ्मयनिर्मिती केली ती केवळ स्वान्तःसुखाय नसून तिच्या मागील प्रेरणा ही प्रामुख्याने ईश्वरभक्तिमूल अशी होती. विशिष्ट धर्मपंथांच्या आधारे परमार्थविचार जनसामान्यांना सोपा करून सांगणे ही संतकवींची भूमिका होती, त्यामुळे सर्वच वाङ्मय व्यवहारात व्यक्तिविशेषत्वाला आणि आत्माविष्काराला थारा नसून समूहमनांचा उद्धार 'स्व' सह करणे हीच भूमिका प्रभावी ठरली. ईश्वरी प्रेरणेतून जन्माला आलेल्या मराठी वाङ्मयात भक्तिरसाचा इतका उत्कर्ष का झाला याची कारणमीमांसा आपल्याला करता येईल. यादवकालीन कविता उत्स्फूर्त असली तरी तिच्यामागे कोणते ना कोणते प्रयोजन निश्चित प्रभावी असलेले दिसते. महदंबेने गुंडमराऊळांच्या सान्निध्यात असता त्यांच्या आग्रहावरून धवळे रचले असे इतिहास सांगत असला तरी गुंडमराऊळ म्हणजे पंचकृष्णांपैकी एक आहेत ही गोष्ट ती विसरलेली नाही. त्यामुळे उभयदृष्यावतारी मानवीरूप धारण केलेल्या परमेश्वराने 'धवळे' गाण्यास आज्ञा करताच उत्स्फूर्तपणे महदंबा कृष्णरुक्मिणी विवाहकथा गाऊ लागली व पहिल्या मराठी आख्यानकवितेची निर्मिती तिने केली. या उलट नरेंद्राच्या 'रुक्मिणीस्वयंवर' या विदग्ध महाकाव्यसदृश आख्यान काव्य निर्मितीमागील हकिकत थोडी वेगळी आहे. राजसभेत घेतलेली पैज व तिच्या पूर्तीसाठी नरेंद्राने केलेली काव्यनिर्मिती लक्षात घेता या दोन्ही महानुभावपंथाच्या कवींनी कृष्णरुक्मिणी विवाहकथा स्वीकारली असली तरी त्यामागे त्यांचे असलेले भिन्न अभिरुचीपूर्ण व्यक्तिमत्त्व व त्यामुळे त्यांच्या कवितेने घेतलेले भिन्न रूप लक्षात येते.

कृष्णरुक्मिणी स्वयंवरकथा महदंबा व नरेंद्राने जी स्वीकारली ती केवळ एक कथाकाव्य निर्मिती करण्यासाठी म्हणून नव्हे तर पंथीय दृष्टिकोणात कृष्ण हा पंचावतारांपैकी एक अवतार असल्यामुळे व चक्रधर स्वतःला कृष्णावतार म्हणवून घेत असल्यामुळे महदंबेला किंवा नरेंद्राला दिसलेले कृष्णरूप हे मानवी भावभावनान्वित असे दिसलेले नसून एक ईश्वरी अवतार म्हणूनच ते रूप न्याहाळले जाते. या प्रक्रियेमुळे काव्यात्मकतेच्या दृष्टीने एक गोष्ट घडते ती म्हणजे ज्या स्वयंवरकथेत ओतप्रोत नाट्य भरले आहे त्यातील चढउतार आणि आंदोलने यांकडे नाही म्हटले तरी दुर्लक्ष झाले आहे. व ईश्वर आणि भक्त यांची जी भावस्पंदने प्रगट होऊ शकतील तीच कृष्णरुक्मिणी यांच्या संदर्भात निर्माण होतात. अर्थात एक सलग निर्मिती या दृष्टीने महदंबा आणि नरेंद्र यांची रचना लक्षात घ्यावी लागते. धवळ्यांचा उत्तरार्ध लक्ष्मीभट्ट व म्हाइंभट्टाने तयार केला असे म्हटले जात असले तरी धवळ्याच्या पूर्वार्धातून आणि उत्तरार्धातून कथेचा एकसंघ परिणामाला धक्का पोचत नाही त्यामुळे एक सलग वाङ्मयनिर्मिती या दृष्टीने मराठी

कवितेच्या बाळपणी घडलेली ही महत्त्वपूर्ण किमया ठरते. Devotional Poetry असेच रूप संपूर्ण यादवकालीन कवितेला आलेले आहे. तरीही त्यात काही कवी आपल्याला असे दिसतात की, त्यांनी प्राचीन वाङ्मयपरंपरेचा आधार स्वीकारूनच काव्यनिर्मिती केलेली आहे. त्यामुळे यादवकालीन कवितेत सरळ दोन परंपरा स्पष्ट होतात. एक परंपरा म्हणजे आर्षमहाकाव्यांना अनुसरणारी काव्य परंपरा व दुसरी परंपरा म्हणजे पुराणकथांना अनुसरणारी काव्यपरंपरा. त्यातही विष्णुपुराण आणि भागवतपुराणांचा फार मोठा ठसा यादवकालीन मराठी कथात्मकवितेवर पडलेला आहे. यादवकाळातील कवितेत एकीकडे संस्कृत विदग्ध महाकाव्यांचे अनुसरण करून एक अभिजात दृष्टिकोण कवींनी निर्माण केला तर काही कवींनी आपल्या कवितेतून Romantic tradition अनुसरली. रुक्मिणीस्वयंवरकर्ता नरेंद्र हा Classical tradition मधला कवी आहे, तर महदंबा ही Lyricial Poetry लिहिणारी जी स्फुट, भावकाव्यसदृश रचना करणाऱ्या कवींची परंपरा आहे तीत दिसते.

महदंबा आणि नरेंद्र या दोन्ही यादवकालीन कवींची काव्यनिर्मितीमागील प्रेरणा ही महानुभावपंथाचीच आहे. पंथीयदृष्टी व कृष्णरुक्मिणीविवाहातील नाट्यात्मकता यांची मोहिनी कविमनावर पडलेली दिसते. महदंबा ही गोविंदप्रभूंच्या आज्ञेने धवळे गाण्यासाठी सिद्ध झाल्यामुळे धवळ्यांना अंगभूत असे गेयतेचे गुणरूप आलेले आहे. कमालीची उत्स्फूर्तता आणि अभिव्यक्तीचा गतिमानपणा यामुळे तिचे धवळे एक मुक्तकपद्धतीची ओवीसदृश स्फुटस्वरूपी रचना ठरते. प्रयत्नपूर्वक निर्मिती झाली नसल्यामुळे व उत्कटता आणि जिव्हाळा गोविंदराण्याच्या गायनात ओतल्यामुळे भावस्पंदनांची तरल इंद्रधनुष्ये तिच्या काव्यात ठायी ठायी निर्माण झाली व त्यामागे असलेले एक स्त्रीमन उत्कटतेने अभिव्यक्त झाले. भक्तिभाव आणि पुराणभाव यांचे एक अतूट नाते धवळ्यांमध्ये निर्माण झाले व तीतून कृष्णरुक्मिणी स्वयंवरकथा गुंफली गेली. महदंबेने आपले लक्ष केंद्रित केले ते कृष्णावर ! त्यामुळे स्वाभाविकच इतर व्यक्तिरेखांपेक्षा कृष्णाची व्यक्तिरेखा वेगळ्या रंगरूपात अभिव्यक्त होणे अपेक्षित होते; पण तसे झालेले दिसत नाही.

नागदेव, चक्रधर, गुंडमराऊळ या महानुभाव आचार्यांचा सहवास महदंबेला घडला असला तरी तिने आपली भाववृत्ती कोमेजू दिली नाही. आणि त्यामुळेच धवळ्यांना अभिव्यक्तीची एकसंधता साधता आली. कथाविस्तार न करता महदंबेने अतिशय मूलभूत तपशीलांच्या साह्याने कृष्णरुक्मिणीविवाहकथा फुलवली आहे. त्यामुळे कथेची परिणामकारकता तर वाढलीच; पण त्याबरोबर तिची गतिमानताही लक्षणीय ठरली. एकप्रकारचा प्रवाहीपणा आणि खळखळता धावतेपणा तिच्या मुक्तओवीसदृश रचनेत आपोआप आला आहे. महदंबेच्या शब्दकळेत काय दिसते तर तिचे शब्द भावनांचे वाहक न बनता भावनावृत्तीचेच रूप घेऊन येतात. 'तुझा पति गवळी वो माय' असे रुक्मिणीला चिडवणारा नारद किंवा रुक्मिणीच्या सख्या, या साऱ्या व्यक्तिरेखा अंगासरशी तर झाल्या आहेतच, पण त्या व्यक्तिरेखांनी परस्परांचे जपलेले भावनांचे पदर अतिशय मोजक्या पद्धतीने व

नेमकेपणाने महदंबा व्यक्त करते. रुक्मिणी आणि तिच्या सख्या, कृष्णबलरामसंवाद, रुक्मिणीसुदेव संवाद, भीमकरुक्मी संवाद, या संवादातून महदंबेने विविध मनोभूमिकांचे नाट्य व या भूमिकांनाच व्यक्त करायला लावण्यात यश मिळविले आहे. व्यक्तिरेखांच्या जीवनातील प्रसंगाची अचूकता आणि अपरिहार्यताही धवळ्यांना गुणरूप देते. रूक्मिणीला कृष्णाविषयी वाटणारे प्रेम व त्या प्रेमाच्या विविध भावावस्था आपल्या सूक्ष्मतरल शब्दकळेने महदंबा व्यक्त करते. त्यामुळे या आद्य कवितेला ताजेपणा, उत्फुल्लता आणि रसरशितपणा येऊन जातो. भावकवितेतील गेयता आणि अन्तःप्रवृत्तीतील नवीनता यामुळे दीर्घकाव्यनिर्मितीच्या कालखंडात इतके बांधेसूद काव्य धवळ्यांच्या रूपाने लिहिले गेले. महदंबा मूळ अनुभवाशी अतिशय प्रामाणिक असल्यामुळे सारे कसे साधेसरळ आरशात प्रतिबिंब पडावे तसे झाले आहे. विविध व्यक्ती व त्या व्यक्तींच्या विविध भावभावना यांचे मोजके चित्रण महदंबा करते, व हे सारे करीत असताही व्यक्तिरेखांमधील वैचित्र्य आणि ठसठशीतपणा लपत नाही. एक अभिनव अशी धाटणी धवळ्यांमधून गोचर होते व सारा कथापट विणला जातो तो अत्यंत लालित्याने, सहजसौंदर्याने अन्वित होऊन ! आख्यान काव्याचे रूपविशेष आणि प्रकृतिवैशिष्ट्ये महदंबेच्या धवळ्यांनी निश्चित केलेली जाणवतात. संपूर्णपणे व एकचएक परिणाम करणारे कथाकाव्य म्हणून धवळ्यांचे स्थान मराठी कवितेत निश्चित आहे. वारकरी संप्रदायात जे स्थान मुक्ताईचे तेच महानुभाव संप्रदायात महदंबेचे आहे व मराठी कवितेची पृथगात्म वाटचाल एका स्त्रीने सुरू करावी यातही एक निश्चितच विधिसूत्र असलेले दिसते.

महदंबा व नरेंद्र यांची काव्यदृष्टी

कृष्णरुक्मिणीच्या राक्षसपद्धतीच्या स्वयंवराची कथा नरेंद्राने स्वीकारली ती महदंबेप्रमाणे अजाणता किंवा सहजपणे नव्हे, तर त्यामागे निश्चितच एक जाणीवपूर्वक प्रयत्नाची रूपरेखा आहे. अभिजात विदग्ध संस्कृत महाकाव्यांना डोळ्यासमोर ठेऊन महाकाव्यसदृश रचना करण्याची भूमिका नरेंद्राने स्वीकारली. कारण तो एक सभाकवी होता. सभेत वैदग्ध्याला, पांडित्याला महत्त्व असणे स्वाभाविकच होते नरेंद्राच्या रुक्मिणीस्वयंवराला अर्धनाट्यात्मक महाकाव्याचे (Half epic) स्वरूप आले आहे. त्यात भागवत पुराणातील कृष्णकथा महाकाव्याच्या आदर्शांच्या साह्याने साहित्यशास्त्रीय परिभाषा स्वीकारते. नरेंद्राची भूमिका ही आदर्श महाकाव्य निर्मितीची आणि आदर्श महाकवी होण्याची होती, म्हणूनच त्याने मूळ कथाबीजाला फुलवू शकतील अशी स्वतंत्र आख्यानांची जोड स्वयंवरकथेला दिली व तिची परिणामकारकता वाढविली. वेदघोष ब्राह्मण व किन्नर यांचीही एक स्फुट लोककथा मूळ कथेचे परिणाम वाढविण्यासाठी नरेन्द्राने योजली आहे व धारादामोदराचे वर्णन करून रुक्मिणीची विरहव्यथा किती पराकोटीची होती हे दाखविण्यासाठी नरेंद्राने धारादामोदराचा चांगला उपयोग करून घेतलेला आहे. मूळ कथासूत्र आणि त्याची कलात्मक बांधणी या संदर्भात नरेन्द्राला चांगलेच यश मिळालेले आहे. कारण विविध

तपशील जे या काव्यात येतात, त्यातून त्यांची अपरिहार्यता आणि अचूकता लक्षात येते. वर्णनपरतेमागे असलेली नरेन्द्राची विदग्ध काव्यदृष्टी त्यामुळे लक्षात आल्यावाचून राहात नाही.

कृष्णकथेचे माहात्म्य वर्णन करीत असताना नरेन्द्राने स्वभाषाभिमान आणि साहित्य-शास्त्रीय सिद्धांताची ओळख स्पष्ट करून एका सुसंस्कृत अभिरुचीचे दर्शन घडविले आहे. नवरसरूपी कालवा, साहित्यरूपी कुंज, आणि कविताकामिनीचा हात धरून डुलत डुलत जाणारा भाव यामधून वाङ्मयाच्या संदर्भातील रसभावान्वित साहित्याची साहित्य-शास्त्रीयदृष्ट्या असलेली संकल्पना तो व्यक्त करतो. साहित्यशास्त्रीयदृष्ट्या रसप्रतीतीला असलेले जे महत्त्व आहे त्याची विशद जाण येथे स्पष्ट होते. वस्तुवर्णन, व्यक्तिवर्णन आणि प्रसंगवर्णन यामधून मूळ कथानक आकारत असते; पण त्याचबरोबर त्याची विदग्ध रसिकवृत्ती आणि विशाल काव्यदृष्टा यांचे दर्शन वाचकाला घडत असते. ज्ञानेश्वरांप्रमाणेच आपल्या प्रतिभासामर्थ्याचा सार्थ असा अभिमान नरेन्द्राजवळ आहे म्हणूनच त्याच्या काव्यात केवळ अध्यात्म हा काव्यविषय म्हणून न येता किंवा केवळ रुक्मिणीचे भक्तिमय अंतःकरणाने कृष्णावर केलेले प्रेम इतकी मर्यादित विषयबांधणी न येता महाकाव्याचा डौल स्वीकारणारे एका विदग्ध कवीचे विदग्ध कथाकाव्य रूप घेत असते.

प्रसंगनिर्मितीचे वेगळेपण

नव्या व्यक्ती व नवे प्रसंग यांच्या निर्मितीनेही नरेन्द्राच्या रुक्मिणीस्वयंवराला एक विशिष्ट डौल प्राप्त झाला आहे. कल्याणकीर्ती या भाटाचे उपकथानक त्या उपकथानकात आणखी एक किन्नरजन्माची उपकथा योजून नरेन्द्र मार्मिकता दाखवितो. रुक्मिणीचे देहसौंदर्य बघून भाटास वाटलेले आश्चर्य, भाटाने किन्नराचे केलेले वर्णन, सभाजनांना वाटलेले आश्चर्य, किन्नराची गाननिपुणता, विविध गायनप्रकार, रुक्मिणीला वर म्हणून अपात्र ठरणारे देव, पाताळलोक, सप्तद्वीप, जंबुद्वीप, उत्तरेकडील पूर्वेकडील, ईशान्येकडील आणि दक्षिण दिशेचेही राजे कसे अपात्र ठरतात याचे फार रेखीव चित्र नरेन्द्र उभे करतो व त्यातून कृष्णथोरवी व कृष्णमूर्तीच्या वर्णनाकडे वळतो. या नव्या प्रसंगामुळे नरेन्द्राने रुक्मिणी-कृष्ण यांच्या विवाहाची अपरिहार्यता सुचविली व रुक्मिणीला योग्य ठरेल असा एकही वर कृष्णाशिवाय नाही हेही स्पष्ट केले व विविध देशोदेशींचे राजेलोक कसे सामान्य ठरतात हे सांगून, रुक्मिणीचे देहसौंदर्य आणि श्रीकृष्णाची अनुरूपता यांचा चपखलपणा दाखवून दिला.

कल्याणकीर्ती आणि किन्नर याही प्रसंगातून नरेंद्राची कवितेवरील अथपासून इतिपर्यंत असलेली सुजाण पकड लक्षवेधी ठरते. कोणताही प्रसंग, कोणतीही व्यक्ती आणि कोणतीही घटना ही कार्यकारणसंबंधाने बांधली गेलेली दिसते. भाटाने कृष्णरूपसौंदर्याचे वर्णन करणे व रुक्मिणीने विरहार्त होणे या निर्मितीची अपरिहार्यता आणि काव्यदृष्टीची मुक्तक्रीडा मोहविणारी ठरते. प्रसंगांचे औचित्य आणि तपशीलाची अचूकता यामुळे विविध प्रसंग

कथेला परिणामकारक रूपसौंदर्य देतात. घटनाप्रसंगांची कलात्मक वीण नरेंद्र अशी काही निर्माण करतो की, त्यातून मूळ कथानक एकसारखे प्रवाही बनत असते, गतिमान होत असते व जिवंतपणा त्याच्या अंगप्रत्यंगातून अवतरत असतो.

कृष्ण, रुक्मिणी, रुक्मी, भीमक, कल्याणकीर्ती, किन्नर आणि रुक्मिणीच्या सख्या या साऱ्याच व्यक्तिरेखा अतिशय प्रत्ययकारी आणि जिवंतस्वरूपात निर्माण करण्यात नरेंद्र यशस्वी ठरला आहे. कृष्णाला रुक्मिणी द्यावी असा तात्काळ निर्णय घेणारा भोळा भीमक, त्याला विरोध करणारा रुक्मी, शिशुपाळाची वर म्हणून नियुक्ती व त्यामुळे रुक्मिणीला आलेला शीण यांचे परस्परपूरक आणि परस्परांना जिवंत करणारे वर्णनकौशल्य मुळातून बघण्यासारखे आहे. विरहव्यथित रुक्मिणी नरेंद्राने फार सुंदर रेखाटली आहे. रुक्मिणीला आलेली मूर्च्छा, सख्यांनी केलेले तर्कवितर्क, विरहोपचारांचा केलेला आरंभ आणि तरीही रुक्मिणीचा विरह कमी होत नाहीच, तगमग कमी होत नाही म्हणून भावकळनेने उचित चंद्रिकेला केलेली खूण हा कथाभाग अतिशय हृदयंगम झालेला आहे.

ते प्रधानकुमरी सांगाणी : उचितचंद्रिकेसी बोले खुणे
'तू सरिसें करी पां साजणी : धारादामोधर' ।[1]

–रुक्मिणीची विरहार्तता व त्यासाठी धारादामोधराची झालेली योजना यातून प्रसंगांचे औचित्यपूर्ण रेखाटन आणि रम्यकल्पनाविलास यांचा कलात्मक आविष्कार लक्ष वेधतो; उदा० संध्याकाळची कातरता आणि रुक्मिणीची विरहार्त अवस्था हे वर्णन, हळू हळू अंधार पडू लागल्यामुळे अधिक गहिरेपणाने वातावरणाला आलेली धूसरता यांचे वर्णन.

संकोचली कमळे : पक्षिये टाकिती आविसाळे
चक्रवाके होति व्याकुळे : वियोगे प्रियाचेनि[2]

चक्रवाक चक्रवाकीची व्याकुळता, दिव्यांचा लखलखाट, नक्षत्रांकित नभोमंडपाची शोभा, चंद्रोदय, द्राक्षमंडपातील चंद्रकिरणांची शोभा, यामुळे रुक्मिणीची वाढणारी तगमग आणि उलाघाल फार प्रत्ययकारित्वाने नटलेली आहे. विरहाचा शारीरिक परिणाम, सख्यांनी केलेले रोगनिदान, उपचार करूनही उतार न पडल्याने सख्याचे बावरलेपण, पक्ष्यांचे शकून आणि रुक्मिणीने व्यक्त केलेले हृद्गत या सर्वच चढत्या आणि परिणामकारक प्रसंगचित्रणातून कथेची एकसंधता आणि विकास साधला आहे. कथासूत्र एका सरळ पद्धतीने उलगडत न जाता त्याला विविधलक्षी टोकदारपणा येतो म्हणून प्राचीन मराठी कवितेतील सर्व कृष्णरुक्मिणी स्वयंवरकथांमध्ये धवळ्यांबरोबर नरेंद्राचे रुक्मिणीस्वयंवर कलात्मक ठरते.

सुदेव रुक्मिणीभेट आणि रुक्मिणीपत्रिका याहीप्रसंगांतून रुक्मिणीचा कातर, प्रणयी, उत्कट, तारुण्यसुलभ उतावळेपणा यांचे दर्शन नरेंद्र घडवितो. रुक्मिणीप्रमाणेच

---

१. रुक्मिणीस्वयंवर : १४३
२. रुक्मिणी स्वयंवर : ४७६

रुक्मिणीच्या सख्याही अतिशय मार्मिक आणि हजरजबाबी आहेत. सुदेवाची त्यांनी केलेली थट्टामस्करी व रुक्मिणीपत्रिकेविषयी केलेली चेष्टा मुळातून बघण्यासारखी आहे. द्वारकादर्शन, ऋतुवर्णन, वनोपवनांचे वर्णन, वृक्षवर्णन या विविध वर्णनातूनही नरेंद्राच्या अभिरुचीची संपन्नता जशी जाणवते तशीच प्रसंगवर्णनातील अचूकताही लक्ष वेधते. पूर्ण कथाशयावर लक्ष केंद्रित करून याठिकाणी रुक्मिणीस्वयंवराची निर्मिती झाली आहे ही गोष्ट स्पष्टपणे निदर्शनास येते. मूळ कथेचे पोत नरेंद्राने विविध नाट्यपूर्ण प्रसंगनिर्मितीने आणि निसर्गवर्णनाने अधिकच मुलायम केले आहे.

स्वतंत्र व वेगळी कथा

महदंबेने स्वीकारलेली रुक्मिणीकृष्णविवाहकथा आणि नरेंद्राने स्वीकारलेली कृष्ण रुक्मिणीस्वयंवरकथा यांच्या निर्मितीहेतूमध्ये मूलतः फरक असल्यामुळे त्यांच्या कथाही स्वतंत्र व वेगळ्या झाल्या आहेत. कथेच्या मर्मावर लक्ष केंद्रित करून महदंबेने अतिशय संक्षेपाने व्यक्तिदर्शन व प्रसंगचित्रण केले व त्यातून कृष्णचरित्राचे माहात्म्य वर्णन केले. नरेंद्राची अभिरुची विदग्ध आणि संपन्न होती व भूमिका काव्यनिर्मितीची होती त्यामुळे मूळ कथेला धक्का न लावता अधिकाधिक प्रसंगनिर्मिती आणि व्यक्तिरेखानिर्मिती करून मूळ आख्यानावर कल्पनाशक्तीच्या साह्याने कलापूर्ण संस्कार नरेंद्राने घडविला. केवळ संस्कृत महाकाव्याचे रूपांतर किंवा भाषांतर करण्याचा हा प्रयत्न नाही, तर त्यातून नरेंद्राने आपल्या विदग्ध प्रौढ प्रतिभेने एक उत्कट प्रणयकथा निर्माण केली. या कथेच्या भावनिक उठावासाठी व व्यक्तिरेखांच्या पूर्णतेसाठी त्याने नवे प्रसंग व नव्या व्यक्ती स्वतःच्या कल्पकतेच्या साह्याने निर्माण केल्या व उचित परिणाम साधला जाताच त्या व्यक्तींना निरोप दिला आहे. प्रसंगानुरूप आणि व्यक्तिनुरूप बदलेले भाषेचे अन्तःप्रवाहही मुळातून बघावे. एकएक धागा उलगडत जावा आणि बघता बघता विकसित पूर्णरूप कथेचे दिसू लागावे तशी वीण रुक्मिणीस्वयंवरातील घटनांची आणि प्रसंगांची झाली आहे. तीतून नरेंद्राचे काव्यविषयक अवधान लक्षात येते. महदंबेने कोणताही जाणीवपूर्वक प्रयत्न न करताही तिच्या कवितेचे उत्स्फूर्त रूप डोळ्यात भरते; तर नरेंद्राने वैदग्ध्याने परिपुष्ट करून ही कथा सांगितली तरी कथानुसंधान आणि प्रसंगचित्रण यातील अपूर्वता मनावर बिंबली जाते व प्राचीन मराठी कवितेच्या बाल्यावस्थेतही स्वतःच्या स्वतंत्र काव्यनिर्मितीने व उत्स्फूर्त प्रतिभासामर्थ्याने महदंबेने आख्यानकाव्याची मुहूर्तमेढ रोवली तर नरेंद्राने मराठी आख्यानकाव्याला वैदग्ध्याचे लेणे चढविले व आपली पृथगात्मता स्पष्ट केली.

नरेंद्राची संपन्न अभिरुची व विदग्ध प्रतिभा यांचे मुक्तचिंतन रुक्मिणीस्वयंवरातून प्रतीत होते. अर्थात महदंबा व नरेंद्र यांचा पंथीय दृष्टिकोण यांच्या कवितेतून गोचर होत असतो. किंबहुना तोच त्यांच्या निर्मितीमागील उद्देश असतो. परंतु वाचकाला तो दृष्टिकोण बाधा आणू शकत नसतो, तो टाळूनही या कथाकाव्यांचा आस्वाद घेता येत असतो. भक्तिमूल अन्तःकरणाचा कवी म्हणून रुक्मिणीस्वयंवराच्या प्रथमार्धात नरेंद्र दिसत असला तरी त्याच्या भक्तिभावावर काव्यभावाने श्रेष्ठत्व मिळविलेले असते म्हणून कथेवरील एकात्म

पकड आणि कल्पकतेने आशयाचा झालेला आविष्कार यातून एक कलात्मक स्वयंभू स्वतंत्र असे 'देशिकार लेणे' नरेंद्राने निर्माण केले की त्याच्या रुक्मिणीस्वयंवराचा परिणाम पुढील काळातील केवळ महानुभाव कवीच्या कवितेवरच झाला असे नाही तर सर्वच मराठी आख्यानकवींनी नरेंद्राच्या रुक्मिणीस्वयंवराशी आपले नाते या ना त्या पद्धतीने दाखविलेले आहे. एक सुसंस्कृत अभिरुचीचे इतके स्पष्ट आणि स्वच्छ दर्शन फार क्वचितच पुढील आख्यानकवितेतून झालेले आहे. जी गोष्ट नरेंद्राची तीच महादंबेने जाणीवपूर्वक प्रयत्नशील नसताही एक स्फुट, उत्कट रसरशित आणि उत्स्फूर्त कथाकाव्य गाऊन आद्यत्वाचा मान मिळविला. धवळे आणि नरेंद्राचे 'रुक्मिणी स्वयंवर' यांचा स्वतंत्र आणि तुलनात्मक विचार केला कारण या दोन कवितांवर पुढच्या काळातील मराठी आख्यान कविता सुरूप झाली आहे. या कवितेवरोबरच साती ग्रंथांचा विचार होणे आवश्यक आहे.

ईश्वरनिष्ठेतील समान्तरत्व

तेराव्या शतकातील कवितेचा प्रवास सतत एकाच दिशेने चालू होता. ती दिशा म्हणजे मोक्षाची! मोक्षप्राप्ती करणे, ईश्वरी सान्निध्याचा ध्यास बाळगणे आणि तिच्या साह्याने भवसागर तरून जाणे या जाणिवेपोटी ही कविता लिहिली गेली असली तरी तितक्यापुरती ती मर्यादित झालेली नव्हती. तिच्यातून आत्माविष्कार जसा होत होता तसाच उत्कट भावनांचा कल्लोळही प्रगट होत राहिला.

यादवकालीन कवी विविध सांप्रदायिक असले तरी त्यांच्या कवितेचे पोत आणि अनुभवांची उत्कटता ही समांतर होती. असे होण्याचे कारणही उघड आहे, ते म्हणजे एकाच ध्येयाने आणि एकाच उद्देशाने ही कविता लिहिली गेली होती. विठोबा आणि श्रीकृष्ण ही देवतारूपे प्रस्थापित सांप्रदायिकांची मूलप्रेरणाविषय झालेली होती. त्यामुळे महानुभाव आणि वारकरी संतकवींनी लिहिलेल्या कवितेत आशयघनता प्रगट होऊ शकली आहे. विषय, आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीनेही वारकरी व महानुभाव कवींच्या कवितेत सारखेपणा जाणवतो. असे होणे अपरिहार्यच होते. कारण समकालीन प्रवृत्ती आणि सांस्कृतिक सामाजिक असे स्थितिसापेक्ष चढउतार हे कवितेतून प्रतिबिंबित होत राहणारच. अशा वेळी भाषा एखादे वेळी बदलू शकते, पण जीवनाचे व काळाचे जे प्रतिबिंब आहे ते कवितेतून दृग्गोचर होणे अपरिहार्य ठरते! यादवकालीन कविता ही स्वतंत्र नाही. तिला कितीतरी बंधनांचा स्वीकार करावा लागला आहे. पूर्वकवितेचा विशेषतः संस्कृत कवितेचा आदर्श तिला स्वीकारून पुढे जायचे होते. संस्कृतमधील समृद्ध विचारदर्शन सामान्यांना घडवावयाचे होते. सांप्रदायिकदृष्ट्या तत्त्वज्ञान-निरूपण आणि जीवदेवताप्रपंच यांचा जीवघेणा खेळ अधिक सुटसुटीत व मोकळा करीत जाणे व तो जनसमूहासह करीत राहणे ही तत्त्वज्ञाननिरूपणामागील या कवींची मूलप्रेरणा होती. त्यामुळे एकीकडे तत्त्वज्ञानाचा गुंता सोडविण्याचा प्रयत्न; तर दुसरीकडे उत्कट भावनांचा आविष्कार करण्याचा प्रयत्न यादवकालीन कवितेने केला.

गद्यरचनेपेक्षा पद्यरचनेवर त्या कलावंतांचा अधिक भर असणे स्वाभाविकच होते; पण गद्यात्म लेखनात चरित्र, आत्मचरित्र, स्फुटगद्य आणि ललितगद्य अशा वेगवेगळ्या पद्धतींनी व बारकाव्यांनी तत्कालीन वाङ्मय कसे समृद्ध झालेले दिसते हे यापूर्वीच स्पष्ट झालेले आहे. हे गद्यलेखन प्रामुख्याने महानुभाव लेखकांनी केलेले आहे. मराठी वाङ्मयाच्या या दोन्ही (गद्य आणि पद्य) शाखा महानुभाव कवींनी प्रामुख्याने विकसित केल्या आहेत. कवितेच्या संदर्भात विचार केल्यास असे दिसू लागते की संतकविता आणि महानुभाव कवींनी लिहिलेली कविता यांमध्ये तत्त्वज्ञानात जरी फरक निर्माण झाला असला तरी त्यांनी स्वीकारलेला व आळवलेला भक्तिमार्ग एकच आहे. ईश्वरविषयक स्मरण, मनन, चिंतन दोन्ही पंथांमध्ये समांतरच असलेले स्पष्ट दिसून येईल. तत्त्वज्ञान आणि आचारधर्म हा संतांचा आणि महानुभावांचा वेगळा असला तरी ज्या तत्त्वज्ञानाच्या आणि आचारधर्माच्या साह्याने ईश्वरसान्निध्य मिळवायचे तो मात्र एकच आहे, श्रीकृष्णच आहे. त्यामुळे संतकवितेत आणि महानुभावांच्या कवितेत समान्तरत्व निर्माण झाले ते ईश्वरविषयक एकनिष्ठेमुळेच !

प्रस्थानत्रयी

वारकरी संप्रदायाला जशी 'प्रस्थानत्रयी' म्हणून ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत आणि दासबोध हे ग्रंथ शिरोधार्य वाटले, त्याचप्रमाणे महानुभाव सांप्रदायिकांना 'सातीग्रंथ' वाटतात. सातीग्रंथांचे फार अनन्यसाधारण असे महत्त्व प्रत्येक महानुभावीयाला वाटत असते. वास्तविक 'सातीग्रंथ' हे सर्व काव्यग्रंथ आहेत. त्यात ईश्वरविषयक भक्तिभावाला महत्त्व मिळाले आहे आणि त्या भक्तीच्या साह्याने परमेश्वराच्या 'सान्निध्या'ला अग्रक्रम मिळालेला आहे. संतकविता आणि महानुभावांची कविता ही वरवर बघितली असता तत्त्वज्ञानाचा वेगवेगळा पुरस्कार करीत असली तरी तिचा अन्तरात्मा हा एकच आहे, तिची ध्येयदृष्टी आणि वेषभूषाही त्यामुळे सारखीच झालेली आहे. मराठी भाषेचा स्वाभिमान दोन्ही पंथीयांमध्ये तितकाच प्रकर्षाने प्रगट झाला आहे. संतकविता आणि 'सातीग्रंथा'तील कविता ही समान्तर प्रवाहित झाली असून मराठी बोलीभाषेचाच दोहोंनी स्वीकार केलेला आहे. ज्ञानेश्वर, नामदेव व महानुभाव कवी दामोदर पंडित व भास्करभट्ट बोरीकर हे समकालीन कवी आहेत. जरी ते भिन्न पंथीय असले तरी त्यांचे परस्परांचे संस्कार परस्परांवर झालेले वाङ्मयातून गोचर होतात. समकालीनात जनजागृती करणे हा युगधर्म दोन्ही पंथांनी अंगीकारला होता. त्या युगधर्माला अनुसरून त्यांनी वाटचाल आरंभिली होती. 'सातीग्रंथ' या दृष्टीने मराठी वाङ्मयाच्या अभ्यासात फार महत्त्वपूर्ण समजले जातात. किंबहुना महानुभावांचा आचारधर्म, तत्त्वज्ञान, भक्तिप्रवणता आणि काव्यात्मकता समजावून घ्यायची असेल तर हे ग्रंथ परिशीलन करावे लागतात. 'साधु दिसती वेगळाले : परि ते स्वरूपी मिळाले' असे या साती ग्रंथांचे स्वरूप आहे.

सातीग्रंथ

'सातीग्रंथ' ही संकल्पना ते काव्य निर्माण करणाऱ्या कवींची नाही तर महानुभाव

संप्रदायाचा स्वीकार ज्या ज्या पंथीयांनी केला त्यांनी 'सातीग्रंथ' ही संकल्पना निश्चित करून वछाहरणापासून ऋद्धिपूरवर्णनापर्यंतच्या सात ग्रंथांची योजना त्यात केली. 'वछाहरण' हे शके १२३८ मध्ये लिहिले गेले तर 'ऋद्धिपूरवर्णन' हे 'साती ग्रंथा' तील शेवटचे काव्य शके १२८५ मध्ये लिहिले गेले. म्हणजे ज्ञानेश्वरांच्या समकालीनात दामोदर पंडिताला स्थान मिळाले असून 'सातीग्रंथा' तील सर्व कविता पाच पन्नास वर्षात (यादवकाळातील) लिहिली गेली आहे. एका शतकात जी महत्त्वपूर्ण काव्यरचना महानुभाव कवींनी केली त्यापैकी काव्यदृष्ट्या व तत्त्वज्ञानदृष्ट्या जी श्रेष्ठ कविता पंथीयांना वाटली व ज्या कवितेने भक्तिमार्गाचे अनुसरण केले होते व चक्रधरांच्या तत्त्वज्ञानाचा पुरस्कार केला होता अशी ही 'सातीग्रंथा 'तील वैशिष्ट्यपूर्ण कविता आहे. भक्तिमार्ग, तत्त्वज्ञान आणि काव्य यांचा आदर्श महानुभाव सांप्रदायिकांनो स्वीकारला होता; असे दिसते कारण ज्या ज्या जुन्या पोथ्या आज संशोधकांना उपलब्ध झाल्या आहेत त्यात 'सातीग्रंथ' सलग, एकत्रित व अनुक्रमाने टिपले गेलेले आहेत. उपनिषदे, ब्रह्मसूत्र आणि गीता किंवा ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, आणि दासबोध ही जशी त्या त्या धर्मकल्पनेला प्रेरक ठरली, तशीच सातीग्रंथांची अवस्था आहे. धर्मकारण आणि भक्तिकारण या अंगांनी ही कविता रंगलेली आहे. हे सातीग्रंथ खालील कवींनी त्या त्या काळी लिहिले आहेत. (१) वछाहरण-दामोदर पंडित, शके १२३८ (२) रुक्मिणी स्वयंवर–नरेन्द्र, शके १२१४ (३) शिशुपाळवध–भास्कर भट्ट बोरीकर, शके १२३० (४) उद्धवगीता–भास्कर भट्ट बोरीकर, शके १२३० (५) ज्ञानप्रबोध–विश्वनाथ बाळापूरकर, शके १२५३ (६) सह्याद्रिवर्णन–रवळोबास, शके १२५५ (७) ऋद्धिपूरवर्णन–नारायण बास, शके १२८५ याप्रमाणे रचना झालेली आहे. वछाहरण, रुक्मिणी स्वयंवर, शिशुपालवध आणि उद्धवगीता हे चार काव्यग्रंथ कृष्णलीला वर्णनपर आहेत व त्याची प्रेरणा मूलतः तत्त्वज्ञान प्रसाराची आहे. ज्ञानप्रबोध हा निखळ महानुभाव तत्त्वज्ञानाचे विश्लेषण करणारा काव्यग्रंथ आहे, तर सह्याद्रिवर्णन आणि ऋद्धिपूरवर्णन हे स्थानमहात्म्य वर्णन करणारे ग्रंथ आहेत.

यादवकाळातील समग्र कवितेत महानुभाव संप्रदायाने अन्वित झालेल्या कवींची वाङ्मयदृष्टी व जीवनदृष्टी लक्षात घेतली पाहिजे. जवळजवळ सर्व महानुभाव कवींनी ज्ञानेश्वरांना भक्तिनिरूपणात म्हणा किंवा काव्यदृष्ट्या म्हणा अनुसरलेले आहे. किंबहुना नाही म्हटले तरी दामोदर पंडित आणि भास्करभट्ट बोरीकर यांनी ज्ञानेश्वरी व अमृतानुभव यांचे चिंतन केले असले पाहिजे असा सबळ संस्कार यांच्या कवितेतून सापडतो. म्हणून ज्ञानेश्वर व महानुभाव पंथ यांचा परस्पर संबंध शोधला जाणे आवश्यक ठरते.

ज्ञानेश्वर आदिकवी

ज्ञानेश्वर हे भागवत संप्रदायाच्या कवींचे अग्रणी होते. एकीकडे भगवद्गीतेचे अनुसरण करणे ही भूमिका त्यांनी स्वीकारली, तर दुसरीकडे हे अनुसरण करीत असताना स्वतंत्र पण उत्कट अशी काव्यनिर्मिती त्यांनी केली. जणू यादवकाळातील कवींसमोर त्यांनी

आपल्या ज्ञानेश्वरीच्या रूपाने कवितेचा आदर्शच निर्माण केला व हा आदर्श केवळ वारकरी संप्रदायाच्या कवींनीच फक्त अनुसरला असे नाही; तर महानुभाव कवीही ज्ञानेश्वरांच्या विलक्षण प्रतिभासामर्थ्याने चकित झालेले दिसतात. किंबहुना महानुभाव कवींच्या कवितेत आलेली कमालीची वैचारिकता ही ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीच्या प्रभावातून आली आहे का ? तिच्या केवळ आशयाचा किंवा केवळ बाह्यांगाचा किंवा केवळ अभिव्यक्तीचा प्रभाव समकालीन कवितेवर पडला असे नाही तर ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीने जणू यादवकालीन सर्वच मराठी कवितेचे पोषण केले आहे. म्हणून ज्ञानेश्वरीच्या ओळखखुणा समकालीन कवितेतून जाणवतात. महानुभाव कविताही तिला पारखी नाही. आशय, विषय, प्रतिमासृष्टी आणि अभिव्यक्ती या कवितेच्या सर्वांगांच्या संदर्भात ज्ञानेश्वरीचा प्रभाव केवळ संतकवितेवर पडला असे नाही, महानुभाव कवितेवरही पडलेला आढळतो. पैकी केवळ सर्वमान्य झालेले व प्रस्थानग्रंथ म्हणून मान्यता पावलेले महानुभावांचे 'साती ग्रंथ' विचारादाखल घेतले आहेत.

ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीतून भगवद्गीतेतील विचारधन सकलजनांना संबोधित करण्याचा प्रयत्न केला व असा करीत असतानाच तत्त्वज्ञान-निरूपणही तीतून झालेले आहे. ज्ञानेश्वरीचे मूळ प्रयोजन हे भगवद्गीता अनुसरत अद्वैत तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करणे आणि सामान्य माणसाला गीताशास्त्र समजावून देणे हे आहे. ज्ञानेश्वरीच्या रचनेनंतर महानुभावांच्या साती ग्रंथांची रचना झालेली आहे ही वस्तुस्थिती आज निश्चित झालेली आहे.

वाङ्मयाच्या मुळाशी असलेली तत्त्वज्ञानाची बैठक ही नेहमी बौद्धिक स्वरूपाची असते. तत्त्वज्ञानात मनुष्याचे प्रातव्य काय याची चर्चा असते. परंतु त्या तत्त्वज्ञानाचा व्यवहारात किंवा समाजात कसा उपयोग करावयाचा हे त्या तत्त्वज्ञानाच्या शिकवणीवरून ठरते. ज्ञानेश्वरांनी समकालीन सामाजिक पार्श्वभूमी लक्षात घेऊन समाजाला जी शिकवण दिली, ती जाणीवपूर्वक दिलेली असून या बाबतीत त्यांची एक प्रखर भूमिका निश्चित झालेली होती. गीतेचा अर्थ कर्मयोगपर लावून या कर्मयोगाला अनुसरत लोकसंग्रहाच्या दृष्टीने स्वधर्माचरणावर त्यांनी विशेष भर दिला.

साती ग्रंथ आणि ज्ञानेश्वरी

साती ग्रंथांत ही ज्ञानेश्वरांनी प्रगट केलेली वैचारिक भूमिका बऱ्याच अंशी स्वीकारली गेली आहे. 'वछाहरण', 'रुक्मिणीस्वयंवर', 'शिशुपाळवध', 'उद्धवगीता', 'ज्ञानप्रबोध', 'सह्याद्रिवर्णन' आणि 'ऋद्धिपूरवर्णन' अशी ही साती ग्रंथांतील वेगवेगळी काव्यरचना आहे. एकाच कालखंडात, एकाच भू-प्रदेशात आणि एकाच सांस्कृतिक वातावरणात एकाच भाषामाध्यमातून काव्यरचना करणाऱ्या कवींचा प्रभाव परस्परांवर पडणे सहज शक्य आहे. परंतु ज्ञानेश्वरीचा नुसता प्रभाव पडून यादवकालीन कविता प्रभावित झाली आहे असे नाही, तर ज्ञानेश्वरीतून व्यक्त झालेली काव्य-जाणीव आणि तत्त्वज्ञानात्मक जाणीव सर्वच पुढील कवींनी अनुकारली आहे. महानुभाव कवी हे त्यांपैकीच

ठरतात. गद्यसदृश्य अशा ओवी छंदात ही कविता बांधली गेली आहे. ज्ञानेश्वरीतील ओवीरचनेतील शब्दसंख्या व साती ग्रंथांतील ओवीरचनेतील शब्दसंख्या ही मुळातून बघण्यासारखी आहे. नामधातू तयार करण्याची ज्ञानेश्वरांची लकब व तिचा महानुभाव कवितेवरील प्रभावही मुळातून शोधता येईल. मराठी भाषाभिमानही ज्ञानेश्वरीत आणि समकालीन कवितेत व्यक्त होणे स्वाभाविकच होते व त्याचे उन्मेष कवितेतून उमटणे यथायोग्यच होते.

हे असो शब्दब्रह्म जिये बाजे । शब्दु मावळलेयां निवांत निदिजे ।
तो गोतार्थु मऱ्हाटिया बोलिजे । हा पाडु काइ ।।ज्ञा. ९ : २२. ।।

ज्ञानेश्वरांचा हाच आशय नरेंद्राच्या रुक्मिणीस्वयंवरात असा प्रगट होतो.

जाण अवधारितु स्थानिचे । जे भावरीय शद्व-ब्रह्मा.चे ।।
ते नाणे पारखीतु यां बोलांचे । जे देशी सरते ।।३८।।

शिशुपाळवधात भास्करभट्ट मराठी भाषेचे गुणवर्णन असे करतो.

साहित्याचिया खेडकुळिया । सुदेशा बोलांचीया चीपोळीया ।
सींपणें खेळती सांवळीया । रसवृत्तीसीं ।।२६।।

गीतातत्त्वाचे महात्म्य वर्णन करताना ज्ञानेश्वर म्हणतात की शब्दांच्या उपयोगाशिवाय ज्याच्याशी मेळ साधून घ्यावा, इंद्रियांना नकळता ज्याचा उपभोग घ्यावा आणि शब्दांच्या उगमस्थानी जाऊन प्रतिपाद्य आशय आत्मसात करावा असे हे गीतातत्त्व आहे (ज्ञा. १ : ५८). 'वछाहरणा'त अशाच प्रकारचा विचार मांडला गेला आहे.

जे अनुभवे जाणिजे । ते बोलीं केवि वानिजे ।।
परि श्रवणसुख न पविजे । आणिकी परि ।। वछा १०।।

गीतामाहात्म्य आणि श्रीकृष्णमाहात्म्य वर्णन करणाऱ्या ज्ञानेश्वर आणि दामोदराने मात्र जे दृष्टान्त दिले आहेत त्यांतील साधर्म्य बघण्यासारखे आहे.

जैसे डोलेया अंजन भेटे । तेव्हलो दृष्टीसि पाटा फुटे
मग वास पाहिजे तेथे प्रगटे । महानिधि ।। ज्ञा. १ : २३।।
डोळां अंजणे न सुझति ।। तरि निधाने केवि दिसती ।।
नव्हता रविचि दिप्ती । अंधकारु न वचे ।। वछा : ११।।

गीतातत्त्व नित्यनूतन आहे ही ज्ञानेश्वरांची गीतातत्त्वाच्या संदर्भातील संकल्पना दामोदर-पंडिताने स्वीकारली आहे. 'हे नित्यनूतन देखिजे । गीतातत्त्व ।। असे ज्ञानेश्वर म्हणतात तर 'परि नित्यनौतन मधुर श्रीभागवति कथा ।। ' असे दामोदरपंडित म्हणतो.

ज्ञानेश्वरीच्या पहिल्या अध्यायाचे प्रास्ताविक, नवव्या अध्यायाचे प्रास्ताविक, दहाव्या अध्यायाचे प्रास्ताविक, सोळाव्या अध्यायाचे प्रास्ताविक आणि अठराव्या अध्यायाचे प्रास्ताविक व वछाहरण, रुक्मिणीस्वयंवर आणि शिशुपाळवध या काव्यांचे प्रास्ताविक यांमध्ये

एक अन्तर्गत सारखेपणा जाणवतो. आशयाच्या अभिव्यक्तीची एक विशिष्ट पद्धती, त्यासाठी आलेले विशिष्ट पद्धतीचे दृष्टान्त, देवता गुणवर्णनासाठी आणि संकीर्तनासाठी उपयोजिलेल्या प्रतिमा यांमध्ये बरेच साधर्म्य जाणवते. असे साधार्म्य निर्माण होण्याचे कारण वरील सर्व महानुभाव कवींनी ज्ञानेश्वरीचे निश्चित सखोलपणे अध्ययन केले असले पाहिजे. नरेंद्राच्या रुक्मिणीस्वयंवराचे प्रास्ताविक अभ्यासण्याजोगे आहे. ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीत प्रास्ताविकात आलेले गणेशमूर्तीचे वर्णन व शारदावंदन यांची छाप रुक्मिणी-स्वयंवरावर स्पष्टपणे पडलेली आढळून येते.

आता अवधारां कथा गहन । जें कलाकौतुकां जन्मस्थान
कि अभिनव उद्यानवन । विवेकतरुचें ॥ज्ञा. १ : २८॥

अशाच तऱ्हेने नरेंद्राने रुक्मिणीस्वयंवरकथेची सुरुवात केली आहे.

आता परियसा कथा-मुख । कैसी कवितेची रेख
तुम्हां दोजैल आनंद-सुख । साहानुकेसी ॥रु. स्व. : १४ ॥

'रेखा' या ज्ञानेश्वरांच्या संकल्पनेचाही महानुभाव कवींनी केलेला स्वीकार डॉ. मा. गो. देशमुख[1] यांनी स्पष्ट केलेला आहे. गणेशवंदन आणि शारदावंदन करून विषयप्रवेश करण्याची विशिष्टानुगामी पद्धती नरेंद्राने ज्ञानेश्वरांच्याच प्रभावाने स्वीकारली होती हे वरील केवळ एक जरी उदाहरण घेतले तरी स्पष्ट होण्यासारखे आहे. वछाहरण व शिशुपाळ-वधातही वरीलप्रमाणेच ईश्वरस्तवन करून 'भक्तिरसाचा आदरू' कसा वाढविता येईल या संदर्भात विचार केला गेला आहे. अर्थात ज्ञानेश्वरांनी भक्तिरसापेक्षा शांतरसाला जरी महत्त्व दिले असले तरी ईश्वरविषयक जी रती ती त्यांना अमान्य होती असे नव्हे!

ते कथेचि संगति । भावाची संपत्ति
रसाची उन्नति । म्हणिपेल पुढां ॥ज्ञा. ४ : २११ ॥

या ठिकाणी भक्तिरसाचा उल्लेख जरी ज्ञानेश्वर करीत नसले तरी भक्तिरसाची अपरि-हार्यता त्यांना पटलेली आहे. शिशुपाळवधात भास्कराने रसानुकूल विकार या ज्ञानेश्वरांना अभिप्रेत असलेल्याच शब्दाचा उपयोग केला आहे.

कृष्णकथेचे आलें कोजे खोल । बुडी भावरसाची जेती ओल ।
तऱ्हे प्रबंधलतेचा वेलु । वाढतां दिसें ॥ शिशु. २२ ॥

अर्थात भास्कर, दामोदरपंडित आणि विश्वनाथ या महानुभाव कवींनी भक्तिभावापेक्षा भक्तीला 'रस' म्हणून प्रतिष्ठा मिळवून दिली आहे व पुढील सर्व मराठी कवींनी, अगदी शाहीर कवींपर्यंत, भक्तिरसाचा पुरस्कार केलेला दिसून येतो. शांतरसापेक्षा भक्तिरसाची वाढती लोकप्रियता ही महानुभाव कवींनी भक्तिरसाला मिळवून दिलेल्या प्रतिष्ठेत सामावली आहे ही गोष्ट निर्विवाद होय!

---

१. मराठीचे साहित्यशास्त्र : ज्ञानेश्वर ते रामदास पृष्ठ १५९ ते १७२

ज्ञानप्रबोध आणि ऋद्धिपूरवर्णन हे दोन्ही ग्रंथ विश्वनाथ व नारायणव्यास एकत्र असताना व एका गावी असता लिहिले गेले आहेत. अर्थात दोन्ही ग्रंथांचा विषय जरी भिन्न असला तरी निवेदनसाम्य नाकारता येत नाही. श्रीप्रभूंच्या लीळावर्णनाच्या निमित्ताने सर्वच महानुभाव कवींनी आत्मोद्गार व आत्मनिवेदन हे जागोजागी केले आहे. ईश्वरगुणवर्णन, ईश्वरगुणचिंतन, स्वोद्धाराची तळमळ हाच आशयाच्या अभिव्यक्तीचा विषय बनलेला आहे. 'सह्याद्रिवर्णनात 'तही हेच दिसते. डॉ. वि. भि. कोलते यांनी ज्ञानप्रबोध व ऋद्धिपूरवर्णन या दोन्ही ग्रंथांतील साम्यस्थळे दाखवून दिली आहेत. विश्वनाथ व नारायणव्यास या दोन्ही कविमनांवर ज्ञानेश्वरीचा प्रभाव चांगलाच जाणवतो. ज्ञानलक्षणे, असुरी संपत्ती, दैवी संपत्ती, अमानित्व, अदंभित्व, अहिंसा, शांती, अनहंकार या सर्व विविध संकल्पनांच्या संदर्भात ज्ञानप्रबोधात आलेले विवेचन पूर्णतः ज्ञानेश्वरीला अनुसरणारे झाले आहे.

अथवा बोल तुटलेयां सुकति कोंभ । तयावरि अवचीतें वरिखे आंभ
तेवि तया सुख प्रकटे सैंभ । भेटीसवे ॥ ज्ञा. प्र. ९०८ ॥
कां सुकतेया अंकुरा– वरि पडिलेयां पीयूखधारा
कां निर्जळिचा सागरा । आला मछ ॥ ज्ञा. १३. ३८० ॥
चरणांचे मोकळेपण देखौनि । जीवाचीय उपाहानौ करूनि
हृदये कठोण खूपैल भणौनि । भक्त मेळवीतो ॥ ज्ञा. प्र. ४०८ ॥
ऐसीं सुरंगें सूहावे । राउळिचीं चरणतळें बरवीं ।
जया हृदय उपाहानौ सदैवी । मेळवीजतीं ॥ ऋद्धि २०५ ॥

ज्ञानेश्वरांनी सांगितलेली ज्ञानलक्षणे आणि विश्वनाथाने सांगितलेली ज्ञानलक्षणे यांतील अन्तर्गत सुसंगती मुळातून वाचण्यासारखी आहे. 'उत्तमातें धरिजे। अधमातें अव्हेरिजे' या ज्ञानेश्वर उक्तीचा 'तान्हेयातें पासि करावे। जाणतेयातें अळग धरावे' हा पडसाद ज्ञानप्रबोधमध्ये असा उमटतो, किंवा

तरि न्यून ते पुरते । अधिक तें सरते ।
करुनि घेयावें हें तुमतें । विनवितु असे ॥ज्ञा. १ : ८० ॥

या ओवीचे प्रतिबिंब ज्ञानप्रबोधात उमटते ते असे :–

लागते असैल तें घेयावें । न लगे तें डाळुनि घालावे ।
परि तुम्ही जाणता नीवडावे । राजहंसें ॥ ज्ञा. प्र. ११८४ ॥

सर्वच महानुभाव कवींची तत्त्वज्ञानाची बैठक त्यांच्या कवितेतून भिन्नस्वरूपी दिसत असली तरी त्यांची मने ही प्रामुख्याने संतांची होती, त्यामुळे रचनेचा मांड आणि ईश्वरसान्निध्याची तळमळ फार सर्वांगीणतेने प्रकट झाली आहे. महानुभाव कवींनी ज्ञानेश्वरीला अत्यंत आदराने आणि कौतुकाने न्याहाळले आहे. ज्ञानेश्वरीच्या अभिजाततेची ओळख महानुभाव कवींना पटलेली दिसते. स्वभाषाभिमान संत कवी असलेल्या ज्ञानेश्वरादी वारकरी

सांप्रदायिक कवींत जो दिसतो तितकाच प्रखरपणे तो महानुभावांच्या कवितेत उमटतो इतकेच नव्हे, तर बोलीभाषेचे अत्यंत जिवंत आणि सळसळते असे भाषारूप महानुभाव कवितेतून व्यक्त झाले आहे. भाषेच्या अभिमानाबरोबरच एका भक्तिमूल मनाची आंदोलने प्रस्फुरित होत असता समकालीन परिस्थितीजन्य अशा उल्लेखांपेक्षा ईश्वराची एकरूपता आणि तादात्म्य यामध्येच यादवकालीन कविता रंगून गेलेली होती. क्रियापदांचा वापर, नामधातूंची योजना, विशिष्ट प्रतिमांचा सारखेपणा आणि भाषेची विशिष्ट घडण हीही ज्ञानेश्वरीत आणि महानुभाव कवितेत सारखी दिसते, 'प्रबंध', 'पसायदान', 'लावणी', 'नागरीबोल', 'ॐऽत्वणे', 'दोंद निघे', 'धारसा', 'वासटु', 'उमेठा बोल' 'पूजाबंध' या काही शब्दांवरूनही वाङ्मयीन असे त्यांचे असणारे जे अर्थ आहेत ते ज्ञानेश्वरीत व महानुभावांच्या 'साती ग्रंथां'त समान दृष्टीने वापरले आहेत.

साती ग्रंथांत अवतरलेली कृष्णभक्ती आणि कृष्णमय झालेली वारकरी पंथाची भावकविता व तीतून प्रवाही झालेला भक्तिस्रोत यांचा विचार करताना ज्ञानेश्वरीला अग्रमान द्यावा लागतो. जनसामान्यांसाठी ही कविता जन्माला आली असली तरी रंजनमूल्याला न स्वीकारता एका अभिरुचिसंपन्न समाजाला रुचेल, समजेल अशा पद्धतीची कविता निर्माण करण्याचा प्रयत्न यादवकालात झाला होता. भक्तिरसाचा स्रोत वाहता ठेवून समाजाच्या अभिरुचीला प्रौढता आणि संपन्नता आणून देण्यात ज्ञानेश्वर यशस्वी ठरले व त्यांचा प्रभाव स्वीकारत स्वीकारत महानुभाव कवीही विशेषतः 'साती ग्रंथां'चे कवीही यशस्वी ठरले ही गोष्ट यावरून सिद्ध होते.

महाराष्ट्रातील साधुसंतांचे कार्य

काळ बदलतो, परिस्थिती बदलते, धार्मिक, राजकीय अवस्थांतरे होतात; पण समाजाचे मानसिक परिवर्तन होते असे नाही. त्यासाठी रंजल्यागांजल्याचे अश्रू पुसण्यासाठी आणि त्यांच्या सुखदुःखात वाटेकरी होण्यासाठी एक सुहृद असावा लागतो; एक समानधर्म असावा लागतो. महाराष्ट्रातील साधुसंतांनी त्या त्या काळात समाजाचे मानसिक बळ वाढवून ईश्वराकडे जाण्याचा भक्तिमार्ग दाखविला. या भक्तिमार्गाने जात असता ज्ञान आणि कर्म यांची ओळख करून देत आणि आत्माविष्कार करीत उत्कटतेने ईश्वराचे गुणसंकीर्तन केले. संतांची कामगिरी अशाप्रकारे दुहेरी स्वरूपाची झाली. एकारीतीने ती आध्यात्मिक आत्मोन्नती आणि समाजोन्नती करण्यासाठी अवतरली व संत वाणीतील आत्माविष्कारामुळे तिला वाङ्मयाचे रूप आले. केवळ यादवकाळापुरता विचार केला तरी असे दिसते की चक्रधरांच्या विहरणातील उपदेशाने मराठी वाङ्मयाच्या ललितगद्याला प्रारंभ केला. चरित्र, आत्मचरित्रादी वाङ्मयप्रकार निर्माण झाले व ज्ञानदेव नामदेवांच्या आत्माविष्कारीवाणीने अभिजात भावकाव्याचा जन्म झाला. राजकीय, ऐतिहासिक, भौगोलिक, सामाजिक जीवनव्यवहाराचेही दर्शन संतवाणीतून घडते, पण ते तिचे प्रयोजन नव्हते. महाराष्ट्रीय संस्कृतीत जे एक विचारसातत्य आणि परम

सहिष्णुता जाणवते त्याची पाळेमुळे यादवकाळातील संतवाणीत आहेत मानवतावाद, उदारमतवाद, समानता आणि स्त्रीपुरुषसामंजस्य या ज्या आजच्या काळाच्या सामाजिक गरजा म्हणून आपण लक्षात घेतो त्या यादवकाळातील संतांनी आपल्या कृतिउक्तीतून समाजातील मनामनांच्या अंतःकोषात रुजविल्या होत्या; ही गोष्ट विसरता येत नाही. शिक्षणाचे कोणतेही संस्कार नसता भौतिकदृष्ट्या अत्यंत मागासलेपण भोगत असताही वैचारिकदृष्ट्या महाराष्ट्रातील संतमंडळाने पुरोगामी दृष्टिकोण स्वीकारून आध्यात्मिक सामर्थ्य प्राप्त केले. आत्मशुद्धीकडून समाजशुद्धीकडे, आत्मविकासाकडून समाजविकासाकडे आणि आत्मज्ञानाकडून अध्यात्मज्ञानाकडे यादवकालीन साधुसंतांनी वाटचाल केली. तीतून 'आधी केले मग सांगितले' अशी साधना त्यांच्या जीवनव्यवहारातून पुढील पिढ्यांना मार्गदर्शक ठरली. खरा क्रांतदर्शी, जिज्ञासू द्रष्टा तोच की जो आपल्या उपदेशाने आणि आचरणाने समाजाचे मार्गदर्शन करतो आणि धार्मिकदृष्ट्या नेतृत्व करतो. मानवकल्याणाची भूमिका घेत व भूतवर्तमानातून भविष्यात डोकावीत पुढे जाण्याचा प्रयत्न करतो. म्हणूनच त्यांचा उपदेश हा वाळूवरील पावलासारखा क्षणकालीन नसतो. क्षणजिवी नसतो यादवकाळातील संतांची जीवनदृष्टी आणि वाङ्मयदृष्टी न्याहाळली तरी तीतून त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील सौहार्द, भक्तिभाव आणि कारुण्याचा महासागर उचंबळताना दिसू लागतो.

मराठी तत्त्वविचार

जीव, जगत् आणि ईश्वर यांच्या अंतिमरूपाकडे ज्या भूमिकेतून बघितले जाईल त्या भूमिकेतून निष्कर्ष निघतील. म्हणूनच ईश्वरवादी आणि निरिश्वरवादी तत्त्वज्ञानाचे सरळ दोन गट पडलेले भारतीय तत्त्वज्ञानात दिसतात. बौद्ध, जैन, सांख्य आणि महानुभाव यांचा पहिल्या वर्गात समावेश होतो; तर वेदांत, न्याय, वैशेषिक यांचा अंतर्भाव दुसऱ्या गटात होतो. यामधूनच विविध संप्रदायांची आणि पंथांची बांधणी झालेली आहे. एक स्वतंत्र संप्रदाय (School) आपण स्थापन करीत आहोत याची तीव्र जाणीव चक्रधरांच्या ठिकाणी होती तशी ज्ञानदेवांच्या ठिकाणी असण्याचे कारण नाही; कारण वारकरी किंवा विठ्ठलपंथ हा नवव्या दहाव्या शतकापासून अस्तित्वात होता. चार्वाकांची भौतिकता, सांख्यांचे प्रकृतिपुरुषवर्णन, पातंजलाचे योगदर्शन, जैनांची चराचर विश्वाची मूलतत्त्वे, शंकराचार्यांचे केवलाद्वैत, रामानुजांचे विशिष्टाद्वैत, मध्वाचार्यांचे पूर्ण द्वैत किंवा वल्लभाचे शुद्धाद्वैत हे सर्व दृष्टिकोण म्हणजे जीव, जगत् आणि परमेश्वराच्या संदर्भात त्या त्या विचारवंतांनी केलेला तत्त्वविचार होय. पण नुसत्या तत्त्वज्ञानामुळे संप्रदायाची संघटना होऊ शकत नाही तर संप्रदायप्रमुखाच्या वैचारिक दृष्टिकोणाचा जिवंतपणा आणि लोकाभिमुखता याशिवाय संप्रदाय बळ धरणार नाही. चक्रधर आणि ज्ञानदेव यांचा विचार करताना किंवा महानुभावपंथ आणि वारकरीपंथ यांचा विचार करताना जणू ते पंथ आणि पंथीय यांचे कार्य हे क्रिया-प्रतिक्रियात्मकच आहे असे गृहीत धरूनआजवर विचार होत आला व

त्यात एकाने क्रांती केली असेल तर दुसरा समन्वयवादी ठरविला गेला! खरोखर वस्तुस्थिती तशी आहे का? चक्रधर, ज्ञानदेव यांच्या विचारातून खरोखर तसे जाणवते का? एकमेकांचा वैचारिक आणि तात्त्विक पराभव करण्यासाठीच त्यांनी आपली वाणी परजली होती का? असा विचार करू लागता एका अंतिम मुक्कामाला जाणाऱ्या समांतर विचारधारा असेच चक्रधर–ज्ञानदेव यांच्या विचारांचे रूप नाही काय? परंतु एकदा गृहितकृत्य निश्चित केल्यामुळे आपोआपच एक श्रेष्ठ ठरविला जातो. दुसरा कनिष्ठ ठरविला जातो. चक्रधरांना महात्मा ठरविण्यासाठी डॉ. वि. भि. कोलते यांना ज्ञानदेवांचे क्रांतिकारकत्व उणे वाटू लागले, तर विशिष्ट परिस्थितीजन्य असे संतकार्य आहे हे निश्चित करण्यासाठी मुसलमानी आक्रमणाला तोंड देण्यासाठी ज्ञानेश्वरी लिहिली असा अपसिद्धान्त प्रा. न. र. फाटक यांना मांडावा लागला. त्याचा मुळातच विचार करू या!

दोन आक्षेप

'बौद्ध आणि जैन तत्त्वज्ञानाचे आघात उत्तरेत सुरू होताच त्यापासून वैदिक तत्त्वज्ञानाचे संरक्षण करण्यासाठी भारताच्या दक्षिणेत जन्मलेल्या शंकराचार्यांना धावून जावे लागले. उलटपक्षी जैन आणि बौद्ध यांना दक्षिणेत उतरावे लागले'[१] असे डॉ. कोलते प्रतिपादन करतात आणि त्यातून महाष्ट्रात चक्रधर का आले याचे कारण सुचवितात. तसेच पुढे पृष्ठ १५ वर ते म्हणतात, 'चक्रधर आणि ज्ञानेश्वर यांच्या आध्यात्मिक तत्त्वज्ञानातील द्वैता द्वैताच्या ह्या मुख्य भूमिका आणि या दोन व्यक्तींचे पौर्वापर्य लक्षात घेतले म्हणजे ज्ञानदेवांच्या कार्याची भूमिका स्पष्ट होते असे मला वाटते. तेराव्या शतकाच्या शेवटी शेवटी महाराष्ट्रात 'अद्वयानंदवैभव' जनतेला देण्याची ज्ञानदेवांना आवश्यकता का वाटली असावी? या प्रश्नाचे उत्तर असे देता येईल की त्यावेळी महाराष्ट्रामध्ये 'द्वैतां'चे तत्त्वज्ञान विशेष प्रसार पावत होते. हा द्वैत तत्त्वज्ञानाचा प्रसार चक्रधराने चालवला होता. खास ज्ञानदेवांच्या काळातही चक्रधराचे अनुयायी हेच कार्य करीत होते. याचा प्रतिरोध करण्यासाठी ज्ञानदेवांना द्वैताविरुद्ध विवेकाचे शस्त्र उपसावे लागले[२]...' पुढे आणखी दोन वर्षांनी लिहिलेल्या चक्रधर चरित्रात डॉ. कोलते म्हणतात, 'स्वामींच्या तत्त्वज्ञानामुळे आणि सामाजिक आचारविचारामुळे अन्य पंथांतील धर्मधुरीणांची संपुष्टात येऊ लागलेली प्रतिष्ठा हे होय'[३] आणि एका मुलाखतीत त्यांनी 'चक्रधरांचे (मातंगाच्या हातचा लाडू खाणे) हे एकच कार्य लक्षात घेता 'मातंगाचे सदन टाळले पाहिजे' असे सांगणाऱ्या ज्ञानेश्वरांना मी कदापि क्रांतिकारक म्हणणार नाही'[४] असे उद्‌गार काढले.

---

१. चक्रधर आणि ज्ञानदेव : पृष्ठ १०

२. चक्रधर आणि ज्ञानेश्वर : डॉ. वि. भि. कोलते १९५०, पृ. १५.

३. श्रीचक्रधर चरित्र : डॉ. वि. भि. कोलते १९५२, पृ. १७.

४. रविवारची लोकसत्ता १०–२–७४.

गेल्या चाळीस वर्षांतील चक्रधर आणि ज्ञानदेव यांच्या संदर्भातील डॉ. कोलते यांचे आक्षेप लक्षात घेतले पाहिजेत. चक्रधरांचे चरित्र आत्मचरित्र असलेला आणि मराठी गद्याचा पहिला ग्रंथ आणि महानुभाव तत्त्वज्ञानाचा बीजग्रंथ समजला गेलेला 'लीळाचरित्र' हा एकमेव बृहद ग्रंथ चक्रधर चरित्र देतो. त्यातून चक्रधरस्वामी धर्मप्रचारासाठी किंवा धर्मसंस्थापनेसाठी म्हणून महाराष्ट्रात आलेले नाहीत तर एका विमनस्क अवस्थेत [१] घर सोडून निघाल्यावर व समाजाची स्थितिशील अवस्था न्याहाळल्यावर स्वामींच्या वृत्तिप्रवृत्तीत फरक पडत गेला व वयपरत्वे तो वाढत जाऊन अखेर शके ११८५ मध्ये पैठणला येऊन त्यांनी मानवी जीवनातील अंतिम आश्रम जो संन्यास त्याचा स्वीकार केलेला आहे. त्यानंतर त्यांनी आपल्या विहरणातून भक्तगण मिळविले, संघटना तयार केली व आपले तत्त्वविचार समाजासमोर ठेवले. यावरून शंकराचार्यांना उत्तरेत धावून जावे लागले तसे चक्रधरांना महाराष्ट्राच्या मदतीसाठी धावून यावे लागले ही वस्तुस्थिती नाही.

हेतुनाम् अनेकता

डॉ. कोलते यांच्या विचारसरणीत दोन हेतू दडलेले दिसतात. एक म्हणजे ज्ञानदेवांपेक्षा चक्रधर क्रांतिकारक कसे हे दाखविणे व दुसरा म्हणजे द्वैत तत्त्वज्ञानाचा महाराष्ट्रात झालेल्या प्रसार-प्रचाराचे उत्तरदायित्व चक्रधरांकडे देणे, हे होय! पण त्यासाठी त्यांनी ऐतिहासिक किंवा वाङ्मयीन पुरावे दिलेले नाहीत. वास्तविक चक्रधरांचे गुरू, स्वतः चक्रधर आणि चक्रधरांचे शिष्य नागदेव या महानुभावपंथाच्या आचार्यांनी वाङ्मयनिर्मिती केलेली नाही. ते पंथीयांच्या वाङ्मयनिर्मितीचा विषय झालेले आहेत. भोवतालच्या केसोबास, म्हाइंभट, भास्करभट यांसारख्या साहित्यिकांना त्यांनी लेखनप्रवृत्त केलेले आहे. ज्ञानदेवांची गोष्ट तशी नाही. कालसापेक्ष अशी निर्मितीची भूमिका ज्ञानदेवांच्या उपदेशवाणीत नाही. कारण ज्ञानदेवांपुढचा समाज हा सर्व पृथ्वीतलावरील समाज आहे, मानव आहे. ज्ञानदेव स्वतः कलावंत आहेत, केवळ उपदेशक नव्हे! ज्ञानेश्वरीत ज्ञानदेवांनी मागितलेले पसायदान आणि विश्वात्मक देवाजवळ त्यांनी केलेली प्रार्थना त्यांची भूमिका स्पष्ट करते. ज्ञानदेव आणि चक्रधर यांच्या व्यक्तित्वात हा मूलभूत फरक आहे. मानवकल्याणाच्या तळमळीतून चक्रधरांनी जे विचार मांडले ते नंतरच्या पंथीयांनी संकलीत केले होते. ज्ञानदेवांच्या जीवनदृष्टीचे प्रतिबिंब त्यांच्या काव्यसृष्टीत पडले असल्यामुळेच त्यांची काव्यनिर्मिती पुढील मराठी कवितेला आणि वारकरीपंथाच्या संघटनेला, तत्त्वविचाराला अधिकच उपकारक ठरली होती. पंथ आणि व्यक्तित्व यांतील द्वैत समजून घेत व अनेकात एक असे आपण आहोत हे लक्षात घेत ज्ञानदेव वारकरीपंथाशी एकरूप झाले होते. चक्रधरांची भूमिका त्यांच्या नंतर महानुभावपंथाला उपकारक ठरली का? चक्रधरांच्या व्यक्तिवादी भूमिकेमुळे त्यांच्या तत्त्वज्ञानाला व आचारधर्माला आलेले सांकेतिक स्वरूप नंतरच्या काळात कमी होऊ शकले नाही; उलटपक्षी ते अधिकाधिक कसे वाढतच

---

१. श्रीचक्रधर चरित्र : पूर्ववृत्त पृ. ९, १०.

गेले ते यापूर्वी बघितले आहेच. चक्रधराच्या द्वैत तत्त्वज्ञानाला विरोध करण्यासाठी ज्ञानदेवांनी निरुपणासाठी भगवद्गीता स्वीकारली असे काही वेळ गृहित धरले तरी ज्ञानदेवांबरोबर निवृत्तिनाथ, नामदेव आणि ज्ञानदेवांपूर्वी विवेकसिंधुकार मुकुंदराजांनी जो अद्वैततत्त्वज्ञानाचा सतत पुरस्कार केला त्याचा अन्वयार्थ कसा लावावयाचा!

अर्थात जर ज्ञानदेवांना चक्रधरांच्या द्वैत तत्त्वज्ञानाला विरोध करावयाचा असता तर जैनांचा किंवा बौद्धांचा उल्लेख जसा ज्ञानेश्वरीत आला आहे तसा महानुभाव पंथाचा किंवा चक्रधरांचा किंवा त्यांनी निरुपित केलेल्या जीव, देवता, प्रपंच, परमार्थ या संकल्पनांच्या संदर्भात विचार आला असता; पण तसे ज्ञानेश्वरीत दिसत नाही. मूळ वस्तुस्थिती अशी आहे की अद्वैत तत्त्वज्ञानाची भारतीय परंपरा ही फार प्राचीन असून वेद-उपनिषदातून ती विकसित होत आलेली आहे. गीतेतील तत्त्वज्ञान हे मूळ उपनिषदातील तत्त्वज्ञान आहे. ब्रह्मविद्या, कर्मयोग, साक्षात्कार, भक्तियोग, ज्ञानयोग, नीतिविचार, आत्मविचार, सगुणनिर्गुण विवेक ही सर्व भारतीय संस्कृतीच्या तात्त्विक अधिष्ठानाचेच विषय आहेत, तेच गीतेने अनुसरले व त्यातील मानव-कल्याणाचा व समाजहिताचा आणि सर्वात्मकतेचा दृष्टिकोण स्वीकारीत ज्ञानदेव आपले 'देशीकार लेणे' घडवितात. वस्तुतः महानुभावपंथ हा ज्ञानदेवपूर्वकालीन आहे, परंतु त्याला संघटनात्मक आणि वाङ्मयीन बळ मिळवून दिले ते नागदेवाचार्याने! व नागदेवाचार्य ज्ञानदेव समकालीन होते. ज्ञानेश्वरीपूर्वी चक्रधरोक्ती एकत्रित करण्याचे व तिचे संकलन संपादनाचे काम महानुभाव पंथीयांनी केले होते पण महानुभाव कविता मात्र ज्ञानेश्वरीनंतरच लिहिली गेली आहे. केवळ सातीग्रंथांची जरी साक्ष काढली तरी ही गोष्ट स्पष्ट होईल! चक्रधरकाळी आणि चक्रधरांनंतर 'महानुभावपंथ' हे नाव संप्रदायाला नव्हते तर ते सोळाव्या सतराव्या शतकात मिळालेले आहे. तत्पूर्वी चक्रधर काळात या पंथाला 'परमार्ग' हे नाव होते. नागदेवाचार्याचे काळी 'भटमार्ग' असे त्याला म्हणत असत. 'आम्ही भटमार्गाचे महात्मे जालो' किंवा 'मज भटमार्गाचा उपदेसु असे' [१] असे उल्लेख येतात. आर. ई. एन्थोवेन यांनी या पंथाला एकूण बारा नावे असल्याचे म्हटले आहे. [२] वरीलपैकी एकातरी नावाचा द्वैताच्या संदर्भात ज्ञानदेवांनी उल्लेख केला असता. पण ज्ञानदेवांची महानुभावांप्रमाणे इतकी मर्यादित भूमिका नव्हती. कारण ते केवळ उपदेशक, विचारवंत किंवा समाजशिक्षक नव्हते. त्यांच्यासह एक प्रतिभावंत कवी होते, द्रष्टे होते. या संदर्भात प्रो. वा. ब. पटवर्धन म्हणतात ते लक्षात घ्यावे लागेल. [३]

ज्ञानेश्वरी म्हणजे केवळ टीका, भाष्यरूप नाही. गीतेतील हिंदुधर्माच्या आधारभूत तत्त्वांना धक्का लागू न देता समाजाच्या जीवन जाणिवांमध्ये बदल घडवून आणण्यात

---

१. नागदेवस्मृती : ८६.
2. Ethnographical Survay of Bombaay 109, Monograph, 131.
3. Wilson Philological Lecturers : 1917.

आणि धार्मिक परिवर्तन घडवून आणण्यात कालोचित समन्वय आणि बदल ज्ञानेश्वरीत गीतेच्या आधाराने ज्ञानदेवांनी घडवून आणला. याही दृष्टीने चक्रधरांच्या तुलनेत ज्ञानदेव धर्मसुधारणेच्या संदर्भात अधिक वास्तववादी भूमिका घेणारे होते ही गोष्ट स्वतः सिद्ध झालेली आहे. ज्ञानदेवांनी केलेली गीतास्तुती व त्यातून सुचविलेली स्वकाव्यविषयक भूमिका लक्षात घेता ज्ञानदेवांची वैचारिक सर्वात्मकता लक्षवेधी ठरते. ज्ञानेश्वरीच्या पहिल्या अध्यायात शब्दब्रह्माब्धीचे मंथन करून निघालेल्या नवनीताला ज्ञानाग्नीच्या स्पर्शाने आणि विवेकाने कढविलेले स्वादिष्ट तूप म्हणजे गीता होय. अशा गीतेचे निरुपण करताना 'बोली अरुपाचे रूप दावीन, अतींद्रिय परी भोगवीन इंद्रिया करवी' अशी आपली प्रतिज्ञा ज्ञानेश्वर व्यक्त करतात. गुरू, ईश्वर आणि गीता यांच्यात ज्ञानदेव एकरूपता मानतात.

तैसी जो ब्रह्मविद्या रावो : जो सकल शास्त्रां विसंवता ठावो
ते भगवद्गीता बोवि गाओ : एसे केले ।। ज्ञा. १० : १९ ।।

द्वैत तत्त्वज्ञानाचा तात्त्विक निरास करणे ज्ञानदेवांना अशक्य नव्हते. ज्या प्रज्ञेने आणि प्रतिभेने त्यांनी ज्ञानेश्वरी आणि अमृतानुभव यांची निर्मिती केली तिला ही गोष्ट अशक्यही नव्हती. पण ज्ञानदेवांची भूमिकाच मुळातून वेगळी होती. 'मराठी संतोका सामाजिक कार्य' याही ठिकाणी डॉ. कोलते यांनी ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरी ही आत्मशुद्धीसाठी, मनःशांतीसाठी आणि आत्मोद्धारासाठी लिहिली' असे म्हटले पण यादवकालीन सर्व संत आत्मोद्धाराकडून समाजोद्धाराकडे वळलेले होते; त्यात ज्ञानदेवांचा अपवाद नाही.

एकनाथांनी 'मानभाव' हा पंथवाचक शब्द पहिल्यांदा योजून आपली नाराजी व्यक्त केली. 'होऊनी मानभाव : अवघा बुडविला ठाव' किंवा 'जालो म्हणती मानभाव : अंतरी शुद्ध नाही भाव' यावरून एकनाथकाळी महानुभाव पंथाला विशेष प्रसिद्धी आणि अनुकूलता होती असे दिसत नाही. आणि वाङ्मयीनदृष्ट्या डॉ. कोलते यांचे विधान तपासले तरी नागदेव आचार्यपदी आल्यानंतर महानुभाव वाङ्मयाचा उषःकाल झाला आहे. नागदेवाचार्यांनी लीळाचरित्र, दृष्टांतपाठ, रत्नमाला स्तोत्र, सूत्रपाठ या ग्रंथांना प्रेरणा दिली व सत्यान्वेषणाच्या भूमिकेवरून सर्व तपशील मूलतः अनुसरण्याची दक्षता घेतली. 'स्वदेश संबंधु त्याज्य, स्वग्राम संबंधु त्याज' किंवा 'तेलंग देशा न वचावे महाराष्ट्री असावे' या उपदेशाचा संदर्भ वेगळा असला तरी प्रादेशिकतेची जी भूमिका चक्रधरांनी व्यक्त केली, तशी ज्ञानदेवांच्या ज्ञानेश्वरीमागे नाही. म्हणून आज सातशे वर्षे होऊनही ज्ञानेश्वरीचे चैतन्यमयी आणि रसरसलेले ताजे अनुभव अन्तर्मुख करण्यास समर्थ ठरतात. चक्रधरांच्या आणि ज्ञानदेवांच्या मूळ लोककल्याणाच्या पाठीमागील भूमिकेतच फरक होता व त्या भूमिकांचा परिणाम त्यांच्या पंथावर पडला व अनुयायांनीही त्याच भूमिका स्वीकारल्या! हा मूलभूत दोन व्यक्तित्वातील फरक लक्षात न घेतल्यामुळे आजवर तरतमची भाषा वापरावी लागली. प्रा. न. र. फाटक यांनीही ज्ञानदेवांच्या कर्तृत्वाचे मूल्यमापन करताना

तिला कालसापेक्ष ठरविले आहे. मुसलमानी आक्रमणाला परतविण्यासाठी ज्ञानदेव लेखनप्रवृत्त झाले असे प्रा. फाटकांना वाटते. ते म्हणतात, 'अशा बहुविध अडचणींच्या अनुभवाने भांबावून कोलमडू पाहणाऱ्या बुद्धीला स्थैर्य पुरवून कर्तृत्वक्षम करण्यासाठी ज्ञानेश्वरांनी गीतेवर टीका लिहिली असून तिच्या प्रेरणेने पुढे नामदेवांनी लोकसंघटनेचे कार्य पार पाडले.[१] प्रा. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी या विधानाला उत्तरही दिलेले होते. इस्लामी संकटाला मागे हटविण्यासाठी धार्मिक जागृतीशिवाय दुसरा पर्याय नव्हता म्हणून ज्ञानदेवांनी गीतेवर निरूपण केले. प्रा. सहस्रबुद्धे यांनी विजयनगर व राजपुतांचा दाखला देऊन शस्त्रबळाने इस्लामी आक्रमण हटविता आले असते व गीतेचे तात्कालिक प्रयोजन अर्जुनाला युद्धाला प्रवृत्त करणे हे आहे अशा गीतेवर ज्ञानदेवांनी भाष्य केले.[२] असे डॉ. सहस्रबुद्धे म्हणत असले, तरी ज्ञानदेवांनी युद्धाला प्रवृत्त करणारा अर्जुन आणि कृष्ण स्वीकारलेला नाही; तर वैश्विक पातळीवरील मानवी जीवनाचा विचार ज्ञानेश्वरीत सतत प्रतीत होतो म्हणूनच 'स्वतंत्रता' किंवा 'आज्ञापक' या शब्दांचे अर्थ आध्यात्मिक दृष्ट्या घेतले पाहिजेत. राजकीय दृष्ट्या ते ज्ञानदेवांना अभिप्रेत होते असे नाही. किंबहुना यादवकालीन संत मंडळाचे कार्य न्याहाळले तर मी–माझे, तू–तुझे इतकी मर्यादित ऐहिक भावना कोणत्याच साधुसंताने व्यक्त केलेली नाही. किंबहुना एका समष्टीच्या विचाराने कार्यप्रवृत्त झालेले ते दिसतात. अशा वेळी 'परस्परांचे मैत्र'च त्यांच्या विचारातून व्यक्त होते. जर महानुभावपंथ आणि वारकरीपंथ यांना परस्परांना सतत विरोधी उभे राहायचे असते तर लिंगायत किंवा दत्तसंप्रदायाप्रमाणे त्याचेही रूप मर्यादित झाले असते. वास्तविक दोन्ही पंथांतील लेखकांनी मराठी भाषेला आणि वाङ्मयाला जे गर्भश्रीमंत बनविले ते काही विरोध-विकासातून नव्हे! संतांच्या कार्याचा विचार करताना संत आणि समाज यांतील भावनिक नाते शोधावे लागते. समाज विशिष्ट पद्धतीचा होता. परिस्थिती अमुक प्रकारची होती म्हणून द्रष्टे पुरुष निर्माण होतात असे नाही; तर अंधाराला जे प्रकाशाचे महत्त्व ते समाजाला द्रष्ट्या माणसाचे! यादवकाळामुळे चक्रधर किंवा ज्ञानदेव निर्माण झालेले नसून, त्यांनी आपल्या संघटनांना तात्त्विक अधिष्ठान दिले, हजारो-लाखोंचा समाज आपल्यामागे नेला. समाजजीवनाला एक दिशा दाखविली आणि त्यातून एला मानव-धर्माला आणि समतेला परिपुष्ट केले. हे त्यांचे खरे लौकिक दृष्ट्या आणि आध्यात्मिक दृष्ट्या सामाजिक कार्य आहे. वाङ्मयाच्या साह्याने आणि माध्यमातून ज्या भक्तिपंथांत ही संतमंडळी होती त्यांनी यादवकाळात जन-जागृती घडवून आणली ही वस्तुस्थिती विसरता उपयोगी नाही.

मराठी भाषा, गद्यपरंपरा, काव्यपरंपरा, चरित्र-आत्मचरित्र, दैनंदिनी, वृत्तकथन, कथात्मकता, शास्त्रीय परिभाषा, व्याकरण, सूत्रभाष्य, संकलन संपादनाचे आदर्श चक्रधर

---

१. ज्ञानेश्वर : वाङ्मय आणि कार्य, प्रा. न. र. फाटक, पृ. ४६.

२. माझे चिंतन : डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे पृ. ५३.

आणि ज्ञानदेव यांनी ज्या पंथात राहून कार्य केले, त्यांनी घालून दिले व पुढीलांनी ते पुढे नेले. या आदर्शामध्ये आजही घटनात्मक किंवा रूपांतरात्मक बदल झालेला नाही. चक्रधर आणि ज्ञानदेव यांचे कार्य भिन्न भिन्न पातळीवरचे असूनही त्यांनी समाजाला सत्य आणि शिवाचा भक्तिमार्गप्रदीप दाखविला व समाजाचे मानसिक पुनरुत्थान घडवून आणले. ज्ञानदेव आणि महानुभावपंथ यांचे नाते असे आहे म्हणून ज्ञानदेव आणि महानुभावपंथ यांचा विचार करताना ज्ञानदेव व महानुभावपंथाचे अध्वर्यू चक्रधर यांची व्यक्तित्वे कशी घडत गेली ते बघितले पाहिजे.

चक्रधर आणि ज्ञानदेव

यादवकाळाच्या शेवटच्या दशकात दोन घटना घडल्या. एक म्हणजे महानुभाव पंथाचे प्रर्वतक चक्रधरस्वामी यांचे उत्तरापंथे प्रयाण शके ११९४ मध्ये झाले व ज्ञानदेवांचा जन्म शके ११९७ मध्ये झाला. मूळ गुजराथमधून चक्रधर आले असले तरी त्यांची कर्मभूमी महाराष्ट्रच होती. चक्रधर आणि ज्ञानदेव यांची जीवननिष्ठा लक्षात घेता आणि त्यातून घडत गेलेली त्यांची व्यक्तिमत्त्वे बघता या दोन्ही पंथप्रमुखांच्या लौकिक जीवनातील चढउतार आणि त्यातून व्यक्त झालेली त्यांची जीवनविषयक जाणीव विलक्षण प्रत्ययकारीपणे गोवर होते. चक्रधरांच्या ऐन तारुण्यात अत्यंत जिवलग अशा प्रिय पत्नीने आपल्या उत्कट प्रेमापेक्षा द्रव्याला महत्त्व द्यावे, ऐहिकांत सुख मानावे या गोष्टींचा मनावर खोलवर परिणाम होऊन त्यांची वृत्ति-प्रवृत्ती बदलली. जीवनविषयक अंतिम मूल्यांचा हिशोब मांडला जाताच चक्रधर अन्तर्मुख होऊन रामटेकच्या यात्रेला गेले ते पुनः परत फिरले नाहीत. सालबर्डीच्या डोंगरावर व इतर अनेक ठिकाणी वास्तव्य करीत शके ११८५ मध्ये त्यांनी पैठणला येऊन संन्यास घेतला. भारतीय संस्कृतीत संन्यास हा मानवाचा अंतिम आश्रम समजला जातो. तेथूनच पुढे आठ-नऊ वर्षे सतत विहरण करीत गावागावांतून, वस्त्यावस्त्यांतून ते भटकले. याच वेळी त्यांनी महानुभाव पंथाची रचना, संघटना आणि प्रचार, प्रसार आरंभिला. जीवनाच्या पूर्वार्धात आणि एकांतकाळातही ऐहिक सुखोपभोग चक्रधरांनी घेतले होते. विवाह केले होते, राजभोग स्वीकारले होते. यातून बाहेर पडून ते निःसंग बनले. संन्यास स्वीकारल्यावरही त्यांनी दोन विवाह केल्याची नोंद लीळाचरित्र देते. परिभ्रमणात आपल्या विचारांना द्वैताचे तात्त्विक अधिष्ठान त्यांनी दिले व जीव, देवता, प्रपंच व परमेश्वर या चार संकल्पना निश्चित केल्या. जीव व ईश्वर यांची एकरूपता शक्य नाही, जर जीवाला मोक्षप्राप्ती अपेक्षित असेल तर सगुणोपासनेतून त्याला ती शक्य आहे असे ते सांगत. अहिंसा, निवृत्तिपर संन्यास, स्पृश्यास्पृश्यामधील अभेद, स्त्रीपुरुष समानता या मानवी जीवनातील मूलगर्भ तत्त्वांचा पुरस्कार त्यांनी केला व आपल्या विचारांचा कायमचा ठसा (imprint) महानुभाव संप्रदायावर ठेवला.

ज्ञानेश्वरांच्या जीवनातील संघर्ष हा चक्रधरांसारखा आत्मसंघर्ष नव्हता, तर समाजाशीच त्यांना सतत संघर्ष करावा लागला. कुलपरंपरेने ब्राह्मण्य मिळूनही 'संन्याशाची

मुले ' हा शाप चारही भावंडांना जीवन जगणे अशक्य करणारा ठरला. जीवन व्यवहारातील सारीच द्वारे बंद झाल्यामुळे ज्ञानदेवांना शुद्धिपत्रासाठी जावे लागले तेही पैठणलाच. चक्रधरांनी घेतलेला संन्यास आणि ज्ञानदेवांनी मिळविलेले शुद्धिपत्र हे पैठणचे स्थळ-माहात्म्य लक्षात घेता; संवेदनशील अशा मनांचा झालेला कोंडमारा आणि त्यातून त्यांची बनत गेलेली वृत्तिप्रवृत्ती यांचे आत्मबल चक्रधर आणि ज्ञानदेव याच्या दयार्द्र, सहृदय आणि विश्वकल्याणात्मक भूमिकेमागे असलेले बीजकेंद्र होय. चक्रधरांनी पुरस्कृत केलेले तत्त्वज्ञान उत्स्फूर्त होते, नवे होते; पण त्यातील जटिलताच त्याच्या प्रसाराला मारक ठरली. उलटपक्षी ज्ञानदेवांनी अद्वैत निरूपण अधिक सर्वंकष पद्धतीने मांडले. जीव, जगत आणि ईश्वर या संकल्पनांच्या संदर्भात चक्रधर आणि ज्ञानदेव यांच्या मनोभूमिकांत फरक होता, तसा त्यांच्या मानवकल्याणाच्या बाबतीत नव्हता. आचार व विचार यांचेबाबतीत विरुद्धत्त्व असून मानवकल्याण विषयक विचार सरणीत मात्र ज्ञानेश्वर चक्रधर यांच्यात एकवाक्यता होती. म्हणूनच वारकरी पंथाला द्वैत स्वीकारणारा महानुभाव पंथ हा सर्वार्थाने अधिक जवळचा होता. तरीही मोक्षमार्गाकडे समाजाला घेऊन जात असता मीच इश्वर आहे ही व्यक्तिवादी भूमिका चक्रधरांनी महानुभाव पंथाला दिली. ' गोसावी ईश्वरू ' (उत्तरार्ध ली. च. २६९) ' आपणेयासि ते ईश्वर म्हणाविताति ' (उत्तरार्ध : ३४३) मीच ईश्वर आहे ही चक्रधरांची स्वतःविषयीची भूमिका त्यांनी पंथीयांना स्वीकारावयास लावल्यामुळे चक्रधर आणि पंथीय यांमधील भावनिक नाते ज्ञानदेव आणि वारकरी यांच्यातील भावनिक नात्यासारखे राहणे शक्य झाले नाही.

आठनऊ वर्षांच्या भ्रमणातील सूत्ररूपभाष्य आणि आचारदीक्षा चक्रधरांच्या-बरोबरच्या पंथीयांनी आठवणीतून एकत्र आणली व त्या लीळांचे संकलनसंपादन नागदेवांच्या देखरेखीखाली म्हाइंभट्टाने केले. यावरून चक्रधरोक्ती पंथीयांच्या आठवणीतून आलेली आहे, तर ज्ञानदेवांनी अभिजात वाङ्मयनिर्मिती केली. ज्ञानदेवांनी जे जे अनुभवले, वैयक्तिक दृष्टिकोणातून बघितले, ते ते आपल्या प्रासादिक वाणीतून मांडले व त्याचा परिणामही डोळसपणे न्याहाळला. उलट, चक्रधरोक्ती आठवणीतून आल्यामुळे एक विभूतीवादी दृष्टिकोण प्रबळ ठरला. महानुभाव लेखक पंडित विद्वान असूनही त्यांनी चक्रधरांच्याच विचारांची व्यवस्था लावण्याचा, संकलन, संपादन करण्याचा आणि ते विचार अधिक नीट कळावे म्हणून सूत्रभाष्य, व्याकरणशास्त्र, टीका, टिप्पणी तयार केल्या म्हणजे त्यांची विद्वत्ता, पांडित्य अखेर चक्रधरांना शरण गेले. त्यात नवी काही भर घालणे, आत्माविष्कार करणे पंथीय दृष्टीला मान्य झाले नाही. त्यामुळे पंथाला काळाबरोबर वाटचाल करता आली नाही व सांकेतिकतेमुळे महानुभाव पंथ अधिकच बंदिस्त झाला. अल्लाउद्दिन खिलजीची स्वारी होताच महानुभावांची जी पळापळ झाली किंवा ज्या सांकेतिक लिप्या त्यांना आपले धर्मग्रंथ जपून ठेवण्यासाठी निर्माण कराव्या लागल्या, तशी अवस्था वारकरी पंथाची झालेली दिसत नाही. ' इतुकिया-वरी तुरकान आले तै सकु सोळा मन्मथ संवत्सरे : एक वेळ दिल्लीचा सुलतान चाळीला

अवघे मंडळ हालविले.[१] अशी अवस्था वारकऱ्यांची झालेली नाही. उलटपक्षी आपल्या पदरचे विविध भावानुभव वाङ्मयात घुसडून देऊन नामदेवाची गाथा, ज्ञानदेवाची अभंगगाथा फुगविल्या गेल्या ही वस्तुस्थिती वारकरी पंथ व महानुभाव पंथ यांतील वाङ्मयनिर्मितीमागील भूमिकेवर प्रकाश टाकते. चक्रधर म्हणजे महानुभावपंथ व महानुभावपंथ म्हणजे चक्रधर इतके बंदिस्त रूप पुढील काळात या पंथाला आले. चक्रधर भाष्यामुळे मराठी गद्याची पायाभरणी झाली; पण मनामनांचे हुंकार जसे प्रत्येक शतकात वारकरी पंथाच्या कवितेतून ऐकू येतात तसे महानुभाव वाङ्मयातून ऐकू येत नाहीत इतके ते निष्क्रिय झाले.

लोकमान्य टिळकांनी एके ठिकाणी म्हटले आहे की, "महाराष्ट्र देशात दहाव्या शतकाच्या सुमारास किंवा त्यापूर्वी जी काही धर्मोन्नतीकडे लोकांची प्रवृत्ती झाली तिचेच महानुभाव पंथ हे पहिले फळ आहे आणि इतर पंथांप्रमाणे जर हा पंथ आज आपल्या विशेष नजरेस पडत नसला तर त्याचे कारण या पंथाचे खरे पुढारी म्हणजे संन्याशाचे मेळे व त्यांचे महंत हे आपला धर्म प्रसृत करण्याची विशेषशी आस्था न करता, जो आपल्याकडे खुशीने येईल त्यासच दीक्षा देऊन आपापल्या मोक्षप्राप्तीच्या कामात निमग्न असतात एवढेच होय. साधुसंतांच्या वारकरीपंथापेक्षा याची योग्यता काही कमी नाही, इतकेच नव्हे तर त्यापेक्षा काही वर्षांनी तरी तो जुना असावा हे निर्विवाद होय"[२] लोकमान्यांनी महानुभावपंथाला काही वर्षांनी जुने ठरविले असले तरी शके ११८५ पूर्वी काही तो अस्तित्वात नव्हता आणि वारकरी पंथाची मूळ पूर्वपीठिका नाथपंथातून प्रगट झाली आहे. नाथपंथाचे एक विकसित रूप वारकरी पंथात दिसते. त्यामुळे त्याची पाळेमुळे परंपरेत खोलवर रुजली गेली आहेत. चक्रधरांचे गुरू आणि आजे गुरू नाथपंथी होते; इतकेच नव्हे तर बालोन्मत्त पिशाच्चवत वर्तन करणारे गुंडमराऊळ हे नाथयोग्याचे एक प्रातिनिधिक रूपच होते; आणि दुसरी एक साम्याची गोष्ट म्हणजे जैनांचे गुरू महावीर आणि गुंडमराऊळ यांचा जन्मही 'दवडणे' या पद्धतीनेच झालेला आहे. ज्ञानदेवांची गुरुपरंपरा नाथपरंपराच स्वीकारणारी दिसते.

'श्री ज्ञानेश्वर आणि महानुभाव' यांच्या संदर्भात डॉ. य. खु. देशपांडे यांनी 'शके ११९५ पूर्वी ८–९ वर्षेच जरी महानुभावपंथाचे प्रसाराचे कार्य चक्रधर स्वामींनी केले, तथापि महानुभावपंथाच्या तत्त्वांचा प्रसार व्हावयास तत्पूर्वी १००–१२५ वर्षांपासून सुरुवात झाली होती आणि महानुभावीय वाङ्मय निर्माण व्हावयास ५०–७५ वर्षांपासून प्रारंभ झाला होता.' डॉ. देशपांडे यांचे हे विधानही पारखून घ्यावे लागेल. कारण चक्रधरांनी महानुभावपंथ प्रसाराचे कार्य ८–९ वर्षे केले

---

१. स्मृतिस्थळ : ८३–८७

२. केसरी : १८९९

असले तरी त्यांच्या काळानंतर पंथाला संघटनात्मक रूप पुढील आचार्यांनी दिले आहे. तसेच या पंथाने पुरस्कृत केलेली तत्त्वे तत्पूर्वी १००–१२५ वर्षांपूर्वीपासून होती; याही विधानाचा अर्थ इतकाच की संन्यास, जीवईश्वरातील द्वैतवाद, अहिंसाधर्म पालन, जातिव्यवस्थांचे उच्चाटण, कर्मकाण्डाचा त्याग ही तत्त्वे बौद्ध, जैन आणि लिंगायत या धर्मांमधून पूर्वीच आलेली होती. बौद्ध व जैन हे वैदिक धर्माविरुद्ध प्रथम बंड पुकारणारे दोन धर्म आहेत. हिंसात्मक व कर्मकाण्डात्मक वैदिक धर्म मान्य नसल्यामुळे गौतमबुद्ध व महावीर यांनी बौद्ध व जैन धर्माची स्थापना केली. आर्यांनी दक्षिणेत वसाहत करण्यापूर्वीच्या आणि नंतरही जैनधर्माचे अनुयायी महाराष्ट्रात आले आणि गुजराथच्या उत्तरेस वस्ती करून राहू लागले. चालुक्यकाळी (इ. स. ५५०–७५३) जैनधर्माचा मांडलिक राजांवर स्वतः हिंदू असूनही प्रभाव पडलेला दिसतो. जैनपंडित साधू व कवी हेही गुजराथेत येऊन स्थायिक झाले होते. त्यांच्या विचारांचा परिणाम पिढ्यानुपिढ्या गुजराथेत असलेला दिसतो. चक्रधरांचा जन्म राजघराण्यात झाला असून, ते मूळ गुजराथी आहेत. बौद्ध, लिंगायत किंवा माध्वविचारांपेक्षा जैनधर्म विचारप्रणालीला स्वीकारणारी अशी चक्रधरांची विचारसरणी दिसते. म्हणून जैनांचा विशेष प्रभाव चक्रधरांच्या विचारांवर असलेला स्पष्ट होतो.

वारकरी पंथ व महानुभाव पंथ यातील साम्य

बहुजन समाजाच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी वारकरी व महानुभाव पंथ झटलेले होते. आत्मोद्धाराचे साधन लोकभाषेच्या साह्याने सर्वसाधारण समाजाला उपलब्ध करून देण्यात दोन्ही पंथांचे उद्दिष्ट समान होते. महानुभावांची द्वैतावर, तर वारकऱ्यांची अद्वैतावर निष्ठा असूनही ज्ञानोत्तर भक्तिसाधना हेच आत्मोद्धाराचे अंतिम साध्य दोन्ही पंथांनीं मानले. भागवत आणि भगवद्गीता ही दोन्ही पंथांच्या लोकांना निरुपणासाठी महत्त्वपूर्ण वाटली होती. मूळ धर्मग्रंथ एकच; मुक्तीच्या साधनात समानता, सत्संग गुरुसेवा, नामस्मरण, सगुणोपासना यावर दोन्ही पंथांनी भरच दिला होता. बोलीभाषेच्या संदर्भातही दोन्ही पंथांचे धोरण अधिक उत्कट होते. महानुभाव पंथाने तर मराठी भाषेला धर्मभाषेचे स्थान दिले, तर वाङ्मयातील विविध प्रकारांची सातत्याने मराठांतून निर्मिती केली होती. तरीही महानुभावपंथाविषयी कटुता का निर्माण झाली व हळूहळू तो पंथ अप्रिय का ठरला याची कारणमीमांसा अनेकांनी केली आहे ती योग्यच आहे.

ज्ञानदेव आणि महानुभाव पंथ

ज्ञानदेव आणि महानुभाव पंथ यांच्या संदर्भात विचार करता चक्रधरांनी पुरस्कृत केलेल्या महानुभाव पंथात निवृत्तीवर आत्यंतिक भर, विक्षिप्त व कठीण आचारधर्म ! 'स्वदेश, स्वबंधु, स्वग्राम त्याज्य : संबंधियाचा संबंधु तो विशेषतः त्याज्य' अशी एकांगी दृष्टी व 'चित्रीची स्त्री न पहावी' व 'निरसे विरसे अन्ने सेविजिती,' 'मसनीचे वस्त्र घेणे' असा संन्यास मार्ग व आत्यंतिक वैराग्याने आणि आत्मक्लेशाने जीवन कंठण्याचा

मार्ग सांप्रदायिकांना क्लेशदायक होणे अशक्य नव्हते. याउलट 'आता गृहादिक आघवे। ते काही नलगे त्यजावे' अशी ज्ञानदेव समज देतात. एक उदार आणि सर्वात्मक दृष्टिकोणामुळे ज्ञानदेवांनी इच्छामरण स्वीकारूनही वारकरी पंथात पोकळी निर्माण झाली, असे दिसत नाही. उलट जोपर्यंत महानुभावांच्या वाङ्मयातून चक्रधरोक्तता व्यक्त होत होती, तोपर्यंत ते काही प्रमाणात जिवंत होते; पण हळूहळू काळाबरोबर महानुभाव संघटनेचा आणि वाङ्मयाचा नाही म्हटले तरी संकोच होऊ लागला तो पंधराव्या, सोळाव्या, सतराव्या शतकापर्यंत !

तत्त्वज्ञानाची गुंतागुंत, आचारधर्मातील आत्मक्लेश, आचारधर्म हेच एक कर्मकांड, सांप्रदायिकतेचा वाढता प्रभाव आणि समाजापासून दूर जाण्याची वृत्ती यामुळे सुलभ, प्रवाही, गतिशील, जीवनसन्मुख, समन्वयवादी अशा ज्ञानदेवांच्या वारकरी पंथापुढे महानुभाव पंथ बळ धरू शकला नाही. वाङ्मयातसुद्धा यादव काळात जे महानुभाव वाङ्मयाला रूप होते ते पुढील काळात राहिले नाही, तर अधिकच सांकेतिकता त्यात आली.

'उद्धरेत् आत्मनात्माऽनम्' या भूमिकेतून चक्रधर आणि ज्ञानदेव यांनी सुरू केलेले समाजप्रबोधनाचे कार्य ज्ञानदेवांना समृद्धपणाने करता आले तर चक्रधरांच्या संदर्भात मात्र शिष्यात् शिष्ये पराजयम् अशी अवस्था झाली ती त्यांच्या व्यक्तिवादी व केवलवादी भूमिकेमुळेच ! यादवकाळात वरीलप्रमाणे दोन परस्परविरुद्ध पण अंतिम ध्येय एकच असलेल्या विचारधारा विकसित झाल्या, प्रवाही झाल्या व त्यांनी समाजालाही आपल्यापाठी नेले. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात जसे लोकमान्य टिळकही समाजाला हवे होते व आगरकरही हवे होते, त्याप्रमाणे यादवकाळात चक्रधर आणि ज्ञानदेव दोघेही हवे होते.

ज्ञानदेव आणि महानुभावपंथ यांचा विचार करता लोकोद्धाराच्या, ईश्वरभक्तीच्या आणि मोक्षमार्गाच्या वाटेवर एका समांतर निष्ठेने ज्ञानदेव व महानुभावपंथीय यांनी वाटचाल आरंभिली होती; पण त्यांचे अंतिम रूप तसे राहू शकले नाही. ज्ञानदेवांचे लोकोत्तरत्त्व स्वतःसिद्ध असून, कोणत्याही पंथाविषयी त्यांनी नाराजी व्यक्त केलेली नाही. कारण त्यांचे मन एका कलावंताचे मन होते व त्यांच्या डोळ्यापुढील मानवजात ही केवळ समकालीन किंवा केवळ भोवतालची होती असे नाही. तर 'वसुधैव कुटुम्बकम्' अशी तत्त्वचिंतकाची भूमिका ज्ञानदेवांच्या वाङ्मयातून प्रतीत होते. या संदर्भात चक्रधरांच्या तत्त्वज्ञानाला परंपरेचा आधार नाही. ज्ञानाचा एका किंवा नामाचा तुका ही परंपरा वारकरी पंथात निर्माण झाली व तत्त्वज्ञानाची जिवंत वाढ व सुसंगती आजवर टिकून राहिली. चक्रधरांना अभिप्रेत नसलेली आत्यंतिक क्लिष्टता नंतरच्या पंथीयांनी तत्त्वज्ञानाला आणि आचारधर्माला दिली. ज्या डोळसपणे आणि मानवतेच्या दृष्टिकोणातून चक्रधरांनी पंथाची स्थापना आणि आचारधर्माची संहिता निर्माण केली, त्यातील अचूकता नंतरच्या पंथीयांना लक्षात घेता आली नाही व चक्रधरांचा दृष्टिकोण पेलू शकेल असा द्रष्टा महानुभाव पंथाला

मिळाला नाही. चक्रधरांनी मराठी भाषेला धर्मभाषेचे स्थान मिळवून दिले. तिची अस्मिता जागवली. पण त्यांच्या शिष्यांनी मात्र भाषा मराठी पण विषय आणि आशयाचे अनुकरण संस्कृत परंपरेने केले. महानुभाव कवितेतील मूर्तिवर्णने लक्षात घेतली तरी ही गोष्ट स्पष्ट होईल. ज्ञानेश्वरीनंतर महानुभावांची काव्यनिर्मिती धवळ्यांचा अपवाद वगळता झाली आहे, त्यातही ज्ञानेश्वरीशी ओळख असल्याच्या कितीतरी जागा यापूर्वीच स्पष्ट केल्या आहेत. चक्रधर आणि ज्ञानदेव यांचे कार्यकर्तृत्व क्रिया प्रतिक्रियात्मक नसून अंतिम एकाच ध्येयाप्रत जाणारे हे दोन तत्त्वज्ञ होते. त्यातही ज्ञानदेव तत्त्वचिंतक कवी होते. चक्रधर विचारवंत होते. त्यांनी आपापल्या पंथांना केलेले मार्गदर्शन आणि त्यातून त्या पंथांना आलेले स्वरूप वेगळे, स्वतंत्र आहे, भिन्नमार्गी आहे.

□□□



॥ ज्ञानदेवे रचिला पाया ॥

"उत्पत्स्यते मम कोऽपि समानधर्मा : कालोह्ययं निरवधिर्विपुलाच पृथिवि" अशी जी भवभूतीने अपेक्षा आपल्या काव्यकर्तृत्वाविषयी, आपल्या वाङ्मयनिर्मितीविषयी बाळगली होती; तशी अपेक्षा स्पष्टपणे ज्ञानेश्वर स्वकर्तृत्वाच्या संदर्भात कुठेही बोलून दाखवीत नसले तरी त्याचे काव्यकर्तृत्व इतके श्रेष्ठ दर्जाचे आहे की कमलदलांकडे भृंगांनी आकृष्ट व्हावे त्याप्रमाणे गेली सातशेवर्षे ज्ञानदेव वाङ्मयाकडे अभ्यासक आकृष्ट होत आहेत. सामाजिक परिवर्तनातील ज्ञानदेवाचे ऋण किंवा 'ज्ञानेश्वरी'तील आणि 'अमृतानुभवा'तील तत्त्वज्ञानाचे मूलरूप किंवा ज्ञानेश्वरीच्या पाठचिकित्सेच्या अभ्यासाच्या विविध दिशा या संदर्भात ज्ञानदेवांच्या वाङ्मयकर्तृत्वाचे परिशीलन करीत असता "दशांगुळे उरला" असाच त्या कर्तृत्वाचा अनुभव आपल्या सारख्या रसिकांना येतो.

कविश्रेष्ठ ज्ञानदेव आणि त्यांचा काळ म्हणजे तेरावे शतक यांचा परस्पर संबंध लक्षात घेताना ज्ञानदेवाचे संघर्षमय जीवन जगणारे शारीर अस्तित्व अभिप्रेत नसून त्यांच्या वाङ्मयनिर्मितीच्या संदर्भात विचार करणे अपेक्षित आहे. ज्ञानदेवांचे 'अभंगवाङ्मय', 'चांगदेव पासष्टी', 'ज्ञानेश्वरी' आणि 'अमृतानुभव' या वाङ्मयनिर्मितीचा, काळाशी असलेला दृढ संबंध आणि संदर्भ लक्षात घ्यावा लागेल. ज्ञानदेव वाङ्मयाच्या साह्याने ज्ञानदेवांचा कालखंड आणि त्यांचे वाङ्मय यांचा अन्वयार्थ लावता येईल.

आजची ज्ञानेश्वर आणि ज्ञानेश्वरी समीक्षा

यादवकालीन वाङ्मय व्यवहारात परामर्शप्रवणता आणि तत्त्वजिज्ञासा यांच्या साहचर्याने आत्मज्ञान आणि आत्मरूप न्याहाळण्याचा प्रयत्न संतकवींनी केलेला आहे. कारण संपूर्ण जीवनव्यवहार हाच धर्मप्रभावाने झाकलेला असल्यामुळे जीवनध्येय आत्मज्ञानाच्या रूपात स्वीकारून सर्व यादवकालीन कवींनी आपली एका अर्थाने असलेली 'मोक्ष कविता' लिहिली होती. धर्मपंथाच्या अस्तित्वावर कवितेचा विकास झाल्यामुळे तत्त्वज्ञान आणि आचारधर्म यांना कधी प्रवृत्तीचा तर कधी निवृत्तीचा मार्ग आणि नामसंकीर्तनाचे पाठबळ यांच्या साह्यानेच वाङ्मयाला स्थान मिळाले होते. ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरी लिहून 'ग्रंथसिद्धीचा सोहोळा' आर्त भक्तजनासाठी मांडला व जीवितसाफल्याची परिसीमा भक्तजनांना अनुभविता आली. धर्मभावनेचा समाज जीवनावरील खोलवर संस्कार निर्माण करण्यासाठी आणि त्याच प्रेरणेने यादवकालीन मराठी वाङ्मयनिर्मिती झालेली असली तरी तेच एकमेव तिचे उद्दिष्ट असलेले दिसत नाही. इतर अनेक उद्दिष्टांबरोबर हे एक उद्दिष्ट मराठी कवींनी स्वीकारले, म्हणून ज्ञानदेवांची 'धर्म'विषयक संकल्पना फार वेगळी आहे असे दिसून येईल.

ज्ञानेश्वरीतून तेराव्या शतकाच्या अमूक प्रकारच्या जीवनमानाचे, अमूक पद्धतीच्या आक्रमणाला तोंड देण्यासाठी आणि अमूक पद्धतीच्या धर्मजागृतीचे दर्शन घडते. अशी

काही अपवादात्मक मते रूढ झालेली आपल्या परिचयाची आहेत. त्यांचा यापूर्वी परामर्श घेतला आहेच. इतकेच नव्हे, तर ज्ञानदेव पूर्वकाळापासून लीळाचरित्रासारखे श्रेष्ठदर्जाचे चरित्र, आत्मचरित्रात्मक ललितगद्य मराठी वाङ्मयाला बहाल करणाऱ्या चक्रधरांच्या महानुभाव संप्रदायाला विरोध करण्यासाठी ज्ञानेश्वरांनी वाङ्मयनिर्मिती केली व तिच्यातून भागवत-संप्रदायाचा पुरस्कार केला अशीही साक्षात् ज्ञानदेवांनाच वेदनामय वाटावी अशी समीक्षा केली गेली, ती आपण बघितली आहेच ज्ञानदेवांना एक तर निरूपणकार ठरविले गेले किंवा प्रवृत्तिमार्गाने निवृत्ति मार्गाकडे नेणारा संतश्रेष्ठ म्हणूनही त्यांना गौरविले गेले. गीतेचे भाष्यकार किंवा समकालीन स्थितिगतीचा आलेख काढण्यासाठी ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीची निर्मिती केली अशीही एक विचारधारा आजपर्यंत प्रभावी ठरली होती.

तत्त्वचिंतककवी : ज्ञानेश्वर

आजवरच्या ज्ञानदेवांच्या काव्यकर्तृत्वाकडे विशेषत: कवीची भूमिका बाजूला ठेऊन, इतर भूमिकांकडेच अधिक लक्ष केंद्रित केलेले दिसते. डॉ. वाळिंबे व प्रा. घोंड यांनी ज्ञानदेवांना कवी म्हणून न्याहळण्याचा प्रयत्न विशेष मूलगामी स्वरूपात केला तसा प्रयत्न अजूनही 'ज्ञानेश्वर नवदर्शन' १९७७ आणि प्राज्ञ पाठशाळेच्या 'ज्ञानदेवचिंतन' व 'ज्ञानदेव-विशेषांक' यांचा अपवाद वगळता विशेष प्रभावीपणे झाला आहे असे दिसत नाही. ज्ञानेश्वरीतील विचारगर्भ आशय, अध्यात्म, प्रस्तावना आणि कवीने आत्मविष्कारासाठी घेतलेले स्वातंत्र्य या तीनच बाबी जरी कविभूमिकेच्या संदर्भात विचारात घेतल्या तरी केवळ संतश्रेष्ठ, किंवा केवळ समाजसुधारक किंवा केवळ भागवतधर्माच्या मंदिराचा पाया घालणारा एक लोकशिक्षक इतकी मर्यादित भूमिका ज्ञानेश्वरीच्या निर्मितीमागे असेल ही गोष्ट अशक्य आहे. ज्ञानदेवांच्या निर्मितिप्रेरणांच्या संदर्भात विचार करताना महानुभाव कवी नरेंद्राप्रमाणे जरी विशुद्ध वाङ्मयनिर्मितीप्रेरणा कवितेमागे नसली तरीही तिचा प्रभावी आविष्कार आज 'ज्ञानेश्वरी'च्या रूपाने उपस्थित आहे. ज्ञानदेवांना केवळ तत्त्वज्ञानाचे अंतिम रूप ज्ञानेश्वरीतून न्याहाळावयाचे असते तर त्यांनी अमृतानुभवाची निर्मिती केलीच असती असे नाही म्हणून अभंगवाङ्मयातून ज्ञानदेवांनी जशी आपल्या उत्कट भावस्थितीला गोचर केले, तत्त्वज्ञान निखळपणे 'अमृतानुभवांत' व्यक्त केले तर ज्ञानेश्वरीतून तत्त्वज्ञानान्वित काव्यनिर्मिती केलेली आहे म्हणून ज्ञानदेवांना 'तत्वचिंतक कवी' म्हणून लक्षात घेणे अगत्याचे ठरणार आहे. एका वाङ्मयीन भूमिकेवरून या ठिकाणी विचार केला आहे. सांस्कृतिक दृष्ट्या, सामाजिक दृष्ट्या किंवा धार्मिक आणि राजकीय दृष्ट्या, प्रत्येकच माणसाचा जीवनधागा त्या परिस्थितीशी जोडलेला असतो तसा तो असणे अपरिहार्यच नाही काय? कारण समाजाचा एक घटक म्हणून व समाजातील स्थिती गतीचा एक मूलाधार म्हणून व्यक्तीच्या अस्तित्वाला आपण महत्त्व देत असतो.

ज्ञानेश्वरीतून तेराव्या शतकाच्या जीवनमानाचे आणि धर्मजागृतीचे दर्शन घडतही असेल, नाही असे नाही. पण केवळ ते दाखविण्यासाठी ज्ञानेश्वरीची निर्मिती झाली का?

कवी आणि त्याची कविता यांच्या आकलनात काळाच्या साद-पडसादाचे महत्त्व निश्चितच आहे, पण या साद-पडसादांना किती महत्त्व द्यावयाचे ? हा ही एक प्रश्नच आहे. कारण आजपर्यंत ज्ञानेश्वरीचा अभ्यास स्थितीगतीच्या संदर्भातच होत आला. अर्थात् अशा वेळी त्या अभ्यासात कवी ज्या विशिष्ट काळाचा, संस्कृतीचा एक अविभाज्य घटक असतो व म्हणून त्याच्या कवितेतून राजकीय, सामाजिक, धार्मिक असे विचारप्रवाह अनस्यूत असतात. त्यातून त्याच्या काळाची प्रचिती घडविणे हा महत्त्वाचा उद्देश, दडलेला असतो. कवी आणि त्याचा काळ यांचे नाते कोणत्या स्वरूपाचे आहे ? व त्याला कितपत महत्त्व द्यावयाचे हा खरा प्रश्न एकनाथ, मुक्तेश्वर, सामराज, विठ्ठलादी कवींच्या कवितेतून ज्यावेळी स्वकालाची बहिर्मुख स्वरूपात प्रचिती येते, त्यावेळी त्यांच्या कवितेची अस्सलता ही उणीच होते. समाजमनाची स्पंदने आणि समकाळाची जाण ही कवितेतून आपोआपच साक्षात होत असते. श्रेष्ठ कवीला तीसाठी प्रयत्नशील असावे लागत नाही. श्रेष्ठ कवी आपल्या कवितेतून आत्माविष्कार करण्याचा प्रयत्न करीत असतो. अशा वेळी सामाजिक जाणिवेचा रंग त्याच्या भावानुभवाला माखून निघाला याचा अर्थ त्यासाठीच काव्यनिर्मिती झालेली असते का ? कवीच्या काळाचे आणि कवीच्या काव्य-निर्मितीचे संबंध कोणत्या स्वरूपाचे असतात ? परस्परांचा परस्परांवर जो प्रभाव पडतो तो कसा असतो ? आणि काळामुळे कवीला संबोधिले जाते की, एखाद्या कवीमुळे काल खंड स्मरणीय ठरतो ? या साऱ्याच प्रश्नांची उत्तरे ज्ञानेश्वर आणि तेरावे शतक यांच्या संदर्भात तपासून बघणे आवश्यक आहे.

ज्ञानेश्वरांची धर्म-संकल्पना

ज्ञानेश्वरीही धर्मभावनेचा विचार करते, पण ज्ञानदेवांची 'धर्म' या संकल्पनेबद्दल एक विशिष्ट समज होती त्यामुळे आपोआपच समकालीन वाङ्मय व्यवहारात ज्ञानदेवांची धर्मकल्पना वेगळी ठरली. एक उदार आणि वैचारिक रूप ज्ञानेश्वरांनी धर्मकल्पनेला दिलेले दिसते. केवळ हिंदुधर्म इतक्या मर्यादित अर्थाने ज्ञानेश्वर धर्माकडे बघत असलेले दिसत नाहीत, तर धर्म आणि मानवी जीवनव्यवहार यांचा संबंध शोधण्याचा प्रयत्न ज्ञानदेव करीत असलेले दिसतात. ज्ञानेश्वरीत आलेला धर्मविचार उत्स्फूर्त आणि स्वतंत्र आहे. कारण 'धर्म' संकल्पनेच्या संदर्भातील ज्ञानेश्वरांची जाण ही मानवी जीवनाशी एकरूप झालेली होती. माणसाच्या मनोविकासाचे स्वप्न ज्ञानेश्वरांनी आपल्या धर्म-विचारानीं साकार केलेले आहे. कोणत्याही कालखंडात समाजमन हे नेहमीच स्थितिशील असलेले दिसते. पुरोगामी विचार त्याच्या पचनी पडण्यास फार वेळ जावा लागत असतो. परंपरेने दृढमूल केलेला आचारधर्म आणि विचारधर्म एकदम सोडवून टाकणे त्याला अशक्य झालेले असते. अशा वेळी त्याच्या परंपराभिमानाला किंचित सैल करून नवाविचारदर्शन व पुरोगामीत्व पृथगात्मरीतीने व्यक्त करणे आवश्यक असते. यादव-कालीन कवितेत दोन्ही प्रवृत्ती अतिशय प्रबळ झालेल्या आपल्याला स्पष्ट जाणवतात. एक

प्रवृत्ती म्हणजे परंपरेला स्वमान्य स्वरूपात स्वीकारून पृथक्‌विचार मांडावयाचे व दुसरी प्रवृत्ती म्हणजे संस्कृत महाकाव्य आणि भाष्यकाव्य यांना स्वीकारीत बोलीभाषांतून काव्य-निर्मिती करावयाची. महानुभाव कवींनी यादवकाळात विशेषतः संस्कृतमहाकाव्याचे अनुसरण केले; पण भास्कराचा 'शिशुपाल वध' वगळता संस्कृत-महाकाव्यात शृंगाराचे असलेले अधिक्य न स्वीकारता एक सत्वशील आणि संयमशील भक्तिमूल भूमिका नरेन्द्र, दामोदर नारायणव्यास, खळोव्यास यांनी स्वीकारली होती. समाजमनाच्या मनोविकासासाठी आणि अभिरुचीला वळण लावण्यासाठी प्रामुख्याने असे झाले असावे, संस्कृत महाकाव्यांना स्वीकारले गेले तरी त्यांचा विलक्षण अन्वयार्थ स्वकालोचित समाजाच्या मनोविकासासाठी नरेंद्र, दामोदर पंडिताने लावलेला दिसतो. या संदर्भात ज्ञानदेवांनी सांस्कृतिक आणि धार्मिक एकात्मतेच्या जाणिवेतून मराठी भाषेची पृथगात्मता आकारास आणली. ती केवळ संस्कृत भाषेला विरोध करण्यासाठी म्हणून नव्हे, तर जनसामान्यांपर्यंत आपले विचार पोहचविता यावे या हेतूने मराठी भाषेचा स्वीकार ज्ञानदेवांनी केला. समाजातील सर्व स्तरांपर्यंत आपले विचार व्यवहारात यावे म्हणून 'धर्म' विषयक ज्ञानदेवाचे चिंतन अधिक एकपिंड झाले आहे. सांस्कृतिक आणि धार्मिक एकात्मतेच्या जाणिवेतून ज्ञानेश्वरांनी जीवनाच्या गुंतागुंतीची, जीवनव्यवहाराची आणि धर्माची सुसंगत प्रतीती ज्ञानेश्वरीतून घडविली. एका दिव्य तेजाने आणि मानव्याच्या सखोल अन्तर्दृष्टीने ज्ञानेश्वरांनी धर्मविषयक विचार प्रस्तुत केला. केवळ परंपरेने दिलेला धर्मविचार, भगवद्‌गीता निरूपणासाठी स्वीकारली असताही ज्ञानेश्वरांनी न घेता त्या विचारांची जडणघडण अधिक मानवतावादी आणि पुरोगामीदृष्टीने ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीत मांडलेली आहे. 'ज्ञान आणि 'कर्म' यांना विशिष्ट पद्धतीने ज्ञानदेवांनी स्वीकारून त्याला भक्तीचे दिलेले अधिष्ठान अपूर्व आहे. जीव, जगत आणि जगदीश्वर यांचा परस्परपूरक आणि परस्परावलंबी अर्थ लावण्यात ज्ञानदेव आपल्या संपूर्ण वाङ्मयनिर्मितीत समर्थ ठरले.

ज्ञानदेवांच्या कल्पनाशक्तीचा मुक्तसंचार जीवनसापेक्ष प्रतिमांमधून शब्दरूप घेतो. 'गोविंदप्रभुचरित्र' किंवा 'लीळा चरित्र' यांना ज्या संदर्भात सामाजिकता प्राप्त होते तशी सामाजिकता ज्ञानेश्वरीतून गोचर होते का? आणि जरी काही प्रमाणात ती गोचर झाली असली तरी लीळाचरित्र आणि गोविंदप्रभुचरित्र यांना जसे महत्त्व प्राप्त होते तसे ज्ञानेश्वरीतील सामाजिकतेला महत्त्व देण्याचे प्रयोजन उरत नाही. उलट पक्षी ज्ञानदेव स्वकाळावरोबर फार क्वचित चालत असताना दिसतात, असे ज्ञानेश्वरीतून जाणवते कारण केवळ नैमित्तिकता ज्ञानदेवांच्या तत्त्वचिंतनाला येत नाही. मानवतेची आणि विश्वकल्याणाची आस या कविमनाला लागलेली ओवी ओवी मधून प्रत्ययाला येत असते.

तेयां अक्षरां आंतूला भाओ: पावविन मी तुमच्या ठाओ
आइकां म्हणे ज्ञानदेवो : निवृत्तीचा ॥ १४ : ४११ ॥

अक्षरांच्या आतला भाव गोचर करण्याचा हळुवार यत्न ज्ञानेश्वरांची जी भूमिका आहे;

तिच्याविषयी बरेच काही सांगून जातो. मनामनांचे खंडन मंडनात्मक रूप 'आडवाट' (ज्ञा. १३ : १५) म्हणून ज्ञानेश्वरांना दिसते. स्वतःच्या काळात जर ज्ञानेश्वर थांबले आहेत असे क्षणभर मानले तरी महानुभावांच्या संदर्भात किंवा इतर पंथांच्या संदर्भात ज्ञानेश्वर उदासीन राहतात. आणि विश्वरूप परमेश्वराजवळ ज्ञानेश्वरांनी जे पसायदान मागितले त्याचा अन्वयार्थ लक्षात घ्यावा लागतो. ज्ञानेश्वरांना विश्वरूपात परमेश्वर भासतो, पण नामरूपात्मक विश्व म्हणजे परमात्मा नव्हे असेही ते म्हणतात. मानवी जीवनाकडे ज्ञानेश्वरांनी केवळ व्यक्तीच्या किंवा कुटुंबाच्या किंवा केवळ समाजाच्या दृष्टीने बघितले नाही तर समष्टीच्या दृष्टीने ते विचार करतात.

गीता जाण हे वाङ्मयमूर्ती : श्रीप्रभूची

ज्ञानेश्वरांनी प्रस्थानत्रयी पैकी एक असलेली गीता आपल्या निरुपणासाठी निवडली. ज्ञानेश्वरांना जर कालानुवर्ती रचना करावयाची असती, तर भागवत पुराणांचा विचार इतर कवींनी केला तसा ज्ञानेश्वरांना करता आला असता. पण ज्ञानेश्वरांनी गीतेतील मानवतावाद आणि मानव्याची महती लक्षात घेतली कृष्णार्जुन संवादातून गोचर होणारे सार्वत्रिक मानवी जीवनाचे रहस्य आणि मानवी मनाच्या तळाचा शोध घेऊन त्यातून जीवनविषयक तत्त्वज्ञान एका विशिष्ट पद्धतीने स्वीकारण्याचा प्रयत्न ज्ञानेश्वरांनी केला. गीतास्तुती म्हणूनच ज्ञानेश्वर करतात. वेद, उपनिषदे यातील ब्रह्मविद्येचे सार गीतेत आहे आणि अर्जुनाच्या निमित्ताने गीतेतून जगाचा उद्धार अपेक्षिता येतो. अशी गीतेविषयीची ज्ञानेश्वरांची भूमिका होती. 'गीता जाण हे वाङ्मयमूर्ती : श्रीप्रभूची' ज्ञानेश्वरांनी गीतेला इतके महत्त्व दिले कारण ज्ञानेश्वरांना स्थलकाल निरपेक्ष चिरंतन टिकून राहील, असा ज्ञानयुक्त आणि कर्मयुक्त भक्तिमार्ग गीतेत दिसला होता. काळाची गरज म्हणून जर ज्ञानेश्वरीची निर्मिती झाली असती तर इस्लामी आणि इंग्रजी आक्रमणानंतर आज सातशे वर्षे तिची जी कसून परीक्षा होत आहे ती होती ना व श्रेष्ठ वाङ्मयाच्या काळमूल्याला ती उतरती ना। गीतेतील मानवतावाद ज्ञानेश्वरांना आपल्या विचारानुभवाला प्रगट करण्यासाठी सर्वस्वी अनुकूल वाटलेला आहे. किंबहुना वैचारिकदृष्ट्या गीताकार आणि ज्ञानेश्वरीकार हे एका समान पातळीवर या ठिकाणी येऊ पाहतात. कारण ज्ञानेश्वर विश्वात्मक अनुभूतींना गोचर करू बघतात. विश्वसंकल्पना म्हणूनच त्यांच्या समग्र वाङ्मयात पुनः पुनः येते.

ज्ञानेश्वरांच्या कवितेतून पाझरणारी जिवंत जाणती धर्मनिष्ठा, कर्मनिष्ठा आणि भक्तिनिष्ठा ही केवळ यादव काळातून जन्माला आली असे म्हणता येणार नाही. कोणत्याही कलावंताचे श्रेष्ठत्व हे काळाच्या आणि परिस्थितीच्या विशिष्टतेवरून ठरविता येणे शक्य नसते. किंबहुना काळाच्या परिस्थितीच्या चौकटीत श्रेष्ठ दर्जाचे वाङ्मय बसू शकत नाही. देश काळ, परिस्थिती यांची बंधने झुगारून देऊन अशा प्रकारचे वाङ्मय चिरंजीव ठरत असते. ज्ञानेश्वरवाङ्मय असे आहे. भाषेचे अमोघ सामर्थ्य आणि विचारानुभवाची

प्रवरता यांच्या साह्याने ज्ञानेश्वरांच्या कल्पनाशक्तीचे रूप न्याहाळता येणे शक्य होईल. यादवकाळाच्या संदर्भात ज्ञानेश्वरीला आपण समजाऊन घेऊ लागलो तर तो एक ऐतिहासिक मूल्यमापनाचा प्रकार म्हणून फार तर विचारात घेता येईल.

ज्ञानेश्वरीचा मराठी कवितेतील प्रभाव

सर्वच प्राचीन मराठी कवितेला ज्ञानेश्वर वाङ्मयाने मार्गदर्शन केले. भावनात्मक, विचारात्मक आणि अद्वैतानुभूतीच्या अभिव्यक्तीच्या संदर्भात सर्व प्राचीन मराठी कवी ज्ञानेश्वरांना आदर्श मानीत आलेत. नामदेव व नामदेव समकालीन संतमंडळ एकनाथ व एकनाथ समकालीन मराठी कवी आणि तुकाराम-निळोबापर्यंतचे सर्व कवी ज्ञानेश्वरांना आणि ज्ञानेश्वरीला माऊलीच्या रूपात न्याहाळत होते. पुढच्या काळातील कवींना तत्त्व-ज्ञानाचा आचारधर्माचा आणि भक्तीमार्गाचा आदर्श ज्ञानेश्वरांनी आपल्या चरित्राने आणि वाङ्मयीन कर्तृत्वाने निश्चित करून दिला. ज्ञानेश्वरीचा फार मोठा प्रभाव केवळ वाङ्मयीन दृष्ट्याच नव्हे तर आचारधर्माच्या संदर्भात आणि नैतिक मूल्यांच्या संदर्भात समाजमनावर झालेला स्पष्टपणे आजही जाणवतो. आधुनिक मराठी कवींवरही आशय आणि अभिव्यक्तीच्या संदर्भातील परिणाम स्पष्ट करून सांगण्याची गरज नाही विश्वपातळीवर विचारानुभव प्रगट करण्याच्या संदर्भात ज्ञानेश्वरांची बरोबरी करू शकेल असा एकही मराठी कवी नंतरच्या काळात निर्माण झाला नाही. या अर्थाने मराठी कवितेला ज्ञानेश्वरांची कविता उपजीव्य ठरली आणि उपकारक ठरली; पण ज्ञानेश्वरांच्या विचारा-नुभवाला ताकदीने पेलणारा असा एकही कवी निर्माण न झाल्याने ज्ञानेश्वर व ज्ञानेश्वरी यांचे स्थान एकमेवाद्वितीय राहिले. लोकमानसाशी एकरूप होण्याचा प्रयत्न करणारी आणि चिरंतनाचा ध्यास बाळगणारी अशी अनुभूती पुढीलांच्या कवितेतून व्यक्त होत गेली. अर्थात भगवद्गीतेच्या वाटेकडे फार कमी मराठी कवी वळलेले दिसतात. अन्यथा सारी मराठी कविता ही भागवत पुराणांवर प्रामुख्याने पोसली गेली आहे.

तैसें गीतेचे हे दुभते : वत्स करुनि पार्थाते
दुभिन्नली जगापुरते : श्रीकृष्णगाद ॥ ज्ञा : १८ : १६६७ ॥
कां जे श्रवणे-पाठे-अर्थे : गीता नेदी मोक्षा आरौतें
स्थूळ दाता किं : कोण्हातें नास्ति न म्हणे ॥ ज्ञा. : १८ : १६७८ ॥
शब्दे जे नलभे : ते घडुनिया अनुष्टुभे
स्त्री शूद्रादि प्रतिथे : सामाविले ॥ ज्ञा. १८ : १७०० ॥

स्त्रीशूद्रादी सर्वांना सामावण्याची भाषा मानवतेच्या आणि भूतमात्रांच्या उज्ज्वल भविष्यासाठीच ज्ञानेश्वर वापरीत नाहीत काय? जर चक्रधरांच्या द्वैत तत्त्वज्ञानाला प्रतिरोध करण्यासाठी किंवा समकालीन इस्लामविरोधी स्वधर्म जागृतीसाठी ज्ञानेश्वरीत प्रयत्न होतो असे घटकाभर खरे मानले, तर कर्म, ज्ञान, भक्ती, सदाचार व नीती या विशिष्ट संकल्पनांचा उद्घोष करण्याची गरज ज्ञानेश्वरांना वाटती ना, पण ज्ञानेश्वरीची निर्मिती

ही काळानुरूप व काळासाठी झाली आहे असे गृहीतकृत्य निश्चित केल्यावर ज्ञानेश्वरांच्या भूतमात्रांवरील प्रेमाची व वात्सल्याची पारख कशी व्हावी हाही एक प्रश्नच आहे. ज्ञान भक्तियुक्त कर्मयोगाची सुलभ शिकवण देण्याचा प्रयत्न संपूर्ण ज्ञानेश्वरीत झाला आहे. 'मग आर्ताचेनि वोरसें : गीतार्थ ग्रंथनमिसें वर्षला शांतरसे : तो हा ग्रंथु ॥ असे ज्ञानेश्वरांनी स्पष्टच म्हणून ठेवले आहे.

ज्ञानेश्वरीतून व्यक्त झालेली आचारसंहितेची मूल्ये

ज्ञानी भक्ताचा स्वधर्माधिष्ठित कर्मयोग व त्यातून स्फुरलेली नीतीची व सदाचाराची शिकवण देताना ज्ञानेश्वरांनी अमानित्व, अंदभित्व, शांती, आर्जव, स्थैर्य, आत्मनिग्रह, अनहंकार, अनासक्ती, समचित्तता या मूल्यांचा पुरस्कार केलेला आहे. वस्तुतः, यादवकाळातच फक्त ही मूल्ये शिकवण्याची गरज होती असे नाही, तर ही माणसाला माणूस म्हणून जगण्यास उपयुक्त ठरणारी आचारसंहितेची मूल्ये ज्ञानेश्वर सांगतात. सत्य व शिव यांचा ज्ञानेश्वरांनी चालवलेल्या शोधालाच उपकारक ठरणारी अशी ही सर्व जीवनमूल्ये आहेत, मानवी मूल्ये आहेत. अभय, सत्वसंशुद्धी, दान, दम, यज्ञ, स्वाध्याय, तप, आर्जव, भूतदया ही जीवनमूल्ये एका विशिष्ट वर्गासाठी किंवा एका विशिष्ट परिस्थितीसाठी किंवा एका विशिष्ट काळासाठी नसून, द्रष्ट्या कवीची ती मनुष्यत्वाच्या आदर्शांची मनोमनीची खुणगाठ आहे. ज्ञानेश्वर हे खऱ्या अर्थाने द्रष्टे व स्वयंभू कवी ठरतात. त्यांनी दाखविलेला लोककल्याणाचा व भक्तीचा मार्ग हा केवळ सार्वत्रिक व सर्वांगीण स्वरुपाचा आहे. देशाची, काळाची किंवा परिस्थितीची बंधने ज्ञानेश्वरांच्या विचारानुभवाला पडत नाहीत म्हणूनच त्या विचारानुभवाचे जिवंतपण प्रत्येक ओवीतून मूर्त होते.

दासबोधात मूर्ख लक्षणे सांगत असता रामदास रंगून गेलेले दिसतात. तर श्रेष्ठ भक्ताची लक्षणे सांगतांना विस्तार होत नाही तर ती संक्षेपाने सांगितली जातात. ज्ञानेश्वरांनी असुरी संपत्ती व दैवी संपत्ती यांची केलेली विभागणी व माणसाच्या ठिकाणचे हीण नाहीसे करणे व ज्ञानमार्गाने व भक्तिमार्गाने सत्वसंशुद्धी मिळविणे यासाठी दैवी संपत्तीचे विस्तारपूर्ण विवरण ज्ञानेश्वर करतात व एक आदर्शपूर्ण प्रतिमा, स्वतःला भावलेली, गोचर करतात. भक्तीची तळमळ आणि ईश्वरभेटीची उत्कटता यांच्या पलीकडे जाऊन तीतील वैचारिक बाजू ज्ञानेश्वर हळूवारपणे उलगडून दाखवतात. व त्यातच ज्ञानेश्वरांच्या जीवनविषयक जाणिवा आणि त्यांचा कला दृष्ट्या झालेल्या आविष्काराची प्रतीती येते.

यादवकाळात अंतिम सत्याचा, निरपेक्ष सत्याचा शोध पुराणग्रंथातून आणि दार्शनिकांच्या तत्त्वप्रधान भाष्यातून घेण्याचा प्रयत्न सतत होत होता. पण हा शोध मानवी द्वंद्वातून, मानवी जीवनातून लक्षात घेण्याचा प्रयत्न त्या काळात प्रथमतः एकटे ज्ञानेश्वर करीत असलेले दिसतात. श्रीकृष्ण व अर्जुन यांच्या गीतेतील सुखसंवादात आणि सहज संवादात आपल्याला निवृत्तिनाथ आणि ज्ञानेश्वर यांच्या सुखसंवादाची, सहज संवादाची

प्रतीती येते. ही प्रतीती सर्वार्थाने नावीन्याची आहे कारण केवळ अद्वैत तत्त्वज्ञानाचे सुलभीकरण करण्यासाठी गीतेचा अनुवाद ज्ञानेश्वरानी केलेला नसून ज्ञानेश्वरीत एका कविमनाचा आत्माविष्कारही आपल्याला जाणवतो. व अशा कवीचे बहुकेंद्री व्यक्तिमत्व व अनुभवाची बहुकेंद्रितता प्रत्ययाला येते. ज्ञान आणि कर्म याच्या वाटेने जाऊन आत्म-निरपेक्ष आहे तो कर्म विकर्म आणि अकर्म यांच्यासह निर्ममवृत्तीने न्याहाळला तर ब्रह्माचे निर्गुण स्वरूप लक्षात येईल. असे ज्ञानेश्वर अव्यक्तोपासनेत हटयोगाच्याद्वारे प्रतिपादन करतात. (१२ अध्याय.) 'मी' चे रूप लक्षात येताच ईश्वर आणि 'मी' किंवा 'अहम्' यांतील अद्वैत संपून ईश्वराचे 'ज्ञान' होईल अद्वैत तत्त्वज्ञानाला भक्तीच्या आणि ज्ञानमार्गाच्या साह्याने एक निखळ स्वरुप देण्यात ज्ञानेश्वर यशस्वी ठरले व आत्मो-द्धार आणि समाजोद्धार अशा दुहेरी पद्धतीने त्यांनी यादव काळात समाजप्रबोधन तर्शा भूमिका नसतांनाही घडवून आणले. आपला सर्व वैचारिक दृष्टिकोणच ज्ञानेश्वरांनी लोका-भिमुख केला व म्हणूनच वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान हे ज्ञानेश्वरीतून स्वीकारले गेले.

ज्ञानेश्वरांचे श्रेष्ठत्व

स्वतःच्या निर्मितीची प्रतिष्ठा मानव कल्याणातील समानतेची भूमिका याविषयी ज्ञानेश्वरांच्या ठिकाणी आत्मप्रौढीची व अभिमानाची जाणीव असलेली दिसते. जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत काहीतरी मूलभूत नवीन पण उपकारक असे करून दाखविण्यातील आत्म-विश्वास ज्ञानेश्वरीतून व्यक्त होतो कारण ज्ञानेश्वरीतून प्रगट झाले ते 'अनुभवाचे बोल'

महानुभाव कवींनी संस्कृतीचा, धर्माचा आणि भाषेचा अभिमान व्यक्त केला; पण ज्ञानेश्वरांनी ज्या कोवळेपणाने व हळूवारपणाने आणि हृद्य अशा मार्दवाने केला तसा कोरडेपणाचा स्पर्श होऊ न देता करणे कोणत्याही यादवकालीन कवीला जमले नाही.

प्रखर आत्मप्रचीतीच्या तेजाने उजळलेली कविता ज्ञानेश्वरांनी निर्माण केली. एक धगधगते विचारदर्शन आणि व्यामिश्र संवेदनांचे विश्व उभे करण्यात ज्ञानेश्वर सफल झाले 'बडा बंडवाल्यात ज्ञानेश्वर नामे पहिला' असे कवी 'बी' म्हणतात त्याचा संदर्भ हाच असतो. मराठी भाषेचा, धर्माचा, संस्कृतीचा आणि अस्मितेचा लोकाभिमुख पद्धतीने अपूर्वपणे आणि डोळसपणे विचार करणाऱ्या ज्ञानेश्वरांनी मराठी कवितेचे आदिपीठ निर्माण केले. ज्ञानेश्वर एके ठिकाणी म्हणतात :

हृदया हृदय एक झाले : ये हृदयीचे ते हृदयी घातले
द्वैत न मोडता केले : आपणा ऐसे अर्जुना ॥ १८ : १४२१ ॥

ज्ञानेश्वर आणि तेरावे शतक यांचा परस्पर संबंध वरील ओवीप्रमाणे आहे. हृदय हृदय एक होणे व ये हृदयीचे ते हृदयी घालण्याप्रमाणे ज्ञानेश्वर म्हणजे तेरावे शतक व तेरावे शतक म्हणजे ज्ञानेश्वर । आत्मबुद्धीने व आत्मतेजाच्या प्रखर प्रकाशात भगवंताशी संवाद साधणे ही ज्ञानेश्वरांची आकांक्षा ज्ञानेश्वरीत पूर्ण झाली व त्यांनी मराठी साहित्याला, भाषेला, वारकरी पंथाला आणि तेराव्या शतकाला चिरंतर ऋणी करून ठेवले आहे.

ज्ञानेश्वरांचे भक्तिरहस्य

ज्ञानेश्वरांसारख्या सिद्धसंताने जी लोकोत्तर आणि मराठी वाङ्मयाला श्रीमंत करणारी काव्यनिर्मिती केली तिच्यामुळे महाराष्ट्रीय समाज अनंतकाळपर्यंत त्यांचा ऋणी राहील. जगावेगळा जीवनभोग वाट्याला येऊनही ज्ञानेश्वरांनी ज्या ममतेने आणि कळवळ्याने प्रेमाची पाखर संपूर्ण जीवसृष्टीवर घातली तिला जगाच्या इतिहासात तोड नाही. विश्व मोहरे लावण्यासाठी आणि जे जे भेटे भूत ते ते मानी भगवंत या वस्तुपाठातून ज्ञानदेवांनी विश्वात्मक अनुभूतीलाच साक्षात करण्याचा प्रयत्न केला म्हणूनच भूत वर्तमान आणि भविष्याच्याही पुढे आणि सर्व दिशांची बंधने या अनुभूतीच्या अभिव्यक्तीला निर्माण होऊ शकली नाहीत. अरूपाला रूपवंत, साजिवंत करण्यासाठी, जीवनातील कुरुपतेच्या पलीकडे मानवाला घेऊन जाण्यासाठी आणि जीवनातील सत्यशिवसौंदर्य तत्त्वांना सामोरे जाऊन सर्वांभूती भगवंत या निष्कर्षापर्यंत वाङ्मयाच्या आधाराने ज्ञानेश्वरांनी आत्मप्रवास आरंभिला. भावर्थ-दीपिका, अनुभवामृत, चांगदेवपासष्टी, हरिपाठाचे अभंग आणि अभंगगाथा इतक्या वाङ्मयनिर्मितीच्या साह्याने आपल्या आत्मप्रवासाची सांगता केली आणि संजीवन समाधीच्या साह्याने पंचत्वात विरून गेले. ज्ञानदेव की ज्ञानेश्वर, कुळकर्णी की म्हैसे, देशीकार लेणे की ज्ञानेश्वरी, अनुभवामृत की अमृतानुभव अशी ज्ञानदेवांच्य नावापासून निर्मितीपर्यंत जी गेली सातशे वर्षे चर्चा घडत आहे त्यातूनच ज्ञानदेवांच्या व्यक्तिमत्वाची आणि वाङ्मयाची महाराष्ट्रीय जीवनातील अनन्यता तीळमात्र उणावलेली दिसत नाही ही गोष्ट स्पष्ट होते. एखाद्या साक्षात्कारी संतमनाच्या साहित्यिकावर समाजाने इतके अलोट प्रेम करावे आणि आपल्या जीवनाचा एक अविभाज्य भाग म्हणून त्याच्या शिकवणुकीला स्वीकारावे असे भाग्य फार क्वचित् ! ज्ञानदेव असे भाग्यवंत ठरले !

भगवद्गीतेतील उपदेशप्रधान आणि प्रस्थानत्रयींपैकी एक महत्त्वपूर्ण तत्त्वचिंतन ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत मुक्तपणे आणि प्रत्यही स्वातंत्र्य घेत परंतु मूळ विषयाच्या समांतर जात स्वीकारले. महाभारत, गीता आणि भारतीय तत्त्वज्ञानाचे आगर म्हणून समजल्या गेलेल्या सर्व साहित्य-निर्मितीला ज्ञानेश्वरांनी उचितपणे न्याय देऊन आणि परामर्ष घेऊन ज्ञानेश्वरीत एक आदर्श समाज उभा करण्याचा आणि एका आदर्शाकडे समाजाला घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. पूर्ण पुरुष आणि धर्मपुरुष अशा श्रीकृष्णाचा उपदेश ज्ञानेश्वरीत रूप घेत असता केवळ उपदेशप्रधानता न स्वीकारता ज्ञानेश्वरांनी एक सर्जनशील अशी नव-निर्मिती भगवद्गीता निरुपणातून साधली. तिची तात्कालिकता नाहीशी करीत आणि मानवी जीवनसंदर्भ देत विश्वसंगतीने निसर्गाच्या माध्यमातून आणि पंचमहाभूतांच्या स्वीकारातून गीतेतील उपदेश आणि तत्त्वचिंतन अंगिकारले. ज्ञानेश्वरीपूर्वी आणि ज्ञानेश्वरीनंतर भगवद्गीतेवर कितीतरी टीका निर्माण झाल्या, पण एकतर ज्ञानेश्वरीला टीका म्हणण्यास कुणी धजावत नाही इतकी ती स्वतंत्र आणि वेगळी आहे. अतींद्रिय अशा चिद्विलासानुभूतीला गोचर करीत असता संवेदनामाध्यमातून अनुभवाला स्वीकारीत मूळ तत्त्वाशयाकडे

ज्ञानेश्वर पोचतात. ही ज्ञानेश्वरीतील प्रक्रिया समजावून घेण्यासारखी आहे. निर्गुण व स्वसंवेद्य अगोचर अशा आत्मतत्त्वरूपाला आणि त्याच्या अतींद्रिय अनुभूतीला ज्ञानेश्वर कृष्णार्जुनाच्या प्रगाढ भक्तिमाध्यमातून सगुण साकार करतात. श्रीकृष्णाचे आणि अर्जुनाचे भावसंबंध, धृतराष्ट्र आणि संजय यांचे भावसंबंध, गुरु आणि शिष्याचे भावसंबंध हे सारेच मुळी रूपवान आणि कांतिमान होऊन साक्षात होत जातात. पहिल्या अध्यायापासून आठव्या अध्यायापर्यंत ज्ञानेश्वर मूळ भगवद्गीतेशी बरीच संगतसोबत करीत, निरूपण करीत असताना दिसतात, परंतु नवव्या अध्यायापासून पुढे अठराव्या अध्यायापर्यंत मात्र एका प्रचंड गतीने आणि आत्मविष्काराच्या स्फूर्तीने झपाटलेले कविमन सतत वाचकाला जाणवत असते. नवव्या अध्यायापासून पुढे जवळ जवळ प्रत्येक अध्यायात आलेल्या आचार्योपासनावरील ओव्या म्हणजे गुरुकृपेने ओथंबलेले आणि भारावलेले कविमनच असते. एका अर्थाने ही सगुणभक्तीच ठरते. सगुणोपासनाच असते. म्हणून ज्ञानेश्वरीत निर्गुण, निराकार, निरवयव विश्वचैतन्याला सगुणसाकार स्वरूपात, कृष्णरूपात आणि गुरुरूपात ज्ञानेश्वरांचे कविमन न्याहाळते.

> तुझे विश्वरूप आवघे । माझिये दिठिसि गोचर होआवे
> ऐसी थोर आस जीवे । घेतली असे ॥ ११ : ८८ ॥

ही जी ज्ञानेश्वर या कविमनाची तळमळ आहे ती तळमळ ज्ञानोत्तर भक्तीतून आणि सगुणरूपातून ज्ञानेश्वर साक्षात करतात. कारण 'आम्ही जे जे जोडावे । ते समस्ती इही भोगावे । हे जीवितही उपकारावे । काजी याच्या ।। अशी मानवी जीवनव्यवहारा-संबंधीची त्यांची जाणीव आहे. ज्ञानेश्वरीत ज्ञानेश्वरांनी मूळ गीतेला अनुसरत असताही कर्मनिष्ठेपेक्षा ज्ञाननिष्ठा आणि ज्ञाननिष्ठेचे रूपांतर भक्तिनिष्ठेत करण्यात सामर्थ्य मिळविले. भक्तिमार्गाची साधनावस्था नाहीशी करून ज्ञानेश्वरांनी तिला कर्मनिष्ठा आणि ज्ञाननिष्ठेच्या बरोबरीने स्थान दिले आणि त्यातूनच ज्ञानोत्तरभक्तीचा पुरस्कार आपल्या आदर्शवादी भूमिकेला अनुसरून स्पष्ट करीत नेला. १२ व्या अध्यायात शांतिसुखाची व मोक्षाची वाट व त्यावरील व्यक्त अव्यक्ताचे दाखले याचे विचारपूर्वक चित्रण ज्ञानदेवानी केले आहे. ज्ञानदेवांची गीतेकडे बघण्याची भूमिका समन्वयाबरोबर आदर्शाची आहे. आणि हा आदर्शवाद संपूर्ण ज्ञानेश्वरीभर कृष्णमुखातून अभिव्यक्त करण्यात ज्ञानदेवांनी अपूर्व औचित्य साधले आहे. अज्ञानखंडन, अविज्ञाखंडन, क्षराक्षर विचार नित्यनैमित्तिक कर्मबंधने, असुरी संपत्ती, मायानदी, विषयी माणूस, अश्वत्थ वृक्षाचे रूपक या ज्ञानेश्वरीत वारंवार आलेल्या विषयांच्या स्पष्टीकरणातून ज्ञानेश्वर ज्ञानमंडन आणि विहीतकर्माची अपरिहार्यता आणि निष्कामता यांचाच पुरस्कार करीत जातात. डोळस-भक्तीची आणि ज्ञानोत्तर भक्तीची पुण्याई सतत जागती ठेवतात. धुरेचा मार्ग कोणता याची स्पष्टता जोखतात. एका साधकाची साधकावस्था आणि त्या साधकावस्थेतून घेतलेले समष्टीतील अनुभव ज्ञानेश्वरांचे कविमन टिपून घेत असते व त्यात मोक्षमार्गाची

पायवाट साधकानेच साधकांसाठी निर्माण करून ठेवलेली असते. ज्ञानेश्वरीच्या पूर्वार्धात निर्गुण, निराकार परब्रह्माच्या संगतीने जाणारा साधक उत्तरार्धात मात्र गुरूरुपाने पर-ब्रह्माला सगुणसाकार रुपात न्याहाळू लागतो त्यावेळी त्याला चित्सूर्याचे दर्शन घडते. प्रज्ञाप्रभात सूर्याची पहाट झालेली असते. पहाट होताच अंधकार नाहीसा व्हावा त्याप्रमाणे प्रज्ञाप्रभात सूर्याची जणू वर्दी देणारी ज्ञानात्मक पहाट होताच अज्ञानाची तमच्छाया नाहीशी होते. आणि अठराव्या अध्यायात तर वारकरी संप्रदायाची जी आचारसंहिता आहे, जी सगुण भक्तीची दीक्षा आहे तिचाही ज्ञानेश्वर उल्लेख करतात. वारकरी एकमेकांना उराउरी भेटतात आणि मंदिराच्या कळसावरच नजर ठेवून त्याला नमस्कार करून मंदिर प्रवेश करतात. शेवटचा अध्याय एकीकडे कळसाध्याय असतो व या कळसाला नमस्कार करूनच सगुणरूपी आणि कृष्णरूपी परब्रम्ह्याचे चिंतन करावयाचे आहे. संपूर्ण ज्ञानेश्वरी म्हणजे एक प्रचंड द्राविडी पद्धतीचे मंदिर-शिल्प असेल तर कृष्णरूप परब्रह्म ही त्यातील प्रमुख मूर्ती होय. नवव्या अध्यायात ज्ञानेश्वर म्हणतात--

> कृष्ण विष्णू गोविंद । एया नामाचे निखिल प्रबंध
> माझि आत्मचर्चा विशद । उदंड गाती ॥ ज्ञा. ९:२०९ ॥

तसेच अकराव्या अध्यायात ज्ञानेश्वर म्हणतात--

> हरिहरादि समस्तां । देवा तू परदेवता
> वेदातेही पढविता । आदि गुरु तू ॥ ११:५५५ ॥

याही ओवीवरून कधी कृष्णमिसे तर कधी अर्जुनमिसे ज्ञानेश्वरांनी कृष्णविष्णुगोविंद आणि हरिहरैक्याची जी अपेक्षा बाळगली, तिचेच मानचिन्ह वरील ओव्यांतून स्पष्ट होते. सगुण-भक्तीची साधनसुचिता आणि आचारांची सुलभता चित्ते चैतन्या मिठी घालण्यासाठी आणि प्रेमरसाच्या कल्लोळी बुडी घेण्यासाठी ज्ञानी भक्ताला आवाहन करीत असतात. सर्वत्र आत्माच आहे हे बुद्धीने किंवा ज्ञानाने ओळखणे एवढेच ज्ञानेश्वरांना अभिप्रेत नाही तर सर्वव्यापी आत्मरूपात सर्वांसह प्रेमाने तल्लिन होऊन अद्वयानंदाचा आस्वाद घेणे हीच ज्ञानेश्वर ज्ञानोत्तर भक्ती मानतात. कारण सर्वत्र आत्माच भरला आहे हे ज्ञान होताच नानात्व नष्ट पावून आत्मौपम्य स्थिती होते व येथूनच ज्ञानोत्तरभक्तीचा प्रारंभ होतो. विश्वपसारा हे ब्रह्माचेच एक कर्म आहे. त्यामुळे देहाच्याच रूपाने देहवंताला कर्म टाळता येत नाही. कर्मत्याग अशक्य असल्यामुळे कर्मबंधनकारक नसून कर्माची आसक्ती बंधनकारक ठरते हाही ज्ञानदेवांचा कर्मविचार त्यांच्या भक्तिविचाराशी आणि अद्वयानंदी चिद्विलासाशी सुसंवादीच आहे. इतकेच नव्हे, तर आद्य वेदप्रतिपाद्या स्वसंवेद्या आत्मरूपापासून ज्ञानेश्वरांनी आपल्या भक्तिमार्गाला सुरुवात करून 'आता विश्वात्मके देवे तेणे वाग्यज्ञे तोषावे' इथपर्यंत आत्मतत्त्वाकडून विश्वतत्त्वापर्यंत, अहम्-पासून वयम्पर्यंत आणि आत्मरूपाकडून विश्वरूपाकडे केलेला जो विकास आहे त्यातूनही

त्यांची सर्वभूतात्मैक्याची आणि 'मार्गाफारे वर्तावे। विश्व मोहरे लावावे (ज्ञा: ३: १६९) याची करुणापूर्ण तळमळ लक्षणीय ठरली. समाजहिताला डोळ्यापुढे ठेवून ज्ञानयज्ञ, कर्मयज्ञ आणि वाग्यज्ञची संकल्पना साक्षात करून स्वधर्माची आदर्शस्वरूपी प्रतिस्थापना त्यांनी केली. मोक्षमार्गाला सामान्य भक्ताला नेत असता निष्कामकर्माची प्रतिष्ठा आणि साधनमार्गातील अधिकारभेद, ऐहिकसुख आणि पारलौकिक कल्याणाचा ज्ञानेश्वरांनी विश्वात्मक संदर्भात मार्ग स्वीकारला. १२ व्या अध्यायात 'हे विश्वचि माझे घर। ऐसी मती जयाची स्थिर' असे ज्ञानेश्वर म्हणतात.

'विचरे विश्व होऊनि। विश्वामाजी॥ ज्ञा २: ३६७ येथे ज्ञानेश्वरांनी विश्व-पसाऱ्यातील माणसाच्या अस्तित्वाशी आत्मलीन झालेल्या ईश्वरी अस्तित्वाची अपेक्षा व्यक्त केली आहे. ज्ञानेश्वरांचा परमेश्वर हा विश्वरूप आहे. आणि तो नानाविध रंगरुपांनी बहरलेला आहे. तो चिरतरूण आणि 'नटना' करणारा असा आहे. अनंत, अनादि, अगोचर अशा परमेश्वराला विश्वरूपाने साकार करण्यात आणि साक्षात करण्यात ज्ञानेश्वरांनी प्रतिमांची जी व्यामिश्र वलये निर्माण केली आहेत तिच्यातून गोचर करण्यात आणि अशा ईश्वराची निष्कामपणे आणि एकनिष्ठपणे भक्ती करण्यास ज्ञानेश्वरांनी मानवसमाजाला सुचविले आहे. ईश्वरस्वरूपाची गूढ गहन अनुभूती केवळ भावगम्य किंवा बुद्धिगम्य किंवा तर्कगम्य नाही तर ती ज्ञानाच्याही कक्षेपलीकडची आहे अशी अनुभूती ज्ञानेश्वरांनी आपल्या जीवनविषयक चिंतनातून आणि निवृत्तिनाथ या गुरुच्या ठिकाणी सर्वार्थाने एकात्म आणि एकरूप असलेल्या स्वरूपातून अभिव्यक्त केली. अशा त्यांच्या व्यक्तिगत अनुभूतीलाच ज्ञानेश्वरीत अमृतानुभावात आणि अभंगगाथेत विश्वात्मकरूप मिळाले आणि या रूपाच्या पाठीमागे निवृत्तिनाथांविषयीची नितांत भक्तीस्वरूपी गंगाजळ होते. पाटीवरची अक्षरे पुसली तरी त्याच्यातील आशय नष्ट होत नाही त्याप्रमाणे अनंत नामरूपांनी नटलेला ईश्वर अविनाशीच राहतो व तो विश्व पसाऱ्यात विरघळून गेलेला असतो. अशा आत्मस्वरूपी ईश्वराला जाणून घेण्यासाठी ज्ञानेश्वरांनी त्याच्यावर गणेशाचे रूपक पहिल्या अध्यायात सर्वांगपरिपूर्ण असे उभे केले आहे त्यातूनही निर्गुणाकडून सगुणा-कडे जाण्याचा दृष्टिकोण भक्तिमार्गाची विवक्षितता पटवून देतो. आणि भक्तिमार्गात दडलेले जे ईश्वर आणि भक्त यांचे द्वैत आहे तेही कमी करीत विश्व म्हणजे ईश्वर व ईश्वर म्हणजे विश्व इतक्या अंतिम जाणिवेपर्यंत ज्ञानेश्वरांनी तत्त्वविचार नेलेला आहे. या त्यांच्या भक्तिरहस्यात अनुस्यूत असलेला प्रमुख धागा म्हणजे श्रीकृष्णाचे ईश्वरीपण आणि मानवीपण, अर्जुनाची निष्ठा आणि स्वकर्तव्याविषयीची जाग, धृतराष्ट्राची व्यावहारिकता आणि संजयाची निर्भर मनोवस्था, निवृत्तिनाथांची नितांत करुणा आणि ज्ञानेश्वरांचा प्रेमकल्लोळ या साऱ्या द्वद्वांतूनही अंतिम दिशा मिळते ती उत्कट अपरंपार प्रेमभक्तीची ज्ञानेश्वरी म्हणजे गीतारहस्याचे ज्ञानेश्वरांनी केलेले उद्घाटन होय आणि 'अमृतानुभव' म्हणजे ज्ञानयज्ञातून लखलखून निघालेले 'तत्त्वसत्य' होय. ज्ञानेश्वरीनिर्मितीमागे ज्ञानेश्वर या कविमनाच्या अनंत जाणिवांची नर्तने आणि आरोह-अवरोह कृष्णार्जुनसंवाद मिसे

आंदोलित असतात. उलटपक्षी, अमृतानुभवात एक 'स्थितप्रज्ञ', 'निश्चित' आणि जीवनापलिकडे जाऊन जीवनाला तटस्थपणे न्याहाळणारा तत्त्ववेत्ता वाचकाला जाणवत असतो. 'ज्ञानेश्वरी'कडून 'अमृतानुभवा'कडे आणि 'अमृतानुभवा'कडून 'हरिपाठ आणि अभंगगाथे'कडे वळले तर ज्ञानेश्वर या कविमनाच्या प्रतिभापरिवर्तनप्रक्रिया स्पष्ट होत जाते. ही विशिष्टता जाणवत असूनही एकाच सर्जनशील मनाची ती काव्यक्रीडा असते याचीही जाणीव वाचकाला होत असते.

ज्ञानेश्वरांची वाङ्मयनिर्मिती

'ज्ञानेश्वरी' नंतर 'अमृतानुभव' व त्यानंतर 'चांगदेवपासष्टी' व 'अभंगगाथा' असा इतिहासाने जरी अनुक्रम आपण स्वीकारत असलो तरी खरोखर इतक्या अल्पायुष्यात आणि केवळ चार ते पाच वर्षांच्या काळात ज्ञानेश्वरांनी आपली साहित्यनिर्मिती केलेली आहे यावरून तत्त्वचिंतन, तत्त्वव्यवस्थापन आणि काव्यनिर्मितीतून सगुणनिर्गुण परब्रह्माचे लौकिक-अलौकिक स्वरूप न्याहाळण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न ज्ञानेश्वर हे कविमन करीत आहे. आत्मज्ञानासह आत्मस्वरूप चिकित्सा ज्ञानभक्तीच्या माध्यमातून आणि भगवद्गीतेच्या आधाराने ज्ञानेश्वर ज्ञानेश्वरीतून करतात तर याच आत्मज्ञानाची केवलावस्था अंतिम सत्यस्वरूपात शोधण्याची प्रक्रिया अमृतानुभवात घडत जाते म्हणूनच ज्ञानेश्वरीत सतत असलेले संवादात्मक भावद्वंद्व पूर्णतः अमृतानुभवात विलय पावते. शिवशक्तीची अभिन्नता किंवा प्रकृतिपुरुषाची एकरूपता ज्ञानेश्वर विशेषत्वाने व अधिक सूक्ष्मपणे 'अमृतानुभवात' स्पष्ट करीत जातात. श्रोता-वक्ता, अर्जुन-श्रीकृष्ण, गुरु-शिष्य, पती-पत्नी, आई-मूल, धृतराष्ट्र-संजय, निवृत्ती-ज्ञानदेव ही सारी द्वंद्वे ज्ञानेश्वरीतील आशय अधिक टोकदार आणि सूक्ष्म करीत असतात. ही सारी द्वंद्वे वस्तुतः मूळ गीतेत नाहीत परंतु ज्ञानेश्वर नाथपंथी असल्यामुळे व निवृत्तिनाथांनाच गुरूत्व आणि पितृत्व देत असल्यामुळे या अलौकिक गुरूचा अलौकिक शिष्य संपूर्ण जीवनव्यवहारात मिसळून गेलेलाच दिसू लागतो. 'लवणाची मासोळी' समुद्रात विरघळूनच जाणार तशी ही प्रियूची प्राणेश्वरीमय अवस्था 'ज्ञानेश्वरी'त सर्वदूर ज्ञानेश्वर अनुभवीत आहेत. ज्ञानेश्वरीत आलेले उपमा-दृष्टान्त एकीकडे कवीच्या विशाल आणि सर्वस्पर्शी प्रतिभेचा पडताळा देत असतात, तर दुसरीकडे कवीचे भावनाते निसर्गाशी कसे तादात्म्य पावलेले आहे हेही स्पष्ट करीत असतात. ज्ञानेश्वरीच्या प्रत्येक अध्यायातील उपमा-दृष्टान्तातील विविधता आणि विशालता बघू लागलो तर त्यातून ज्ञानेश्वरांच्या प्रतिमासृष्टीचे तेजाळलेले रूपशिल्प वाचकाला दिपवून टाकीत असते पण त्यातही ज्ञानेश्वर या कविमनाचे रंग मिसळून त्यांच्या जीवनदृष्टीचे जे मोरपंखी इंद्रधनुष्य निथळत असते ते थक्क करून सोडणारे असते. एका उद्बोधनाच्या, प्रबोधनाच्या आणि उपदेशाच्या भावावस्थेतून संपूर्ण 'गीतातत्त्व' ज्ञानेश्वरांनी न्याहाळलेले असते. श्रोत्याचा कुठेही विसर ज्ञानेश्वरीत ज्ञानेश्वरांना पडलेला नाही हाच त्याचा पुरावा म्हणता येईल. गीताशय निरुपणासाठी

ज्ञानेश्वरांनी प्रवचन कीर्तनाचा आकृतिबंध स्वीकारलेला आहे ही गोष्टही लक्षणीय म्हणावी लागेल. ज्ञानेश्वरीत बहुजनहिताय आणि बहुजनसुखाय असा गीतातत्त्वाचा अन्वयार्थ स्वतंत्र आहे ही भावावस्था स्वतःच 'ज्ञानेश्वरी' निर्मितीच्या वेळी उपभोगली व त्यातूनच आलेली एक निःसंग जीवनप्रवृत्ती अमृतानुभवात शोधण्याचा प्रयत्न केला. 'ज्ञानेश्वरीत' विश्व-पसाऱ्याविषयी, कर्म-विकर्म आणि अकर्माविषयी किंवा ज्ञानयज्ञ आणि कर्मयज्ञाविषयी चिंतन करीत असतानाच त्यांची अंतिमतः केवलता या कविमनाला जाणवत होती व त्यातून 'अमृतानुभव' साक्षात झाला. ज्ञानेश्वरीची आणि अभंगांची निर्मिती ही 'स्वान्त सुखाय' नसून 'सकलजन सुखाय' ठरली. उलटपक्षी, 'अमृतानुभवात' मात्र ज्ञानेश्वर मन आणि आत्मा, बुद्धी आणि प्रतिभा, काव्य आणि तत्त्वचिंतन यामधील द्वंद्वावस्था पुसून टाकण्याच्या दृष्टिकोणातून सतत विविधांगांनी आशयाशी 'झोंबी' करीत असतात आणि यातच 'अमृतानुभवा'च्या निर्मितीचे स्वान्तसुखायत्व साक्षात झालेले असते. 'ज्ञानेश्वरी' आणि 'अमृतानुभव' ही अशाप्रकारे एकाच कविमनाची दोन भिन्न पातळ्यांवरील परंतु परस्परानुबंधी अशी 'काव्यक्रीडा' आहे. 'तत्त्वचिंतन क्रीडा' आहे. 'आत्मानात्मक्रीडा' आहे. अमृतानुभव हे केवळ सिद्धानुवाद करणारे काव्य नाही. तर ज्ञानेश्वरीत आलेल्या 'विवेकवादा'चे आणि 'आत्मबोधा'चे निखळरूप न्याहाळून त्यातून जीवनसत्य (essence of life) शोधण्याचा आणि त्याशी एकरूप होण्याचा कविमनाचा चाललेला प्रयत्न आहे. ज्ञानाची ज्ञानात्मकता, दर्शकाची दार्शनिकता आणि तत्त्वबोधाची तात्त्विकता निखळ, निरंग, नितळ स्वरूपातील शोधविषय अमृतानुभवात होत जातो. म्हणजे 'ज्ञानेश्वरी' पेक्षा पुढचे पाऊल 'अमृतानुभवा'त पडले आहे असे नाही, तर वृक्षबीजन्यायाने ज्ञानेश्वरांच्या सर्व वाङ्मयनिर्मितीत ते अनस्यूत आहे. हरिपाठ आणि अभंग गाथेची साक्ष काढली तरी स्पष्ट होते की सगुण-निर्गुणाच्या पलीकडे असलेले चैतन्यतत्त्व ज्ञानेश्वर सगुणरूपात शोधू बघतात. 'कृष्ण विष्णू गोविंद या नामाचे निखिल प्रबंध। माझी आत्मचर्चा विषद। उदंड गाती॥' ९ : २०९ असे ज्ञानेश्वरीत म्हणणारे ज्ञानेश्वर हरी हरेक्याचा उद्घोष गोविंदगोपाळच्या संकीर्तनातून आणि विराणीतील आर्त अशा लौकिक प्रेमभावातून अभंगात गात असतात व त्यातून 'अवघाची संसार सुखाचा करीन आनंदे भरीन तिन्ही लोक' ही जाणीव व्यक्त होत असते. 'तुज सगुण म्हणू की निर्गुण रे' म्हणत असतानाच 'रूप पाहता लोचनी सुख झाले हा साजणी' अशी भावावस्था 'आजी सोनियाचा दिनु। वर्षे अमृताचा घनु' अशा समृद्धीप्रत पोहोचत असते व तिचे रूपांतर सरतेशेवटी 'इवलेसे रोप लाविलेले द्वारी। त्याचा वेल गेला गगनावरी' असे होत असते. ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयनिर्मितीची अवस्थाही अशीच आहे. एकाच शुद्धबीजातून अंकुरलेली त्यांची साहित्यसृष्टी विविधता असूनही परस्पर नाते दर्शविणारी आहे; कारण तिचे मूळ आदिनिर्मितीबीज एकच आहे आणि ते म्हणजे ज्ञानदेवांची प्रतिभा. हरिपाठ आणि 'पाळणा', 'घोंगडी', 'बाळक्रीडा', 'पाईक', 'हमामा', 'अंबुला', 'एकविध', 'डौर', 'पांगुळ', 'सौरी', 'फुगडी',

'आंधळा' आणि 'कूटे' ही सारी अभंग-रंगी रचना विविधतापूर्ण दिसत असली तरी तिच्या मागील जी तात्त्विक विचारांची बैठक आहे ती 'ज्ञानेश्वरी', 'अमृतानुभव' यापाठी जी आहे तीच आहे. एका अर्थी ही अभंगगाथा म्हणजे ज्ञानेश्वरांनी केलेले जे परिभ्रमण आहे त्यात उत्स्फूर्तपणे गायिलेली आणि अनुभवाच्या कोवळिकेने अभिव्यक्त झालेली भावकविता ठरली. ज्ञानेश्वरीत ज्ञानेश्वर विविधांगांनी जीवन-जाणिवांची अस्तित्वखूण एकीकडे न्याहाळतात तर दुसरीकडे ती समजावून देतात. अभंगांमधून त्यासाठी अनेक रूपके रचतात की जे सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित आहेत. त्यातून त्याला चैतन्यतत्त्वाची ओळख आणि समज पटणार असते. तर 'अमृतानुभवा'त ज्ञानेश्वर जीवनमुक्ताची भावावस्था व्यक्त करीत असतात. अनुभवही तोच आणि अनुभवीही तोच असा हा 'जीवन्मुक्त' अनेकांतील एक किंवा समष्टीतील एक न राहता त्या साक्षात्कारी सिद्धाने घेतलेला गूढ आध्यात्मिक आणि साक्षात्कारी सिद्धानुवाद सुटा सुटा करून सांगण्याचा प्रयत्न होत असतो एका चिद्विलासाचा अनोखा अनुभव कविमनाला जाणवलेला असतो 'म्हणोनि जग असिकी वस्तुप्रभा' अमृ : ७ : २८९ असे ज्ञानेश्वर म्हणत असतात व 'चित्ते चैतन्यामिठी' घालण्यासाठी 'प्रेमरसे कल्लोळे' बुडी घेतात. कारण त्यांचा चैतन्यतत्त्वावर ठाम विश्वास आहे. आणि 'भावेविण भक्ती भक्तिवीण मुक्ती' असंभव आहे अशी त्यांची धारणा आहे. भगवद्गीतेतील आत्मबोधाने स्थितप्रज्ञ असलेला श्रीकृष्ण आणि ज्ञानेश्वरीतील आत्मबोधाने स्थितप्रज्ञ असलेले ज्ञानेश्वर आपल्या जाणिवेच्या डोळ्यांनी (ज्ञा. ७४४), प्रज्ञाप्रभातसूर्याला (१४ : १) न्याहाळून स्वधर्मयज्ञासाठी श्रीकृष्ण अर्जुनाला आणि ज्ञानदेव श्रोत्याला आवाहन करतात व त्यात त्यांना विश्वरूपदर्शन 'निरय'पद्धतीने घडत जाते. कर्म, ज्ञान, भक्ती आणि भक्तिज्ञानकर्म अशा दोन्ही संवादी सूरांनी ज्ञानेश्वरांनी आपली साहित्यनिर्मिती साधलेली आहे व तिला त्यांच्या आत्मानुभूतीचे पाठबळ मिळालेले आहे.

अमृतानुभव, चांगदेवपासष्टी, हरिपाठ आणि अभंग गाथा ही ज्ञानेश्वरीपेक्षा स्वतंत्र रचना आहे. तिचे स्वातंत्र्य तिच्या मागील भूमिकेत आणि आत्मरंगी प्रतिभेत आहे. स्वान्तसुखाची अशी निर्मिती होत असूनही अभंगात मात्र ती लोकानुवर्ती ठरते. निर्गुण, निराकार ईश्वराचे सगुण, साकार रूप अभंगातून न्याहाळून आपल्या उत्कट अनुभूतींना ज्ञानेश्वर सहजाविष्कार देतात. ज्ञानेश्वरांची साहित्यनिर्मिती अशा रीतीने द्विदल ठरते. पण तिचे अंतिम उद्दिष्ट आणि ध्येय मात्र एकच असते. ज्ञानेश्वरांच्या प्रतिभेचे क्षितिज मानवी जीवनाकाशाला गवसणी घालण्याचाच प्रयत्न आपल्या संपूर्ण निर्मितीतून करीत असते. आत्ममग्नता किंवा आत्मतुष्टता न स्वीकारता ज्ञानेश्वरांनी विश्वात्मक पातळीवरूनच अनुभूती न्याहाळल्या आणि अभिव्यक्त केल्या. आर्ताचेनि मिसे बांधीली सोडीत आणि बुडाली काढीत, साकडी फेडीत कधी स्वान्त क्रीडा केली तर कधी उपदेशाच्या आधारे 'सकळासी येथे आहे अधिकार' असा ठाम आत्मविश्वास निर्माण केला. एका अनुतापयुक्त अनन्यभक्तीची जी शिकवण जीवनात स्वीकारण्याचा

प्रयत्न या जगावेगळ्या भावंडांनी केला होता त्याच भक्तीचा पुरस्कार ज्ञानेश्वरांनी आपल्या संपूर्ण निर्मितीतून केला.

गीता ज्ञानेश्वरी

'ज्ञानेश्वरी' जरी भगवद्गीतेवर टीकापद्धतीने साक्षात झालेली असली तरी या निर्मितीत ज्ञानेश्वरांनी घेतलेले निर्मितीचे जे स्वातंत्र्य आहे ते इतर सर्व गीताटीकेपेक्षा सर्वस्वी भिन्न आहे. भगवद्गीता ही भारतीय जीवनाच्या गाभ्याशी सलग्न आहे. तिच्यातील उपदेश आणि विचारदर्शन हे प्रामुख्याने एका विशिष्ट असंतुलित अशा जीवनव्यवहाराच्या संदर्भात अभिव्यक्त झाले आहे. सत्य-असत्य, नैतिक-अनैतिक, व्यवहार्य-अव्यवहार्य, योग्य-अयोग्य अशा मानवी जीवनातील मूलभूत समस्यांच्या संदर्भातील अंतिम सत्यदर्शनशोधन कृष्णाच्या उपदेशात आलेले आहे. मानवी जीवनातील अनेक भावनांनी आणि त्यांच्या परस्पर तणांतील द्विधात्मकता या संदर्भात गीता उपदेश करते व त्यातून स्वधर्माचे संसूचन करीत जाते. म्हणूनच गीतेतील तत्त्वज्ञान हे भारतीय तत्त्वज्ञानच असते की ज्यात सत्य-शिव-सौंदर्याच्या अंतिम जाणीवनेणिवेपर्यंतचा शोध घेतला गेला आहे व ज्यात जीव, जगत आणि ईश्वर यांच्यातील अतुट नात्याचे आणि परस्परावलंबित्वाचे दर्शन घडलेले आहे. कर्म, ज्ञान आणि भक्ती या मानवी जीवन-व्यवहाराच्या संतुलित कथा भगवद्गीता विशद करीत जाते. ज्ञानेश्वरांनी भगवद्गीतेतील तत्त्वज्ञान स्वीकारले, अध्यात्माला शास्त्ररूपातून सोडवून अधिक जीवनसंदर्भी बनविले. आणि शास्त्रविचार पेलणारा नवा मराठी आकृतिबंध निर्माण केला. गीतेतील तात्त्विक अनुभूतीचे सोलीव आणि यथार्थ दर्शन घडवीत असताना ज्ञानेश्वर निर्मितीचे स्वातंत्र्य घेतात. भगवत्गीतेचा यथार्थ अभिमान, गीतेतील विचारांशी सतत समांतर राहात जाणे, तत्त्वज्ञान स्वीकारणे असा मूळ गीतेशी नातेसंदर्भ सांभाळीत ज्ञानेश्वरी उलगडत जाते. परंतु तिच्या या उलगडण्यातच तिचे मुक्त आणि मुग्ध सौंदर्य लपलेले आहे. गीतेतील कृष्ण-अर्जुन म्हणजे उपदेशक-उपदेशी असे आहेत. ज्ञानेश्वरांनी या व्यक्तिरेखांना अनंत परिमाणांची गर्भश्रीमंती बहाल केली. धृतराष्ट्र आणि संजय यांच्या सेव्यसेवकभावापेक्षाही एक वेगळाच रंग त्या व्यक्तिरेखांना दिला. गीतेतील अर्जुनाच्या कृष्णभक्तीपेक्षा ज्ञानेश्वरी-तील अर्जुनाची कृष्णभक्ती काही वेगळीच आहे. या भक्तिचेही अनंत रंग आहेत. विविध नाती आहेत आणि विविध भावावस्था आहेत. ज्ञानेश्वरांचा कृष्ण अर्जुनाला सतत प्रेमालिंगन देण्यासाठी आसुसलेला असतो, तर धृतराष्ट्र म्हैसा म्हणून संबोधिला असतो. पांडवांचाच जय होणार असे म्हणताच धृतराष्ट्र गंभीर बनतो, अस्वस्थ होतो. गीतेतील कर्मनिष्ठा आणि ज्ञाननिष्ठांचा योग्य आदर करीत ज्ञानेश्वरांनी भक्तीचे साधनच काढून टाकून तिला साध्याचे स्थान दिले आहे. कर्माकडून आत्मज्ञानाकडे आणि आत्मज्ञानाकडून ज्ञानोत्तर भक्तीकडे ज्ञानेश्वरांनी भगवद्गीतेतील अध्यात्म विचार अभिमुख केला आहे. शंकराचार्यांनी गीतेचा अन्ययार्थ निवृत्तीपर संन्यासप्रधान लावला तर ज्ञानेश्वरांनी तिचे चिद्विलासात्मक स्फूर्तीरूप लक्षात घेतले.

विश्वचैतन्याचा साक्षात्कार

'ज्ञानेश्वरांच्या सर्वच वाङ्मयनिर्मितीपाठीमागे स्फुरणरूप विश्वचैतन्याच्या अनुभूतीचा साक्षात्कार आहे या साक्षात्काराची विविध रूपे म्हणजे ज्ञानेश्वर वाङ्मय होय. एकाच आधारदेठावर डोलणारी ही स्फूर्तिरूप वाङ्मयनिर्मिती आहे. ज्ञानेश्वर या व्यक्तिमत्वाला जाणवलेले जे भावसत्य आहे तेच विश्वचैतन्यसत्य होय. तर्कपातळीवरील अनुभूतीचा साक्षात्कार असूनही तो संवेदनास्पर्शाने, कल्पनेच्या विलासाने आणि प्रतिभापूरीत विचारदर्शनाने रूपवान आणि कांतिमान ठरले. 'ज्ञानेश्वर केवळ ईश्वर आणि मानव यांचे नाते शोधत नसून, संपूर्ण चराचर आणि माणूस यांच्या द्वंद्वात्मक जाणिवेपलीकडे असलेले जे चैतन्यपरमात्मरूप त्याच्याशी विश्वपसाऱ्याचा आणि माणसाचा संबंध आणि संदर्भ शोधू बघतात. ज्ञानेश्वरांची प्रतिमासृष्टी जी निसर्गातून आणि विश्वपसाऱ्यातून चिद्विलासाच्या अनुभूतीला गोचर करू जाते त्यावेळी ती अनुभूतीच विश्वात्मक आणि सार्वत्रिक होऊन जाते. काळाचे भान, परिस्थितीची चौकट किंवा देशविभागाची जाणीव त्या ठिकाणी प्रस्तुताप्रस्तुतापलीकडे असते. अहंकार गळून पडलेली व चैतन्यतत्त्वाच्या साक्षात्काराने दिपून गेलेली अनुभूतीच सर्वाभूती भूषविण्याची मनोमन इच्छा ज्ञानेश्वरांच्या निर्मितीतून घडत असते. कारण पसायदानात खळांची व्यंकटी सांडो असे ते म्हणतात; तर अमृतानुभवात गुरु आणि शिष्य, शिव आणि शक्ती, ईश्वर आणि भक्त यांचीच एकरूपता व्यक्त करतात आणि अनीर्वचनीय अशा स्वात्मानुभूतीचा स्वयंभूपणा आणि केवलता ते जाणून घेतात. आत्मप्रत्ययातून स्फुरलेली अशी ज्ञानेश्वरांची वाणी आहे. विवेकवादाने आणि बोधप्रसारासाठी झगटली गेलेली अशी ही वाणी ! अमृतानुभवाच्या दहाव्या अध्यायाच्या प्रास्ताविकात ज्ञानेश्वर म्हणतात ' महेश्वराने सूर्याला तेजाचे सूत्र दिले तेव्हा सूर्याने ते विश्वाला बहाल केले, चंद्राला अमृत दिले ते काय केवळ चंद्रापुरते मर्यादित राहिले ? समुद्राने मेघाला पाणी दिले किंवा वसंतऋतूने झाडे आणि वेली फुलून गेल्या ! त्याप्रमाणे स्वयंप्रकाशाला आणखी मी तो काय प्रकाश देणार ! पण निवृत्तिनाथांनी मला सुखाविले व मी तुमच्यासह सुखाविलो ' ज्ञानेश्वरांची ही मूळ काव्यप्रेरणा आहे. विश्व मोहरे लावणे आणि तुमच्यासह सुखावणे ही एकच प्रक्रिया आहे आणि ती म्हणजे संविद् रहस्याच्या अनुभूतीचा आलेला प्रत्यय, झालेली जाणीव भरभरून आलेल्या आनंदऊर्मी !

✓ ' चांगदेव पासष्टी 'मध्येही नैमित्तीकता लपलेली असली तरी ती क्षणात नाहीशी होऊन जाते. पासष्टी हा एक तत्त्वसंवाद आहे. अभेद दृष्टीने संपूर्ण विश्वाकडे बघणारे ज्ञानेश्वर मनाने योगिराज चांगदेवाला समजाऊन घेतात, समजूत घालतात आणि अद्वया नंदानुभूतीला व्यक्त करतात.

कल्लोळ कञ्चुक । न फेडिता उघडे उदक
तेवी जगेसी सम्यक् । स्वरूप जो ॥

तरंगवस्त्राने पाणी झाकू म्हटले तरी ते उघडेच राहते, तसे वटेश्वररूप चांगदेव म्हणजे ' परि आम्हा आम्ही आहो । ते कैसे पाहो जावो ॥ अशी अद्वैतानुभूतीच ज्ञानेश्वर

साक्षात करतात. ही एकरूपता कशी तर कापुर आणि त्याचा रवा, सोने आणि सुवर्णपण, स्वादाचा स्वाद, बोलाचा बोल, आरसा आणि मुख, चंद्र आणि किरण, वाद्य आणि ध्वनी, तळहाताची तळहातीमिठी याच प्रतिमांमधून अतींद्रिय असा अध्यात्मानुभव ज्ञानेश्वर एकीकडे भावनेच्या पातळीवर आणि दुसरीकडे संवेदनांच्या माध्यमातून गोचर करतात. ज्ञानेश्वरांच्या सर्वच वाङ्मयनिर्मितीत प्रतिमांचे सारखेपण काहीवेळा जाणवल्यासारखे वाटते, पण ते सारखेपण नसून अनेकांगी तपशीलाने त्या प्रतिमांची आणि प्रतीकांची भूमिकाकेंद्रच बदललेले असते. उदा. लवणाची मासोळी, कल्लोळकंचुक, प्रज्ञाप्रभातसूर्य, सुवर्ण आणि अलंकार, सूर्यचंद्र आणि त्यांचे किरणजाळ, अग्नीच्या माळा, या प्रतिमा सर्वदूर आलेल्या असूनही त्यांचा संदर्भतपशील भिन्न स्वरूपी असतो. भावनोत्कटता आणि संवेदनशीलता हाच त्या प्रतिमांचा सहजधर्म असतो वस्तुतः 'चांगदेव पासष्ठी' हे एक तसे स्फुटरूप प्रकरण! व विलक्षण जीवनसंदर्भातून अभिव्यक्त झालेले! पण त्यातही ज्ञानेश्वरांची 'सूर्यदिठी' चिद्विलासानुभवाचा अद्वयानंद भोगणारी अशीच व्यक्त होते.

ज्ञानेश्वरांची अभंगगाथा म्हणजे पुनः आनंदानुभूतीचाच एक रम्य, उत्कट आणि स्वतंत्र रूपाविष्कार होय. जे स्वानुभवाचे परगुणे ज्ञानेश्वरीत, अमृतानुभवात आणि पासष्टीत ज्ञानेश्वरांनी मुक्तभोजनासाठी मांडले त्याच आत्मरत प्रबुद्धाची सहजस्थिती आत्मरंगी रंगात रूपवान होते. आणि 'हरि पाहिला रे हरि पाहिला। सबाह्यभ्यंतरी अवघा व्यापक मुरारी या आनंदक्षणातली ज्ञानेश्वर 'सोनियाचा दिनु आणि अमृताचा धनु 'मध्ये उपभोगतात.

प्रकाशाचे गाणे

ज्ञानेश्वर आणि नामदेव यांची आळंदी आणि पंढरपूर येथे झालेली भेट आणि जडलेला दृढस्नेह त्यांनी केलेली तीर्थयात्रा यामुळे निर्माण झालेले भावनाते यांचा एक प्रसन्न आणि खळखळता भावानुभव ज्ञानदेव-नामदेवांच्या अभंगातून साक्षात होतो. त्या दोघांनी परस्परांचा केलेला गौरवही त्याची साक्ष देतो. ज्ञानदेवांच्या भेटीमुळे नामदेव अन्तर्मुख होऊन त्यांची भक्तीही अधिक डोळस झाली, तर उलटपक्षी नामदेवाच्या भक्तीच्या उत्कट आविष्काराने ज्ञानेश्वर नुसते भारावले नाहीत तर त्यांचा सहवास ज्ञानेश्वरांना हवा-हवासा वाटू लागला व अशा आनंदनिर्भर अवस्थेत ज्ञानेश्वरांची अभंगगाथा आकारास येऊ लागली तर नामदेवाच्या अभंगात आत्मज्ञानावर आधारलेला निस्त्रैगुण्याचा आत्मानुभव अवतरू लागला. चिदानंदघन, चिन्मय चिद्रूप असे ज्ञानदेव नामदेवांना दोघांनाही स्वात्मानुभवात भावलेले ईश्वरी साक्षात्कारी रूपच त्यांच्या अभंगातून अभिव्यक्त झाले. इतकेच नव्हे तर नामदेव म्हणतात 'देव म्हणे नाम्या पाहे ज्ञानदेव मीच आहे' अंतर्बाह्य एकची कोंदले अशी दोघांचीही धारणा झाली होती. सबाह्य अभ्यंतरी स्वरूप गेल्यामुळे दृश्याकार द्वैताचाही निरास त्यांच्या अभंगवाणीत झाला. शके १२१८ मध्ये ज्ञानेश्वरांनी संजीवन समाधी घेतली त्यावेळी नामदेवांचे वय सव्वीस वर्षे होते. म्हणजे जवळ जवळ पाच सहा वर्षे ही दोन्ही संवेदनशील कलावंतमने परस्परांचे मैत्र सांभाळून होते. याचा परिणाम ज्ञानदेवांच्या हरिपाठाचे अभंग निर्मितीवर

झालेला निश्चित जाणवतो; पण ज्ञानेश्वरांच्या ज्या विराण्या आहेत त्यात झालेली भक्ति-प्रेमाची उत्कट विशुद्ध अशी जी अवस्था आहे तिचे मूळ रूप नामदेव सहवासात असावे. नामदेवांची आर्तता, पारमार्थिक तळमळीची उत्कटता आणि भक्तिभावाची अपूर्वता यांचा डोळस परिचय ज्ञानदेवांनी अनुभवला होता व त्यातून ज्ञानोत्तरभक्तीचा पुरस्कार करणारे ज्ञानेश्वर प्रेमपिसे झालेले आहेत. गूढरम्य हुरहूरीचे भावसांद्र श्रुतिगोचर आणि दृक्‌गोचर रूप ज्ञानेश्वरांच्या विराण्यांना आले. भक्त आणि ईश्वर यांच्या अलौकिक एकात्मतेसाठी सर्वच प्राचीन कवींनी प्रियकर-प्रेयसीच्या प्रतीकांची योजना केली. प्रणयाची उत्कटता, अतीतपण आणि ताजेपण या प्रतीकातून जाणवतो, पण ज्ञानेश्वरांची विरहिणी ही रंगबावरी अशी आर्ती आहे. 'चंदनाची चोळी माझं अंगअंग पोळी' 'धनु बाजे घुणघुणा' किंवा 'पैल तो गे काऊ' या विराण्यांना मिळालेला लोककाव्याचा जो बाज आहे त्यातूनही लोकसमजुती, आचारविचारांची संगत त्या विरहिणीच्या आर्ततेला काही वेगळाच रंग भरते. ज्ञानेश्वरांच्या गौळणींना आणि विरहिणीला लागलेले जे प्रेमपिसे आहे त्यातही एका अद्वैतमिलनाची आनंदाची निर्भर अवस्थाच ज्ञानेश्वर प्रगट करतात. लावण्य नव्हाळी मिरविणारी ज्ञानेश्वरांची गौळण आणि विराणी म्हणजे श्रीकृष्ण आणि विठ्ठलाशी एकरूप होणारे आणि त्या आनंदातच तृप्त होणारे कवीमन आहे. विरह-भावाने थरथरणारा विराण्यातील भावानुभव प्रसंगनाट्य अपूर्वाईने साक्षात करतो. विशिष्ट भाववृत्तीची संगीतात्मकताही ज्ञानेश्वरांच्या विराण्यात आणि गौळणीत गोचर होते. विरहिणीची प्रणयातूर आर्तता आणि मीलनातील आनंदकल्लोळ यांचे मोठे विलोभनीय चित्रण ज्ञानेश्वरांनी केले आहे. 'दर्पणी पाहता रूप नाहिसे हो आपुले' असे म्हणणारी व्रजगोपी जणू कृष्णमय होऊन जाते. अद्वयानंदाचा हा परमोत्कर्ष ज्ञानेश्वर साधतात. 'ज्ञानदेव निली हदची सावजी। प्रेमरसे कल्लोळी बुडी देत' हाच ज्ञानेश्वरांच्या सर्व वाङ्मयनिर्मितीमागील आनंदकल्लोळी असा साक्षात्कारी आत्मानुभव आहे. हेच ज्ञानेश्वरांचे प्रकाशाचे गाणे आहे.

नामदेवांच्या अभंगातून नामदेवांच्या मनोभावस्थितीतील वृत्त्यन्तर स्पष्टपणे जसे जाणवते तितके स्पष्टपणे ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयनिर्मितीत जाणवत नसले तरी त्यांचे अद्वयानंदाच्या किनाऱ्याकिनाऱ्याने जाणारे गंगाजळ शेवटी चैतन्याच्या आत्मरूपी सागराशीच एकरूप होऊन जाते ही गोष्ट तितकीच खरी! ज्ञानेश्वरीत भगवतद्‌गीतेच्या आधाराने अभिव्यक्ती होत असूनही तीन अंतिमतः चिद्विलासाचा स्फूर्तिरूप अनुभवच ज्ञानेश्वर गोचर करतात. अमृतानुभवाचा तर तो अनुभवविषयच आहे. अभंगगाथेत सगुणोपासने-तून त्या चैतन्यतत्त्वाचे श्रुतिरूप ज्ञानेश्वर न्याहाळतात.

ज्ञानेश्वरांनी आपल्या वाङ्मयातून भक्तिमार्गाचा जो ठसा जनमानसावर उमटविला त्यातून एक संतभक्तांची मांदीयाळीच निर्माण झालेली. विठ्ठलाची आराधना आणि भिवरेचे प्रांगणातील समुदाय यांचा खोल परिणाम अभंग निर्मितीवर झाला. चोखमेळा व त्याचे संपूर्ण कुटुंब, नामदेव व त्यांचे मोठे कुटुंब, ज्ञानेश्वर आणि त्यांचे कुटुंब ही भागवतपंथातील

तीन महत्त्वाची कुटुंबमंडळे आणि त्यांच्याबरोबर राहणारी इतर वारकरी मंडळी सर्वच व्यवसायधर्म आणि जातिवर्णव्यवस्था मान्य करून विठ्ठल चरणी मात्र एकरूप झालीत ! चौदाशेवर्षाचे चांगदेव बाल मुक्ताबाईचे शिष्य झाले; तर नामदेवाचे गुरु म्हणून विसोबाखेचर मिरविले. लाडाई, राजाई, सोयराबाई याही जनाबाई-मुक्ताईच्या सुरात सूर मिसळून हरिसेवारत झाल्या. याच सुमारास ज्ञानेश्वरांनी नामदेवांबरोबर तीर्थयात्रा करून जणू सिद्ध करून दाखविले की, 'आत्मरंगी आत्माराम !' ज्ञानदेव नामदेवांबरोबर गेलेला जो भक्तसमुदाय होता त्यानेच निर्माण केलेली अभंगगाथा वारकरी संप्रदायाला विशेषत्वाने लोकाभिमुख बनवू शकली. अनेकरंगी भक्ती या सर्वच वाङ्मयातून व्यक्त झाली. प्रेमभक्ती, वात्सल्यभक्ती, मधुराभक्ती, शृंगारभक्ती, गुरुभक्ती, मित्रभक्ती अशा अनेक नात्यातून भक्तीचे पदर ईश्वराशी एकरूप झालेत व भक्तिविचारातही विविधता आली. ईश्वराची अनेक रूपे आणि मानवी जीवनाच्या अनंत पातळ्या यांमध्ये संवाद साधला गेला अनंत रूपांतून कल्पनेच्या साह्याने आणि उत्कट मनोभावाने ईश्वर नित्य भेटू लागला. समाज जीवनाला एक श्रेयस् मिळाल्याचे समाधान आणि प्रेयस मिळाल्याचा आनंद अशिक्षित आणि अज्ञानीही उपभोगू लागला. एका तृप्त आणि समाधाननिर्भर अशी मानसिक स्थिती समाजाची निर्माण झाली. ईश्वराशी भांडण करणारी माणसेच त्याच्या गळ्यात गळा घालू लागलीत. जनाबाईला, नामदेवाला इतकेच काय तर सर्वच संतकवींना ईश्वरच नित्यनैमित्तिक कर्मे करताना मदतीचा हात देऊ लागला हे आध्यात्मिक समाधान संपूर्ण समाजाला एका विशिष्ट ध्येयाकडे घेऊन जाऊ शकले. चारही वर्णांची चौकट न मोडता, वंशपरंपरेने लादले गेलेले व्यवसाय करताना आणि गावकुसाबाहेर त्रस्त जीवन जगावे लागत असूनही एका आकंठ तृप्तीत आणि समाधानात माणसं एकत्र येत होती व पांडुरंगाशी संवाद साधीत होती. ही प्रचंड किमया व्यक्तीच्या ज्ञानोदयाने झाली आणि ती केली ज्ञानेश्वरांनी ! नामदेवाच्या आंधळ्या भक्तीचे डोळस भक्तीत रूपांतर केले तेही ज्ञानेश्वर आणि त्यांच्या कुटुंबियांनीच ![ज्ञानेश्वरांनी भक्तिमार्गाचा पुरस्कार करून विश्वचैतन्याची दिवाळी साजरी केली व त्यात संपूर्ण महाराष्ट्राला आनंदोत्सवात समाविष्ट करून घेतले. सत्य शिव आणि सौंदर्याच्या मार्गावर समाजाला घेऊन गेले आणि स्वतःला झालेला ईश्वरी साक्षात्कार समाजाचाही अनुभवविषय बनविला. दिव्याने दिवा पेटवावा तसे घराघरांतून प्रतिभेचे दीप प्रज्वलित झाले आणि भक्तिगीतांचे स्वर घराघरांच्या अंगणात घुमू लागले. इतकेच नव्हे तर जनाबाई, नामदेवांच्या अभंगनिर्मितीत तर साक्षात परमेश्वरच नित्यकर्मे करू लागला व संपूर्ण त्यांची प्रभावळच कविगृही कर्तव्यदक्ष होऊ लागली. सल्लामसलत करू लागली. व्यवसाय व्यवहार करू लागली. ईश्वराच्या अस्तित्वाचेच कमालीचे साधारणीकरण झाले की एक कल्पनारम्य अपरविश्वाचा जन्म अभंगगाण्यातून झाला. उदा. नामदेवाचे ज्ञानेश्वर समाधीच्या अभंगात पांडुरंग, रुक्मिणी, सत्यभामा यांची मावंदे घालण्यातील धावपळ लक्षात घेतली, तर समजू लागते की मनाने ही कविहृदये ईश्वराशी किती प्रकारांनी आणि अनंत माध्यमातून कशी एकरूप झालेली होती.

ही तादात्म्याची शिकवण ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयाने दिली आणि तिचा खोलवर परिणाम इतका झाला की रामजोशीसारखा लौकिक रचना करणारा शाहीरही त्यापासून वंचित राहिला नाही. भक्तिनिष्ठेचा पुरस्कार करणारे ईश्वरभक्तात अद्वैत कल्पिणारे आणि चिद्विलासाच्या आत्मानुभूतीत अद्वयानंदाची बरसात करणारे मराठी वाङ्मयाचे आदिकविकुलगुरु ठरले. त्यांच्या वाङ्मयावरच पुढच्या काळातील संपूर्ण मराठी वाङ्मय पुष्ट झाले होते. म्हणूनच विनोबांसारख्या आधुनिक संताला म्हणावे लागले : ज्ञानेश्वरी– मराठी वाङ्मय=शून्य ! अशी 'अक्षरता 'केवळ ज्ञानेश्वरांनी मराठी साहित्याला दिली असे नाही; तर मराठी 'अनुभूतीं 'नाही दिली हेच आता विस्ताराने बघावयाचे आहे.

अमृतानुभव

ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयकृतीमध्ये त्यांच्या प्रत्येकच कलाकृतीचे एक स्वतंत्रपण असते हे आतापर्यंत बघितले. ज्ञानेश्वरीपेक्षा अमृतानुभव वेगळा असला तरी परस्परांचे नाते आहे. अमृतानुभवापेक्षा चांगदेवपासष्टी वेगळी पण ज्ञानेश्वरी, अमृतानुभव आणि पासष्टी यांचे आन्तरिक सूत्र आहे व या सर्वांचे हरिपाठ आणि अभंगगाथेशी नाते आहे तेही समानपद्धतीने साक्षात होत असते. एकाच कविमनाची ही उल्लसिते असल्यामुळे त्यांच्यात आंतरिक साम्य येणे स्वाभाविकच आहे. परंतु ज्ञानेश्वरांच्या साहित्यनिर्मितीत दृष्टांताचे, उपमांचे, प्रतीकांचे आणि प्रतिमांचेही साधर्म्य असणे स्वाभाविक आहे. अनुभवाची अभिव्यक्ती आशयाद्वारा घडवीत असता एका विशिष्टपद्धतीनेच ज्ञानेश्वर प्रतिमांची व्यामिश्र वलये निर्माण करतात. त्या प्रतिमांच्या साह्याने ज्ञानेश्वरांची डोळस प्रज्ञा आणि कल्पक प्रतिभा जाणवते. दृष्टांत, रूपक आणि उपमांच्या समूहातून जीवनकक्षांची परिसीमा लक्षात येत असते. जीवनव्यवहाराचे मार्मिक, सूक्ष्म व रसिकतेने केलेले अवलोकन प्रतीत होत असते. निसर्गवेड्या मनाची भावांदोलने, कंपने आणि संवेदनांची थरथर अभिव्यक्त होत असते. विश्वव्यवहार आणि ईश्वर यांचे अनंतपद्धतीने नाते शोधण्याचा तो प्रयत्न असतो आणि या प्रयत्नात विश्वाच्या उग्रसुंदर आणि गंभीर पसाऱ्याचा पंचमहाभूतांचा चैतन्याशी अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न ज्ञानेश्वर करीत असतात. मग ज्ञानेश्वरीत उपदेशप्राधान्य येते. चांगदेवपासष्टीत उपदेशसंवाद येतो. हरिपाठात आणि अभंग गाथेत अध्यात्मानुभवच उत्कट भावानुभवाचा विषय होतो. अमृतानुभवातही वरीलप्रमाणेच निर्मितीप्रक्रिया घडली असूनही त्यापेक्षाही त्याचे स्वतःचे काहीतरी वेगळेपण जाणवते. ज्ञानेश्वरांनी अमृतानुभवात एक स्वतंत्र ज्ञानानुभवोपनिषद उभे केले आहे. त्यांची ही स्वतंत्र तत्त्वक्रीडा आहे. आत्मानुभवाला साक्षात करीत जात त्यातूनच ज्ञानेश्वरांनी एक प्रमाणग्रंथ निर्माण केला तो अनुभवामृतातून !

अमृतानुभवाची निर्मिती स्वान्तःसुखाय झाली असे वरवर दिसत असते. परंतु ज्ञानेश्वर हे कविमन कधी स्वान्ताशी बांधले गेलेले नसल्यामुळे सतत लोकांताचाच विचार स्वान्त विचारात अनस्यूत होत राहतो. अमृतानुभवाचे स्वान्तत्व हे त्याने मांडलेल्या तत्त्वविचारात आहे. प्राचीन काळापासून भारतीय तत्त्वविचार हा प्रस्थानत्रयींवर आधारित

व्यक्त झाला. उपनिषदे, ब्रम्हसूत्र आणि भगवद्गीता या त्रयींतील तत्त्वज्ञानाचे आचार-धर्माचे आणि उपदेशाचे मूलानुसरण आणि अवलंबन भारतीय तत्त्ववेत्त्यांनी केलेले होते. ज्ञानेश्वरांनी 'अमृतानुभवात' कोणत्याही तत्त्वग्रंथाला न स्वीकारता मनःपूत आणि स्वबुद्धिप्रामाण्याने एका नव्या पण जीवनस्पर्शी तत्त्वविचाराची भर भारतीय तत्त्वविचारात घातली. पैकी भगवद्गीता ही ज्ञानेश्वरांच्या अनुभवाचा विषय झालेली ज्ञानेश्वरीत होतीच. ब्रम्हसूत्राची सूत्रमयता व दशोपनिषदांच्या बरोबरीचे ज्ञानानुभवांकित असे निखळ स्वतंत्र आणि अनुभवप्रामाण्याने मुसमुसलेले एक उपनिषद अमृतानुभवाच्या निर्मितीने साक्षात झाले. प्रचंड जलाशयात एखाद्या पट्टीच्या पोहणाऱ्याने जलक्रीडा करावी व संथपणाने त्याने जलाशयाच्या मध्यात येऊन तळाशी सूर मारावा तसे ज्ञानेश्वर अमृतानुभवात तत्त्वक्रीडा करीत आहेत. ज्ञानेश्वरांची प्रतिभा ही अरूपाला रूप आणते ती निवेदनातून नव्हे तर संवादातून! सर्वच ज्ञानेश्वरवाङ्मयनिर्मितीत संवादात्मकता गोचर होत असते. अमृतानुभवातील संवाद हा श्रोता, वक्ता किंवा ईश्वरभक्त यांच्यामधील संवाद नसतो तर ज्ञानेश्वरांचा तो मनःसंवाद असतो. ती एकोक्ती असते. हृदय आणि आत्मा यांचा तो संवाद आहे. या अर्थाने अमृतानुभवाच्या निर्मितीत स्वान्तसुखायत्व येत असले तरी अंतिमतः गुरूने दिलेले ते 'खाजे' असते, 'खाऊ असतो' व तो 'प्रसादरूप खाऊ' ज्ञानेश्वर सर्वांना वाटण्यास निघालेले असतात. म्हणजे लोकानुवर्ती अशी अनुभवामृताची निर्मिती झालेली नसूनही ज्ञानेश्वर त्यांच्या प्रकृतिधर्मानुसार समष्टीमध्ये येऊन पोहोचतात. ज्ञानेश्वर आत्मसाक्षात्कारी संत होते. त्यांना झालेला आत्मसाक्षात्कार आत्मानुभवी आणि आत्मरत पद्धतीने मांडून त्यांनी आपल्या समानधर्मा जनांसाठी उपलब्ध करून ठेवला. अमृतानुभव स्वतंत्रही आहे आणि भक्तांमुळे त्याला परतंत्रताही आलेली आहे.

नामचर्चा

अनुभवाचे अमृत ज्ञानेश्वरांनी अमृतानुभवात ग्रथीत केले आहे. संपूर्ण जीवन जाणिवांची घुसळण होऊन जणू आलेला तात्पर्यबोध म्हणजे अनुभवामृत! 'अमृत' हा कविसंकेत ज्ञानेश्वरांचा अत्यंत जिव्हाळ्याचा आहे. अमृताचे माधुर्य, अमरत्व, देव-दानवांशी असलेले नाते आणि त्याही पलिकडे माणसाला असलेली दुष्प्राप्यता व मानवी-जीवनाची अंतिमता यांच्या संदर्भात 'अमृत' हे मार्मिक प्रतीक ज्ञानेश्वरांनी योजिलेले आहे. अमृतसिद्धीसाठी अपेक्षित असलेली मानवी चांगुलपणाची सद्गृहस्थपणाची व पुण्यवंताची अपेक्षाही येथे गृहीत आहे. ज्ञानेश्वरांनी आपल्या अनुभवालाच अमृताची प्रत दिलेली आहे. या पदामागील ज्ञानेश्वरांच्या स्वकर्तृत्वाविषयीचा उचित अभिमानही स्पष्ट होतोच. अमृतानुभवालाच ज्ञानेश्वर 'सिद्धानुवाद' म्हणतात. सिद्धाने केलेला जीव-नानुवाद असेच अनुभवामृताचे स्वरूप आहे. खुद्द ज्ञानेश्वर अमृतानुभव म्हणत नसून 'अनुभवामृत' असे या निर्मितीला म्हणतात, परंतु सुलभीकरण आणि शब्दविपर्य यामुळे अनुभवाचे अमृत, अमृताचे अनुभव झाले. ते गेले सातवे वर्षे अजूनही तितकेच प्राणसंजीवक ठरले आहे.

ज्ञानेश्वरीत परमामृतम् २ : ६७ व विवेकसिंधू ६ : ११ अशी मुकुंदराजांच्या काव्य-निर्मितीची ओळख ज्ञानदेवांनी दाखविली आहे, परंतु त्यावरून ज्ञानेश्वरांनी अनुभवामृत असे ग्रंथनाम घेतले असावे असे वाटत नाही, तर योगवाशिष्ठाचाच हा प्रभाव असावा असे मान्य होण्यास हरकत नाही. तसेच ज्ञानेश्वरी आधीची की अमृतानुभव आधीचा हाही वादविषय ज्ञानदेवांच्या अल्पायुष्याच्या संदर्भात नगण्य म्हणून समजावा. सांप्रदायिक आख्यायिका लक्षात घेता व नामदेव, जनाबाई आणि महीपती यांची साक्ष काढता ज्ञानेश्वरीनंतर अमृतानुभव रचला गेला असे मानले जाते. त्यातही प्रो. वा. ब. पटवर्धन किंवा पांडुरंगशास्त्री शर्मा सुचवितात त्याप्रमाणे बदल करण्याची आवश्यकता नाही; कारण केवळ वयाच्या ऐन तारुण्यातच उण्यापुऱ्या चार-पाच वर्षांत ज्ञानेश्वरांसारख्या प्रकाण्ड प्रतिभेच्या कवीने केलेली ही वाङ्मयनिर्मिती असल्यामुळे कविमनाची स्पंदने आणि श्वासोश्वासाचे प्रबंधपण ज्ञानेश्वरांच्या निर्मितीतून जाणवत असते. केवळ अमृतानुभवात नमनाचे पाच श्लोक आले म्हणून ते एकीकडे पारंपारिक प्रकरण आहे असे सिद्ध करावयाचे व दुसरीकडे ज्ञानेश्वरीपूर्वपण त्याला द्यावयाचे अशी तादृश्य आवश्यकता नाही.

अमृतानुभवावर अनेक टीका त्या त्या काळात लिहिल्या गेल्या तरी शिवकल्याणाची शके १५५७ मधील टीकेचा बराच बोलबाला झाला. 'यावरी भाषा ओवीबद्ध । अष्टदश मूळग्रंथ तो दहा प्रकर्णी विविध । विवरिला ग्रंथु ॥' असे शिवकल्याण म्हणतो. यावरून मूळ अखंड व एकग्रंथ असलेले अमृतानुभवाचे प्रकरणशः बांधणीरूप साक्षात झाले.

केवळ परमात्म वस्तूचा ज्ञानी मुक्तचिंतकाला आलेला आत्मानुभव अद्वैतानुसारी पद्धतीने ज्ञानेश्वर अमृतानुभवात मांडतात. स्वतःचे अनुभूतिप्रामाण्य व ब्रम्हचैतन्याच्या संदर्भातील प्रतीती द्वैतातील अद्वैत आणि अद्वैतातील द्वैताच्या साह्याने ज्ञानेश्वर अतिशय अलवारपणे स्वीकारू बघतात. 'दशदिशा आत्माराम' किंवा 'भरला घनदाट हरिदशे' ही अनुभूती अनंत परिमाणांच्या साह्याने मनःपूत रीतीने ज्ञानेश्वर पारखून घेतात. एकीकडे Nature of the Ultimate experience च्या संदर्भात Nature of the Ultimate Reality चा शोध घेतात, तर दुसरीकडे द्वैताच्या अन्वयातून आणि अद्वैताच्या व्यतिरेकातून The supereme Indentity चा संदर्भ लावू बघतात. निर्विशेष असे परमात्म्याचे स्वरूप ज्ञानाज्ञानातीत आणि शब्दांच्याही पलिकडचे आहे आणि ते फक्त स्वानुभवाचाच विषय होते. परिणतप्रज्ञ अशा सिद्धाचा स्वानुभवांकित अशा आपल्या आन्तर मनाशी चाललेला सुखसंवाद जाणीवनेणिवेपलीकडचा आणि विश्वचैतन्याच्या गूढ अस्तित्वाचा संदर्भशोध घेणारा असा अमृतानुभवात साक्षात होतो. अमृतानुभवच्या आशयाचा मूलकंद द्वंद्वातीत आत्मस्वरूपावर गुरुब्रह्माच्या साह्याने केंद्रिभूत झाला आहे. ज्ञानेश्वरांनी स्वानुभवच ब्रह्मरूपात आणि ब्रह्मालाच स्वानुभवात सामावून घेतले आहे. जीव आणि जगत दोन्ही ब्रह्मरूप असल्यामुळे ब्रह्माच्या ठिकाणी कोणतीही प्रतिकर्म व्यवस्था नाही. 'अमृतालाही उठी लाळ अमृते येणे ॥ १०–२० अशी अनुभवामृताची अवस्था आहे.

पाचश्लोकी प्रस्तावना

ज्ञानेश्वरीचा अठरावा अध्याय ज्याप्रमाणे एकाध्यायाची गीता आहे त्याप्रमाणे अमृतानुभवाच्या सुरुवातीला आलेले जे श्लोक आहेत ते संपूर्ण अमृतानुभवाचे सारसर्वस्व अभिव्यक्त करतात. एका अर्थाने अनुभवामृताची ती मंत्राक्षरे होत. महायोगी निवृत्तिनाथ हे माझे दैवत असून मी त्यांच्या आश्रयाला जातो. हे दैवत कसे तर अक्षर, अनाख्येय, आनंदरूप, अज आणि केवल! माझे गुरु म्हणजे साक्षात शांकरीविद्याच आहेत. या दोन्ही श्लोकांत केवळ निवृत्तिनाथ हे गुरु म्हणून नाथपंथीयांप्रमाणे सर्वभावे केलेले नमन नाही तर साक्षात गुरु म्हणजे शांकरी विद्याच ज्ञानेश्वर मानतात. गुरु हाच परमात्मा ज्ञानेश्वर मानतात. ज्ञानेश्वरांच्या सर्वच वाङ्मयनिर्मितीचे गुरू हे मूळ सूत्ररूप आहे. येथे शांकरीविद्याच गुरूरूप घेऊन अवतरली आहे.

तिसऱ्या श्लोकात शिवशक्तीच्या द्वैताचा आभास निर्माण करून पाचव्या श्लोकात निरूपाधिक शंभूला म्हणजे ब्रह्माला नमन केले आहे. पहिल्या श्लोकातील निवृत्तिनाथाचे जे अनाख्येय, आनंदमय, अज, अक्षर आणि केवल रूप आहे तेच पाचव्या श्लोकात निरुपाधिक ब्रह्मरूपात ज्ञानेश्वर न्याहाळतात. आणि द्वैताकडून अद्वैताकडे व अद्वैताकडून द्वैताकडे आपला प्रवास आरंभितात. या श्लोकांत अमृतानुभवातील आशयाचे बीजकेंद्र आहे. किंबहुना या श्लोकांचे अन्वयव्यतिरेकात्मक पद्धतीने केलेल्या स्पष्टीकरणाचे आणि विवरणाचे काव्यात्म रूप म्हणजे अमृतानुभव होय. निवृत्तिनाथ, शिवशक्ती आणि निरुपाधिक शंभू हे अमृतानुभवाचे स्वानुभूतिविषय आहेत आणि त्यांचा ज्ञानेश्वरांनी घेतलेला अनुभव व त्या अनुभवाच्या अभिव्यक्तीत ज्ञानेश्वरांना जाणवलेले 'नेतिनेति' असे अंतिम सत्य! स्वानुभवाच्या बीजातून स्फुरलेला आणि फुललेला हा महावृक्ष!

संपूर्ण विश्वाचे उत्पत्तिबीज असलेले शिवशक्ती यांना मी वंदितो असे म्हणून ज्ञानेश्वरांनी शिवशक्तीची द्वैतावस्थेतील अंतिम अद्वैतावस्था न्याहाळली आहे. शिवशक्ती हे जगाचे मातापिता आहेत, म्हणजे जगाचे आदिकरण प्रकृतिपुरुष असून त्यांच्यापासून जगोत्पत्ती झाली असली तरी हे विश्व म्हणजे तरी अंतिमतः शिवपणानेच आर्धार्धे होऊन नांदत आहे.

दो दांडी एक श्रुती । दोही फुली एक दृति
दोहो दीवी दीप्ती । एकीचि जेवी
दो ओठी एकी गोष्टी । दो डोळा एकी सृष्टी
तेवी तिही सृष्टी । एकीचि जे ॥ अमृ. १: १८–१९.

वरील ओव्यांतून ज्ञानेश्वरांनी दोन भिन्न सजातीय वस्तूतून एकच सजातीय वस्तुलाभ स्पष्ट केला आहे, पण ज्या शिवशक्तीच्या किंवा पुरुषप्रकृतीच्या संसाराचे उत्कट रम्याद्भुत रसपूर्ण गृहचित्र ज्ञानेश्वर रेखाटतात त्यात त्यांची मार्मिकता आणि नवीनता स्पष्ट होते. वास्तविक वेदान्ताच्या अद्वैतीभूमिकेवरून सर्वच ज्ञानेश्वरपूर्व तत्त्ववेत्त्यांनी जीवनाचा अन्वयार्थ लावलेला होता. पण ज्ञानदेवांनी पुरुषप्रकृतीच्या संसारात खेळणाऱ्या

विश्वबाळाचे आणि प्रकृतिपुरूषांचे जे जन्यजनकत्व दाखविले तो ज्ञानेश्वरांच्या स्वतंत्र प्रतिभेचा स्वतंत्र अविष्कार आहे. देवोदेवी, प्रीयुचि प्राणेश्वरी, मेहूण, जोडपे, दंपत्य, पतिव्रता भ्रतार, कांतुप्रिया, प्रियप्रिया, शिवमिथुन असे ज्ञानेश्वरांनी प्रकृतिपुरुषाचे उत्कट, गाढ, अपूर्व परस्परानुप्रवेशी प्रेमचित्र रंगविले तर दुसरीकडे

जया एके सत्तेचे बैसणे । दोघां एका प्रकाशाचे लेणे
जे अनादि एकपणे । नांदती दोघे
जेणे देवे संपूर्ण देवी । जिचे वीण काही ना तो गोसावी
किंबहुना एकोपजीवी । एकाएकाची
कैसा मेळु आला गोडिये । दोघे न माती जगी इये
की परमाणूही माजी उवाये । मांडिली आहाती
जिही एका एकावीण । न कीजे तृणाचेही निर्माण
जिचे दोघे जीवप्राण । जिया दोघा ।। अमृ. १: ८–१२.

ज्ञानेश्वरीत ज्ञानेश्वरांनी पतिव्रतेचे वार्धक्य कसे निष्काम असते यावर भर दिला तर अमृतानुभावाच्या संसारचित्रात मात्र तारुण्याची मुसमुसती आणि लवलवती अभिलाषा प्रियुच्या आणि प्राणेश्वरीच्या ठिकाणी किती उत्कट आहे याचे मोठे रसपूर्ण शृंगारचित्र रेखाटले.

आणि प्रकृति पतिव्रते । पडिला एक पत्नीव्रते
येणेही कारणे जेयाते । पुरुषु म्हणो ये ।। ज्ञा. ८: १८७.
अर्धनारी नटेश्वरी । जो पुरुषु तोचि नारी ।। ज्ञा. ९: २६९.

असे ज्ञानेश्वरीत प्रकृतिपुरुषाच्या एकात्मतेचे वर्णन ज्ञानेश्वर करतात.

जया दोघांच्या आलिंगनी । विरोनी गेली दोनी
अवघीयाचि रजनी । दिठीच जे ।। अमृ १: ४७

अशी प्रकृतिपुरुषांची शृंगारिक एकता आणि दोहोंची एकता आणि एकात्मतेचे दुहेरीपण अनंत कल्पनाचित्रांच्या साह्याने ज्ञानेश्वर उभे करतात. शिव आणि शक्ती हे द्वैत भासत असले तरी ते निरुपाधिक अद्वैतच होय हा नवा सिद्धांत ज्ञानेश्वरांनी मांडला. भूतेशु आणि भवानी, प्रियकर आणि प्रेयसी प्रकृती आणि पुरुष ही द्वंद्वे अंतिमतः निर्द्वंद्वेच होत. त्यासाठी गूळ आणि गुळाची गोडी, सुवर्ण आणि अलंकार, कापूर आणि त्याचा परिमळ, दर्पण आणि प्रतिबिंब, रंभागर्भ आणि आकाश, मीठ आणि सागर या विविध उपमानांच्या साह्याने प्रतिमासमूह निर्माण केले आहे. शिवशक्तीच्या द्वैताद्वैततेचे स्वरूप हे मूलबीजाच्या दोन शकलांच्या स्वरूपाचे ज्ञानेश्वरांना भावलेले आहे. बीजाची दोन्ही शकले भिन्न दिसत असली तरी अंतिमतः त्याच्या मातीमध्ये रुजण्यातूनच सृजन प्रक्रिया घडणार असते व बीजाच्या सृजनातून वृक्ष निर्मिती होताच बीज शकले नष्ट होतात. नाहीशी होतात. त्याप्रमाणे प्रकृतीच्या आणि पुरुषाच्या समन्वयातून विश्वनिर्मिती होते. पण

विश्वनिर्मितीनंतर प्रकृतिपुरुष राहात नाहीत तर अंतिम शिवतत्त्वच निरुपाधिक स्वरूपात चिरंतन राहते अशा शिवतत्त्वाशी 'मी' एकरूप होतो, हा एक नवा सिद्धांत ज्ञानेश्वरांनी मांडला. सांख्यतत्त्वनिरूपणात किंवा वेदांत्यांच्या तत्त्वनिरुपणात प्रकृतीला पुरुषापेक्षा वेगळे आणि जड मानले गेले किंवा वेदांत्यांनी तिला अज्ञानस्वरूपी आणि मायामय म्हणून मिथ्या मानले. ज्ञानेश्वरांनी पतिपत्नीच्या उत्कट प्रणयाचे भावचित्र रेखाटून शिवशक्ती, परमात्मा आणि जीव या सर्वांचेच ऐक्य प्रतिपादन केले व तेही एका रम्याद्भूत उत्कट रसपूर्ण अशा गृहस्थाश्रमी संसार चित्रणातून की ज्यात प्रकृती ही गृहितागमा आहे, तर पुरुष हा गृहस्थ आहे. मोठ्या सुखाचा आणि परस्परांवर प्रचंड प्रेम करणाऱ्या युगुलाच हा उत्कट प्रणयाने सांद्र झालेला रम्य संसार!

गृहस्थाश्रमातील रम्य संसाराचे कल्पनाचित्र ज्ञानेश्वरांनी निर्माण केले. पण हा लौकिक संसार नाही, तर लोकविलक्षण असे त्यांचे स्वरूप आहे. अतिआवडीने प्रियकर-प्रेयसी एकमेकांना गिळून टाकतात तर जगवाळ निर्मितीतही स्वतःच्या द्वंद्वात त्याचा प्रवेश होऊ देत नाहीत. गोसावी निद्रिस्त झाला की भार्या संपूर्ण संसाराची जबाबदारी सांभाळते. भार्या दिसेनाशी झाली तर भ्रतार अंग टाकतो. परस्परांवरील प्रगाढ प्रेमामुळे परस्परांच्या अलिंगनसौख्यात ती मिटून जातात आणि दोघेही अर्ध्या अर्ध्या प्रमाणात जगनिर्मिती करतात. शिवाचे जगकर्तृत्व शक्तीमुळे तर शक्तीचे सत्तास्फुरण शिवामुळे होते. व अंतिमतः एक चैतन्यशिवच आत्मरूपात उरते की जे सर्व विश्वात व्यापून आहे अशावेळी मीच शांभवी झालो असे ज्ञानेश्वर म्हणतात. प्रकृतिपुरुषाच्या विश्वात्मक संसाराचेही मूळ स्वरूप अंतिमतः चैतन्याच्याच ठिकाणी असते व त्याच्याशीच प्रकृतिपुरुषही एकरूप होतात. व ते चैतन्य मुंगीपासून तृणापर्यंत आणि ब्रह्मान्डापासून परिमाणूपर्यंत एकच आहे.

ज्ञानेश्वरांच्या मनःकोषात सद्गुरूला एक अनन्य स्थान आहे. ज्ञानेश्वरीतील 'आचार्योपासनम्' च्या मूळ गीतेतील श्लोकात ज्ञानेश्वरांनी गुरूविषयीचा आपला नितांत आदर आणि आत्यंतिक श्रद्धा व्यक्त केलेली होतीच. पण अमृतानुभवातील गुरूवंदनात गुरू आणि शिष्य हे द्वैतभेदन करणारा सद्गुरू म्हणजेच आत्मरूपदर्शक आरसाच होय. शिष्याला गुरुशिवाय ज्ञान नाही. गुरुशिष्यात वास्तव द्वैत नसून गुरूच शिष्याच्या निमित्ताने विकसित झालेला असतो. शिष्याला गुरूमुळेच मुक्ती मिळते कारण परमात्म सद्गुरू हा ज्ञानरूप चिदाकार होय. गुरू म्हणजे प्रवृत्तीरूपी गंगेचा समुद्र आहे. तो अविद्यारूपी काळोख नाहीसा करून बोधरूपी प्रकाश सर्वदूर फैलावतो. व बोधामृताची प्राप्ती गुरूकडून होताच शिष्य 'अहमब्रह्मास्मि'च्याही पलीकडे पोहोचतो. गुरूच आपले रूप शिष्यात न्याहाळतो. पंचमहाभूतांनी व्याप्त असे जड आकाश गुरुच्या ज्ञानरूप चिदाकाशाची बरोबरी करू शकत नाही. चंद्रसूर्याचे प्रकाशणे हेही गुरुच्या भेदातीत दृष्टीने घडते. गुरुला पाहिल्याबरोबर वंदकत्व आणि वंदत्व हे द्वैत नष्ट होते. परमात्मस्वरूप सद्गुरु जरी रूपातीत भासला तरी तो सत्शिष्याच्या प्रतीकाने जगत् विलास करतो.

निवृत्ति जया नाव । निवृत्ति जया बरव
जया निवृत्तीचो राणीव । निवृत्तीची ॥ अमृ. २:७०
ओपसरयाचे बळ । घेऊनि मिरवे कीळ
तैसे रत्न नव्हे निखिळ । चक्रवर्ती हा ॥
तैसे निवृत्तिपणासी कारण । हाचि आपणया आपण
घेयावया फुलचि झाले घ्राण । आपुली वृत्ति ॥ अमृ. २: ७४-७५.

अशा अकृत्रिम स्वयंसिद्ध निवृत्तिरूपी चैतन्यतत्त्वाला मी वंदन करून, वाचाऋणातून मुक्त झालो असे ज्ञानेश्वर म्हणतात आणि आपल्या व गुरुच्या ठिकाणचा अभेद स्पष्ट करतात. शिवशक्तीचे द्वैतपण आणि अन्तिमतः असलेले अद्वैत, त्याचप्रमाणे सद्गुरु आणि ब्रह्मरूपाचे जीवाशी असलेले द्वैतपण आणि अंतिमतः निर्माण झालेले अद्वैत स्पष्ट करून ज्ञानेश्वरांनी गुरुपदाला आत्मरूपपदावर नेऊन बसविले आहे. ज्ञानेश्वरीच्या पंधराव्या अध्यायाच्या सुरुवातीलाच

आता हृदय हे आपुले ! चौफाळोनि भले
वरि बैसऊ पाऊले । श्रीगुरुची
ऐक्यभावाची आंजुळि । सर्वेन्द्रिय कुड्मळि
वरी भरूनी पुष्पांजली । अर्घ्यु देऊ ॥ ज्ञा. १५ : १, २

अशी गुरुची मानसपूजा बांधली आहे.

तिसऱ्या प्रकरणात ज्ञानेश्वरांनी परा, पश्यन्ती, मध्यमा आणि वैखरी या वाणींचे ऋण गुरुवंदनाने फेडलेले आहे. देहाच्या नाशाबरोबर हातपाय नाहीसे होतात, पण इंद्रिय नाश पावतात ते मनाच्या लयाबरोबर. गुरुच्या उपदेशाने अविद्या नष्ट होते. परापश्यंती मध्यमा आणि वैखरी यांनी आत्म्याची झोप म्हणजे अज्ञाननिवृत्ती होते, पण पूर्णतः निरास होत नाही. लाकूड जाळले तरी निखारा उरतो, लोखंड तापविले तरी लोहरस निर्माण होतो, मीठ विरघळले तरी आपला मीठपणा सोडत नाही, त्याप्रमाणे चारही वाणी अविद्येबरोबर नाहीशा झाल्या तरी तत्त्वज्ञानाच्या रूपाने पुनः जिवंत होतात. 'अहम् ब्रह्म' हा अहंकारही बंधच आणि 'देहोऽहम्' ही वृत्तीही बंधच ! फरक पडतो तो स्थूलसूक्ष्माचा ! देहापासून ब्रह्मापर्यंत होणारा चार वाणींचा व्यवहार हेच वाचाऋण ते गुरुवंदनाने मूळ ज्ञानात्मक आत्मरूपाला वंदन करून वाचाऋण फेडतो. विशिष्ट प्रतीकांच्या साह्याने गुरु आणि शिष्य यातील द्वैत नष्ट करून अंतिमतः गुरु म्हणजेच ज्ञानरूप आत्मस्वरूप अशा अद्वैतापर्यंत येऊन पोहोचतात. ज्ञानेश्वरीत जशी गुरु-शिष्यांची संवादात्मक चर्चा अनुभवावयास मिळते, तसे अमृतानुभवात घडत नाही. कारण येथे ज्ञानेश्वरच आत्मसुखसंवाद आत्मसुखार्थ करीत आहेत. त्यात लौकिक अनुभवविषयच काव्यपातळीवर जाऊन पोहोचतात. माध्यान्हीची छाया, ओहोळाचा ओलसरपणा, कर्पुरमिश्रित पाण्याचा गंध या संयुक्त प्रतीकांतून ज्ञानेश्वर आपला मूलानुभव गोचर करू बघतात.

परमात्मतत्त्व हे ज्ञानाचा विषय होत नसून ते ज्ञानरूप असते. वस्तुनिरपेक्ष आणि अज्ञाननिरपेक्ष असे स्वयंभू आणि स्वतंत्र परमात्मतत्त्व अनुभूतीच्या साह्याने प्रतितीग्राह्य होते हा विचार ज्ञानेश्वरांनी चौथ्या प्रकरणात मांडला आहे.

वात दशाही ते निमालिया । येणे जै ये उपाया
ते केवळ नाशावया । दीपाचे परि ।।
उठणे की पडणे । कुचभाराचे कोण जाणे
कां फाकणे की सुकणे । जाउळाचे
तरंगांचे रूपा येणे । तयाची नाम निमाणे
का विजूचे उदैजणे । तोचि अस्तु ।। अमृ. ४:७ ते ९

अज्ञान नाशाप्रमाणेच ज्ञाननाशही कसा होतो ते ज्ञानेश्वर निरनिराळ्या दृष्टान्तातून दाखवून देतात. अज्ञानाचा नाश करून ज्ञान उत्कर्षाला पोहोचत असले तरी त्याचाही शेवटी नाशच होतो. परमात्मस्वरूप असे ज्ञानाज्ञानातीत आहे. ते शुद्ध असून द्वैतातीत आहे.

जो निरंजनी निदेला । तो आणिकी नाही देखिला
आपुलाही निमाला । आठवू तया
परी जीवे नाही नोहे । तैसे शुद्ध असणे आहे
हे बोलणे न साहे । असे नाहीचे ।।अमृ. ४:३३–३४.

अमावस्येच्या अंधारात उभा असलेला काळा माणूस, मलीन आकाशाचे आकाशपण, आटलेल्या झऱ्याचा ओलसरपणा या प्रतीकांतून मूळ परमात्म स्वरूपाचे शुद्धत्व, स्वयंभूपण आणि सर्वधर्मरहितता ज्ञानेश्वरांनी प्रतिपादिली.

पाचव्या प्रकरणात सत् चित् आणि आनंद या तीन संकल्पनांतून एकच अनुभव व्यक्त होतो असे ज्ञानेश्वर सांगतात. कांतिमयता, कठिणता आणि कनकत्व म्हणजे जसे सुवर्ण किंवा द्रविभूत अवस्था, माधुर्य आणि अमृतत्व म्हणजे जसे अमृत त्याप्रमाणे सत् चित् आनंद म्हणजे परमात्मस्वरूप सच्चिदानंदी असे! सत्ता, प्रकाश व सुख म्हणजे असत्, जड आणि दुःख यांची व्यावृती होय असे श्रुतींनी मानले. असत्च्या निरसनासाठी सत् व अचेतनाच्या निरसनासाठी चित् तत्त्व योजून जडनिवृत्ती केली. सूर्य जड पदार्थांना प्रकाशित करतो, ते पदार्थ सूर्याला प्रकाशमान करीत नाहीत त्याप्रमाणे, सच्चिदानंद आत्मा हा मूळ परमात्मस्वरूपी लय पावतो. स्वतःसिद्ध परमात्मवस्तू ही प्रमाणकक्षे पलीकडची असून सच्चित्सुख हे बोल वस्तुवाचक आहेत. नदीचा ओघ सागराला मिळतो आणि संपतो. फूल सुकते आणि फळ निर्माण होते, पुढे फळ नष्ट होते व तृप्ती देऊन रसही लुप्त होतो. चेहऱ्याला चेहरा दाखविला की आरश्याचे काम संपते तसे सच्चिदानंद ही पदे द्रष्ट्याला दृष्य दाखवून (परामात्मस्वरूप) मौन स्वीकारतात. कारण परमात्मवस्तू ही सुखरूप आहे. दुःखशून्य आहे.

रूप नाही तै लावण्य । अंग नुठी तै तारुण्य
क्रिया न फुटे तै पुण्य । कैसे असे ?

असा प्रश्न उपस्थित करून ज्ञानेश्वर म्हणतात

आता यया वरी जे बोलणे । ते येणेचि बोले शहाणे
जै मौनाचेही निपटणे । पिऊनि गेले ।। अमृ. ५ : ५३.

अनुभव्य, अनुभविक आणि अनुभव ही त्रिपुटीच गळून पडते तेथे शब्दांची मातब्बरी कशी राहणार ! शब्द हे भिंगुळवाणे ठरतात ! स्मारकरूपच होतात.

ज्ञानेश्वरांनी अमृतानुभवाच्या दुसऱ्या प्रकरणात वाचाऋण फेडण्याचा प्रयत्न केला तर सहाव्या प्रकरणात परमात्मस्वरूपाचे विस्मरण हेही भ्रामक कसे हे शब्दप्रमाण खंडनातून दाखविले. परमात्मस्वरूपाचे स्मरण करून देणारा स्मारकरूपी शब्द असल्यामुळे मरण तरी कुणाचे करायचे ? कारण परमात्म स्वरूप एकटे अंतिम असे आहे. स्वसंवेद्य. परमात्म्याला स्मरणासाठी कुणाची मदत लागेल !

अविद्या तव स्वरूपे । वांझेचे कीर जाउपे
मा तर्काचे खुरपे । खांडणे कोणा ।। अमृ. ६:२४.

अभावरूपाने असलेल्या अविद्येचा नाश करणे म्हणजे

तेणे शेळी गळा दोहावी । गुडगा डोळा वास पहावी
वाळवूनी काचरी करावी । सांज वेळेची
जांभई वाटूनी रसु । तेणे काढावा बहुवसु
कालवूनि अळसु । मोदळा पाजावा
तळहातीचे विचरू । केस सुखे
घटाचे नाहीपण फोडू । गगनाची फुले तोडू
सशियाचे मोडू । शिंगसुखे
वांझेचे लेकरू । परणु सुखे ।। अमृ. ६:४८ ते ५३.

आपण आपल्याशीच लग्न करणे किंवा सूर्याने आपले आपल्यालाच ग्रहण लावलेले माहीत आहे का ? अशा अतिशयोक्त व चमत्कृतिपूर्ण उपमानांनी ज्ञानेश्वरांनी शब्दखंडन घडविले आहे. मौनाचेही मौन व्हावे या भूमिकेचा हा मूलारंभ होय. मूलानुभवाच्या अभिव्यक्तीसाठी शब्दांची जाणवलेली मर्यादित अवस्था ज्ञानेश्वर सांगू जातात. सच्चिदानंद आत्मारामाचे स्वरूप जसे शब्दातीत आहे त्याचप्रमाणे अतींद्रिय अनुभवाची अभिव्यक्ती ही शब्दांच्या माध्यमातून एका मर्यादेपलीकडे गोचर होऊ शकत नाही.

एवं शब्दैक जीवने । बापुडी ज्ञाने अज्ञाने
साचपणे वने । चित्रिची जैसी ।। अमृ. ६:१०२.

सहाव्या प्रकरणात ज्ञानेश्वरांनी शब्द या मूलद्रव्याचीच मर्यादा स्पष्ट केली तर सातव्या आणि आठव्या प्रकरणांत परतत्त्व स्वरूपाची अंतिम निकरात्मकता स्पष्ट झाली आहे. अज्ञान आणि ज्ञान या दोन्ही संज्ञा कशा आत्मस्वरूपदर्शनात सापेक्ष आहेत हे विविध दृष्टान्तातून दाखवून दिले. संपूर्ण अमृतानुभवातील जवळजवळ अर्धा भाग या दोन प्रकरणात विभागला गेला आहे, ही दोन्ही प्रकरणे म्हणजे आत्मतत्त्वाचे ज्ञानाज्ञानातीत जे निखळ स्वरूप आहे त्या स्वरूप प्रमेयाचे उद्घाटन येथे ज्ञानेश्वरांनी केलेले आहेत. सृष्टीतील नामरूपात्मकताच अविज्ञामूळ आहेत. परमात्मा नामरुपातीत असल्यामुळे अनुभव, अनुभवी आणि अनुभव्य किंवा द्रष्टा दृश्य आणि द्रष्टव्य यांना अस्तित्वच उरत नाही. अज्ञान हे ज्ञानसापेक्ष आहे. अज्ञान आणि आत्मस्वरूप एकत्र नांदत नाहीत तसे ते आहे असे म्हणणे म्हणजे रात्र आणि दिवस, जगणे आणि मरणे, शीत आणि उष्ण एकत्र नांदतात असे म्हणण्यासारखे आहे. ज्ञानस्वरूप आत्मा असल्यामुळे मिठाची मासोळी जशी पाण्यात आणि पाण्याबाहेरही राहू शकत नाही, त्याप्रमाणे अज्ञानाला अस्तित्वच उरत नाही. विश्व व्यवहाराच्या मुळाशी चैतन्यतत्त्व फक्त असते. द्रष्टा आणि दृश्य दोन्ही चैतन्यस्वरुपीच आहेत. द्रष्टा आणि दृश्य या अज्ञानसापेक्ष कल्पना असून स्फुरणशील चैतन्य स्वरूपच एकमेवाद्वितीय स्वरूपात चिरस्थायी आहे. आणि त्याचीच प्रभा म्हणजे हे चैतन्याने रसरसलेले जग होय. जग आणि चैतन्यस्वरूप भिन्न नाहीत. जगाच्या ठिकाणी चैतन्यस्वरूपी परमात्मरूप सामावलेले आहे. ज्ञानखंडनातून आणि अज्ञानखंडनातून ज्ञानेश्वरांनी वरील सिद्धान्त मांडला.

नवव्या प्रकरणात अनीर्वचनीय असे ज्ञानस्वरूप आकलन झालेल्या प्रबुद्धाची जीवदशा ज्ञानेश्वरांनी सांगितली. देव हाच भक्त होतो व भक्तालाच देवपण येते इतका मुक्तावस्थेतील हा आत्मानुभव. बंधमोक्षातील सहजावस्थेतील मुक्ताला विश्व हाच एकांत आणि सर्व शिवरूपच होते. वाच्य वाचकभेद, हरिहरांची लीनता, नावरूपांचा शेवट घडवून आणलेल्या या आनंदभूमीचाच हे गुरु तू आम्हाला वारसा दिलास व 'मी तू पणाची बोळवण' करून तूच आमचा सोयरा झालास! दहाव्या प्रकरणात या अननुभूत आनंदाची 'खिरापत' ज्ञानेश्वर सर्वांना देण्यास निघाले आहेत.

आम्ही बोलीलो जे काही । ते प्रगटची असे ठायी
मा स्वयंप्रकाशा काई । प्रकाशावे बोले ॥
या कारणे मिया । गौप्य दाविले बोलोनिया
ऐसे नाही आपसया । प्रकाशुचि ॥
म्हणोनि माझी वैखरी । मौनाचेही मौन करी
ज्ञानदेवो म्हणे श्रीमंत । हे अनुभवामृत
सेवोनी जीवन्मुक्त । हेचि होतु
स्वानुभूति परगुणे । डोगरले ॥

परि अमृताही उठी लाळ । अमृते येणे
आणि मुक्त मुमुक्षु बद्ध । हे तववरी योग्यता भेद
अनुभवामृतस्वाद । विरुद्ध जंव ।। अमृ. १०: ९ ते २५.

अमृतानुभवाच्या पहिल्या अध्यायात संसारशिल्पातून सुरूवात करुन अमृतानुभावाच्या उपसंहारात ज्ञानेश्वरांनी या लौकिक संसारातील मी माझे तू तुझे या उपाधीपासून तू मला मुक्त केलेस व हे सद्गुरू तू माझा 'सोयरा' झाला आहेस. वऱ्हाडात 'सोयरा' या शब्दाचा अर्थ दोन घराण्यांच्या नातेसंबंधातून निर्माण झालेल्या ऋणानुबंध! संसारापासून मुक्त झालेले ज्ञानेश्वर निवृतिनाथांचे 'सोयरेपण' स्वीकारून अमृतानुभवाचा शेवट करीत आहेत.

शिवशक्ती, गुरुशिष्य या द्वंद्वातून ज्ञानदेवांनी स्वतःला जाणवलेले आत्मतत्त्वाचे अनीर्वचनीय स्वरूप व्यक्त केले आहे. विश्वाचा पसारा प्रकृतिपुरुषामुळे होत असला तरी त्याच्यापाठी असलेले चैतन्यतत्त्वच स्फुरणशील असून ते शब्दातीत आहे. शब्दांच्या साह्याने त्याला समजावून घेणे म्हणजे सूर्याने कुणाच्या तरी मदतीने उगवण्यासारखे आहे असे ज्ञानेश्वर म्हणतात. परमात्मस्वरूप गुरुरूपात ज्ञानेश्वर न्याहळत असल्यामुळे गुरु आणि शिष्य यातील निर्द्वंद्व अवस्थाही पूर्णतः केवलानुभवाच्या प्रतीतीची ठरते.

शब्दमाध्यमातून मूळ केवलानुभवापर्यंत पोहोचत असता ज्ञानेश्वरांनी 'प्रकाशाचे लेणे', (१:८) 'प्रकाशाची कवाडे' (७:१२३), 'प्रकाशाची कथा' (७:२५८), 'स्वप्रकाशाचा घास', (७:२६७) जाणिवेची लेणी (७:१२८) 'प्रकाशाचा दीवो (७:२७३), 'चित्गगन' (८:१९), 'चिदादित्य' (८:१९), 'स्वयंप्रकाश' (१०:८), 'सूर्य दिठी' (१०:२१), अशा प्रकाशदीप्ती स्वरूपात चैतन्यानुभवाचे स्फुरण अनुभवले आहे ही आत्मप्रभा, वस्तुप्रमेशी तदाकार स्वरूपात न्याहाळली आहे. ज्ञानेश्वरी आणि अभंगगाथेतही चिद्घनचिद्कार ब्रह्मतेजाची अपेक्षा ज्ञानेश्वरांनी व्यक्त केली आहे. 'ब्रह्मतेज पुंजाळले' असे ज्ञानेश्वर म्हणतात. शब्दमाध्यमाची मर्यादा व अपुरेपणाविषयी ज्ञानेश्वरांचे मन खंतावते व शब्दखंडनातही आपली प्रामाणिक खंत ते प्रगट करतात. तर शेवटच्या अध्यायात विश्वात्मक आनंदोत्सव अमृतानुभवाच्या सणाने उपभोगण्याची इच्छा व्यक्त करतात. शब्दसृष्टीचे कुबेर असलेल्या ज्ञानेश्वरांनाही आपला स्वात्मानुभव अभिव्यक्त करीत असता 'मौनाची मिठी' पडलेली आहे.

म्हणौनि माझी वैखरी । मौनाचेही मौन करी
हे पाणियावरी मकरी । रेखिलिया ।। अमृ. १०:६

परा-पश्यन्ती यांमधील वैखरी ह्या अंतिम वाणीने आतापर्यंत स्वानुभूतीचे पक्वान्न तुमच्यासमोर मांडले पण शेवटी त्याची रुची शब्दसंभारापेक्षा अनुभूतीनेच येणार आहे म्हणून मी मौनाचेही मौन स्वीकारतो. आतापर्यंत मी जे निरुपण केले ते म्हणजे पाण्यावर मासुळीची चित्राकृती चित्रित करण्यासारखे आहे. मासुळी असल्यामुळे ती

पाण्याबाहेर राहू शकत नाही. कारण तिचा तो प्रकृती जीवनधर्म आहे आणि पाण्यावर ती चित्राकृती स्पष्ट रूपवंत होऊ शकत नाही; कारण ती स्फुरणशील, चंचल, तरंगान्वित पाण्यात रेखांकित होऊ शकत नाही. त्याप्रमाणे आत्मानुभवातील विश्वात्मक चैतन्याचा अनुभव ज्ञानेश्वरांना जाणवतो व तो त्यांनी शब्दांच्या गाभाऱ्यातून भोगण्याचा प्रयत्न केला असला तरी शब्द हे स्मरणरूप स्मारके होत असे ज्ञानेश्वर पुनःपुनः स्पष्ट करतात. शब्दसंहिता गोमटी आहे पण तरीही ती अनुभवाच्या जाणिवेच्या प्रांतात थिटी आहे. शब्द हे फक्त डोळ्यांसाठी असतात, तर अध्यात्मशास्त्राची प्रतीती अंधही घेऊ शकतात. चर्मचक्षूंपेक्षा ज्ञानचक्षू सर्वश्रेष्ठ असून लिखित शब्द हा स्मरणदानी प्रसिद्ध (६ : १२) आहे. ती केवळ स्मारके होत (६:१८) असे ज्ञानेश्वर शब्दखंडनातून पुनःपुनः दाखवून देतात आणि त्याही पलीकडे आत्मानुभूतीच्या प्रत्ययात्मक प्रतीतीचा प्रांत आहे असे ठासून सांगतात त्यासाठी त्यांनी शब्दांना अक्षरशः धारेवर धरलेले आहे. उदा. 'शब्द नासणे' (६:५५), 'निरर्थक थिटा शब्द' (६:७१), 'निरर्थके जल्पे' (६:१०१) 'बापुडी शब्दैकजीवने (६:१०२), 'विखुरली वाचेचिये आते' (७:२७७) म्हणजे वाणीला शब्दांनी फाटे फोडले आहेत. 'शास्त्रांची भाटगिरी' (९:६९) शब्द करतात असे अमृतानुभवात सर्व दूर ज्ञानेश्वर म्हणत असतात. केशवसुत, बी, मर्ढेकर या आधुनिक कवींचीही शब्दांविषयी हीच धारणा आहे. शास्त्रकाटयाची कसोटी आणि द्रौपदीचे सत्व तिला मिळो असे म्हणणारे कवीही शेवटी ज्ञानेश्वराप्रमाणे अस्वस्थच दिसतात. ज्ञानेश्वरी-मध्ये 'अमृतातेहि पैजा जिंके' अशी तरफदारी ज्ञानेश्वरांनी शब्दांची केलेली होती. परंतु अमृतानुभवातील अनुभवच अतिशय अलवार आणि सोलीव असल्यामुळे तो पाऱ्यासारखा चंचल आणि जाऊळाच्या फुलाप्रमाणे नाजुक, चंद्रासारखा शितल आणि सूर्यासारखा तेजस्वी रूपात ज्ञानेश्वरांना भावतो आहे. त्याच्या अभिव्यक्तीसाठी ज्ञानेश्वर बुद्धी आणि मन यांच्याशी 'झोंबी' करतात. अमृतालाही लाळ निर्माण करणाऱ्या अलौकिक स्वात्मा-नुभवाला मौनाच्या निपटण्यातून मौनाची वाट दाखवितात. शब्दांच्या माध्यमातून त्या सोलिव अनुभवापर्यंत पोचण्याचा प्रयत्न मी केला परंतु शेवटी हा प्रयत्न म्हणजे आकाशाला कवेत घेणे, सूर्याला हात लावणे आणि समुद्राला गिळून टाकण्यासारखा ठरला. म्हणून शेवटी मौनाच्या महाद्वारातूनच मी जाणिवेतून आणि त्याही पलिकडील नेणिवेतून जातो त्याचा मला प्रत्यय येतो असे शेवटी ज्ञानेश्वर सुचवितात.

ना तरी निंदास्तुति । दोन्ही मौनांसाठी जाती
मौनी मौन आथी । बोलता बोली ।। अमृ. ९:५१

एखादा भोवरा फिरता फिरता स्वकेंद्राशी स्थिररूप फिरत राहावा आणि बघणाऱ्याला मात्र तो फिरतो आहे की स्थिर आहे याबद्दल अचंबा वाटावा त्याप्रमाणे ज्ञानेश्वरांनी चैतन्य हेच ज्याचे स्फुरणरूप आहे त्या आत्मानुभवाचे अत्यंत मार्मिकपणे आणि सूक्ष्मपणे विवरण केले आहे. कारण ज्ञानेश्वरांना आत्मवस्तूचे बुद्धी आणि मनापलीकडचे रूप जाणवलेले आहे.

देह हाडाची मोळी । मी म्हणोनी पोटाळी
तो अहंकारू गाळी । पदार्थू हा
बुद्धि बोध्या सोके । ते यवढी वस्तू चुके
मना संकल्प निके । याहीहूनी ॥ अमृ. ७ : १०९-११०.
नाडिले जे वादीकोडे । आतुचि बाहेरी सवडे
तैसा निर्णो सुनाथा पडे । केला येथ ॥ अमृ. ७:११६.

अशा रीतीने ज्ञानेश्वर प्रकाशाची कवाडे उघडतात आणि स्वान्ताबरोबर परान्तालाही आपल्याबरोबर महाप्रकाशाच्या सूर्यदिठीचा अनुभवप्रत्यय देतात.

विविध संवेदनासंपृक्त प्रतिमावर्तुळे निर्माण करणे ही तर या शब्दसृष्टीच्या ईश्वराची सहजलीला आहे. पण त्यातही विरोधमूलक संवेदनासंपृक्त प्रतिमा परस्परांच्या जवळ ठेवून एक अलौकिक प्रत्यय ज्ञानेश्वर देत असतात. उदा. ज्वाळांच्या माळा (७ : १३६) आणि रश्मीचा परिवार, चांदण्याचा चंद्रावरील प्रकाश! दोन विरोधी संवेदना एकत्र आणून ज्ञानेश्वर प्रतिपाद्यातील टोकदार अनुभव अभिव्यक्त करीत असतात.

ज्ञानेश्वरीत निवृत्तिनाथांविषयी गौरवपर उद्‌गार काढीत असता ज्ञानेश्वरांनी निवृत्तिनाथांना 'व्यवहारा' असे विशेषण लावले आहे. व्यवहारा म्हणजे व्यापारी असा अर्थ अभिप्रेत आहे. अमृतानुभवातही लघुत्वाचे मुद्दल (२:२०) आणि ऐक्याचे मुद्दल (१ : ५९) आहे. त्यातही हातचा राखून ठेवलेला आहे (५:३९) आणि त्यावरील व्याजही बंधमोक्षाचे व्याज (५ : ६६) साडलियेचे व्याजे (७ : २११) वाढतेभरते आहे, असेही एक कल्पनाचित्र 'व्यवहारो' ज्ञानेश्वर काढतात.

अमृतानुभव हे असे प्रतीती काव्य आहे. बद्ध मुमुक्षूच्या पलिकडे पोचलेल्या जीवन्मुक्ताला विश्वसंविद्‌रहस्याच्या उद्‌घाटनात आलेला केवळ, निःसंग, निष्कलंक आणि प्रकाश दीप्तिगर्भी अनीर्वचनीय आणि अलौकिक आत्मानुभव!

निसर्गाच्या, पंचमहाभूतांच्या आणि लौकिक मानवी जीवनाच्या संगतीने आणि सोबतीने निवृत्तिनाथांना सांगाती घेऊन केलेला हा आत्मप्रवास! द्वैतातून अद्वैताकडे, द्वंद्वाकडून निर्द्वंद्वाकडे, स्वान्ताकडून अनंताकडे, लौकिकातून अलौकिकतेकडे, जडशीळाकडून स्फुरणचैतन्याकडे, स्थिरचराकडून अनंताकडे, अंधाराकडून प्रकाशाकडे आणि समकालिकतेकडून सार्वत्रिकतेकडे जाण्यासाठी आरंभिलेला हा महाप्रवास!

रूप सामावले, दर्शन ठाकले । अंग हारपले तेचि भावी
पाहो जाय तव पाहण्यावेगळे । ते सुख सोहळे कोण बोले
जेथे जाय तेथे मौनचि पडिले । बोलवेना पुढे काय करू
आदिअंती तोचि सबराभरितु । रूपनामरहितु नीच नवा ॥

अशा एका अभंगातही परतत्त्वाच्या निःशब्दावस्थेतील ज्ञानेश्वरांचा अनुभव आहे. ज्ञानेश्वर

म्हणतात, 'तू ते अवघे गुज म्या सांगावे! वाचेविन बोलावे निःशब्दाकारे' हीच ज्ञानेश्वरांची अभंगातील मनोवस्था अमृतानुभवात गोचर होते.

कालतत्त्व आणि ज्ञानेश्वर

मराठी वाङ्मयाच्या सुवर्णयुगाला सुवर्णाची प्रत देणाऱ्या श्रेष्ठ कवींमध्ये ज्ञानदेवांचे स्थान अनन्यसाधारण असे आहे. ही गोष्ट तर खरीच. पण त्या काळात संगीत, शिल्प, नृत्य या कलांच्या आविष्काराला एक विशिष्ट अवस्था प्राप्त झाली होती. संस्कृतनिष्ठा सर्वांगीण जीवनव्यवहारात प्रकर्ष पावली होती. अशा वेळी मानवतेचा उद्घोष करणारी भगवद्गीता ज्ञानेश्वरांनी निरूपणासाठी स्वीकारून पूर्वकालीन आणि समकालीन वाङ्मय-व्यवहारात एक बदल घडवून आणला. एकतर मराठी भाषेचे आविष्कारसामर्थ्य ज्ञानेश्वरांनी ओळखून लोकभाषेतून वाङ्मयनिर्मिती केली. ज्ञानेश्वरांना आपल्या कर्तृत्वाचा सार्थ असा अभिमान होता. आपल्या कवित्वाविषयी योग्य ती समज होती म्हणूनच भागवतादि पुराणांवर आधारलेल्या आणि संस्कृतवाङ्मयनिष्ठा व्यक्त करणाऱ्या मराठी कवितेपेक्षा ज्ञानेश्वरांनी गीतेला प्राधान्य दिले. गीतेतील मानवतावाद आणि मानव्याची महती ज्ञानेश्वरांनी लक्षात घेतली. कृष्णार्जुनसंवादातून गोचर होणारे सार्वत्रिक मानवी जीवनाचे रहस्य व मानवी मनाच्या तळाचा शोध घेऊन त्यातून जीवनविषयक तत्त्वज्ञान एका नव्या पद्धतीने स्वीकारण्याचा प्रयत्न ज्ञानेश्वरांनी केला. या संदर्भात त्यांनी केलेल्या गीतास्तुतीला अर्थ प्राप्त होतो. वेद, उपनिषदे आणि ब्रह्मसूत्रे यांतील ब्रह्मविद्येचे सार गीतेत आहे आणि अर्जुनाच्या निमित्ताने गीतेतून जगाचा उद्धार अपेक्षिता येतो अशी ज्ञानेश्वरांची गीतेविषयीची भूमिका होती.

यादवकालीन सामाजिक, आर्थिक, धार्मिक अशा प्रेरणा ज्ञानेश्वरीतून शोधून काढून त्यांच्या साह्याने ज्ञानेश्वरांचे लोकोत्तरत्व निश्चित करण्याचा प्रयत्न करणे योग्य होणार नाही. हे यापूर्वी सिद्ध केले आहेच. कारण महानुभाव गद्यातून जशा सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक घटनांचा अन्वयार्थ लावता येतो तसा ज्ञानेश्वरीतून फार अभावानेच परिस्फुट होतो. अर्थात समकाळाच्या प्रेरणा ज्ञानेश्वरीत बिलकूल नाहीत असा वरील विधानाचा अर्थ नाही. पण 'लीळाचरित्र', 'गोविंदप्रभुचरित्र' किंवा 'रुक्मिणीस्वयंवर', 'नामदेवाचे अभंग' या मराठी वाङ्मयातून यादवकाळाच्या खुणा स्पष्ट होतात तशा तितक्या प्रमाणात ज्ञानेश्वरीत होत नाहीत याचाच अर्थ असा की स्वतःच्या काळाबरोबर कवी जात आहे असे वाटावे पण काळाच्याही पुढे जाऊन भविष्याचा वेध घेण्याचा प्रयत्न श्रेष्ठ कवी करीत असतो. ज्ञानेश्वरीच्या संदर्भात असे म्हणता येईल. आणि 'तत्त्वचिंतक कवी' म्हणून ज्ञानेश्वरांना लक्षात घेता येईल.

'विश्व स्वधर्मसूर्ये पाहो'

यादवकाळातील सर्वच कवी विशिष्ट पंथाच्या आधाराने उभे होते. आपण काही काव्यनिर्मिती करीत आहोत अशी त्यांची प्रबळ भावना नव्हती तर जगाचा उद्धार

आणि परमेश्वरप्राप्ती यांविषयी सतत चिंतन करण्याचा हेतू त्याच्या निर्मितीमागे होता. ईश्वराशी संवादी स्वरूप व मानवनिष्ठांतील तत्त्वरूप यातील एकरूपता म्हणजे 'धर्म' संकल्पना. ज्ञानेश्वरांची धर्मावद्दलची भूमिका ही अतिशय व्यापक होती. केवळ सदाचार, सद्गुण, नीतितत्त्व यांच्या पाठपुराव्यापेक्षाही 'विश्व स्वधर्मसूर्ये पाहो' असे म्हणून मानव धर्माचा उल्लेख त्यांनी केला आहे. माणसाची ईश्वराशी संवादी भूमिका निर्माण करण्यासाठी 'धर्म' संकल्पना ज्ञानेश्वरांना अभिप्रेत असल्यामुळे वर्ण, जाती, व्यक्ती, कुटुंब आणि समाज या मानवी जीवनाच्या विविध पातळ्या आहेत त्यांचे 'परस्परा मैत्र जडे' अशी धर्मासंबंधी ज्ञानेश्वरांची कल्पना होती. तत्त्वज्ञान आणि आचारविचार यांची सांगड घालून एक उदार आणि वैचारिक उत्स्फूर्त पण स्वतंत्र अशी धर्मदृष्टी ज्ञानेश्वरांनी प्रगट केली. समकालीन कवींनी मांडलेली धर्मकल्पना आणि ज्ञानेश्वर यांच्यात या ठिकाणी फरक पडतो. मानवी जीवनाशी एकरूप होणारी धर्मजाणीव ज्ञानेश्वरांनी प्रगट केली. एकीकडे समाजाचा विकास आणि दुसरीकडे त्या समाजाचा मनोविकास घडवून आणण्याचे कार्य ज्ञानेश्वरांना अभिप्रेत होते. ते त्यांनी आपल्या धर्मविचाराच्या साह्याने ज्ञानेश्वरीत मांडले. धर्माविषयीची एक पृथगात्म भूमिका त्या काळात तर नवीन होतीच पण आजही त्या संकल्पनेतील सहिष्णुता, मानवता व सर्वकल्याणकारी भूमिका ही जगालाही वंद्य ठरणारी अशी असलेली दिसते. म्हणूनच माझ्या मते ज्ञानेश्वर हे देशकाल परिस्थितीची बंधने स्वीकारणारे कविमन नव्हते !

धर्म रक्षावयासाठी करणे आटी आम्हासी

भागवतधर्माला निश्चित अधिष्ठान देऊन त्या धर्माचा खोलवर परिणाम जनतेवर करण्यासाठी ज्ञानेश्वरांच्या काळात आणि नंतरही अनेक संतमहंत निर्माण झाले. किंबहुना संत आणि ईश्वर यांच्या कार्यकर्तृत्वात साम्यही बघण्याचा प्रयत्न तुकारामाने केला होता 'देवासी अवतार : भक्तासी संसार : दोहींचा विचार : एकपणे' किंवा 'धर्म रक्षावया साठी : करणे आटी आम्हासी' ईश्वराचा जसा एक भावनिक आदर्श सामान्य माणसासमोर असतो, त्याच्या कर्तृत्वाविषयी जशी निःसंदिग्ध निष्ठा असते, त्या दृष्टीने संतमहंतांकडे ज्ञानेश्वरांनीही बघितले आहे. परंतु संतांकडून अपेक्षित असलेला भक्तिमार्गाचा आदर्श व त्या भक्तीची असलेली उत्स्फूर्तता ज्ञानेश्वरांनी इतर सर्व संतांपेक्षा वेगळी मानली होतीन ज्ञानेश्वरांनी भक्तीचा जो पुरस्कार केला ती केवळ साधनभक्ती नव्हे (ज्ञानाने डोळस झालेली, प्रेमाशी एकरूप झालेली अशी ही ज्ञानभक्ती आणि प्रेमभक्ती आहे. समाजाचे मानसिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी आणि कर्मशिकवणुकीने कार्यरत झालेली अशी ही ज्ञानोत्तर भक्ती ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीतून प्रामुख्याने मांडली.) महानुभाव कवितेतून आणि नामदेवादी भक्तकवींच्या किंवा एकनाथ, रामदास, तुकाराम या सर्वच यादवकाळापासून पेशवेकाळापर्यंत निर्माण झालेल्या मराठी कवींच्या कवितेतून ज्ञानेश्वरांच्या भक्तिविचाराचे अनुकरण झाले, पण त्याला जी झळाळी ज्ञानेश्वरांनी दिली तशी कुणाही

मराठी कवीला देता आली नाही. अतिशय जिवंत, टवटवीत असे रूप या भक्तिविचाराला ज्ञानेश्वरांनी दिले. म्हणून हा विचारही वेगळा ठरला. केवळ गीतेला न अनुसरता ज्ञानेश्वरांनी 'अनुभवाचे बोल' आपल्या भक्तिविचारातून मांडले ते आजही अनुकरणीय ठरले आहेत. पसायदानात जी अपेक्षा ज्ञानेश्वर करतात त्यातून सर्व समाज सुखी करण्याचे, प्राणिमात्रांच्या सुखाची चिंता वाहणारे सार्वत्रिक आणि विश्वकल्याणात्मक असे ध्येय गोचर होते. नामरूपात्मक विश्व आणि परमेश्वर यांची एकरूपता आत्म्याशी व्हावी, त्यातून विश्वात्मक प्रेमानुभूती अनुभवावी ही ओढ प्रामुख्याने ज्ञानोत्तर भक्तीमधून ज्ञानेश्वरांनी प्रगट केली आहे. याच प्रकारच्या अनुभवाला निवृत्तिनाथांनी 'प्रेममुद्रा' म्हटले आहे. तर अनुभवामृतात ज्ञानेश्वरांनी याच अनुभवाला 'प्रेमभक्तीचा व्यवहार' असे नाव दिले आहे. ज्ञानेश्वरांचा भक्तिविचार केवळ क्रांतिकारक होता असे नव्हे, तर नव्या युगाची निर्मिती करणारा असा होता. अद्वैत तत्त्वज्ञानाला ज्ञानेश्वरांनी दिलेले संस्करणही मूळ ज्ञानेश्वरीत बघण्यासारखे आहे. मध्ययुगीन धर्मविचार ज्ञानेश्वरांनी आपल्या चिद्विलासाच्या सिद्धान्ताने दिपवून टाकला. अद्वैततत्त्वज्ञान स्वीकारताना मायावादाला बाजूला सारीत भक्तिमार्गाची तात्त्विक बैठक सिद्ध केली आहे. ज्ञानेश्वरांच्या ठिकाणी असा लेल्या तत्त्वचिंतकाचे आणि प्रौढ आणि आत्मनिष्ठ अशा कवीचे प्रत्यंतर येथे वाचकाल घडते. एकीकडे ज्ञानेश्वर अद्वैत सिद्धांत स्वीकारतात पण त्याच वेळी अद्वैतात असलेला मायावाद दूर करतात. कारण शुद्धज्ञान अर्थात ब्रह्माचे, मिळविण्यासाठी मायेचे किंवा अविद्येचे आवरण नाहीसे होणे आवश्यक आहे. त्यासाठी मूळ ब्रह्मावर मायेचे आवरण कसे येईल असा ज्ञानेश्वर प्रश्न करतात.

जालेनि जगे मी झांके : तरि जगत्वे कोण फांके
कोळेवरि माणिके : लोपिजे काई ॥
म्हणोनि मग परौते : सारूनि पाहिजे माते
जैसा नव्हे उखितें : आघवेंचि मी ॥

परमात्माच जर विश्वरूपाने नटलेला असेल तर निरास कशाचा करावयाचा? कारण विश्वाचा निरास म्हणजे पर्यायाने परमात्म स्वरूपाचाच निरास होय असे ज्ञानेश्वरीत सर्वदूर ज्ञानेश्वर प्रतिपादन करतात.

गीताच का स्वीकारली

ज्ञानेश्वरांनी भगवद्गीता निरूपणासाठी घेतली असता 'मी गीतार्थ मराठीमध्ये आणला' असे ज्ञानेश्वर म्हणतात. किंवा 'देशीकार लेणे' असे ते त्याला नाव देतात. उदा. ज्ञा. १८ : ७४० ज्ञा. १८ : १७१४, ९ : २२, १८ : १७१८ या ठिकाणी तसा उल्लेख येतो. ज्ञानेश्वरांच्या समोर गीता होती. तिच्या प्रवचनाचा अंतिम हेतू सामाजिक नीतिमत्तेची पातळी उंचविण्याचा होता. पसायदानातून आणि इतरत्र सर्व ज्ञानेश्वरीच्या अध्यायांतून आपल्याला स्पष्टपणे जाणवते. चक्रधरांनी मराठी भाषेचा केलेला प्रचार व

तिला बोलीचे असलेले मुग्धसौंदर्य व त्यात ज्ञानेश्वरांच्या काव्यात्मकतेने घातलेली भर यामुळे यादवकालीन मराठीभाषा कसदार तर झालीच पण तिला एक प्रौढ आणि विकसित रूप प्राप्त झाले. मराठी भाषेला ज्ञानेश्वरांनी दिव्य तेज, विचारांची खोली आणि स्वतंत्रता मिळवून दिली. गीतेच्या साह्याने विश्वरहस्याचा व मानवी जीवनाचा शोध घेणाऱ्या ज्ञानेश्वरांच्या प्रतिभेने कल्पनाशक्तीच्या साह्याने एक अलौकिक जग निर्माण केले. मानवी जीवनाच्या बाह्यांगाची किंवा व्यवहाराची मीमांसा करण्यासाठी ज्ञानेश्वर सिद्ध झालेले दिसत नाहीत, तर जीवनभाष्य करण्यासाठी जगाच्या अन्तर्जीवनाची उकल करून तिचा अर्थ लावण्याचा प्रयत्न ज्ञानेश्वर करतात. वस्तुतः ज्ञानेश्वरांनी स्वीकारलेले तत्त्वज्ञान कमी-अधिक प्रमाणात भारतीयांचेच जीवनधारणेचे तत्त्वज्ञान होते पण त्या तत्त्वज्ञानाला नित्यनूतन अर्थ देण्यात आणि मानवी जीवनाच्या कृतिउक्तीत हे शोधण्याचा प्रयत्न ज्ञानदेव करतात.

तेयां अक्षरा आंतूला भाओ : पाववीन मी तुमच्या ठाओ
आइका म्हणे ज्ञानदेओ : निवृत्तीचा ।। ज्ञा. १४ : ४११ ।।

शब्दांच्या आतला भावबंध शोधून तो कृतीत आणण्याचा प्रयत्न ज्ञानेश्वर करतात. केवळ कुटुंब-समाज या संदर्भात ज्ञानेश्वर विचार करीत नाहीत तर समष्टीच्या संदर्भात या ठिकाणी विचार केला जातो. प्रत्येक कलात्मक आविष्कार म्हणजे जर कलावंताने जीवनाचे केलेले भाष्य असेल तर ज्ञानेश्वरी म्हणजे या जीवनभाष्याचा आकरग्रंथ होय.

यादवकाळात आणि नंतरही ज्ञानेश्वरांचे द्रष्टेपण आणि लोकोत्तरत्व सर्व कवींनी स्वीकारलेले होते. भावनात्मक, विचारात्मक आणि अद्वैतानुभूतीच्या अभिव्यक्तीच्या संदर्भात ज्ञानेश्वर 'आदर्श' मानले गेले. प्रो. वा. ब. पटवर्धन यांनी म्हटल्याप्रमाणे "ज्ञानदेव is thus the father of Marathi literature. He was the first eloquent advocate of the doctrine of Bhakti in Marathi. He was probably the first to break away with the tradition that required all religious and higher thought to be conveyed through Sanskrit. He was the first gifted Poet and man of letters. He was discovered the artless grace of Marathi." ज्ञानेश्वरांच्या समकालीन कवींपैकी 'श्री ज्ञानराजे केला हा उपकार : मार्ग हा निर्धार दाखविला' असे सेना न्हावी म्हणतो. 'विवेकसागर सखा माझा ज्ञानेश्वर : मरुनिया जावे वा माझ्यापोटी यावे' असे जनाबाई म्हणते. 'ज्ञानेश्वर नामे धरिला अवतार, क्षेत्र अलंकापूर इंद्रायणी' असे चोखोबाने म्हटले आहे. 'नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी : एकतरी ओवी अनुभवावी' असे नामदेव म्हणतात. 'ज्ञानियांचा गुरु राजा महारावो : म्हणती ज्ञानदेव ऐसेतुम्हा' असे ज्ञानाचा एका असलेल्या एकनाथांनीही म्हणून ठेवले आहे.

यादवकाळापासून आजपर्यंत ज्ञानेश्वरांच्या भागवतसंप्रदायाला, ओवीअभंगाला आणि तत्त्वज्ञानाला अनुसरणारे महाजन मिळाले पण ज्ञानेश्वरांनी ज्या वैचारिक भूमिके-

वरून संस्कृतीची टीका केली आणि जीवनाची मीमांसा केली ती वैचारिक अनुभूतीची अभिव्यक्ती अनन्य ठरली. विश्वासमोर ज्ञानेश्वरांनी ठेवलेल्या 'अमानित्व' 'अदंभित्व', 'शांती', 'आर्जव', 'शुचित्व', 'स्थैर्य', 'आत्मनिग्रह', 'अनहंकार', 'अनासक्ती' 'समचित्तता' या संकल्पना मानवी जिव्हाळ्यातून माणसामाणसाविषयीच्या अपार प्रेमातून, आणि वात्सल्यातून ज्ञानेश्वरांनी अभिव्यक्त केल्यामुळे त्यांना त्रिकालाबाधित असे अस्तित्व प्राप्त झाले आहे. ज्ञानेश्वर शरीरदृष्ट्या यादवकाळाच्या उत्तरार्धाशी बांधले गेले असले तरी त्यांच्या कवितेला त्या काळापुरते मर्यादित स्वरूपातून न्याहाळणे म्हणजे सागराला बांध घालण्यासारखे किंवा सूर्याला पकडून ठेवण्यासारखे होईल! कोणत्याही साम्राज्याला शह देण्यासाठी किंवा एखाद्या धर्मसंप्रदायाला मागे खेचण्यासाठी जर काव्यनिर्मिती ज्ञानेश्वरांच्या हातून झाली असती तर ते निमित्त संपताच ज्ञानेश्वरांची कविता शून्यवत झाली असती, तिचे प्रयोजन संपले असते. पण श्रेष्ठ प्रतिभावंत कवी काळाबरोबर जात आहे. चालतो आहे असे सामान्यजनांना वाटत असते, पण तो एकाच वेळी भूतकाळाचा, वर्तमानाचा आणि भविष्याचा वेध आपल्या काव्यनिर्मितीतून घेत असतो अशा वेळी कोणती कालिकता त्याला बांधू शकेल? आपल्या जीवनविषयक जाणिवा कलात्मकरूपाने आविष्कृत करून ज्ञानदेवांनी मराठी भाषेला, तत्त्वज्ञानाला आणि कवितेला जन्माचे ऋणी करून ठेवले आहे. ज्ञानेश्वरीतून व्यक्त होणारी प्रखर आत्मप्रतीती आणि धगधगते विचारदर्शन व व्यामिश्र संवेदनांचे अनुभवविश्व साक्षात करणारी कविता अजून जन्माला यावयाची आहे. 'हृदया हृदय एक जाले : ये हृदयीचे ते हृदयी घातले' असा संबंध ज्ञानेश्वरी आणि भारतीय संस्कृतीचा आहे. कविवर्य बीनी म्हटल्याप्रमाणे 'बडाबंडवाल्यात ज्ञानेश्वर नामे पहिला' ही आजही वस्तुस्थिती उघड आहे. ज्ञानेश्वरांच्या काव्यकर्तृत्वाचे अवलोकन जसे जसे करीत जावे तसे तसे ते 'दशांगुळे उरले' असेच होऊन जाते. भारतीय संस्कृतीचे सातत्य हे तिच्यातील धर्मविचारात आहे आणि ज्ञानेश्वरांनी या 'धर्म' विचाराला एक नवा अर्थ दिला आणि मानवधर्माची प्रतीती दिली. नामदेवांनी म्हटल्याप्रमाणे 'तया उतराई व्हावे कवण्या गुणे' असेच ज्ञानेश्वरांच्या अलौकिक काव्यकर्तृत्वाविषयी व कालातीत अशा व्यक्तिमत्त्वाविषयी म्हणता येईल! त्या दृष्टीने ज्ञानेश्वरीच्या केवळ प्रस्तावना तपासून बघितल्या तरी वरील विधानाचा पडताळा येईल.

ज्ञानेश्वरीच्या अध्याय प्रस्तावना

मूळ भगवद्गीतेला अध्याय प्रस्तावना किंवा कोणतेही मंगलाचरण नसतानाही ज्ञानदेवांनी भगवद्गीतेला स्वीकारून जी ज्ञानेश्वरी निर्मिली तिच्या अध्यायांना मंगलाचरणांनी आणि प्रास्ताविकांनी सजविले आहे. यावरून ज्ञानदेवांचा दृष्टिकोण अभिव्यक्त होत असला तरी केवळ जनहित आणि लोककल्याणकारी भूमिकाच प्रबळ ठरली असे नाही तर ज्ञानदेवीच्या सर्व अठरा अध्यायांच्या प्रस्तावना लक्षपूर्वक अभ्यासिल्या तर काही विशिष्ट निष्कर्ष सप्रमाण काढता येतील.

महाभारतात भगवद्गीता ही महाभारताच्या उत्तरार्धात सहाव्या पर्वातील पंचविसाव्या अध्यायापासून आलेली आहे. म्हणजे तिचे स्वरूप मूळ आशयापासून वेगळे नाही व पृथकही नाही. ज्ञानदेवांनी अशी गीता स्वीकारून तिला संपूर्ण, स्वयंपूर्ण आणि स्वतंत्र रूप दिलेले आहे. गीतेच्या अठरा अध्यायांतील मूळानुरूप आशय स्वीकारीत पण योग्य ते व प्रतिभामूल स्वातंत्र्य घेत ज्ञानेश्वरीची रचना झालेली आहे ही गोष्ट उघडच आहे. ज्ञानेश्वरीचा प्रत्येक अध्याय परस्परपूरक आणि परस्परावलंबी असा गीतेप्रमाणेच झालाही आहे. वास्तविक मूळ गीतेतील तत्त्वज्ञानाला आणि कर्मवादाला स्वीकारण्यात ज्ञानदेवांनी मूळ ग्रंथाशी असलेला आपला भावनिक, वैचारिक आणि तात्त्विक अनुबंध स्पष्टही केलेला आहे. असे असूनही ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीच्या अध्यायांना दिलेल्या ज्या प्रस्तावना आहेत त्या प्रस्तावनामुळे ज्ञानेश्वरीला एक भगवद्गीतेपेक्षाही वेगळी 'पूर्णता' मिळालेली आहे. विशिष्ट एकसंधता वैचारिकदृष्ट्या तिच्यात निर्माण करता आली व नैमित्तिकाचे रूपांतर तात्कालिकाशी सीमित न राहता चिरंतनात झाले. ज्ञानेश्वरांनी काही विशिष्ट अध्यायांनाच प्रास्ताविके जोडली आहेत. काही अध्याय मूळ गीतेतील अध्यायांप्रमाणे 'आणि मग.....' असे एकदम सुरू झालेले आहेत. या प्रस्तावनातून ज्ञानदेवांना काय अभिप्रेत आहे याचा शोध घेणे आवश्यक ठरते !

मूळ ओवीसंख्या व प्रस्तावना

ज्ञानेश्वरीच्या पहिल्या अध्यायात प्रस्तावनादाखल अशा चौऱ्यांशी ओव्या आल्या आहेत तर अठराव्या अध्यायाच्या सुरुवातीलाही चौऱ्यांशी ओव्याच प्रास्ताविक म्हणून आल्या आहेत. यावरून गीतेचा पहिला अध्याय आणि शेवटचा अध्याय भावार्थ प्रतिपादनासाठीच निर्माण झालेला आहे असे नाही तर ज्ञानेश्वरीच्या पहिल्या अध्ययात संपूर्ण भगवद्गीतेला अनुसरून प्रास्ताविक ज्ञानेश्वरांनी केले तर अठरावा अध्याय हा कळसाध्याय असल्यामुळे पुनः सर्व विषयांचे संसूचन करून अठरावा अध्याय समाप्त केला आहे. एक स्वतंत्र कलाकृतीचे रूप येथे ज्ञानेश्वरांनी आपल्या भावार्थ दीपिकेला दिले. ज्ञानेश्वरीच्या संदर्भात नेहमी एक गोष्ट लक्षात येते की ज्ञानदेवांनी फक्त काही अध्यायांची सुरुवात पारंपारिक पद्धतीने म्हणजे मंगलाचरणाने केली आहे. ती तशी होणे स्वाभाविकही होते परंतु बाकी सर्व अध्यायांच्या सुरुवातीच्या ओव्या मूळ भगवद्गीतेला अनुसरणाऱ्या नसून स्वतंत्रपणे त्या त्या विषयाचे प्रास्ताविक म्हणून आल्या आहेत. वास्तविक भगवतगीतेचे स्थान महाभारताचा एक महत्त्वपूर्ण भाग म्हणून आहे. त्यामुळे मूळ महाभारताची सुरुवात पारंपारिक मंगलाचरणांनी झालेली होतीच. गीतेत मंगलाचरणांची आवश्यकता भासली नाही, परंतु त्याच गीतेला 'देशीकार लेणे' म्हणून निर्माण करीत असता मात्र ज्ञानेश्वरांनी जवळजवळ प्रत्येक अध्यायाला स्वतंत्र प्रास्ताविके जोडली.

पहिल्या अध्यायाची मूळ ओवीसंख्या २७३ असून प्रास्ताविक ओव्या ८४ आहेत. दुसऱ्या अध्यायाची मूळ ओवीसंख्या ३७४ असून एकही ओवी प्रास्ताविक म्हणून

योजलेली नाही. तिसऱ्या अध्यायात मूळ ओवीसंख्या २७१ असून एकही ओवी प्रास्ताविकात नाही. चौथ्या अध्यायात मूळ ओवीसंख्या २२२ असून चौदा ओव्या प्रास्ताविकात आल्या आहेत. पाचव्या अध्यायाची मूळ ओवीसंख्या १७८ असून एकही ओवी प्रस्तावनादाखल नाही. सहाव्या अध्यायाची ओवीसंख्या ४९४ असून ३८ ओव्या प्रस्तावना म्हणून आल्या आहेत. सातव्या अध्यायाची मूळ ओवीसंख्या २०५ असून एकही ओवी प्रस्तावना म्हणून आलेली नाही. आठव्या अध्यायाची मूळ ओवीसंख्या २६९ असून एकही ओवी प्रास्ताविकात आलेली नाही. नवव्या अध्यायाची मूळ ओवीसंख्या ५३० असून ३३ ओव्या प्रास्ताविकात आल्या आहेत. दहाव्या अध्यायाची मूळ ओवीसंख्या ३१० असून ४८ ओव्या प्रास्ताविकात आहेत. अकराव्या अध्यायाची मूळ ओवीसंख्या ६९८ असून ४३ ओव्या प्रस्तावना म्हणून आल्या आहेत. बाराव्या अध्यायाची मूळ ओवीसंख्या २४४ असून १९ ओव्या प्रस्ताव म्हणून आल्या आहेत. तेराव्या अध्यायाची मूळ ओवीसंख्या ११६४ असून फक्त ५ ओव्या प्रस्तावना म्हणून आल्या आहेत. चौदाव्या अध्यायाची मूळ ओवीसंख्या ४११ असून ३८ ओव्या प्रास्ताविक म्हणून आल्या आहेत. पंधराव्या अध्याची मूळ ओवीसंख्या ५६५ असून ४५ ओव्या प्रस्तावनेत आल्या आहेत. सोळाव्या अध्यायाची मूळ ओवीसंख्या ४७० असून ६६ ओव्या प्रास्ताविकात आल्या आहेत आणि सतराव्या अध्यायाची मूळ ओवीसंख्या ४३० असून ३३ ओव्या प्रास्ताविकात आल्या आहेत. अठराव्या अध्यायाची मूळ ओवीसंख्या १७८८ असून ८४ ओव्या प्रास्ताविक म्हणून आल्या आहेत. यावरून ज्ञानेश्वरीच्या ओवीसंख्येपैकी ५७० ओव्या विविध अध्यायांच्या प्रस्तावना म्हणून ज्ञानेश्वरांनी योजिल्या आहेत. पैकी दुसरा, तिसरा, पाचवा, सातवा, आठवा या अध्यायांना सुरुवात करताना एकही ओवी प्रस्तावना म्हणून ज्ञानेश्वरांनी योजिलेली नाही. उलटपक्षी दहा ते अठराव्या अध्यायापर्यंत सर्व अध्यायांना ज्ञानेश्वरांनी प्रास्ताविके दिली आहेत.

पूर्व कांड-उत्तर खंड

ज्ञानेश्वरांनी दहाव्या अध्यायात–

> आतां आपुलेन प्रसादे : भगवद्गीता ओवीप्रबंधे
> पूर्वकांड विनोदे : बाखाणिले ॥ज्ञा : १०:२२ ॥

असे म्हणून भगवद्गीतेचे पूर्वकांड व उत्तरखंड असे पृथक दोन विभाग कल्पिले आहेत. याचा अर्थ असा की एक ते नऊ अध्यायांपर्यंत पूर्वार्ध संपतो व दहाव्या अध्यायापासून अठराव्या अध्यायापर्यंतचा उत्तरार्ध दहाव्या अध्यायात सुरू होतो. ज्ञानेश्वर म्हणतात–

> एवं नवै अध्याय पहिले : मिया मतीसारिखे बोलिले
> आता उत्तरखंड आदरिले : ग्रंथिचे आईकां ॥ ज्ञा: १० : ३९ ॥

वरील ओव्यावरून पहिल्या नऊ अध्यायांत ज्ञानेश्वरीचा एक भाग पूर्ण होतो व दहाव्या अध्यायापासून अठराव्या अध्यायापर्यंत एक Unit पूर्ण होते. त्यातही अठराव्या अध्यायात ज्ञानेश्वर म्हणतात– 'अठरावां अध्याॐ हा नोहे : ही एकाध्यायी गीताचि आहे' यावरून अठरावा अध्याय म्हणजे पुनः गीतेतील अन्तर्गीताच होय. आणि या अध्यायात ज्ञानेश्वरांनी अध्यायाबरहुकूम पुनः पूर्ण गीतेचा स्वाध्याय रचला आहे. पहिल्या अध्यायाची पहिली ओवी आणि अठराव्या अध्यायातील पसायदान या दोन किनाऱ्यांतून ज्ञानेश्वरी प्रवाही झाली आणि तिचा विकास आणि विस्तार होऊन तिला घनतापूर्ण अशी खोली (अनुभवांची) आली. आपणच आपणाला पूर्णरूप जाणू शकणाऱ्या आत्मरूपी तत्त्वाचा जयजयकार ज्ञानेश्वर पहिल्या अध्यायाच्या पहिल्या ओवीत करतात. परमात्मा हाच स्वसंवेद्य आहे आणि परमात्म्याचेच एक रूप म्हणजे जीवात्मा होय. म्हणजे परब्रह्माला आत्मरूपात बघता बघता ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या शेवटी त्याच परब्रह्माला विश्वरूपात प्रस्थापित केले. आत्मा आणि परब्रह्म व विश्व आणि परब्रह्मापर्यंतचा असा हा प्रवास आहे. विश्वाच्या एका अर्थाने आदिअंताच्या भाग्यरेखेची स्पष्टता ज्ञानेश्वरांनी पहिल्या अध्यायाच्या पहिल्या ओवीपासून शेवटच्या अध्यायाच्या शेवटच्या ओवीत गुंफली आहे.

ज्ञानेश्वरीची पहिल्या अध्यायाची प्रस्तावना काय किंवा अठराव्या अध्यायाची प्रस्तावना काय, या सर्व अध्यायांतून ज्ञानदेवांना अभिप्रेत असलेली अनुभवाकृती स्पष्ट झाली आहे. ज्ञानदेवांचे 'देशीकारलेणे' पुराणपद्धतीचे किंवा पारंपारिक वाटत असले तरी केवळ प्रस्तावनांचा विचार केला तरी असे दिसून येते की कृष्ण-अर्जुन, ज्ञानदेव-निवृत्तिनाथ, वक्ता-श्रोता यांचे सतत संभाषण चालू आहे. हृदयसंवाद होत आहे आणि मार्मिक प्रश्नोत्तरांमधून विश्वाच्या पसाऱ्याचे आणि ब्रह्माचे स्वरूप न्याहाळण्याचा प्रयत्न होत आहे. एक, चार, नऊ, दहा, अकरा, बारा, तेरा, चौदा, पंधरा, सोळा, सतरा, आणि अठरा या अध्यायांच्या प्रस्तावनांतून क्वचित विषयबोध, कधी पाल्हाळिक जवळीक, कधी गुरुस्तुती, कधी मराठी भाषेचे श्रेष्ठपण आणि श्रोत्यांना विश्वासात घेण्याचा होत गेलेला प्रयत्न या अनुभवाच्या विविध अभिव्यक्तीच्या छटा मोठ्या मनोहारी स्वरूपात गोचर होतात. एक विलक्षण अवधानात्मकता, जागरुकता आणि वेधकता रोचक आणि प्रासादिक शैलीने तर कधी अत्यंत लडिवाळपद्धतीने ज्ञानदेवाच्या संकीर्तनात येते. कीर्तनपरंपरेचा जणू आश्रय घेत ही निरुपणपद्धती ज्ञानदेव स्वीकारतात त्यातही औचित्य आहे. एकनाथी भागवताप्रमाणे किंवा दासबोधाप्रमाणे ज्ञानदेवांची निरुपणशैली एकसाची किंवा वस्तुनिष्ठ नाही तर ज्ञानेश्वरीच्या सर्वच प्रस्तावनांतून आत्माविष्कार साधण्याचा प्रयत्न झाला आहे. विविध विषयांतरातून, विविध प्रश्नांतून आणि विविध जीवन जाणिवांच्या प्रतीतीतून या प्रस्तावना घडत गेल्या म्हणूनच या प्रस्तावनांचे स्वरूप केवळ पारंपारिक किंवा केवळ वस्तुस्थितीनिदर्शक नाही. केवळ पौराणिक नाही तर प्रस्तावनात ज्ञानदेवांच्या मनाचे रंग मिसळले गेले आहेत ते जीवाचे कान करून ऐकले तर त्यांचा नाद, त्यांची लय, त्यांची सुभगता यांचा पडताळा येईल. या प्रस्तावना म्हणजे केवळ मंगलाचरणेही नव्हे तर इष्ट

* ज्ञानेश्वरी १८ अध्याय प्रस्तावना स्वरूप

१ ला अध्याय
गणेशवंदन
शारदावंदन
सद्गुरुवंदन
महाभारत थोरवी
गीतामहात्म्य

४ था अध्याय
गीतास्तुती
कृष्णश्रेष्ठत्ववर्णन
अध्यायस्वरूपदिग्दर्शन

६ वा अध्याय
गीतार्थसार
मराठी भाषाभिमान
सद्गुरुकृपा

९ वा अध्याय
श्रोतावक्तासंवाद
निवृत्तिनाथ ज्ञानदेव नाते
आई आणि मूल वात्सल्य

१० वा अध्याय
स्तोत्रपद्धतीने ईश्वरवंदन
गुरुमहिमा
गणेशवंदन
गुरुमहिमा
पूर्वाध्याय पौर्वापर्व
संस्कृत मराठी परस्पर नाते

११ वा अध्याय
कथाबैशिष्ट्य
रसवृत्ती
गीतार्थाचा अन्वय
श्रोत्याचे अवधान
गीतामहती
अर्जुनप्रशस्ती

१२ वा अध्याय
स्तोत्रपद्धतीने ईश्वरवंदन.
गुरुवंदन
शारदावंदन

१३ वा अध्याय
गुरुउन्मेष भाग्य

१४ वा अध्याय
प्रज्ञाप्रभात सूर्यवंदना
गुरुवंदन
पूर्वापर संदर्भ
श्रोता-वक्तासंबंध
ज्ञानदेव–निवृत्तिनाथ आदरभाव.

१५ वा अध्याय
गुरुपूजाबंधन
गुरुमाता–भक्तबालक संबंध
गुरुवंदना
विशेषविशेष्यभावदर्शन
कृष्णगुणवर्णन

१६ वा अध्याय
ज्ञानसूर्य–निवृत्तिवंदन
गुरुभक्ती
पूर्वाध्यायसंगती
दैवीआसुरीसंपत्तिनिर्देश

१७ वा अध्याय
आराध्यलिंग–गणेशवंदन
गणेश–गुरुनिवृत्ति बोध
पूर्वाध्यायसंगती
अर्जुनप्रशस्ती

१८ वा अध्याय.
मंत्रपुष्पांजलिसदृश्य
स्तोत्र पद्धतीची देवतास्तुती
गुरुमहिमा
भगवद्गीता–श्रेष्ठत्व

गीताप्रासादसंकल्पना
कळसाध्यायाची सूचना
अठरा अध्यायाचा सारांश
म्हणजे अठरावा अध्याय
अध्याय जन्यजनक भाव
एकाध्यायी गीता

देवतेच्या ठिकाणीही ज्ञानदेव आपल्या गुरुलाच संबोधिताना दिसतात. प्रस्तावनातून-केवळ विषयनिरूपण किंवा विषयसंसूचन झाले असेही नाही तर ज्ञानदेव अधिक मोकळेपणाने आणि ऐसपैसपणे भोवती, विश्वात आणि पंचमहाभूतांना न्याहाळताना दिसतात. भाषिक प्रश्नांचा खल करतात, समाजाच्या नित्यनैमित्तिक कर्माच्या बाबत पसंती-नापसंती दर्शवितात. गुरुविषयी आत्यंतिक आदरभाव व्यक्त करतात आणि गुरुशिष्याचे सामंजस्य कृष्णार्जुनाशी अन्तर्गत पद्धतीने जोडू बघतात.

* प्रास्ताविकांचे वाङ्मयीन रूप

पहिल्या अध्यायाचे प्रास्ताविकात आणि अठराव्या अध्यायाचे प्रास्ताविकात वरवर वेगळेपणा जाणवत असला तरी तो तसा नाही. कारण (पृष्ठ १९६ वरील) कोष्टकावरून एक वस्तुस्थिती निश्चित झाली आहे की ज्ञानेश्वरीच्या सर्व अध्यायप्रस्तावनांतून गुरुमहिमा आणि गीताप्रशस्तीला सर्वाधिक महत्त्व मिळाले आहे. गीतेचा उपक्रम आणि उपसंहार लक्षात घेताही ज्ञानदेवांनी निवृत्तिनाथांची बांधलेली महापूजा आणि अठराव्या अध्यायात गीताप्रासादाची उभी केलेली प्रचंड इमारत सर्वस्वी ज्ञानदेवांच्या भूमिकेवर प्रकाश टाकणारी झाली आहे. महानुभाव कवी दामोदरपंडिताचे 'वछाहरण' किंवा भास्करभट्ट बोरीकराच्या शिशुपाळवधकथेची साक्ष घेतली तरी असे स्पष्ट दिसते की ज्ञानदेवांनी ज्याप्रमाणे कधी पारंपारिक पद्धतीची स्तोत्रपर मंगले रचली तर कधी निखळ प्राकृत-पद्धतीची पादपूजा बांधली तशीच ज्ञानदेवीच्या निर्मितीनंतर झालेल्या 'वछाहरण', 'शिशुपाळवधा'तही हीच पद्धती अवलंबिलेली दिसते. यावरून केवळ संस्कृत परंपरेचे अनुकरण न करता देशी प्राकृतातून आराध्य दैवताविषयीचा उत्कट जिव्हाळा आणि दुर्दम्य भक्तिभाव अभिव्यक्त करण्याचा प्रयत्न वरील मराठी कवींनी केला व तो करीत असता मराठी भाषेची अस्मिता, तिचे वैभव आणि श्रेष्ठत्वही सिद्ध करण्याचा जिवापाड प्रयत्न केला. म्हणून ज्ञानेश्वरीची रचना जरी पौराणिक पद्धतीची कीर्तन-प्रवचन निविष्टपद्धतीची झालेली दिसत असली तरी तिचा पूर्वरंग आणि उत्तररंग हा पारंपारिक नाही तर त्याला भावनेचे, कल्पनेचे अनेक नवे नवे उन्मेष मिळाले व अनेक लवलवते जीवन जाणिवांचे अंकुरकोंभ निर्माण झाले. म्हणूनच या प्रस्तावना जिवंत आणि ज्ञानदेवांच्या व्यक्तित्वाचा, संवेदनशील मनाचा पडताळा देण्यास समर्थ ठरल्या. ज्ञानेश्वरीच्या प्रस्तावनांमधून केवळ विषयोपन्यासच झालेला आहे असेही नाही, एक भावप्रतीतिपूर्ण संवादांच्या साहाय्याने नाट्यात्मकता त्या अनुभवांतून अभिव्यक्त झाली आहे. म्हणूनच प्रस्तावनांना स्वतःचे एक विशिष्ट अस्तित्व आहे. स्वतःचा असा एक रंग आहे, स्वतःचा असा एक डौल आहे. एक लय आहे. एखादे फूल उमलत जावे आणि बघता बघता त्याचे उत्फुल्ल पूर्णरूप सुगंधितपणे जाणवावे तशा ज्ञानेश्वरीच्या प्रस्तावना आहेत. या प्रस्तावनातील, गुरुस्तुती, श्रोता-वक्ता संवाद, आईमुलांचे वात्सल्य, कृष्णार्जुनसंवाद आणि गणेश शारदावंदनातून सरतेशेवटी वाचक पोचतो तो अंतिमतः

ज्ञानदेवाच्या वाङ्मयीन व्यक्तित्वाने घेतलेल्या जिवंत जागत्या अनुभवाशी ! म्हणूनच ज्ञानेश्वरीच्या केवळ प्रस्तावना लक्षात घेतल्या तरी ज्ञानदेवांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा, त्यांनी घेतलेल्या काव्यानुभवाचा आणि त्यातून अभिव्यक्त झालेल्या आशयाचा एकात्म परिणाम वाचकावर होतो. ज्ञानेश्वरांचा जिवंत, झळझळीत असा भाषाभिमान, आईच्या वात्सल्याने हरखून जाणारा प्रेमभाव, गुरुविषयीचा नितांत आदरयुक्त भक्तिभाव हे सारे चिंतनविषय अधिक सघन गहिऱ्या रंगरूपातून प्रस्तावनात येतात. त्यासाठी सांगरूपकांची आणि दृष्टांतशृंखलांची ज्ञानेश्वरांनी केलेली खैरात आणि झालेला वर्षाव अपूर्व आहे, एकमेवाद्वितीय असा आहे.

'भूषविले कवणकवणे'

ज्ञानेश्वरीच्या अध्याय प्रस्तावनांना महत्त्व येण्याचे कारण म्हणजे ज्ञानेश्वरी हा मूलतः गीतेवरील भाष्यग्रंथ आहे. एक टीकाग्रंथ आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या वस्तुनिष्ठ आणि बुद्धिनिष्ठ स्वरूपाच्या ग्रंथनिरुपणात आत्मविष्काराला संधी मिळणे जवळजवळ दुरापास्तच म्हणावे लागेल. अशा वेळी प्रत्येक अध्यायप्रस्तावनेत आपल्या भावानुभवाच्या अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य घेत ज्ञानेश्वरांनी आत्माविष्कार साधला आहे. ज्ञानेश्वरीच्या जवळजवळ सर्व अध्यायप्रस्तावनांतून एक अनिर्बंध वक्तृत्वाचा जोष जाणवतो. त्याचेही कारण हेच आहे की गीतानिरुपणात आत्माविष्काराला तसा अवसर कमी. त्यातही विषयानुसंधान आणि विषयव्याप्ती निश्चित झालेली. अशावेळी ज्ञानेश्वरांनी प्रस्तावनातून असे काही आपले प्रतिभासामर्थ्य आविर्भूत केले की त्यामुळे 'भूषविले कवणकवणे' अशी गीतेची अवस्था झाली. केवळ धर्मसंकीर्तन केवळ समाजप्रबोधनाची अपेक्षा न बाळगता काव्यनिर्मितीची प्रक्रिया आणि अभिव्यक्तीची दिशाही ज्ञानदेवांनी प्रस्तावनातून स्पष्ट केली आहे. शब्दांचे सामर्थ्य, भावनांचे कल्पनांचे अपूर्वपण आणि अभिप्रायो अभिप्रायेचि विणे' आणि 'अर्थू बोलाची वाट न पाहे' अशी असलेली आशय अभिव्यक्तीची अभिन्नता व रसवृत्तीच्या वडपांची समृद्धी ज्ञानदेवांनी प्रस्तावनांमधूनच न्याहाळली.

पहिल्या अध्यायात शब्दब्रम्हरूपी गणेशाचे रूपक, त्यात अठरापुराणे, षड्दर्शने, तर्कमीमांसा आणि दशोपनिषदांची स्थापना गणेशमूर्तीवर केली आहे. ज्ञानेश्वरांनी केलेले शारदावंदनही महत्त्वाचे ठरते. ज्ञानेश्वरांनी ओंकार आणि गणेशमूर्तीत एकत्व मानले आहे तर शारदा हा 'अभिनववाग्विलासिनी', 'चातुर्यकलाकामिनी' आणि 'विश्वमोहिनी' आहे. या प्रतिमांमधील क्षितिजझेप लक्षात घेतली तर ज्ञानेश्वरांच्या प्रतिमासृष्टीचे विकसनशील स्वरूप दिसून येईल. शारदावंदन हे जसे भव्य आहे तसे गुरुवंदन हे वात्सल्यउमाळ्याने ओथंबलेले आहे. कमालीचा सुसंस्कृतपणा, आत्यंतिक विनम्रता यांचे हे प्रतीक होय. निवृत्तिनाथ एकीकडे वडीलबंधू आहेत तर दुसरीकडे ज्येष्ठ गुरु आहेत. कौटुंबिक नात्यातील उत्कट जिव्हाळा आणि गुरुशिष्य संदर्भातील आध्यात्मिक अधिकार या ताण्याबाण्यातून ज्ञानदेव आणि निवृत्तिनाथ यांचे परस्परातील

भावबंध उलगडत जातात. डोळ्यातील अंजन, चिंतामणी, अमृतरसास्वादिनीतीर्थ, अभिलखित मनोरथ पुरविता, अशा अनेक विशेषणांनी गुरुमहात्म्य ज्ञानेश्वरांनी वर्णिले आहे. त्यातून त्यांची काव्यात्म मनोवृत्ती आणि भावप्रधानता लक्षणीय ठरते.

व्यास, महाभारत आणि गीता यांची भलावण ज्ञानेश्वरांनी केली आहे. महाभारत म्हणजे महाकाव्यांचा राजा, ग्रंथगौरवाचे मूळस्थान, पुराणकथांचे मूलस्थान, शारदेचे लावण्यभांडार, सर्वधर्मसंग्रहधाम, परमार्थजन्मभूमी असे महाभारत म्हणजे मानवजातीचा 'आचारविचार कोश' होय.

म्हणौनि भारती नाही । ते नव्हेचि लोकी तिही
एणें कारणे ह्मणिपे पाही । व्यसोच्छिष्ट जगत्रय ॥ ज्ञा: १ : ४७ ॥

असे ज्ञानेश्वर म्हणतात व महाभारताचा जनमानसावरील प्रभाव सर्वमान्य म्हणूनच पुनः प्रस्थापित करतात. महाभारताचा कमळ पराग म्हणजेच जणू भगवद्गीता! शब्द-ब्रह्माब्धी घुसळून काढलेले नवनीत असा उल्लेख ज्ञानेश्वर करतात. ज्ञानाग्नीचा संपर्क आणि विवेकाचे कडसणे यातून निर्माण झालेला भावगंध गीतेच्या निमित्ताने स्वीकारा! असे ज्ञानेश्वर सांगतात. 'अतिहळुवारपणे चित्ता आणुनिया, ते यापरी श्रोता! हे कथ अनुभवावी' असे ज्ञानेश्वर अनुभवतात व हे अनुभवणे कसे तर 'शब्दांविण संवादिजे, इंद्रिया नेणतां भोगिजे, बोला आधी जोंबिजे प्रमेयासी' असे.

श्रोत्यांच्या अवधानाची अपेक्षा ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत सर्वदूर केलेली आहेच. त्यात 'चकोर तलग' 'कमलदलातील भ्रमर', 'चंद्रोदय आणि कुमुदिनी' असे एकापेक्षा एक सरस दृष्टांत देऊन ज्ञानेश्वरांनी आपली रसिकता, काव्यदृष्टी आणि वृत्तिगांभीर्य स्पष्ट केले आहेच. हा ज्ञानेश्वरांचा स्वतंत्र कल्पनाविलास आहे. पंचमहाभूतांतून प्रतिमा स्वीकारीत त्यातून आपला भावानुभव फुलवीत न्यावयाचा ही ज्ञानेश्वरांच्या प्रौढ प्रतिभेची एक नेहमीची 'लीला' आहे. त्यातून त्यांच्या कविमनाचे निखळ दर्शन घडते. जेथे वेदही वेडावतात अशा गीताशास्त्राला मी कसे कवळावे! असे करणे म्हणजे 'गगन मुठी सुआवें । मशकें केवि ।' असे ज्ञानेश्वर म्हणतात. एया बोला निवृत्तिदासु । पावौनि परम उल्हासु ॥ अशा तऱ्हेच्या आपल्या प्रस्तावनांचा शेवट ज्ञानेश्वरांनी जवळजवळ सर्व अध्यायांतून केला आहे. पहिल्या अध्यायाची प्रस्तावना प्रामुख्याने संपूर्ण ज्ञानेश्वरीची प्रस्तावना होती. त्यामुळे तीत एका विशिष्ट अनुक्रमाने गणेश, शारदा, महाभारत, गीता, गुरु आणि श्रोते यांचे वंदन ज्ञानेश्वरांनी अतिशय प्रसन्नपणाने केले आहे. अनुभवांचा ताजेपणा, टवटवीतपणा आणि रसात्मकता लक्षात घेतल्यास पहिल्या अध्यायाच्या प्रस्ताव-नेने कवी ज्ञानेश्वरांचे हृद्गत व्यक्त केले. उलटपक्षी शेवटच्या अध्यायात संपूर्ण आवरा-आवर करण्याची भूमिका असलेली दिसते. पूर्ण ज्ञानेश्वरीत अठरावा अध्याय हा विस्तृत आहे व त्याची प्रस्तावनाही विस्तारपूर्ण झाली कारण पूर्ण निर्मितीचे सिंहावलोकन आणि उपसंहार करण्याचा प्रयत्न जणू ज्ञानेश्वर या अध्यायात करतात. या अध्यायाला ज्ञाने-

श्वरांनी 'एकाध्यायी गीता' म्हटले आहे व १७ अध्याय म्हणजे सात मजले असून अठरावा अध्याय म्हणजे गीतारूपी प्रासादाचा कळसाध्याय होय. गीतेतील जवळजवळ प्रत्येक सिद्धांताचे निरूपण या अध्यायात आले आहे. त्याग व संन्यासनिरूपण हा या अध्यायाचा विषय.

पहिल्या दहा ओव्यांत मंत्रपुष्पांजलीच्या पद्धतीने ज्ञानेश्वरांनी ईश्वरचिंतन केले आहे. नंतर पुनः गुरुस्तुती केली आहे व गुरुस्तुतीकडून गीतास्तुतीकडे ज्ञानेश्वर वळले आहेत.

जी गीता रत्नप्रासादाचा । कळशु अर्थांचितामणिचा
सर्वगीतादर्शनाचा । पाढाओ जो ॥ ज्ञा १८: ३० ॥

असे गीताप्रासादाचे सांगरूपक ज्ञानेश्वरांनी योजिले आहे व त्यात सर्व सतरा अध्यायांचा मूलगामी आढावा घेतला आहे. यावरून ज्ञानेश्वरीचा उपक्रम आणि उपसंहार यांमधील सुसूत्रता आणि अंतर्गत बांधणीमधील सूक्ष्मता यांचा प्रत्यय येतो. यापूर्वी म्हटल्याप्रमाणे पहिल्या आणि अठराव्या अध्यायाच्या प्रस्तावनांच्या किनाऱ्यांनी ज्ञानेश्वरी प्रवाही झाली असली तरी तो किनारा हा मुक्त आहे, नैसर्गिक आहे आणि त्याच्या नैसर्गिकतेमुळेच मूळ ज्ञानेश्वरीच्या भावाशयाला वेगळे परिमाण मिळाले आहे. वेगळी लय व वेगळा समतोल आला आहे.

चौथ्या अध्यायाचे प्रास्ताविक थोडे वेगळे आहे. आणि त्याच्या वेगळेपणानेच ते संपूर्ण ज्ञानेश्वरीत उठून दिसते. ज्ञानेश्वरांनी पहिल्या अध्यायानंतर एकदम चौथ्या अध्यायालाच प्रास्ताविक जोडले आहे. श्रवणेंद्रियांचा सुकाळ स्वप्नाने सत्यवत होणे; असा चमत्कार गीतारूपी ठेवा बघितल्यामुळे घडला. गीतेचे महत्त्व पटवून देत असता ज्ञानेश्वर म्हणतात– गीतेविषयी काही बोलणे म्हणजे 'आदी ची विवेकाची गोठी । वरी प्रतिपदी कृष्णु जगजेठी ॥' गीतेचा अनुभव असा आहे अत्यंत श्रवणमधुर असा पंचमस्वर सुगंधयुक्त व्हावा किंवा सुगंधाला मधुर चव प्राप्त व्हावी त्याप्रमाणे गीतानिरुपण प्रसंग आहे. श्रीकृष्णासारखा वक्ता आणि अर्जुनासारखा श्रोता यामुळे सुगंध आणि स्वरमाधुर्य यांचा अपूर्व संयोगच होय! गीताकथा म्हणजे अमृताची गंगाच होय. कृष्णार्जुनाचे प्रेम कसे आहे याचा ज्ञानेश्वरांनी फार मार्मिकपणे येथे खुलासा केला आहे.

देवी लक्ष्मी येतुली जवळिक । परि तेही यया प्रेमाचे नेदखे चि मुख
आजि कृष्णस्नेहाचे पीक । ययाते चि आथी ॥
यया जगदीश्वराचे प्रेम –। येथ दोसतसे निरूपम ।
कैसें पार्थे येणे सर्वोत्तम । पुण्य केले ॥ ज्ञा ४ : ८, १० ॥

देवी लक्ष्मी विष्णूची प्रत्यक्ष पत्नी असल्याने विष्णूला अत्यंत जवळची आहे. पण तिनेही ज्या कृष्णप्रेमाची उत्कटता अनुभविली नाही तो प्रेमाचा बहर अर्जुनाला लाभला आहे असे ज्ञानेश्वर विषयांतर करून कृष्णार्जुनप्रेमाची एकरूपता दर्शवितात. वास्तविक

हा परमात्मा योग्यांना सापडत नाही वेदार्थाला त्याचा थांगपत्ता लागत नाही, त्याच्या-पर्यंत योग्यांची ध्यानदृष्टीही पोहचत नाही असा हा आत्मस्वरूप परमात्मा अनादी, अनंत आणि अविकारी असूनही अर्जुनाच्या बाबतीत मात्र कृपावंत झाला आहे. (१२–१३) त्रैलोक्यव्यापक स्वरूपाचा निर्गुण निराकार कृष्ण अर्जुनासाठी त्रैलोक्यवस्त्राची घडीच झाली आहे. कारण तो सगुण, साकार झाला आहे. चौथ्या अध्यायातील वरील प्रस्ता-विकातून ज्ञानेश्वरांनी केवळ अध्यायाची पूर्वकल्पना देण्यासाठी ही प्रस्तावना योजिली आहे असे दिसत नाही तर कृष्ण-अर्जुन प्रेमासाठी असलेली उत्कटता निवृत्तिनाथ आणि ज्ञानदेव यांच्या उत्कटप्रेमाच्या संदर्भात अनुभविली आहे. म्हणून मूळ अध्यायाला तर प्रस्तावना उपकारक ठरत असतातच पण त्याहीपेक्षा ज्ञानेश्वरांच्या आत्मविष्कारातून व्यक्त झालेला भावकल्लोळ अधिक श्रेष्ठदर्जाचा होत असतो. सहाव्या अध्यायाची प्रस्तावना नैमित्तिक झाली आहे. विचारसागराचे पैलतीर असे गीतार्थाचे सार मी प्राकृतातून सांगत आहे असे म्हणून मराठी भाषेचा गौरव तिचे प्रासादिकत्व आणि अर्थकारित्व, शब्दांचे व्यापकपण आणि साहित्यशास्त्रातील विविध संकल्पना व्यक्त केल्या आहेत. ज्ञानेश्वरांचा भाषाभिमान आणि स्वनिर्मितीवरील विश्वास ' तेणे कारणे मी बोलैन । बोली अरूपाचे रूप दावीन । अतींद्रिय परी भोगवीन । इंद्रियाकरवी ॥ ' असा व्यक्त केला आहे. ९ व्या अध्यायात तर हा आत्मविश्वास अधिकच प्रखर झाला आहे. ९ व्या अध्यायातील प्रस्तावनेचे स्वरूप श्रोतावक्तासंवादाचे असले तरी ज्ञानदेव निवृत्तिनाथ आणि मूल आणि आई यांच्या भावसंबंधावर भर दिला आहे. एका प्रतिज्ञोत्तराची पेरणी ९ व्या अध्यायाच्या प्रस्तावनेत झाली आहे, एकीकडे गुरुवंदन तर दुसरीकडे अत्यंत विनम्रपणे त्या गुरुचा आपण असलेला शिष्य यांचे वात्सल्यभरित अतूट नाते आई आणि मुलाच्या दृष्टांतातून ज्ञानेश्वरांनी साधले आहे. अर्थात् ज्ञानेश्वरांच्या मुक्तशैलीचा हा एक अपूर्व विलास असतो. संभाषणे, संवाद, परस्परांना निरुत्तर करीत जाणे, स्वतःकडे नम्रता घेणे, गीतेचे मोठेपण स्पष्ट करीत जाणे ही ज्ञानेश्वरांची एकार्थी काव्यक्रीडा आहे. सतत जीवनव्यवहार न्याहाळत असता त्यातून जीवनाचे जे वैविध्य आणि नित्यनूतनत्व ज्ञानेश्वरांना जाणवते ते प्रस्तावनांमधून गोचर होत जाते म्हणून प्रस्तावना सरळ एकसुरी झालेल्या नाहीत. त्यांच्यातही तसेच वैविध्य भरलेले आहे. ज्ञानेश्वरांच्या प्रतिभासृष्टीचे आणि दृष्टांतरीतीचे सम्यक दर्शनही या प्रस्तावनामधून जाणवत असते. 'चावटै करितसे बालक' किंवा ' रोसें प्रेम दूणावटे ' असे एक भाव नाते ज्ञानेश्वर श्रोता–वक्ता, निवृत्तिनाथ ज्ञानेश्वर आणि अर्जुन कृष्ण यांच्यात निर्माण करतात. एका प्रचंड आवेगाने काव्य-निर्मिती होत असते असे ज्ञानेश्वरीच्या प्रस्तावनामधून जाणवत असते. उदा.

अर्थु बोलाची वाट न पाहे । तेथ अभिप्रावोचि अभिप्रायाते विये ॥
भावांचा फुलोरा होतु जाये । मतिवरी । । ज्ञाः ९ : २७ ॥

असे वाङ्मयीन आत्मनिष्ठेचे उद्‌गार ज्ञानदेव काढतात. आणि सर्व श्रेय मात्र गुरूला म्हणजे अर्थात निवृत्तिनाथांना देतात. ११ व्या अध्यायात शांतरस आणि अद्‌भुतरस

यांच्या संदर्भात ज्ञानेश्वर प्रस्तावनेत विचार करतात. येथेही त्यांची वैचारिक संगती साहित्यशास्त्रीय विचारातही स्पष्ट होते. काव्यलक्षण, काव्यकारण, काव्यप्रयोजन, शब्द-विचार, ध्वनिविचार आणि रसविचार ही जी एक साहित्यशास्त्रीय अभ्यासपद्धती आहे तिचाच अवलंब करून ज्ञानेश्वर शांताचेया घरा, अद्‌भुत आला आहे पाहुणेरा, आणि येरां ही रसां पांतिकरा, जाला मानु' असे म्हणतात. लग्नसमारंभात वऱ्हाड्यांनीही वस्त्रालंकार घालून मिरवावे तसे मराठी भाषेच्या पालखीत इतर सर्व रस शोभत आहेत. ज्ञानेश्वरकाळी संस्कृत कवितेत शृंगाररसाला मिळालेले महत्त्व आणि ज्ञानेश्वरांनी अभिनव-गुप्तप्रणीत शांतरसाचा केलेला उल्लेख आणि पुरस्कार त्यांच्या सहेतुकतेवर प्रकाश पाडतो. त्यासाठी ज्ञानेश्वरांनी योजिलेले दृष्टांत बघण्यासारखे आहेत. विष्णु आणि शंकराने परस्परांना भेटावे. अमावास्येला चंद्राची व सूर्याची गाठ पडावी, गंगा यमुना एकत्र याव्या व प्रयागतीर्थ तयार व्हावे आणि गीतेची सरस्वती लुप्त राहून ज्ञानेश्वरीला प्रयाग तीर्थाचे मोठेपण यावे हा ज्ञानेश्वरांना अपेक्षित नसलेला पण व्यक्त झालेला भावार्थ मोठा लक्षणीय ठरतो. संस्कृताची गहन तीरे तोडून मऱ्हाटियाच्या साह्याने शब्दसोपान निवृत्तिनाथांच्या आशीर्वादाने मी रचला असे म्हणून ज्ञानेश्वरांनी संस्कृत मराठी संदर्भातील आपला अभिप्राय पुनः एकदा स्पष्ट केला. पंधराव्या अध्यायाच्या प्रस्थावनेत ज्ञानेश्वरांच्या गुरुपूजेचा उत्कर्ष साधला गेला. हृदयाच्या चौरंगावर श्रीगुरुच्या पादुका स्थापन करून ऐक्यभावाच्या ओंजळीत सर्वेन्द्रियांच्या कळ्या भरून देवाला पुष्पांजली व अर्घ्यपूजा देऊया अशी सुरुवात ज्ञानेश्वर करतात. एका आध्यात्मिक परिभाषेत सर्वांग-परिपूर्ण पाद्यपूजा ज्ञानेश्वरांनी बांधली आहे. निवृत्तिनाथांविषयीचा नितांत आदर आणि कमालीचे सौहार्द या प्रस्तावनेत व्यक्त झाले आहे. दाही दिशांनी आकाशाला आलिंगन द्यावे तसे ज्ञानदेवांनी निवृत्तिनाथांच्या संदर्भातील आपला परमोच्च आदरभाव व्यक्त केला आहे व सोळाव्या अध्यायात तर तो अंतिम टोकाला पोचला आहे. एका सांग रूपकाच्या मालिकेतून गुरुवंदन ज्ञानेश्वर करतात. या आचार्योपासनेची ज्ञानदेवांनी बांधलेली मानसपूजा संपून १६ व्या अध्यायात कैवल्यरूप निवृत्तिनाथांचे ज्ञानसूर्यत्व प्रस्तावनेत आले आहे. निवृत्तिनाथरूपी ज्ञानसूर्यामुळेच अज्ञानरूपी अंधकार नाश पावतो. आत्मज्ञानाचा प्रकाश दिसतो. सूर्योदय आणि माध्यान्हकाळ यांचे गुरु संदर्भात आध्या-त्मिक विवेचन ज्ञानेश्वर करतात. उपाधियुक्त शब्दांनी उपाधिविरहित गुरुची स्तुती करणे अशक्य होते. त्यामुळे परा, पश्यन्ती आणि मध्यमा, वैखरी या चारही वाणी असमर्थ ठरतात. सद्‌गुरुचा आशीर्वाद आणि अनुग्रह ज्ञानदेव सतत अपेक्षित असतात.

ज्ञानेश्वरीच्या सोळाव्या अध्यायात दैवी संपत्ती व आसुरी संपत्तीचे संश्लेषण ज्ञानेश्वरांनी केले आहे. हा विषय यापूर्वीच ९ व्या अध्यायात आणि तेराव्या अध्यायात येऊन गेला. पण सोळाव्याच्या प्रस्तावनेत केलेले गुरुवंदन आणि दैवीसंपत्तीचे ज्ञानेश्वरांनी केलेले विस्तारपूर्वक निरुपण यांचा अन्तर्गत संबंध आहे. दैवी संपत्तीचे 'अभय', 'सत्वसंशुद्धी' इत्यादी सव्वीसगुण ज्ञानेश्वर निवृत्तिनाथात बघतात. त्यामुळे दैवीगुण-

संपत्तीचे वर्णन अतिशय विस्तारशील आणि जिव्हाळ्याने भरलेले असते. तर आसुरी संपत्तीचे केवळ सहा दोष दाखवून तिच्या तावडीत सापडलेला पुरुष संसारातून बाहेर पडत तर नाहीच, उलट त्यात बुडत राहतो. मोक्षरूपी सुखाची उजाडलेली पहाट ज्ञानेश्वर कैवल्यपुतळा निवृत्तिनाथात शोधतात.

दहाव्या, बाराव्या, तेराव्या चौदाव्या आणि अठराव्या अध्यायाच्या प्रस्तावना ज्ञानेश्वरांनी पारंपरिक पुराणपद्धतीच्या केलेल्या दिसत असल्या तरी त्यामागे गुरुचा व अंतिमतः ईश्वराचा जयजयकार करण्याची भावनाच प्रगट झाली आहे. पैकी दहाव्या अध्यायाला एक स्वतंत्र वैशिष्ट्य आहे. पहिल्या ते नवव्या अध्यायापर्यंत ज्ञानेश्वरीचा पूर्वखंड पूर्ण झाला आहे. आणि दहाव्यापासून उत्तरखंडाला सुरुवात झालेली आहे. येथे एका अर्थाने ज्ञानेश्वरीचा पूर्वार्ध संपतो व उत्तरार्ध सुरु होतो. म्हणूनच पारंपरिक पद्धतीची मंत्र पुष्पांजलीच्या स्वरुपाची प्रस्तावना या अध्यायाला आली आहे. गणेशवंदन, शारदा-वंदन, गुरुवंदन कृष्णस्तुती, पौराणिक श्रेष्ठांचे दाखले, संस्कृत मराठीभाषेचा अन्वयार्थ, त्यातून प्रगट झालेली विदग्धा रसवृत्ती यांची पुन्हा नव्याने मांडामांड ज्ञानेश्वरांनी केली आहे. एक ते नऊ अध्यायविषयांचा आढावाही दहाव्या अध्यायाच्या प्रस्तावनेत ज्ञानेश्वर घेतात. तेराव्या अध्यायाची प्रस्तावना फक्त पाच ओव्यांची आहे. कारण दहाव्या अध्यायाच्या प्रस्तावनेत ज्ञानेश्वरांनी पूर्वापूर्व संदर्भ जोडून निरूपण केलेले दिसते. उलट बाराव्या आणि चौदाव्या अध्यायांची प्रस्तावना लक्षात घ्यावी लागेल! बाराव्या अध्यायात गुरुकृपादृष्टीला माउलीचे रूपकातून ज्ञानेश्वरांनी संबोधिले आहे. हृदयाकाशरूपी पाळणा, प्रत्यकज्योतीची ओवाळणी, आत्मसुखाची बाळलेणी, जीवनकलेचे स्तनपान, अनाहत चक्राचे गाणे, समाधिबोधाची निद्रा, अशा या माउलीमुळे मी ग्रंथनिवेदनासाठी सिद्ध झालो. तुझ्यामुळे मी कर्तृत्व करू शकेन! असे ज्ञानेश्वर म्हणतात.

साहित्य सोनेयांचिया खाणी । उघडवि देशीचिया अक्षोणि
विवेक वेलीची लावणी । हो दे सैघ ।।
मन्हाटियेंचा नगरीं । ब्रह्मविद्येचा सुकाळ करी ।
घेणे देणे सुखचि वेन्ही । जगा हों देई ।। ज्ञा : १२ : १२, १७ ।।

बाराव्या अध्यायाप्रमाणेच सतराव्या अध्यायातही ज्ञानेश्वरांनी गणेशवंदन, सद्गुरुवंदन केले आहे. अर्थात या अध्यायामध्ये शेवटच्या कळसाध्यायाची बीजे आहेत. पण चौदाव्या अध्यायात ज्ञानेश्वरांनी ईश्वरगुणवर्णन केलेले आहे व ईश्वराचे संकीर्तन केले आहे. आणि अठराव्या अध्यायात संपूर्ण गीतेचा तात्पर्यबोध प्रस्तावनेत ज्ञानेश्वरांनी काढलेला आहे.

यावरून ज्ञानेश्वरांनी अठरा अध्याय गीतेला मराठीत आणीत असता केवळ मंगलाचरणात्मक पद्धतीने प्रस्तावना लिहिलेल्या नाहीत ही गोष्ट सिद्ध झाली आहे. तसेच ज्ञानेश्वरांनीच म्हटल्याप्रमाणे ज्ञानेश्वरीचा पहिला अध्याय ते नववा अध्याय असा एक गट पडतो व दहावा अध्याय ते अठरावा अध्याय असा दुसरा गट पडतो. अर्थात हे गट परस्परां-

पासून संपूर्णपणे पृथक आहेत असे नाही तर त्या पाठीमागे असलेले ज्ञानेश्वरांचे व्यक्तिमत्त्व स्वतःसिद्ध असलेले दिसून येते. त्यातही पहिला, दुसरा आणि तिसरा असा एक उपगट मानता येईल. तर चौथा, पाचवा, सातवा, आठवा हा दुसरा गट मानता येईल. सहावा, दहावा, बारावा, तेरावा, चौदावा आणि अठरावा अध्यायप्रस्तावनेचा आणखी एक उपगट कल्पिता येईल व नववा, अकरावा, पंधरावा, सोळावा व सतरावा अध्यायांच्या प्रस्तावनेचा एक उपगट विषय, आशय, अभिव्यक्ती, रचनापद्धती यातील साम्यावरून मानता येईल. यावरून ज्ञानेश्वरीच्या अध्यायप्रस्तावनांची व्यवस्था खालीलप्रमाणे करता येईल :–

ज्ञानेश्वरी अध्यायप्रस्तावना

पहिला अध्याय	चौथा अध्याय	सहावा अध्याय	नववा अध्याय
दुसरा अध्याय	पाचवा अध्याय	दहावा अध्याय	अकरावा अध्याय
तिसरा अध्याय	सातवा अध्याय	बारावा अध्याय	पंधरावा अध्याय
	आठवा अध्याय	तेरावा अध्याय	सोळावा अध्याय
		चौदावा अध्याय	सतरावा अध्याय
		अठरावा अध्याय	

अर्थात प्रत्येक अध्यायप्रस्तावना म्हणजे गीताध्यायाची मंगलाचरणपर निर्मिती नव्हे ! किंवा केवळ विषयविवेचनपर पौर्वापर्य संदर्भही नव्हे ! तर ज्ञानेश्वरांच्या मनात असलेला गुरुविषयीचा आदरभाव, भगवद्गीतेविषयीची आस्था आणि मराठी भाषेच्या सामर्थ्याविषयीचा दुर्दम्य आत्मविश्वास कधी साहित्यशास्त्रीय पद्धतीने, तर कधी उत्कट भावकल्लोळी दृष्टान्तपद्धतीने ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या अध्यायप्रस्तावनांतून आपला काव्यानुभव अभिव्यक्त केला. आणि या अध्यायप्रस्तावांतून व्यक्त झालेला जो काव्यविचार आहे त्यातील संगती आणि काव्यतत्त्वविचारसंदर्भातील प्रगाढ जाणीवही सार्वत्रिक स्वरूपाची अभिव्यक्त झाली आहे. संस्कृत आणि मराठी या दोन भाषांतील शब्दसामर्थ्य आणि अर्थगौरवही अतिशय प्रभावीपणे ज्ञानेश्वरांनी प्रस्तावनातून मांडला. काही प्रस्तावनातून पारंपरिक स्वरूपाची स्तोत्रपद्धती स्वीकारली तरी ती अपवादात्मकच ! कारण ज्ञानेश्वरीच्या सर्वच अध्यायप्रस्तावनांचे प्रयोजन हे केवळ विषयनिरुपणापुरते निबद्ध नाही तर या प्रस्तावनांत ज्ञानेश्वर हे कवी म्हणून अधिक मोकळेपणाने काव्यरचना करीत आहेत. पहिल्या अध्यायाची प्रस्तावना किंवा नवव्या अध्यायाची प्रस्तावना वरील विधानाच्या पुष्ट्यर्थ बघता येतील.

प्रस्तावनारचनेमध्येही एक अन्तःसंगती आहे. ती अशी की संवादात्मकता, संभाषणात्मकता यातून ज्ञानेश्वर एक अतूट नाते श्रोता वक्ता यांचे निर्माण करतात आणि अशा संवादातून एक नाट्यात्मक काव्यानुभव अभिव्यक्त होत असतो. ज्ञानेश्वरांनी

'चावटै' करणे निवृत्तिनाथांनी दम भरणे आणि पुढे काय झाले ते लवकर सांग असे म्हणणे व ज्ञानेश्वरांनी मार्मिकपणे आई आणि बालकाचा दृष्टान्त देणे अशा पद्धतीने अतिशय स्वाभाविकपणे अध्यायप्रस्तावना उमलत असतात. त्यांच्यात श्रोतागौरव, वक्ता-गौरव, ईश्वरगौरव आणि गुरुगौरव सतत होत असला तरी अंतिमतः वाचक येतो तो ज्ञानेश्वर आणि निवृत्तिनाथ यांच्या भावनिक नात्याजवळ! कृष्णार्जुनाचे प्रेम आणि निवृत्ति-नाथ-ज्ञानेश्वर यांचे प्रेमबंधन एकाच पातळीवर वाचकाला घेऊन जाण्याचे सामर्थ्य ज्ञानेश्वरीच्या अध्यायप्रस्तावनामध्ये ओतप्रोत भरले आहे. या अध्यायप्रस्तावनांमधून ज्ञानेश्वरांची कल्पकता, उत्तुंग प्रतिभासामर्थ्य, अमोल अशी रसिकता आणि जीवन-जाणिवांची अन्तर्भेदी समज व्यक्त झाली आहे. या दृष्टीने मूळ ज्ञानेश्वरीला जे अनन्य महत्त्व आहे त्यात तिच्या प्रस्तावनांचाही निश्चित, पृथक असा ठसा पडलेला आहे. ज्ञानेश्वरांची सुभाषितवाणीही प्रस्तावनांतूनच व्यक्त झाली आहे.

यावरून ज्ञानेश्वरीच्या प्रस्तावना म्हणजे केवळ मंगलाचरणे नव्हेत किंवा केवळ विषयप्रतिपादनासाठीही या प्रस्तावना निर्माण झालेल्या नसून ज्ञानेश्वरीप्रस्तावनांतून कवी ज्ञानेश्वरांची मुक्तशैली 'काव्यक्रीडा' अनुभवायला मिळते. सृष्टीतील चराचरांच्या जीवनव्यापारातील प्रतिमा आणि प्रतीके घेऊन आणि अरूपाला रूप देण्याचा प्रयत्न करून ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी हे 'साहित्यविश्व' अतिहळूवार चित्ताने आणि कलाकुसरीने निर्माण केले, मराठी भाषेला आत्मसन्मान आणि आत्मप्रौढी मिळवून दिली आणि गुरुशिष्यस्नेहाला मायेचा वात्सल्यभाव लेवविला. ज्ञानेश्वर ज्ञानेश्वरीला 'देशीकार लेणे' म्हणतात तेही अत्यंत सहेतुक आहे. कारण लेण्याचे कोरीव काम ज्ञानेश्वरीच्या प्रस्ताव-नांनी साधले व मूळ शिल्पाला अधिक सौंदर्यसंपन्न आणि सुभग बनविले आहे. 'गीता प्रासाद' आणि 'ज्ञानेश्वरीप्रासाद' परस्परानुप्रवेशी आणि तितकेच तुल्यबळ ठरले की ज्यामुळे संपूर्ण मानवी जीवनाच्या संदर्भात पुनःपुन्हा ज्ञानेश्वरीतील आचार आणि विचार जनसंमर्दाला वाट दाखवितो. एका दिव्याने दुसरा दिवा पेटवावा आणि संपूर्ण आसमंत प्रकाशमय होऊन जावा तसे भगवद्गीता आणि ज्ञानेश्वरी यांचे चिरंतन दृढ नाते अपूर्व होय. त्यात पुनः ज्ञानेश्वरी आणि तिच्या प्रस्तावना यांनी मूळ गीतेतील आशयाला एक नवेच देशीकार लेणे चढविले ही गोष्ट तितकीच खरी! विविध प्रसंगांमधून ही काव्य-निर्मिती होत गेली.

निर्मितीमागील प्रासंगिकता

तेराव्या शतकातील साहित्यनिर्मितीमागे कोणता ना कोणता प्रसंग कारणीभूत झाला आहे. असे प्रसंग आज दंतकथा आणि आख्यायिकांच्यारूपाने उपलब्ध आहेत. अर्थात असे प्रसंग हे केवळ निमित्तमात्र ठरलेले आहेत. उदा. महदंबेच्या धवळ्यांची निर्मिती, गोविंदप्रभूंच्या कृतकविवाहेच्छेतून आणि बाशिंग घेऊन जाणाऱ्या तेलिणीला बघून झालेली आहे. 'रुक्मिणीस्वयंवर' नरेन्द्राने तडफदारपणे कविकुळाबोलु लागैल असा

राजाला दिलेल्या मनस्वी उत्तरातून झाली. पैठणला योगबलाने चमत्कार करून विद्वानांकडून शुद्धिपत्र ज्ञानेश्वर भावंडांनी मिळविले आणि 'न वाढवा संस्कृति काम बंड। अनुतापयुक्त अनन्यभक्ती' स्वीकारून नेवास्याला आल्यावर 'ज्ञानेश्वरी' रचली गेली. महानुभाव पंथाचे उद्‌गाते चक्रधरस्वामी यांचे महानिर्वाण होताच विरहव्याकूळ भक्तांनी 'लीळा' आठवून आठवून विरह कमी केला आणि लीळाचरित्राची निर्मिती झाली. ज्ञानेश्वर रागावून बसले आणि 'ताटी उघडा ज्ञानेश्वरा' हा सुप्रसिद्ध अभंग मुक्ताईने गायिला. इतकेच काय पण 'रामायण', 'महाभारत' या 'आकर ग्रंथां'ची निर्मितीही अशाच प्रकारच्या एखाद्या प्रसंगातून झाली होती. ही प्रासंगिकता त्या काव्यात नैमित्तिकता येऊ देत नसते तर फुलाचे रूपांतर फळात व्हावे आणि त्याचाच आस्वाद रसिकाने घ्यावा तसे अशा दंतकथांचे स्थान आहे. कलावंताला अभिव्यक्तीसाठी आणि प्रतिभेला सृजनासाठी उद्युक्त करणे इतकेच महत्त्व अशा प्रसंगांना असते. नामदेवाच्या आणि इतर संतमेळ्याच्या अभंगात तर साक्षात पांडुरंगच स्वतंत्र व्यक्तिमत्व घेऊन वावरत असतो इतकी उत्कट भक्तिमयता कवितेतून साक्षात होते.

'चांगदेव पासष्टी' ही ज्ञानेश्वरांची निर्मितीही अशाच एका प्रसंगातून रूपवंत झाली. वस्तुतः ते स्फुटकाव्य आहे पण काव्यावरोबरच त्यामागील प्रसंगही काव्याभिव्यक्तीला कारणीभूत ठरला. दोन संत मनांची आणि योगीमनांची परस्परांना समजाऊन घेण्याची क्रिया-प्रतिक्रिया पासष्टीत घडते. पासष्ट ओव्या चांगदेवांना उद्देशून ज्ञानेश्वरांनी पत्ररूपाने लिहिल्या ती 'चांगदेवपासष्टी' होय.

'ज्ञानेश्वरी' आणि 'अमृतानुभव'मध्ये जी तत्त्वज्ञानाची आत्मनिष्ठ भूमिका ज्ञानेश्वरांनी प्रतिपादिली तिचे सूत्रमय रूप म्हणजे 'चांगदेवपासष्टी' होय. भगवद्‌गीतेवरील निरुपण आणि स्वतंत्र तात्त्विकस्वरूपाचा आत्मानुभव यांचे सारसर्वस्व पासष्टीत एकवटले आहे. योगीराज चांगदेवाच्या कोऱ्या पत्राला दिलेले प्रत्युत्तर असे पासष्ट ओव्यांचे वास्तविक स्वरूप आहे, पण त्यातून पुनः 'दुधावरील साय त्यात साखर मेळणी' या नामदेवाच्या उद्‌गारांप्रमाणे जीव, जगत आणि ईश्वर यांचा स्वानुभवाच्या पातळीवरून ज्ञानेश्वरांनी घेतलेला संदर्भशोध व्यक्त झाला. ज्ञानेश्वरांच्या संपूर्ण जीवनदृष्टीचे आणि वाङ्मयसृष्टीचे जणू प्रतिबिंब चांगदेवपासष्टीत उमटले. ज्ञानेश्वरांची अभंगगाथा आत्माविष्कारी खरी पण तीतूनही अंतिमतः ज्ञानेश्वर शोध घेतात तो जीव आणि ईश्वर यांच्या सामंजस्याचा!

त्यांच्या प्रकाण्ड पांडित्याची आणि मानवतावादी दृष्टिकोणाची जाणीव समाजाला आहे. ज्ञानेश्वर म्हणजे जणू विष्णूचा अवतार आहे इतकी समाजाची पराकाष्ठेची आपुलकीची ज्ञानेश्वरांसंबंधीची भावना आहे. 'ज्ञानेश्वरी' आणि 'ज्ञानेश्वर' यांचे 'माऊलीपण' जे बहुजन समाजाला जाणवते तेही ज्ञानेश्वरांचे चारित्र्य आणि त्यांनी वाङ्मयाच्या माध्यमातून समाजजागृतीची घेतलेली भूमिका याविषयी समाजमनाला

जाणवणारा परमादराचाच विषय होते. लौकिकदृष्ट्या वयाने अतिशय बाल्यावस्थेतील पण वैचारिक कर्तृत्वात मात्र त्रिभुवनात दरारा निर्माण करणारे अशी वाङ्मयीनमूर्ती ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयातून आकारास आली. चांगदेव हा वयाने चौदाशे वर्षांचा सर्व योगविद्या पारंगत ज्ञानवृद्ध, तपोवृद्ध असा योगीपुरुष आणि ज्ञानेश्वरांचे कर्तृत्व ऐकून त्यांना प्रेमभराने पत्र लिहिण्यास बसलेला जिव्हाळ्याचा महापुरुष, परंतु तोही नमस्कार की आशीर्वाद या ऐहिकात शेवटी सापडला आणि कोरेच पत्र त्याने ज्ञानेश्वरांना पाठविले. त्यावेळी ज्ञानेश्वरांना जाणवलेली त्याची मनोभूमिका पासष्टीतून पुनः पत्ररूपानेच सांगितली गेली म्हणजे श्रोता किंवा वाचक पुनः चांगदेवच आहे की जो सिद्धपुरुष आणि जीवन्मुक्त असा आहे. ज्ञानेश्वरी किंवा अमृतानुभवापेक्षा पासष्टीची अभिव्यक्ती आणि आविष्कार वेगळ्या पद्धतीचा झाला. सूर्याने सूर्याशी किंवा सागराने सागराशी केलेल 'सुखसंवाद', 'संविद् संवाद' आणि 'आत्मसंवाद' असे स्वरूप पासष्टीला येते, पण खरी ती 'एकोक्ती'च असते. चांगदेवांच्या निमित्ताने पुनः ज्ञानेश्वरांनी आपले विचार पारखून घेतलेले आहेत. एकच वक्ता आणि एकच श्रोता असे स्वरूप म्हणूनच पासष्टीला येते. चांगदेवाच्या तत्त्वसार ग्रंथात पासष्टीमधील तत्त्वज्ञानाचा पुरस्कार केला गेला ही वस्तुस्थितीही बोलकी आहे.

शके चौतिसे बारा । परिधावी संवत्सरा
मार्गशीर नीज रविवार । नामसंख्या ।। तत्त्वसार १०२८

वरील ओवीवरून शके १२३४ मध्ये 'तत्त्वसार' ग्रंथाची रचना झाली. मुक्ताबाई ही चांगदेवाची गुरु असून ते तिचे अनुगृहीत आहेत असे नामदेव म्हणतो व तत्त्वसारात जे चिंतनाचे विषय आलेले आहेत त्यावर ज्ञानेश्वर परंपरेचा ठसा उमटला आहे. पासष्टीत जो तत्त्वबोध ज्ञानेश्वरांनी चांगदेवाला केला त्याचेच अनुसरण करून 'तत्त्वसार' ग्रंथ चांगदेवाने ज्ञानेश्वर समाधीनंतर निर्माण केला अशी ही परंपरा आहे.

उपनिषदजन्य आत्मविचार

उपनिषदजन्य आत्मविचार हेच ज्ञानेश्वरांचे सर्व वाङ्मयनिर्मितीतील प्रतिपाद्य आहे. आत्मविचार आणि आत्मसाक्षात्काराची अवस्था आत्मबोधात्मक पद्धतीने सांगण्याची मूलगर्भ प्रेरणा ज्ञानेश्वरवाङ्मयात आहे तशी ती पासष्टीतही आहे. स्वानुभूतिजन्य रसाळ खाद्य आत्मदर्शनोत्सुक भक्तांसाठी पुरविले गेले आणि त्यातून आत्मोन्नतीची तृप्ती निर्माण झाली. स्वानंदजीवनातील सुख भोगावयाचे असल्यास आत्मदर्पणातच आत्मरूप शोधा म्हणजे उपाधिविरहित आत्मरूप परमात्म पातळीपर्यंत पोहोचेल. आणि त्यातून प्रतीत झालेली सुखसंवेदना दृश्य.द्रष्टा किंवा ज्ञेय-ज्ञाता आणि अनुभव-अनुभवी यांतील द्वैताचाच निरास करील. आत्मस्वरूपदर्शन म्हणजेच परमात्मस्वरूपदर्शन आणि त्यातून आत्मसुखप्राप्ती शक्य आहे. हा सिद्धांत ज्ञानेश्वर पासष्टीमधून मांडतात. पासष्टीची सुरुवातच वटेशनमनातून होते, कारण वटेश्वर हा चांगदेवाचा परमात्मस्वरूपी श्रीगुरुच आहे. तो 'जगाचा दृश्य

राजाला दिलेल्या मनस्वी उत्तरातून झाली. पैठणला योगबलाने चमत्कार करून विद्वानांकडून शुद्धिपत्र ज्ञानेश्वर भावंडांनी मिळविले आणि 'न वाढवा संस्कृति काम बंड। अनुतापयुक्त अनन्यभक्ती' स्वीकारून नेवास्याला आल्यावर 'ज्ञानेश्वरी' रचली गेली. महानुभाव पंथाचे उद्‌गाते चक्रधरस्वामी यांचे महानिर्वाण होताच विरहव्याकूळ भक्तांनी 'लीळा' आठवून आठवून विरह कमी केला आणि लीळाचरित्राची निर्मिती झाली. ज्ञानेश्वर रागावून बसले आणि 'ताटी उघडा ज्ञानेश्वरा' हा सुप्रसिद्ध अभंग मुक्ताईने गायिला. इतकेच काय पण 'रामायण', 'महाभारत' या 'आकर ग्रंथां'ची निर्मितीही अशाच प्रकारच्या एखाद्या प्रसंगातून झाली होती. ही प्रासंगिकता त्या काव्यात नैमित्तिकता येऊ देत नसते तर फुलाचे रूपांतर फळात व्हावे आणि त्याचाच आस्वाद रसिकाने घ्यावा तसे अशा दंतकथांचे स्थान आहे. कलावंताला अभिव्यक्तीसाठी आणि प्रतिभेला सृजनासाठी उद्युक्त करणे इतकेच महत्त्व अशा प्रसंगांना असते. नामदेवाच्या आणि इतर संतमेळ्याच्या अभंगात तर साक्षात पांडुरंगच स्वतंत्र व्यक्तिमत्व घेऊन वावरत असतो इतकी उत्कट भक्तिमयता कवितेतून साक्षात होते.

'चांगदेव पासष्टी' ही ज्ञानेश्वरांची निर्मितीही अशाच एका प्रसंगातून रूपवंत झाली. वस्तुतः ते स्फुटकाव्य आहे पण काव्यावरोबरच त्यामागील प्रसंगही काव्याभिव्यक्तीला कारणीभूत ठरला. दोन संत मनांची आणि योगीमनांची परस्परांना समजाऊन घेण्याची क्रिया-प्रतिक्रिया पासष्टीत घडते. पासष्ट ओव्या चांगदेवांना उद्देशून ज्ञानेश्वरांनी पत्ररूपाने लिहिल्या ती 'चांगदेवपासष्टी' होय.

'ज्ञानेश्वरी' आणि 'अमृतानुभव'मध्ये जी तत्त्वज्ञानाची आत्मनिष्ठ भूमिका ज्ञानेश्वरांनी प्रतिपादिली तिचे सूत्रमय रूप म्हणजे 'चांगदेवपासष्टी' होय. भगवद्‌गीतेवरील निरुपण आणि स्वतंत्र तात्त्विकस्वरूपाचा आत्मानुभव यांचे सारसर्वस्व पासष्टीत एकवटले आहे. योगीराज चांगदेवाच्या कोऱ्या पत्राला दिलेले प्रत्युत्तर असे पासष्ट ओव्यांचे वास्तविक स्वरूप आहे, पण त्यातून पुनः 'दुधावरील साय त्यात साखर मेळणी' या नामदेवाच्या उद्‌गारांप्रमाणे जीव, जगत आणि ईश्वर यांचा स्वानुभवाच्या पातळीवरून ज्ञानेश्वरांनी घेतलेला संदर्भशोध व्यक्त झाला. ज्ञानेश्वरांच्या संपूर्ण जीवनदृष्टीचे आणि वाङ्मयसृष्टीचे जणू प्रतिबिंब चांगदेवपासष्टीत उमटले. ज्ञानेश्वरांची अभंगगाथा आत्मविष्कारी खरी पण तीतूनही अंतिमतः ज्ञानेश्वर शोध घेतात तो जीव आणि ईश्वर यांच्या सामंजस्याचा!

त्यांच्या प्रकाण्ड पांडित्याची आणि मानवतावादी दृष्टिकोणाची जाणीव समाजाला आहे. ज्ञानेश्वर म्हणजे जणू विष्णूचा अवतार आहे इतकी समाजाची पराकाष्ठेची आपुलकीची ज्ञानेश्वरांसंबंधीची भावना आहे. 'ज्ञानेश्वरी' आणि 'ज्ञानेश्वर' यांचे 'माऊलीपण' जे बहुजन समाजाला जाणवते तेही ज्ञानेश्वरांचे चारित्र्य आणि त्यांनी वाङ्मयाच्या माध्यमातून समाजजागृतीची घेतलेली भूमिका याविषयी समाजमनाला

जाणवणारा परमादराचाच विषय होते. लौकिकदृष्ट्या वयाने अतिशय बाल्यावस्थेतील पण वैचारिक कर्तृत्वात मात्र त्रिभुवनात दरारा निर्माण करणारे अशी वाङ्मयीनमूर्ती ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयातून आकारास आली. चांगदेव हा वयाने चौदाशे वर्षांचा सर्व योगविद्या पारंगत ज्ञानवृद्ध, तपोवृद्ध असा योगीपुरुष आणि ज्ञानेश्वरांचे कर्तृत्व ऐकून त्यांना प्रेमभराने पत्र लिहिण्यास बसलेला जिव्हाळ्याचा महापुरुष, परंतु तोही नमस्कार की आशीर्वाद या ऐहिकात शेवटी सापडला आणि कोरेच पत्र त्याने ज्ञानेश्वरांना पाठविले. त्यावेळी ज्ञानेश्वरांना जाणवलेली त्याची मनोभूमिका पासष्टीतून पुनः पत्ररूपानेच सांगितली गेली म्हणजे श्रोता किंवा वाचक पुनः चांगदेवच आहे कीं जो सिद्धपुरुष आणि जीवन्मुक्त असा आहे. ज्ञानेश्वरी किंवा अमृतानुभवापेक्षा पासष्टीची अभिव्यक्ती आणि आविष्कार वेगळ्या पद्धतीचा झाला. सूर्याने सूर्याशी किंवा सागराने सागराशी केलेल 'सुखसंवाद', 'संविद् संवाद' आणि 'आत्मसंवाद' असे स्वरूप पासष्टीला येते, पण खरी ती 'एकोक्ती'च असते. चांगदेवांच्या निमित्ताने पुनः ज्ञानेश्वरांनी आपले विचार पारखून घेतलेले आहेत. एकच वक्ता आणि एकच श्रोता असे स्वरूप म्हणूनच पासष्टीला येते. चांगदेवाच्या तत्त्वसार ग्रंथात पासष्टीमधील तत्त्वज्ञानाचा पुरस्कार केला गेला ही वस्तुस्थितीही बोलकी आहे.

शके चौतिसे बारा । परिधावी संवत्सरा
मार्गशीर नीज रविवार । नामसंख्या ॥ तत्त्वसार १०२८

वरील ओवीवरून शके १२३४ मध्ये 'तत्त्वसार' ग्रंथाची रचना झाली. मुक्ताबाई ही चांगदेवाची गुरु असून ते तिचे अनुगृहीत आहेत असे नामदेव म्हणतो व तत्त्वसारात जे चिंतनाचे विषय आलेले आहेत त्यावर ज्ञानेश्वर परंपरेचा ठसा उमटला आहे. पासष्टीत जो तत्त्वबोध ज्ञानेश्वरांनी चांगदेवाला केला त्याचेच अनुसरण करून 'तत्त्वसार' ग्रंथ चांगदेवाने ज्ञानेश्वर समाधीनंतर निर्माण केला अशी ही परंपरा आहे.

उपनिषदजन्य आत्मविचार

उपनिषदजन्य आत्मविचार हेच ज्ञानेश्वरांचे सर्व वाङ्मयनिर्मितीतील प्रतिपाद्य आहे. आत्मविचार आणि आत्मसाक्षात्काराची अवस्था आत्मबोधात्मक पद्धतीने सांगण्याची मूलगर्भ प्रेरणा ज्ञानेश्वरवाङ्मयात आहे तशी ती पासष्टीतही आहे. स्वानुभूतिजन्य रसाळ खाद्य आत्मदर्शनोत्सुक भक्तांसाठी पुरविले गेले आणि त्यातून आत्मोन्नतीची तृप्ती निर्माण झाली. स्वानंदजीवनातील सुख भोगावयाचे असल्यास आत्मदर्पणातच आत्मरूप शोधा म्हणजे उपाधिविरहित आत्मरूप परमात्म पातळीपर्यंत पोहोचेल. आणि त्यातून प्रतीत झालेली सुखसंवेदना दृश्य.द्रष्टा किंवा ज्ञेय-ज्ञाता आणि अनुभव-अनुभवी यांतील द्वैताचाच निरास करील. आत्मस्वरूपदर्शन म्हणजेच परमात्मस्वरूपदर्शन आणि त्यातून आत्मसुखप्राप्ती शक्य आहे. हा सिद्धांत ज्ञानेश्वर पासष्टीमधून मांडतात. पासष्टीची सुरुवातच वटेशनमनातून होते, कारण वटेश्वर हा चांगदेवाचा परमात्मस्वरूपी श्रीगुरुच आहे. तो 'जगाचा दृश्य

पसारा म्हणजे वटेश्वराची कृपाच आहे. तो दूर जातो त्यावेळी विश्वपसारा दृक्गोचर होतो आणि तो प्रगट होतो तेव्हा संपूर्ण विश्वालाच तो व्यापून टाकतो. अशा वटेश्वर परमात्म्याचा तू पुत्र असल्यामुळे कापराचा रवा म्हणजे कापूर किंवा सुवर्णाचे अलंकार म्हणजे सुवर्णच असते त्याप्रमाणे हे चांगदेवा तूही परमात्मस्वरूपीच आहेस.' कारण ईश्वर प्रगटही होत नाही आणि नाशही पावत नाही.

कल्लोळ कंचुक । न फेडिता उघडे उदक
तेवी जगेसी सम्यक । स्वरूप जो ।। चांगदेवपासष्टी ।। ५ ।।

'कंचुक' 'फेडणे' आणि 'उघडे' या शब्दातील व्यंजना कवी ज्ञानेश्वरांची साक्ष पटविते. परमात्मा आणि जग किंवा परब्रह्म आणि विश्व यात मुळी मूलतः फरकच नाही. पृथ्वीवरील अणुपरमाणू वेगळे पृथक आहेत असे वाटत असले तरी पृथ्वीपणा नाहीसा होत नाही. त्याप्रमाणे विश्वाचा आविष्कार म्हणजे परमात्म्याचाच चिद्विलास होय. त्यामुळे तोच कसा झाकला जाईल असाच विचार 'ज्ञानेश्वरी' आणि 'अमृतानुभवात' ज्ञानेश्वर करतात.

जेवी नाममात्र लुगडे । येन्हवी सुतची ते उघडे
का माती मृद्भांडे । जयापरी ।।
तेवी शिवोनी पृथ्वीवरी । भासती पदार्थाचिया परी
प्रकाशे ते एकसरी संवित्ति हे ।। चांगदेव पासष्टी : ९, १०.

भिंतीवरील चित्र आणि भिंत, गुळाची ढेप आणि गोडी यात द्वैत दिसत असले तरी ती अंतिमस्वरूपी संविद्प्रतीतीच असते. कारण हा परमात्मा कसा आहे तर 'विश्वस्फूर्ति स्फुरे ! स्फूर्तीची हे' असा. स्फुरणशील त्याचे स्वरूप आहे. चैतन्यशील चित्तत्त्वाचा विलासच चांगदेवपासष्टीत आत्मसुखानुभवी आणि आत्मानुभवी परतत्त्वाचा त्रिपुटीविरहीत असा विलास आहे. 'निवृत्तिपुत्र ज्ञानेश्वर' आणि 'वटेश्वर सुत चांगदेव' यांच्या हृदयसंवादी स्वरूपदर्शनात आरशात प्रतिबिंब पडावे तसे लखख प्रतिबिंब ज्ञानेश्वरांच्या मनोभावांचे पडलेले आहे. म्हणून पासष्टी चांगदेवाला उद्देशून पत्ररूप घेऊन आलेली असली तरी खऱ्या अर्थाने 'एकोक्ति' असते. आत्मा आणि परमात्म्यात जसा ऐक्यभाव असतो तसा तुझ्यामाझ्यात आहे कारण तूही परमात्मस्वरूप आणि मीही परमात्मस्वरूप. म्हणून तुझ्यामाझ्यात अभेद आहे. मी उपदेश करणे म्हणजे तूच तुला उपदेश करण्यासारखे आहे. ज्याप्रमाणे 'उजव्या हाताने डाव्या हाताला मिठी मारावी, गोडीने गोडी चाखावी आणि शब्दाने शब्द ऐकावा किंवा उजेडाने उजेडामागे जावे,' (३७ ते ४२) ह्या गोष्टी जशा अशक्य आहेत त्याप्रमाणे चांगदेवा तुझ्या आणि माझ्या प्रस्तुत संवादाचे आहे. 'सखया' तुझी भेट घेण्यासाठी माझा जीव उत्सुक झाला आहे हे तर खरेच, पण आत्मतत्त्वाच्या दृष्टीने ही भेट स्वतःसिद्धच आहे कारण तू आणि मी असे येथे द्वैत नाहीच. तुला भेटणे म्हणजे मला मीच भेटण्यासारखे आहे. तुझे दर्शन व्यावे अशी इच्छा करताच

माझे मन आत्माकारी होते आणि या सायुज्य अवस्थेत मीतूपणाची अनुभूती उरतच नाही. सर्व 'एकाकार' होऊन जाते. 'आपणिया आपण भेटी। आपणेया माजी' अशी अवस्था होऊन जाते. मीठाने पाण्याची गहराई बघावी किंवा निद्रेची अवस्था जागणाऱ्याने तपासून बघावी त्याप्रमाणे चांगदेवा तुझ्या यर्थार्थ आत्मस्वरूपाची सखोलता मोजू जाणे म्हणजे तुझ्यापासून 'मी' त्वाला बाजूला सारणे ठरते. आरशात बघणारा स्वतःलाच बघतो तसा मला मीच बघत आहे. 'मी तूं वीण भेटी माझी तुझी' अशी अवस्था प्राप्त होते. असे तुझे माझे ऐक्य आहे.

तैसी अप्रमेये प्रमेये भरली । मीतांची अक्षरे भली
रचोनि गोष्टी केली । मेळिवेचि ।। ५३ ।।

अप्रमेय परमात्मा विशद करणारा आणि प्रमेयांचे बाधक असा जो शब्द त्याला गिळून टाकणारी अक्षरे गुंफून तुझ्यामाझ्यातील ऐक्याचा 'अक्षर संवाद' मी रचला असे ज्ञानेश्वर म्हणतात.

ज्ञानदेव म्हणे नामरूपे । विण तुझे साच आहे आपणपे
ते स्वानंद जीवनपे । सुखिया होई ।।
चांगया पुढतपुढती । घरा आलीया ज्ञानसंपत्ती
वेद्यवेदकत्वही अतीती । पदो बैसे ।
चांगदेवा तुझेनि व्याजे । माउलिया श्रीनिवृत्ति राजे
स्वानुभव रसाळ खाजे । दिधले लोभे ।। ५९ ते ६१ ।।

आत्मा हा सद्रूप, प्रकाशमय, आनंदघन असा आहे. त्याचे दर्शन चांगदेवपासष्टीतून घडते. येथेच चांगदेवपासष्टीचे पूर्णरूप साकारते आणि शेवटच्या चार ओव्यांमधून ज्ञानेश्वरांनी उपसंहार करून आपली नितांत विनम्र वृत्तीच स्पष्ट केली आहे.

योगी ज्ञानदेव

योगबळाने भिंत चालवून चांगदेवाच्या भेटीतील अहंकाराचा निरास करणाऱ्या ज्ञानेश्वरांनी व्याघ्रस्थित चांगदेवाला भेटीपूर्वीच योगमार्गाची दिलेली स्पष्ट जाणीव म्हणजे चांगदेवपासष्टी. ज्ञानदेवादि भावंडांची कीर्ती ऐकून नामदेवही पंढरपुराहून आळंदीला आले व सर्वांचे नमस्कार घेऊन तृप्त झाले तर 'अखंड जयाला देवाचा शेजार! कारे अहंकार नाही गेला' असे मुक्ताबाईंनी परखडपणे बोलताच गुरुशिवाय आणि गुरुबोधाशिवाय मोक्ष नाही आणि साक्षात्कारही नाही याची प्रचीती नामदेवाला आली हे त्याच्या अभंगातून दिसते. तसाच प्रसंग ज्ञानदेव चांगदेव भेटीतही घडला. व्याघ्रावर बसून चांगदेव आले तर भिंतीवर आरूढ होऊन निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताई ही चार भावंडे त्यांना भेटली व त्यांचा गर्वपरिहार झाला. या भेटीपूर्वीच ज्ञानेश्वर कीर्ती ऐकून चांगदेवाने कोरे पत्र पाठविले होते व त्या कोऱ्या पत्रातून ज्ञानेश्वरांना

जाणवलेला चांगदेवाचा मनःक्षोभ अतिशय तळमळीने आणि उदारपणे ज्ञानदेवानी पासष्टीतून शांत केला. 'चांगदेवपासष्टी' हे एक बोधात्मक पत्र असले तरी हा बोध स्वजनाला आणि स्वमनाला केली गेलेली बोधवाणी उपदेशवाणी आहे. ही उपदेशवाणी स्वानुभवातूनच स्फुरली व त्यातच रंगली.

आत्मसाक्षात्कार ही ज्ञानेश्वरांची अनुभूती आहे व ती त्यांच्या तिन्ही वाङ्मयकृतींतून आविष्कृत झाली आहे. द्वैताची अविद्यामूलकता, त्रिपुटीची भ्रांती, अजातवाद, नामरूपातीत परमात्म्याचे स्वरूप, त्याची केवलता जीव, जगत, ईश्वर यांची एकरूपता 'ज्ञानेश्वरी', 'अमृतानुभव' आणि 'चांगदेवपासष्टी' या तिन्ही ग्रंथांत समान तत्त्वचिंतनसूत्रातून प्रभावीपणे अभिव्यक्त झाली आहे. ज्ञानेश्वरांचे अभंग मात्र सगुणाचा पुरस्कार करतात.

ज्ञानेश्वरांची अभंग गाथा

ज्ञानेश्वरांच्या नावावर जवळ जवळ साडेनऊशे ते हजाराचे घरात अभंग उपलब्ध आहेत. हे सर्व अभंग ज्ञानेश्वरांचे आहेत असे गृहीत धरले तर ज्ञानेश्वरांची जी एक वाङ्मयीन भूमिका आहे, जो जीवनविषयक दृष्टिकोण आहे, त्याला सुसंगत असे स्वरूप काही अभंगांचे वाटत नाही अर्थात जोपर्यंत उद्‌बोधक पुरावा उपलब्ध होत नाही तोपर्यंत जरतरच्या भाषेशिवाय गत्यंतर नाही. उदा. आवटेप्रतीतून काही अभंग गाळून नामदेवगाथा सरकारी प्रत तयार झाली असली तरी तीतही पुनः अस्सल आणि नक्कल यांची सरमिसळ झालेली जाणवतेच. तरीही तिचा आधार घेऊन अभ्यासक चिकित्सा करतो; कारण कुठेतरी एका समान पातळीवर येऊन विचार करणे आवश्यक ठरते व अशा वेळी तोच योग्य असतो. ज्ञानेश्वरांच्या अभंगांची चिकित्सा आणि पाठनिश्चिती होणं आवश्यक आहे. तसेच ज्ञानदेवांच्या वाङ्मयीन कर्तृत्वात 'ज्ञानेश्वरी','अमृतानुभव','पासष्टी','अभंगगाथा' असाही अनुक्रम आपण कोणत्या आधारावर स्वीकारतो. पैकी महीपती आणि निरंजनमाधव या उत्तरकालीन चरित्रकारांपेक्षा नामदेवाने उभे केले ले जे ज्ञानदेव-चरित्र आहे तेच काळाच्या दृष्टीने अधिक सत्यनिष्ठ मानणे आवश्यक आहे. आणि नामदेवाने 'ज्ञानेश्वरी' आणि 'अमृतानुभवाचा' जसा स्पष्ट उल्लेख केला तसा पासष्टीचा आणि अभंगगाथेचा केलेला नाही. पासष्टीप्रकरण अतिशय लहान म्हणून सोडून दिले तरी अभंगनिर्मिती तर विपुल आहे. ज्ञानेश्वरांच्या उत्तर आयुष्यात नामदेव त्यांच्या अगदी निकट होता तरी ज्ञानेश्वरांच्या अभंगनिर्मितीचा उल्लेख नामदेवाने का केला नसावा? ज्ञानेश्वर एक की दोन हा वाद येथे सुचवायचा नाही; कारण अभंगातूनही ज्ञानेश्वरी अमृतानुभव आणि पासष्टीमधील आत्मविचाराचे आणि अद्वैताचे प्रवाह वाहते असून एका आनंदकल्लोळी तृतावस्थेची निर्भरावस्था अभंगातून जाणवते म्हणून अभंगनिर्मिती ज्ञानेश्वरांचीच आहे यात शंका नाही. प्रश्न आहे नामदेवाने उल्लेख का केला नसावा? एक कारण असे संभवते की, 'ज्ञानेश्वरी' आणि 'अमृतानुभवा'तील विचारदर्शनाचा आत्यंतिक प्रभाव आणि दीर्घ

स्वीकारणारे समकालीन साहित्यिक ज्ञानेश्वरांनी अभंगनिर्मिती करू लागताच विशेष स्वतःपेक्षा वेगळेपण त्यांना जाणवले नसावे. दुसरे कारण असे संभवते की 'ज्ञानेश्वरी' आणि 'अमृतानुभव' या निर्मितीची समकालीन विचारविश्वात जातच वेगळी ठरली आणि कुलपरंपराही अनन्य ठरली. उलटपक्षी विठ्ठलभक्ती, विठ्ठलसंप्रदाय आणि भजनी कीर्तनासाठी अभंगनिर्मिती ही पंढरपुरात आणि महाराष्ट्रात होतच होती. त्यात ज्ञानेश्वर अभंगनिर्मिती करू लागता काही वेगळा चमत्कार घडला असे वाटण्यासारखी परिस्थिती नव्हती. सर्वच संतमंडळी उत्कट भक्तीने विठ्ठलाचे नामसंकीर्तन आणि सगुणभक्ती करीत होती, ती परंपरेने चालत आलेली होती. नामदेवाच्या घराण्यात परंपरेने विठ्ठलभक्ती चालत आलेली होती. 'पंढरी माहेर विठ्ठल माउली' अशी सर्वत्र भागवत धर्मियांची धारणा होती आणि अभंगनिर्मितीचे मूळ प्रयोजन नामसंकीर्तनाचे आणि नामस्मरणाचे आहे. उत्कटपणाने जाणवलेले ईश्वरी स्वरूपाचे भावसत्य सगुणपद्धतीने साक्षात करणे हा अभंगनिर्मितीचा धर्म होता. ज्ञानेश्वरीत आलेले नामस्मरण हे मूलतः गीतानुवर्ती होते. 'अमृतानुभव' आणि 'चांगदेव पासष्टीत' नामस्मरण आलेले नाही उलटपक्षी ज्ञानेश्वरांची संपूर्ण अभंगगाथा आणि हरिपाठ यात नामस्मरणाचा आणि नामसंकीर्तनाचा जागर भरून गेला आहे यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, ज्ञानेश्वरांची अभंगनिर्मिती ही ज्ञानेश्वरी अमृतानुभवाच्या नंतरची निर्मिती तर आहेच, पण तीर्थयात्रेत आणि तीर्थयात्रेनंतरची ती असावी असे अनुमान काढता येईल. नामदेव तुकाराम यांच्या कवितेत जसा कविमनाचा विकास कवितेतून जाणवतो तशी अवस्था ज्ञानेश्वरांच्या काव्यनिर्मितीची नाही. पूर्णत वाङ्मयीन आणि आध्यात्मिक सौंदर्याने नटलेली भावतृप्त आणि विचारपरिप्लुत अशी काव्यनिर्मिती ती आहे. त्यामुळे कविमनाचे विकसनशीलत्व किंवा काव्याचा विकास त्यांच्या कवितेतून व्यक्त होण्याचा प्रश्न उभा राहात नाही. ज्ञानेश्वरांची अभंगनिर्मिती म्हणजे एक उत्स्फूर्त आणि अंगभूत सौंदर्याने नटलेल्या तरल भाववृत्तींचा हर्षोद्गार आहे आनंदोद्गार आहे, हा आनंद कशाचा तर अद्वैतीप्रतीतींचा आणि आत्मसाक्षात्काराचा असा हा आनंद होय.

ज्ञानेश्वरीत एका आदर्शाचे शोधकार्य ज्ञानेश्वरांची प्रतिभा घेते. अमृतानुभवात जीवन्मुक्तीच्या चिदैक्य प्रतीतीची डोळस चिकित्सा ही प्रतिभा करते. चांगदेवपासष्टीत आत्मापरमात्म्याच्या अद्वैतातच मीतूपणा विरघळून टाकणारी अनन्य जाणीव ही प्रतिभा निर्माण करते तर अभंगात मात्र विठ्ठलभक्तीचा आणि नामस्मरणाचा अनेक पातळ्यांवरून जयजयकार करते. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव आणि चांगदेवपासष्टी हे तिन्ही वैचारिक ग्रंथ आळंदी नेवासे या परिसरात निर्माण झाले. नंतर पंढरपूरला यात्रेनिमित्त गेल्यावर नामदेवाच्या पंढरपुरात व पुढील यात्रेत जो सहवास घडला त्यामुळे त्यांच्या संगतीत असतानाच ज्ञानेशांनी बहुतेक अभंग रचले असण्याचा संभव आहे. सगुणोपासना आणि विठ्ठलभक्ती हे जे अभंगांचे वैशिष्ट्य त्याची संगती एरवी लागत नाही '....ज्ञानेश्वरांच्या उत्तर

आयुष्यात नामदेवाच्या सहवासाने ज्ञानेशांनी हे अभंग रचले असावे.'[१] असा अन्वयार्थ ज्ञानेश्वरांच्या अभंगांचा डॉ. पेंडसे यांनी काढला आहे.

अभंगाची स्वतंत्रता

ज्ञानेश्वरी, अमृतानुभव आणि चांगदेवपासष्टी या तिन्ही वाङ्मयनिर्मितीची अभिव्यक्ती एका विशिष्ट पद्धतीने आणि भूमिकेतून झाली तर अभंगगाथा मात्र वरील कलाकृतीशी सृजनाचे नाते स्वीकारूनही पुनः पृथगात्म झालेली आहे. वास्तविक आत्मसाक्षात्काराची मनोवस्था सर्वच ज्ञानेश्वरनिर्मितीतून गोचर होते पण अभंगगाथेतून ती काही वेगळ्याच पातळीवरून गोचर झाली. आनंदाचा कल्लोळ, प्रतीतीचा गहिरा रंग आणि आत्माविष्काराचा झळाळ अभंगकवितेतून साक्षात झाला. अभंगाला विविधता आली. अनेक पदरीपणा आला आणि वास्तवाच्या पातळीवरील रूपकात्मकता तिने स्वीकारली. कृष्णभक्तीची अनेक भावरूपे आणि विठ्ठलभक्तीची सगुणता अभंगातून प्रवाही बनली 'बांधल्या तळ्याचा फुटियेला बांध,' अशा सहस्त्रधारांनी जाणवलेले आत्मस्वरूप आणि ब्रम्हस्वरूप ज्ञानेश्वरांच्या भावकवितेतून, अभंगातून प्रवाही बनते. ब्रम्हैक्याची आणि आत्म्यैक्याची प्रवाही, गतिमान आणि ओघवती, नादमयी आणि लावण्यमयी भावावस्था शब्दरूपातून पदन्यास करीत असते. आत्मरूपात विश्वरूप आणि विश्वरूपात आत्मरूप शोधणारी भावपरता अभंगातून व्यक्त होते. म्हणून या कवितेत नामसंकीर्तन आणि नामस्मरण 'मी'च्या भूमिकेतून गोचर होते. राधा आणि कृष्ण, विठ्ठल आणि भक्त यांची सगुणप्रतीती येत जाते. सगुणाकडून निर्गुणाकडे आणि निर्गुणाकडून सगुणाकडे जाण्याचा ज्ञानेश्वरांच्या प्रतिभेला छंदच आहे. ज्ञानेश्वरीत असे सारखे घडत असते. अभंगातही सगुण आणि निर्गुण रूपद्वयात असलेले गोविंदाचे 'केवल रूप' जाणवलेले असते !

तुज सगुण म्हणू की निर्गुण रे । सगुण निर्गुण एकु गोविंदु रे
अनुमानेना अनुमाने ना । श्रुति नेति नेति म्हणतां गोविंदु रे ॥
तुज स्थूल म्हणो की सूक्ष्म रे । स्थूल सूक्ष्म एकु गोविंदु रे ॥
तुज आकार म्हणो की निराकार रे । साकारूं निराकारू एकु गोविंदु रे ॥
तुज दृश्य म्हणो की अदृश्य रे । दृश्यअदृश्य एकु गोविंदु रे ।
निवृत्तिप्रसाद ज्ञानदेव बोले । बाप रखुमादेविवरू विठ्ठलु रे ॥

सगुण-निर्गुण, स्थूल-सूक्ष्म, आकार-निराकार, दृश्य-अदृश्य यांच्याही पलिकडे आणि अतीत असलेले ईश्वररूप एका भावपातळीवरून न्याहाळणारे कविमन त्या रूपाशीच एकरूप होऊन जाते, मिसळून जाते. 'चित्ते चैतन्या मिठी घालिता खेवो' अशी अवस्था कविमनाची होते. 'मूळ ना डाळ शाखा ना पल्लव' असा ईश्वर सगुणपणाची शोभा घेऊन निर्गुणपणे उभा असलेला ज्ञानेश्वरांच्या अनुभवाचा विषय आहे. त्याची गती

---

१. ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान : डॉ. शं. दा. पेंडसे पृष्ठ ३७५.

आणि लीला, जीव आणि शिवाची प्रभा, त्याचे चराचरात कोंदलेपण, असे हे काही समजू शकत नाही. त्या स्वरूपाला लघु म्हटले तर तो सूक्ष्मही नाही आणि सूक्ष्म म्हटले तर अगाधही नाही. तर 'सगुण-निर्गुण जाला बाईये वो' असे त्याचे अस्तित्व आहे.

आपण शून्याकार की आपण निराकार। आकारनिराकारचे दोन्ही नाटो ही ज्ञानेश्वरांची काव्यजाणीव आणि जीवनजाणीव ईश्वरी एकरूपतेच्या संदर्भात सर्व वाङ्मय-निर्मितीत प्रभावी ठरली आहे. उदा.

सगुणाचें शेज निर्गुणाचो बाज । सावळी विराजे कृष्णमूर्ती
मन गेले ध्यानी कृष्णचें नयनी । नित्यता पर्वणी कृष्णमुख
हृदयपरिवारी कृष्ण मनोमंदिरी । आमुच्या माजघरी कृष्णबिंबे
निवृत्ति निघोट ज्ञानदेवा वाट । नित्यता वैकुंठ कृष्णसुखे ।।

ज्ञानेश्वरांच्या अभंगवाणीत केवळ विषयांची विविधता आहे असे नाही, तर अभिव्यक्तीची आणि आशयाचीही अनेक पदरी वीण अभंगवाणीत घातली जाते. अभंगवाणीत कवी ज्ञानेश्वर अतिशय उत्कटतेने आणि मोकळ्या मनाने काव्यक्रीडा करीत आहेत. एरवी अथांग असे ज्ञानेश्वरांचे मन अभंगात किती उत्कट भावभावनांनी उचंबळून आले आहे, याची साक्ष पटते. भोवरा फिरता फिरता अथांग जलाशयात खोल खड्डा करीत जावा आणि पुनः पाण्यात पाणी मिसळून जावे तशी क्रिया-प्रतिक्रिया अभंगातील भाव-भावनांची आहे. मूळ विषय कृष्णविठ्ठलाचे किंवा हरिहराचे नामस्मरण, नामसंकीर्तन हा असतो पण विविध पातळ्यांवरून आणि विविध वृत्तछंदांतून अनेक पदरी पद्धतीने ईश्वराचे इंद्रियगोचर रूप न्याहाळले गेले असते.

एखादा छायाचित्रकार एकाच वस्तूची जशी अनेक परिमाणातून चित्रण करून सौंदर्यदृष्टी व्यक्त करतो तसे ज्ञानेश्वर हे ईश्वराच्या (विठ्ठलाच्या) छायाचित्रणाबरोबरच मनोभावचित्रण करीत असतात. आणि त्याशी एकरुप, तदात्म आणि एकाकार झालेले असतात. वस्तुतः या सर्व ज्ञानेश्वरांना झालेल्या परमानंदाच्याच विविध मनोवस्था असतात. समुद्र तोच परंतु कधी प्रचंड लाटांनी डहूळणारा तर कधी किनाऱ्याशी लडिवाळ जवळिक साधणारा! तशी अभंगवाणीतील परमानंदाची अवस्था या एकाच मनोवृत्तीतून तल्लीनतेतून साकारली आहे. मग ती गौळण असो, विराणी असो, कूट असो किंवा नाममहिमा असो ज्ञानेश्वर परमानंदाची उत्कट भावावस्था लक्षकेंद्र बनवितात व त्यातून अनेकपदरी भावानुभव गोचर होतो; जीवनसाफल्याचा श्रुतिसुभग आनंदोत्सव कधी स्त्रीमनाचे नाट्य उभे करीत तर कधी कानडाविठ्ठलुचा भक्त बनीत ज्ञानेश्वर साजरा करीत असतात. तो एक सुखसोहळा असतो, एक सुखमेळा असतो.

रूप सामावले दर्शन ठाकले । अंग हरपले तेंचि बाही
पाहो जाता तव पाहण्यावेगळे । ते सुख सोहळे कोण बोले
जेथे जाय तेथे मौनचि पडिले । बोलवेना पुढे काय करू –२७५.

ज्ञानेश्वरांना झालेल्या आनंदाच्या जशा अनेक परिसीमा आहेत त्याप्रमाणे आत्मप्रतीतीचा, आत्मदर्शनाचा आणि अद्वैतप्रतीतीचाही तो आनंद असतो. मनाचा अंकुर मनीच मुरला अशी ती अद्वैतावस्था असते.

सावळेचे तेज सावळे बिंबळे । प्रेम ते घातले हृदयपटी
निरालंब बाज निरालंब तेज । चित्ररस निज निजतेजे
आदि मध्य अंत राहिला अनंत । न दिसे द्वैताद्वैत आम्हा रया ।।–२६

असा हरी ज्यावेळी अंगणी बघितल्याचा साक्षात्कार कवीला होतो त्यावेळी अंगांगांनी तो मोहरून जातो. चिदानंदाची मांदुस किंचितघन चिदाकाश होऊन तेजःपुंज प्रकाश-शोभा सर्वदूर फाकलेली असते. आणि 'उचलल्या नाही भुजा देई क्षेम' अशी स्पर्शानुभूती साक्षात होते. ज्ञानेश्वरीतही अर्जुनाच्या नितांत प्रेमाने कृष्ण भुजा पसरून त्याला क्षेमालिंगन देतो असा तेराव्या अध्यायात उल्लेख आहे. आजी सोनियाचा दिन वघितल्याचा हर्षोल्हास 'हरि पाहिला रे हरि पाहिला रे । सवाह्याभ्यंतरी अवघा व्यापक मुरारी' अमृत-वर्षावासारखा बरसत असतो व त्यात कविमन न्हाऊन निघत असते. प्रत्यक्षावलोकनाचा प्रत्यक्षानुभूतीचा आणि प्रत्यक्षानुप्रतीतीचा अनुभव मनःपटलावर कोरला जातो. व त्याचे शब्दरूप अभंगातून झिरपत असते. विविध रूपकांतून अद्वैती भावप्रतीतीचे नाट्य गोचर होत असते. उदा. बाळक्रीडेचे अभंग, पाळणा, घोंगडी, पाईक हमामा, अंबुला एकविध, सखीसंवाद या आणि अशा प्रकारच्या रूपकात्मक अभंगातून अनेक भावना, त्यातून ईश्वराची प्रतीती ज्ञानेश्वरांनी घेतली आहे अनेक संवेदनांच्या माध्यमातून! म्हणून त्यांच्या अभंगकवितेत एकीकडे मनोभावदर्शन घडत असते, तर दुसरीकडे ईश्वराची एकरूपता जाणवत असते. नामदेवतुकारामाच्या अभंगात त्यांच्या काव्य-जीवनातील आणि लौकिक व पारमार्थिक जीवनाच्या अनंत पातळ्या, विविध परिवर्तने आणि कमालीची आर्तता अभिव्यक्त झालेली असते. ज्ञानेश्वरांच्या सर्वच अभंगांतून मग ते रूपकाश्रयी असोत किंवा वास्तव लोकजीवनातील तपशीलाला अभिव्यक्त करणारे असोत किंवा स्त्री मनोभाव दर्शन घडविणारे असोत, सर्व अभंगांचा मूळकंद हा निर्भर अशा साफल्यावस्थेचा व तीतून निर्माण होणाऱ्या ज्ञानात्मक अनुभवाचा असतो ज्ञानेश्वरांच्या मनोरंगमंचावर घडणारेच विविध नाट्यप्रसंग विविध रूपकांमधून आविर्भूत होतात. म्हणूनच ज्ञानेश्वरांच्या अभंगांना धाव्यांचे, स्तोत्रांचे किंवा भूपाळी आणि आरतीचे स्वरूप येऊ शकलेले नाही ज्ञानेश्वरांची आरती नंतरच्या पिढ्यांनी गायिली पण ज्ञानेश्वर मुळी मनाने आणि शरीरानेच पंचमहाभूतांशी, निसर्गाशी आणि चैतन्यतत्त्वाशी एकरूप झालेले आहेत. त्रिपुटीविरहित आणि ज्ञाता-ज्ञेय संबंधापासून त्यांनी स्वतःला मोकळे केलेले आहे आणि ही प्रचीती त्यांना कशी येते तर....

इवलेसे रोप लावियले द्वारी । त्याचा वेलु गेला गगनावरी
मोगरा फुलला मोगरा फुलला । फुले वेचिता अतिभारू कळियासी आला
मनाचिये गुंती गुंफियेला शेला । बापरखुमादेवीवर विठ्ठली अर्पिला –२३४

ही भावबृत्तीच संपूर्ण अभंगनिर्मितीमागे आहे. एका आनंदाच्या डोहावर उठलेले अनंत तरंग म्हणजे ज्ञानेश्वरांची अभंगसृष्टी 'चंदन जेवी भरला अश्वत्थ फुलला' असा निराकार, निर्गुण ईश्वर अनुभूतीचाच विषय होतो. ही अनुभूती पंचज्ञानेंद्रियात्मक आणि पंचसंवेदनातून आलेली आणि स्वीकारलेली असते.)

गौळणी आणि विराण्या

(ईश्वरी साक्षात्काराचा सर्वांगाने येतलेला अनुभव व त्यातून साधलेला आत्माविष्कार म्हणजे ज्ञानेश्वरांच्या 'गौळणी' आणि 'विरहिणी' होत. ईश्वराशी अनेक पातळ्यांवरील एकरूपता गौळणीत आणि विरहिणीत स्त्रीभाव आणि पुरुषभाव यांच्या आदिम प्रणयबंधनातून ज्ञानेश्वरांनी व्यक्त केली आहे. केवळ ही मधुराभक्तीची कविता नाही तर येथे दोन व्यक्तींनी परस्परांत मिसळून जाण्याची विरघळून जाण्याची अपेक्षा आहे आणि ती प्रणयानुभवातून गोवर होते. स्त्रीत्व आणि पुरुषत्व यांचे अनंत काळाचे जे भावबंध आहेत त्यांच्या साह्याने आणि माध्यमातून 'गौळण' आणि 'विरहिणी' रूप घेते. तिच्या नावावरूनच लक्षात येते की हे एका स्त्रीचे गीत आहे तेही विरहभावनेने ओथंबलेले असे. अपसुकच अशा गीतात स्त्रीभाव व्यक्त होतोच पण त्याबरोबरच तिच्या विकाराच्या आणि अनंत भावनांच्याही तरंगाकृती 'गौळण' आणि 'विरहिणी' मधून आकाराला येतात. ती प्रियुचि प्राणेश्वरीच असते. म्हणून ज्ञानेश्वरांच्या गौळणीत किंवा विरहिणीत सांकेतिकता येत नाही. एका आत्मरत भूमिकेतूनच स्त्रीभावाचे नाट्य घडत असते. त्यातील बारकावे टिपले जात असतात. तपशील सांगितला गेला असतो. शकून मागितला गेलेला असतो आणि मीलनक्षणाची आतुरता शब्दाशब्दांतून ओसंडत असते. शारीर मीलनापेक्षाही मनोमीलनावर ज्ञानेश्वर भर देतात. एका अव्यभिचारी प्रेमनिष्ठेने 'बावरी' झालेली गौळण दही-दूध विकायला गेली असता 'गोविंद घ्या हो, गोपाळ घ्या हो' अशी त्याच्याशी एकरूप होऊन जाते. देहयुक्त गौळण आणि विरहिणी एकीकडे शृंगारभावदर्शन घडवितात तर दुसरीकडे देहमुक्ता होऊन 'देह पालटतो' अशीच गळ प्रियकराला घालतात. ईश्वरा-भक्त यांच्या अद्वैती स्वरूपदर्शनासाठी मराठी गौळणींचा आणि विरहिणीचा जन्म झाला असला तरी ईश्वर या प्रियकराला प्रेमपिसे लावणारी प्रेयसी तितकीच उत्कट आहे, भावविव्हळ आहे. 'तुजविण येकली रे कृष्णा न गमे राती' 'पाया दिधली मिठी घातली जीवे गांठी। साउमा नये जगजेठी उभा ठेला गे माय। प्रत्येक विरहिणी म्हणजे स्वतंत्रपणे प्रियकराशी एकरूप होणाऱ्या स्त्रिया आहेत. स्त्री समूहमनाची प्रियकराविषयीची भावना 'गौळणी' व 'विरहिणी' मधून बोलकी होते. येथे स्त्रीभावालाही विविधता आलेली आहे. स्त्री-सुलभ उतावीळी, कातरता, सर्वस्व अर्पण करण्याची तयारी, भोळेपणा, सुखावणारी, तृप्त असणारी, तृप्ती मागणारी, संगनिःसंगापलीकडे मनाने पोहोचणारी, लौकिकाची दृष्टी ठेवणारी, सर्वस्व अर्पण करण्यात पुढाकार घेणारी अशी ही स्त्री-चित्रे आहेत तरी ती सर्व मर्यादशील आहेत. ज्ञानेश्वरांची विरहिणी व्यभिचारिणी नाही, तर एकनिष्ठ

पणे प्रेम करणारी स्त्री आहे. घराबाहेर पडण्याचा अनेकवेळा प्रयत्न करणारी पण अंगणा-ओसरीच्या बाहेर न पडणारी अशी ही मर्यादशील भारतीय स्त्री आहे. 'चंदनाची चोळी माझे सर्व अंग पोळी' इथपर्यंतच तिचा शृंगार जातो. लावणीतील शृंगारभाव दर्शनाप्रमाणे तो उघडाबाघडा आणि बटबटीत नाही किंवा गीतगोविंद आणि गाथा सप्तशतीमधील शृंगाराप्रमाणे सांकेतिक नाही. प्रियकराची वाट बघूनही भेट होत नाही म्हणून शकुन मागणारी मनाची सरळ आणि भोळी अशी ही विरहिणी आहे त्यामुळे ती अधिकच स्वाभाविक आणि जिवंत उतरली आहे. 'पैल तो गे काऊ कोकताहे' त्याला शकुन मागणारी आणि अनंतकाळापर्यंत वाटेवर डोळे लाऊन बसलेली ही स्त्री 'पाहता वाटुली शिणुली डोळिये' अशी आहे. शब्द, स्पर्श, रस, रूप गंधात्मक संवेदनेतून कृष्णरूपाला न्याहाळणारी स्त्री आहे. आणि त्याच्याशी शरीरापेक्षाही मनाने तादात्म पावणाऱ्या स्त्रीमनोभावाचे दर्शन ज्ञानेश्वरांनी आत्मपातळीवरून घडविले आहे.

ज्ञानेश्वरांनी एकूणच 'स्त्री'कडे विशेष अगत्याने लक्ष केंद्रित केले आहे असे नाही तरीही ज्ञानेश्वरीत मातेचा आणि पतिव्रतेचा त्यांनी केलेला गौरव, अमृतानुभवात पति-पत्नीच्या उत्कट प्रणयाचे शिवशक्ती मीलनात घडविलेले दर्शन आणि अभंगातील गौळणी आणि 'विरहिणी' मधील स्त्रीसृष्टी लक्षात घेतल्यास ज्ञानेश्वरांची स्त्रीविषयक भूमिका समजू शकते उत्कट प्रणयाला गौरवाने ते शब्दांकित करतात, स्त्रीच्या वात्सल्याचा गौरव करतात व व्यभिचारिणींची निर्भत्सना करतात. 'घुणु वाजे धुण धुणा' या विरहभाव अभिव्यक्त करणाऱ्या नादलययुक्त गीतातूनही विरहाची दुःखकल्लोळी अवस्था टोकदार होत जाते; पण त्याबरोबरच संयमशील विरहिणी मात्र 'विठ्ठले मज ऐसे केले' असे बोलू लागते. आपली उत्कट विरहार्त अवस्था होण्यास विठ्ठल कारणीभूत आहे. माझा त्यात काही दोष नाही, इतकी भावडेपणाने कबुली देणारी विरही स्त्री जिवंत होते. तिला दर्पणी पाहता 'रूप न दिसे की आपुले' अशी तिची अष्ट सात्विकभावांनी अवस्था झाली आहे. ज्ञानेश्वर वाङ्मयात 'दर्पणा'ला एक विशेष महत्त्व आहे ते वेगवेगळ्या भूमिकेतून. घनु वाजे घुण-घुणा...या विराणीतील दर्पणाचा उल्लेख काही और आहे. 'दर्पणी पाहता रूप न दिसे वो आपुले' या एकाच ओळीतून संपूर्ण कवितेतील शृंगारचित्रण अतिशय मुलायम पद्धतीने उलगडत जाते. स्त्री सुलभ आरश्यात बघण्याची आवड, रूपवान असल्यामुळे आरश्याच्या सान्निध्याचे हवेहवेपण, प्रियकर न आल्यामुळे डोळे भरून आल्यामुळे दर्पणात कुणाचे रूप दिसत नाही. उलटपक्षी दर्पणी मी माझे रूप बघते पण हृदयात असलेले सावळ्या कृष्णानेच वेडावलेली मी त्याच्या रूपाला दर्पणात पुनःपुनः बघू लागते. हे रूप घननीळ, सावळे, सावळ्या घुंदीचे आहे. त्याला 'विरहिणी ज्ञानदेवी'च शोधते आहे. भेटते आहे. त्याच्याशी एकरूप होऊन जाते आहे. सर्व बाह्य उपचारांसह आणि सर्व अंतरंग गुणधर्मासह. अद्वैताचा अतीद्रिय अनुभव प्रणयाच्या आणि रंगसंवेदनेतूनही अभिव्यक्त होतो अरूपाला रूप येते. निराकार कांतिमान होऊन कृष्ण-विठ्ठलरूपात साजिवंत होतो. केवळ भक्ती आणि रती हाच गौळणी विराण्यातील स्त्रीभाव नाही, तर स्त्रीत्वाचे सारे स्वभावविशेष आणि गुणविशेष घेऊन

अनुभूती अभिव्यक्त होते. या अनुभूतीलाच देखणेपण येते ते स्त्रीचे देखणेपण नसून अनुभूतीचे देखणेपण असते. चैतन्यतत्त्वाशी एकरूप होणारे कविमन आणि त्या कविमनाने घेतलेले स्त्री-भावरूप असे विराण्या व गौळणीमधील अनुभूतीचे स्वरूप आहे. ज्ञानेश्वरांच्या संपूर्ण अभंगनिर्मितीत जो साकल्याचा आनंदोत्सव आहे त्यातील प्रणयभावनेची परमोच्च अवस्था विराण्या आणि गौळणीमधून साक्षात होते. ज्ञानेश्वरांचे उपदेशपर अभंग किंवा बाळ-क्रीडेचे अभंग यापेक्षा आनंदाच्या दाही दिशा प्रकाशमान करणाऱ्या इतर सर्व अभंगांतील अद्वयानंदैक्य अवस्थेतील विरण्यातील एकात्म अनुभव खरोखर अनिर्वचनीय ठरतो.)

हरिपाठाचे अभंग

(काव्यदृष्ट्या हरिपाठाला महत्त्व देण्यापेक्षा वारकरी संप्रदायातील साधनमार्गातील भक्तिमार्गप्रदीप स्वरूपी अशी भूमिका हरिपाठाच्या अभंगांची आहे. वारकरी संप्रदायाचे आचारधर्माचे आणि विचारधर्माचे रहस्योद्घाटन हरिपाठाचे अभंग करतात. नित्यनैमित्तिक पठणात हरिपाठाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. पठणातील पुनरावृत्ती, नित्यता आणि सूत्रमयता हरिपाठातील अभंगांनी जोपासली म्हणून ज्ञानेश्वरी हा वारकरी भक्तांचा पूजाग्रंथ समजला गेला तसा हरिपाठाचे अभंग नित्यपठणाच्या परिपाठासाठी स्वीकारले गेले. ईश्वर-सेवा म्हणजेच गुरुसेवा, ईश्वरगुणसंकीर्तन, संतसमागम आणि सगुणभक्तीतील नामसंकीर्तन आणि नामस्मरण हे हरिपाठाचे प्रमुख विषय असून वारकरी पंथाच्या आचारधर्माचा तो एक आदर्श वस्तुपाठच ठरला. नामसंकीर्तनाचे, ईश्वरीनाम भक्तीचे वेगळेपण हरिपाठातून व्यक्त झाले. निर्गुणोपासक ज्ञानेश्वरांनी सांगितलेली सगुणोपासना म्हणजे 'हरिपाठ'!

देवाचिये द्वारी उभा क्षणभरी । तेणे मुक्ती चारी साधियेल्या
हरिमुखे म्हणा हरिमुखे म्हणा । पुण्याची गणन कोण करी ॥
त्रिगुण ते असार निर्गुण हे सार । सारासारविचार हरिपाठ ॥

मोक्षसाधना, आत्मसाक्षात्कार आणि नामस्मरणासाठी भक्तभूमिकेतून ज्ञानेश्वरांनी केलेले हरिगुणलीलावर्णन हरिपाठात येते. विविध उपाधींसह ईश्वरसंकीर्तनापेक्षा केवळ त्याच्या नामस्मरणाने ईश्वरी साक्षात्कार होतो ही शिकवण ज्ञानेश्वर हरिपाठातून देतात, केवळ अठ्ठावीस अभंग असूनही ते वारकरी संप्रदायाच्या आचारसंहितीचे सूत्ररूप मंत्र आहेत. संसारात तरून जाण्यासाठी संसार न सोडता ऐहिकाचा परिहार नकरता केवळ नामस्मरणाने परमेश्वर भेटतो व मुक्ती मिळते. घटपटादि खटपटीपेक्षा केवळ नामोच्चाराने पुण्यसंग्रह होतो. ज्ञान म्हणजे आत्मज्ञान आणि आत्मज्ञान होणे हेच मोक्षाचे साधन होय.

चौदा विद्या जरी पूर्ण अभ्यासिले । व्यर्थचि जाहले ज्ञानेविण
अष्टांगादि योग प्रयासे जोडिले । व्यर्थचि जाहले ज्ञानेविण ॥
मुक्ति पावावया करिजे हरिभक्ती । तरीच विरक्ती प्रगटेल
विरक्तीविषयी होतांची विचार । नित्य हे नैश्वर ओळखती
तेव्हा आत्मज्ञान अनुभव होय । अविद्यत्व जाय जीवरूप ॥

भक्ती, विरक्ती, मुक्ती आणि आत्मज्ञान या चार साधकावस्था येथे सांगितल्या आहेत. 'कानडा विठ्ठलु कर्नाटकु 'ने आळंदी नेवाशाच्या ज्ञानेश्वरांना वेडे केले व भक्तिमार्गातील नामस्मरणाचा उद्घोष त्यांच्याकडून जणू पांडुरंगाने करवून घेतला. नामदेव हे परंपरेने विठ्ठलभक्त व विठ्ठलसांप्रदायिक होते. परंतु नाथपंथाची परंपरा स्वीकारलेले नाथपंथी ज्ञानेश्वरांचा शैव संप्रदाय आणि कर्नाटकातील विठ्ठल संप्रदायाचा संगम 'भक्तिशाळा' म्हणजे हरिपाठाचे अभंग आहेत. पंढरी महात्म्य वर्णनात ज्ञानेश्वरांनी पंढरपुराला 'भक्तिशाळा' असे संबोधिले आहे तेही अहेतुपूर्वक झाले नाही, तर आज काळाने त्यावर शिक्कामोर्तब केले आहे. 'हरि मुखे म्हणा हारे मुखे म्हणा' असा भक्तांच्या मांदियाळीला ज्ञानेश्वरांचा आग्रह आहे. सगुण–निर्गुण, द्वैत-अद्वैत, साकार–निराकार ही अवस्थाही नष्ट होऊन जणू उपदेशकाच्या भूमिकेतूनच 'विठुच्या हरिनामाचा झेंडा रोविला! अशी गजबज चंद्रभागेच्या वाळवंटी निर्माण झाली असेल व त्यावेळी ज्ञानेश्वरांच्या जवळच नामदेव सर्वांगाने फुलून येऊन अष्टसात्त्विकभावांनी डवरून येऊन अनिमिष डोळ्यांनी ज्ञानदेवांचे ते 'रुपडे' मनामध्ये साठवून घेत असेल!

सगुणाने केलेली परमात्म्याची उपासना उपदेशाच्या धाग्यातून ओवली जाते. हरिपाठाला सर्व मार्ग सुगम सोपे असून येथे कष्ट पडत नाही असे स्पष्टीकरण ज्ञानेश्वर करतात. वस्तुतः आत्मरंगी रंगून जाण्याचा ज्ञानेश्वरांचा प्रतिभा धर्म! परंतु हरिपाठात मात्र यजमानाच्या लगबगीने सर्वांचे सुकृत ज्ञानदेव जोपासतात. 'रामकृष्ण उच्चार अनंतराशी तप। पापाचे कळप पळती पुढे' योगयागविधी, जपतपांची बांधिलकी, तीर्थव्रतांचा नित्यनेम, योगयज्ञयागाचे बंधन ही सर्व वास्तव जीवनातील बंधने केवळ हरिनाम संकीर्तनाने निखळून पडतात. संसारातून भवपार होण्याचे ते एक सोपे माध्यम आहे. प्रभावी साधन आहे. आत्मा हाच निधान असून धनदाट अशी त्याची उपस्थिती आहे. 'दशदिशा आत्माराम' अशी त्याची अवस्था आहे. त्याचे आकलन आणि मोक्षमुक्ती पाहिजे असल्यास हरिमुखे म्हणारे हरिमुखे। हा ज्ञानेश्वरांनी समस्त समाजाला दिलेला सोपा साधनमार्ग आहे. 'मनोमार्गी जो गेला तो तेथे मुकला' उलट 'रामकृष्ण नामी उन्मनी साधली तयासी लाधली सकळ सिद्धी' आणि अशा सकळ सिद्धी मिळालेल्या क्षणीच 'देवाचिया द्वारी उभा क्षणभरी। तेणे मुक्ती चारी साधियेल्या' संतसंगती आणि गुरुबोध अशा मुक्तीच्या वेळी भक्ताला आवश्यक आहे. कारण साधूंचे संगती शेवाय तरणोपाय नसून 'गुरुविण अनुभव कैसा मिळे' असा प्रश्न ज्ञानेश्वर विचारतात. हरिपाठातील अभंगातून भक्ताची एक आदर्श अवस्था व्यक्त होते. प्रल्हाद, उद्धव यांचा उल्लेख ज्ञानेश्वर करतात, पण त्याहीपेक्षा पुंडलिक विशेषतः नामदेवच ज्ञानेश्वरांच्या डोळ्यासमोर होता ना! नामदेवाची आर्तभक्ती आणि त्यामुळे ईश्वराला मनोमन जिंकल्याचा जो भाव नामदेव अभंगातील नामसंकीर्तनातून डोकावतो तोच येथे अभिप्रेत नसावा का? हरिपाठे गेले ते निवांतचि ठेले। भ्रमर गुंतले सुमन कळिके' असे ज्ञानेश्वर म्हणतात याचा अर्थ इतकाच की हरिपाठाच्या मार्गाने जे गेले ते तेथेच एकरूप

झाले. कमळामध्ये भ्रमर जसा अडकून पडावा तसा ! येथे ज्ञानेश्वर उल्लेख करीत नसले तरी अशी भावावस्था खरोखर एकट्या नामदेवाची आहे हरिनाम संकीर्तनामुळे त्याला लौकिक-दृष्ट्या अनंत संकटांना तोंड द्यावे लागले तरीही तो अविचलच राहिला. 'तृण अग्नीमेळे समरस झाले। तैसे **नामे** केले जपता हरी। कापुराची वाती उजळली ज्योती। ठायीच समाप्ती झाली जैसी ॥ हा ज्ञानेश्वरांचा अनुभव नामदेवांविषयीचा तर नसावा !

'हरिपाठात' उत्कटतेने आणि मनाच्या तळापासून ज्ञानेश्वर सगुणभक्तीचा पुरस्कार सलग पद्धतीने करतात. तसेच नामस्मरण, नामचिंतन आणि नामसंकीर्तनाचा प्रभावी पुरस्कार करतात. हरिपाठ ही संज्ञा ज्ञानेश्वरांना निवृत्तिनाथांच्या अभंगातून मिळाली असली तरी प्रेरणा मात्र नामदेवाच्या सहजीवनातील स्नेहाला द्यावी असे वाटते. अर्थात यासाठी आज पुरावा उपलब्ध नाही परंतु ज्ञानेश्वरांच्या मनाची घडण लक्षात घेता हरिपाठात जे दृष्टान्त आणि प्रतिमा आल्या आहेत निर्गुण भक्तीकडून ज्ञानेश्वर सगुणभक्तीकडे जे वळले आहेत त्यात कुठेतरी निवृत्तिनाथांबरोबरच नामदेवाचा वाटा असावा असे सारखे मनोमन जाणवते. परंतु पुराव्याशिवाय वरील विधान उभे राहू शकत नाही हेही पटते.

ज्ञानेश्वरांच्या संपूर्ण वाङ्मयकृतीत अभंगगाथा आणि हरिपाठाचे एक स्वतंत्र आणि वेगळे स्थान आहे. तत्त्वनिष्ठपणापेक्षा आत्माविष्काराचे स्वातंत्र्य ज्ञानेश्वरांनी अभंगनिर्मितीत विशेष स्वीकारले. अनेक पातळ्यांवरून ईश्वरी सान्निध्याला आणि अद्वैत अनुभूतीला शब्द-बद्ध केले. मनमुक्त भक्तिभावनेचा उल्लास कल्लोळी स्वरूपात अभंगगाथेतून साक्षात झाला. ज्ञानेश्वरीत गीतेला अनुसरत आणि कर्म-ज्ञान-भक्तीच्या साह्याने ज्ञानेश्वर अद्वैतविचार-दर्शनाला स्वीकारते झाले. अमृताचा अनुभव आत्मप्रतीतीच्या अनुभवाला अमृतानुभवात स्थान मिळाले. तेच सूत्र चांगदेवपासष्टीतून गोचर झाले. परंतु या निर्मितीपेक्षा अभंग-गाथेची निर्मिती वेगळ्या पातळीवरून झाली. केवळ तत्त्वबोध किंवा केवळ उपदेशात्मकता आत्मरंगी भूमिकेतून अभिव्यक्त न होता ज्ञानेश्वरांनी मनोदर्शनच अनेक मनोभावातून अभिव्यक्त केले. तृप्तीचा आनंदोल्लास, अद्वैतप्रतीतीचा आनंदोल्लास, अद्वयाचा आनंदो-ल्लास, आत्मप्रतीतीचा आणि आत्मैक्याचा केवळ आनंदोत्सव अभंगगाथेतून गोचर होतो, तल्लीनता, तद्रूपता, एकरूपता ही मनाची अवस्थान्तरे ज्ञानेश्वरांच्या प्रतिभेला रुचणारी नाहीत परंतु अभंगातून मात्र तृप्त ज्ञानेश्वर आणि जीवनसाफल्याच्या आनंदाने न्हाऊन निघालेले ज्ञानदेवांचे कविमन अतिशय पारदर्शकपणे जाणवू लागते व ज्ञानेश्वरी, अमृता-नुभव आणि चांगदेवपासष्टीत आपल्या मनःकोषाचा थांग न लागू देणारे अथांग ज्ञानेश्वर 'अभंगगाथे'त आणि 'हरिपाठा'तही भक्तभूमिका घेऊन ईश्वर सन्मुख झालेले दिसतात हेच त्याचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व वाचकाला भुरळ पाडीत असते ते कायमचे !

ज्ञानेश्वर हे एक साक्षात्कारी संताचे मन होते. सौंदर्यासक्ती आणि औचित्यविचार ही त्यांच्या प्रतिभेची गुणवैशिष्ट्ये. अलौकिक कल्पनाशक्तीने साक्षात केलेले ज्ञानेश्वरांचे

संपूर्ण वाङ्मय म्हणजे एका अर्थाने एका सौंदर्यासक्त कलावंताचे आत्मचिंतन आणि भावचिंतनच होते. धगधगती वैचारिकता ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयात कुसुमकोमल भावरूप घेते आणि अनुभवातून अभिव्यक्त होते. व त्यातून मूल्यवान विचारधन आपोआप साक्षात होते व ज्ञानेश्वरांच्या वाणीला सुभाषितत्व येते. विचारांच्या अर्थांगतेने ज्ञानेश्वरांचे अनुभवही अर्थांग सघन आणि व्यामिश्र बनतात. श्रेष्ठ विचारमूल्य आणि भावमूल्य हीच ज्ञानेश्वरांच्या कवितेची मूलधर्मी सर्वार्थता आणि संपन्नता ठरते.

□ □ □



॥ अंकुरला गाभा विराटाचा ॥

नामदेवाच्या अभंगांचा रसास्वाद अतिशय उत्कटतेने आणि नैसर्गिकपणे वाचकाला घेता येतो पण नामदेवाची अभंगवाणी नक्की कोणती ? त्याचा जन्म निश्चित कुठे झाला व त्याच्या अनेकतेवद्दल मात्र अजूनही निश्चित एकमत विद्वानांत झालेलं दिसत नाही. आत्यंतिक विविधतेने नटलेली आणि अनेक भाषांतून आविष्कार साधणारी अशी ही अभंगवाणी एकमेवाद्वितीयच म्हणावी लागेल. नामदेवाच्या हृदयीचे 'उभड' त्यांच्या कवितेत काठोकाठ भरलेले आहेत. भावनांची उत्कटता आणि आत्माविष्काराची उत्कट तळमळ अतिशय नैसर्गिकपणे नामदेवाच्या कवितेतून अभिव्यक्त होते. अशा इतकी 'केवल कविता' यादवकाळात नामदेवाशिवाय इतर कुणीही निर्माण केली आहे असे दिसत नाही. ज्ञानेश्वरांचे अभंग आणि ज्ञानेश्वर प्रभावळीचे अभंग हे नाही म्हटले तरी पारमार्थिक मोक्षासाठी आर्ततेने काढलेले उद्‌गार आहेत. दैनंदिन जीवन जगत असता त्या जीवनाचाच एक अविभाज्य भाग म्हणून तळमळीने परमेश्वराचा केलेला धावा त्यांच्या अभंगगाथेत ऐकू येतो. नामदेवाच्या विकसनशील व्यक्तिमत्वाचे पदन्यास आणि भावविव्हळ मनाचे आर्तकढ त्याच्या कवितेतून ऐकू येतात. एका विकसनशील व्यक्तिमत्त्वाचा काव्यनिर्मितीच्या प्रवासाचा ठसा नामदेवाच्या कवितेतून स्पष्ट दिसतो इतकी ती विपुलही आहे. समकालीन कवींमध्ये कुटुंबवत्सल आणि दीर्घायुष्य मिळालेला समृद्ध कवी म्हणून नामदेवाला लक्षात घ्यावे लागते. प्रपंचाचा पसारा आणि संपूर्ण कुटुंबाची अभंगवाणी नामदेवसहवासातूनच स्फुरलेली आहे ही गोष्ट विसरून चालणार नाही. इतकेच नव्हे तर दासी जनीही भावकल्लोळी कविता गाऊ लागते आणि पुढे शिवकाळात तुकाराम नामदेवांचे वारसापीठ पुढे चालवितो, वास्तविक वारकरी संप्रदायाला तात्त्विक विचारांचा पाया ज्ञानेश्वरांनी घालून दिला. सर्वच कवींचे डोळे त्यामुळे दिपून गेले व त्यांनी ज्ञानेश्वर प्रशस्ती केली. पण जर नामदेवाने ज्ञानेश्वरांच्या विचारांना समाजामध्ये झिरपविले नसते, त्या विचारांचे सुलभिकरण केले नसते आणि आचारधर्म सांगितला नसता तर कदाचित चित्र बदलले असते.

नामदेव आणि ज्ञानदेव यांचे भावनाते

नामदेवांमुळे ज्ञानेश्वर प्रभावीत झाले व ज्ञानेश्वरांमुळे नामदेव तर दिपून गेलेले होते हीही घटना महत्त्वाची समजली पाहिजे. नामदेवांबरोबर तीर्थाटनासाठी उत्सुक होणारे ज्ञानेश्वर व ज्ञानेश्वरांबरोबर नामदेवांनी केलेले पहिले तीर्थाटन त्यात परस्परांचे जडलेले मैत्र एकमेकांना समजाऊन घेण्याचा झालेला प्रयत्न, मिळालेला निवांतपणा आणि एकमेकांच्या सहवासाची एकमेकांना लागलेली ओढ या साऱ्या घटना नामदेवांच्या अभंगवाणीतून टिपल्या गेल्या आहेत. वारकरी संप्रदायाच्या दृष्टीने ज्ञानेश्वरांचे कार्य हे वैचारिक आणि पारमार्थिक स्वरूपाचे होते. एका बौद्धिक पातळीवरून आणि स्वानुभवातून जाणवलेले चिद्वयानंदाचे सुख ज्ञानेश्वर व्यक्त करू बघतात. ईश्वर आणि जीव एकच आहेत आणि ईश्वरी अंशच जीवाच्या ठिकाणी भरलेला आहे. ही ज्ञानेश्वरांची धारणा आणि त्यातून अंकुरलेला स्फूर्तिवाद आणि चिद्विलासवाद भगवद्‌गीतेच्या अनुषंगाने आणि

स्वतंत्र अशा अमृतानुभवाच्या निर्मितीतून स्पष्ट झाला. 'जे जे भेटे भूत ते ते मानी भगवंत' ही ज्ञानेश्वरांची समज होती. आत्मज्ञानात्मक पातळीवर जाणवलेला ईश्वरी साक्षात्कार ज्ञानेश्वर 'ज्ञानेश्वरी' आणि 'अमृतानुभवा'तून शब्दबद्ध करतात. त्यासाठी प्रकाशाच्या प्रतिमा स्वीकारतात. एक ज्ञानात्मक 'प्रकाश जाणीव' ईश्वरी स्वरूपाच्या संदर्भात ज्ञानेश्वरांच्या अनुभवास येते. नामदेवांनी जे ज्ञानेश्वरचरित्र गायिले त्यात 'ज्ञानेश्वरी' व 'अमृतानुभवा'चाच एक उल्लेख केलेला आहे यावरून ज्ञानेश्वरांची अभंगनिर्मिती आणि ज्ञानेश्वर नामदेवांचा सुखद सहवास यांचे आन्तरिक नाते असले पाहिजे. त्याचप्रमाणे तीर्थयात्राप्रसंगी बरोबर असलेल्या इतर संतांचीही मनोभूमिका तयार झालेली असली पाहिजे अशा वातावरणात भक्तिमार्गाचा पुरस्कार करणारी व पारमार्थिक जीवनाची आकांक्षा करणाऱ्या अशा साहित्यिक मंडळांनी अभंगनिर्मिती केलेली होती. जीवनव्यवहार, संसारधर्म आणि सामाजिक जीवनस्तर स्वीकारूनही पांडुरंग-चरणी मात्र सारी भक्तमंडळी एकमेकांच्या अतिशय निकट आली व परस्परांचा परस्परांवर प्रभाव पडला हेही त्यांनी एकमेकांची केलेली जी परस्पर स्तुती आहे आणि काढलेले जे गौरवोद्गार आहेत त्यावरून सहजच लक्षात येते. 'जय जय रामकृष्ण हरि' या गजरात किंवा 'विष्णु कृष्ण हरि गोविंदुरे' यामध्ये ज्ञानेश्वरांनी विठ्ठलाचे स्वरूप शोधलेले स्पष्ट दिसतेच; पण नामदेवांचा सहवास ज्ञानेश्वरांना घडताच नामदेवांची विठ्ठलभक्तीची अत्युच्च श्रेणीवरील आर्तता, विठ्ठलभक्ती आणि विठ्ठलभक्तीचा सोपा आचारधर्म म्हणजे नामसंकीर्तन आणि नामस्मरण याचा परिणाम होऊन ज्ञानेश्वरांचे 'हरिपाठाचे अभंग' तयार झाले असावेत कारण नामस्मरणाविषयी ज्ञानेश्वरी किंवा 'अमृतानुभवात' विषय सिद्धान्ताच्या संदर्भात विशेष स्पष्टता आलेली दिसत नाही, ती स्पष्टता हरिपाठाचे अभंगात आलेली आहे. केवळ सत्तावीस ते अठ्ठावीस अभंग हरिपाठाचे असूनही त्यांना वारकरी सांप्रदायिकांत नित्यपठणाचे स्थान मिळाले आहे कारण त्यात नामसंकीर्तनाला दिलेले जे महत्त्व आहे ते होय. ज्ञानेश्वरांनी भागवत धर्मातील भक्तिमार्गाची मुहूर्तमेढ रोवली, पण ही भक्ती जी ज्ञानात्मक होती तिला नामदेवाने भावनेचा ओलावा आणि नामस्मरणाचा उजाळा दिला व सर्व संतमंडळाला प्रेमपिसे लावले. इतके की कुटुंबेची, कुटुंबे ईश्वरगुण-संकीर्तन भक्तीच्या उमाळ्याने आणि भावनेच्या कळवळ्याने करू लागलीत. चोखामेळा व त्याचे कुटुंब, ज्ञानेश्वर व सारे कुटुंब, नामदेव व जनाबाईसह असलेले त्याचे कुटुंब सर्वांनीच केलेली अभंगनिर्मिती लक्षात घेता त्यापाठीमागे असलेले नामदेवाचे कर्तृत्वजळ लक्षवेधी ठरते. ईश्वरभक्तीचा साधनमार्गच मुळी नामदेवांनी अतिशय सुलभपणे समाजासमोर ठेवला म्हणून ज्ञानेश्वरांचे कार्य वैचारिक पातळीवरचे आहे तर अशा वैचारिकतेला नामदेवांनी भावनांची किनार जोडली व कीर्तन-प्रवचनांचा नवा पायंडा पाडून एका सांस्कृतिक जनजागृतीला सुरुवात केली. स्वतःचा कुटुंबधर्म सांभाळणारी माणसे, जाती जमातींची बंधने स्वीकारणारी माणसे आणि नित्यनैमित्तिक कर्मे करून ईश्वरभक्ती करणारी माणसे नामदेवांनी भीवरेच्या तीरी एकत्र आणली व विठ्ठलरखुमाईला एक नवेच

भावलावण्य प्रदान केले. नेवासे आळंदीचे स्थानमाहात्म्य जणू नामदेवांच्या भजनकीर्तन परंपरेने पंढरपूराला मिळाले आणि विठ्ठलभक्तीची नव्यानेच अधिस्थापना झाली.

अभंगांची भावगीतात्मकता

अभंगनिर्मिती ही प्रासंगिक स्फुटस्वरूपाची आणि नैसर्गिकपणे भावगीतात्मक झाली याचे कारण तिच्यामागची उत्स्फूर्तता आणि विठ्ठलाद्वारी चाललेला भजनकीर्तनांचा सोहळा हे होय. 'विवेकसिंधू', 'ज्ञानेश्वरी', 'उद्धवगीता', 'सह्याद्रिवर्णन', 'ऋद्धिपूरवर्णन' या कवितेत आलेली भाष्य निरुपणपद्धती अभंगनिर्मितीत येणे शक्यच नव्हते कारण परंपरेने चालत आलेला अध्यात्मविचार डोळसपणे न्याहाळून तो काव्यमाध्यमातून चिंतनशील पद्धतीने गोचर करणे ही भाष्यकाव्य निर्मितीमागील भूमिका होती. त्यामुळे एकतर त्यात कवींच्या भावनोत्कट आत्माविष्काराला जागाच नव्हती व दुसरी गोष्ट म्हणजे अशी कविता तत्त्वप्रचुर आणि चिंतनशीलतेसह अध्यात्माचे निर्देशन करू लागली. जनसामान्यांच्या बौद्धिकपातळीपर्यंत पोहचणे अशाप्रकारच्या कवितेला जवळजवळ दुरापास्तच झाले. एक विदग्धप्रकृतीचे प्रबंधपण या काव्यनिर्मितीला आले. अभंगांचे स्वरूप मूलतः संगीतात्मक, लयबद्ध आणि सुरावटीने सजलेले झाले. कारण त्यांची जन्मभूमी ही कीर्तन प्रवचन पुराण ऐकणाऱ्या भोळ्याभाबड्या जनसंपर्काची होती. एका अंगभूत गेयतेने आणि पदलालित्याने नटलेले अभंग उत्स्फूर्तपणे टाळमृदंगाच्या साथीने चंद्रभागेच्या वाळवंटी शीघ्रकवित्वाने नटून गायिले गेले. एकीकडे सरलत्व, सोपेपणा आणि सहजता हा गुणधर्म अभंगांचा ठरला तर दुसरीकडे स्वाभाविकपणे आणि नैसर्गिकपणे झालेला भावनांचा उत्कट आविष्कार त्यातून पाझरू लागला. भक्तिपूर्ण अशी भक्तांची मनेच त्यांच्या अभंगातून व्यक्त होऊ लागलीत. आत्मनिष्ठ काव्याचे एक नवेच दालन अभंगकवितेने यादवकाळात उघडले.

सगुण भक्तीचा साधन मार्ग म्हणून अभंगांची निर्मिती झाली. भक्तिभावनेतील वैविध्य आणि सगुणरूपातील सावळ्या ईश्वरीरूपाशी तादात्म्य पावण्याची कविमनांची आकांक्षा गौळणी आणि विराण्यांमधून निर्माण होऊ लागली तर रूपकात्मक रचनेतून लोकजीवनातील व्यवहार आणि लोकसंस्कृतीशी असलेले अतुट नाते सांभाळू लागली. गोराकुंभार, सेनान्हावी, सावतामाळी, सजनकसाई, रोहिदास, मुकुंद जोहरी, निर्मळा, चोख्याची महारी, विसोबा, चांगावटेश्वर या विविध जातींचे ओझे खांद्यावर घेऊन आलेल्या कवींना ईश्वरगुणसंकीर्तनात कोणताच अडसर निर्माण होऊ शकला नाही. उलटपक्षी आपल्या व्यवसायजीवनातील प्रतीमानातून ही मंडळी विठोबाला आळवू लागली व ग्रामजीवनातील विविध तपशीलांच्या रूपकांतून विठ्ठलाला न्याहाळू लागली. 'कांदा मुळा भाजी अवघी विठाई माझी', 'आम्ही वारीक वारीक करू हजामत वारीक', 'ऊस डोंगा परी रस नव्हे डोंगा', 'दुडीवरी दुडी निघाली गुजरी' या आणि अशा हजारो अभंगांतून आत्मानुभूतीने रसरसलेला निष्कलंक जीवनानुभव साक्षात

झाला. भक्तिसाधना हीच त्याच्या निर्मितीमागील प्रबळ आणि मूलगामी प्रेरणा होती तरीही त्यांचे अविष्कृत स्वरूप मात्र स्वाभाविक उतरले. बोलीभाषेशी अभंगाचे असलेले नातेही त्याद्दष्टीने लक्षात घ्यावे. हमामा, हुमरी, कुस्ती, खेळिया, चेंडुफळी, विटीदांडु याप्रकारच्या ग्रामीण जीवनातील खेळांची रुपके ईश्वरी गुणवर्णनपर साधनेसाठी अठराविगड जाती-जमातींतील भोळ्याभाबड्या लोकांनी उपयोजिली. सौर, डौर, पांगुळ, वासुदेव, गोंधळी यांसारख्या ग्रामजीवनातील लोकरंजनार्थ कार्य करणाऱ्या समूहांची रूपके रचली आणि भूपाळ्या, आरत्या, पाळणे, जाते, आडसणे यांसारख्या स्त्रीजीवनातील विविध तपशीलाच्या रूपकातून ईश्वराचे संकीर्तन केले. मनोरंजनासाठी कहाणीवाङ्मय आणि ईश्वर गुणसंकीर्तनासाठी अभंगवाङ्मयाची निर्मिती मराठी मातीशी इमान राखीत रुजली गेली. त्यामुळे ही कविता यादवकालीन प्रबंधकवितेपेक्षा सर्वस्वी वेगळी ठरली. तिच्यात वैदग्ध्याला, काव्यदृष्टीला, विचारदर्शनाला उत्स्फूर्तपणे महत्त्व न देताही भावनांच्या उत्कट तळमळीने अभंगातील भावानुभव काव्यात्म पातळीवरून गोचर होऊ लागला. याच सुमारास ज्ञानेश्वरांनी दाखविलेला अद्वैतानुभवाचा स्वानंदही व्यक्त होऊ लागलेला होताच आणि तरीही अभंग कविता ही स्वतंत्र आणि उत्स्फूर्त झाली. तिची उत्स्फूर्तताही बंधनविरहित आणि अतिशय स्वाभाविक आणि नैसर्गिक ठरली कारण अभंगनिर्मिती करणारी सर्व कलावंतांची मने ही भावभक्तीने ओथंबलेली आणि आर्त होती अशा निखळ 'भक्त' परंपरेचा पहिला प्रतिनिधी वारकरी संप्रदायात नामदेव ठरला. 'भक्तराज', 'भक्तशिरोमणी', 'प्रेमभांडारी', अशी खुद्द ज्ञानेश्वरांनीच नामदेवाला बिरुदे दिली आहेत. नवविधा भक्तीचा प्रचार, प्रसार आणि पुरस्कार नामदेव करतो. मनाने तो निखळ, स्वतंत्र आणि उत्कट आर्त असा भक्त आहे. आपले ईश्वराविषयीचे जे उत्कट भावानुभवर आहेत ते अत्यंत नैसर्गिकपणे व कोणत्याही दडपणाविना विमुक्त पद्धतीने तो गात आहे ते जनसंमर्दाच्या पुढ्यात, आणि मंदिरामंदिराच्या गर्भागारात कीर्तनप्रवचनाच्या अंगाने! विठ्ठलमूर्तीचे जे आविष्करण सर्वच अभंगकवितेत येते त्याचे कारण म्हणजे उत्स्फूर्तपणे व सतत डोळ्यासमोर असलेले विठ्ठलाचे स्वरूपदर्शन तितक्याच उत्स्फूर्तपणे आणि प्रामाणिकपणे शब्दातून पकडले जाते. सर्व अभंगकवितेतील विठ्ठलरखुमाई स्वरूपचित्रणात जे समांतरत्व आहे त्याचे कारण हे आहे. 'युगे अठ्ठावीस उभा विटेवरी' अशा सावळ्या-पांडुरंग विठ्ठल रखुमाईची आराधना अभंगकवितेत जोपासली गेली. पंढरपूरचा भक्तिसंप्रदाय प्राचीन असूनही त्याला विशेष उजाळा मिळाला तो ज्ञानेश्वर-नामदेवांच्या सान्निध्याने! अद्वैती असे त्याचे स्वरूप तर होतेच, पण ईश्वर निर्गुण परब्रह्म असूनही तोच विश्वरूपात सगुण साकार होतो हीच ज्ञानेश्वर पुरस्कृत तत्त्वभावना अभंगकवितेतून विशेष प्रभावीपणे जोपासली गेली.

निर्गुण सगुण नाही ज्या आकार । होऊनि साकार तोचि ठेला
सुवर्णी की धन धन ते सुवर्ण । निर्गुण सगुण यथापरी ॥
पांडुरंगी अंगे सर्व झाले जग । निवडी सर्वांग नामा म्हणे ॥ ३३०

याच नामदेव वाणीचा प्रभाव समकालीन आणि पश्चात कालीन अभंगकवितेवर पडला. ज्ञानेश्वर प्रभावळीतील सर्व मराठी अभंगकवींच्या कवितेत सतत दोन स्तर जाणवतात. दोन पातळ्यांवर अभंगकविता विभागली जाते. एकीकडे आर्तपणे ईश्वराला आळवणे व दुसरीकडे उपदेश करीत जागे. निवृत्ती, सोपान, मुक्ताई, गोराकुंभार, सेनान्हावी या आणि इतर सर्व कवींचो कविता अल्पप्रमाणात आज उपलब्ध असूनही तीत या दोन पातळ्या स्पष्ट होतात. ज्ञानेश्वरांनीही संतवर, नामवर, माहात्म्यपर असे अभंग रचले. लोकगीतात्मक रचनाही केलो पण जनास उपदेश, मनास उपदेश, मुमुक्षूस उपदेश, ज्ञानपर अभंग अशी वर्गवारी नामदेवांच्या अभंगाप्रमाणे ज्ञानेश्वरांच्या अभंगांचीही करता येते. स्वमनाला उपदेश करण्याचो प्रथा ज्ञानेश्वर-नामदेवांनी सजवली व रामदासांच्या मनाच्या श्लोकापर्यंत ती उपदेशवाणी फोफावली. यादवकालीन अभंगवाणीतून कविमनाचे ईश्वराविषयीचे सुजाण भक्तिपर उत्कट 'आर्त' जाणवते. आत्मानुभवाची ही एक अवस्था असते. विविध पातळीवरील आर्तता कधी बाह्यतेतून, प्रपंच भावनेतून, श्रद्धायुक्त भावनेतून, दर्शनोत्सुक तळमळीतून, आत्मनिरीक्षणातून, प्रेमकलहातून, रुसव्यातून, अनुनयातून अभिव्यक्त होते. प्रत्येक कवीच्या अनुभव घेण्याच्या स्वतंत्र पद्धतीमुळे त्यांच्या अभंगाला स्वतंत्र रूपसिद्धी मिळते व अशा आर्तावस्थेतून ज्यावेळी कविमने बाहेर पडतात त्यावेळी बद्ध, मुमुक्षू, साधक अवस्थेपलीकडे पोहोचलेले संतस्वरूपी कवी अभंगातून जीवनमुक्त सिद्धावस्थेत पोहोचलेले व ईश्वरीरूपाचा साक्षात्कार मनामनी पटलेले अनुभव आपोआपच अभंगवाणीतून अभिव्यक्त करू लागतात व त्यात उपदेशात्मकता भरून येते. अभंगकवितेची ही दुसरी पातळी आहे. स्वजीवन संघर्षात आलेले अनुभव, त्यातून मिळालेली मुक्तता जीवनचैतन्याच्या ईश्वरी स्वरूपात झालेला साक्षात्कार आणि त्यामुळे मनाच्या वृत्तीप्रवृत्तीत झालेले परिवर्तन, त्या परिवर्तनातून अपरिहार्य पणे आलेली उपदेशवाणी आणि तिचा जनसामान्यांवर झालेला परिणाम अशी अभंगकवितेची निर्मितीप्रक्रिया आहे. ईश्वराविषयी भीती वाटण्याऐवजी प्रीती निर्माण करून यादवकाळात ईश्वर व भक्त यांचे स्नेहशील असे नाते अभंगकवितेत निर्माण झाले. सगुणसाकार होऊन विठ्ठलाने सर्वच आपल्या भक्तांचा केलेला उद्धार आणि संसारजीवनात हरघडी केलेली अपूर्व मदत म्हणजे अभंगकवितेत जोपासल्या गेलेल्या चमत्कारकथा आणि दंतकथा ईश्वरीरूपासंबंधी कविमनांतील एक विशिष्ट धारणाच सुचवितात.

यादवकाळात विदग्ध प्रबंधकाव्यनिर्मितीची बरोबरी करू शकेल अशी गुणदृष्ट्या समृद्ध भावकविता अभंगरूपाने साक्षात झाली आणि तिने आत्माविष्काराचे स्वातंत्र्य, व्यक्तिविकासाचे स्वातंत्र्य आणि विचारदर्शनाचे स्वातंत्र्य यांची मुहूर्तमेढ रोवली. एका विशिष्ट वर्गाची मिरासदारी निर्मितीक्षेत्रात न येता अठरापगड जातीतील स्त्रीपुरुष मनमुक्तपणे चैतन्याने रसरसलेल्या आपल्या उत्कट भावानुभूती अभिव्यक्त करू लागल्या. रचनेचे स्वातंत्र्य, अनुभवाचे स्वातंत्र्य आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य यामुळे अभंग कवितेतील लोकजीवन संस्कृतीचा झरा खळाळून वाहू लागला. ही सारी परंपरा ज्ञानेश्वर

नामदेवांनी जी अभंग निर्मिती केली त्यातून सुरू झाली ज्ञानेश्वरांपेक्षाही नामदेवांना दीर्घायुष्य मिळाल्यामुळे व भ्रमणशील वृत्तीमुळे संपूर्ण भारतदेशात नामदेवांनी विठ्ठल-भक्तीचा पुरस्कार आणि प्रचार केला व पुढील अनेक शतकांत नामदेवाचे पारमार्थिक संस्कार जोपासणारे भगवद्भक्त भारतभर दिसू लागले. रामानंद, तुळसीदास, मीराबाई, गुरुनानक, कबीर, रोहिदास, सूरदास, तुकाराम इत्यादी भारतीय संतकवी नामदेवाचे पारमार्थिक स्वरूपातील ऋण मानतात.

भारत भ्रमणी : नामदेव

नामदेव बहुभाषी होते. पंजाबी, मराठी आणि हिंदीभाषेत भक्तिमार्गाचा पुरस्कार नामदेवांनी भारतभर केला व आयुष्याच्या अंतकाळी ते पंजाबात स्थिर झाले. सांस्कृतिक एकात्मता आणि लोकोद्धाराची तळमळ नामदेवांच्या या भारत भ्रमणाच्या मुळाशी होती. नामदेवांनी विपुल व स्वतंत्र विविधलक्षी रचना केली. भारतभर शिष्यमंडळींची परंपरा निर्माण केली. स्वतः विसोबा खेचराकडून उपदेश घेतला तर परिसा भागवत, बंकामहार, चोखामेळा, जनाबाई याना आपले अनुगृहीत केले. विठ्ठल भक्तीच्या प्रचारार्थ आणि विठ्ठल माहात्म्यासाठी नामदेवांनी भारतभ्रमण केले. सौराष्ट्र, राजपुताना, काशी, पंजाब, हरियाना, गुजरात, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, कर्नाटक अशी यात्रा नामदेवानी केली व त्यातून मिळालेल्या अनुभवातून जनोपदेश केला.

नामदेव गाथेच्या सरकारीप्रतीत * नामदेवांच्या नावावर जवळजवळ दोनहजार तीनशेसदतीस हिन्दी-मराठी-पंजाबी अभंग एकत्रित केलेले आहेत. त्यातून नामदेवाच्या अभंगवाणीचे विशेष कोणते जाणवतात ते प्रस्तुत बघता येईल. पहिला आत्मचरित्रकार संतचरित्रकार, भावगीतकार, पदकार, लोकगीतकार आणि आख्यानपर अभंग निर्मिती करणारा कवी या नात्याने नामदेवाचे लक्षणीय स्थान निश्चित करावे लागते. नामदेवानी लिहिलेली समाधिकविताही अपूर्व आहे. अनेकविधस्वरूपी आणि अनेकपदरी अशी अभंगनिर्मिती नामदेवाने केली तिची वर्गवारी खालीलप्रमाणे होय.

नामदेवाच्या अभंगनिर्मितीतील विविध उन्मेष

१. पौराणिक पद्धतीची आख्याने : रामकथा आणि कृष्णकथापर आणि इतर. २. संतचरित्रे : आदि-तीर्थावळी, जनाबाई, गोराकुंभार, सावतामाळी, जगन्मित्रा, चोखामेळा, ही शिष्यचरित्रे ३. समाधिवर्णने : ज्ञानदेव, सोपान, चांगदेव, मुक्ताबाई, निवृत्तिनाथ ४. आत्मचरित्रपर कविता : बद्धावस्था, मुमुक्षु अवस्था, वंचितावस्था, सिद्धावस्था, साक्षात्कारी अवस्था आणि जीवन्मुक्तावस्था. ५. नामसंकीर्तनपर. ६. उपदेश आणि मनाचे अभंग. ७. भूपाळी-आरती-कूटे. ८. हिंदी पंजाबी पदावली. ९. वर्णनपर कविता : संत महिमा, तुळशीमाहात्म्य, शिवस्तुती, विठ्ठलमाहात्म्य, पंढरी माहात्म्य.

वरील वर्गवारीवरून नामदेवाच्या अभंगांची समृद्धता स्पष्ट होतेच, पण त्याचा

---

* नामदेव गाथा : सरकारी प्रत १९७०

चौकसपणा आणि बहुश्रुतपणाही लक्षणीय ठरतो. ज्ञानेश्वरांच्या पश्चात एका अर्थाने नामदेव म्हणजे ज्ञानेश्वरांचा बहिश्चर प्राणच ठरला. ज्या हेतूने आणि भूमिकेतून ज्ञानेश्वरांनी लोककल्याणाचा मार्ग स्वीकारला त्यात तितकाच तोलामोलाचा असा नामदेव ज्ञानेश्वरांच्या सहवासात आला आणि ज्ञानेश्वर पुरस्कृत कार्य नामदेवाने पूर्ण केले. नामदेवाने भागवत संप्रदायाला आणि आचारधर्माला एक संघटित व्यवस्था मिळवून दिली ती आपल्या कृतिउक्तीतून! ज्ञानभक्ती आणि नामभक्ती यांचा अपूर्व संयोग पुढील कालखंडावर, मानवी जीवनमानावर आणि भौतिक स्वरुपावर अनेक शतके रेंगाळत राहिला. राजकीय परिवर्तने आणि स्थित्यंतरे भारत देशात झालीत पण साधुसंतांनी उजळून दिलेला जो ईश्वरभक्तीचा मार्ग होता त्यात कोणत्याही शतकात अपुरेपणा किंवा स्थितिशीलता निर्माण झाली नाही. हा महाराष्ट्राच्या आध्यात्मिक जीवनाचा इतिहास शिवकालीन बहिणाबाईने मार्मिकपणे लिहून ठेवला. *

मराठी मातीच्या गंधातून स्फुरलेली भावकविता

नामदेवाची कविता ही अशी स्थळकाळसंस्कृतीच्या संस्कारातून जोपासली गेलेली कविता आहे. मराठी मातीचा गंध भगवद्भक्तीचा दरवळ आणि मानवतेचा स्पर्श या कवितेला झाला आणि तिच्यातून बहुजन समाजाला एक व्यासपीठ मिळाले आत्मोद्गारासाठी! आत्मवंचना नाहिशी करण्यासाठी!! आणि लौकिक जीवनातील अधःपाताची दारुणता विसरण्यासाठी!!! दलितांची वेदना आत्मानुभूतीतून अभिव्यक्त होण्यासाठी! अभंगकवितेतून साधलेल्या स्वाभाविक आत्माविष्कारातच श्रमसाफल्याचा आणि जीवनयथार्थतेचा एक कोवळा थरथरता अनुभव सर्व स्तरातील कवींना पुलकित करून गेला आणि प्रत्यक्ष जीवन जगण्यातील काठिण्य वितळून गेले ते मनःपूत अशा स्वीकारलेल्या भक्तिसाधनेने. सर्व अभंगनिर्माते कवी मोठ्या आत्मविश्वासाने आणि अतिशय ठामपणे व निःसंकोचपणे जे ईश्वराला आळवू लागले. त्यातील मोकळेपणाचे वातावरण निर्माण करण्यात आणि जातीस्तरांचे व कर्मकाण्डाचे धुके नाहिसे करण्यास ज्ञानेश्वरांच्या पश्चात नामदेवाची आर्त कविता सज्ज झाली व तिच्या पाठीमागे सर्वच वारकरी जाऊ लागले असे विलक्षण दृश्य अभंगनिर्मितीतून स्पष्ट होते. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम यांच्या कवितेतील विलक्षण आत्मविश्वास आणि भक्तिविश्वास त्यांच्या काव्यनिर्मितीचा बीजकेंद्रभाव ठरला व त्यातून त्यांची कविता रूपवान आणि कांतिमान झाली.

अंकुरला गाभा विराटाचा

नामदेवाची आख्यानपर कविता ही प्रामुख्याने कृष्ण आणि राम या दैवतांच्या संदर्भातील आदर्श भक्तिभाव गोचर करणारी अशी कविता आहे. नामदेवाच्या नावावर

---

* संतकृपा झाली : इमारत फळा आली : बहिणाबाई.

जवळ जवळ तीसबत्तीस आख्याने सांगितली जातात.* द्रोणपर्व, शुकाख्यान, हरिश्चंद्राख्यान, श्रियाळचरित्र, उपमन्यु चरित्र, भीष्म प्रतिज्ञा, नक्रोद्धार, कबीर, कमाल, मीराबाई, भानुदास, नागाजगन्मित्र आणि संताजी अशी चरित्रकथात्मक स्फुटआख्याने नामदेवाच्या नावावर सांगितली जातात; परंतु ती त्याची नाहीत कारण नामदेवाची अनुभव घेण्याची आणि अभिव्यक्त करण्याची जी एक विशिष्ट पद्धती आहे तशी वरील आख्यानातून आढळून येत नाही. दुसरा पुरावा म्हणजे नामदेवाचा मानसिक कल हा प्रामुख्याने भक्तिप्रवण आणि आर्ततेचा आहे त्यावरूनही भीष्मप्रतिज्ञा किंवा हरिश्चंद्राख्यानासारखे आख्याने नामदेवाकडून 'शब्द घडवु घडवु' तयार होणे शक्य नाहीत. नामदेवाच्या अभिव्यक्तीचे एक खास जे वळण आहे तेही वरील आख्यानात दिसत नाहीत म्हणून ही आख्याने नामदेवाची नसून नंतरच्या काळातील कवींनी ती नामदेवगाथेत घालून दिली असली पाहिजेत. कबीर, कमाल आणि मीराबाई ही भारतीय संतमंडळी नामदेवाची निर्गुणोपासना वंदनीय मानतात व ती नामदेवांच्या नंतर जवळ जवळ दीड-दोनशे वर्षांनी भक्तिमार्गाचा पुरस्कार करून गेलीत त्यामुळे त्यांची कथात्मक चरित्रे नामदेवाची असणे शक्यच नाही तर ती नंतरच्या काळातील कवींनी नामदेवगाथेत घातली व परंपरा तशीच चालू राहिली.

नामदेवाची प्रतिभा ज्ञानेश्वरांप्रमाणे किंवा एकनाथाप्रमाणे चिंतनशील स्वरूपाची नाही. उत्स्फूर्तपणे आणि उत्कटतेने जे जाणवते ते साक्षात करीत जाणे हा नामदेवांच्या प्रतिभेचा मूलधर्म आहे. आख्यान कवीला आख्यानाच्या रचनेचा मांड, घटनाप्रसंगांची सुसंगती, वातावरणाची परिणामकारकता आणि जीवनानुभवाची एकसंधता जी अनेक पातळ्यावरून लक्षात घेऊन सतत अभिव्यक्ती साधावयाची असते तशी नामदेवांची मनोभूमिकाच नव्हती. किंबहुना अतिशय संवेदनशील आणि भावविव्हळ असे नामदेवाचे कविमन आहे. ईश्वरीसान्निध्यात नामदेव मनानेच आणि मनोमन ईश्वराशी तद्रूप होऊन जातात, आणि अशा तादात्म्याची स्वप्नचित्रे, क्षणचित्रे, शब्दचित्रे प्रसंगचित्रे आणि घटितचित्रे नामदेव एका एका अभंगात पूर्णत्वाने साकार करतो. प्रबंधकवीची किंवा विदग्धकवींची प्रतिभा ही चिंतनातून आणि जीवनाच्या अनेकपदरी स्वरूपातून अभिव्यक्ती साधीत जाते. ज्ञानेश्वरांची 'ज्ञानेश्वरी' किंवा नरेंद्राचे 'रुक्मिणी स्वयंवर' यात त्या त्या कवीच्या प्रतिभाधर्माची वेगळिक वाचकाला जाणवत असते. विश्वपसाऱ्याचे हृदगत जाणून घेणे आणि जाणवून देणे हा प्रयत्न ज्ञानेश्वर ज्ञानेश्वरीत अनंत प्रतिमांची व्यामिश्र वलये निर्माण करून करीत असतात. वैदग्ध्याची प्रतीती आणि जीवनजाणिवांची गुंतागूंत त्यातून गोचर होत असते. नरेंद्राने रुक्मिणीकृष्णाच्या विवाहकथेला महाकाव्याच्या परंपरेत बसविण्याचा प्रयत्न केला आणि एका विदग्ध महाकाव्यसदृश आख्यानकथाकाव्याची निर्मिती केली. नामदेवाचे व्यक्तिमत्व हे एकीकडे आत्यंतिक

---

* सरकारी नामदेव गाथेतून ही प्रकरणे दिलेली नाहीत.

श्रद्धाळू आणि दुसरीकडे कमालीचे उत्कट आहे त्यामुळे भावनांचे कढ अपरिहार्यपणे त्याच्या अभंगातून साक्षात होतात. काव्यनिर्मितीची जाणीव आणि काव्यदृष्टीची अचुकता त्याच्याकडून अपेक्षिता येत नाही त्याचे जीवनच काव्यातून गोवले गेले ते विठ्ठल चरणी गायिलेल्या अभंगातून ! म्हणून नामदेवाची जीवनदृष्टी आणि काव्यदृष्टी, नामदेवाचे लौकिक आयुष्य आणि पारमार्थिक आयुष्य हे सर्व एकयोती, एकरंगी, एकात्म आणि अद्वैती ठरले. उत्स्फूर्तता हा प्रतिभेचा गुणधर्म असल्यामुळे नामदेवाची सारीच कविता स्फुटस्वरूपी झाली आणि नैसर्गिकही झाली. आख्यानकाव्यातील कथाप्राधान्य नामदेवाच्या प्रतिभेला मानवणारे ठरले नाही व म्हणून जितक्या उत्कटपणे नामदेवाने भावकाव्यनिर्मिती केली तशी आख्यानात्मक काव्यनिर्मिती नामदेवाकडून अपेक्षिणेही बरोबर नाही.

एका उत्कट भावपातळीवरून नामदेव अनुभूती गोचर करतो. उत्कटता, श्रद्धात्मकता आणि कमालीचा जिव्हाळा हीच त्याच्या कवितेची नजरेत भरणारी रूपे असल्यामुळे कथानकाची चौकट स्वीकारून नामदेवाने आख्यानकाव्य निर्मिती केलेली नाही. नामदेव भजनीकीर्तनकार असल्यामुळे व विठ्ठलाचे सतत सान्निध्य उपलब्ध असल्यामुळे नामदेवाच्या अविष्कारावर एक पौराणिकपद्धतीची छाया जाणवते. रसाळपणा नामदेवाच्या कवितेच्या गुणरूप ठरतो कारण नामदेव कीर्तनप्रवचनकार आहे. कीर्तनासाठी नामदेवांनी काही आख्यानात्मक अभंगांची निर्मिती केली आहे. ज्ञानेश्वर किंवा नरेन्द्र यांच्या कवितेत जो एक विशिष्ट आदर्शवाद आहे त्या आदर्शवादी भूमिकेतून नामदेवाने आख्याननिर्मिती केलेली आहे असे नाही तर आख्यानात्मक अभंगांमागील हेतूप्राधान्य हे प्रामुख्याने कृष्णजीवन आणि रामजीवन यांचा संस्कार व जीवनचित्रणातील नाट्य दिग्दर्शित करण्यासाठी कीर्तनपरंपरेच्या पूर्वरंग आणि उत्तररंगाच्या पूर्ततेसाठी अभिव्यक्त झालेला आहे.

कृष्णभक्तीचा प्रभाव भारतीय जीवनमानावर सर्वच काळात होता आणि आहे तसाच तो यादवकाळातही होता. नामदेव त्याला अपवाद नाही. किंबहुना यादवकालीन सर्वच मराठी कवींची कृष्णभक्ती वधण्यासाठी आहे. आदर्श निर्माण करण्याची भूमिका नामदेवाच्या कृष्ण गुणवर्णनात नाही तर कृष्ण आणि विठ्ठल व्यक्तिरूप घेऊन नामदेवाच्या कवितेतून अवतरतात. 'बाळक्रीडे'च्या अभंगात वसुदेव–देवकीच्या विवाहापासुन कुंतीचा श्रीकृष्णास निरोप आणि उद्धवाने केलेले सांत्वन इथपर्यंतची कृष्णजीवनातील विविध प्रसंग नाट्ये नामदेवाने अभंगातून गायिलेली आहेत. कृष्णाचे शैशव, बाल्य, निर्व्याजता, तारुण्य आणि प्रौढत्व अशा विविध अवस्थातील आणि वयातील कृष्णलीला, नामदेवाने वर्णिल्या आहेत. तृणावर्त, वत्सासुर, बकासुर, अघासुर, धेसूकासुर, प्रलंबासुर, असुरासुर, शंखचुडासुर, केशीदैत्य, व्योयासुर, कंस यांच्या वधाचे मोठे रसभरीत वर्णन नामदेवाने केले आहे. नामदेवाने वर्णिलेले वीरकृष्णरूप होय. कृष्णबालली ळा, गोपींची गाऱ्हाणी, मृत्तिकाभक्षण मंथनपात्रताडन, उखळीबंधन, या प्रसंगातील खोडकर कृष्णरूप आहे. कृष्णगोपीसंवाद, गोपीगर्व परिहार, राधाविलास, वनविहार, कालियामर्दन, वणवा, काला, वेणुवादन, इंद्रगर्व परिहार आणि गौळणी या अभंगांतून तरुण बलशाली आणि मुग्ध

कृष्णरूप नामदेवाने वर्णिले आहे. अनेक वयोगटांतील कृष्णरूप नामदेवाने एका भक्ति-प्रवण भूमिकेने गायिलेले आहे. त्यापाठीमागे आहे तो एक साधाभोळा भाव. सगुणरूपात कृष्णाला न्याहाळून त्याची भक्ती करीत जाणे याच उद्देशाने नामदेवाने एका निमित्ताने अभंग गायिले. नामदेव कृष्णरूपाशी एकरूप झाला आहे. त्यामुळे कृष्णकथेपेक्षा निर्माण होते ती एक निखळ भाव कविता. उदा.

मल्हार महुडें गगनी दाटले । बिजू खेळे गर्जिनल्ले गे माय
गोविंद पाहाया लौकरी । कैसे बरसताहे मधुधारी गे माय
आनंदे मयुरे नाचती आपैसे । प्रेमे निलकंठ झाले ते कैसे ॥

या कवितेत कृष्णरूपदर्शन आणि कविमनोदर्शन यांची मोठी उत्कट अवस्था भावपातळी-वरून नामदेवाने गोचर केली आहे.

बाळक्रीडा आणि कृष्णलीलाप्रमाणेच रामकथाही काही प्रसंगांच्या साह्याने नामदेवाने गायिली आहे. रामजन्मापासून सीताशुद्धीपर्यंतचा रामजीवनातील महत्त्वाचा तपशील नामदेवाने कीर्तनासाठी निर्माण केला रामकथेला एका संकलकपद्धतीने नामदेवाने वर्णन केले आहे. नामदेवाची कविता ही उत्कट भावकविता असल्यामुळे त्याने वर्णिलेली आख्याने ही प्रासंगिक स्वरूपाची उतरली आहेत. आख्यान काव्याची जी एक विशिष्टता असते, जो एक मांड असतो आणि जी एक आकृती असते त्यात नामदेवाची आख्याने चपखल ठरत नाहीत. कथानिर्मितीकडे तिच्या वाढीकडे आणि परिणामाकडे निर्मितीवेळी लक्ष केंद्रित झालेले नसून नामदेव एक नैमित्तिक पद्धतीने व भक्तिपरतेतून कृष्णकथा रामकथा वर्णितो ती संस्कारपूर्णतेसाठी आणि भक्तिपूर्णतेसाठी.

संत चरित्रे

नामदेवाने गायिलेली संतचरित्रे ही त्या त्या व्यक्तिमत्त्वाचा उत्कट ईश्वरभक्तिभाव जो आहे त्यातून स्फुरलेली आहेत. जनाबाई, सावता माळी, जगन्मित्रा या भोळ्याभाबड्या निखळ भक्तांच्या भक्तीने प्रभावित होऊन नामदेवाने त्यांचे चरित्र 'संत' म्हणून गायिले, चोखा मेळाविषयी तर नामदेवाच्या मनात एक विशिष्ट स्थान होते, जिव्हाळा होता, प्रेम होते. चोखामेळ्याच्या चरित्रात जो उद्भुताचा आणि चमत्कारांचा रंग नामदेवाने भरला त्यामागील त्याची भूमिका समजू शकते. नामदेव स्वतः एक प्रामाणिक भक्तशिरोमणी आहे. त्यामुळे जेथे जेथे समानधर्मा दिसला तेथे तेथे नामदेव वर्णनात एकरूप झाला. उदा. प्रल्हाद, सुदाम, श्रियाळ, उपमन्यु, ध्रुव यांचीही चरित्रे नामदेवाने गायिली असे गृहीत धरले तरी स्पष्ट दिसू लागते की, ही व्यक्तिमत्त्वे आपल्या उत्कट आणि आर्त भक्तीसाठी पुराणात प्रसिद्धी पावली आहेत. नामदेव वर्णन करतो ते जीवनदर्शनात्मक चित्रणाचे. प्रत्येक भक्ताचे चरित्र म्हणजे प्रत्येक प्रसंग, जन्ममृत्यूची

नोंद आणि संपूर्ण व्यक्तिजीवन या पद्धतीने नामदेवाने संतचरित्रे गायिलेली नसून त्या त्या व्यक्तिमत्वाचे आर्तभक्त म्हणून असलेले जे वैशिष्ट्य ठरते ते नामदेवाने नेमकेपणाने आणि अद्‌भुत चमत्कारांच्या साह्याने साक्षात केले.

नामयाचे घरी असे दासी जनी । तिने चक्रपाणी वश केला
करिता कामधंदा ध्यानी नारायण । करीत चिंतन अहोरात
देखोनिया भाव तिचा पांडुरंग । काम करू लागे जनीलागी
रात्री येऊनिया जनीचिया घरी । दळू लागे हरि तिजलागी
दळिता काढली माळ वैजयंती । ठेविली परती शालजोडी
जनीचे आवडे देवाजीस गाणे । झालासे तल्लीन पांडुरंग ॥

या अभंगातून जनाबाईच्या व्यक्तिमत्वाचे दर्शन तर नामदेवाने घडविलेच, पण त्याबरोबरच ईश्वरी साह्याची अद्‌भूत कथा जनीच्या व्यक्तिजीवनाशी जोडून दिली. नामदेवाने आपल्या भोवतीच्या सर्वच महत्त्वपूर्ण भगवद् भक्तांविषयी असलेला प्रेमाचा उमाळा अभंगातून गायिला. तो गात असता प्रत्येक आर्तसंताचे वैशिष्ट्य सांगण्यास नामदेव विसरला नाही म्हणून आज यादवकालीन संतमंडळींच्या स्थलकाळाची व कर्तृत्व-चमत्कारांची ओळख मराठी वाङ्मयाच्या इतिहासाला करून घेता येणे शक्य झाले. नामदेवाने जी व्यक्तिचित्रणे केली त्यांचे त्यांचे विशेष अतिशय नेमकेपणाने साक्षात केले. उदा. सावता माळीविषयी नामदेव म्हणतो, 'सावता सागर प्रेमाचा आगर। घेतला अवतार माळ्या घरी ॥ गोरा कुंभाराविषयी नामदेव म्हणतो, 'प्रेम अंगी सदा वाचे भगवंत । प्रेमळ तो भक्त कुंभार गोरा ॥' नामदेवाने जनाबाई, चोखा मेळा, गोरा कुंभार, जगन्मित्रा यांची जी चरित्रे गायिली त्यातून त्या त्या भक्तांची ईश्वराशी जी निष्ठा होती तिने प्रभावित होऊन आणि त्याचा संस्कार जन सामान्यांवर व्हावा म्हणून गायिली. ही सारी माणसे महानुभाव चरित्रनायकांप्रमाणे दैवी, ईश्वरी विभूतिमत्वाने नटलेली नव्हती. ती गुरुपदाला पोहोचलेलीही नव्हती. त्यांनी संप्रदायाची अधिष्ठापनाही केलेली नव्हती. यावरून यादवकालीन चरित्रनिर्मितीतील द्विदल प्रेरणा स्पष्ट होते व त्यात नामदेवाने बहुजन समाजावर घडविलेला जो संस्कार आहे त्याची प्रचिती येते.

आदिसमाधि तीर्थावळी

तीर्थावळीचे अभंग आणि आदि अभंग यांच्याविषयी मतभिन्नता आहे. 'तीर्थावळी' प्रकरण कादंबरीप्रमाणे कपोलकल्पित आहे व आदिमधील ज्ञानेश्वर कुलचरित्र विश्वासार्ह नाही असे अजूनही संशोधकांना वाटत आहे. येथे काही गोष्टी गृहीत धरल्या पाहिजेत. एक म्हणजे नामदेवाच्या अभंगाशिवाय दुसरा कोणताही अस्सल पुरावा ज्ञानेश्वर चरित्रासंदर्भात आजपर्यंत उपलब्ध नाही. दुसरी गोष्ट म्हणजे नामदेवाने चरित्रचित्रणात जरी अद्‌भुताचे रंग आणि चमत्कारकथांचे धागे चरित्रात्मक अभंगात

गोविलेले असले तरी विचक्षणाला त्याच्या पलिकडे असलेले निखळ चरित्रदर्शन जाणवत असते. तिसरी गोष्ट म्हणजे नामदेव बहुश्रुत, विचारवंत, बहुभाषित असे दीर्घायुष्यी संत होते. चक्रधरस्वामींच्या महानिर्याणापूर्वीच नामदेवांचा जन्म झाला होता. नामदेवांच्या भेटीसाठी ज्ञानेश्वर व ज्ञानेश्वरांच्या भेटीसाठी नामदेव अनुक्रमे पंढरपूर आणि आळंदीला गेले होते. या सर्व नामदेव अभंगांन्तर्गत पुराव्यावरून आणि इतर कोणताही पुरावा आज उपलब्ध नसल्यामुळे आणि नामदेवाचे स्फटिकासारखे पारदर्शक मन तीर्थावळीतील अभंगातून स्पष्ट दिसत असल्यामुळे त्याची विश्वासार्हता इतकी तकलादू प्रमाणाने भिरकावून देणे योग्य नाही.

तीर्थावळीच्या अभंगातून नामदेवाने ज्ञानदेव आणि ज्ञानदेवांची लोकोत्तरता यांचा स्वतःवर झालेला मूलगामी जो परिणाम आहे त्याचे मोठे प्रत्ययोत्पादक शब्दचित्रण केले आहे. तीर्थस्थळ महात्म्याऐवजी ज्ञानदेव आणि नामदेव जी मनाने जवळ आलीत आणि परस्परांच्या स्वभाववैशिष्ट्यामुळे जी प्रभावित झालीत त्या प्रसंगाचे लोभसवाणे चित्र तीर्थावळीत दिसू लागते. आळंदीला ज्ञानदेवांना भेटून आल्यापासूनच नामदेवात झपाट्याने वृत्तिपरिवर्तन घडून आलेले होते. लोहचुंबकाकडे खेचले जावे तसे नामदेव आणि ज्ञानदेव मनोमनी परस्परांकडे खेचले गेले. परस्परांच्या पारमार्थिक दृष्टिकोणावर परस्परांचा प्रभाव पडला. नामदेवाला गुरू मिळाल्यामुळे नामदेवाच्या भक्तीत डोळसपणा आला आणि अशा डोळस भक्तीने हृदयी भरून आलेल्या नामदेवाने तीर्थावळीचे अभंग रचले आहेत. त्यासाठी साक्षात विठ्ठल-रखुमाईलाही त्याने आपले सखेसांगाती बनविले आहे आणि मनोमन जाणवलेला विठ्ठलाचा विरह कल्पनेच्या पातळीवरून अभिव्यक्त केला आहे. तीर्थावळीत ज्ञानदेव आणि भक्तसंतमंडळी, विठोबा-रखुमाई आणि त्याचा समस्त परिवार आणि नामदेव अशा तीन पातळ्यांवरील मनोभाव नामदेव स्वतःच जाणून साक्षात करीत आहे. विठोबा ज्ञानदेव-नामदेव यांचा सुखसंवाद जणू यथातथ्य स्वरूपात नामदेव मनःपूत व्यक्त करीत आहे. वास्तवावर उभी असलेली ज्ञानदेव-नामदेवाची मैत्री पांडुरंगाच्या साक्षीने अधिकसघन होत जाते. आपल्या अनुपस्थितीमुळे विठ्ठलाच्या नित्यनैमित्तिक भजनपूजनात अंतराच निर्माण होईल, याची नामदेवाला खूण पटते. तो म्हणतो–

> हासोनि पंढरीनाथ पाहे नाम्याकडे । म्हणे नवल केवढे भाग्य तुझे
> प्रत्यक्ष परब्रह्म मूर्ति ज्ञानेश्वर । करीतसे आदर संगतीचा ॥
> मन नामयाचा हातु धरूनी श्रीपती । देतु असे हाती ज्ञानदेवा ॥
> म्हणे वाटते जडभारी नाम्याच्या वियोगे । दाटले उद्वेगे चित्त माझे —१०९

अशी विठ्ठलाची अवस्था झाली तर नामदेवही विठ्ठल विरहामुळे व्यथित झाला. 'फुटोनी हृदय होती दोन भाग। बहु मज उद्वेग वाटताती, तू माझी जननी तू माझा जनिता। तू

बंधु चुलता पंढरीराया ॥ असे नामदेव म्हणतो. प्रचंड भावनांचा कल्लोळ मनात दाटून आला असता नामदेव तो व्यक्त करतो अभंगातून ! नामदेवाचे सर्वच अभंग म्हणजे आत्मनिष्ठ भावकवितेचे आदर्शस्वरूप होय; कारण त्याचे मनच त्याच्या ओठातून व्यक्त होत जाते. एक सरलोक्ती स्वाभाविकपणे रूपवान होते. ज्ञानदेवांचा आपल्याविषयी काय अभिप्राय आहे हेही नामदेवच सांगून जातो इतका तो मनाचा सरळ आहे, निर्व्याज आहे. नामदेवाच्या मनाच्या सरळपणामुळेच त्याच्या कवित्वाला ऐतिहासिक महत्त्व आले, चरित्रात्मक महत्त्व आले, कालिक महत्त्व आहे आणि यादवकालीन संतकवींचे आणि समाजपरिवर्तनाचे चित्रण मिळू शकले. इतिहासलेखकाची, चरित्रलेखकाची भूमिका नसूनही जे उत्कट ते ते नामदेवाला जाणवले. ते अभिव्यक्त करीत जात असता आपोआपच त्याच्या कवित्वाला अनन्यसाधारण महत्त्व आले.

ज्ञानदेव म्हणे शंका न धरिजे मनीं । दृष्टि दुजेपणीं न ठेवावी
सुखे सुख घ्यावे अनुभवोनी अनुभवावे । आहे ते आघवे ब्रह्मरूप
सुखाचिये ताटी सुखची वोगरी । तृप्ती होईल थोरी क्षुधातुरा
पंढरीरायाचा तू प्रेमभांडारी । आस पूर्ण करी मज याचकाची
सिंधुहुनी सखोल सुरस तुझे बोल । आनंदाची वोल नित्य नवी ॥ ९१६
भक्त भागवत बहुसाल ऐकिले । बहु होऊनि गेले होति पुढे
परि नामयाचे बोलणे नव्हे हे कवित्व । हा रस अद्भुत निरूपम ॥ ९१८

असे नामदेव ज्ञानदेवांकडून स्वतःचे वैशिष्ट्यच अभंगातून सांगू लागतो. ज्ञानेश्वरांच्या 'आदि'मध्ये नामदेवाने विठ्ठलपंतांच्या जन्मापासून ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी आणि अमृतानुभव निर्मिती येथपर्यंतचा जीवनसंदर्भ वर्णिला आहे. ज्ञानदेवांचे अलौकिकत्व, जीवनसंघर्ष आणि समाजाकडून प्रतारणा झाल्यामुळे अंतर्मुख झालेले ज्ञानेश्वर कुटुंब यांचे प्रत्ययोत्पादक शब्दचित्र नामदेवाने रेखाटले आहे. 'तुम्ही वेदरूप भूदेव प्रत्यक्ष' किंवा 'तिन्ही देव जैसे परब्रह्मीचे ठसे जगी सूर्य जैसे प्रकाशले' अशी नामदेवाची ज्ञानेश्वर-निवृत्ती-सोपानाबद्दलची धारणा होती.

ज्ञानराज माझी योगयांची माऊली । जेणे निगमवल्ली प्रगट केली
गीता अलंकार नाम ज्ञानेश्वरी । ब्रह्मानंद लहरी प्रगट केली
अध्यात्म विद्येचे दाविलेसे रूप । चैतन्याचा दीप उजळिला
छपन्न भाषेचा केलासे गौरव । भवार्णवी नाव उभारिली
श्रवणाचे मिषे बैसावे येऊनी । साम्राज्य भुवनी सुखी नांदे
नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी । एक तरी ओवी अनुभवावी ॥ ९०२

वरील अभंगाच्या आशयातून दोन गोष्टींचा निर्देश करावयाचा आहे. एक म्हणजे नामदेवांनी ज्ञानेश्वरी आणि अमृतानुभवाच्या निर्मितीचा केलेला गौरव. या गौरवावरूनच

असे जाणवते की समाधीची रचना आधी झाली असावी. नंतर तीर्थावळी रचली गेली व सर्वांत शेवटी म्हणजे समाधिअभंग निर्मितीनंतर नामदेवाने ज्ञानदेवांचो कुलपरंपरा सांगण्यासाठी 'आदी' अभंग लिहिले असावेत असा प्रबळ पुरावा वरील अभंगातून मिळतो. उदा. 'चैतन्याचा दीप उजळिला' किंवा 'छपन्न भाषेचा केलासे गौरव' आणि ज्ञानरायाचे योगीपण या सर्व घटना ज्ञानदेवांच्या उत्तर आयुष्यातील आहेत. त्यासाठी काही काळ गेला आहे व म्हणून नामदेवाने समाधीचे अभंग आधी लिहिले. नंतर तीर्थावळीची रचना झाली तोपर्यंत कदाचित 'आदी' विषयी मनःचित्र नामदेवासमोर तयार नसावे; कारण एका विस्ताराने तीर्थावळीत नामदेव ज्ञानदेवगुणसंकीर्तन आणि विठ्ठलाला जाणवलेले ज्ञानदेवांचे मोठेपण सांगत जातो. ज्ञानदेवांच्या आध्यात्मिक कर्तृत्वामुळे नामदेव आणि सर्वच प्रभावळ प्रभावित झालेली आहे; अशा वेळी ज्ञानदेवचरित्र अपसुकच नामदेवांच्या ओठी आले आणि 'आदि' अभंग बांधले गेले. लीळाचरित्र निर्मितीत ज्याप्रमाणे स्मृतिस्थळात 'उत्तरार्ध पूर्वार्धः दोनि विभाग केले' असा उल्लेख येतो व आधी 'उत्तरार्ध' नंतर 'पूर्वार्ध' व उत्तरार्ध पूर्वार्धातून 'एकांक' चक्रधरचरित्राचा बांधला गेला तशीच समाधी-तीर्थावली-आदि या अभंगनिर्मितीची प्रक्रिया झालेली असावी. त्यासाठी वरील अभंग पुरावा म्हणून उपयुक्त ठरेल!

नामदेवांची समाधि कविता

ज्ञानेश्वरांची समाधी, ज्ञानेश्वरांपाठोपाठ सोपान, मुक्ताई आणि निवृत्तिनाथ यांनीही समाधी घेतली. आपल्यापेक्षा वयाने अल्प असणारी पण कर्तृत्वाने श्रेष्ठ असलेली भावंडे निघून गेल्यामुळे चांगदेव वटेश्वरही विदीर्ण विदीर्ण झाला व साक्षात आपल्या गुरूने म्हणजे मुक्ताईने समाधी घेतलेली बघून चांगदेवानेही समाधी घेतली व जीवनाचा शेवट केला. अशी ही करुणार्त घटना आयुष्याच्या सायंकाळीची अंतिम अवस्था नामदेवाने समाधि अभंगातून टिपली आहे. नामदेवाची समाधीची कविता म्हणजे त्याच्या मनात दाटून आलेले जे दुःखाचे कढ आहेत, प्रिय सख्यासोबतींचा डोळ्यादेखत झालेला जो शेवट आहे, त्यातील दुःखकल्लोळ आणि मनाची काहिली ही या कवितेचा आधारदेठ आहे. ईश्वरभेटीसाठी तळमळणारा नामदेव आणि प्रिय व्यक्तीच्या दुःखान्ताने होरपळून निघालेला नामदेव वेगळा आहे. हे ओले दुःख गहिऱ्या जखमा घेऊन कवितेतून ठिबकते. केवळ करुणरसाचा आविष्कार समाधि कवितेतून घडत नाही तर एकीकडे व्यक्तिवैशिष्ट्य, तिचे अस्तित्व आणि स्वभावविशेष यासह प्रसंगचित्रण नामदेव करतो व आपल्या मनाची ठिबकती वेदना बोलकी करतो. नामदेवाच्या संतचरित्रपर अभंगांपेक्षा समाधि अभंगांचे स्वरूप वेगळे आहे. ज्ञानेश्वर समाधीची अपरिहार्यता नामदेवाला जाणवते तशी ती महिमावर्णनातून नामदेव व्यक्त करतो. साधुसंतांची जीवनयात्रा नैसर्गिकपणे पूर्ण होण्यापेक्षा त्यांनी संजीवन समाधीतून आपल्या जीवनाला पूर्णविराम द्यावा यात नामदेवाला अनैसर्गिक असे काही वाटत नाही; कारण तत्कालीन

तशी एक सामाजिक चाल होती. तीत श्रेष्ठ विभूतींचा जन्म आणि मृत्यू हाही लोकविलक्षण असावा अशी त्याची धारणा असते म्हणूनच नामदेवाने, ज्ञानेश्वरांच्या समाधीमुळे व्याकुळ झाला असताही, समाधी महिमा गायिला आहे. पण ज्ञानेश्वरसमाधीचा प्रसंग अतिशय अभूतपूर्व आणि जाणिवेने थरथरणारा असा नामदेवाने साक्षात केला. एका अबोध दुःखाने हेलावणारा नामदेव जसा त्यातून स्पष्ट होत जातो तसाच सूक्ष्मभाव-तरल वातावरणही त्यातून स्पंदनशील होत जाते. वस्तुतः समाधीसोहळा हा एक महोत्सवाचे रूप घेतो आहे तर नामदेव मात्र मनाने जडशीळ झालेला आहे.

विठ्ठलरुक्मिणीसहित गरुड हनुमंत । आणिक संतमहंत जमा झाले
पंढरीचा पोहा आला अळंकापुरी । पंच कोसावरी साधुजन
धन्य इंद्रायणी पिंपळाचा पार । धन्य ज्ञानेश्वर पुण्यभूमी
अल्याड पल्याड पताकांचे भार । मध्ये मनोहर इंद्रायणी
पिवळ्या पारव्या आणिक हिरव्या । नीळवर्ण साऱ्या लखलखित
जरी जर्तारी जाल्या रानभरी । विजा त्यावरी खेळताती
सर्पाकार दंड तारांगणावाणी । पताका तिकोनी दाटताती
नामा म्हणे तेथे पताकांचे भार । केव्हडे भाग्य थोर ज्ञानोबाचे ॥ १०३४

अशा महोत्सवात नामदेव मात्र मनाने मृत्यूच्या छायेत विरून जाणाऱ्या दैदिप्यमान ज्ञानदेवांच्या चिरविरहाने व्याकुळ झाला आहे.

कासावीस प्राण मन तळमळी । जैसी का मासोळी जीवनाविण
दाही दिशा ओस वाटते उदास । करिताती सोस मनामाजी
घातियेली घोण प्राण आला कंठी । ज्ञानदेवासाठी तळमळी
नामा म्हणे देवा वाटतसे खंती । चालली विभूति योगियाची ॥ १०५०

अशी नामदेवाची अवस्था झाली तर निवृत्ती, सोपान आणि मुक्ताईला साक्षात पांडुरंगाने हृदयाशी धरले. ज्ञानदेवांनी समाधी घेतली म्हणजे 'उगमापासुनी गंगा सागराशी गेली। काय दोन जाली उदके त्यांची ॥ तैसा ज्ञानदेव जाला अनुभव। काय आम्हा देव दुरावला॥ असा प्रश्न नामदेवाने संतमंडळाला केला. ज्ञानदेवांच्या निघून जाण्यामुळे निवृत्तिनाथांची अवस्था कशी झाली याचे चित्र नामदेवाने खालीलप्रमाणे काढले आहे.

बांधल्या तळाचा फुटलासे पाट । ओघ बारा वाट मुरडताती
बांधल्या पेंढीचा सुटलासे आळा । तृण रानोमाळा पांगलेसे
हरिणीविण खोपी पडियेली वोस । दशदिशा पाडसे भ्रमताती ॥ १०८५
नामा म्हणे देवा घार गेली उडोन । बाळा दाणादाण पडियेली ॥ १०८८
मुंग्यांचिये विवरी लागलासे आग । पुढे आणि मागे झाले नाही
दाही दिशा धुंद उदयास्ताविण । तैसेचि गगन कालवले ॥
नामा म्हणे आता लोपला दिनकर । बाप ज्ञानेश्वर समाधिस्थ ॥ ११९१

ज्ञानदेव समाधीच्या प्रसंगचित्रणातील सूक्ष्मता, पारदर्शकता आणि मनामनांची दुःखपूर्ण भावावस्था नामदेवाने वरील अभंगात टिपली व अत्यंत सूक्ष्म अबोध दुःखाला वाट मोकळी करून दिली. नामदेव प्रतिमांमधून आपली ठिवकती वेदना गोचर करू लागतो आणि उत्कट भावकाव्याची प्रत त्याच्या अभंगाला येते. जिवीचे गुज हरपल्याची जाणीव विषण्ण मनोवस्था आणि व्याकुळ विरहार्तता ज्ञानदेवसमाधीच्या अभंगांतून व्यक्त होते. मनाने खचलेला नामदेव आणि आपले छत्रच उडून गेले म्हणून भयकंपित होणाऱ्या नामदेवाच्या मनाची विविध कंपने ज्ञानदेवसमाधीच्या अभंगातून पाझरतात. गंभीर प्रसंगाला कारुण्याची किनार मिळते आणि अबोध दुःखाला जाणिवेचे डोळे फुटतात.

सोपानदेव आणि चांगावटेश्वर यांचा समाधीसोहळा प्रत्यक्षावलोकनाची प्रतीती देतो. मुक्ताबाईच्या समाधीवर्णनात अद्‌भुताचा रंग मिसळला गेला आहे. मुक्ताबाई ही ज्ञानदेव कुटुंबाची कर्तृत्ववान स्त्री व चांगावटेश्वराची गुरू या नात्याने एकूणच तिचा स्वभाव परखड आणि फटकळ! तीही या प्रसंगात अन्तर्मुख होत आहे. नामदेव एकीकडे वास्तव भावना व्यक्त करतो व त्याचवेळी पूर्वायुष्याचे स्मरणही देत जातो उदा–

> "निवृत्ति मुक्ताईने पाहून स्थळ डोळा । आलासे उमाळा ओसंडूनी
> तात आणि मात गेलासे येथून । तेव्हा आम्ही लहान पांडुरंगा
> निवृत्ति ज्ञानेश्वर कोणाचावे अन्न । सांभाळी सोपान मजलागी. "

या स्मृतीमधून मुक्ताईसह निवृत्ती ज्ञानदेव भावंडांचे पूर्वजीवन समजते. समाधिस्थळ, समाधिकाळ, समाधिवेळही नामदेवानी टिपून ठेऊन एक ऐतिहासिक महत्त्वाचे कार्य करून ठेवले आहे.

> गर्जता गगन कडाडली वीज । स्वरूपी सहज मिळयेली
> मावळता दीप ज्योत कोठे होती । सहज सामावली निरंजनी !

मुक्ताबाई स्वरूपमय अनंतात वीजेसह एकरूप होऊन गेली. ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई ही आपली लहान भावंडे आपल्यापुढे निघून गेल्यावर निवृत्तिनाथांची अवस्था कशी झाली याचे सूक्ष्म चित्र नामदेवाने रेखाटले आहे.

> ज्येष्ठाच्या आधी कनिष्ठाने जाणे । केले नारायणे उफराटे ।
> उफराटे फार कळले माझे मनी । वळचणीचे पाणी आढ्या गेले

अशी अवस्था निवृत्तिनाथांची झाली, तर नामदेवाला झालेले दुःख 'लोपलासे भानु पडला अंधार। गेला योगेश्वर निवृत्तिनाथ' या शब्दात व्यक्त झाले आहे. एका कुटुंबाचा संपूर्ण झालेली शेवट आणि त्यामुळे वारकरीभक्तांच्याच जीवनात निर्माण झालेल्या पोकळीचे दर्शन ज्ञानेश्वराविषयी जे अभंग सर्व समकालीन संतांनी उत्स्फूर्तपणे गायिले त्यातून लक्षात येते. निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर, सोपानदेव आणि मुक्ताबाई यांच्या समाधीनंतर वारकरी पंथात

नामदेवाकडे नेतृत्व आपोआपच आले आणि तेच त्याने स्वीकारून पुनः तीर्थयात्रा सुरू केल्या. ज्ञानदेवविरहाची पोकळी मनोमन नामदेवाने विपुल रचना करून आणि उपदेश व रुपके निर्माण करून एका अर्थाने भरून काढली.

गोंधळ, डाक, पांगुळ, वासुदेव, पिंगळा, खेळिया, कुटे, शेत, कुळवंडी, उदीम, चाटापरी, धोंगडे, स्वप्न, धेनु आणि हरिजागर ही नामदेवाची रूपकात्मक पण उपदेशपर अशी कविता आहे. लोकजीवनातील विविध तपशीलाच्या रूपकातून नामसंकीर्तनाचा भक्तिविचार नामदेवाने समाजासमोर मांडला. ग्रामजीवनातील समूह खेळ, मनोरंजन-संस्था आणि श्रद्धास्थाने यांची रूपके रचून त्यातून भक्तिमार्गाचा पुरस्कार नामदेवाने केला. लोकसंस्कृतीशी अभंगकवितेचे नाते हे असे सृजनक्रियेपासूनच जोडले गेले भूपाळ्या आणि आरत्याही ईश्वरभक्तिपर नामस्मरणाचाच एक आचारधर्म समजल जातो तोही नामदेवाने आपल्या भूपाळ्या व आरत्यामधून पुरस्कारिला.

नामदेवाचे पंजाब भ्रमण

नामदेव आपल्या उत्तरायुष्यात पंजाबात गेलेत आणि तेथेच त्यांनी विठ्ठलभक्तीचा प्रसार आणि प्रचार हिंदी रचना करून केला. आज नामदेवाची अशी पंजाबी गुरूमुखी हिंदी पदावली उपलब्ध आहे ती नामदेवाच्या मराठी कवितेतील आशयाशी मिळतीच जुळतीच आहे. आशयसाम्य, विषयसाम्य, विचारसाम्य, अभिव्यक्तिसाम्य, निरुपणपद्धती साम्य, तत्त्वविचारसाम्य, प्रतिमासाम्य, अलंकारसाम्य, आणि आत्माविष्कारातील विशिष्ट तेचे साम्य यावरून नामदेवाच्या नावावर आज उपलब्ध असलेली हिंदी-पंजाबी कविता हे नामदेवाचेच कर्तृत्व असून नामदेव आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात पंजाबात स्थिरावले त्यावेळी ही रचना तयार झाली. अनुभवाचा ताजेपणा व नावीन्य जसे मराठी-अभंगात दिसते तसे नामदेवाच्या पंजाबी आणि हिंदी रचनेत दिसत नाही केवळ-भाषिक परिवर्तनच झालेले आहे. ही कविता नामदेवाच्या उत्तरायुष्यातील आहे. नामदेवाची उपदेशवाणी ही पंजाबात नामदेव जो गेला त्यापूर्वीची आहे. साक्षात्कारी संतत्वाच्या पातळीवर नामदेव पोहोचला त्यावेळी उपदेशपर कविता नामदेवमुखातून स्रवू लागली. उपदेशाचे विषय जरी न्याहाळले तरी लक्षात येईल की एका जीवन्मुक्ताच्या पातळीवर नामदेवाचे कविमन पोचल्यावर भोवतालच्या जगाशी तो संबंध साधू बघतो आणि असा संदर्भ उपदेशातून येतो. कलिप्रभावामुळे खचलेल्या माणसाला उपदेश, खलदुर्जनाला उपदेश, जनास उपदेश, उपासकास उपदेश, सांसारिकास उपदेश, मुमुक्षूस उपदेश, प्रारब्ध गतीप्राप्त जनास उपदेश अशा विविध मानवीस्तरावर नामदेवाने उपदेश केला आहे. ही बोधवाणी सर्वच संत-कवितेतून अभिव्यक्त झालेली आहे. आध्यात्मिक जीवनात झालेला आत्मिक अनुभव जो अद्वैताचा आहे त्यामुळे संतकवी साक्षात्काराच्या अवस्थेप्रत पोहचले व अशा अवस्थेतून सामान्यजनांची

दुर्बलता कमी करण्यासाठी आणि त्यांच्या आध्यात्मिक आणि पारलौकिक सुखप्राप्तीसाठी यादवकालीन संतांनी उपदेशातून रचना केली.

एका मिशनरी ध्येयाने संतकवींनी बोध केला. नामदेवाने विठ्ठलकीर्तनाद्वारा आपल्या अभंगातून जनबोध केला व त्यातून एक सुसंगत नीतिशास्त्र सुचविले. ज्ञानदेव, नामदेवाच्या काव्यनिर्मितीचे एक विधायक स्वरूप म्हणजे त्यांनी समाज मनावर आपल्या निष्कलंक चारित्र्याने आणि वागणुकीने घडविलेले मनःपूत संस्कार आणि जीवन जगण्याची दिलेली शिकवण. जीवनाचे अनेक पदरी स्वरूप आणि संकटे यांच्या पलीकडे असलेले ईश्वरी ध्येय मोक्षस्वरूपी असून ते हरिगुणलीला वर्णनाच्या साह्याने प्रत्येकाला प्राप्त होऊ शकते हा त्यांच्या उपदेशवाणीचा मूळ पाया होय. आणि मानवतेतून स्रवणारा समाजवाद हा त्यांचा आधारदेठ होय. या दृष्टिकोणातून आध्यात्मिक लोकशाहीची बीजे समाजात रोवली गेलीत ती यादवकालीन संतांच्या शिकवणुकीतून ! नामदेवाची उपदेशपर कविता आणि रूपकाश्रयी कविता ही ज्ञानदेव भेटीनंतरची कविता आहे. आणि ज्ञानदेव समाधी-नंतर नामदेवांच्या कर्तृत्वाला जे वळण मिळाले व वारकरी पंथाची धुरा त्यांना जी सांभाळावी लागली त्याचे प्रगट चिन्ह म्हणजे नामदेवाची उपदेशपर आणि रूपकाश्रयी अभंगनिर्मिती. आत्माविष्कारातील आर्ततेपेक्षा उपदेशातील बोधात्मकता अशाप्रकारच्या कवितेत टोकदार झाली आहे.

नामदेव आणि ज्ञानेश्वर यांनी केलेली जी तीर्थयात्रा होती तिच्या प्रेरणेतून आणि आदर्शातून नामदेवांनी संतमहिमा अनुभविला होता. नामदेवाची ही कविता वास्तविक वर्णनपर आहे. संत कोणास म्हणावे ? व संतमहात्मे कसे असतात याचे चित्र काढीत असता नामदेवापुढे संताचा आदर्श आहे तो ज्ञानेश्वरादि भावंडांचा ! यादवकालीन सारेच संतकवी मनाने ज्ञानेश्वराशी बांधले गेलेले होते. उदा. 'सूर्य सूर्यकांतु प्रकाश एकु,' 'दुधावरील साय वरी साखर मेळवणी' 'कोंदले हरिरूप देखती विश्वाकार,' 'तळपे शांतीचे ओढण। घेती स्वानंदे उडुाण,' 'नामा म्हणे हृदयभानी योगी निरंजन मनी' 'सर्व चित्ती समभाव। सर्व मानी वासुदेव,' 'तेव्हा योगियासी कीर्तनाचे ध्यास। मुक्ती चारी त्यास हात जोडी,' 'आपणा समान सर्वत्र पाहाती अन्य सर्वाभूती रामविष्णु.'

'ब्रह्ममूर्ति संत जगी अवतरले', 'नामा म्हणे धन्य धन्य भेट झाली'

शिवस्तुती, तुळशीमाहात्म्य, चोवीस नामांचा महिमा, दशावतार-वर्णने ही सारी नामदेवाची रचना पारमार्थिक जीवनाच्या वाटचालीची पूर्वरूपे होत. नामसंकीर्तन आणि नाममाहात्म्य या अभंगसमूहातूनही नामदेवाची ईश्वरविषयक जी आर्तता आहे ती भजनी कीर्तनासाठी रूप घेते असे जाणवते. समूहमनांच्या वैचारिक अवस्थेचा विचार करूनच सोप्या साध्या सरळ अशा नामसंकीर्तनाच्या मार्गाचा नामदेवाने पुरस्कार केला व त्यातून समाजाला एक भक्तीची दृष्टी दिली केवळ भक्तीचा पुरस्कार नामदेवाच्या

नामपर अभंगात येत नाही तर मोक्षमार्गाचा साधनमार्ग आणि भक्तिमार्गाचा आचार-धर्म नामदेवाइतका साकल्याने कोणत्याच मराठी संतकवीने सांगितलेला नाही. यातून नामदेवाची सांस्कृतिक कामगिरी मनोमनी पटते. बहुजनसमाजाच्या बोलीभाषेतून दिलेली साधनसुचिता म्हणजे नामदेवाचे नामपर अभंग होत.

नामदेवाचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व

आतापर्यंत नामदेवाच्या अनेकपदरी अभंगनिर्मितीचा विचार केला व त्यातून नामदेवाचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व कसे प्रतीत होते व नामदेवाचे मन आणि कविता ही मुळी दोन पातळीवरील कशी नाही हेच शोधविषय म्हणून न्याहाळले. नामदेव अभंगातूनच नामदेवाच्या आध्यात्मिक जीवनाच्या विविध अवस्था लक्षात येतात. ज्ञानेश्वर भेटीपूर्वीची नामदेवाची आर्तता आणि भक्तीची उत्कटता आणि ज्ञानेश्वर भेटीनंतर आलेली सम्यक जाण यांचेही मोठे हृदयंगम दर्शन नामदेवाच्या अभंगातून घडते. नामदेवाचा व्यक्ती म्हणून झालेला विकास नामदेवाच्या आत्मचरित्रपर अभंगातून मिळतो, तसाच कवी म्हणून झालेला जो विकास आहे त्याचे आरेखन स्पष्ट होत असते. नामदेवाचे बद्धावस्था-मुमुक्षू अवस्था वंचित अवस्था जीवन्मुक्तावस्था आणि साक्षात्कारी अवस्था अशा पाच पातळ्यांवर पारमार्थिक जीवन पसरलेले आहे. त्यातून नामदेवाच्या पारमार्थिक जीवनाचा संदर्भशोध जसा मिळतो तसाच त्याच्या भावपर आणि आत्मपर कवितेचा विकासही जाणवत असतो.

आत्मचरित्रातील तीन परिवर्तने

नामदेवाचे आत्मचरित्रपर अभंगाच्या कर्तृत्वासंबंधी मतभेद असले तरी अभंगाची जी वीण आहे ती मूळ नामदेवाचीच ठरते. नामदेव जीवनातील तीन परिवर्तने आणि त्या परिवर्तनातून स्फुरलेले अभंग यांचा आलेख काढता येतो. नामदेवाची बंधनकारक अशी संसारी अवस्था म्हणजे त्याची बद्धदशा होय. नामदेवकुटुंबात गोणाईला नामदेवाच्या देवपिसेपणामुळे जास्त विव्हल बनविले आहे. तिचा आकांत म्हणजे मातृवात्सल्याचा आकांत आहे. त्या मानाने दामाशेठ हा तटस्थ आहे. नवसाने झालेला आपला एकुलता एक मुलगा वेडापिसा झालेला बघून गोणाई सैरभैर झालेली आहे. आईवडिल आणि पत्नी या सांसारिकांचा आपल्या विठ्ठलभक्तीत येणारा विरोध आणि निर्माण होणारा अडसर यामुळे नामदेवही दुःखी आहे. एका व्यावहारिक पातळीवरचे हे दुखःकोंभ नामदेवाच्या आत्मचरित्रपर अभंगातून अंकुरतात. गोणाई ही आई असल्यामुळे विठ्ठलाशी प्रामाणिकपणे भांडत आहे, तर नामदेव हा भक्तशिरोमणी असल्यामुळे तितक्याच उत्कटतेने ईश्वराला शरण जात आहे हे भावनिक तणाव आणि द्वंद्वात्मक अवस्था नामदेवाच्या आत्मपर अभंगांमधून अधिक धारदार होऊन साक्षात होतात. तर नामदेवाला मात्र 'नामा तो केशव केशव तोची नामा अन्तर्बाह्य एक ब्रह्मची कोंदले, मन पांगुळले स्वरूपी गुंतले द्वैत निरसिले दृश्याकार' अशी भावप्रतीती येते आहे. 'देव माझा मी देवाचा' अशी नाम-

देवाची भावावस्था एका प्रगट निश्चयाने पुढे येते. संसारबंधनात न अडकणारे नामदेवाचे मन आणि त्याने चारचौघांसारखा संसार करावा म्हणून आई वडिल आणि पत्नीने चालविलेला अट्टाहास यातूनच नामदेवाच्या ईश्वरभक्तीला एक निराळेच वळण मिळते.

नामदेवाचे वाढते देवपिसे हे नामदेवकुटुंबाच्या चिंतेचा विषय ठरला आणि प्रत्येकच कुटुंबीय आपापल्या परीने नामदेवाला आणि विठ्ठलाला 'बोलू लावून' आपली प्रपंचव्यथा मोठ्या निर्वाणीने सांगू लागला. परंतु त्याचा परिणाम नामदेवावर होणे शक्यच नव्हते कारण नामदेवाची विठ्ठलभक्ती ही 'कैसी तुझी भक्ती या लौकिकावेगळी' अशी होती. 'लाजिरवाणे तुवा केले हे जिणे । सांडी सांडी नाम्या तू हे देवपिसे' अशी कुटुंबियांची हाक तर 'देव झाला नामा, नामा झाला देव' अशी नामदेवांची अवस्था! नामदेवाच्या बद्धदशेतील संसारजीवनाचे सूक्ष्म आणि मार्मिक अवलोकन चरित्रपर अभंगातून घडते. आईचा मुलासाठी आणि पत्नीचा पतीसाठी झालेला जीवाचा आकांत आणि विठ्ठलाशीच केलेले परखड सवालजबाब त्या प्रसंगातील भावनांची घारदार अवस्थाच सुचवितात. राजाई विठ्ठलपत्नी रखुमाईलाच विचारते 'शिकवा हो रुक्माई आपुलिया कांता। कां आम्हा अनाथा कष्टवितो' आणि आपली पतिविषयक चीड व्यक्त करते. नामदेवकुटुंबात नामदेवाच्या उत्कट ईश्वरभक्तीमुळे निर्माण झालेले वादळ नामदेवाच्या आत्मचरित्रपर अभंगाचा पहिला भाग ठरतो.

दुसरा विभाग म्हणजे, नामदेव पंढरपूरहून ज्ञानेश्वर निवृत्तिनाथांच्या भेटीला आळंदीला गेले तो होय. नामदेव जीवनात परिवर्तन घडणाऱ्या अशा तीन घटना या विभागात घडल्या. नामदेवाचा अहंकार ज्ञानेश्वर निवृत्तिनाथांनी नामदेव ज्येष्ठ म्हणून वंदन करून फुलून आला त्याला मुक्ताईने दिलेला शह! दुसरी घटना म्हणजे, अहंतासर्पाच्या वेढ्याने गुंडाळलेल्या चंदनाच्या झाडाप्रमाणे नामदेवाचे असलेले मन गुरुविना केविलवाणे ठरले. 'ऐक रे नामया होई आत्मनिष्ठ तरीच तू श्रेष्ठ' असे मुक्ताबाईने नामदेवाला सुचविताच आणि गोरा कुंभाराने थापटण्याने नामदेवाला थापटताच 'गोरा म्हणे कोरा राहिला गे बाई' असे गोरोबाने काढलेले उद्‌गार त्यामुळे नामदेवाना आलेल-संताप व संतापाच्या भरात पंढरपुरी जाऊन कैकाडी आणि कपटी संतमंडळींचे विठ्ठलासमोर केलेले गाऱ्हाणे व ईश्वराने विसोबाखेचराची भेट घेऊन त्याला गुरू मानण्याबद्दल दिलेला संदेश या साऱ्या तपशीलातून नामदेवाच्या व्यक्तिजीवनावर होत गेलेले संस्कार आणि नामदेवाचे झालेले मानसिक परिवर्तन सत्यापलाप होऊ न देता अतिशय प्रांजळपणे आत्मचरित्रपर अभंगातून डोकावते. विविध जीवन तपशीलांची अपरिहार्यता, प्रसंगातील चित्रमयता आणि घटनाचित्रणातील नाट्यात्मकता यामुळे प्रत्यक्षानुभूतीचा आढळ हे प्रकरण वाचताना वाचकांना येतो. नामदेवाचे मन अतिशय निर्व्याज आहे आणि मनाने तो अतिशय प्रांजळ आहे सरळ आहे, म्हणूनच त्याच्या आत्मचरित्रपर अभंगातून नामदेवाचे व्यक्तिमत्वही वाङ्मयीन स्वरूपात साक्षात होऊ लागते. नामदेवाची बद्धावस्था संपून मुमुक्षू अवस्थेत नामदेव जातो. नामदेवाचे भावनिक आणि मानसिक परिवर्तन घडून

त्याच्या ठिकाणचा अहंकार नष्ट होतो व गुरुपोदेश मिळाल्यामुळे नामदेवाच्या भक्ति-चिंतनाला एक विशिष्ट दिशा मिळते.

आत्मचरित्रपर अभंगातील तिसरा भाग म्हणजे अनुतापदग्ध नामदेवाने केलेले आत्मसंशोधन, आत्मनिरीक्षण आणि आत्मपरीक्षण. विविध भावभावनांचे सप्तरंगी इंद्र-धनुष्य नामदेवाच्या अभंगातून दिसू लागते. नामदेव आर्ततेने ईश्वराशी संवाद साधू बघतो व या संवादाच्या विविध पातळ्या निर्माण होतात. नामदेवाची उत्कट भावकविता येथेच स्पष्ट होते आणि भावकाव्याबरोबरच आध्यात्मिक भावगीतेही नामदेवाच्या विविध भावभावनांच्या कल्लोळी आविष्कारातून दाटून येतात. 'दिवस गेले वाचांविण । देवा तुज न रिघता शरण' अशी खंत नामदेवाला जाणवते. वीतभर पोट पाठीशी लागल्यामुळे आणि चोरटे मन कुसंगी लागल्यामुळे नामदेव दुःखी होतो. पण त्यातच त्याला जाणवते 'नामा म्हणे देवा कळली तुझी माव । माझा मी उपाव करीन आता' अशी आत्मसाम-र्थ्याची जाणीव निर्माण होते. व 'आम्हा सापडले वर्म । करू भागवत धर्म' अशा मोकळ्या वातावरणात पुनः नामदेव गाऊ लागतो. 'माझे मनोरथ पूर्ण कीजे देवा' कारण तुला जर मी 'लटिका मी गाईन लटिका मी नाचेन, लटकी माझी क्रिया लटिके माझे कर्म' असे वाटत असेल तरी मला मात्र तू 'जीव तू प्राण तू । आत्मा तू गा विठ्ठला' असाच वाटत आलेला आहेस, माझा निर्धार आता कायम झाला आहे.

नाम गाऊ नाम ध्याऊ । नाम विठोबासी पाहु
आम्ही दैवाचे दैवाचे । दास पंढरीरायाचे
टाळ दिंडी घेऊनि हाती । केशवराज गाऊ गीती
नामा म्हणे लाखोली सदा । अनंत नामे वाहू गोविंदा -१४६५

जे जे घडेल ते ते घडो पण आता माघार नाही कारण देह राहो अथवा पडो तरी मी तुझे पाय सोडणार नाही, असा निर्धारभाव नामदेव व्यक्त करतो. 'लपलासि तरी नाम कैसे नेसी । आम्ही अहर्निश नाम गाऊ' असा युक्तिवाद विठ्ठलाशी नामदेव करतो. तरीही परमेश्वर प्रसन्न होत नाही हे बघून नामदेव व्यथित झालेला आहे. अंतर्मुखतेत येणारी उत्कट अवस्था आणि अनुतापातील तळमळ पुनः पुनः व्यक्त करूनही विठ्ठल प्रसन्न होत नाही त्यामुळे नामदेव अधिकच व्याकुळ होत जातो. नामदेवाच्या मनाची अत्युच्च कालवाकालव आणि वंचितावस्थेत विठ्ठलाने ठेवल्यापुढे निर्माण झालेली दुःखमूल अवस्था नामदेव व्यक्त करतो.

डोळुले सिणले पाहता वाटुली । अवस्था दाटली हृदयामाजी
तू माझी जननी सखिये सांगातिणी । विठुले धांवोनी देई क्षेम
तू माझी पक्षिणी मी तुझे अंडज । क्षुधे पीडिलो भज विसरलीसी
तू माझी कुरंगिणी मी तुझे पाडस । गुंतले भवपाश सोडी माझा

मी तुझे वच्छ तू माझी गाऊली । वोरसोनि घाली प्रेमपान्हा
नामा म्हणे माझी पुरवावी आस । पाजो तान्हुल्यास प्रेमपान्हा

* * *

उडाली पक्षिणी गेली अंतराळीं । चित्त बाळाजवळी ठेवूनिया
तैसे माझे मन राहो का ईश्वरी । मग सुखे संसारी असे ना का
धेनु चरे वनी वच्छ असे घरी । चित्त वच्छावरी ठेऊनि फिरे

* * *

तू आकाश मी शामिका । तू लिंग मी साळुंका
तू समुद्र मी चंद्रिका । स्वये दोन्ही
तू वृंदावन मी चिरी । तू तुळसी मी मंजिरी
तू पावा मी मोहरी । स्वये दोन्ही
तू चांद मी चांदणी । तू नाग मी पद्मिणी
तू कृष्ण मी रुक्मिणी । स्वये दोन्ही --१५०१

वरील अभंगातून, नामदेवाने विविध पातळीवरून ईश्वराशी साधलेला जो संवाद अ हे त्याची अनंतरूपे प्रकट होतात. प्रेमकलह, रुसवा, अनुनय, आग्रह, वात्सल्य, निर्भत्सना, तळमळ, प्रेमकल्लोळ, विरहार्तता, सैरभैर मनोवस्था अशा अनेक पातळीवर नामदेव आपली आर्त-भक्ती आणि विठ्ठलाची आस जिवंतपणाच्या तेजाने रसरसलेल्या स्वरूपात व्यक्त करतो. कमालीची आर्तता आणि प्रेमभक्तीचे पिसे भावभक्तीच्या उचंबळीतून साक्षात होते. ऐहिक जीवनाचे बंध तुटता तुटत नाहीत म्हणून अंतर्मुख होणारा नामदेव बद्धदशा, साधकदशा, वंचितदशा, मुमुक्षुदशा आणि जीवनमुक्तदशेच्या पार पोहोचतो.

स्फुंदत स्फुंदत नामा उभा महाद्वारी । दृष्टि पायावरी विठोबाच्या
देखोनि केशवे उभारिल्या बाहे । पालवितु आहे पीतांबरे
रुसलासे नामा उभा गरुडपारी । पितांबर धारी पालवी तो
प्रेमाचे स्फुंदन न सावरे नामया । पसरोनिया बाह्या देत क्षेम
. . . मीच माझा देव मीच माझा भक्त । मी माझा कृतार्थ सहज असे
नामा म्हणे सोय सापडली निकी । जालो येकायेकी हरिचा दास
देह देव्हारा पाट हृदय संपुष्ट । मधी कृष्णमूर्त बैसविली
. . . माझा भाव तुझे चरणी । तुझे रूप माझे नयनी
सापडलो एकमेका । जन्मोजन्मी नोहे सुटका ।।

विठ्ठल आणि नामदेव यांची एकात्मता मनोमनी जाणवताच नामदेवाला चैतन्याचा साक्षात्कार झाला आहे. आत्मचैतन्यात विठ्ठलरुपाला न्याहाळताना नामदेवाची जीवन्मुक्त अशी अवस्था झाली आणि ईश्वर व भक्त यांचे एकात्मस्वरूप, अद्वैत चिरंतन स्वरुपात

नामदेवाच्या अनुभवाला आले. आत्मतेजाने रसरसलेला स्वानुभव नामदेवाने प्रकाश-रेखनातून अभिव्यक्त केला. नामदेव मनाने मोहरून आला. एका प्रचंड आत्मविश्वासाने त्याने जीवनाचे आव्हान स्वीकारले आणि तितक्याच निष्ठेने विठ्ठलाशी एकरूप होताच अद्वयानंदाची दिवाळी साजरी केली.

कोटी दिवाळचा दसरे । आम्हा हेचि जाले पुरे
घरोघरी ओवाळणी । विठ्ठला देखिला नयनी
जाला सुखाचा शेजार । करा नामाचा गजर
नामयाचा स्वामी आला । ब्रह्मादिका आनंद झाला —१७७२

विठ्ठल साक्षात्काराचा अद्वयानुभव नामदेवाला कोटी सूर्य प्रभादीप्ती । गगनी झळकली अवचिती अशा प्रकाश जाणिवेतून आलेला आहे. विठ्ठलरूपाच्या साक्षात्कारातून नामदेवाचे वृत्तिपरिवर्तन झाले आणि नामदेवाची उपदेशवाणी स्रवू लागली. भगवद्धर्माचे किंकरत्व स्वीकारलेल्या नामदेवाच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास आणि काव्यकर्तृत्वाचा विकास परस्परानुप्रवेशी आणि परस्परानुबंधी झाला. नामदेवगाथेतील (सरकारी प्रत) अभंगांच्या विषयानुक्रमातही थोडा बदल प्रस्तुत सुचवावयाचा आहे.

व्यक्तित्वविकास आणि काव्यविकास

नामदेवाच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा विकास आणि काव्यविकास समांतर झालेला आहे ही गोष्ट स्वतःसिद्धच आहे. अशावेळी आवटेप्रतीवरून सुधारून दिलेली नामदेव गाथेची सरकारी प्रत मात्र व्यवस्थित बांधली गेलेली दिसत नाही. नामदेवाचे आत्मचरित्र, आन्तरिक संघर्ष, गुरुपोदेशाने नामदेव जीवनात झालेले वृत्तिपरिवर्तन, ज्ञानेश्वर नामदेव भेट व तीर्थयात्रा त्यातून स्फुरलेली नामदेवाची कविता नामस्मरणपर व नामसंकीर्तनपर ईश्वराशी अनेक पातळीवरून साधलेला संवाद ज्ञानेश्वरादी भावंडांची समाधी, संतचरित्रे आणि अनेक स्फुट वर्णनपर आणि आख्यानपर अभंगांची निर्मिती आणि नामदेवाला झालेला ईश्वरी साक्षात्कार आणि साक्षात्कारी संत म्हणून नामदेवाने समाजाला केलेला उपदेश व रूपकात्मक रचना व त्यानंतर निर्माण झालेली हिंदी आणि पंजाबी कविता असा नामदेवाच्या कवितेचा विकासक्रम आहे. तिच्यात एक अंतर्गत सुसंगती आहे व या सुसंगतीतून नामदेवाच्या कविमनाच्या बद्धावस्थेपासून मुक्तावस्थेपर्यंत झालेला जो प्रवास आहे तो अंकित झालेला आहे अनेकपदरी रचना करणाऱ्या नामदेवाची कविता तुकारामाच्या कवितेप्रमाणे व्यूहात्मक नसली तरी स्फटिकासारखे त्याचे मन पारदर्शकपणे अभंगातून स्पष्ट जाणवत असते. ज्ञानेश्वरांच्या संजीवन समाधी नंतर निर्नायक झालेला वारकरी संप्रदाय आणि विठ्ठलभक्ती यांचा प्रचार आणि पुरस्कार हयातभर नामदेवाने केला आहे आणि संपूर्ण महाराष्ट्र मंडळच गजबजून सोडले असे नाही, तर उत्तरेतही आपल्या काव्यकर्तृत्वाचे झेंडे लावले !

ज्ञानेश्वरांच्या कर्तृत्वाला पूर्णतः ओळखणारा आणि त्यांच्या कुटुंबाशी समरसून जाणारा नामदेव, ज्ञानेश्वरांचे अलौकिक आध्यात्मिक सामर्थ्य जाणून मनोमनी नम्र होणारा नामदेव आणि नामदेवासाठी तळमळणारे ज्ञानदेव आणि त्याच्या भक्तिप्रवणतेने प्रभावित झालेले ज्ञानदेव असे या दोन भिन्न पातळीवरील कलावंतांना ईश्वरभक्तीने प्रेरित केले आणि परस्परांच्या इतके जवळ आणले की 'हृदया हृदय एक झाले! ये हृदयीचे ते हृदयी घातले' अशी त्यांची अवस्था झाली!

नामदेव ज्ञानेश्वरांप्रमाणेच साक्षात्कारी संत होते. तुकारामाच्या आत्मविकासाप्रमाणे साधकावस्थेपासून साक्षात्कारी अवस्थेपर्यंत त्यांच्या मनाची झालेली परिवर्तने म्हणजे नामदेवाची कविता ठरली. ईश्वर संदर्भातील अनंत पातळीवरील अनंत भावभावना व्यक्त करणारा असा अनुभव नामदेवाच्या कवितेत येतो. कधी भावचित्र, कधी भाववर्णन, कधी भाव निवेदन, कधी भावनांची अनेकता तर कधी एकता अशी नितळ चित्रणे साक्षात होतात. उत्कट भक्ति भावनांची अशी अलौकिक सृष्टी नामदेवाने सजविली व मनाने तो तीत रंगून गेला. एकरूप होऊन गेला. मूर्त आणि अमूर्त, लौकिक आणि अलौकिक, पार्थिव आणि अपार्थिव यांच्या पलीकडे उभी असलेली नामदेवाची भावसृष्टी व तीत नामदेव या व्यक्तित्वाला आणि ईश्वर या चैतन्याचे आलेले अनुभव कल्पनेच्या पातळीवरून नामदेव साक्षात करतो. त्यातच तो मनःपूत गुंतून पडतो. आत्मभाव विसरून आणि निःशंकपणे नामदेव गाऊ लागतो व त्यातून अनंत कल्पनाचित्रे, काव्यचित्रे, ईश्वरचित्रे, संवेदनाचित्रे, आकारास येतात. आणि ती असतात नामदेवाच्या आदर्शाची अनंत 'उभड'!

नामदेवाबरोबर नामदेवाचे कुटुंब, जनाबाई, चोखामेळा आणि इतर संत आपल्या मनीचे 'उभड' व्यक्त करण्यास सरसावले व त्यातून संतवाणीचा फुलोरा निर्माण झाला!

□ □ □



॥ अमृत कविता ॥

(ज्ञानेश्वर आणि नामदेव यांनी आपल्या काव्यवाणीने तेराव्या शतकात एक निरंतर वसंतऋतूच निर्माण केला.) ज्ञानदेवांचे कुटुंब, नामदेवाचे कुटुंब आणि चोखामेळ्याचे कुटुंब हरिभक्तीचे नादताललयसंपृक्त उत्कट आणि उत्कृष्ट भावगीतच सर्वजण गाऊ लागले. नामदेवाबरोबर राजाई, गोणाई, लाडाई आणि जनाबाई गाऊ लागली, ज्ञानेश्वरांबरोबर मुक्ताबाई गाऊ लागली, तर चोखामेळाबरोबर 'चोख्याची महारी' अशी नाममुद्रा घेऊन त्याची बायको गाऊ लागली, निर्मळाही गाऊ लागली. या सर्वांच्या प्रभावामुळे कान्होपात्रेला देखील हा देववेडा छंद लागला. स्त्रिया, मुले, माणसे, तरुण, वृद्ध सारीच विठ्ठलवेडाने झपाटली गेली. त्यांचे अध्वर्यु ज्ञानदेव नामदेव होते पण ज्ञानदेव नामदेवाप्रमाणे तात्त्विक भूमिकेवरून चिंतन न करता ईश्वराविषयीची उत्कट भावना आत्यंतिक तळमळीतून व्यक्त झाली आणि मराठी कवितेच्या वसंतऋतूत काव्यमोगऱ्याला जणू बहरच आला. निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर, सोपान आणि मुक्ताबाई हे सर्व कुटुंबच 'रचना' करू लागले. त्यांचाच आदर्श नामदेवाच्या कुटुंबाने आणि चोखामेळ्याच्या कुटुंबाने उचलला. विसोबा खेचर, गोरा कुंभार आणि चांगदेव ही वयाने वृद्ध झालेली पिकली पाने देखील तल्लीनतेने ईश्वरगुणसंकीर्तन करू लागली.

सर्व संतमेळ्याची परस्परांची नातीही मोठी नाजुक आणि भावकोमल! मुक्ताई सर्व संतमेळ्यात वयाने अतिशय लहान तर तिचा आध्यात्मिक अधिकार आणि तिची जरबही संतमेळ्यावर पराकोटीची! चांगावेटश्वराची ती गुरु तर ज्ञानेश्वर निवृत्तींची जणू माता! गोरोबा काकांना अधिकाराने थापटण्याने कच्चेपक्केपणा बघण्याचा तिचा अधिकार! 'योगी पावन मनाचा,' 'ताटी उघडा ज्ञानेश्वरा' ही मुक्ताईची संवेदनसंपृक्त अशी वात्सल्यपूर्ण आर्तवाणी! जनाबाईचे नामदेवाकडील लौकिक आयुष्य तसे काबाडकष्टाचे पण आध्यात्मिक अधिकार लाखमोलाचा! चोखामेळ्याचे जीवन बहिष्कृत गावाबाहेरचे! त्याची स्त्री आणि निर्मळा ही बहीण तशा नगण्य पण त्यांनीही आपला विद्रोह मराठी काव्यवाणीत शिलालेखान्वित करून ठेवला. दुसऱ्याला आपल्या छंदी लावणारी कान्होपात्राच, विठ्ठलाच्या छंदी लागली आणि त्या नटनाट्यरूप घटना करणाऱ्या ईश्वराने तिचा उद्धार केला. नरहरी सोनार, सावता माळी, सेना न्हावी, बंका महार, परिसा भागवत इत्यादि कविमंडळी धन्याचा हा माल मी भारवाही इतक्या प्रामाणिकपणाने आणि उपजत अशा नैसर्गिकपणाने ते ईश्वराशी तादात्म पावत होते, एकरूप होऊन जात होते.

पंढरी माहेर विठ्ठल माऊली

एकीकडे जीवनाची बंदिस्त चौकट नित्यजीवनात स्वीकारूनही 'विठूचा गजर हरीनामाचा झेंडा रोविला' अशा थाटात जो तो आपली पडशी जणू सोहम् सुकृताच्या गाठी सोडवून जात येत राहिले ते आयुष्याच्या सायंसमयापर्यंत! मृत्यूचे भय नाही, जीवनभोगाची

चिंता नाही, अशा निर्भय अवस्थेत विठूने त्यांना नेले. एका वेगळ्याच लोकशाहीचा जन्म झाला. 'कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे' राहण्यापेक्षा विठ्ठलाच्या पायरीवरच त्यांनी आपली भावशिदोरी सोडली आणि तृप्तीची विश्रांती घेतली तीही त्याच्या पायरीजवळ असा भागवत पंथाचा आणि धर्माचा इतिहास आहे. 'पंढरी माहेर विठ्ठल माऊली' असल्याने संपूर्ण महाराष्ट्र तिच्या पायापाशी येऊन तिची दृष्टिभेट घेऊ लागला तो अनादिकालापासून आजपर्यंत. आषाढी कार्तिकीची दिंडी आणि वारकऱ्यांची वारी म्हणजे कीर्तन प्रवचनातून भजनीपद्धतीचा समूहमनांचा झालेला आत्माविष्कारच होय. प्रत्येकाची भावतळमळ स्वतंत्र आहे, तिच्यातच प्रत्येकाचे व्यक्तिमत्त्व अभिव्यक्त झाले. महानुभाव कवितेत जशी विषयाची एकदेशीयता आल्यामुळे आणि पंथाची प्रेरणाच मूलगामी प्रेरणा ठरल्यामुळे व्यक्तित्वाची ओळख नाही म्हटले तरी अस्पष्ट झाली, धूसर झाली. कविता अनेकांगांनी विस्तारली पण तीत आत्माविष्कार येऊ शकला नाही. प्रचंड जलाशयाला काठावरून न्याहाळावे व जे जे दिसेल, जाणवेल त्याची नोंद करावी त्याप्रमाणे महानुभावांची कविता विशेषतः 'साती ग्रंथा'तील कविता झाली कारण तीत आत्माविष्काराची भूमिकाच प्रबळ ठरू शकली नाही. याउलट भागवत संप्रदायाच्या अभंगनिर्मितीतही विषयाची एकदेशीयता असूनही तीत व्यक्तिपरत्वे आत्माविष्काराची अस्तित्वखूण उमटली गेली आणि आज साडेसातशे वर्षे उलटूनही अभंगाची नाममुद्रा माहिती नसली तरी कुणाचा अभंग यांची मनोमन खूण पटते. वास्तविक वारकरी संतमेळ्याची कविताही तशी आज अतिशय अल्प स्वरूपात उपलब्ध आहे, पण तरीही ती स्वतःचे सोने जपणारी ठरली आहे. वारकरी संतमेळ्यातील प्रत्येक कवीने विठ्ठल माहात्म्य आणि पंढरी माहात्म्य गायिले आहे; पण त्यातही प्रत्येकाची स्वतंत्र निर्मिती प्रक्रिया अभिव्यक्त होते. उलट चक्रधर गुणवर्णनात मात्र अतिशय सांकेतिकता नरेंद्र महदंबा वगळता येत असते व तो केवळ एक उपचार संकतेभूत होऊन अवतरतो.

मुक्तगीत परंपरा

विविध पातळीवरून जीवन जगण्याऱ्या विविध दुःखभोग आनंदाने झेलणाऱ्या सामान्य माणसांचे मनोबळ वाढविण्यास आणि त्यांच्या संवेदनशीलतेच्या अभिव्यक्तीचे वातावरण निर्माण होण्यास ज्ञानेश्वर आणि नामदेव यांची काव्यवाणी कारणीभूत ठरली व दिव्याने दिवा पेटवावा तसा सारा महाराष्ट्र उजळून निघाला तो बहुजन समाजाच्या काव्यदीपिकांनी आणि निरांजनांनी मोक्ष प्राप्तीचे साधन म्हणून उत्कटतेने विठ्ठलाची होणारी आळवणी उत्कट भावकविता म्हणून ओळखली गेली. आत्माविष्काराच्या अंगभूत लावण्याने ती नटली सजली आणि अतिशय सरळतेने अभिव्यक्त झाली हेच तिचे विशेष समजले गेले. महानुभाव कवींची दीर्घकथात्मक काव्यनिर्मिती आणि भागवत कवींची स्फुट स्वरुपाची जहजाविष्कारी भावकविता यामुळे तेरावे शतक दुमदुमून गेले व सर्वच कवींना पंढरीचे एक व्यासपीठ मिळाले ते काव्यगायनासाठी. प्रत्येकाने आपली हजेरी 'पंढरी माहात्म्य' आणि 'विठ्ठल माहात्म्य' रचून लावलेली आहे. एका विशिष्ट भक्ति-

सूत्राने सारी मने एकत्र बांधली गेली आणि आपली भक्तिपरता चित्तिचैतन्याच्या भेटीसाठी विठ्ठलाच्या गुणसंकीर्तनातून, लोकजीवनातील विविध रूपकातून, भूपाळ्या आणि आरत्यांमधून, दुर्बोध अशा कूटांतून मनमुक्त अशा भावावस्थेतून गाऊ लागलीत संगीतात्मकता हा अभंग ओवीचा अंगभूत गुणधर्म ठरला कारण अनुभव अभिव्यक्त होतानाच मुळी प्रत्यक्षातून गोचर होत राहिले. अभंगातील शब्द हे केवळ साधन म्हणून न येता संपूर्ण भावनांनी ओथंबलेले आणि बोलीभाषेशी व लोकजीवन व्यवहाराशी नातेसंबंध असलेले असे नैसर्गिकपणे येत राहिले. कविमनांची कल्पनेची पातळी आणि वास्तवाची पातळी मुळी दोन राहिल्याच नाहीत इतकी सहजता अभंग कवितेत उतरली. महानुभाव कवितेत चक्रधरस्वामी हाच परमेश्वर या विचारसूत्राने सारी माणसे एकत्र बांधली गेली होती व त्यातून त्यांची कविता एका विशिष्ट मर्यादशील पद्धतीने आणि आपल्याच थाटात निर्माण होत होती. स्थळवर्णने, व्यक्तिवर्णने, प्रसंगवर्णने ही सारी ईश्वरीरूप चक्रधर संदर्भ घेऊन अवतीर्ण झाल्यामुळे केवळ विषयाची एकदेशीयताच या कवितेत उतरली असे नाही, तर अभिव्यक्तीची ही एकदेशीयता ती टाळू शकली नाही. अभंगकवितेच्या संदर्भात तर ही तफावत फारच जाणवते. अभंग कवितेतही अभिव्यक्तीची जी विविधता आली त्यामुळेही मराठी कवितेच्या विकासाला आणि विस्ताराला एक प्रचंड वेग आला, गती आली. कवितेचे विविध आदिरूप प्रकार निर्माण झाले. आरती, गौळण, विराण्या, रूपकाश्रयी रचना, लोकसंस्कृतिमय रचना, विविध खेळस्वरूपी रचना, स्त्रियांचे खेळ, पुरुषांचे खेळ, मनोरंजनपर कार्य करणाऱ्या संस्थांची कविता अशी कवितेची अनेक रूपे साजिवंत होऊन अवतरली व विषय जरी ईश्वरीगुण संकीर्तनाचा असला तरी त्यात प्रत्येक व्यक्तित्वाचे भावगंध उसळते होऊन व्यक्त झाले. अभंग कवितेत संगीत आहे, नाट्य आहे, वक्तृत्व आहे, उपरोधात्मकता आहे, स्वभावोक्ती आणि व्याजोक्तीही आहे, ताल आहे, सूर आहे आणि शब्द आहेत. सर्व ललितकलांचा जणू संगम अभंग या उत्स्फूर्त भावकाव्यात्मक गीतांतून आणि पदांतून झाला. रचनेचे वैचित्र्य आणि आविष्काराची विविधता यामुळे मराठी कवितेची श्रीमंती तर वाढलीच, पण एक समर्थ अशी मुक्तगीताची आणि मुक्तकाव्याची परंपरा मराठी मातीत रुजली. बोलीभाषेतील आदीस्वरूपी काव्याची ती निर्मिती ठरली.

ज्या निवृत्तिनाथांसमोर परमादराने नम्र होऊन ज्ञानेश्वरांनी आपली अलौकिक वाङ्मयसृष्टी निर्माण केली ते निवृत्तिनाथही अभंगनिर्मिती करून आपली भावांजली जणू विठ्ठलासमोर रुजू करतात. सोपान, मुक्ताबाई हीही मागे पडत नाहीत, तेही अभंगनिर्मिती करतात. ज्ञानेश्वरांचे आज जितके वाङ्मय उपलब्ध आहे तसे निवृत्तिनाथ, सोपानदेव आणि मुक्ताईचे उपलब्ध नाही ही वस्तुस्थिती आहे. किंबहुना पौर्णिमेला चांदण्या झाकल्या जाव्या पण चांदण्यांमुळे चंद्र शोभायमान ठरावा तसे ज्ञानेश्वर आणि त्यांची भावंडे यांचे नाते आहे असे वाटत असले तरी ज्ञानेश्वरांचे स्फूर्तिकेंद्र निवृत्तिनाथ आहेत त्यांचा कृपाप्रसाद आणि आज्ञा वचनातून वाङ्मयाची अलौकिक प्रतिसृष्टी ज्ञानेश्वरांनी

निर्माण केली. म्हणून एका अर्थाने निवृत्तिनाथ म्हणजे पांडुरंग पंढरीच्या भागवत धर्माचे चिरंतन असे चित्सूर्य आहेत. की जो कधीच मावळणारा नाही! चैतन्याच्या सूर्याची कृपादृष्टी ज्ञानेश्वरांनी स्वीकारली व भागवत धर्माची वैभवशाली विचारपरंपरा महाराष्ट्रात एका वेगळ्या वळणाने रुजविली. निवृत्तिनाथांचे अतिशय अल्प अभंग आज उपलब्ध आहेत पण त्यावरूनही ज्ञानेश्वरांचे ज्येष्ठ बंधू या दृष्टीनेही लक्षणीय अशी काव्यनिर्मिती त्यांचे हातून झाली आहे.

पंढरपूर विठ्ठल माहात्म्य : आणि संतकवी

निवृत्तिनाथ, जनाबाई, चोखामेळा, सेनान्हावी यांचे तिनशे साडेतिनशेच्या वर अभंग उपलब्ध आहेत तर सोपानदेव, विसोबाखेचर, मुक्ताबाई, चांगदेव, गोराकुंभार, जगमित्रनागा, नरहरी सोनार, सावतामाळी, नारा, महादा, गोंदा, बिटा, आऊबाई, लिंबाई, लाडाई आणि परिसा भागवत यांचे पन्नासचे आत बाहेर इतकेच अभंग उपलब्ध आहेत. ज्ञानदेव नामदेवाची प्रेरणा या अभंगनिर्मितीमागे निश्चितच आहे. निवृत्तिनाथ वगळता सर्व कवींनी ज्ञानेश्वरांचा गौरवपूर्ण उल्लेख केलेला आहे. ज्ञानेश्वरांचे विचार समजावून घेतलेले आहेत आणि ज्ञानेश्वरांनी दिलेली जी शिकवण आहे तिचा पुरस्कार आपल्या आत्माविष्कारातून साधलेला आहे. हे एक समान सूत्र सर्व अभंग वाङ्मयाच्या मुळाशी आहे. दुसरे समान सूत्र म्हणजे जवळ जवळ प्रत्येक कवीने रामकृष्णहरिगोविन्द यांच्या ऐक्याचा केलेला पुरस्कार आणि नामसंकीर्तनाची स्वीकारलेली साधना हेही ज्ञानदेव-नामदेवांचीच शिकवण म्हणून लक्षात घ्यावी लागते. तिसरे समानसूत्र म्हणजे पंढरी माहात्म्य आणि विठ्ठलमूर्तिवर्णनाचे जवळ जवळ सर्व कवींच्या निर्मितीत असलेले सातत्यही लक्षणीय आहे. पंढरीचा विठ्ठल आणि विठ्ठलाचे भक्त जे संतमंडळी त्यांचाही गुणगौरव आणि वैशिष्ट्ये संतकवींनी गायिले आहे. कृष्णभक्ती व कृष्णजीवनातील अनेक नाट्यपूर्ण प्रसंग व कृष्णाने भक्तांचा केलेला उद्धार या भूमिकेतून आत्मोद्धाराची तळमळ अभंगांतून व्यक्त झाली. ज्ञानेश्वर, निवृत्तिनाथ आणि नामदेव यांचे श्रेष्ठभक्त म्हणून उल्लेख अभंगांतून इतर संतांनी केलेला असून संतमहिमा गातांना त्यांचाच गुणगौरव केलेला आहे. व विठ्ठलाच्या खालोखाल वरील संतमंडळींचे अलौकिकत्व व श्रेष्ठ भक्तपण समकालीन कवींनी स्वीकारले होते व त्यांच्या मागोमाग भक्तिमार्गाची वाटचाल आरंभिली होती.

निवृत्तिनाथ, मुक्ताबाई, सोपानदेव, जनाबाई, चोखामेळा यांनी साक्षात केलेले पंढरीमाहात्म्य आणि विठ्ठलमाहात्म्य म्हणजे प्रत्यक्ष आवलोकनातून दृष्टिगोचर पद्धतीने विठ्ठलाचे जाणवलेले जे स्वरूप आहे त्याचेच भावचित्रण वरील कवींनी केले. वरील सर्वच कवींच्या विठ्ठलमूर्तीच्या वर्णनात एक साम्य आहे ते म्हणजे पांडुरंगाची मूर्ती पंढरपूरच्या देवळात जशी दिसते तशी त्यांनी आपल्या भावप्रतीताचा विषय केली आहे. महानुभाव कवितेतही मूर्तिवर्णने येतात ती प्रामुख्याने कृष्णवर्णने असतात व चक्रधर वर्णने असतात. 'मूर्तिप्रकाश' हे काव्य तर चक्रधरांच्या प्रत्यक्षमूर्तीचे चित्र साक्षात करणारे ठरते. अभंग-

कवितेत आलेली विठ्ठलमूर्तीची वर्णने आणि महानुभाव कवितेतील मूर्तिवर्णने यातील साम्य कुतूहल निर्माण करणारे ठरते. 'रुक्मिणी स्वयंवर', 'शिशुपालवध', 'महदंबेचे धवळे', 'उद्धवगीता', 'वछाहरण' या आणि इतर महानुभाव कवींच्या कवितेची साक्ष घेतली तर लक्षात येते की एक सांकेतिकता या कृष्णवर्णनातून डोकावते व चक्रधर म्हणजे कृष्णावतार या भूमिकेतून त्यांची मूर्तिवर्णने साकारतात. आपल्या दैवताविषयीचा कमालीचा आदर आणि उत्कटभक्तिभाव यातूनच तेराव्या शतकातील कवींनी दैवतांची गुणवर्णने, अधिकारवर्णने तर केलीच पण त्याबरोबरच त्यांच्या अभिव्यक्तीतून मूर्तिवर्णनांनीही रूप घेतले. तेराव्या शतकातील वाङ्मयातील एक महत्त्वाचा काव्य प्रकार म्हणून मूर्तिवर्णनांना लक्षात घ्यावे लागते.

ते रूप भीवरे पांडुरंग खरे । पुंडलिक निर्धारे उभे असे
युगे अठ्ठावीस उभा हृषिकेश । पुंडलिका सौरस पुरवित ।।
रूपाचे रूपस विठ्ठल नाम वेध । पंढरीनिवास आत्माराम
पुंडलिक भाग्य वोलके संपूर्ण । दिननिशी कीर्तन विठ्ठल हरि
पाहता साधन विठ्ठल कीर्तन । भक्त संजीवन आत्माराम
विठ्ठल सधर भिवरा ते नीर । नाम निरंतर केशवाचे

असे निवृत्तिनाथांनी म्हटले असून कीर्तनसाधनेतून विठ्ठलस्वरुप वरील सारख्या अनेक अभंगांतून गायिले आहे. बालक्रीडेच्या अभंगात कृष्णबाल्यावरोबर कृष्णाचे ईश्वरीपण व कृपाळूपण यांचाही उल्लेख जवळ जवळ प्रत्येक संतकवींने केलेला आहे. 'देहाच्या दीपकी एकी वस्तु चोख। असोनिया शोक कां करितोसी ।।' किंवा 'कल्पना मासोळी भवजळ-जळी। पाशा चिये जाळी गुंतताहे' किंवा 'दीपाची कळिका दीपी की सामावे। तैसा जीवशिव बोल रवी जो जी। दीप आहे देही तयाचे हे प्रकाश। त्याचेनि सावकारा हरि भजे रया। असे निवृत्तिनाथांनी भक्त आणि ईश्वर यांचे भावनाते सांगितले आहे

देहाचि हिवटी अखंड पै सतेज । चंद्रसूर्य भोज नाही तेथे
नाही तेथे रवि नाही तेथे चंद्र । अवघाचि महेंद्र एकतत्त्वे
दीपकेचि दीपक विस्तार अनेक । अवघाचि त्रैलोक्य एकतत्त्वे
निवृत्ति संपन्न एकतत्त्व सेवी । सर्वत्र गोसावी दिसे आम्हा ---३३७

आत्मा आणि परमात्मा यांची अद्वैतनिष्ठा दीपन्यायाने निवृत्तिनाथांनी स्वीकारली आहे. 'करुणा कल्लोळणी' अशी सृष्टी हरिनामाने तुडुंब भरली असून 'सर्वही आत्मा, आत्मा सर्वत्र' असे या सृष्टीचे स्वरूप आहे. 'जेथे पाहे तेथे व्यापिले अनंते। तयाविण रिते कोण ठाव' असे जीवाशिवाचे अद्वैतीरूप आहे. याच विचाराचा पुरस्कार ज्ञानेश्वरांनी केला व त्याला अखंड परंपरा मिळाली. कळिकेसि ज्योती तेजाने सामावली जावी त्याप्रमाणे ईश्वर आणि जीव यांचे नाते आहे. 'आपणची विश्व आपणची विश्वेश्वर' असे 'अद्वैती' स्वरूप जीवाशिवाचे निवृत्तिनाथांनी स्वीकारले आहे. निवृत्तिनाथ ज्ञानेश्वरांचे

गुरु आहेत, पितृतुल्य असे स्थान ज्ञानेश्वरांच्या जीवनात त्यांचे आहे म्हणून त्यांचा उद्‌गार ज्ञानेश्वरांनी आपल्या वाङ्मयनिर्मितीतून जोपासला व पुढे त्याला अनंतधारा येऊन मिळत गेल्या.

सोपानदेवांच्या अभंगात विठ्ठल माहात्म्य चित्रणात राममहिमा गायिला आहे. 'सोपान संचित रामनामामृत। नित्यता सेवित हरिकथा', 'हरि राम गोविंद नित्य हाचि छंद' असेही त्यांनी म्हटले आहे. सोपानदेवांच्या अल्प अभंगांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यात अद्वैत तत्त्वज्ञानाच्या पुरस्कारापेक्षा नामसंकीर्तनावर विशेष भर दिला गेला आहे व ज्ञानेश्वर निवृत्तिनाथ यांच्याविषयी परमादर व्यक्त झाला आहे.

दुजे पणी ठाव द्वैव ते फेडिले। अद्वैत बिंबले तेजोमय
तेजोकार दिशा बिंबि बिंब एक। निवृत्तीने चोख दाखविले
निमाली वासना बुडाली भावना। गेली ते कल्पना ठाव नाही
सोपान नैश्वर परब्रह्म साचार। सेवितु अपार नाम घोटे॥

आत्मा आणि परमात्म्याची एकात्मता आणि ईश्वराचे चिरंतनत्व याच भूमिकेतून जीवा-शिवाचे ऐक्य सोपानदेवांनी आपल्या अतिशय अल्प अभंग निर्मितीतून मांडलेले आहे.

मुक्ताईची कविता

'निवृत्ति जया नाव, निवृत्ति जया बरव, जया निवृत्तीची राणीव निवृत्तीची' अशा निवृत्तिनाथांच्या भावंडांत मुक्ताबाईचे अमोल कर्तृत्व विलक्षण आहे. वास्तविक निवृत्ती, ज्ञानदेव आणि सोपानदेव यांच्यापेक्षा मुक्ताबाई वयाने लहान पण तिचा अधिकार मात्र त्या कुटुंबात फार मोठा होता. तिने आईच्या मायेने सर्व भावंडांना आधार दिला आणि वाढविले. समाजातील दारुण विद्रोहाला मोठ्या समंजसपणे तोंड देण्यासाठी मुक्ताईनेच सर्व भावंडांची मनोभूमिका तयार केली. आईवडिलांनी देहांत प्रायश्चित घेताच त्याचा व्रण मुक्ताईच्या कोवळ्या तरल मनावर उमटला. वास्तविक एक मुलगी म्हणून ती आपल्या कुटुंबात जगलीच नाही तर अकाली प्रौढपणा तिच्या ठिकाणी आला. संन्याशाची मुले ही शापवाणी तिलाही भोगावी लागली पण त्यासाठी समाजसमूहाने तिला व तिच्याबरोबर तिच्या कुटुंबातील भावंडांना दिलेली शिक्षा अघोरी स्वरूपाची ठरली. मौजबंधनासाठी आपल्या भावंडांची पैठणच्या धर्म आदिपीठापुढे चालू असलेली परीक्षा व त्यात त्यांचा होत असलेला अपमान तिच्या मृदु, कोमल मनाला असह्य होऊ लागला. आईवडिलांच्या छत्राशिवाय एकाकी झालेली ही भावंडे समाजछत्रालाही पारखी झाली आणि खऱ्या अर्थाने वनवासात गावकुसाबाहेर त्यांना जगावे लागले. पतित, भ्रष्ट म्हणून त्यांना जगावे लागले. अल्पवयी अशी ही भावंडे प्रतिकूल परिस्थितीचे आघात भोगत आपला आयुष्यक्रम स्थिरावू बघत होती. जीवन म्हणजे काय हे कळण्यापूर्वीच त्या जीवनाची भयानकता या कुटुंबाला भेडसावू लागली.

तात आणि माता गेलीसे येथून । तेव्हा आम्ही लहान पांडुरंगा
निवृत्ति ज्ञानदेव कोरान्नाचे अन्न । सांभाळी सोपान मजलागी ॥

असे आर्तबोल त्यांच्या तोंडून निघत होते. जीवनातील प्रत्येक क्षणच मुळी या भावंडांना आव्हान देत होता.

यामधूनच निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर, सोपानदेव आणि मुक्ताई यांच्या जीवनदृष्टीला आकार मिळत गेला' स्वभावविशेष स्पष्ट होत गेले आणि त्याचे प्रतिबिंब त्यांच्या काव्यात उमटलेले आहे. लोकसंग्रह करीत विश्व ते मोहरे लावावे। मार्गाधारे वर्तावे। अलौकिक न होआवे लोकांप्रती' ही ज्ञानदेवांनी स्वीकारलेली जीवनदृष्टी निवृत्तिनाथ, सोपानदेव आणि मुक्ताबाई यांचे ठिकाणी फारशी दिसत नसली तरी परमार्थ मार्गावरील वाटचाल अतिशय गांभीर्याने त्यांनीही अनुकारिली होती हे त्यांच्या अभंगांवरून समजू शकते. तशी ही भावंडे स्वेच्छामरणी असल्यामुळे त्यांच्या अल्प अशा आयुष्यातही त्यांनी लोकोत्तर, पारमार्थिक अशी आत्मोन्नती घडवून आणली व आपला 'अक्षरठसा' मराठी साहित्यात अजरामर करून ठेवला. ज्ञानदेवांच्या संजीवन समाधी पाठोपाठच एका वर्षाच्या आत बाहेर या भावंडांचे कुटुंब इहलोक सोडून गेले. पण जाता जाता त्यांनी आपल्या वंशजांना वारसदारांना, मराठी माणसाला 'प्रकाशाचे गाणे' देऊन ठेवले ते कायमचे. जो जीवनभोग या भावंडांना भोगावा लागला त्या भोगालाच त्यांनी आपल्या आचरणाने लाजवले, खाली मान घालावयास लावले. व ही किमया त्यांनी केली ती आपल्या 'अक्षर यात्रेतून.'

चैतन्याचा गाभा

मुक्ताई–ज्ञानेश्वर, मुक्ताई–नामदेव आणि मुक्ताई–चांगदेव यांच्या परस्पर स्नेहातून आणि आध्यात्मिक जीवन जाणिवांच्या मार्गातूनच त्यांची लौकिक वंचना दुर्लक्षणीय अशी झाली. लौकिक जीवनात आपल्यावर शिंतोडे उडविले जाताच ज्ञानेश्वर अस्वस्थ झाले. त्यांनी स्वतःला बंदिस्त करून घेतले. परंतु त्याचेळी त्यांची समजावणी लहानशा मुक्ताईने केली व ते अभंग 'ताटीचे अभंग' म्हणून लौकिक पावलेत. वास्तविक ज्ञानेश्वर म्हणजे ज्ञानसागर असे असूनही मुक्ताईच्या प्रेमळ वात्सल्याची त्यांना ओढ लागली व तिच्यामुळेच पुढे ज्ञानेश्वरांच्या हातून अलौकिक त्रिखंडकीर्ती वाङ्मयरचना झाली. ज्ञानेश्वरांचे जीवनाला आणि साहित्याला वळण लावण्याचे महत्त्वपूर्ण कार्य मुक्ताईने केले. नामदेवांच्या बाबतीतही मुक्ताईने स्पष्ट केलेला दृष्टिकोण सर्वश्रुतच आहे. किंबहुना नामदेवाने तो प्रसंग अतिशय अभिमानाने आपल्या गाथेत वर्णन केला आहे.

उठले निवृत्ति संतांच्या दरुशना । पंढरीचा प्रेमा घरा आला ॥
केली प्रदक्षिणा वंदिले चरण । जाला अभिमान नामयासी ॥
नामा म्हणे काय वंदू यांचे चरण । अंगे परब्रह्म मजपाशी ॥

असे निवृत्तिनाथांपासून सोपानदेवांपर्यंत सर्वांनी नामदेवांच्या वडिलधारेपणाला व विठ्ठल-

भक्तातील शिरोमणीला नमस्कार केला. परंतु हे सर्व बघून मुक्ताई मात्र परखडपणे बोलून गेली--

अखंड जयाला देवाला शेजार । कां रे अहंकार गेला नाही ॥
मान अपमान वाढविसी देवा । दिवस असता दिवा हाती घेसी ॥

'साक्षात् विठ्ठलाजवळ तुझे वास्तव्य असूनही नामदेवा तुझ्या डोळ्यांना आंधळेपण कसे आले ? कल्पवृक्षाच्या छायेत तू राहात असूनही तुझ्या हातात मात्र नरोटीच दिसते ! घरामध्ये तुझ्या कामधेनू असतांना तू मात्र ताक मागण्यासाठी दुसऱ्याचे घरी दारोदार फिरत आहेस, कारण तुझी आत्ममग्न दृष्टी गेलेली नाही. गुरुशिवाय तुला मोक्ष नाही. अहंकाराने तुला बांधून टाकले आहे. म्हणून तू आत्मनिष्ठ हो. तरच तू श्रेष्ठ ज्ञानी होशील ! नामदेवाची अवस्था म्हणजे अमृत टाकून कांजी खाण्यासारखी, पोवळे म्हणून रानगुंजा घेण्यासारखी, ऊसाच्या शेजारी एरंड, कर्पुराच्या शेजारी दीप, समुद्राच्या शेजारी मीठ अशी आहे. 'म्हणे मुक्ताबाई चंदनाचे झाड अहंता सर्प वेढे गुंडाळिले' नामदेवांना चंदनाच्या झाडाची उपमा देऊन त्यांच्याविषयीची गुणग्राहकता मुक्ताबाईने निश्चितच दाखविली आहे.

"म्हणे मुक्ताबाई भाजले की कोरे । काकाचे उत्तर सत्य मानू ॥
गोरा जुनाट पै जुने । हाती थापटने अनुभवाचे ॥"

वडिलधाऱ्या नामदेवाला मुक्ताबाईनेच आत्मदृष्टीची वाट दाखवून त्यासाठी ती गोरोबाकाकांना भेटण्यासाठी आकाश मार्गाने कशी गेली त्याचेही नामदेवाने स्वतः मोठे अद्भूत रमणीय असे वर्णन केले आहे. त्यातूनही त्याला मुक्ताबाईविषयी वाटत असलेला आदर आणि दरारा स्पष्ट होतो व तिच्या लोकोत्तरत्वाची खूण पटते.

मोतियांचा चुरा फेकला अंबरी । बिजुचियापरी कीळ जाले
जरी पितांबरे नेसविली नभा । चैतन्याचा गाभा नीळांबिदू
परी पसरली शून्याकार जाली । सर्पाचित्रे पिली नाचू लागे
कडकडोनि वीज निमाली ठायिचे ठायी । भेटली मुक्ताई गोरोबाला ॥

मुक्ताबाईविषयी नामदेवाची भावना अशी विलक्षण ठरली. वास्तविक ती 'लहानशी मुक्ताई जैशी सणकांडी' अशी होती तरी तिचा अधिकार मात्र मोठा होता. ज्ञानेश्वरांना आणि नामदेवांना काव्याभिमुख करण्यास काही प्रमाणात मुक्ताबाई कारणीभूत झाली आहे. एकीकडे तिने ज्ञानेश्वर नामदेवांसारख्या संतकवींना आधार दिला आणि अशा थोर मोठ्या कवींच्या सहवासात तिला राहता आले. तिची मानसिक बैठकच वेगळी आणि स्वतंत्र असल्यामुळे तिच्या मनाचे रंग तिच्या कवितेत उतरले आहेत. विश्वबंधुत्वासाठी निगडीत असलेले ज्ञानेश्वरांचे मनःनाते त्यांच्या कवितेत उतरले आहे. बंधुत्वाच्या पायावर आणि विवेकपूर्ण जीवन दृष्टीच्या भक्कम पाठबळावर ज्ञानेश्वरांची कविता उभी आहे.

निवृत्ती, ज्ञानदेवांच्या छायेत वाढणारी मुक्ताई वयाने लहान असली तरी मनाने प्रौढ होती. विश्वव्यवहारातील बंधुत्वाला आणि विवेकापेक्षा संपूर्ण विश्वव्यवहारालाच ती तटस्थपणाने न्याहाळण्याचा प्रयत्न करते व त्यात तिला विलक्षण विसंगती जाणवते. त्यामुळे तिची कविता समकालीन इतर संतकवींपेक्षा स्वतंत्र आणि वेगळी ठरली. चांगदेवांसारख्या योगी पुरुषाने मुक्ताईला गुरुपद द्यावे यातच तिच्या लोकविलक्षण व्यक्तित्वाचे आणि कवित्वाचे रहस्य दडलेले आहे.

मुक्ताई जैसी सणकांडी

स्त्रीची सोशिकता, सामाजिक अवहेलना, अकाली आलेले प्रौढत्व संपूर्ण संसाराचा अंगावर पडलेला भार, बालपण विसरून जाऊन आणि शैशव बाजूला सारून मनाने सिद्ध झालेली मुक्ताई जीवन व्यवहाराचा अन्वयार्थ कठोरपणे आणि निर्भिडपणे लावते व तिच्या अभंगांना रूप गोचरता येते. प्रेमळपणाच्या स्निग्धतेने चिंब भिजलेले संतकाव्य मुक्ताईच्या काव्यात काही वेगळेच उमटून जाते. आध्यात्मप्रवणता, मनाची तटस्थता, वृत्तीचा फटकळपणा यांचा स्पष्ट संस्कार मुक्ताबाईच्या मुक्त कवितेत प्रतिबिंबित झाला आहे. म्हणूनच मुक्ताईचे अभंग संख्येने अल्प असूनही गुणवत्तेने अलौकिक ठरले आहेत.

ताटीच्या अभंगात मुक्ताईने ज्ञानेश्वरांच्या कर्तृत्वाचा योग्य पडताळा जाणून त्यांच्या संतपणाला जागृत केले आहे. एका अर्थाने ज्ञानेश्वरांना दिलेली ती आध्यात्मिक समजच आहे. लौकिक जीवनातील सामाजिक अपमानाने कोमेजून गेलेले ज्ञानेश्वरांचे मन वात्सल्याची फुंकर घालून आणि मायेचा विंझणवारा घालून पुनः टवटवीत करण्याचे काम मुक्ताबाईने 'ताटीच्या अभंगात' केले. अथांग, समतोल असे ज्ञानेश्वरांचे मन ज्यावेळी संतुलन गमावून बसले त्यावेळी मुक्ताबाईने 'संतपणा'ची जाणीव ज्ञानेश्वरांना करून दिली.

योगी पावन मनाचा । साही अपराध जनांचा
विश्व रागे झाले वन्ही । संत सुखे व्हावे पाणी
शद्बशस्त्रे झाले क्लेश । संती मानावा उपदेश
विश्वपट ब्रह्मदोरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा

सर्वसामान्य माणूस आणि समाज यांच्या आघातांनी संताने पिचून न जाता समाजाचे आघात सोसत असतानाच त्याने मनाची समचित्तता ढळू देता उपयोगी नाही. संपूर्ण जग पेटून उठले तर संतसख्याने पाणी होऊन विश्वाला शांत करावे. समाजाच्या वाक्-ताडनाने क्लेश होत असले तरी संताने तो उपदेश म्हणून ग्रहण करावा. कारण संताच्या दृष्टीने ब्रह्मरूपी दोऱ्याने विश्वरूपी पट एकरूप करायचे ध्येय त्याच्या डोळ्यांसमोर असते. समाजातील अनन्वित छळाने ज्ञानेश्वर क्षणकाल का होईना, संतपणापेक्षा आपले माणूसपण सांभाळीत असतानाच मुक्ताईने त्यांना त्यांच्या संतपणाची जाणीव करून दिली आहे, वास्तविक मुक्ताई सर्वसाधारणपणे 'संत' कुणाला म्हणावे व त्याचे जीवनकार्य काय? या संदर्भात बोलते आहे :

संत तेचि जाण जगी । दया क्षमा ज्यांचे अंगी
लोक अहंता नये मना । जगी विरक्त तेचि जाणा
इह परलोक सुखी । शुद्ध ज्ञान ज्यांचे मुखी
मिथ्या कल्पना मागे सारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।

मिथ्या कल्पना, लोभ, अहंता यांना मागे सारून जे दया, क्षमा, विरक्ती यांच्यासह शुद्ध ज्ञानाचा आविष्कार करतात तेच इहपरलोकी सुखी होतात असा उपदेश दुःखी झालेल्या ज्ञानेश्वरांना मुक्ताई करते.

अवघें साधन हातवटी । मोले मिळत नाही हाटी
कोणी कोणा शिकवावे । साद शोधूनिया घ्यावे
लडिवाळ मुक्ताबाई । जीव मुद्दल ठायीचे ठायी
तुम्ही तरूनी विश्व तारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।

या ठिकाणी मुक्ताबाईने आपल्या अधिकाराची जाणीव ज्ञानेश्वरांना करून दिली आहे व कुणी कुणाला शिकवावे? असा प्रश्न करून 'तुम्ही तरुनी विश्व तारा' असा संदेश दिला आहे. एका प्रत्यक्ष अवलोकनाच्या पार्श्वभूमीवर ज्ञानेश्वर मुक्ताबाई यांच्यातील भावसंबंध 'ताटीचे अभंग' यामधून व्यक्त झाले आहेत. मुक्ताबाई व ज्ञानेश्वरांच्या आध्यात्मिक कर्तृत्वाविषयीचा विलक्षण अभिमान आणि अस्वस्थ झालेल्या ज्ञानेश्वरांविषयचा कळवळा या दोन्ही भावनांचे मिश्रण ताटीच्या अभंगात झाले आहे. मुक्ताबाईच्या ठिकाणची समधातता, वृत्तीतील गांभीर्य आणि बंधुविषयीचा वात्सल्य उमाळा यांचे सांद्र प्रतिबिंब ताटीच्या अभंगात उमटले आहे. वास्तविक रुसून बसलेल्या ज्ञानेश्वरांची समजावणी मुक्ताबाई करीत आहे. परंतु तीतूनच एक अनन्यसाधारण पारमार्थिक तत्त्वचिंतन साक्षात झाले आहे. रचनेत स्वाभाविकता असूनही व्याकूळ होणारे मुक्ताबाईचे मन त्यातून स्रवत असते. ज्याच्या साह्याने जीवनातील भयानक गळचेपी सुसह्य करावयाची तोच जर रुसून बसला तर अखेर या विश्वात बंधुत्वाचा पुरस्कार कोण करणार? शुद्ध ज्ञानाची अभिव्यक्ती कोण करणार? हीच खंत ताटीच्या अभंगातून व्यक्त होते.

समचित्त मुक्ताई

'पंढरी माहात्म्य', 'नामपर', 'संतपर', 'उपदेशपर', 'कूटात्म' आणि 'मुक्ताबाई चांगदेव संवाद' असेही मुक्ताबाईचे अभंग सकल संतगाथेत एकत्रित केलेले आहेत. त्यातून भागवत संप्रदायाची जी कविता आहे तिचेच वळण आणि विषय मुक्ताबाईने स्वीकारले आहेत. नामसंकीर्तनासाठी हरिपाठाची रचना मुक्ताईने केली आहे. सगुणो पासनेतील चोखाळपण निवृत्तीने मला दाखविले अशी तिची भावना आहे. हरिपाठाच्या साह्याने विठ्ठलचरणी समरस होताना मुक्ताई चिंतनातूनच पुनः मुक्तही होते.

शून्याकारते पाही तंव शून्य तेही नाही । पाहाते पाहोपण ठाय ठेविले ।।
...प्रकृति निर्गुण प्रकृति सगुण । दोंपे दीप पूर्ण एका तत्त्वे ।।

...हरिविण मुक्त न करि तो सर्वदा । संसार आपण भाव तोडी ॥
...मुक्ताई मुक्तलग सांडिली वासना । मुक्तामुक्ती राणा हरिपाठे ॥
मुक्ताई जीवन्मुक्त हा संसार । हरि पारावार आम्हीं केला ॥

या उपदेशपर अभंगातील सूक्ष्मता लक्षणीय आहे. त्यातही जीवनमुक्त मुक्ताईने संसाराची बंधने सोडून हरीचाच पारावार आम्ही स्वीकारला आहे असे ती म्हणते. यातील तिच्या लौकिक जीवनातील मुक्तता आणि सर्वसंगाविषयीची उदासिनताच स्पष्ट होते. 'मुक्त' या शब्दाची प्रत्येक अभंगातून असलेली उपस्थिती मुक्ताईच्या जीवनदृष्टीची साक्ष पटविते. ती म्हणते 'मुक्तता पूर्णता मुक्ताई साधिली । साधना दिधली चांगयासी' चांगदेवाला दिलेली साधना आणि पूर्णमुक्तता मिळाल्यामुळे समचित्त झालेली मुक्ताई हे दर्शन मोठे विलोभनीय ठरते. निवृत्तिनाथ आणि ज्ञानेश्वर यांच्या अभंगातील सगुण–निर्गुणता आणि हरिपाठातील हरिहरैक्य यांचा मोठा संस्कार मुक्ताईंच्या रचनेवर उमटला आहे. किंबहुना मुक्ताईच्या अभंगातून निवृत्तिनाथ आणि ज्ञानेश्वर यांचेच मनोगत व्यक्त होत असते. निवृत्ती, ज्ञानेश्वर, सोपान आणि मुक्ताई ही देहधर्माने भिन्न भासत असली तरी त्यांचा आध्यात्मिक जीवनानुभव हा प्रचितींनी पूर्ण असून तीच सर्वांच्या जीवनाच मूलाधार ठरला. ज्ञानेश्वर-निवृत्तिनाथांना जे जाणवले तेच मुक्ताईनेही आपल्या अभंगातून अधोरेखित केले, परंतु त्याची अभिव्यक्ती मात्र खास मुक्ताईची राहिली. तिची चिकित्सक दृष्टी, ज्ञानतृष्णा, वृत्तिगांभीर्य, आत्ममग्नता आणि केवळ आत्मनिष्ठ पद्धतीने घेतलेला जीवनानुभव ज्ञानेश्वर-निवृत्तिनाथांच्या विचार–संस्कारांसह स्वतंत्रपणे व मुक्तपणे अभिव्यक्त होतो. उदा.

मुक्तलग चित्ते मुक्त पै सर्वदा । रामकृष्ण गोविंदा वाचे नित्य
हरि हरि छंदु तोडी भवकंदु । नित्य नामानंदु जपे रया
सर्वत्र रुपडे भरलेसे दृश्य । ज्ञाता ज्ञेय भासे हरिमाजी
मुक्ताई सधन हरिरूप चित्ती । संसार समाप्ति हरिच्या नामे ॥

निवृत्तिनाथ आणि ज्ञानेश्वर यांच्या अध्यात्मजीवनाचा संस्कार मुक्ताबाईवर होत असतानाच चांगदेव वटेश्वराने तिचे शिष्यत्व स्वीकारलेले होते. चांगदेव म्हणजे मूलतः जीवन्मुक्त सिद्धपुरुष. ज्ञानवृद्ध आणि वयोवृद्ध महामुनी ! त्यांनी एक प्रश्नमालाच मुक्ताईपुढे ठेवली व त्या प्रश्नांची उत्तरे सहजसिद्ध मुक्ताईने दिली. त्या अभंगांना मुक्ताई-चांगदेव संवादरुप आले आहे.

बंधन नाही आणि बद्धही नाही, सुखदुःख नाही आणि पापपुण्यही नाही, मोक्षही नाही आणि भवबंधनही नाही अशा अवस्थेत भ्रमिस्त चांगदेवास मुक्ता ही मोक्षमार्ग दाखविते. इतकेच नव्हे तर लहान बाळाला समजावून सांगावे त्याप्रमाणे मुक्ताई चांगदेव बाळाला समजाविते. त्याला पाळणागीत म्हणते, त्याला जोजाविते, अनुहात टाळी वाजवून त्याला हर्षनिर्भर करते. निःशब्दाची अनुहात ओवी त्याच्यासाठी गाते.

अविनाश पाळणा अव्यक्ते विणिला । तेथे पहुडला योगिराज
जो जो जो जो म्हणतसे माया । साकारातीत निजरे चांगया
सोहं सोहं षट्चक्रन्यासे । तज परिये देता मीच न दिसे
ऐशी निद्रा तुज लागो दे पुत्रा । मुक्ताई खेचरा उपदेशी मंत्रा ।।

चांगया बाळासाठी उपदेश मंत्राचा पाळणा सजवून मुक्ताई गाऊ लागते. मुक्ताईच्या आध्यात्मिक अनुभूती चांगदेवाला शिष्य आणि बाळ कल्पून व्यक्त झाल्या आहेत. चांगदेव मुक्ताई संवादातून त्यांचे मातृबाळनाते अधिक उजळून निघते पण मुक्ताईच्या कूटरचनेची गोष्ट मात्र वेगळी आहे.

कूट रचना

मुक्ताबाईच्या अभंगरचनेत दोनच रचना कूट म्हणून वेगळ्या काढल्या तरी मुक्ताईच्या एकूण सर्वच रचनेत गूढात्मकता उतरली आहे. अध्यात्माची प्रतीती येताच ती शब्दात पकडू जाता कूटरचना निर्माण होते. सर्वच संतकवींनी कूटरचना निर्माण केली आहे. तत्त्वविचारांना आत्मप्रत्ययातून व्यक्त करू जाता त्यांची परिभाषा बदलते व विलक्षण बौद्धिक पातळीवरून आशय गोचर होऊ लागतो. कवीच्या मनातील एक विशिष्ट अभिप्राय वेगळ्याच गूढ अशा शब्दांतून व्यक्त केला जातो त्याला 'कूट' असे म्हटले गेले आहे.

मुंगी उडाली आकशी । तिने गिळिले सूर्याशी ।।
थोर नवलाव जाहला । वांझे पुत्र प्रसवला ।।
विंचू पाताळाशी जाय । शेष माथा वंदि पाय
माशी व्याली घार झाली । देखोन मक्ताई हसली ।।

एका उत्कट पण परस्पर विरुद्ध अनुभूतीची बंदिश मुक्ताबाईने येथे साधली आहे. एका अघटित अशा सत्याला वरील अभंगात जन्म मिळतो. विश्वातील विसंगती; अपरिहार्यता आणि अशक्यप्रायता यातील ताण अतिशय उपरोधात्मरीतीने व्यक्त होतो. एका चमत्कृतिपूर्ण रचनेला त्यात जन्म मिळतो. अतिशय तेजस्वी व सर्व प्रकाशमान सूर्यास मुंगीने गिळून टाकले. त्यासाठी तिने आकाशात उडत जाणे ही कल्पनाच खूप चमत्कृतिजन्य व अशक्य कोटीतील असते. तसेच वांझेला पुत्र व्हावा किंवा विंचवाने पाताळापर्यंत जाऊन शेषाला वंदन करावे किंवा माशी प्रसूत होऊन तिला घार व्हावी असे विश्वात अघटीत घडू लागताच त्याकडे बघून मुक्ताबाई मात्र अतिशय तटस्थपणे हसत असते. लौकिक जीवन जगत असताही त्यापासून तटस्थ होत गेलेली मुक्ताई विश्वविसंगतीतील समतोल पुनः आपल्या मूळ रचनेतून न्याहाळू बघते.

जीवनाची वैयर्थता, सामान्यपण यःकश्चितता आणि त्या दृष्टीने ईश्वराचे कर्तृत्व अशक्याचे शक्ततेतही होणारे रूपांतर या प्रचंड ताण्याबाण्याच्या संदर्भात जीवनाचे आकलन मुक्ताईला झाले आहे. 'योगी पावन मनाचा, तांटी उघडा ज्ञानेश्वरा, असे

अतिशय आर्ततेने म्हणणारी मुक्ताई कणखर आणि फटकळ मुक्ताबाई विश्वचमत्काराने अतिशय कडवटपणाने हसते आहे. तिचे हे हसणे अभंगाला तर गहिरा रंग चढवितेच पण तिच्या हसण्यातून तिच्या आणि तिच्या भावंडांवर झालेल्या अन्यायाची टोकदार बोच आहे, व्याकुळता आहे. त्या भावंडांच्या वाट्याला आलेले दुःखभोग आहेत. मातापित्यांच्या देहांत प्रायश्चित्ताची ओली जखम आहे आणि या सर्वांतून अतर्क्य गोष्टी घडतील पण आमच्यावर झालेल्या अन्यायाला पर्याय नाही याविषयीची विकल जाणीव मुक्ताबाईच्या हसण्यातून व्यक्त होते. महाभारतात द्रौपदीही अशीच दुर्योधनाला पाहून हसली होती व त्यातून संपूर्ण महाभारत घडले. तीही मनस्वी स्त्री होती मुक्ताबाईही अतिशय मनस्वी स्वभावाची पण आईच्या मायेने भावंडांना सांभाळणारी अशी स्त्री होती.

ज्ञानेश्वर-नामदेव आणि चांगदेव या तिन्ही आचार्यांना मार्गदर्शन करणाऱ्या व ते मार्गदर्शन आनंदाने स्वीकारण्यात धन्यता मानण्यातच मुक्ताबाईचे अलौकिक व्यक्तिमत्वाचे सार एकवटलेले आहे. ती जितकी प्रेमळ आहे तितकीच फटकळ आहे. जितकी मीतभाषिणी आहे तितकीच खोचदार बोलणारी आहे. जितकी कनवाळू आहे तितकीच रागीट आहे. वयोमान हा तिच्यापुढील गुणभाजक नव्हे, तर वाट चुकलेल्यांना सन्मार्गावर आणण्यासाठी प्रसंगी तिने कैकाडपणही स्वीकारले. परंतु तिच्या हृदयाच्या तळाशी होती ती प्रचंड माया. उत्कट स्त्रीभाव आणि विलक्षण ऋजुता याच व्यक्ती विशेषांचे प्रतिबिंब तिच्या अल्प पण गुणवंती कवितेत उमटले गेले व तिची कविता चिरंतन झाली. मराठी साहित्याच्या कविकुलगुरुवरही अधिसत्ता गाजविणारी मुक्ताई, भक्तशिरोमणी नामदेवावर अधिकार गाजविणारी मुक्ताई आणि चांगदेवासारख्या योग्याची गुरु होऊन अधिकार गाजविणारी मुक्ताई मनाने मात्र प्रांजळ आणि लौकिक जीवनमुक्तच ठरली नाही का ?

'निर्गुणाची सेज सगुणाची बाज' अशावर केशीराज पहुडले आहेत असे मुक्ताबाई म्हणते व सगुण-निर्गुणातील अशी परमात्म्याची प्रतीती गोचर करते. ज्ञाता आणि ज्ञेय हरिच आहे. 'मुक्तलग चित्रे मुक्त पै सर्वदा । रामकृष्ण गोविंदा वाचे नित्य' असा असून 'हरि हरि छंदु तोडी भवकंदु' करून 'सर्वत्र रुपडे भरलेसे दृश्य' अशी ईश्वराची सर्वात्म प्रचीती गोचर करते. कोवळ्या वयात तिला अध्यात्माचा अधिकार प्राप्त झाला होता. नामदेवाने मुक्ताचे वर्णन 'मोतियांचा चुरा फेकिला अंबरी, विजूचिया परी कीळ झाले' असे केले आहे. मुक्ताबाई-चांगदेव संवादातही तिच्या आध्यात्मिक अधिकाराची श्रेणी आणि समकालीन संतांवर व विशेषतः भावंडांवर जी प्रभावी आणि प्रेमळ जरब आहे त्याचे दर्शन घडते.

जनाबाईचे वेगळेपण

जनाबाईच्या अभंगात अनेक परिवर्तने आहेत. तिची उत्कटता आणि नामदेव-ज्ञानेश्वराविषयीचा जिव्हाळा व त्यांचे संस्कार बघण्यासारखे आहेत. जनाबाईचे भावविव्हळ मन व भक्तीने ईश्वराला प्रसन्न करून घेण्यासाठी तिची चाललेली तगमग यांचे स्पष्ट चित्र जनाबाईच्या अभंगात व्यक्त होते.

पाय जोडुनि विटेवरी । कटी हात उभा हरी
रूप सावळे सुंदर । कानी कुंडल मनोहर
सोनसळा वैजयंती । पुढे गोपाळ नाचती
गरुड पारी सन्मुख उभा । जनी म्हणे धन्य शोभा —२७०
. , . कर ठेऊनि कटावरी । उभा राहिला विटेवरी
मुगट घातला सिरी । कलगी खोविली वरी
पितांबर नेसुनिया पिवळा । गळा पै तुळशीच्या माळा ।
की रूपसंदर सावळा । तेज झळके झळाळा —३३८

असे विठ्ठलाचे मूर्तिवर्णन जनाबाई करते. नामदेवाच्या कुटुंबात राहिली असल्यामुळे जनाबाईवर नामदेवाचा परिणाम होणे सहज शक्य आहे आणि तसा तो झालेलाही आहे. विशेषतः भावसंकीर्तनाचे अभंग, करूणमनाचे अभंग, संतस्तुती, बालक्रीडेचे अभंग, ज्ञानेश्वर स्तुती या विभागातील अभंगावर नामदेवाची छाप चांगलीच जाणवते. विविध भावभावनांचे न्यास साक्षात करणे हे जनाबाईच्या कवितेचे वैशिष्ट्य आहे. उत्कट भावनांचा सहजाविष्कार नैसर्गिक आणि स्वाभाविकपणे तिच्या काव्यवाणीतून घडतो. 'अरे विठ्या अरे विठ्या मूळ मायेच्या कारट्या' असे विठ्ठलाला बोल लावणारी जनी 'विठो माझा लेकुरवाळा । संगे लेकुरांचा मेळा ॥' अशा त्याच्या परिवाराचा निर्देश करते. ईश्वर प्रसन्न होत नाही म्हणून त्याला अनंत बिरुदांची आठवण करून देते.

गंगा गेली सिंधूपाशी । त्याने अव्हेरिले तिसी
तरी ते सांगावे कवणाला । ऐसे बोले बा विठ्ठला
जळ कोपे जळचरा । माता अव्हेरी लेकुरा
जनी म्हणे शरण आले । अव्हेरिता ब्रीद गेले ॥ ३८
. . . आम्ही जावे कवण्या ठाया । न बोलसी पंढरीराया
. . . राजाई गोणाई । अखंडित तुझे पायी
नीच म्हणोनि बाहेरी । मज ठेवियले द्वारी ॥ —६७

जनाबाईची आर्तावस्था वरील अभंगातून दिसते व नामदेवाप्रमाणेच स्वजनांचा ईश्वर-भक्तीतील विरोधात आणि लौकिक नीच जातीच्या शापामुळे होरपळून गेलेली जनाबाई वरील अभंगातून लक्षात येते. वस्तुतः ईश्वराला तिने व्यक्तित्व दिले आहे तो नित्यनैमित्तिक कर्मात तिला नित्यदिनी मदत करू लागतो. अशा वेळी जनाबाई हरखून जाते. 'देव भावाचा लंगट,' 'देव भक्तांचा अंकित,' 'चोखा मेळा संत भला त्याने देव भुलविला' असे विठ्ठलाचे आणि त्याच्या भक्तांचे नाते होते. नामदेवाने 'लपलासी तरी नाम कुठे नेसी' असे विठ्ठलाला म्हटले होते तर जनाबाई म्हणते–

माझा लोभ नाही देवा । तुझी करी ना मी सेवा
नाही अंगी थोरपण । मिथ्या धरिसी गुमान

रागा येऊनि काय करिसी । तुझे बळ आम्हापासी
नाही सामर्थ्य तुज हरी । जनी म्हणे धरिला चोरी —९९
. . . देव भक्तांचा अंकित । कामे त्याची सदा करीत

असे हे नाते जिव्हाळ्याने, प्रेमाने, करुणेने, वात्सल्याने पराकोटीचे एकरूप झालेले, एकजीव झालेले प्रत्येक संताच्या कवितेतून डोकावते. 'ज्याचा सखा हरि त्यावरी विश्व कृपा करी' असे ईश्वराचे कर्तृत्व असून त्याचे स्वरूप 'पक्षी जाय दिगंतरा। बालकासी आणी चारा। घार हिंडते आकाशी झाप घाली पिल्लापाशी' असे असते. जनाबाईच्या अभंगात तत्कालाचा चालताबोलता इतिहासच रूपवंत होतो. विविध जाती-जमातींतील भक्तांचा उद्धार ईश्वर कसा करतो व मी त्याला का दिसले नाही याचाही ती मनोमन हिशेब मांडते.

'स्त्री जन्म म्हणऊनी न व्हावे उदास । साधुसंता ऐसे केले जनी
संतांचे घरची दासी मी अंकित । विठोबाने दिली प्रेमकळा
. . . सखा विरळा ज्ञानेश्वर । नामयाचे जो जिव्हार ॥

असे म्हणून ज्ञानदेव नामदेवांच्या उत्कट मैत्रीवरही जनाबाई प्रकाश टाकते. जनाबाईच्या अभंगात समकालीन संतांची व विशेषतः नामदेव ज्ञानदेवाचे चरित्रचित्रण आलेले आहे. 'संत हे कोण, तरी देवाचे हे डोळे' असे जनाबाई म्हणते. ज्ञानेश्वरांविषयी तिच्या मनात कमालीची आदरभावना आहे.

ज्ञानाचा सागर । सखा माझा ज्ञानेश्वर
मरोनिया जावे । वा माझ्या पोटी यावे
ऐसे करी माझ्या भावा । सख्या माझ्या ज्ञानदेवा
जावे वोवाळुनी । जन्मोजन्मी दासी जनी ॥ —२६८
सदाशिवाचा अवतार । स्वामी निवृत्ति दातार
महाविष्णूचा अवतार । सखा माझा ज्ञानेश्वर
ब्रह्मा सोपान तो झाला । भक्ता आनंद वर्तला
आदिशक्ती मुक्ताबाई । दासी जनी लागे पायी —२७२

या शब्दात चारही भावंडांचे आध्यात्मिक अधिकार जनाबाईने टिपले आहेत. सेना न्हावी आणि नामदेवाचे चरित्रही जनाबाईने गायिले आहे. नामदेवाच्या गृहजीवनाचा आणि भावजीवनाचा आलेख जनाबाईच्या अभंगातून मिळतो. 'गाणे गाती प्रकाशाचे' असे ज्ञानेश्वराच्या कवितेविषयी नामदेवाचे उद्‌गार आहेत तर विरळा असा सखा असलेला ज्ञानेश्वर नामदेवाचे जीवीचे जिव्हार आहे हे जनाबाईच्या अभंगावरून समजते.

तिच्या मानसिक आणि आध्यात्मिक परिवर्तनाची साक्ष तिच्या अभंगातून व्यक्त होतेच पण त्याबरोबरच स्त्री असून दासीपणाची उपाधी स्वीकारूनही एक आनंदसोहळा ती अभंगातून रूपवान करते आणि तल्लिनतेने त्यातच दंग होते. तिच्या अभंगातील सहजता आणि

स्वाभाविकता, प्रतिमासृष्टीचे स्त्री-जीवन तपशीलातून झालेले प्रगटीकरण, उत्कट आर्त भक्तिपरता आणि ईश्वरी साक्षात्काराने दिपून गेलेली जनाई या साऱ्या विविध मनोभाव व्यक्त करणाऱ्या पातळ्या लक्षवेधी होतात. तिने भक्तगणांविषयी ऐतिहासिक माहिती पुरविली. नामदेवाच्या संसार जीवनाचे चित्रण केले. ज्ञानेश्वर आणि भावंडांचे जीवनातील वैशिष्ट्य ठळकपणे सांगितले आणि ईश्वराला मुळी एक जिवंत आणि साजिवंत व्यक्तिमत्त्व दिले. वास्तव भीषण जीवन जगत असताही तेराव्या शतकातील संतांनी आपल्याच आत्माविष्काराची फुंकर आणि शिडकावा आपल्या लौकिक जीवनावर टाकला आणि ते सुसह्य केले. नाकारलेले जीवन भक्तिमयतेतून स्वरूपसंपन्न केले आणि ईश्वरभक्तीचा आदर्श निर्माण केला. लौकिक जीवनातील संघर्ष, हर्षामर्षाचे क्षण, दुःखभोगाची पराकोटी किंवा सामाजिक बहिष्काराची झळ त्यांच्या अलौकिक सृष्टीला मुळी छेदूच शकली नाही. तटस्थपणाने लौकिक जीवनाला त्यांनी न्याहाळले आणि त्याच्यावरच जय मिळविला. लौकिक जीवन जगणारी व्यक्तिमत्त्वे आणि काव्यनिर्मिती करणारी व्यक्तित्वे यांचे जणू पृथक अस्तित्वच उरू नये इतकी निरामय दृष्टीने सर्व संतांनी ऐहिकाला वरचेवर झेलले व त्याच्याजवळच न थांबता भक्तिमार्गाची दिंडी ज्यांनी पुढे नेली ती शतकानुशतके अजूनही जात राहिली आहे.

जनाईच्या कवितेतील भावनाट्य

जनाबाईंच्या कवितेने नामदेवांच्या कवितेचा संस्कार स्वीकारला पण तरीही तिची स्त्रीदृष्टी त्यातून व्यक्त झालीच आहे. तिच्या भावविश्वात कृष्णाचे बाल्य, शैशव, त्याच्या खोड्या, त्याचा पाळणा, अंगाई, थाळीपाक, यांना एक विशिष्ट महत्त्व आहे. स्त्रीचा वात्सल्यभाव आणि प्रेमातील उत्कटता यांचे मनोज्ञ दर्शन जनाबाईच्या सर्वच अभंगांतून घडते. विठ्ठलाशी तिचे विविध पातळ्यांवरून भांडण चालू असते, रुसणे फुगणे चालू असते, कधी गट्टीफू झालेली असते, कधी निवांत मातृभावेने विठ्ठलाला जनाबाई जोजवीत असते. कधी अंगाईगीत गात असते. पाळणा म्हणत असते, या सर्व वात्सल्यात स्त्रीसुलभ भावनाविष्कार उमटलेला असतो.

माझे अचडे बचडे छकुडे राधे रुपडे । पांघरू घालिती कुंचडे
हरि माझा गे सावळा । पायी पैजण वाजे खुळखुळा
याने भुलविल्या गोपी बाळा । हरि माझा गे नेणता
करी त्रिभुवनाचा घोंगता । जो का नांदे त्रिभवनी । ऐसे देवाजीचे गडी
पेंद्या सुदामाची जोडी । बळिभद्र त्याचा गडी । जनी म्हणे तू चक्रपाणी
खेळ खेळतो वृन्दावनी । लुब्ध झाल्या त्या गौळणी —३५७

असे जनाबाई कृष्णाचे बाल्य, शैशव आणि तारुण्यही तितक्याच निरागसपणे व्यक्त करते :

नवल वर्तले नवल वर्तले । साखर पेरूनी उस काढीला
कान झाला डोळा । निबर बायको तान्हा नवरा सासरा तो भोळा
डोहामाजी मासोळीने वाचविले जीवना । नवल वर्तले नवल वर्तले
अनाम चक्रपाणी । गोकुळ चोरूनी नेले तेथे कैची दासी जनी ।। ३३९

अशी कूटात्म आणि काहीशी विनोदगर्भ निर्मितीही जनाबाईची आहे.

खंडेराया तुज करिते नवसु । मरू दे रे सासू खंडेराया
सासू मेल्यावरी तुटेल आसरा । मरू दे सासरा खंडेराया
सासरा मेलिया होईल आनंद । मरू दे नणंद खंडेराया
नणंद मरता होईल मोकळी । गळा घालीन झोळी भंडाराची
जनी म्हणे खंडो अवघे मरो दे । एकटी राहू दे पायापाशी ––३४०

वरील अभंगातून वास्तव जीवनापेक्षाही विठ्ठलभक्तीचे जनाबाईला लागलेले प्रेमपिसेच ठळकपणे स्पष्ट होत जाते.

मुक्त मनाच्या संतांची मांदियाळी

नारा, विठा, महादा, गोंदा, आऊबाई, लिंबाई, परसा भागवत यांचे अभंग अतिशय अल्प असून त्यातून त्यांचे उत्कट मनाचेच दर्शन घडत जाते. नामदेव ज्ञानेश्वरांच्या अभंगगाथेत रूपकाश्रयी आणि भारुडात्मक लोकसंस्कृतीशी नाते असलेले अभंग आहेत तसे वरील कोणत्याच कवीने रचलेले नाहीत, ही बाबही ज्ञानदेव नामदेव यांच्या कर्तृत्वावर प्रकाश टाकणारी ठरते. कवयित्रींनीही लक्षणीय अशी अनेकपदरी रुपकाश्रमी रचना केलेली नाही. तसेच त्यांच्या अभंगरचनेत जवळजवळ अनेक ठिकाणी नामदेवाचा विशेष संदर्भाने उल्लेख आलेला आहे. उदा. गोरा कुंभार म्हणतो.

सरितेचा ओघ सागरी आटला । विदेही भेटला मनामन
कवणाचे सांगाने । पुसावया कवणाते । सांगतो ऐक ते तेथे कैचे
नाही दिवस राती । नाही कुळ याती । नाही माया भ्रांती अवघेची ।
म्हणे गोराकुंभार परियेसी नामदेवा सापडला ठेवा विश्रांतीचा–६
कसे बोलणे कैसे चालणे । परब्रह्मी राहणे असे नामा
म्हणे गोराकुंभार अनुभवित जाणे । आव्हाने राशी राहणे असे नामा

गोरा कुंभारचे केवळ वीस अभंग आज उपलब्ध असले तरी त्याचे संतमेळ्यातील स्थान फार आदराचे होते. नामदेवाचा अहंकार कमी करण्यासाठी गोरोबाकाकाने थापटण्याने त्याला थापटले होते 'गोरा म्हणे कोरा राहिलो गे बाई' असे नामदेवाविषयीचे त्याचे उद्‌गार होते. ' देवा तुझा मी कुंभार । नासी पापाचे डोंगर ' हीच केवळ गोरोबाची खंत आहे.

नरहरी सोनाराची कविताही अल्पच उपलब्ध आहे. तीत त्याच्या आध्यात्मिक जीवनाचे पडसाद उमटले आहेत.

नव्हे ते सगुण नव्हे ते निर्गुण । जाणती हे खूण तत्त्वज्ञानी
आहे हे अंबर निःशब्द निराळ । अद्वय केवळ जैसे तैसे
म्हणे नरहरी सोनार तै क्षर ना अक्षर । परेहुनी परात्पर ब्रह्म जैसे

सगुणनिर्गुण आणि क्षराक्षरापलीकडे असलेले परतत्त्व म्हणजे ब्रह्मतत्त्व होय ही ज्ञानेश्वरांचीच आध्यात्मिक भूमिका नरहरीने स्वीकारली आहे. त्याच्या कवितेत आर्तता आणि ईश्वरभेटीची उत्कट आकांक्षा आहे.

देवा तुझा मी सोनार । तुझे नामाचा व्यवहार
देह बागेसरी जाणे अंतरात्मा नाम सोने । त्रिगुणाची करूनि मूस
आत ओतिला ब्रह्मरस । जीवशिव करुनी फुंकी । रात्रंदिवस ठोकाठोकी
विवेक हातवडा घेऊनि । कामक्रोध केला चूर्ण । मनबुद्धीची कातरी
रामनाम सोने चोरी । ज्ञान ताजवा घेऊनी हाती । दोन्ही अक्षरे जोखिती
खांद्या वाहोनी पोतडी । उतरला पैल थडी । नरहरी सोनार हरीचा दास
भजन करी रात्रंदिवस ॥१२॥

लौकिक व्यवहारातील रूपकातून आध्यात्मिक अन्वय ईश्वरी साक्षात्काराचा नरहरी सोनाराने लावला आहे. तर **सावता माळयाने**

कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी
लसूण मिरची कोथिंबीर । अवघा झाला माझा हरी
मोट नाडा विहीर दोरी । अवघी व्यापिली पंढरी
सावता म्हणे केला मळा । विठ्ठल पायी गोविला गळा
आमची माळीयाची जात शेत लावू बागाईत
आम्हा हाती मोट नाडा । पाणी जाते फुलझाडा
शांतिशेवंती फुलली । प्रेम जाईजुई व्याळी
सावताने केला मळा । विठ्ठल देखियला डोळा ॥

आपल्या कामधंद्यातील प्रतिमानांनी भक्तिमार्गाचा मळा शिंपला. जीवनव्यवहारातील तपशील स्वीकारून त्यातून भगवद्भक्तीचा मार्ग जो ज्ञानदेवनामदेवांनी घालून दिला त्या मार्गाने जाणारी अशीच ही वाटचाल आहे. मनाचे स्वातंत्र्य आणि आविष्काराचे स्वातंत्र्य मनमुक्तपणे अभंगकवींनी आविष्कृत केले. 'नामाचिया बळे न भीऊ सर्वथा ! कळीकाळाच्या माथा सोटे मारू' असे सावतामाळी निसंकोचपणे म्हणू शकतो इतकी आध्यात्मिक स्वरूपाची मुक्तावस्था सर्व कवींना मिळाली. आविष्काराच्या दृष्टीने ते स्वतंत्र झाले पण विठ्ठलाने त्यांना परतंत्र बनविले. विठ्ठलभक्तीचा इतका उत्कर्ष पुन्हा झाल्याचे

दिसत नाही. मनामनांनी बांधलेली ही विठ्ठलपूजा म्हणजे मराठीतील भावकविता झालेली अभंगरचना होय. कीर्तनाच्या आश्रयाने आणि विठ्ठलाच्या साक्षीने ती फुलत गेली, बहरली आणि घराघरातून कुटुंबाकुटुंबातून वस्तीवस्तीतून हरिनामाचा संकीर्तनाचा आनंदसोहळा साक्षात झाला. 'सांडोनि कीर्तन नकरी आणिक साधन' असे **सेना न्हावी** म्हणतो.

विटेवरी उभा नीट करावरी कर । वाट पाही निरंतर भक्ताची गे माय
श्रीमुकुट रत्नाचा ढाळ देती कुंडलाचा । तुला खोविला मोत्याचा तो गे माय
कंठी शोभे एकावली तोडर गर्जे भूमंडली । सोनसळा पीतांबर बीद वागवी मनोहर
सेना बंदी निरंतर तो गे माय ॥
विटेवरी उभा जैसा लावण्याचा गाभा । विटेवरी उभा नीट देलिखा गे माये
निवाली कांती हरपला देहभाव । ते रूप पाहता मन माझे वेधले

असे प्रत्यक्षावलोकनाने सेनान्हावीने विठोबाचे वर्णन केले आहे. चोखामेळा म्हणतो. 'श्रीमुखाची शोभा कस्तुरी मळकट । उभा असे नीट विटेवरी । कर दोनी कटी कुंडळ झळकती । तेज हे फाकती दहादिशा । वैजयंतीमाला चंदनाची उटी ! टिळक तल्लाटी कस्तुरीचा ! वैजयंतीमाला किरीटकुंडले ! प्रेमे आलिंगिले चोखियाने ॥ सुंदर मुखकमल! कस्तुरी मळवटी उभा देखीला तटी भीवरेच्या । मकराकार कुंडले श्रवणी ढाळ देती । गळा वैजयंती पुष्पमाला । शंख, चक्र, गदा पद्म पद करी । गरुडवाहन हरी देखीयेला । रूप हे सावळे गोड ते गोजिरे । कांसे सोनसका नेसला पिवळा । वैजयंतीमाला गळा शोभे । चोखा म्हणे ऐसे सगुणध्यान ! विटेसमचरण ठेवियेले ! विठोबा देखणा विठोबा देखणा । योगियांचा राणा पंढरीचे ॥

असे चोखामेळ्याने विठ्ठलाचे मूर्तिवर्णन केले आहे. प्रत्येकच संतकवीला जाणवलेले विठ्ठलाचे रूप प्रत्यक्षानुभूतीतून आलेले आहे. पंढरीला जाऊन विठ्ठलाच्या राऊळी आपली भावांजली अर्पण करण्याचा जणू अभंगनिर्मितीत प्रयत्न आहे. सामूहिक पद्धतीने भजन-कीर्तनांची गर्दी यात्रेत जमून आली आहे. अशावेळी प्रत्येक संतकवीने स्वतःला जाणवलेली विठ्ठलमूर्ती वर्णन केली आहे. सगुणनिर्गुण, क्षराक्षर आणि द्वैताद्वैतापलीकडे असलेले चैतन्यतत्त्व हाच सर्व संतकवींच्या आत्मप्रतीतीचा आणि आत्माविष्काराचा अनुभवग्राह्य विषय होता. सेना न्हाव्याने तर त्रिंबकमाहात्म्य आणि आळंदीमाहात्म्यही वर्णिले आहे. यावरून महानुभाव कवितेत जसे स्थलवर्णन (स्थानपोथी) आणि मूर्तिवर्णन (मूर्तिप्रकाश) आले तसेच वारकरी संतांच्या काव्यातही ते आलेले आहे. यावरून हा एक उत्कट भक्ती प्रदर्शित करण्याचा मार्ग म्हणूनच अनन्य स्थान त्याला मिळाले आहे; ज्या देवतेची भक्ती करावयाची तिची यथासांग पूजा बांधावयाची व तिचा मूर्त आविष्कारही मनोभावे न्याहाळावयाचा हा एक साधनमार्ग कवितेतून गोचर झाला फरक इतकाच की महानुभाव कविता वेगळ्या वाटेने केली व संतकविता वेगळ्या वाटेने प्रवाही झाली. 'येऊनि नरदेहाशी वाचे उच्चारी ज्ञानेश्वरी । तयाचा संसार सुफल झाला गे माय । प्रत्यक्ष परब्रह्म येऊनि अवतारासी ।

तारिले जगासी नाम मात्रे । जयाचे अंगणी पिंपळ सोनियाचा । सिद्धसाधका चा मेळ तेथे । तयाचे स्मरणे जळति पातके । सांगत पंढरीनाथ सेना म्हणे । विष्णुचा अवतार सखा माझा ज्ञानेश्वर ॥ असे सेना न्हावी म्हणतो यावरूनही स्थळ भक्तिमहात्म्याच्या बाबतीत महानुभावीयांइतकेच वारकरी सांप्रदायिकही मागे नाहीत हीच गोष्ट प्रस्तुत स्पष्ट झाली आहे.

संतकवितेचे आदिरूपबंध

तेराव्या शतकांत सर्वच वाङ्मयाची निर्मिती ही संप्रदायनिष्ठ होती. राजकीय, भौतिक आणि व्यावहारिक जीवनातील परिवर्तने आणि चढउतार अतिशय क्षीणबलपद्धतीने या वाङ्मयातून गोचर झाले असले तरी संपूर्ण जीवनाशी आणि वास्तवाशी फारकत कोणत्याही कलावंताला घेता येणे अशक्य असते. असे कोणत्याही काळात घडत नसते ही गोष्ट खरी आहे, परंतु तेराव्या शतकात वास्तव जीवनदर्शनापेक्षा आध्यात्मिक जीवनदर्शनाचा मार्ग कलावंतांनी स्वीकारला. गद्य वाङ्मयाचा अपवाद वगळला तर तेराव्या शतकातील मराठी कविता ही वास्तव अनुभूती जीवनाच्या संदर्भात अभिव्यक्त करण्याऐवजी आध्यात्मिक जीवनानुभूतीच त्यांनी लक्षणीय मानल्या व त्यातून मराठी वाङ्मयाचा उदय झाला. आध्यात्मिकता स्वीकारल्यामुळे विशिष्ट तत्त्वज्ञानाचाही प्रभाव समकालीन कवींनी स्वीकारला व तो आपापल्या पद्धतीने जोपासला आणि अभिव्यक्त केला. महानुभाव कवी द्वैतमार्गाने गेले तर वारकरी कवी अद्वैती मार्गाने गेले. ज्ञानेश्वर आणि चक्रधर यांनी पुरस्कृत केलेले हे मार्ग होते. जीवनदृष्टीची समांतर निर्मिती सर्वच कवींच्या कवितेतून अभिव्यक्त झाली कारण ईश्वरकृपेने आणि भक्तिसंकीर्तनाने मोक्षप्राप्ती होते हा त्यांच्या समोरील आदर्श होता याच मार्गाने ज्ञानेश्वर-निवृत्तिनाथ आणि नामदेव गेलेले होते तो मार्ग आपला आहे ही मनोमन खुणगाठ बांधून गोराकुंभारापासून कान्होपात्रापर्यंतचे सर्व संतकवी आत्माविष्कार अभंगनिर्मितीतून करू लागले. यासाठी पुरावा म्हणून परिसाभागवत हा विचक्षण असूनही त्याने अभंगनिर्मिती केलेली आहे याचा देता येईल. किंबहुना जनाबाईसारखी अशिक्षित स्त्रीही थालीपाक, बालक्रीडा, पाळणे, जाते, विठ्ठलपंढरीमाहात्म्य उत्कटतेने ज्ञानेश्वरांचा आणि नामदेवांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन तल्लीनतेने आणि एकरसात्मकतेने गाते आहे ती देहभान विसरून ! यावरून जीवनदृष्टी जरी सर्व संतकवींची निश्चित झालेली असली तरी त्यांना जाणवलेला ईश्वरी साक्षात्कार आणि त्यांचे आर्त हे प्रत्येकाचे स्वतंत्र आणि स्वयंपूर्ण होते. एकीकडे आत्मभावनांचा आविष्कार तर दुसरीकडे समूहभावनांचे प्रगटीकरण लोकसंस्कृतीशी आणि लोकजीवनाशी नाते ठेऊन संतकवींच्या कवितेतून अभिव्यक्त झाले. पुराणकीर्तन प्रवचनांच्या ज्या लोकसंस्था गावागावातील मंदिरामंदिरात प्रस्थापित झाल्या होत्या त्यांचे गानसाधना म्हणूनही काही वेळा अभंग-निर्मिती झाली त्यामुळे तिच्यात विविधता आली आणि अनेकपदरीपणाही आला. विठ्ठल या देवतेची एकदेशीयता असूनही प्रत्येक कवीचा त्या देवतेसंबंधीचा अनुभव हा

वेगळा स्वतंत्र आणि केवल ठरला कारण प्रत्येक संत कवींच्या मनाच्या गाभाऱ्यातून उमटलेला 'आहतनाद' होता. शब्द होता. त्यात विठ्ठल मूर्तिवर्णन होते पंढरीचे किंवा आळंदीचे स्थळदर्शन होते, परंतु ते महानुभाव कवितेसारखे सांकेतिक झाले नाही कारण आध्यात्मिक अनुभवाच्या प्रगटीकरणाच्या वाटेवरील हे कवी मार्गस्थ असूनही कुठेतरी त्यांच्या मनाचे नाते त्यांच्या काव्यानुभवाने स्वीकारले व अभिव्यक्त केले. ईश्वर गुण-संकीर्तनात महानुभाव आणि वारकरी संप्रदायाची कविता पूर्णतः मग्न होती. परस्परांनी परस्परांची दखलही समकाळात घेतलेली नाही यावरूनही त्यांच्या एकरूप, एकसंध आणि तदात्म वृत्तिप्रवृत्तींचेच दर्शन घडते. ज्ञानेश्वर किंवा नामदेव यांनी महानुभावांचा कुठेही उल्लेख किंवा नाराजी व्यक्त केलेली नाही. तर जणू वारकरी संत कवितेचाच 'अकुंरला गाभा विराटाचा' असे त्यांच्या कवितेचे स्वरूप होते. वृक्षबीज न्यायाने संतकविता सर्वांगाने समृद्ध झाली, वाढत गेली, देखणी झाली.

संतांचा विवेकवाद

लौकिक जीवनातील विषमता एकदम नष्ट होणे शक्य नाही याची जाणीव ठेवूनच आत्मानुभूतीला प्रमाण मानून भक्तिमार्गात जातीभेदांना संतांनी थारा दिला नाही. व आपल्या अभंगकवितेतून रूढींवर, चालीरीतींवर, दंभावर, कर्मकाण्डावर कोरडे ओढले आणि प्रहार केला त्याच्याही परिणामांची पर्वा न करता प्रस्थापितांकडून छळही सोसला परंतु वृत्तीची निरामयता आणि शांतचित्ताची झळाळी कमी होऊ दिली नाही. संतकवींनी एक परंपरा निर्माण केली. पृथगात्म अशी काव्यनिर्मिती केली आणि नीतिशिक्षणाची एक प्रभावी आणि प्रचारी कीर्तनसंस्थाच जणू स्थापन केली. प्रत्येक संतकवीच्या कवितेत आर्तमनाची तळमळ शमल्यानंतरची जनास उपदेश, मनास उपदेश, मुमुक्षूस उपदेश अशी उपदेश प्रधानता संतकवींच्या कवितेला आली आहे. अभंगकाव्य हे एका अर्थाने दुधारी शस्त्र ठरले आत्मोद्धार आणि स्वजनोद्धार करण्याचा प्रयत्न अभंगातून झाला. समाजदर्शनातून समाजपरिवर्तनापर्यंतचा हा प्रवास ठरला. प्रत्येक कवीचे स्वतःचे असे एक नीतिशास्त्र होते, अचारसंहिता होती आणि साधनसुचिताहा व्यक्तपरत्वे भिन्न होती लोकसमूह संघटन आणि समूहमनावर उचित संस्कार हाही एक अभिप्रेत गुणधर्म संतकवींनी स्वीकारला होता. ज्ञानेश्वर वगळता सर्व कवींचा काव्यप्रवास म्हणजे त्यांचा आध्यत्मिक जीवनातील विकसनशील विविध पातळ्याच ठरल्या कारण जे हृदयात उचंबळून येते ते तितक्याच स्वाभाविकपणे ओठातून व्यक्त होते व त्यांची मानसचित्रे कवितेतून गोचर होऊ लागतात. सर्व संतकवितेतून आलेली संसृतिटीका आणि आत्मटीका ही त्यांच्या उत्कट प्रचाराची आणि प्रबोधनाची तळमळच स्पष्ट करते. तेराव्या शतकातील वाङ्मयाने अनेक नवे आदर्श निर्माण केले व पुढच्या काळाने अखंडपणे ते आत्मसात केले. त्यापैकी आत्म उद्बोधनाचा आणि समाजप्रबोधनाचा ठसा आणि संस्कार अजूनही मराठी कवितेने जोपासला आहे.

'चंदनाचे संगे बोरी या बाभळी । हे कवी टाकळी चंदनाची' असे म्हणणारा चोखामेळा आपला आध्यात्मिक अनुभव तितक्याच सहजतेने साक्षात करतो.

फुलाचे अंगा सुवास असे । फूल वाळलिया सुवास नासे
मृत्तिकेचे घट केले नानापरी । नाम ठेविले रांजण माथा घागरी
विराली मृत्तिका फुटले घट । प्राणी का फुकट शोक करी
चोखा म्हणे ऐसे मृगजळ पाही । विवेकी तये ठायी न गुंतेची ।।

असा विवेकवादाचाच पुरस्कार चोखामेळा करीत आहे. सर्वच संतकवींनी विवेकनिष्ठा आपला नीतीशास्त्राचा पाया मानली आहे. विवेकवादाचा पुरस्कार आणि त्यामुळे जीवनाला येणारा योग्य आकार याची अचूक जाणीव सर्व संतांच्या कवितेतून अभिव्यक्त झाली व समाजप्रबोधनाचे एक पृथक पर्व तेराव्या शतकात सुरू झाले. त्याचे उद्दिष्ट त्याचा परीघ मर्यादित असेल, परंतु सकलजनांना आपल्या अनुभवात वाटेकरी करून घ्यावे व त्यांच्यासह मोक्षमार्गाने जावे ही जी भावना विशेष प्रभावीपणे अभंग कवितेतून निर्माण झाली तिच्या मुळाशी विवेकनिष्ठेचे भावबळ होते. वयापेक्षा आध्यात्मिक अधिकार आणि जातीपेक्षा त्याचे भक्तिमार्गातील स्थान यावर संतकवींतील गुरूशिष्यसंबंध आधारले गेले याचे कारण विवेकवादातच आढळते भक्तिमार्गाचे उपासक आणि भक्तिरहस्याचे जाणकार असे त्यांच्या आत्मानुभूतीचे पोत होते. सर्वच संतकवींची भक्ती सुजाण आणि डोळस झाली आहे. ईश्वराची सर्वात्मकता त्यांना मनोमन पटलेली आहे. ईश्वराचा साक्षात्कार होताच संतमंडळी सुखावून जातात आणि भक्तिपूर्ण अनंत अभंगांच्या निर्मितीचा वर्षाव होतो. भक्ती आणि प्रीती हे संतकवींच्या अभंगाचे मुलायम पोत आहे आणि ईश्वरदर्शनातून मोक्षाची अनामिक तळमळ ही अभंगनिर्मितीच्या पाठची प्रभावी मूलभाषा आहे.

जवळजवळ सर्व संतकवींनी आपल्या समकालीन समानधर्मियांचा उल्लेख आपल्या अभंगातून केलेला आहे ही घटनाही परस्परांच्या स्नेहातील निरोगीपणा आणि प्रांजळपणाचेच प्रतीक ठरते. नामदेव चोखोबाचे गुरू तर खेचर नामदेवांचे गुरू किंवा चांगदेव मुक्ताबाईचे अनुग्रहित तर मुक्ताबाई निवृत्ति नाथांची अनुग्रहित असे परस्परांना गुरुशिष्याच्या नात्याने बांधली गेलेली अशी ही माणसे परस्परांविषयी नितांत आदर बाळगीत रचना करीत होते. हाच विशेष महानुभाव कवितेतही आढळतो. दामोदर पंडित आणि केसोबास यांची उत्कट मैत्री होती त्याचे प्रतीक म्हणून दामोदर पंडितांनी 'वछाहरण' हे आपले कथाकाव्य 'म्हणे मुनो केशी राजु' म्हणून त्याच्या नावावर प्रसिद्ध केले. हे एक उदाहरण झाले. महानुभाव कवितेत अशी अनेक उदाहरणे काढून दाखविता येतील. गुरुशिष्यामधील निखळ स्वच्छ भावसंबंध आणि सहकाऱ्यांविषयी आणि समकालीनातील उत्कट स्नेह यामुळेही तेराव्या शतकातील कवितेला एक वेगळेच रूपलावण्य आलेले आहे. अभंगकवितेत तर परस्परांनी परस्परांचे पारमार्थिक श्रेष्ठत्वाविषयीची

स्वजाणीव अभिव्यक्त करण्यात कसूर केलेली नाही इतकी मनाची प्रांजळता अन्यत्र कुठे दिसणे शक्य नाही.

लौकिक जीवनात छळ झालेल्या आणि सोसणाऱ्या ज्ञानेश्वर, नामदेव, चोखामेळा, जनाबाई आणि इतरही संताना अभंगकवितेत योग्य सन्मानाचे स्थान मिळाले त्यांच्या कर्तृत्वाची योग्य भलावण समकालीनांनी आपल्या अभंगांतूनच केली. हाही एक गमतीचा योगायोग म्हणावा लागेल. विठ्ठलाशी तादात्म्य आणि समकालीन संतमंडळीत कमालीची आदरभावना यामुळे नामदेव, चोखामेळा आणि ज्ञानेश्वर क्षणकाल आपल्या लौकिक जीवनातील भीषणता कःपदार्थ म्हणून दुर्लक्षित करू शकले असतील इतके आत्मबळ आणि स्नेहबळ त्यांना भरभरून मिळाले आणि ते भवसागर तरून गेले ते सदेह अशा इच्छामरणाने आणि चोखामेळ्याच्या बाबतीत अपघाताने !

ज्ञानियांचा राजा ज्ञानेश्वर माऊली । खेचरा पोळली कृपासिंधू
ज्ञानदेवा चरणी खेचरा शरण । नामदेवा पूर्ण कृपा केली
नामदेव हात चोखियाचे शिरी । विठ्ठल ती अक्षरे उपदेशिले
बंका म्हणे माझा चोखा गुरुमाऊली । तयाचे पाऊली लोटांगण ।।

दिव्याने दिवा उजळावा आणि आसमंत प्रकाशमय होऊन जावा तसा वरील बंकाचा अभंग आहे. सोयराबाई, कर्ममेळा आणि निर्मला यांनी आपले कोंडलेले अंतःकरण अभंग निर्मितीतून मोकळे केले आणि त्यातून भक्तिधारा स्रवू लागल्या.

मुक्ताबाई, जनाबाई, सोयराबाई, निर्मळा या स्त्रिया जीवनातील गांजणुकीने नाही म्हटले तरी बेजार झालेल्या त्यामुळे त्यांच्या अभंगात एकप्रकारचा स्त्रीसुलभ फटकळपणा आणि सडेतोडपणा व्यक्त झाला आहे. मुक्ताबाईने इतरांचा अहंकार कमी केला तर जनाबाई, सोयराबाई आणि निर्मळा यांनी विठ्ठलाला बोल लावला. त्याला शिव्या दिल्या, त्याची निर्भर्त्सना केली आणि तरीही त्याचे लेकुरवाळेपण हळुवारपणे मायेच्या ममतेने कुरवाळले तेही जनाबाईनेच !

विठो माझा लेकुरवाळा । संगे गोपाळांचा मेळा
निवृत्ति हा खांद्यावरी । सोपानाचा हात धरी
पुढे चाले ज्ञानेश्वर । मागे मुक्ताबाई सुंदर
गोरा कुंभार मांडीवर । चोखा जीवा बरोबरी
बंका कडियेवरी । नामा करांगुळी धरी
जनी म्हणे गोपाळा । करी भक्तांचा सोहळा ।।

समकालीन संताच्या मांदियाळीच्या कर्तृत्वाचा योग्य आढावा नामदेवशिष्या जनाबाईने घेतला तर पुढच्या काळात तुकारामशिष्या बहिणाबाईने. 'ज्ञानदेबे रचिला पाया तुका झालासे कळस' असा मराठी काव्यकर्तृत्वाचा योग्य परामर्श घेतला.

उपसंहार

तेराव्या शतकातील अभंगकविता म्हणजे स्वतंत्रपणाने आणि सहजते ते स्फुरलेले भक्तिगीत होय. त्यातील साक्षात्कारी संतांची आत्मानुभूती आणि तिचा विलास यामुळे अभंग वाङ्मय कालनिरपेक्ष झाले. काळाच्या बंधनात मुळी तेराव्या शतकातील वाङ्मय-निर्मिती सापडतच नाही. एकाच वेळी भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळाची प्रतीती तेराव्या शतकातील वाङ्मयनिर्मिती देते अभंग कविताही तिला अपवाद नाही. निखळ पारपार्थिक अनुभूती संतकवितेतून ज्यावेळी अभिव्यक्त होऊ लागते त्यावेळी तीत दुर्बोधताही आलेली आहे. ईश्वरी साक्षात्काराची अनुभूती संतकवींनी प्रकाश माध्यमातून स्वीकारली तर अतींद्रिय अनुभूती रंगसंवेदनेतून आविष्कृत केली. ईश्वर आणि भक्त यातील अद्वैत अंतिमतः शिव आणि शक्ती, पती आणि पत्नी, प्रियकर आणि प्रेयसी या प्रतीकांतूनच अभिव्यक्त केल्याशिवाय संतकवींसमोर दुसरा पर्याय राहिला नाही, कारण ईश्वरी स्वरूपच आत्मानुभूतीचा विषय म्हणून स्वीकारला गेला तरी त्या संदर्भातील आपली अनुभूती अभिव्यक्त केल्याशिवाय तिचे अस्तित्व जाणणे अशक्य ठरले जाईल म्हणूनच की काय लोकजीवनातील स्त्री-पुरुष नात्यातील अत्यंत नाजूक आणि आदिम सृजन नात्यालाच विशेष प्राधान्य मिळाले. भारतीय कवितेत या प्रतीकाला महत्त्व मिळाले पण संतकवींनी अनेक नात्यातील नाट्य व्यक्त करून अंतिमतः विराणी, गौळण, सौरी यांमधून प्रकृती आणि पुरुष किंवा शिव आणि शक्ती किंवा प्रियु आणि प्राणेश्वरी यांची 'वोहरे' आणि 'मेहुणे' प्रतीक म्हणून स्वीकारली व त्यातून ईश्वर आणि भक्त यामधील अद्वैताची प्रत्ययोत्पादक अनुभूती टिपून घेतली.

संतकवितेचा मूळभाव हा प्रामुख्याने भक्तिभाव आहे आणि त्याच्या अभिव्यक्तीत परमात्म्याकडे आणि परमात्म्याच्या सगुण साकार स्वरूपाकडे एका वेगळ्या दृष्टीने कवी बघतात. हृदयीचे उभड, तळमळीतील आवेग, आणि उत्स्फूर्त आनंदोल्लास यामुळे संतकविता ही भक्तिपर भावकविता (Lyric of Devotion) ठरली. केवळ आत्म-निवेदनपरता तिच्यात आली नाही तर आत्मनिवेदनालाच मागून निघालेला आत्मा-विष्कार उत्कट ईश्वरभक्तीच्या संदर्भात साक्षात झाला. अशावेळी त्यात भावपरता आली आणि आध्यात्मिक अनुभवातील गूढता आली. ही गूढता अनेक संवेदनांच्या व्यामिश्रतेतून प्रगट झाली. संतकवींची कविता म्हणूनच एकीकडे अन्तर्मुख आत्मनिष्ठ झाली तर दुसरीकडे बहिर्मुख वस्तुनिष्ठ झाली. असे अनेक चढउतार तिच्यात निर्माण झाले. तिचे खळाळते पाणी वाहते राहिले म्हणूनच तिच्यातून पूर्वज आणि वंशज निर्माण होऊ शकले. तेराव्या चौदाव्या शतकात वाङ्मयाला आलेली अनेकांगी विविधतेपैकी अभंगनिर्मितीची निखळ स्वतंत्र आणि उत्स्फूर्त अशा धारेने मराठी वाङ्मयसरितेला अधिक रेखीव आणि कांतिमान

केले. आत्माविष्काराने अनुभूतीची बंद कवाडे उघडून हृदयीच्या विठ्ठलमूर्तीलाच आपल्या काव्यनिर्मितीची कुसुममाळा संतकवींनी अर्पण केली. चौदाव्या शतकानंतर महानुभाव वाङ्मय सारेच सांकेतिक लिप्यांमध्ये बंदिस्त झाले. इस्लामच्या आक्रमणामुळे जी जीवन-मूल्ये आणि नीतिमूल्ये जीवाच्या आकांताने सांभाळली होती त्यांचाही विध्वंस झाला तो 'याची डोळा याच देही' बघण्याची पाळी नामदेवावरही आलेली होती तरी त्यांचे मनोधैर्य खचले नाही याला कारण त्यांनी स्वीकारलेला नामसंकीर्तनाचा भक्तिमार्ग हे होय! वारकरी संतकवितेला सांकेतिक लिपीत जावे लागले नाही, उलटपक्षी ती नित्य पठणाचा विषय झाल्यामुळे तिच्यात प्रत्येक पिढीतील कवींनी आपल्या पदरचे अभंग मिसळून दिले म्हणून आज अस्सल व नक्कल याविषयी संशोधकांत एकमत होऊ शकत नाही इतकी लोकमानसाशी संतकविता एकजीव झालेली होती. संतकवींनी कठोर आत्म-परीक्षण निरीक्षण आणि संशोधन केले होते. तिच्यात आत्मरता आली याचे कारण कवींनी स्वतःचीच स्वतः घेतलेली परीक्षा होय.

विविध पातळीवर जीवन जगणारे विविध जातीजमातींचे लोक, स्त्रीपुरुष, मुलेमाणसे हे एकाच विठ्ठलसूत्राने बांधले गेले होते व एका अनामिक शिस्तीने त्याचा साधनमार्ग आणि आचारधर्म स्वीकारीत होते म्हणून महाराष्ट्रात आध्यात्मिक लोकशाहीची सुरुवात झाली व नवविधा भक्तीच्या साह्याने ईश्वरी साक्षात्कारावस्थेप्रत संतकवी पोहचू शकले. ज्या काळात स्त्री ही ईश्वरीमार्गातील अडसर वाटत होती अशाच काळात आपल्या संथ मंगल-मय आणि प्रभावी व्यक्तिमत्त्व लाभलेल्या मुक्ताबाई, जनाबाई, निर्मला, सोरयाबाई, कान्होपात्रा या स्त्रियांनी आपला पारमार्थिक अधिकार सिद्ध केला.

कीर्तन प्रवचनांसाठी पुराणांची परंपरा अभंगकवितेने स्वीकारली तर आत्मानुभवाच्य प्रगटीकरणासाठी आत्माविष्कार स्वीकारून कवितेत नवताही आणली. भक्तिभावाने अन्वित असलेला शांतरस शृंगाराच्या माथ्यावर पाय ठेऊन गौरवाने मिरवू लागला. एका आविष्कार स्वातंत्र्याचे सुख पुरेपूर उपभोगणारी अशी पहिली मनमुक्त भावकविता म्हणून ज्ञानेश्वर, नामदेव आणि त्यांची संतप्रभावळ यांच्या अभंगनिर्मितीचा विचार करावा लागतो व त्यातून निर्माण झालेली मराठी संस्कृती, तिचे वेगळेपण आणि सातत्य यांची उजळलेली दिशा अभंगातूनच समजू शकते. म्हणूनच नामदेव म्हणतो–

नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावु जगी ॥ असा कीर्तन आणि अभंग यांचा संबंध आहे. तत्त्वचिंतन आणि काव्यात्मकता कवितेत येऊन पहिली रोमॅन्टिक पद्धतीची काव्यनिर्मिती अभंगातून झाली. तत्त्वविचारालाही जीवनसंदर्भ दिला आणि मराठी कवितेचे क्षितिज विस्तृत झाले. वारकरी संप्रदायाला विचारबळ आणि विशेषतः भावबळ अभंग-कवितेकडून मिळाले. ज्ञानोत्तर भक्तीपेक्षा नामभक्ती आणि सगुणभक्तीचा विशेष प्रभाव जनसामान्यांवर पडला. कर्मज्ञानभक्ती यांचा पृथगात्म अन्वयार्थ ज्ञानेश्वरांनी लावताच नामसंकीर्तनातून तत्त्वज्ञानाचे सुलभीकरण होऊन नवा उन्मेष, नवी दिशा आणि नवे

खळाळ अभंगातून वाहू लागले. सुगमभक्तीचा पुरस्कार अभंगांतून झाला तर निर्गुण, निरवयव आत्मतत्त्व स्वरूपाचे चिंतन भाष्यकाव्यातून झाले. यामुळे तत्त्वचिंतन आणि भावचिंतन एका ईश्वरीरूपाच्या संदर्भातच झपाटलेपणाने होऊन गेले. कवितेत नादात्मकता, लयपद्धती, श्रुतिसुभगता, प्रासादिकता ही संगीतकलेमुळे प्राप्त झाली तर कीर्तनपरंपरेमुळे प्रत्यक्षानुभूती अभंग कवितेत उतरली. घनता आणि तत्त्वसंपन्नता यामुळे अभंग, [illegible] संपूर्ण कालखंडालाच झपाटून टाकले. ज्ञानेश्वर नामदेवांनी तिची सुरुवात केली. ज्ञा[illegible] कविता म्हणजे केवळ मराठी कवितेची गंगोत्री न राहता एका प्रचंड महासागराच्या तत्त्वविचाराला आणि काव्यविचाराला आले. आकाशाची निळाई, सूर्याचा प्रका[illegible] चांदण्याची शितलता आणि पहाटेचा उबदार गारठा, समुद्राची अथांगता, वा[illegible] वेगवानता, पावसाची आर्द्रता आणि पृथ्वीची सृजनता यांचे संमीलन ज्ञानेश्वर[illegible] तत्त्वानुभवात आणि भावानुभवात झाले. निसर्गाला इतक्या अनंत भूमिकांतून आणि ज्ञानेश्वरांनी न्याहाळले की त्याचा फार मोठा परिणाम नामदेवांपासून पुढील [illegible] झाला. ज्ञानेश्वरांची अभंगवाणी आणि एकूण सर्वच कविता मराठी कवितेचे आदि दी[illegible] आणि आदि स्वरूपकेंद्र बनली ती आजपर्यंत !

□ □ □

परिशिष्ट १

संदर्भ ग्रंथ

ाथा	....	....	(सरकारीप्रत)
गाथा	....	....	(सरकारीप्रत)
वरित्र	....	....	(आवटेप्रत)
तपाठ	....	....	डॉ. वि. भि. कोलतेप्रत
पाठ	....	....	डॉ. शं. गो. तुळपुळेप्रत
चे धवळे	...	....	डॉ. य. खु. देशपांडे
क्मणी स्वयंवर	....	....	वा. ना. देशपांडे
ानुभव	....	....	डॉ. वि. भि. कोलते व डॉ. सुरेश डोळकेप्रत
खपासष्टी	....	....	ज्ञानेश्वर
र नवदर्शन	....	....	ज्ञानेश्वर
र चरित्र	....	....	(सरकारीप्रत)
			डॉ. वि. भि. कोलते

मुकुंदराज ते नामदेव अखेर (शके १११० ते १३५०) मराठी साहित्याचे विविध रूपप्रकार

काव्य (ओवी अभंग)

तत्त्वचिंतनपर भाष्य निरुपण

विवेकसिंधू

ज्ञानेश्वरी

अमृतानुभव

चांगदेवपासष्टी

उद्धवगीता

ज्ञानप्रबोध

कथाकाव्य

दीर्घ (महाकाव्यपर)

रुक्मिणीस्वयंवर

शिशुपाळवध

सह्याद्रिवर्णन

ऋद्धिपूरवर्णन

स्फुट (आख्यानपर)

वछाहरण

नामदेवाची आख्याने

जनाबाईची आख्याने

निवृत्तिनाथांची आख्याने

महदंबेचे धवळे

चरित्रकाव्य

आदी-समाधी-तीर्थावळीचे अभंग

सह्याद्रिवर्णन

ऋद्धिपूर वर्णन

मूर्तिप्रकाश

तीर्थमाळिका

पूजावसर

स्फुटभाव-काव्य

ज्ञानदेवांचे अभंग

हरिपाठ

नामदेवाचे अभंग

धवळे मातृकि रुक्मिणी स्वयंवर

मुक्ताबाई अभंग

सोपानदेवाचे अभंग


निवृत्तिनाथ अभंग

चोखामेळा-गोराकुंभार-सावतामाळी-सेनान्हावी

हिंदी रचना नामदेवाचे अभंग

पंजाबी रचना नामदेवाचे अभंग

तेराव्या शतकातील गद्याचे स्वरूप



॥ व्यक्तिनाम सूची ॥

अनेराजबास १७
अणे मा. श्री. २५
एकनाथ २६, १०३, ११२, १२०, २२१
एन्थोवेन आर. इ. १४४
कान्होपात्रा ५, ९९, २५०, २५२, २५४
कानोले वि. अ. २५
कुलकर्णी कृ. पां. २५
केशवमुनी विराटदेशे ९८
केसोबास १७, २५, २६, ६५, ६८, ६९, ७०, ७२, ७३, ७५, ७८, १०१, २७०
कोलते वि. भि. ५०, ७२, ८३, ८९, ९५, ९६, ११७, १२२, १२४, १४२, १४३
गोराकुंभार ५, १२, १३, ९९, २४९, २६५, २६६, २६७, २७०, २७१
गोविंदप्रभू ७, ६२, ८०, ८१, १०२, १०३, १०९, ११०, १२८, २०७
चक्रधर ४, ७, ८, ९, १०, १२, १७, १८, २५, ३१, ३८, ४४, ते ६०, ७२, ७७, ८०, ८१, ८२, ९७ ते १००, १०१, १०२, १०३, १०६, ११०, १२७, १२८, २५०, २५१
चोखामेळा ५, १२, ३२, ९९, २४६, २४९, २५२, २७१
चांगदेव १२, १३, ८०, १०२, २०९, २४९, २५२, २७१
जनाबाई ५, १२, ८०, ९३, ९९, २४६, २४९, २६१, २७१
जोशी ना. ग. १२२, १२३
डोळके सुरेश २५, ११७
ढेरे रा. चिं. ३१
तुकाराम ११८, २४६, २४८, २४९
तुळपुळे शं. गो. २५, ७२, ८४, ८६
दामोदर पंडित ४, १७, ७३, ८०, १०२, १०४, ११२, १३९, २७०, २७१
देशपांडे य. खु. २५, ५२, ७२, ९६
देशपांडे वा. ना. १०९, १११, ११५, १२१
देशमुख मा. गो. १३६
धोंड म. वा. १५६
नरहरी सोनार २६६, २६७, २७१

नरेन्द्र ४, ११, १६, २०, ३९, ८०, ९३, १०२, १०३, १०८, ११५, ११६, ११८, १ ९, १२०, १२३, १२४, १२६, १२७, १२८, १२९, १३५, २५०
नागदेवाचार्य ७, १०, १५, ५०, ५५, ५९, ७३, ८१, ८३, ८४, ९७, ९९, १००, ११०, १२८
नागेश १ ८
नामदेव ४, ५, ८, ९, ११, १२, १३, २०, २४, २५, २६, ३०, ४३, ४४, ४८, ९९, १०२, १०, ११८, २२३, २२५, २२७, २२८, २३६, २३७ ते २४६, २४९, २५०, २६२, २६४ २६५, २७१
निरंजनमाधव २१०
निवृत्तिनाथ १२, २४९, २५१, २५४, २५६, २५८
नेने ह. ना. ८७, ९६
पटवर्धन वा. ब. ११४
पारखे व. वि. ९२
पेंडसे शं. दा. २१२
फाटक न. र. २५
बहिणाबाई २२९, २७४
बेंद्रे द. रा. १११
भास्करभट्ट बोरीकर ४, १६, ९९, १०० १०२, १०५, ११६ ११९, १३५
भीष्माचार्य १७
मम्मट १७, १८, ८३, ९९, १००, १०१, १०९, १२८
महदंबा ४३, ६२ ते ७०, ८२, ९३, ९९, १०२, १०८ ते १३०, २५०
महीपती २१०
मुकुंदराज ३, ४, १०, २० ते ३८, ४३
मुक्ताबाई ७, १२, ४३, ९३, ९९, १२९, २४९ ते २७१
मोरोपंत ५, १२१
म्हाइंभट्ट १२ ते २५, ४५, ५३, ५५, ५७, ५८, ८०
यशवंत ५
रवळोबास ४, ९९, १००
राजवाडे वि. का. २५
रामदास २९, ७३
रामानुजाचार्य २७, ३४, १४१
लक्ष्मेंद्र १७
वाटवे के. ना. १२२

विठ्ठल कवी ११९, १२१
विसोबा खेचर १३, २४९, २५२, २७१
विश्वनाथ ४, १७, ९९
शंकराचार्य १०, २६, ३४, ३५, ३७, १४१
सामराज १२०, १२१
सावतामाळी ५, ९९, २४९, २५२, २७२
सेना न्हावी १२, २४९ २५२, २६३, २७१
सोपानदेव १२, २४९, २५२, २५४, २६०, २७१
सोयराबाई ५, २४९, २५२, २७१
ज्ञानेश्वर ४, ५, ८ ते १६, २० ते ५०, ५१, ५२, ८०, ९३, ९८, १०२, १०६ ११५, ११९, १२६, १३५, १४१, २०९, २१२, २१४ ते २२०, २२३, २२५, २३५, २४१, २४५ ते २७१, २७८, २७५
श्रीधर १२१
श्रीपतिभट्ट ४३

REFBK-0023583

□ □ □

मराठी ग्रंथ संग्रहालय पुणे
२९३७
क्र. क्र. २३५८३
निबंधपालव
संग्रह : याचा (स्थळ प्रत)